# बखर मराठ्यांची



लेखक : ग्रँट डफ़ (१८१८)

First Published in 1823 by Longman's London

# बखर मराठ्यांची

ग्रँट डफ़

First Published in 1823

by Longman's London

ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून ते जास्तीत जास्त लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचावे या उद्देशाने इथे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान ही मराठी साहित्य इंटरनेटवर जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध व्हावे व वाचले जावे यासाठी काम करते. नवीन मराठी लेखक कवींना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे हाही उद्देश आहे. त्याचबरोबर मुंबई पुण्याबाहेरच्या वाचकांना विशेषतः ग्रामीण भागातील वाचक आणि विदेशातील मराठी मंडळींना मराठी पुस्तके विनासायास विनामूल्य मोबाईलवर किंवा कॉम्प्युटरवर मिळावीत हाही उद्देश आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor, eternity,

eastern express highway

Thane, 400604

Digitized by the Internet Archive
in 2008 with funding from
Microsoft Corporation

http://www.archive.org/details/historyofmaratha00duffuoft

# HISTORY

*of the*

# MARAT,HAS

*Translated from the English Origenal*

*of*

**CAPTAIN GRANT DUFF**

*by*

**CAPTAIN DAVID CAPON**

BOMBAY

*January 1830.*

LIBRARY
1968
UNIVERSITY OF TORONTO

# बखर

# मराठ्यांची

क्यापटन ग्रांट डफ याणीं
इंग्रेजींत केलेली तीचें

भाषांतर

क्यापटन डेविड केपनसाहेब याणीं महाराष्ट्र भाषेंत
केलें

मुंबई

जानेवारी सन १८३०

# मराठ्यांचीबखर

सन् हजार

एकमारें मुसलमानलोक

हिंदुस्थानांत संचार करूं लागल्या पासून

सन् अठराशें अठरांत मराठ्यांचें

राज्य इंग्रेजांनीं

घेतलें तोंपर्यंत ही बखर.

मुंबई मध्यें सरकारी छापखान्यांत

छापिली सन् इसवी अठराशें

एकुणतीस

## बखर लिहिण्याचें कारण.

कोणी ह्मणेल कि ही बखर कोणी कशी निर्माण केली. व करण्याचें कारण काय; तर त्याणें असें समजावें कि बाजिराव असतां, अल्फिष्टन साहेबाच्या हाताखालीं कारभार चालविणारा, कप्तान ग्राट साहेब पुण्यास होता. तो पुढें बाजिराव गेल्यावर सातान्यास नेमिला. तो तेथें असतां, त्याचा मनांत आलें कि महाराष्ट्र लोक इतक्यायोग्यतेस कसे चढले, ते समजावयास त्या लोकांचें प्राचीन वृत्त ध्यानास आणिलें पाहिजे. तेणेंकरून विलायतेंतील लोकांसहि विदित होईल, ह्मणोन त्याणें बहुत जागचे पुरातन लेख जमा केले. त्यांत कित्येक कोणी आपले संतोषें करून दिले, व कित्येक त्याणें द्रव्य खर्चून घेतले; याशिवाय सरकारचीं दफ्तरें, पुणें आदिकरून जितके जागीं होतीं, त्या सर्व जागींचे पुरातन लेख आणिले. याशिवाय जागा देवस्थानीं पूर्वींचीं देवास अग्रहार करून दिलेलीं पत्रें; तीं, व कोणी मोठे सरदार लोक यांस जहागिरीचा सनदा करून दिलेल्या त्या, व मुसलमानांनीं लिहिलेल्या बखरा, व पूर्वीं साहेब लोकांनीं लिहिलेलें हिंदूंचें वृत्त; यांतील सर्व गोष्टींचा बहुत विचार करून, व त्या त्या समयविशेषाचाहि शोध करून. त्या सर्व विस्तारांतील सारांश निवडून, आपले बरोबर घेऊन विलायतेस गेला. आणि तेथें इंग्रेजी भाषेंत त्याची बखर लिहून छापिली; तिचीं तीन बुकें आलीं. त्यांतील गोष्टी महाराष्ट्र मुलखीं लोकांस फार हितावह आहेत शा समजून सरकार कंपेनी इंग्रेज बहादुर यांचे आज्ञेवरून, कप्तान केपिन साहेब याणीं बाबा साने यांचे साहाय्यानें, ती इंग्रेजी भाषेची बखर, मराठी भाषेंत लिहून, सन अठराशें एकुणतिसांत मुंबेमध्यें छापिली.

## देशमर्यादांची गोष्ट.

देशमर्यादा करणारे जे हिंदू, त्याणीं नर्मदा व महानदी या दोहींचा दक्षिणदेशाचे विभाग मुख्य पांच केले. त्यांचीं नावें. एक द्रविडदेश; दुसरा कर्नाटकदेश; तिसरा आंध्रदेश; त्यासच तेलिंगण ह्मणतात. चवथा गोंडवणदेश; पांचवा महाराष्ट्रदेश.

द्रविडदेशाची मर्यादा; रामेश्वरापासून मद्रासेचे उत्तरे पर्यंत. कर्नाटकदेशाची मर्यादा; पूर्वेकडे विंध्याद्रीचें टोंक, पश्चिमेस सह्याद्रीचे टोंक, या दोहोंमध्यें जितका उंच प्रदेश; तो कर्नाटकदेश. त्याचा उत्तर दिशेचे मर्या-

देचें

देचें टोंक, तेलिंगण व महाराष्ट्र या दोंहीमध्यें, मांजरा नदीपर्यंत आहे; तेलिंगणदेशाची मर्यादा द्रविडदेशाचे उत्तरे पासून, उत्तरप्रांतीं शिकाकोळ शहर पर्यंत. गोंडवणदेशाची मर्यादा; तेलिंगण व महानदी या दोंहीचा मध्यें जितका प्रदेश तो. महाराष्ट्र देशाची मर्यादा, चांदोगजवळचा पर्वत व कोळवण, व बागलाण, व खानदेश उत्तर मर्यादा. असें ज्योतिषशास्त्रांत आहे; परंतु भाषाभेदेंकरून पाहिलें असतां, महाराष्ट्र मुलुख उत्तरेकडे सातपुडा पर्वत, व नर्मदेपाशीं नांदोड शहर पर्यंत आहे. त्याची पूर्वेची मर्यादा, नागपुराचे पूर्वेस, वेनगंगा नदी, व वरदानदी यांचा संगम होऊन ती नदी तेथ पासून माणिकदुर्गपर्यंत वायव्यवाहिनी जाली. तेथून पुढें पश्चिमवाहिनी माहुर पर्यंत गेली. त्यापुढें त्या देशाची मर्यादा, नीट दोरी सारिखीच नाहीं; वांकडी तिकडी होत होत निर्ऋतीचे दिशेस गोमंतकपर्यंत गेली. या इतक्या देशांत, बहुधा महाराष्ट्र भाषा आहे; सुरत व भडोज व राजपिंपळी, यांत गुजराथी भाषा आहे, यांचा आसमंतात गुर्जर देश. त्याची व महाराष्ट्रदेशाची भेदमर्यादा सुरतेचे दक्षिणेस दमान बंदर आहे. त्या पासून राजपिंपळी पर्यंत.

महाराष्ट्रदेश फार मोठा, आणि त्याची भाषा बहुधा एकसारिखी व त्यांतील ब्राह्मणाचा मोठ्या समुदायाचें नाव महाराष्ट्र ब्राह्मण; त्यावरून असें वाटतें किं दक्षिणेंत मुसलमान लोकांचा संचार होऊं लागल्याचे पूर्वी, यासर्व मुलखाचा राजा एक असेल, परंतु याचा निश्चय करितां येत नाहीं; कां किं पुराणांतरीं+ जशा देवादिकांचा कथा लिहिल्या, त्याप्रमाणें हें लिहिलें नाहीं. यामुलखांतील मुळचे रहाणारे कोण तो सिद्धांत होत नाहीं. पुराणांत लिहिलें आहे किं, महाराष्ट्र मुलखांत मुळचे रहाणारे घडशी लोक; ते वाजंत्री लोकांत मुख्य, आणि जातीचे नीच आहेत. कावेरी आणि गोदावरी या दोंहीं मध्यें, दंडकारण्य देश तो रावणाचे स्वाधीन होता; तेह्मां त्याणें आपले वाजंत्री घडशी यांस दिला. याप्रमाणें पुराणांत आहे, याविषयीं दुसरी गोष्ट ती अशी; इशवी सनाचा आगोधर अडीजशें वर्षे हिंदूंचा मुलखांत एक

---

\+ पूर्वी कोणी एक परशुराम नामें अवतारी पुरुष आला; त्याणें क्षत्रियांस जिंकून त्यांचा मुलुख ब्राह्मणास दिला; तेह्मां ते ब्राह्मण त्याला त्या मुलखांत राहूं देईनात. मग तो सह्याद्रिशिखरावर जाऊन, आपणास रहावयाकरितां समुद्रापाशीं जागा मागूं लागला. त्यासमयीं समुद्र त्याचें ऐकेना; यास्तव त्याणें तेथून एक बाण मारिला. तेह्मां त्यास भिऊन तो बाण पडे तोंपर्यंत समुद्र माघारा हटून गेला. त्याणेंकरून जी जागा रिकामी जाली, तीचें नाव कोंकण, असा पुराणांत लेख आहे.

मोठी

मोठी ता+गारानामें राजधानी होती. तेथें मिश्रमुलखाचे व्यापारी लोक येतजात असत. त्यापुढें कोणी एक शालीवाहन नामें नीच जातीचा पुरुष शककर्ता जाला. त्याणें त्या शहरीं राज्य केलें; तो राजा सन इशवीचे सत्त्याहात्तर अठ्याहात्तर सुमारें जाला. त्यादिवसापासून हिंदूमध्यें त्याचे नावें शक चालूं लागला.

या बरवरींत सन इशवी तारिखा मात्र लिहिल्या, हल्लीं सन अठराशें एकुणतिसांचे चवथ्या महिन्याचे पहिले तारिखेस हिंदूंचें शकेसत्राशें एकावन्नावें वर्ष चालतें होणार.

---

\+ तागारा नामें शहर, कोठें होतें तें आतां निश्चयें करून लिहितां येत नाहीं. परंतु हल्लीं गोदावरीचे कांठीं भीरनामें एक गांव आहे, त्याचे ईशानी दिशेस असेलसें वाटतें.

# सर्वभागानुक्रमणिकापत्र.

## सन हजारापासून चौदाशें अठ्याहत्तरपर्यंत. भाग पहिला.

१

मुसलमान लोकांनीं दक्षिण घेतल्याचा प्रकार. ते लोक नर्मदा उतरून देवगडपर्यंत संचार करिते जाले. तें शहर मुसलमान लोकांनीं आपली राजधानी करून, त्याचें नांव दवलताबाद ठेविलें. त्या लोकांमध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन मुसलमानाचे राज्याचा दोन फळ्या जाल्या. ब्राह्मणी वंश बादशाहाचे राज्याची गोष्ट. तें राज्य असतां, मराठी लोकांचें काय काय वर्तमान जालें तें प्रकरण. दुर्गादेवी नामें मोठा दुष्काळ पडला तें. त्यामुळें मुलुख ओस पडला, आणि किल्ले भलत्याचे हस्तगत जाले. त्याचा बंदोबस्ताकरितां, बादशाहाचें सैन्य निघालें. दादू नरसू काळे याणीं सरकारचे वसुलाचा बंदोबस्त केला. आणखी दोन वेळा राज्याचे बंदोबस्तास, बादशाहानें लश्कर योजिलें.

मुसलमानांनीं कोंकणपट्टी जिंकिली. ब्राह्मणी बादशाहाचे वंशाची समाप्ति, कोणे प्रकारें जाली तें.

## चौदाशें अठ्याहत्तरांपासून सोळाशें सदतीसपर्यंत भाग दुसरा.

२

ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडाल्यावर, पांच राज्यें उत्पन्न जालीं; त्यांतून कांहीं दिवसांनीं दोन बुडालीं, आणि तीन राहिलीं; त्यांत एक अहमदनगर, दुसरें विजापूर, तिसरें गोवळकोंडें, या तिहीं राज्यांचे चतुःसीमेचा प्रकार. मुसलमान लोकांचे राज्यांत, मराठे लोक कोणे रीतीनें वागत होते, तें, व मुसलमान लोक मराठ्यांची योग्यता कशी ठेवीत होते तें. अहमदनगरचे बादशाहानें आपलें वजिरीचें काम ब्राह्मणास सांगीतलें, त्याच वेळेस विजापुरचे बादशाहानें ब्राह्मणाचें माहात्म्य वाढविलें. फिरंगी लोक जहाजावर बसून आले. आणि कोंकणांत शिरून, गोवें घेतलें. आणखी मोठा उपद्र-

व करून कोंकणचा वसूल घेतला. नालिकोटाजवळचे लढाईचा प्रकार. विजयानगरचें राज्य बुडालें तें प्रकरण. विजापुरचा बादशाह व अहमदनगरचा बादशाह, हे दोघे मिळोन फिरंगी लोकांशीं लढले. परंतु जय न पावले. महाराष्ट्र देश वकुन करून, विजापुरकर, व अहमदनगरकर, यांचे हस्तगत जाला. अहमदनगर, व विजापूर, व गोंवळकोंडे, हीं तीन राज्यें कोणकोणत्या प्रकारें चालत होतीं तें. या राज्यांत राहाणार जे मराठे लोक, त्यांस आप आपला धर्म निरनिराळा ह्मणून, परस्परें युद्ध करावें लागलें. विजापूर, व अहमदनगर, या दोहों राज्यांत जितकीं मराठी कुळें होतीं त्यांचें, वृत्त. उत्तरेकडून मोंगल लोकांचें सैन्य दक्षिणेचें राज्य घ्यावयास आलें. दिल्लीचा आकबर बादशाह दक्षिण जिंकावयास आला, त्या वेळेस काय काय वर्तमान जालें तें, व तो मरण पावला ते समयीं काय जालें तें. मल्लीकंबराची वर्तणूक, व लखजी जाधवाचें वृत्त. शाहाजी भोंसल्याचें वर्तमान. दिल्लीचा बादशाह जहानगीर, याचे मरणाचा प्रकार, व त्याचा पुत्र, शहाजहान याचें स्थापन. मोंगल लोकांनीं विजापुरकराचे लष्कराचा पराभव केला तो. विजापुरकर, व अहमदनगरकर, यांचा तह ठरला. मोर्तिजानिजाम, अहमदनगरचा बादशाह, त्यास फत्तेखानानें मारिलें. मोंगल लोकांनीं शहाजी भोंसल्यास द्यावयाकरितां जे मुलुख कबूल केले होते, ते फत्तेखानानें मोंगलांशीं स्नेह करून आपणास घेतले. यास्तव शाहाजी भोंसले विजापुरकरास मिळाले. मोंगल लोक, व फत्तेखान, यांचा सलूख जाला असतां, फत्तेखानानें मोडिला; ह्मणून त्यांचा व याचा युद्धप्रसंग पुनः जाला. शाहाजी भोंसल्यानें अहमदनगरचें राज्य चालविलें. दिल्लीचा बादशाह शाहाजहान कोणे प्रकारें राज्य करित होता तें. विजापुरकर यांशीं शाहाजहानानें युद्ध केलें. आणि त्यांचा व याचा सल्ला जाला. मोंगल लोकांनीं शाहाजी भोंसल्यास जिंकल्यावर, तो विजापुरकरांचे चाकरीस राहिला; त्या पुढें बहिरीवंश बुडाला.

सोळाशें सतनिसापासून सोळाशें अठ्ठेचाळीस पर्यंत भाग तिसरा

३

शहाजी विजापुरकरांचे चाकरीस राहिल्यावर, कसा वागत होता. मग त्याणें दुसरी बायको केली. त्याचा पहिल्या बायकोचे दोघे पुत्र, एक संभाजी, एक शिवाजी. दुसरीचा एक व्यंकोजी.

तो शहाजी करनाटकांत गेला ते समयीं त्याणें, आपली बायको जिजाबाई व पुत्र शिवाजी यांस आपलें जहागीर ठिकाण पुणें, येथें पाठविलीं. आणि त्यांचा बंदोबस्त दादोजी कोंडदेव यांस सांगीतला. विजापूर सरकार, व गोंवळकोंड सरकार, यांचीं लक्ष्यें कोणे प्रकारचीं होतीं तें. मोंगल दक्षिणेचा वसुलाचा बंदोबस्त करिता जाला तें, आणि त्याणें फसली तारीख कधीं स्थापिली तें वर्तमान. दादोजी कोंडदेव याणें वसुलाचा बंदोबस्त कसा केला तो. मावळे लोक यांची हकीकत. शिवाजीचे रक्षक यांणीं त्याचे बाळपणीं, त्याला कोणते प्रकारें वागविला तें. त्या शिवाजीचे पक्षपाती पहिले तिघे कोण होते तें प्रकरण. त्याणें तोरणा किल्ला घेतला; तो आपणाकडेसच रहावा म्हणून बादशाहास काय काय समजाविलें तें. राजगड किल्ला बांधिला शिवाजीनें तें वृत्त. दादोजी कोंडदेवाचा मृत्यु. चाकणकिल्ला व कोंडाणें किल्ला, याचे लोक शिवाजीनें आपणास अनुकूळ केले. सुपेपरगणा व पुरंदर किल्ला, शिवाजीनें घेतल्याचा प्रकार.

सोळाशें अठ्ठेचाळिसांपासून सोळाशें सत्तावन्न पर्यंत भाग चवथा

४

शिवाजीनें घेतलेल्या मुलखाचे सभोंवते, कोण कोणते अधिकारी व जहागीरदार होते तो प्रकार. वाडीचा सावंत, आणि जंजिऱ्याचा शिद्दी, याचें प्रकरण. शिवाजीनें छापा घालून बादशाहाचा खजिना लुटला. त्या शिवाजीनें कितिएक किल्ले युक्तीनें घेतले. कालियाणी परगणा घेतला तो विस्तार. विजापुरचे बादशाहानें शहाजीला कैद करून, विजापुरी आणविला; त्याची सुटका कोणे प्रकारें जाली तें. तो शहाजी करनाटकांत

कांन गेला. आणि आपला पुत्र संभाजी यास. कोणी किल्लेदाराचे पारिपत्यास योजिला; तो मृत्यु पावला. शिवाजीनें जावळीचा राजा घातानें मारविला. आणि त्याचा मुलुख घेतला. शिवाजीनें पहिला पेशवा. शामराज नामें ब्राह्मण केला. सन सोळाशें छत्तिसांपासून मोंगलांची वर्तणूक कसकशी जाली तें. गोवळकोंडेकरांचा कारभारी मिरजुमला याचें वृत्त. शहाजहान दिल्लीचा बादशाह दुखण्यां पडला. तो जीवंत असतां, त्याचे पुत्र चोघे. ते राज्याची इछा करूं लागले. त्या चोघांजणांत एक ओरंगजेब नामें होता, त्याचे स्वभावाचें वर्णन. त्याणें वळेंच आपणास बाप असतां राज्याभिषेक करून घेतला, तें प्रकरण.

सोळाशें सत्तावन्नापासून सोळाशें बासष्ट पर्यंत. भाग पांचवा

५.

शिवाजीनें ओरंगजेबाशीं नम्रभावें करून बोलत असून, मोंगलांशीं कृत्रिम केलें. शिवाजीनें आपल्या लश्करांत स्वार वाढवून, पठाण मुसलमान लोक चाकरीस ठेविले. विजापुरचे मानकरी लोकांत वैमनस्यें पडलीं, त्यांपासून काय जालें तें. शिवाजीचा शामराज पेशवा राजपुरचे शिद्दीपासून, पराभव पावला. त्यावर शिवाजीचा राग होऊन, त्याणें मोरो त्रिंमक पिंगळा नामें, दुसरा पेशवा केला. वाडीचे सावंत, पहिल्यानें शिवाजीस मिळाले, मग लवकरच विजापुरकराकडचे जाले. विजापुरकरांकडून शिवाजीचे पारिपत्यास मोठें सैन्य आलें. त्या सैन्याचा मुख्य सरदार, आफसुल खान. तो शिवाजीनें कशा युक्तीनें मारिला तें प्रकरण. शिवाजीनें विजापुरच्या रुस्तमजमान सरदार, याचा पराभव करून विजापुरचे दरवाजापर्यंत, मुलुख लुटला; व त्वरेनें कोंकणांत जाऊन, राजपुरी व दाभोळ लुटलीं. त्या शिवाजीचे पारिपत्यास दुसरें पुनः सैन्य नेमून, त्याचा मुख्य सरदार शिद्दी जोहार केला, त्याणें पन्हाळ्यावर, शिवाजी असतां त्या किल्ल्यास वेढा घातला. असें असतां, तो शिवाजी वांचला कसा, व त्याचा कारकून हरणस मावळच्या देशपांड्याबा-

जी

जी परभू याणें काय पराक्रम केला तें. विजापुरचा बादशाह अली आदिलशाह, याणें शिवाजीनें घेतलेला मुलुख आपण सैन्यसुद्धां येऊन सोडविला तें. पुनः शिवाजीनें कित्येक किल्ले घेतले तें, व त्याचे बापास जाणें धरून विजापुरीं नेला तो बाजी घोरपडा त्यास सांपडला, त्याला मारून त्याचें गांव मुधोळ तें जाळिलें. सावंताची वाडी प्रांत शिवाजीनें घेतला तो प्रकार. विजापुरकराशीं तह केला तें वर्तमान. शाहाजी शिवाजीचे भेटीस आला तें प्रकरण. रायगड किल्ल्याची गोष्ट. शिवाजीचें लश्कर किती होतें तें व त्याचे मुलखाची हद्द किती होती तें.

सोळाशें बासष्टांपासून सोळाशें सदसष्टां पर्यंत. भाग सहावा.

६

शिवाजीनें मोंगलांचा मुलुख घेणेंचा उद्योग केला, म्हणून औरंगजेब बादशाह याणें शाइस्तेखान नामें सरदार याची योजना दिल्लीहून केली. त्या शाइस्तेखानानें पुण्यास येऊन चाकण किल्ला घेतला; त्यापुढें शिवाजीनें काय पराक्रम केला तें प्रकरण. दिल्लीहून बादशाहानें शाइस्तेखानाला माघारा बोलावून, सुलतान माजूम नामें दुसरा दक्षिणेस योजिला.

शिवाजीनें सुरत लुटली. शहाजीचा मृत्यु. शिवाजीनें आपल्ये नावास राजा असें पद जोडून आपल्येच नावें शिक्के चालविले. जे लोक मक्केस तीर्थयात्रेस जाणार, ते शिवाजीचीं लढाऊ गलबतें जाऊन लुटले. तो शिवाजी अहमदनगर लुटून माल्वणापाशीं गलबतावर चढून समुद्रांतून जाऊन गोव्याचे दक्षिणेस बारशिलोर नामें शहर होतें तें लुटिता जाला. शिवाजीस जिंकावयास, राजा जयशिंग, व दिलीरखान हे दोघे त्याला नकळतां त्याचे मुलखीं जाऊन पोंहचले. त्यांणीं कांहीं स्थानें घेतलीं म्हणून शिवाजीला भय प्राप्त जालें. पुरंदर किल्ल्यास घेरा घातला तें वर्तमान. शिवाजी युद्ध सोडून राजा जयशिंग व दिलीरखान यांचा आज्ञानुवर्ती जाला. आणि त्यावेळेस त्याणें कांहीं ठराव करून घेतला. त्यावरून, विजापुरकरांचा व त्या सरदारांचा युद्धप्रसं-

ग घडला. त्यापुढें शिवाजी बादशाहाचे भेटीस दिल्लीस गेला. तेव्हां औरंगजेबानें त्याला बंदींत ठेविला असतां, त्याणें आपला जीव कोणे प्रकारें वांचविला. विजापुरकरांशीं, जयशिंग लढला, त्याचा विशेष प्रकार. त्या जयशिंगानें विजापुरास घेरा घातला असतां, त्याहीं तो मागें हटविला; तो जयशिंग माघारा दिल्लीस जात असतां वाटेनें मृत्यु पावला.

सोळाशें सदसष्टांपासून सोळाशें एकुणहत्तर पर्यंत भाग सातवा

७

सुलतानमाजूम, आणि जशवंतशिंग, यांचा स्वभावाचा प्रकार. त्याचे योगेंकरून, शिवाजीस बादशाहाकडून कांहीं उपकार घडला. विजापुरकरांशीं आणि मोंगल लोकांशीं सल्ला जाला. विजापुरकर व गोंवळकोंडकर, यांणीं वर्षास शिवाजीला खंडणी द्यावी असा नेम ठरला. गोवें आणि जंजिरा घ्यावयास शिवाजी गेला, परंतु जय न पावला. शिवाजी आपल्ये मुलखीं वसुलाचा व लष्कराचा बंदोबस्त करीत असतां लोक नानाप्रकारचा अटकळी करीत होते तें.

त्याणें नवे कायदे चालविले, तो प्रकार. त्याचेअवळ राज्यकारभार चालविणारे, कोण कोण कसकसे होते तें प्रकरण.

सोळाशें सत्तरांपासून सोळाशें सत्याहात्तर पर्यंत भाग आठवा

८

पूर्वी लोकांस असें वाटत होतें कीं, आतां दक्षिणदेशीं बहुत दिवस पर्यंत, उपद्रव होणार नाहीं, परंतु त्यास अंतर पडलें तो प्रकार. तानाजी मालुसरायाणें सिंहगड घेतला; आणि त्याच वेळेस तो तेथेंच मृत्यु पावला. आणिक कित्येक किल्ले शिवाजीचे हस्तगत जाले. जंजिरा शिवाजीनें घेतलाच असता, परंतु तिघां शिद्दीमुळें त्याचे हातीं लागला नाहीं. ते शिद्दी, आपला मुलुख मोंगलांस देऊन, त्यांचे चाकरीस राहिले. शिवाजी सुरत लुटून माघारा गेला; त्या वेळेस त्याला धरावयाकरितां, मोंगल जे गेले ते त्याणें जिंकिले.

शिवाजी

शिवाजीनें खानदेश लुटला, आणि वसुलाची चवथाई प्रतिवर्षी घेत जावी, असें ठरलें, व औंढा पाटा व साल्हेर, हे किल्ले घेतले. मोंगल लोक शिवाजीस जिंकायास आळस कि निमित्त करीत होते तें. मोंगलांचा राज्यांतून दक्षिणदेशाचा कांहीं नवा बंदोबस्त जाला तो. मराठे लोक व मोंगल लोक यांचे युद्धांत मराठे जय पावोन मोठे विख्यात जाले. तें प्रकरण. शिवाजीचें आणि इंग्रेजांचें कांहीं बोलणें जालें तें. शिवाजीनें गोंवळकोंड्यामध्यें स्वारी केली असतां, त्याचे पाठिमागें जंजिऱ्याहून. आणि सुर्तेहून. लढाऊ गलबतें येऊन समुद्रतीरचे त्याचें गांव लुटले. विजापुरचा बादशाह, अल्ली आदिलशाह याचा मृत्यु. शिवाजीनें हुबळी शहर लुटलें; आणि विजापुरचे सरकाराशीं युद्ध केलें. शिवाजी आणि प्रतापराव, यांमध्यें कांहीं वैमनस्य पडलें. शिवाजीनें कांहीं क्रोधें करून निरोप पाठविला म्हणून, तो प्रतापराव विजापुरचे लश्कराशीं युद्ध करून मृत्यु पावला. त्या युद्धांत मराठे सरदार कोण कोण होते, त्याणीं आपलें लश्कर वांचवून विजापुरकरांचा लश्कराचा पराभव केला. आणि शिवाजीनें त्यांचा संमान केला. शिवाजीला राज्याभिषेक जाला. त्याणें इंग्रेज लोकांशीं तह केला, व कित्येक नवे किल्ले बांधिले; त्या शिवाजीचे शरीरीं सातान्यामध्यें समाधान नाहीं असें जालें.

## सोळाशें सत्याहत्तरांपासून सोळाशें ऐंशींपर्यंत    भाग नववा

१

शिवाजी कर्नाटक प्रांत घ्यावयास गेला तो प्रकार. तो शिवाजी तिकडे जातांना, वाटेनें देवस्थान पाहून तपस्या करावयास गेला. त्याणें करनाटकीं जाउन युद्ध कोणे प्रकारें केलें तें.

आणि त्याचा सावत्र भाऊ व्यंकाजी, याशीं बोलणें झालें तो प्रकार. मोंगल आणि विजापुरकर मिळून गोंवळकोंडेकर यांचें राज्य बुडधायास सैन्य पाठविलें. परंतु तें कार्य शेवटास गेलें नाहीं. अबदुलकरीमाचा मृत्यु. आणि त्याचे जागीं मसाउदखानाची स्थापना. व्यंकाजी शिवाजीचा लश्करावर छापा घालून, आपणच पराभव पावला. तो प्रकार. जनार्दन

र्दन पंत व हंबीर राव व मोरो पंत यांणीं युद्धें करीं केलीं. सुलतान माजूम यानें दक्षिणेचा अधिकार, मानक्यानें दिला, तें वर्तमान. मोंगलांचें लश्कर विजापुर घ्यावयास आलें म्हणून, मसाउदखानानें शिवाजीपाशीं कुमक मागीतली. तो शिवाजी मोंगलांचे मुलखीं जाऊन उपद्रव करिता जाला. आणि तेथून लूट घेऊन माघारा येत असतां, वाटेंत मोंगलांचा लश्करापासून मोठें संकट पावला. नंतर मदन स्वऔर्य करून, आणि जासुदांचे चातुर्यें करून, तो व त्याचें सैन्य वांचलें. संभाजीची वर्तणूक. मोंगलांनीं विजापुरचा घेरा उठविला; नंतर शिवाजीनें विजापुरकरांस कुमक केली होती, तीपासून काय लाभ पावला. तेणेंकरून व्यंकाजी निरुत्साह जाला. यास्तव त्यास शिवाजीनें हितोपदेशार्थ, पत्र लिहिलें. त्या शिवाजीचा मृत्यु व त्याचे स्वभावाचें वर्णन. तो मेल्यानंतर तक्ताधिपती कोण कोण जाले तें वर्तमान.

## सोळाशें ऐशींपासून सोळाशें एकुणनव्वद पर्यंत भाग दहावा

१०

संभाजी राज्य येत असतां, त्याणें काय काय निर्दयपणा केला; त्याणें स्वांदेशीपासून शिद्दीला हांकून द्यावयाचा उद्योग केला, परंतु व्यर्थ गेला. औरंगजेबाचा पुत्र सुलतान महंमद आकबर, तो आपल्ये संरक्षणार्थ संभाजीजवळ राहिला. त्या संभाजीचा सावत्र भाऊ राजाराम यास अधिपती करून, संभाजीला काढावा असें त्याचे जवळचा लोकांहीं योजिलें, त्यावरून संभाजीनें कित्येक जिवें मारिले. मोंगलांचें लश्कर कोंकणांत गेलें; तें संभाजीनें मागें हटविलें. त्याणें शिद्दीचा जंजिऱ्यास घेरा घातला, आणि उठून गेला. मग पोर्तुगीस लोकांशीं युद्ध करूं लागला. त्याचा वजीर कलुषा याची गोष्ट. पूर्वीं शिवाजीचे वेळेस जो लश्कराचा बंदोबस्त होता, तसा संभाजीचे राज्यांत चालिला नाहीं; त्याचा परिणाम कसा जाला तें प्रकरण. औरंगजेब दक्षिणेस आला, त्या वेळेस देशाचा प्रकार काय होता तो. औरंगजेब दक्षिणेस आला, त्या वेळचें त्याचे संपत्तीचें स्वरूपकथन केलें तें प्रकरण.

मोंगलांचे लष्करानें काय आचरण केलें तें. औरंगजेबानें गोंवळकोंडकरांशीं सल्ला केला. विजापूर मोंगलानीं घेतलें तो प्रकार. त्यावर तें राज्य बुडून शहर ओस पडलें. पहिला आलेला सल्ला मोडून गोंवळकोंडें औरंगजेबानें घेतलें त्यावरून तें राज्य बुडालें. हंबीरराव मराठा सेनापती शिरर्जीखानास जिंकून आपण मरण पावला तो प्रकार. करनाटकांत काय काय वर्तमान जालें तें. संभाजी केवळ अयोग्य असें समजून सुलतान महंमद आकबर निघोन गेला. नंतर दक्षिण देशाची दुर्दशा जाली, तें प्रकरण. इंग्रेज लोकांनीं समुद्रांत उपद्रव केला तो प्रकार. संभाजी आपल्या वजिरासुद्धां औरंगजेबाचे कैदेंत सांपडला; त्या दोघांचें मरण.

## सोळाशें एकुणनवदांपासून सत्राशें सातपर्यंत. भाग अकरावा

## ११

मराठ्यानीं रायगडीं मसलत करून संभाजीचा पुत्र शिवाजी तो प्रौढ होई तोंपर्यंत, राजाचा सावत्र भाऊ राजाराम, तो धणी केला. मोंगलानीं रायगड घेतला, तेथें संभाजीची स्त्री येसुबाई, व पुत्र शिवाजी उभयतां सांपडलीं तीं, त्याणीं औरंगजेबाकडे नेलीं. राजाराम जिंजीस गेला तेथें त्याणें शिवाजी प्रमाणें अष्टप्रधानादि करून, आपलें माहात्म्य वाढविलें. मोंगलानीं जिंजीस घेरा घातला तें काम कांहीं निमित्तानें राहिलें. मराठे मोंगलांचा मुलखीं, घांस दाणा घेऊं लागले. तन्निमित्त औरंगजेब ब्रह्मपुरीं जाऊन राहिला. इंग्रेजलोक व पोर्तुगीस लोक यांचें कांहीं वर्तमान. संताजी व धनाजी उभयतां कर्नाटकांत जाऊन मोंगलांशीं युद्ध करून जय पावले; मोंगलांचा सरदारास जिंजी घेणें आवश्यक पडलें म्हणून, त्याणें राजारामास काढून लाविला, आणि जिंजी घेतली. मराठ्यानीं सातान्याची राजधानी केली. राजारामाचा अष्टप्रधानांत कांहीं बदली जाली. कान्होजी आंगरे, व शिधोजी गुजर, यांची गोष्ट. संताजी घोरपडा कोणे प्रकारें मरण पावला तें प्रकरण.

राजाराम मोठें लष्कर जमा करून, खांदेशांत व वराडांत खंडणी घेऊं लागला. औरंगजेबानें करनाटकांतून जुलफि-

कारग्वान बोलावून आणून, राजारामाचे पाठीस लाविला. औरंगजेब फौजेसुद्धा सातार्यास आला. त्याणें युद्ध करून किल्ला घेतला. राजाराम याचा मृत्यु. त्याची स्त्री ताराबाई तिणें राज्य चालविलें. मराठ्यांचें प्राबल्य व मोंगलांची बलहीनता. मराठे लोक कोण कोणत्या कारणार्थ, एकचित्तें करून वागत गेले तें प्रकरण. औरंगजेब विजापुरीं येऊन मग त्याणें, वाकिणकेरा गांवांस घेरा घातला ती गोष्ट. मोंगलांनीं घेतलेले किल्ले मराठ्यांहीं लढून माघारे घेतले. औरंगजेब अहमदनगरीं येऊन मृत्यु पावला.

## सत्राशें सातांपासून सत्राशें वीसपर्यंत. भाग बारावा.

१२

शाहूला शाहू असें नांव कोणे प्रकारें प्राप्त जालें तें प्रकरण. तो शाहू दिल्लींतून सुटून, आपल्या राज्यावर आला; ते समयीं ताराबाईनें तो खोटा म्हटला म्हणून युद्ध जालें. अक्कलकोटच्या राजाची मूळ पीठिका. बाळाजी विश्वनाथ याचा उद्भव. मोंगल लोक व शाहू यांची वर्तणूक. धनाजी जाधव याचा मृत्यु. ताराबाईनें पन्हाळा किल्ला घेतला, आणि कोल्हापुराची राजधानी करून, तेथें राहिली. ताराबाईच्या पुत्र शिवाजी याचा मृत्यु.

संभाजी राजा होऊन ताराबाई बंदीस पडली. चंद्रसेन जाधव आणि बाळाजी विश्वनाथ, यांचा वाद होऊन, जीं जीं वर्तमानें जालीं तें. निजामउलमुलुख याची गोष्ट. मोंगल व मराठे यांचें युद्ध. निजामउलमुलुखानें कोल्हापुरकरांचा पक्ष धरिला; आणि शिधोजी घोरपड्यानें संभाजीचा पक्ष स्वीकारिला. मराठे लोक यांमध्ये फार अव्यवस्था जाली. कान्होजी आंग्यानें बहिरोपंत पेशव्याचा पराभव केला. नंतर बाळाजी विश्वनाथानें कान्होजीशीं तह केला, तेणें करून मराठ्यांस हित होईल असें जाणून, शाहूनें बाळाजीला पेशवाई दिली. मग तो पुरंदरचें आधिपत्य पावला. नंतर मराठ्यांची कांहीं व्यवस्था दिसूं लागली, तो तपशील. शाहूचे स्वभावाचें निरूपण. फरुकशेर बादशाहानें मराठे लोक आपणास अनुकूळ व्हावयाचा उद्योग केला तो पर्याय. त्याणें

णें सैयद हुसेन अल्लीखानाशीं कृत्रिम केलें तो विस्तार. शाहू व सैयदहुसेन यांशीं तह होऊन, सैयद दिल्लीस गेला. आणि फेरुकशेरास, पदच्युत करून दुसरा बादशाह स्थापिला. बाळाजी विश्वनाथ, चौथ, व सरदेशमुखी, व स्वराज्य, यांचा सनदा घेऊन साताऱ्यास आला. नंतर मराठे लोक स्वराज्यांतील वसूल जमा करूं लागले तो प्रकार. कान्होजी आंग्र्याची गोष्ट.

## सनसत्राशें विसांपासून, सत्राशेंसव्वीसपर्यंत भाग तेरावा

## १३

निजामउलमुलुखानें सैयदाचेआज्ञेंत वागणें सोडून, मनांत, दक्षिण घ्यावयाचा निश्चय केला. त्यानंतर तो सैयदाच्या सरदाराशीं युद्ध करून जय पावला. सैयद हुसेन अल्लीखान, आपल्या बादशाहासहित, निजामउलमुलुखाचा पारिपत्यास दिल्लीहून निघाला. तो वाटेनें शत्रूचा मारेकऱ्यानीं मारिला. दुसरा सैयद आबदुलखान, तो निजामउलमुलुखाशीं युद्ध करित असतां पराभव पावोन त्याचे कैदेंत सांपडला. त्यावरून दिल्लीमध्यें लोकानीं बादशाहाचे प्रसन्नतेसाठीं मोठा उत्साह केला. परशुराम त्रिंबक, वबाळाजी विश्वनाथ, व खंडेराव दाभाडे, यांचा मरणामुळें, मराठी दरबारांत काय काय वर्तलें तें. बडोदेकर गाइकवाड यांचा मूळपुरुष दमाजी गाइकवाड याचे मरणाचा प्रकार.

निजामउलमुलुख यास बादशाहानें वश करून आपली वजिरी दिली. त्यानंतर तेथील दरबारी लोकानीं त्याचा नाशाचा उद्योग केला. गुजराथेचा अधिकारी हैदरकुली खान, याचा नाशाविषयीं, निजामउलमुलुखास बादशाहानें गुप्तपणें आज्ञा केली. तो निजामउलमुलुखाचे हातून पराभव पावला. मग बादशाहानें निजामउलमुलुखास वकील मुतलख नामें मोठी पदवी दिली. बाळाजी विश्वनाथाचा पुत्र बाजिराव याचें वागणें. होळकर, व शिंदे, यांची उत्पत्ती. उदाजी पंवाराची वर्तणूक. बाजीराव, बाळाजी विश्वनाथाचा पुत्र याणें काय काय मसलत केली;

ली; तीचा प्रतिपक्षी श्रीपतराव झाला तें प्रकरण. शकरखेराजवळचे लढाईचा प्रकार. सुरतेचा अधिकारी, रुस्तुमअल्ली, तो पिलाजी गाइकवाडाचे घातास प्रवर्तला. अमदाबादच्या अधिकारी आमेदखान, तो कांताजी व पिलाजी यांस चौथ देता आला. तो ऐवज जमा कर्ते समयीं, त्या उभयतांचा कलह होऊन; कांताजीचा विभाग मार्या नदीचे वायव्येस ठरला; व अग्नायीकडचा विभाग पिलाजीचा ठरला. अमदाबादेस, शहाबागेजवळ लढाई झाली तें. गुजराथचे व्यवस्थेचा प्रकार. बाजिरावानें माळव्या मुलखीं स्वारी घातली.

## सन सत्राशें सत्ताविसांपासून, सत्राशें चौतीसपर्यंत भाग चौदावा

१४

निजामउलमुलुखानें, आपलें बळ वाढवायाकरितां, मराठी सरदार लोकांत कलह उत्पन्न व्हावा; ह्मणून काय काय उद्योग, केला तें प्रकरण. त्याणें प्रतिनिधीचा योगें शाहूशीं तह करून; हैदराबादचे चवथाईची सोडचिठ्ठी घेतली. तो तह पेशव्याचे मनास आला नाहीं. निजामउलमुलुखानें, शाहू, आणि संभाजी, या उभयतां बंधूंत वैमनस्य पाडावयाचा यत्न केला; तो पेशव्यानीं व्यर्थ पाडिला. त्यावरून पेशवे, व निजामउलमुलुख, यांचें युद्ध जालें. नंतर तो निजामउलमुलुख याचा, बाजिराव पेशवे, यांचा शहाणपणापुढें उपाय चालेना; ह्मणून तहाचें बोलणें करूं लागला.

बाजिराव गुजराथची चौथ, व सरदेशमुखीची, सनद पावला. कोल्हापुरचा राजा संभाजी, व प्रतिनिधी, हे उभयतां युद्ध करून; संभाजी पराभव पावला. पेशवे बाजिराव, व सेनापती दाभाडे, या दोघांचें युद्ध जालें; त्यांत बाजिरायाचा जय होऊन; दाभाडा मृत्यु पावला. निजामउलमुलुखाची वर्तणूक. गुजराथ मुलखांत पिलाजी गाइकवाड, व ओतपुरचा राजा, आभीशिंग, यांचा युद्धप्रसंग घडला. त्यापुढें आभिशिंगानें पिलाजीशीं तह करावयाचे निमित्तें करून, मारेकरी पाठवून त्यास मारिला. बुंदलखंड मुलखीं, राजा चतुरसाल, याणें पेशव्यास कुमकेस

स घेऊन मोंगलास बुंदलखंडांतून पार केला, यास्तव त्याणें बाजिरावाला कांहीं मुलुख बक्षीस दिला. राजा जयसिंग यास माळव्याचें आधिपत्य प्राप्त झालें, तें त्याणें बाजिरावास दिलें.

सन सत्राशें चवतीसापासून सत्राशें चाळीसपर्यंत भाग पंधरावा

१५

मराठी लोकांची वर्णणूक. रघुजी भोंसल्यास सेनासाहेब सुभा पदवी प्राप्त झाली. वाडीचे सावंत, व आंग्र्या, व शिद्दी यांचें वर्तमान, बाजिराव पेशवा माळव्या मुलखांतून, माघारा आला, तें वृत्त. मल्हारजी होळकर याणें मुलखांत स्वाऱ्या घातल्या तें प्रकरण. दिल्लीच्या बादशाहानें, निजामउलमुलुख आपणास वश व्हावा म्हणून उद्योग केला तो विस्तार. बाजिरावास खर्चाची अडचण पडली; यास्तव त्याणें बादशाह याशीं तहकरून माळव्यामुलखीं कांहीं अधिकार पावला.

त्याशिवाय त्यास दक्षिणेंतही सरदेशपांडेपणा मिळाला.

मोंगल व बाजिराव, या दोहींपक्षीं युद्धाची सिद्धता आली, तेव्हां निजामउल्मुलखानें मोंगलांचा पक्ष स्विकारिला. बाजीरावानें पराक्रमेंकरून दिल्लीच्या दरवाजापर्यंत प्रवेश केला तो प्रकार. आंग्र्याची हकीगत. बाजिरावानें निजामउलमुलखाचा लष्करास भोपाळाजवळ वेग घालून असा उपद्रव केला कीं; त्यास याशीं तह करावा लागला. पोर्तुगीस लोक, व इंग्रेज लोक यांची वर्तणुक. पेशवे व रघोजी भोंसले यांचें युद्ध झालें तें. दिल्लीमध्यें फारशी मुलखाचा नादरशाहनामा बादशाह आला; त्यामुळें मोंगल लोक संकट पावले तें प्रकरण. मग थोडकेच दिवसांनीं त्याणें दिल्लीचें तक्त मोंगलांस माघारें देऊन; आपण आपले मुलखीं गेला. मराठ्यांनीं वसई किल्ल्यास घेरा घातला ती कथा. पेशव्यांनीं दक्षिण घेतल्याचे पूर्वी माळवा व बुंदलखंड या दोहीं मुलखीं कायकाय बंदोबस्त केला तो प्रकार. पेशवा हिंदुस्थानांत संचार करूं लागला. मराठ्यांनीं संभाजी आंग्र्यावर कांहीं मसलत केली होती ती, बाजिरायाचा मरणामुळें सिद्धीस न गेली. हिंदुस्थान व दक्षिणदेश आदिकरून सर्व मुलखांचा

लरवांचा राज्याची वर्तमानें व्यापाराच्या स्वभावाचें स्वरूप कथन, व त्याचे पुत्र बाळाजी बाजिराव. व रघुनाथराव, व जनार्दनबाबा, व समशेरबहादूर यांची गोष्ट.

## सन सत्राशें चाळिसांपासून सत्राशें एकुणपन्नासपर्यंत भाग सोळावा

१६.

कर्नाटकांत मराठ्यांचा प्रवेश. रघोजीभोसला याणे बाळाजी बाजिराव यास पेशवाई न मिळावी म्हणून राजाजवळ उद्योग केला तो शेवटास न गेला. चिमणाजी आपा याचा मृत्यु. पेशवा राजापासून महल्लाभाची सनद पावला. भास्करपंत बंगाल्यांत शिरला. दमाजी गाइकवाडानें माळव्यांत स्वाऱ्या घातल्या. अलीवर्दीखानानें भास्करपंतास बंगाल्यांतून काढून दिल्यावर, रघुजीभोसला याणें स्वयें स्वारी केली. तेव्हां दिल्लीच्या बादशाहानें पेशव्यास माळव्याचा अधिकार व इतर लाभाची आज्ञा दाखविली यास्तव त्याणें अलीवर्दीखानाचा पक्ष स्वीकारून रघुजीला तेथून घालविला. मग पेशवा बादशाहापासून माळव्याची सनद पावोन सातारीयास आला. त्यापुढें रघोजीभोसले आणि बाळाजीबाजिराव पेशवे यांची कांहीं समजूत पडली. निजामउलमुलूख याची कांहीं गोष्ट. रघुजीचा भास्करपंत, व मोठेमोठे मानकरी मराठे सरदार पुनः बंगाल्यांत गेले ते अलीवर्दीखानाच्या कपटानें घात करून मारिले गेले, आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली याची गोष्ट. दिल्लीच्या बादशाहाचा मृत्यु. आणि त्याचा पुत्राचें स्थापन. निजामउलमुलूखाचा मृत्यु. नाशिरजंग मोठें सैन्य घेऊन कर्नाटकास चालिला. राजाराम राजा कसा प्रगट झाला तें प्रकरण. त्यानंतर सातायीस सकवारबाईची व ताराबाईची काय वर्तणूक जाहाली. बाळाजीनें सकवारबाईला कोणेप्रकारें सती घालविली तो विस्तार.

सन सत्राशें पन्नासांपासून, सन सत्राशें छपन्न पर्यंत      भाग सत्रावा

१७

पेशव्यानें रघुजी भोंसला व इतर सरदार वश केले. पुणे मराठे लोक यांची राजधानी झाली. पेशवा व सदाशिवराव भाऊ यांमध्यें कांहीं कलह उत्पन्न झाला. रामचंद्रबाबा शेणवी याचा उद्भव. पेशव्यानें गाजीउद्दिन निजामउलमुलुखाचा वडीलपुत्र, याचा पक्ष अंगीकारिला, आणि फ्रांशीस लोकांनीं मुजाफरजंगाचा पक्ष धरून त्यास निजामपदवी दिली. मुजाफरजंगाचा मृत्यु, व सलाबतजंगास निजामपदवीचा लाभ. पेशवा गाजीउद्दिनाच्या कामासाठीं कृष्णेपर्यंत गेला, परंतु ताराबाई व गाईकवाडाचा कपटामुळें माघारा आला. राजाराम मोठ्या अडचणीनें बंदींत पडला. सलाबतजंग फ्रांशीस लोकांच्या आश्रयेंकरून गांवें लुटित पुण्याकडे गेला. रघुजी भोंसल्यानें कायकाय संपादन केलें तें प्रकरण. मीरहबीब याचा मृत्यु. दिल्लीकडील कांहीं वर्तमान व मराठे त्या कामांत शिरले तो विस्तार. गाजीउद्दिन, शिंदा व होळकर, यांचा आश्रयेंकरून दिल्लीहून दक्षिणेस चालिला, तो आपली निजामपदवी पावेल असें सिद्ध झालें असतां आपण मृत्यु पावला. सलाबतजंग निजामपदवी पावल्यावर त्याणें पेशव्यास कायकाय दिलें तो प्रकार. पेशव्यानें कर्नाटकीं स्वारी केली. पेशव्यानें आपला भाऊ रघुनाथराव गुजराथेंत पाठविला तो तें कार्य करून हिंदुस्थानांत गेला. रघुजी भोंसल्याचा मृत्यु व त्याच्या चौघां पुत्रांची गोष्ट. पेशवा व ताराबाई यांची समजूत झाली ती कथा. दिल्लीकडचें कांहीं वर्तमान. दिल्लीचा आमेदशाह पादशाह याचे गाजीउद्दिनाच्या पुत्रानें डोळे काढून त्यास कैदेंत ठेविला, आणि जानदारशाह म्हणून पूर्वीच्या बादशाहाच्या नातू तख्ताधिपती केला. पेशव्यानें आंग्र्याचा मुलुख घ्यावयाविषयीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें करून तें काम झाल्याचे पूर्वींच, त्याला साबनूर घ्यावयाकरितां तिकडे जावयाचें अगत्य पडलें. इंग्रेजांचीं लढाऊ जाहाजें आऊन सुवर्णदुर्ग किल्ला

घेतला

घेतला. तो मराठ्यांस सोपविला. मराठे यांणीं आंग्र्याचा मुलुख व किल्ले घेऊन विजयदुर्गास घेरा घातला असतां त्यांचे कुमकेस इंग्रेजांचीं जहाजें जाऊन मराठेलोक आपल्या लोकांत न घेतां तो किल्ला घेतला. मराठेलोक जाऊन त्यांणीं सावनूर किल्ला घेतला. फ्रांशीसलोक यांस दक्षिणेंतून काढावयासाठीं पेशवा व सलाबतजंग यांणीं मसलत केली, ती बसीच्या युक्तीपुढें सिद्धीस गेली नाहीं. पुण्यामध्यें पेशवे, आणि मुंबइचे इंग्रेज यांची समजूत झाली तो प्रकार.

## सन सत्राशें छप्पन्नापासून सन सत्राशें साठ पर्यंत भाग अठरावा

१८

रघुनाथराव लश्कर घेऊन हिंदुस्थानांत स्वारीस गेला, व पेशवा कर्नाटकांत जाऊन श्रीरंगपट्टनच्या खंड घेतला. स्वडाप जवळचे लढाईचा प्रकार. मैसूरचा सरदार हैदरअल्ली याचा उत्कर्ष. हैदराबादचे दरबारीं कांहीं आभ्यंतरीय कृत्रिम झाले, तें व त्याचा शेवट. इंग्रेजलोकांनीं सूरत घेतली तें प्रकरण. पुनः मराठे यांणीं कर्नाटकांत संचार केला तो व हैदराबादचें कांहीं विशेष वर्तमान. सदाशिवरायाचा स्वभावाचें निरूपण. त्या सदाशिवरायास मारेकरी घातला असतां तो वांचला तें प्रकरण. आमेदनगर मराठ्यांहीं कृत्रिमें करून घेतलें. सदाशिवराव सेनेचें मुख्यत्व पावोन रघुनाथराव कारभार करूं लागला, तो प्रकार. दक्षिणेंत मराठे व मोंगल यांशीं युद्ध होऊन मराठ्यांस काय लाभ झाला तो पर्याय.

## सन सत्राशें साठांपासून एकसष्ट पर्यंत भाग एकुणिसावा.

१९

आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली यांणें हिंदुस्थानांत येऊन दिल्ली व मथुराशहर लुटलें. रघुनाथराव याणें सुलतान व लाहोर पेशव्याचे सत्तेंत आणिलें तें प्रकरण. राणोजी शिंदा याचा पुत्राचें कांहीं वर्तमान.

दिल्लीचा बादशाह अलमगीर यास शाबूदिन वजीर

याणें

याणें मारून टाकिला. अबदाली बादशाह याणें मुलतान व लाहोर यांतून मराठ्यांस घालविलें आणि आपण दिल्ली कडे चालिला. त्याणें मराठे सरदार यांचा पराभव केला; त्यावरून सदाशिवराव त्याचा पारिपत्यास दक्षिणेहून निघाला. तो पुढें जात असतां त्यास कित्येक सरदार येऊन मिळाले. त्या योगें त्याचें सैन्य फार वाढलें. मग त्याणें निकडे जाऊन दिल्ली हस्तगत केली, आणि नवा बादशाह स्थापिला. पानपता जवळची लढाई. त्यांत मराठ्यांचा बहुत नाश झाला. आफगाण लोकांचा क्रूरतेचें निरूपण. बाळाजी बाजिराव पेशवा याचा मृत्यु. त्याचा स्वभावाचें कथन.

## सनसत्राशें एकसष्टांपासून सासष्टपर्यंत भागविसावा.

२०

माधवराव बल्लाळ पेशवा झाला तें प्रकरण. ताराबाईचा मृत्यु. निजाम अल्ली मराठी लोकांत वेमनस्यें पडलीं अशी संधी पाहून त्यांस जिंकावयाकरितां निघाला. टोंक्याचा देवस्थानाचा भंग निजाम अल्लीनें केला तें प्रकरण. तो निजाम अल्ली पुण्याजवळ येऊन त्याशीं व पेशव्याशीं तह झाला. रघुनाथराव व माधवराव पेशवे यांचा बिघड झाल्यामुळें रघुनाथराव औरंगाबादेस गेला तेथें त्यास मोंगलांची कुमक मिळून तो माघारा पुण्यावर येत असतां माधवराव पेशवा आपल्या सूज्ञपणानें त्याचा स्वाधीन झाला. रघुनाथराव मुख्यत्व पावोन त्याचा अनुचित आचरणेंकरून मोठ्मोठ्या लोकांचीं मनें विटलीं; तेणेंकरून ते कित्येक जाऊन मोंगलांस मिळाले. त्यावर मोंगल ब्राह्मणाचें राज्य बुडवावयास उद्युक्त झाला. मोंगल पुण्यास येऊन तें शहर लुटून तेथचा कित्येकां घरांचा खंड घेऊन कित्येक घरें जाळिलीं. शेवटीं रघुनाथराव चांगला समय पाहून मोंगलांचा लष्कराचा अगदीं पराभव करिता झाला. नंतर औरंगाबादेस पेशवे आणि मोंगल यांचा तह झाला. हैदरअल्लीचा उत्कर्ष. माधवराव फार युक्तीनें त्या हैदराचा पराभव करिता झाला.

पेशवा व निजाम अल्ली मिळून जानोजी भोंसला याशीं

युद्ध

युद्ध करून त्यापासून दिलेला मुलुख कित्येक माघारा घेत-
ला.

## सन सत्राशें सारसष्टीपासून बाहात्तरपर्यंत   भाग एकविसावा.

इंग्लीश सरकार कंपनी बहादुर यानामाचें अर्थसूचन व त्या इंग्लीश लोकाहीं हिंदुमुलखीं कोणे निमित्तें प्रथम प्रवेश केला तें प्रकरण. पुढें त्याहीं आपल्या रक्षणार्थ राजमंडळी घेतली. मग त्याशीं आणि निजाम अल्लीशीं स्नेह पडला ती गोष्ट. माधवराव पेशवा करनाटकीं जाऊन तेथच्या खंडणीचें बहुत द्रव्य घेऊन माघारा पुण्यास आला. रघुनाथरायानें हिंदुस्थानांत स्वारी केली. मल्हारराव होळकर याचा मृत्यु. रघुनाथराव गोहदच्या राण्याचें स्थान घ्यावयास गेला तो तेथें सिद्धी न पावतां माघारा पुण्यास आला, तेथें आपला पुतण्या माधवराव पेशवा याविषयीं त्याचा मनांत कांहीं अविश्वास उत्पन्न होऊन तो होळकर व दमाजी गाइकवाड व जानोजी भोंसला यांच्या साहाय्यानें युद्ध करून सर्वराज्य आपणास इछिता झाला. मग मोठा युद्धप्रसंग होऊन रघुनाथराव माधवरायाचे कैदेंत सांपडला तो प्रकार. माधवराव व निजाम अल्ली एकचित्त होऊन जानोजी भोंसल्याचे मुलखीं गेले तो त्यांस शरण आल्यावर पेशव्यांस हिसाबाद असा जानोजीशीं तह झाला तो विस्तार. माधवराव करनाटकांत जाऊन हैदर अल्लीचा बहुत मुलुख घेतला. मनवगळच्या किल्ला घेतेसमयीं घाडगे कुळांचे दोन भाग यांच्या पुरातन वाद उत्पन्न पुनः झाला ती कथा. करनाटकांत माधवराव आपलें लष्कर त्रिंबकराव मामाच्या स्वाधीन करून आपण माघारा पुण्यास आला. त्या त्रिंबकराव मामानें हैदरास जिंकून त्याशीं तह केला. पानपतचे लढाईनंतर हिंदुस्थानांत कायकाय वर्तमानें झालीं त्यांचा विस्तार. विसाजी कृष्ण सैन्यासहित हिंदुस्थानांत गेला. दिल्लीचा बादशाहानें इंग्लीशांचा आश्रय धरिला. नजीबअदवला याणें मराठ्यांशीं तह केला. दिल्लीचा बादशाह इंग्लीश लोकांचा आश्रय सोडून मराठी लोकांकडे गेला.

गेला. रूजाउद्दौला व रोहिले मिळून मराठे लोकांस मुलखांतून बाहेर घालवावयास सिद्ध झाले. दिल्लीच्या बादशाहा दक्षणी ब्राह्मणाच्या अनुमतस्वभावास कंटाळून, त्याणें आपल्या सरदारांला सर्व मराठे हांकून द्यावयास सांगितलें. माधवराव पेशवा यांचा मृत्यु, व त्याचें गुणकथन. रामशास्त्री यांची गोष्ट.

## सनसत्राशें बाहात्तरांपासून सत्राशें पंचेहत्तरांपर्यंत भाग बेविसावा.

२२.

रघुनाथराव बंदींतून सुटला. परंतु नारायणराव पेशव्याचा कांहीं तंट्यामुळें पुनः बंदींत पडला. नारायणरावाला मारेकरी यांणीं मारिला. मराठ्यांचें सैन्य हिंदुस्थानांतून माघारें फिरलें. रघुजी भोंसल्या यास सेनासाहेब सुभा पदवी प्राप्त झाली. निजामअल्लीवर रघुनाथराव यांचें युद्ध होऊन निजाम पराभव पावोन त्याणें रघुनाथरावास दिलेला मुलुख याणें त्यास माघारा दिला. रघुनाथराव कर्नाटकांत गेला असतां कारभारी लोकांहीं, त्यास अहित अशी कांहीं मसलत केली. त्रिंबकराव मामा रघुनाथरावाशीं युद्ध करून पराभव पावला. मग रघुनाथरावानें हिंदुस्थानांत जाऊन इंग्लीश व होळकर व शिंदे यांशीं आपल्या साहाय्यार्थ कांहीं बोलणें लाविलें. पुण्यांत कारभारी लोकांमध्यें वैमनस्य पडून त्यांच्या दोन फळ्या झाल्या. हैदरअल्लीनें कर्नाटकांतील मुलुख मराठ्यांचा घेतला. विलायतेंतून कंपनी सरकारचे आज्ञेनें मुंबेहून कोणी वकील साहेब पुण्यांत रहावयास गेला. इंग्लिशांहीं भडोजकिल्ला घेतला. ठाणें नामें साष्टीचा किल्ला इंग्लिशांहीं घेतला. शिंदा व होळकर. यांहीं राघोबाचा पक्ष सोडिला; यास्तव राघोबा बडोद्यास गेला. गाइकवाडाचे कुमकेचें कांहीं वृत्त. राघोबा व इंग्लीश यांचें बोलणें होऊन तह झाला. त्याप्रमाणें त्याचे कुमकेस इंग्लीशांचें लश्कर आलें. ते व रघुनाथराव यांचें लश्कर मिळून कसें कसें वर्तलें तो विस्तार. आरासाजवळचे लढाईचा प्रकार. जहाजांची लढाई. फत्तेसिंग गाइकवाड यांशीं इंग्लीश व राघोबा यांशीं तह झाला. रघुनाथराव यांचा

उत्कर्ष. व माधवराव नारायण पेशवा यांचा हाम लोकांमध्यें दिसूं लागला.

## सन सत्राशें पंचाहात्तरांपासून एकुणऐशीं पर्यंत भाग तेविसावा.

२३

रघुनाथराव मुंबई सरकारापासून आपलें कार्य करून घेत होता, तें कलकत्ता याचे मुख्य साहेब आणि त्यांचें मंत्रदायक मध्यें पडल्यामुळें सिद्धीस गेलें नाहीं. कलकत्याहून कोणी वकील साहेब पुरंदरास आला, त्याचें व पुरंदरचे कारभारी लोक यांचें वागणें व त्या वकिलाशीं त्या कारभारी मंडळानें तह केला तो विस्तार. हैदरअल्लीनें पेशव्याचा कांहीं मुलुख घेतला. सदाशिवराव भाऊचें सोंग घेणारा मदोबा याचा उत्कर्ष व पराभव आणि मृत्यु. राजाराम राजा याचा मृत्य द त्याचे जागीं त्रिंबकजी भोंसला याचा पुत्र शाहू महाराज नामें करून स्थापिला. कोल्हापुरकर व मुधोजी भोंसला यांचें कांहीं मामील वर्त्तमान. पुण्यांत कारभारी लोकांमध्यें वैमनस्य पडून दुफळी झाली. मोरोबा फडनवीस याची मंडळी मुख्यता पावोन रायोबास आणवून तो मुख्य करावा अशी मसलत ठरली. नाना फडनवीसानें आपला अर्थ साधावयासाठीं सकपट युक्ती केल्या तो प्रकार. त्यावरून रायोबाविषयीं मोरोबाचें मन फिरून त्यास रघुनाथरावाविषयीं इंग्लीश बोलत असतांही त्याणें रायोबाचें अगत्य टाकिलें. नाना फडनवीस व त्याची मंडळी श्रेष्ठता पावोन तो मोरोबा फडनवीस व त्याची मंडळी कैद केली. फ्रेंचांचा वकील पुण्यांत येऊन प्रतिष्ठेनें वागला तो प्रकार. त्या निमित्तें कलकत्याहून सहा पलटणें लष्कर मुंबईस येऊं लागलें. नंतर मुंबई सरकारांत मसलत ठरली कीं, रायोबास बळेंच पुण्यामध्यें स्थापावा. त्यावरून नाना फडनवीस याची तयारी. इकडे मुंबईसरकारचे मंडळींत वैमनस्य पडल्यानें रायोबाचा कार्यास इंग्लिशांचें लश्कर विलंब करून बोरघाटावर जमा झालें. मग तेथून पुढें तळेगांवाजवळ मराठी लश्कराची गांठ पडली असतां त्या मुख्य साहेबांस कांहीं भय वाटोन, ते

पुढें

पुढें न जातां त्यांहीं मागें हटाचें अस्तानेम केला, त्यासंबंधें व-डगांवाजवळ त्या इंग्लीश लोकांवर कांहीं अनर्थ पडला तो प्र-कार. बंगाल्याहून इंग्लीशांचें लश्कर मुंबईस येत होतें तो विस्तार. महादजी शिंद्यानें रघुनाथरावाविषयीं कायकाय वर्तणूक केली त्या गोष्टीचें कथन. त्या शिंद्यानें सखाराम बापू व चिंतो विठ्ठल हे दोघे नाना फडनवीसाच्या स्वाधीन केले. ते त्यास अनिष्टकारक ह्मणोन त्याणें त्यांस बंदीत ठेविलें अ-सतां त्या प्रतिबंधांतच ते उभयतां मृत्यु पावले.

## सन सत्राशें एकुणऐंशींपासून पंचायशींपर्यंत भाग चोविसावा.

२४

जनराल गाडुडसाहेब व नाना फडनवीस यांचें तहाविषयीं कांहीं बोलणें झालें. इंग्लीश दुसऱ्याचा पक्ष न धरितां स्वयेंच मराठ्यांलोकांशीं युद्ध करूं लागले. मग बडोद्याज-वळ दुभायशाहर आहे तेथें इंग्लीशांचें लश्कर जाऊन तें ठि-काण घेतलें. फत्तेसिंग गायकवाड याशीं तह केल्याचा प्रकार. पेशव्याच्या लोकांपासून अमदाबाद कोट इं-ग्लीशांहीं लढोन घेतला. मग गाडुडसाहेब यास जिं-कावयाकरितां शिंदे व होळकर गुजराथेंत गेले. ते कोण कोणत्या प्रकारें वागले ते प्रकरण. बंगाल्याहून लश्क-र येऊन ग्वाल्हेर व लाहोर हे दोन्ही किल्ले घेतले. कोंक-णांत इंग्लीश व मराठे युद्ध करितें झाले तो प्रकार, दुधारा जवळची लढाई. वसयी किल्ला इंग्लीशांहीं हस्तगत केला.

जनराल गाडुडसाहेब कच्या मसलतीनें बोरघाटास ठाणें धरून राहिला, मग मुंबईकडे त्यास हटून जाणें प्राप्त झालें त्यांत त्याचा कांहींसा नाश झाला. बंगाल्याचें ल-श्कर शिंद्याच्या मुलखांत शिरलें तो प्रकार. मद्रासचें कु-मकेस कलकत्त्याहून लश्कर पायवाटेनें पाठविलें तेसमयीं मुधोजी भोसल्याचें लश्कर त्या लष्कुरास होतें त्यासं-बंधें आपल्या लश्करास अडथळा न होण्याविषयीं कल-कत्त्याच्या साहेबानें तो मुधोजी स्वपक्षानुसारी केला. सर्व मराठे व इंग्लीश यांचा महादजी शिंद्याच्या द्वारें तह झा-

ला

ला     दिल्लीकडील काही वर्तमान.   हैदरअल्ली मरण पावल्यावर त्याचा पुत्र टिपू याचें वागणें. मद्रासेच्या इंग्लीशांहीं मालप्याचा तहाचा वेत ध्यानात न आणिला टिपूशीं वेगळा तह केला.   नाना फडनवीस व निजाम याची टिपूवर काही मसलत झाली.   रघुनाथरावाचा मृत्यु व त्याचा पुत्रांची काही गोष्ट   सन सत्राशें ब्याहत्तरापासून दिल्लीकडे कायकाय वर्तमान झालें तें प्रकरण.   रूजाउदवल्याचा मृत्यु.   नजीफखानाचा दत्तपुत्र याणें शिंद्याची कुमक मागीतली   तेणेकरून तो शिंदा दिल्लीमध्यें फार योग्यता पावला.   त्यायोगें शिंदा उन्मत्त होऊन त्याणें इंग्लीशास काही अमर्याद मागणें केलें त्यावरून ते रुष्ट होऊन त्यांहीं शिंद्याची मध्यस्थता दूर करून आपल्या कोर्णी साहेब नेहेमी पुण्यास असावा असा नेम केला.

## सन सत्राशें पंचायशींपासून नव्वदपर्यंत     भाग पंचविसावा

२५.

टिपू नरगुंदच्या देसायाबरोबर कसकसा वागला तें प्रकरण. त्या टिपूनें हिंदूवर जुलूम करून मुसलमान केले.   नाना फडनवीस याणें टिपूला जिंकावयाविषयीं इंग्लिशांचे कुमकेविषयीं यत्न केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं.   पुण्याहून मराठ्याचें लश्कर निघालें तें निजामअल्ली व मुधोजी भोसले यांस मिळून टिपूवर चालिलें.   बदामी किल्ला युद्ध करून मराठ्यांहीं घेतला.   तुकोजी होळकर कितुरास जाऊन कायकाय करिता झाला, तो प्रकार.   सावनूरच्या नवाबाची काहीं गोष्ट.   टिपूनें एकाएकी मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें तो विस्तार.   महादजी शिंदा दिल्लीमध्यें योग्यतेस चढून त्यागल्या असता. त्याणें अन्यायकर्मे केलीं त्यामुळें मुसलमानलोक त्याचा द्वेष करूं लागले.   त्या शिंद्यानें रजपुतांकडे खंडणी मागीतली असता. ते सारे एकत्र मिळून त्याशीं युद्ध करितें झाले.   त्या युद्धाचा प्रकार व त्याचा बोभाट कसा झाला तें प्रकरण   त्या शिंद्यास संकट प्राप्त झालें असतां तो कसकसा वागला तें प्रकरण.   त्यास पुण्याहून कुमक येऊन पोंहचली.

आग्या

आग्र्याजवळची लढाई. इस्मायलबेगाचा पराभव. कोर्णा गुलामकादर मामा याचें आचरण व त्याचा मृत्यु. शिंदा दिल्लीमध्यें पुन: मोठी योग्यता पावला. त्याणें आपल्या लष्कराचा कायकाय बंदोस्त केला तो विस्तार.

## सनसत्रासें नव्वदापासून ब्याणवपर्यंत भागसव्विसावा

२६

टिपूनें पेशव्यांशीं तह केलेला मोडून फौजेची तयारी केली. नंतर टिपूनें इंग्लीशांचा मित्र त्रावनकोरवाला याशीं युद्ध केलें असतां, त्याचा पारिपत्याविषयीं इंग्लिश, व मराठे, व मोंगल, यांचें ऐक्य झालें. इंग्लीशांची टोळी परशुरामभाऊस मिळून टिपूशीं युद्धाचा उपक्रम केला. धारवाड किल्याचा युद्धाचा प्रकार. मद्रासेकडून इंग्लीशांचें लष्कर आलें त्याचें वागणें. मोंगलांची वर्तणूक. हरिपंत फडके व परशुराम भाऊ यांचें लष्कर इंग्लीशांस मिळालें तो विस्तार.
लार्टकानवालिसानें टिपूचा पराभव करून श्रीरंगपट्टणास घेरा घालावयाची तयारी केली असतां, अन्न तृणादि तोट्यामुळें त्यास तो उद्योग सोडावा लागला. यानंतर इंग्लीश व मराठे व मोंगल यांचा टिपूचा मुलखीं कसकसा संचार झाला तो प्रकार. लार्टकानवालिसानें पुन: श्रीरंगपट्टणास घेरा घातला. मग सल्ला झाल्यावर इंग्लीश व मराठे व मोंगल यास कायकाय लाभ झाला ती कथा. परशुराम भाऊ श्रीरंगपट्टणास विलंबें करून आला तो विस्तार. त्यास तेथून माघारा पुण्यास जातांना वाटेनें बहुत उपद्रव सोसावा लागला.

## सनसत्रासें ब्याणवांपासून पंचाण्णवपर्यंत भागसत्ताविसावा.

२७

महादजी शिंदा पुण्यांतील कारभारी मंडळीपेक्षां वरचढ होण्याविषयीं पुण्यास गेला. पेशव्यास वश करून घ्यावयाविषयीं त्याणें उद्योग कसकसा केला तो प्रकार. पेशव्यास वकील मुतलक नामें पदवी प्राप्त होऊन पेशव्यानेंही महादजी शिंद्यास आपला हस्तक करून दिल्लीच्या कामावर

स्थापिला

स्थापिला तो दिवस. रघुनाथरावाच्या मुलखांत शिंदे होळक
र यांचा सरदार गणपतरावाची लष्करीजवळ लढाई झाली तें प्र-
करण. त्यामुळें पुण्यांतील अधिकाऱ्यांत कांहीं अंतर
पडलें. नानाफडनवीस यांणें पेशव्याचा पक्षांत करून
आपली मुलखांत मदत केली. महादजी शिंद्याचा मृत्यु.
त्याच्या स्वभावाचें व बुद्धीचें वर्णन. त्याचे जागीं त्याचा
भावाचा नातू दवलतराव शिंदा यांची स्थापना. बडोद्यांत व
तंटात. गोविंदराव गायकवाड यास बडोद्यांत अधिकार प्रा-
प्त झाला. मराठ्यांच्या मुलखाच्या पश्चिम भाग समुद्रतीर तेथचे
१२ मदल्याधिपति त्यांची वर्तमानें. त्यांहीं चांचेपणा केला तो व
त्याचें निवारण. मराठीलोक पहिल्या लढाईची चाल
टाकून पलटणाचा अंगवळणावर लढूं लागल्यानें काय का-
य परिणाम झाला तो प्रकार. होळकरानें पलटणें चाकरीस
ठेविलीं. मराठी समुदाय मिळून निजामाशीं बाकी ऐवज मा-
गावयाचे निमित्तें युद्धास सिद्ध झाले, व खरड्याची लढाई.
निजामाचा पुत्र अलीजहा तो मृत्यु पावला. नानाफडनवीस
यांची कांहीं गोष्ट

## सन सत्राशें पंच्याण्णवापासून नव्याण्णवपर्यंत भाग चौविसावा

२८

नानाफडनवीस माधवराव नारायण पेशवा यास कोण
त्याप्रकारें बंदोबस्तानें स्वाधीन ठेविता तें व त्यानें त्याचा रा-
जा रघुनाथरावाचें कुटुंब यांस कशा बंदोबस्तांत रक्षिलें
तें प्रकरण. रघुनाथरावाच्या औरस पुत्रांत बाजीराव व-
डील, त्याचे गुण व स्वरूप यांचें वर्णन. त्या बाजीरावावि-
षयीं नानानें काय मत्सर केला तो प्रकार. माधवराव ना-
रायण पेशवा व बाजीराव रघुनाथ हे दोघे नानाच्या बंदोबस्तां-
त होते त्यामुळे ते परस्पर दुःखी होऊन त्या उभयतांची मैत्री
झाली. तें नानास विदित होऊन त्याणें त्या उभयतांचा
विरोध बंदोबस्त केला. तें माधवरावास सहन न होतां
त्याणें माडीवरून उडी टाकिली, आणि मृत्यु पावला.
नानानें बाजीराव, गादीचा अधिकारी न व्हावा म्हणून यत्न
केला

केला तो प्रकार. बाजीरावानें बाळोबा तात्या व शिंदा यांस आपल्या पक्षाचे करून नानाची नगलत मोडावी असें केलें तें समजून नाना आपणच बाजीरावाला गादीवर बसवावयास उद्युक्त झाला. तेव्हां बाळोबा तात्यानें बाजीरावाला शिंद्याचा बंदींत ठेवून चिमणाजी आपास गादीवर बसवून परशुराम भाऊ पटवर्धन तो मुख्य कारभारी केला. नव्या कारभारी मंडळीनें नानास मुख्य कारभारी करितों असें मिष करून त्यास दगा करावयाची नगलत केली. तें कृत्य नानास विदित होऊन तो सावध झाला त्यांत तो नाना आणि बाजीराव यांचें एकच कार्य पडलें. सर्जेराव घाडगा व बाळोजी कुंजर हे नानाचा उपयोगीं कसे पडले ते प्रकरण. नंतर बाजीरावास गादीचा धणी करावयाकरितां त्या नानानें शिंदा अनुकूळ केला. ती गोष्ट सिद्धीस गेली नाहीं तोंच बाळोबा नाना त्यास विदित होऊन त्यानें बाजीरावास हिंदुस्थानांत पाठवावयाचें योजिलें; तेथें जाणें न होण्यासाठीं बाजीरावानें कांहीं युक्ति केली तो प्रकार. नानानें शिंद्याचें द्वारें बाळोबा तात्यास कैद केला. परशुराम भाऊ पुण्याहून पळाला तेसमयीं त्याचें पाठीस लोक लागले त्यांहीं त्यास धरिला. बाजीरावास पेशवेपदवी प्राप्त झाली. नंतर चिमणाजी आपा यास कांहीं प्रायश्चित्त देऊन तो गुजराथच्या अधिकारी केला तो प्रकार. नानानें करार केल्या प्रमाणें शिंदा व रघोजी भोंसला यांस तें तें प्राप्त केलें. परंतु निजामास कबूल केल्या प्रमाणें बाजीराव देईना म्हणून मशीर उलमुलुख कारस्थ होऊन तेथून निघोन गेला. तुकोजी होळकर याचा मृत्यु नंतर त्याचा पुत्रांत गादीविषयीं वाद पडला. मल्हारराव होळकर युद्ध करून मृत्यु पावला. काशीराव होळकर यास शिंद्याचें द्वारें बापाचा सर्व अधिकार प्राप्त झाला. नाना व शिंदा या दोघांस दूर करावयाविषयीं बाजीराव यत्न करूं लागला. त्यांत शिंद्याचा हातून नानास कैद करून तो नाना व त्याचे पक्षपाती लोक यांचीं घरें लुटावयाची आज्ञा दिली त्यायोगें सर्व शहरांत दंगा झाला. त्यानंतर बाजीराव पेशवा याचा मुख्य कारभारी अमृतराव झाला. सखाराम घाटगा याणें आपली कन्या शिंद्यास दिली आणि त्याचा मुख्यत्वें कारभार आपण करूं लागला. तो सर्जेराव घाटगा व बाळोजी कुंजर हे दोघे बाजी-

रावाच्या

गराचा अनुकूळतेनें पुण्यांतील किच्येक मोठ मोठ्या गृहस्थास अत्यंत पीडा करून त्यांपासून पैका घेते झाले. अमृतरावानें शिं यास धरावयाची मसलत केली त्यास सर्जीरावाची अनुकूळता होऊन शेवटीं त्या सर्जीरावाचा भित्रेपणा मुळें सिद्धीस गेली नाहीं. नानाच्यांचें काम परशुराम भाऊ पटवर्धनास सांगून त्या योगें तो बंदींतून मुक्त झाला.

## सन सत्राशें अठ्याण्णवांपासून अठ्राशें पर्यंत भाग एकोणतिसावा.

२९

शिंद्याच्या बायांचें वर्तमान. त्या बायांहीं दंगा उत्पन्न केला आणि अमृतरावाचेंलष्करांत आश्रय पावल्या. पेशवे व शिंदे यांचें वैमनस्य पडलें. शिंद्यानें नानास मुक्त केलें. नंतर शिंदा आणि पेशवा यांचें पुनः ऐक्य झालें. सर्जेराव घाटगा यास - शिंद्याचा आज्ञेनें प्रतिबंध झाला. इंग्लीश व निजाम अल्ली- यांचा तह. नाना फडनवीस व सर्जीराव यांचा कांहीं गोष्टी. सर्जीरावाचें कुटिल वृत्त. इंग्लिशांहीं श्रीरंगपट्टण घेतलें. त्यामुळ त्याची वांटणी केली तें प्रकरण. इंग्लीश आणि निजाम अल्ली यांमध्यें नवा तह झाला. बायांचें फार वाढलेलें बंड तें मोडावयास शिंद्यानें बाळोबा नान्यास बंदींतून मुक्त केला. कोल्हापुरचें कांहीं वर्तमान. चतुरशिंग राजा याणें युद्ध केलें तो प्रकार. परशुराम भाऊ पटवर्धन युद्धांत- पराजय पावोन मृत्यु पावला.

## सन अठराशें पासून अठराशें तीन पर्यंत भाग तिसावा

३०

नाना फडनविसाच्या मृत्यु व त्याचा स्वभावाचें वर्णन. बाळोबा नात्या याच्या मृत्यु व धोंडिबा व नारायणराव बक्षी यांस निर्दयपणें पेशव्यानें मारिलें तें प्रकरण. दक्षिणेंत धामधूम झाली तो प्रकार. धोंडीबाघाचें बंड व त्याचें पारिपत्य इंग्लिशांहीं केलें तें. पुण्यांतील कांहीं वर्तमान. शिंद्याची माळव्यांतील कांहीं गोष्ट. यशवंतराव होळकराचा प्रादुर्भाव. शिंदा पुणें सोडून हिंदुस्थानांत चालिला नंतर त्यांशीं व होळकराशीं युद्ध झालें तो विस्तार. सर्जेराव घाटगा पुणें सोडून शिंद्यास मिळून. इंदुरावर जाऊन तेथें पराभव

नगवहोळकराचा पराभव केला      यशवंतराव होळकर याणें दक्षिणेंत संचार केला: नंतर तो पुण्याजवळचे लढाई न जय पावला. बाजीराव पेशवा सिंहगडाहून निघोन कोंकणांत जाऊन तेथें इंग्लीशांच्या जहाजांत बसून वसईस गेला. सन सत्राशें ब्याण्णवांपासून अठराशें दोहोंपर्यंत वडोद्यांत कायकाय वर्तमानें झाली तो प्रकार.

## सन् अठराशें दोहोंपासून अठराशें आठपर्यंत      भाग एकतिसावा.

### ३१

होळकर पुणें मुकामीं जय पावल्यानंतर तेथच्या लोकांस उपद्रव न देतां नम्रतेनें वागल्याचें कारण. त्याणें बाजीराव पेशवा याच्या गादीवर अमृतराव याचा पुत्र विनायकराव यास बसविला. वसईंत पेशवा व इंग्लीश यांचा तह झाला तो प्रकार. त्या तहास विघ्न करावयाविषयीं शिंदे व रघुजी भोंसले एकमत होऊन गुप्तपणें सैन्य जमा केलें. इंग्लीशांच्या बळानें बाजीराव पेशवा आपल्या गादीवर पुनः बसला. रघुजी भोंसला व शिंदा यांशीं इंग्लीशांहीं तहाचें बोलणें लाविलें तें सिद्धीस न जातां, उभयपक्षीं मैत्री तुटली. आमेदनगर किल्ला इंग्लीशांहीं घेतला. असायीजवळची मोठी लढायी. अशीरगड व भडोंच व पवनगड हे किल्ले इंग्लीशांहीं घेतले. हिंदुस्थानांतील युद्ध प्रकार. दिल्ली व आग्रें व लासवारी याजवळच्या लढाईची गोष्ट. दक्षिणेंत आरगावांजवळ लढायी झाली तें प्रकरण. देवगांवचा व सर्जीअंजिणगांवचा तह. होळकर व इंग्लीश यांचें वैमनस्य पडून जनराल लेक साहेब सैन्यासुद्धां त्याचे पाठीस लागून त्यास त्याचे मुलखीं घालविला. त्यानंतर तो होळकर पुनः येऊन त्याणें कार्णेल मानसन साहेब याच्या हाताखालचे एके टोळीचा पराभव केला. मग तो होळकर मोठ्या सैन्यासहित हिंदुस्थानांत शिरला. त्या होळकराचें लष्कर दिल्लीजवळ पराभव पावलें. दिगाजवळची लढायी. तो किल्ला इंग्लीशांहीं घेतला. होळकराचे दक्षिणेंतील किल्ले व त्याची राजधानी इंदूर इंग्लीशांचे हातीं लागले. जनरल् लेक साहेबानें भरतपूर किल्ला घ्यावयाचा उद्योग केला तो श

वटास

सदाम्स न गेला. तथापि त्या राजानें वकील पाठवून इंग्लीशां शीं तह केला. शिंद्यानें होळकराचा पक्ष स्वीकारिला यास्तव त्याशीं व इंग्लीशांशीं वैमनस्य पडलें. होळकर पंजाबाकडे पळाला, त्याचे पाठीस लेकसाहेब लागल्या मुळें त्या उभयतांचा तह झाला. तेच समयीं शिंद्यानेंही इंग्लीशांशीं तह केला. होळकर पंजाबांतून आल्यावर, त्यास वेड लागून तो मृत्यु पावला. त्याचा स्वभावादिकांचें वर्णन.

## सन् अठ्राशें तिहींपासून अठ्राशें सत्रांपर्यंत भाग बत्तिसावा.

३२

यशवंतराव होळकर मेल्यानंतर त्याचा कारभार अमीरखानानें पुष्कळ केला तें प्रकरण. शिंदे व नागपुरकर भोसले यांचें वर्तमान. पेंढारी लोकांची कांहीं गोष्ट. बाजीराव पेशवा पुनः गादीवर बसल्यानंतर, कसकसा वागला तें. प्रतिनिधीचें बंड. सदाशिव माणकेश्वर व कुसुरुजी मोदी यांचा वहिवाटीचा प्रकार. बाजीराव पेशवा याणें माधवरावरास्त्याशीं व धरकड जहागीरदार याशीं कोणे प्रकारें कुचिन ठेवलें तो विस्तार. त्रिंबकजी डेंगळा योग्यतेस चढल्याचा प्रकार. बाजीरावानें आपल्या जवळ द्रव्य जमा केलें तें, त्याणें इंग्लीशांस बुडवावयाविषयीं कशी मसलत केली ती. त्या बाजीरावाशीं व बडोदेकराशीं वहिवाट झाली तें. गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा वध. त्यापुढें त्रिंबकजी डेंगळा इंग्लीशांचा बंदीत पडलेला पळून जाऊन त्यास बाजीराव पेशव्यानें गुप्तपणें आश्रय दिला. त्यावर इंग्लीशांहीं काय काय केलें तें प्रकरण.

## सन अठराशें सत्रांच्या आरंभापासून समाप्तीपर्यंत भाग तेहेतिसावा

३३

बाजीराव पेशवा व बापू गोखले यांणीं एकमतें इंग्लीशाच्या नाशाविषयीं मसलत केली. इंग्लीश व पेशवे यांचा स्नेह तुटून पुण्याजवळ युद्ध झालें. कोरेगांवची लढाई. बापू गोखला अष्ट्याजवळ इंग्लीशांवर हल्ला करून मृत्यु पावला. नागपुरकराचें कृत्य. सीताबल्दीजवळची लढाई

लढाई. नागपुरकर आपासाहेब तो इंग्लीशांशीं स्नेह करून आपल्ये गादीवर बसला. चितूपेंढारी यास होळकरानें आश्रय दिला यास्तव मेहदपुरापाशीं होळकराची व इंग्लीशांची लढाई झाली. मग तो होळकर शरण येऊन त्याचा व इंग्लीशांचा तह झाला. पेंढारी यांचे मुख्य सरदार इंग्लीशांहीं धरिले. सिवनीयाशीं बाजीरायाची व इंग्लीशांची गांठ पडली. आपासाहेब पुनः गादीवर बसल्यानंतर कसकसा वर्तला तें. बाजीराव पेशवा इंग्लीशांचे हस्तगत होऊन, त्यांहीं त्यास ब्रह्मावर्तीं ठेविला. मराठी राज्य इंग्लीशांहीं घेतल्यानंतर कसकसा बंदोबंदस्त केला तें प्रकरण.

## अनुक्रमणिका

मुसलमान लोकांनीं दक्षिण घेतल्याचा प्रकार १ ते लोक नर्मदा उतरून, देवगड पर्यंत संचार करिते झाले २ तें शहर मुसलमान लोकांनीं आपली राजधानी करून,त्याचें नांव दौलताबाद ठेविलें ३ त्या लोकांमध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन, मुसलमानाचे राज्याचा दोन फळ्या झाल्या ४ ब्राह्मणी वंशबादशाहाचे राज्याची गोष्ट ५ तें राज्य असतां, मराठी लोकांचें काय काय वर्तमान झालें तें प्रकरण ६ दुर्गादेवीनामें मोठा दुष्काळ पडला तें ७ त्यामु- ळें मुलुख ओस पडला,आणि किल्ले मलत्याचे हस्तगत झाले ८ त्याचा बंदोबस्ताकरितां बादशाहाचें सैन्य निघालें ९ दादूनरसूकाळे यांणीं सरकारचे वसुलाचा बंदोबस्त केला १० आणखी दोन वेळा, राज्याचे बंदोबस्तास बादशाहानें लश्कर योजिलें ११ मुसलमानांनीं कों- कण पट्टी जिंकिली १२ ब्राह्मणी बादशाहाचे वंशाची समाप्ती कोणे कारणानें झाली तें १३ हीं तेरा प्रकरणें मिळोन भाग प्रथम.

## प्रथमप्रकरण.

### मुसलमान लोकांनीं हिंदुस्थान घेतल्याचा प्रकार.

पूर्वी मुसलमान लोकांनीं हिंदुस्थान घेतल्याचे अगोदर ते उगीच स्वाऱ्या घालून तें लुटित असत; ते, सन् ११०० अकराशांचा सुमारें, अटक नदीस येऊन,पोंचले. त्यापुढें ३०० तीन- शें वर्षांनंतर,अल्लाउदीन खिलजी नामें कोणी एक मोठा मुसलमान सरदार याणें, ८००० आठहजार सैन्य घेऊन,नर्मदा उतरून, खानदेशांतून अकस्मात देवगडासमोर येऊन, डेरा दिल्हा;त्या वेळेस, कोणी एक मराठा, रामदेवराव जाधव, त्या किल्याचा राजा होता, त्याणें आ- पलें संस्थान राखावयासाठीं कांहीं युद्ध केलें; आणि परतला; मग किल्यांत जाऊन, अल्लाउ- दीनाशीं तहाचें बोलणें लाविलें; तेव्हां, बहुत द्रव्य दिल्यास, तो आपला मुलुख सोडून जा- तो, असें ठरलें. इतक्यांत रामदेवाचा पुत्र, मुलखांतून फौज जमा करून घेऊन,आला; आ- णि बापानें ठरविला तह नमानितां, अल्लाउदीनाशीं युद्ध करूं लागला. त्या प्रसंगीं राजपु- त्राचा पराभव झाला. त्यामुळें ते मुसलमान लोक गर्वेकरून उन्मत्त झाले. यास्तव रा- जास आपलें सर्वद्रव्य आणि इलिचपूर द्यावें लागलें;तेव्हां ते मुसलमान लोक किल्ला सो- डून निघाले. तेणेंकरून अल्लाउदीन मोठा विख्यात झाला; आणखी त्याला दिल्लीचें तख्त सहज प्राप्त झालें. मग त्याणें दक्षिणदेशीं तीनवेळा फौज पाठविली. त्यायोगेंक- रून,बहुतेक दक्षिणदेश, व तेलिंगण, त्याचे हस्तगत झालें; आणि त्या लश्कराचे उपद्रवा- नें नर्मदेपासून रामेश्वर पर्यंत मुलखाची मोठी देशधडगत झाली. पुढें अल्लाउदीनानें क- हून स्वतंत्र राज्य केलें. शेवटीं त्याचा राज्यांत,आपसांत कलह उत्पन्न झाले; आणि त्या संस्था- नांत,दिल्लीचे सरदारांनीं लोकांत किल्ले [illegible] [illegible] झाले. [illegible] [illegible] पुनः आपलें राज्य स्थापावयास पावले; व, [illegible] सर्व [illegible]

लागले; आणि देवगडासही घेरा घालून, लढूं लागले. तेव्हां, दिल्लीमध्यें मुबरीकनामें बादशाहा होता; तो सैन्य घेऊन, आला. ते समयीं, जे लोक, किल्ला सभोंवता वेढून, युद्ध करीत होते; ते बादशाहाशीं युद्ध नकरितां, पळूं लागले. त्यांचे पाठीस बादशाहा लागला. तेव्हां, एक हरपाळदेव राजा सांपडला; त्याचें आंगाचें कातडें काढविलें. तेणेंकरून, तो मृत्यु पावला. मुबरीकानंतर, दिल्लींत, तघलखनामें बादशाहा झाला. त्याचें राज्य असतां, सन् १३२३ तेराशें तेविसांत दक्षिणदेशीं, पुनः बंड उत्पन्न झालें. तें मोडावयास त्याचा पुत्र युनास तो सैन्य सुद्धा येऊन, त्याणें तें बंड मोडिलें; आणि तेलिंगणातील, वारंगूळनामें राजधानी घेतली. तेवेळेस, त्या नगरचे कित्येक मोठे मोठे गृहस्थ परागंदा झाले. नंतर बारावर्षांनीं त्यांतील दोघां गृहस्थांनीं, तुंगभद्रेचे तीरीं, विजयानामें एक नवीच नगरी वसविली. तिची कांहीं काळेंकरून, कोणी एका मोठ्या राजानें राजधानी केली. मग जाणें एवढा मोठा पराक्रम केला, असा जो युनास्, त्याला, सन् १३२५ तेराशें पंचविसांत राज्याभिषेक करून, दिल्लीचे तक्तावर बसविला; आणि त्याचें नांव महंमद तघलख ठेविलें. तो बहुत विद्यानिपुण असे. परंतु उतावळा, अविचारी, निर्दय, राज्यास अयोग्य होता. तो राज्य करूं लागल्यापासून दोनवर्षांनीं मोंगल लोक, मोठी फौज घेऊन, दिल्लीचे दरवाजाजवळ येऊन पोंचले. तेव्हां, बादशाहानें त्यांस बहुत द्रव्य देऊन फिरविलें. नंतर, तें द्रव्य जितकें खरचलें होतें, तितकें उत्पन्न करावया करितां, धूरसमुद्र* नामें एक नगर, व कर्नाटक लुटून द्रव्य आणिलें; तरी त्याला पुरेसें झालें नाहीं. यास्तव नाना प्रकारें प्रजेस पीडा करूं लागला. तो प्रकार असा कीं, तांब्याचे पत्र्यांवर शिक्का करून, ते रुपयांचा किमतीनें चालविले; आणि देवगडाचें नांव दौलताबाद ठेवून दिल्लींत राहाणारे लोकांस सांगितलें, कीं, तुह्मीं सर्वांनीं दौलताबादेस जाऊन राहावें. असें सांगितल्याप्रमाणें त्या लोकांस वर्तविलें. तेणेंकरून, त्यांस बहुत कष्ट झाले; आणि दिल्ली ओस पडली. त्यानंतर त्याचे राज्यांत, कित्येक जागीं बंडें उत्पन्न झालीं. तीं अशीं कीं, तो बादशाहा एक बंड मोडी तों, त्याला दुसरें बंडाचें वर्तमान कळे. असें होऊं लागलें. शेवटीं अफगाण लोक, व उत्तरेकडचे लोक, हा धणी योग्य नव्हे असें जाणून, राज्यांत आपणच सत्ता करूं लागले. यास्तव बादशाहानें फौज उत्तरेकडे दूर योजिली. त्या संधींत, जो पूर्वीं मुसलमानानीं जिंकिलेला कर्नाटकचे वारंगूळनगरचा राजा, तो मुलखांतून फौज घेऊन, आला; आणि मुसलमान लोकांशीं, मोठ्या युक्तीनें युद्ध करूं लागला. ते वेळेस बादशाहा, संपूर्ण दक्षिणेचा बंदोबस्तास मोठी फौज धरूं लागला. इतक्यांत असें मोठें बंड उत्पन्न झालें, कीं, नर्मदेचे दक्षिणेस जितकीं मुसलमान लोकांचीं वेगळीं वेगळीं संस्थानें झालीं, तितक्यांचें कारण तें बंड. त्या बंडाचें मूळ असें आहे कीं, पूर्वीं गुजराथी

* कोणी ह्मणतात कीं, धूरसमुद्र नगर कर्नाटकचे बल्लाळदेवाची राजधानी; कोणी ह्मणतात कि, तुळवायाचे बंदरचें मोठें शहर होतें; परंतु आतां त्याचा ठिकाणा नाहीं.

लोकांनीं

लोकांनीं कांहीं बंड केलें, तें बादशाहानें मोडिलें. तेव्हां ते लोक बादशाहाचे भयानें पळाले. ते दौलताबादकरांचा पाठ निघाले. यास्तव बादशाहानें दौलताबादकरांस पदच्युत केलें; आणि सेवकांस आज्ञा केली कीं. गुजराथी लोकांस ह्मणावें, तुह्मीं निर्भयपणें हुजूर येऊन भेटावें. तें सेवकानीं सांगितल्यावरून, गुजराथी लोक. विश्वासानें बादशाहाचे भेटीस जाऊं लागले. तेसमयीं बादशाहा फौजेसहित गुजराथेंत होता; ह्मणून ते तिकडे गेले. ते गुजराथे जवळ गेलेतों, त्यांस असें वाटलें कि, बादशाहा आह्मांस बोलाऊन नेऊन, कांहीं घात करील. याकरितां, जे त्यांनां नेणारे बादशाहाचे लोक त्यांचे बरोबर होते, त्यांस तिथेच मारून, बंडाचा झेंडा लावून, माघारें दौलताबादेस चालिले. तेव्हां वाटेनें आतां आतां, जे संस्थानी लोक, बादशाहापासून त्रास पावले होते; ते त्यांस मिळूं लागले. तें सैन्य असें जमलें कीं, ते दौलताबादेजवळ आतांच, त्या किल्यांतल्ये लोकांनी, ह्या सैन्यांपुढें बादशाहाचें कांहीं चालणार नाहीं असें जाणून, दौलताबादेचे मुख्य कारभार्यास कैद केला; आणि किल्ला बंडवाल्यांस दिला. नंतर त्या बंडाचे लोकांस, असें वाटलें कीं, त्या एवढ्या मोठ्या सैन्यास धनी एक असावा, परंतु तें सैन्य एकाएकीं जमलेलें. ह्मणून, त्यांत कोणी राज्यकरायास योग्य आहे किंवा नाहीं हें कोणास कांहींच समजेना, यास्तव एक इस्मायलनामें १००० एक हजार स्वारांचा सरदार होता त्याला, बादशाहा करून, त्याचें नांव नासरूदिन ठेविलें; आणि दौलताबादच्या तक्ताधिपती केला. हें वर्तमान महंमदशाहा बादशाहास कळतांच, तो फौजेसुद्धां गुजराथेंतून आला; तो दौलताबादेस येतो तों ते बंडवाले युद्धास सिद्ध होते, ह्मणून त्यांचें व या बादशाहाचें तत्काळ युद्ध झालें. त्या प्रसंगीं, दोघांतून एकाचाही जय झाला नाहीं; परंतु महंमदशाहाचें सैन्य, जा जागीं लढाई झाली त्याच जाग्यावर होतें; आणि नासरूदिनाचें मागें सरलें. तेव्हां त्या बंडवाल्यांनीं असा विचार केला कीं, नासरूदिनानें किल्याचें रक्षण करावें; आणि सरदारांहीं, फौजेचा वेगळ्या वेगळ्या टोळ्या करून, त्याचे मुलखांत चोंहीं कडून शिरावें; आणि मोठी धुमाळी करावी. समोर लढूं नये. मग तसेंच केलें. हें वर्तमान महंमदाला कळतांच, त्याणें दौलताबादेस वेढा घातला; आणि जे सरदार मुलखांत दंगा करावयास जात होते त्यांत, एक जफीरखान नामें मुख्य होता त्याचे पाठीमागें, एक आपला अंमादउल्मुखटेब्रीजी नामें, मोठा सरदार लाविला. इकडे सभोंवता वेढा पडल्यामुळें, किल्यांतल्या लोकांनां अन्नपाणी दुर्लभ झालें. यासाठीं, ते असा विचार करूं लागले कीं, आतां युद्ध करूं नये; किल्ला द्यावा. इतक्यांत दिल्लीकडे एक मोठें बंड उत्पन्न झालें. असें वर्तमान महंमदशाहास कळलें. यास्तव किल्ला घ्यावयाचें काम, आपले सरदारांस सांगून, आपण दिल्लीस गेला. हें वर्तमान दक्षिणी लोकांस कळतांच, ते चोंहीं कडून आले; आणि जे बादशाहाचे सरदार किल्याशीं लढत होते त्यांस. नानाप्रकारें उपद्रव करूं लागले. तेव्हां त्यांस असें भय झालें कीं. किल्ला सोडून

डून लवकर नर्मदा उतरून पार जावें ह्मणून, पळों लागले. तेव्हां दक्षिणी लोक त्यांचे पाठीस लागले. यास्तव त्यांनां वाटेनें दक्षिणी लोकांचा उपद्रव बहुत लागला; परंतु ते तसाच सोशीत सोशीत नर्मदा पार झाले. इकडे जफीरखान पळत होता तो, हें आनंदाचें वर्तमान ऐकून, पाठीस लागलेल्या अंमादउल्मुलुखावर, माघारा उलटला. तेव्हां तो आपल्ये फौजेसहित, बेदरजवळ ठाणें धरून, राहिला. जफीरखान मोठा विचारवंत होता त्याणें, शत्रूशीं तत्काळ युद्ध नकेलें. त्याचे बरोबरीचा आकार मात्र दाखविला. त्याचा अशा आचरणानें, तेलिंगणचे राजास मोठा भरोंसा वाटला; ह्मणून त्याणें त्याचे कुमकेस १५००० पंधरा हजार फौज पाठविली; आणि दौलताबादेहून ५००० पांच हजार आली; आणि त्याची २०००० वीस हजार होती; अशी ४०००० चाळीस हजार झाली. तेव्हां तो अंमादउल्मुलुखाशीं लढूं लागला. ती लढाई फार मोठी झाली. त्यांत अंमादउल्मुलुख पडला; आणीक त्याची फौज बहुत नाश पावली. मग तो मुलुखांत आगोआग ठाणीं घालून, आपण फौजेसहित दौलताबादेस आला. त्या वेळेस नासरूदिन् बादशाहा, याला आपणा पेक्षां मोठा पराक्रमी आणि विख्यात असें जाणून, किल्यांतून बाहेर आपण त्याला सामोरा आला; आणि भेटला. मग सर्व मानकरी लोकांस ह्मणाला कीं, मज पेक्षां हा बहुत योग्य आहे. याला तक्ताचा अधिकारी करावा, अशी बादशाहाची आज्ञा होतांच, त्या सर्वांहीअवश्य ह्मणोन नासरूदिनाचे जागीं, जफीरखानास बसविला. त्याचें नांव सुलतानअल्लाउदीनहुसेन कांगो ब्राह्मणी असें ठेविलें. ब्राह्मणी नांव ठेवण्यांचें कारण, असें आहे कि, पूर्वी दिल्ली मध्यें एक कांगो नामें ब्राह्मण होता, त्याणें या जफीरखानास याचे बाळपणांत विकत घेऊन, आपल्ये घरचे कामांकरितां, बाळगला होता. नंतर कांहीं दिवसांनीं हा उत्तम गुणी असें जाणून, कांहीं द्रव्य न घेतां, यास ब्राह्मणानें सूट दिल्ही; आणि त्यास आपलें कांहीं द्रव्य देऊन संतोषें करून बोलिला, कि तुला लक्ष्मी प्रसन्न असो. असे त्याचे उपकार, व आशीर्वाद स्मरोन, जफीरखानानें आपल्ये नांवास, कांगो अशीं अक्षरें लाविलीं; आणखी त्या ब्राह्मणास बलावून आणून, त्यास आपल्ये आमदारखान्याचें काम सांगितलें; आणि आपणापासून पुढें जे आपले पुरुष झाले, त्यांचेंही नांव कांगो असें चालविलें. असा त्याणें त्या ब्राह्मणाचा मान केला. हें वर्तमान सन १३४७ तेराशें सत्येताळीसांत झालें. ते वेळेस, महंमदतघलख्य नामें दिल्लीचा बादशाहा मेला, तेणेंकरून जफीरखानाचें राज्य निर्बाध चालूं लागलें. त्यांत जे जे बादशाहा आले; ते ते आपणास ब्राह्मणीवंशसंभव असें ह्मणवित असत. सुलतान अल्लाउदीनहुसेनकांगो ब्राह्मणी बादशाहा झाला ते समयीं, दक्षिणेंत हिंदु लोकांचीं कित्येक संस्थानें होतीं तीं, कित्येक संस्थानी लोकांनीं आप

---

[illegible] मुसलमानानें [illegible] काढून घेतलीं, [illegible] आहे असें [illegible] कारण, मुसलमानाचें कांगो [illegible] आहे [illegible]

आपलीं

आपलीं स्थानें स्वसंतोषें त्यास दिलीं; आणि कित्येक त्याणें बलात्कारें करून घेतलीं. मग जीं घ्यावयास कठीण तीं मात्र राहिलीं. नंतर त्याणें, लोकरंजनार्थ कित्येकांस इनामजमीनी दिल्या. कित्येकांस देशमुख्या व पाटिलक्या दिल्या. कित्येकां सर्दारांस जहागिरी देऊन फौजेसहित चाकरीस ठेविलें. या प्रमाणें त्याणें लोकप्रीति संपादिली; आणि आपल्ये राज्याचे पुष्टीकरणार्थ कित्येक मुसलमान लोकास मोठमोठ्या जहागिरी देऊन, हिंदूलोकांनीं मुसलमानांचे आज्ञेंत वागावें असें केलें. त्या वेळेस बहुतेक दक्षिणदेश, व कोंकणपट्टी, त्याणीं घेतली. परंतु दाभोळेपासून रामसपर्यंत कोंकण, व घाटमाथां पुरंदर डोंगर हरण काशी पावेतों, त्यांचे स्वाधीन झालें नाहीं. अशीं १०० शंभर वर्षें गेलीं; नंतर तेंही घेतलें. सुलतान अल्लाउदीनहुसेन कांगो ब्राह्मणी बादशाहा १० दाहा वर्षें होता; नंतर मेला. त्याचे जागीं त्याचा पुत्र महंमदशाहा ब्राह्मणी स्थापिला. तो सन् १३५७ तेराशें सत्तावन्नांत राज्य करूं लागला. नंतर एक वर्षानें तो सैन्य घेऊन मुलुख घ्यावयास कर्नाटकांत गेला. ते समयीं दौलताबादेंत सैन्य बहुत नव्हतें; आणि असें वर्तमान आलें किं, बादशाहा कर्नाटकांत मेला. तें ऐकून मुसलमानांतील एक बहिरामखान मजेंदराणी नामें सरदार होता त्याणें, कोणी एक मराठा जाधव याचे मसलतीनें, मोठें बंड उत्पन्न केलें. त्या पूर्वीं अकरा वर्षें मुसलमानाचे राज्यांत बंड नव्हतें. हें बंडाचें वर्तमान बादशाहास कर्नाटकांत कळलें. तेव्हां तो बहिरामखान, बादशाहाचे जातीचा मुसलमान, यास्तव बादशाहानें, त्याला, बहुत युक्तीनें सांगून पाठविलें. निकरानें निरोप पाठविला नाहीं. परंतु मराठीलोकांचे साहाय्यास्तव त्याला तें ऐकतां येईना; आणि पैठणाजवळ एक बादशाहाचा मोठा सरदार होता, तेथें फौजेसहित जाऊन, युद्ध करूं लागला; आणि त्यापासून पराभव पावला. या रीतीज ब्राह्मणीवंश बादशाहाचे राज्यांत, दुसरें बंड झालें नाहीं. त्यांत मराठी लोकही सुखी असतील. यानंतर सन् १३९६ तेराशें शाण्णवांचे सालीं एक मोठा दुष्काळ पडला. तो इतर दुष्काळां प्रमाणें नव्हता म्हणून, त्याचें नांव दुर्गादेवी असें ठेविलें. तो बारा वर्षें होता. नंतर समयीं पाउस पडों लागला; परंतु बहुत दिवस दुष्काळ होता म्हणून, मुलुख व प्रांत ओस पडले होते याजकरितां त्या दुष्काळानंतर ३० तीस वर्षें पर्यंत वसूल अगदीं थोडा येत होता. याशिवाय जे किल्ले मुसलमानानीं घेतले होते ते, पाळेगारांनीं बळकाविले; आणि प्रजेस नाना प्रकारें दुःख देऊं लागले. त्याचा सुमार सन् १४२९ चौदाशें एकुणतीस त्या वेळेस, सुलतान आमेदशाहा ब्राह्मणी नामें बादशाहा होता, त्याणें तें बंड मोडिलें; आणि लोकांस सुख व्हावें म्हणून, बंदोबस्तासाठीं एक सैन्य सिद्ध करून पाठविलें. त्याचा मुखत्यार मलिक उलटीजार नामें एक सरदार करून पाठविला. त्याज बरोबर एक मोठा शाहाणा ब्राह्मण, दादनरसू काळे नामें पाठविला. तें कोणी पाटील, व देशमुख, व देशपांड्या; आढळला असतां त्याला बरोबर नेऊन, त्याचे जागीं त्याला स्थापावा, असें करित चालिले. तें जवळ

काढून;

जाऊन त्याणीं तें बंड मोडून, वांई किल्ला घेतला; आणि बंदरास गेले. मुलुखांचा बंदोबस्त लावून तस्त् काळें याजकडे होता त्याणें, प्रांताचे सीमांचें स्मरण नाहींसें पाहून, सर्व हद्दी नव्या केल्या. त्यांत जे देश फार लाहान होते ते वाढविले; आणि लोकांस पहिल्ये वर्षीं माफीचा कौल दिल्हा. दुसऱ्ये वर्षीं बिघ्यास एक तोबरा दाणा घेऊन, लोक सुखी केले. इतक्यांत घाटमाथ्याचे गभोंशी, लोकांस उपद्रव करूं लागले. तेव्हां बादशाहास असें वाटलें कीं, सर्व डोंगरी किल्ले घेतल्या वांचून, रैतेस सुख होणार नाहीं. यानंतर सुलतान् अल्लाउदीन बादशाहा असतां, त्याचा वजीर मियां मनउल्ला त्याणें, असा मनसोबा केला कीं, सारे सह्याद्रि किल्ले, व कोंकण पट्टींत जे मुलुख आपल्ये हातीं आले नाहींत ते घ्यावे. असा विचार झाल्यावर एक सैन्य नवें सिद्ध करून, मलिखउलटीजार् यास नेमिला. त्या लशकराचा तळ चाकणे जवळ पडला; आणि जुंनराजवळ किल्ला बांधून राहिले; आणिक तेथून फौज कोंकणांत पाठवून, कित्येक दुष्ट राजे जिंकिले. मग जुंनराहून सैन्य सुद्धां कोंकणांत जाऊन, शिरके यांचे किल्ल्यास घेरा घालून, तो किल्ला घेऊन, मलिख् उलटीजारानें राजांस व लोकांस आप आपले धर्म सोडून, मुसलमानाचे धर्मानें चालावें ह्मणून, बहुत आग्रह केला. तेव्हां शिरके जातीचे अस्सल मराठे, यांणीं मोठ्या युक्तीनें त्याची आज्ञा न मोडिली असें दाखवून, बोलिले कीं, सिंहगडकर आमचे आप्त आहेत; त्यांस जिंकून वर्तवावें. नंतर आह्मीं वर्तूं. जर आह्मीं एकटेच तुमचे धर्मानें वागूं लागलों, तर ते आमचा मुलुख घेऊन आह्मांस जातीनिराळे टाकितील. असें ते ह्मणाले या साठीं, तो मुसलमानांचा सरदार, सैन्य घेऊन, सिंहगड घ्यावयास चालिला. ते समयीं शिरके यांणीं वाटेंतच रात्री छापा घालून, त्या सैन्याचा बहुत नाश केला; आणि पुनः आपला मुलुख घेऊन पहिल्या प्रमाणें सुखी राहिले. त्यानंतर सोळा वर्षें, त्या शिरक्यांचा मुलुख घ्यावया विषयीं, बादशाहाचे दरबारीं उद्योग झाला नाहीं. पुढें ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडत चालिलें. तें सन १५२४ पंधराशें चोविसांत अगदीं बुडालें. असें होण्याचें कारण असें झालें कीं, त्या बादशाहानें सर्व संस्थानें घेऊन, आपलें राज्य अमर्याद वाढविलें. त्यामुळें मामलतदारच प्रबळ होऊन, त्याची आज्ञा मानिनात असें झालें असतां, सन १४७८ चौदाशें अठ्याहात्तरांत, कोणी एक मोठा शाहाणा ख्वाजेखान् गावान् प्रधान होता त्याणें, हा सर्व प्रकार पाहून, हें राज्य या प्रकारानेंच बुडेल अशी अटकळ करून, न बुडावें ह्मणून, कांहीं बुद्धीचे कल्पनेनें उपायांची योजना करूं लागला. त्यांत पहिल्यानें असें केलें कीं, कित्येक मुलुखांचा तुकड्या नव्या अधिक करून, त्या त्या जागीं, एक एक शाणा माणूस नेमिला. त्या तुकड्यांचा प्रकार असा केला कि, पहिला कल्बुर्ग्याचा सामला एक होता, त्याचे भाग दोन केले, एक विजापूर आणि दुसरा आसनाबाद. दौलताबादेचे दोन केले, एक दौलताबाद आणि दुसरा जुनरभाग. तेलिंगण जुनें त्याचे दोन केले, एक राजमंडी आणि दुसरा वारंगळ. वराड जुनें त्याचे दोन केले, एक गावेल आणि दुसरा माहूर. याशिवाय त्याणें आणखी कि-

त्येक

त्येक बंदोबस्ताचे उपयोगी कल्पना केल्या होत्या, त्या कांहीं दिवस चालिल्या; आणि तोही मोठा वाढला; या साठीं बहुतांचे मनांत विषम वाटून, त्यांणीं त्याजवर कांहीं एक निमित्त आणून, बादशाहाचे आज्ञेनें त्याला मारिलें. त्या पुढें ब्राह्मणीवंशाची बादशाही सहजेंच बुडाली. जे ख्वाजेखान् गावानास मारविणारे त्यांत एक निजामउल्मुल्क बहिरी ह्मणून होता. त्याचें मूळ असें आहे कि, तो पाथ्री गांवचे कुळकर्ण्याचा पुत्र. जा वेळेस दुर्गादेवी नामें मोठा दुष्काळ पडला, ते समयीं, तो आपल्ये बापाबरोबर कर्नाटक प्रांतीं गेला होता. तेथें काळ क्रमणा करीत असतां, आमेदशाहाबली ब्राह्मणी बादशाहाचें लष्कर आलें; त्या लष्करी लोकांनीं त्याला धरून नेला. नंतर बादशाहाचे आज्ञेनें त्यास मुसलमान करून, बादशाहाचे चाकरीस ठेविला. त्याचें नांव मलिख हुसेन ठेविलें. पुढें महंमदशाहाचे राज्यांत त्याला हजार स्वारांची सरदारी दिल्ही. नंतर तो अधिक अधिक योग्यता पावूं लागला असतां, ख्वाजेखान् गावानाचे आश्रयानें, त्याला तेलिंगणाची मामलत, व या मुलुखाचाही कित्येक जागा मिळाल्या; आणि निजामउल्मुल्क असें नांव पावला. तो असा कृतघ्न होता कीं, शेवटीं त्याणें आपला संरक्षण करणारा जो ख्वाजेखान् गावान् त्यास मारिलें.

## भाग दुसरा अनुक्रमणिका.

ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडाल्यावर पांच राज्यें उत्पन्न झालीं, त्यांतून कांहीं दिवसांनी दोन बुडालीं; आणि तीन राहिलीं; त्यांत एक अहमदनगर, दुसरें विजापूर, तिसरें गोंवळकोंडें, या तिहीं राज्यांचे चतुःसीमेचा प्रकार. १ मुसलमान लोकांचे राज्यांत मराठे लोक कोणे रीतीनें वागत होते तें, व मुसलमान लोक मराठ्यांची योग्यता कशी ठेवित होते तें. २ अहमदनगरचे बादशाहानें आपल्ये वजीरीचें काम ब्राह्मणास सांगीतलें, त्याच वेळेस विजापुरचे बादशाहानें ब्राह्मणांचें माहात्म्य वाढविलें. ३ फिरंगी लोक जाहाजावर बसून आले, आणि कोंकणांत शिरून गोंवें घेतलें; आणखी मोठा उपद्रव करून कोंकणचा वसूल घेतल्हा. ४ तालीकोटाजवळचे लढाईचा प्रकार. ५ विजयानगरचें राज्य बुडालें तें प्रकरण. ६ विजापूरचा बादशाहा, व अहमदनगरचा बादशाहा, हे दोघे मिळोन फिरंगी लोकांशीं लढले; परंतु जय न पावले. ७ महाराष्ट्र देश बहुत करून विजापूरकर व अहमदनगरकर यांचे हस्तगत झाला. ८ अहमदनगर, व विजापूर, व गोंवळकोंडें, ही तीन राज्यें कोण कोणत्या प्रकारें चालत होतीं तें. ९ या राज्यांत राहाणार जे मराठे लोक त्यांस आप आपला धनी निर्निराळा ह्मणून परस्परें युद्ध करावें लागलें.
१० विजापूर व अहमदनगर या दोहों राज्यांत जितकीं मराठी खुर्लें होतीं त्यांचें वृत्त.
११ उत्तरेकडून मोंगलाचें सैन्य दक्षिणेचें राज्य घ्यावयास आलें. १२ दिल्लीचा आकबर

वर बादशाहा दक्षिण जिंकावयास आला त्यावेळेस काय काय वर्तमान झालें तें, व तो मरण पावला तेसमयीं काय झालें तें. १३ मह्लीकंबराची वर्तणूक व लखजी जाधवाचें हनन. १४ शाहाजी भोंसल्याचें वर्तमान. १५ दिल्लीचा बादशाहा जहानगीर याचें मरणाचा प्रकार, व त्याचा पुत्र शाहाजहान याचें स्थापन. १६ मोंगल लोकांनीं विजापूरकरांचे लष्कराचा पराभव केला तो. १७ विजापूरकर व अहमदनगरकर यांचा तह ठरला. १८ मोर्तिजानिजाम अहमदनगरचा बादशाहा त्यास विजापूरचा फत्तेखान् बादशाहानें मारिलें. १९ मोंगल लोकांनीं शाहाजी भोंसल्यास द्यावयाकरितां जे मुलुख कबूल केले होते; ते त्या फत्तेखानानें मोंगलाशीं स्नेह करून आपणास घेतले, यास्तव शाहाजी भोंसले विजापूरकरांस मिळाले. २० मोंगललोक व फत्तेखान यांचा सल्ला झाला असतां फत्तेखानानें मोडिला ह्मणून त्यांचा व याचा युद्धप्रसंग पुनः झाला. २१ शाहाजी भोसल्यानें अहमदनगरचें राज्य चालविलें. २२ दिल्लीचा बादशाहा शाहाजाहान कोणे प्रकारें राज्य करित होता तें. २३ विजापूरकर यांशीं शाहाजाहानानें युद्ध केलें, आणि त्यांचा व यांचा सल्ला कसा झाला. २४ मोंगल लोकानीं शाहाजी भोंसल्यास जिंकल्यावर तो विजापूरकरांचे चाकरीस राहिला; त्या पुढें वहिरी वंश बुडाला. २५.

## भाग दुसरा.

प्रथम भागीं असें लिहिलें आहे कीं ब्राह्मणीवंशाचें राज्य सन् १५२६ पंधराशें सवीस पर्यंत बुडालें नव्हतें, परंतु त्या पूर्वींच ज्यांचें नांव ब्राह्मणीवंश नव्हे असे पांच मुसलमान दक्षिणेंत सत्ता करूं लागले होते; त्यांत जो विजापुरीं होता त्याचे कुळाचें नांव इदिलशाही होतें; गोंवळकोंडें आणि हैदराबाद हीं दोन्हीं एकच या जागीं जो होता त्याचे कुळाचें नांव कुतुभशाही होतें; तिसरा वराडांत होता, त्याचे वंशास अंमादशाही ह्मणत; चवथा अहमदनगरीं असे तो निजामशाही कुळाचा होता; पांचवा अहमदाबादबेदरचा राहाणार त्याची वरीदशाही कुळी; असे पांच झाले होते; परंतु अंमादशाही आणि वरीदशाही या दोन्हीं कुळ्या थोडक्याच दिवसानीं बुडाल्या; आणि इदिलशाही १ कुतुभशाही २ निजामशाही ३ या तीन्ही राहिल्या. तेसमयीं मराठी लोकांस तेज आलें. त्या योगें ते स्वतंत्रपणा करूं लागले. दुसरें प्रथम भागांत लिहिलें कीं, सन् १४७७ चौदाशें सत्त्याहत्तरांत खाजेखानानें राज्यांतल्या परगण्यांचे नवनवे अधीक भाग करून, त्याला जागीं एक एक उत्तम माणूस ठेविला. त्यांत जो दौलताबादेस ठेविला, तो आदिलखान्सावी नामें मुसलमान होता. तो जोंपर्यंत खाजेखान् होता तोंपर्यंत दौलताबादेस होता. नंतर बादशाहानें त्यास विजापुरीं ठेविला. तेथें सहज कांहीं निमित्तें घडलीं तीं सर्व दैवयोगें त्यास अनुकूळ होऊन, शेवटीं सन १४८९ चौदाशें एकुणनव्वदांत सालीं तो बादशाहाचें पद पावोन, सर्व

राज्याचा

राज्याचा अनुभव घेऊं लागला. असें विजापुरचे बादशाहीचें मूळ आहे. त्या दिवसापासून इदिलशाही वंश दक्षिणेंत मोठा विख्यात आला. अहमदनगरच्या बादशाहीचें मूळ असें आलें कीं. निजामउल्मुल्क बहिरी नांवे ख्वाजे खान गावान वजीराचा आश्रित होता. त्याणें त्या वजीरास मारवून सुलतानाचें मन प्रसन्न करून तो मेल्या नंतर त्याचे पुत्राची वजीरी तो आपण करूं लागला; आणि त्यानें ख्यानानें दिल्ह्या अधिकारीं मलिक आमेद नामें आपला पुत्र स्थापिला. अणखी किल्लेक जागा आपल्ये पुत्रास देवविल्या. त्यांत जुंनर आणि दौलताबादचे परगणे लावून दिल्हे होते. नंतर निजाम उल्मुल्कानें जगा आपला पोषक ख्वाजे खान गावान वजीर याचा घात केला. त्या प्रकारेंच दुसऱ्या कोणी दुष्टानें त्यास मारिलें. त्या वेळेस त्याचा पुत्र मलिक आमेद मोठें बंड उत्पन्न करून आला; आणि बादशाही आपण करूं लागला. त्या समयीं ब्राह्मणी वंशाचा बादशाहा महामुद शाहा ब्राह्मणी होता. त्याणें तें बंड मोडावयाकरितां फार उद्योग केला, परंतु उपाय चालेना असा अहमदनगरचा बादशाहा आला, आणि त्याचें नांव निजाम. अणखी त्याला बहिरी ह्मणत होते.* कुतुभशाही बादशाहीचें मूळ असें आहे कीं. सन १४९५. चौदाशें पंचाण्णवांत तेलिंगणाची मामलत कुतुभउल्मुल्क नामें कोणी एक मुसलमान होता त्याला सांगीतली होती. त्याणें सोळा वर्षे पर्यंत केली. नंतर तो सन १५१२. पंधराशें बारांत गोंवळकोंडयाचे बादशाहीचें तक्त पावला; आणि आपलें नांव कुतुभशाहा असें चालविलें. असाच वराडचा मामलेदार वराडची बादशाही पावला. त्याचें नांव फत्तेउल्ला अंमाद उल्मुल्क होतें त्याचें राज्य १५१२. पंधराशें बारापासून १५७४ पंधराशें चौऱ्याहत्तरी पर्यंत चाललें. त्यानंतर अहमदनगरचे बादशाहानें तें राज्य घेतलें. बरीदशाही होती ती अंमादशाहीचे आगोदरच बुडाली. तीचे खालीं बेदर व कल्बुर्गा यांचे जवळचा मुलुख होता; ती विजापुरचे बादशाहानें घेतली. याप्रमाणें दोन बुडाल्यावर एक विजापूरची, दुसरी अहमदनगरची, तिसरी गोंवळकोंडयाची. या तीन राहिल्या. त्यांत विजापुरचे बादशाहीची हद्द. दक्षिणेस निरा नदी पासून तुंगभद्रा नदी पर्यंत होती; आणि तुंगभद्रेचे दक्षिणतीरीं आदोणी परगणा, व नंदिहाळ शहर होतें. तेंही विजापुरचे बादशाहीखालीं होतें; पश्चिमेस कोंकणपट्टीत बाणकोटापासून गमस पर्यंत मुलुख मध्यें मध्यें कांहीं कांहीं ठिकाणें सोडून विजापुराकडे होता. पूर्वेकडे रचोर परगणा, व इदगीर परगणा, व मलकेर परगणा. व बेदर परगणा. हे चार परगणे विजापुराकडे होते. या खेरीज पूर्वेकडचे दुसरे परगणे जे राहिले. ते गोंवळकोंडयाकडे होते. उत्तरेकडे आंकलकोट, व नळदुर्ग. व कालीयान, व सोलापूर, इतके मुलुख विजा-

---

* बहिरी नांव पडायाचें कारण असें कीं. त्याचा बाप योग्यता पावल्याचे पूर्वी बहिरी पक्षी याचें संरक्षण करावयाचें काम पत्करून शिकारख्यान्यांत चाकरीस राहिला होता ह्मणून असें नांव पडलें

पुरचे बादशाही खालीं होते. अहमदनगरचे बादशाही खालीं वराडसंबंधी कित्येक मुलुख, व औरंगाबाद सुभा, व आळंद परगणा, कल्याणदेशांतील कित्येक परगणे, व बागलाणापासून वसई पर्यंत कोंकणपट्टी. इतके मुलुख अहमदनगरचे बादशाही खालीं होते. गोंवळकोंड्याची बादशाही अशी किं, जीचे पश्चिमेचे आगीं विजापूरकर व अहमदनगरकर यांचीं राज्यें होतीं. त्यांपासून पूर्वेस समुद्रापावेतों मुलुख गोंवळकोंड्याचे बादशाहीकडे होता; परंतु राजमंडीशहर व त्याखालचा मुलुख त्याचे स्वाधीन नव्हता. तेथें दुसरा राजा होता. या तिन्हीं राज्यांत मुलुखांचीं नांवें ठेवण्याची रीति अशी होती किं, मोठें सरकार, त्यामध्यें परगणा, त्याचे आंत कर्यात, तीचे पोटीं समत, तीचे मध्यें महाल, त्याचे आंत तालुका. या खेरीज हिंदी नांवें प्रांत आणि देश अशीं होतीं. दुसरे राज्यांत अशी रीति होती किं, ल्हान व मोठा मामला सरखल्यानें सांभाळावा; कदाचित सरखतान केला तर बहुतकरून हिंदूलोकांस द्यावा. सरखल्याचा पैका घेणें, व मुलुखांत चौकी पाहारा इत्यादि बंदोबस्त ठेवणें, व मुलखाचे सीमेसंबंधीं खटलें असल्यास त्याची चौकशी करणें. या इतक्या कामांवर बादशाहाचे दरबारांतून एके एके जागीं आमिलनामें एक एक कारभारी ठेवित. त्या कारभाऱ्यानें वतनसंबंधीं अथवा लोकांचे भाऊबंदकीचें वगैरे दुसरें कांहीं खटलें असल्यास त्याची पंचाईत करून पंचांचे विचारानुरूप करावें. जातीनें मनास आणूं नये. विजापुरचे राज्यांत एक मोठा आमिल होता त्याचें नांव मोकासादार ठेविलें असे; आणि दुसरे आमिल त्याचे आज्ञेंत वागत असत. असे कित्येक मोकासादार वीस वीस वर्षें कामावर होते. त्यांत कोणी मेला असतां त्या कामावर त्याचे पुत्रास ठेवित; अशी चाल होती. कांकिं मोकासादारास त्या द्रव्याचा कांहीं विभाग होता. कित्येकवेळा एका वर्षांत मोकासादार पहिला दूर करून दुसरा ठेविला असें झालें. आणखी मोकासादारी निरंतर मुसलमानासच द्यावी असें नव्हतें. कधीं कधीं हिंदूसही देत होते. त्या राज्यांत मोकासादारी पेक्षां मोठा अधिकार दुसरा बहुत करून नव्हता. कधीं कधीं सुभा मोठा असे; परंतु सुभ्यानें नेहेमीं त्या प्रांतीं नसावें, बहुधा दरबारींच असावें. त्याणें मुलुखाचे व सुल्ताचें काम न करावें. परंतु त्याचे मुलुखाचे दप्तरावर त्याची सही घेत होते. ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडाल्यावर कांहीं दिवस नवीं नवीं राज्यें झालीं. परंतु मराठी लोकांचे वर्तमानांत अंतर पडलें नाहीं. त्या वेळेचे बखरी वरून असें वाटतें किं, बहुधा डोंगरी किल्ले मराठी लोकांकडे बादशाहाकडून असत. कधीं कधीं बादशाहाकडेसच असत. कधीं कधीं देशमुख व देशपांडे यांकडे असत; त्यांत कित्येक प्रांतांतील मोठे मोठे किल्ले बादशाहा आपणाजवळच राखीत. त्या लोकांत ज्याचे स्वाधीन बहुत स्वार असा जो मोठा सरदार त्याला मोठ्या योग्यतेचें नांव मनसब असें देत होते. तो अधिकार व तें नांव कधीं कधीं हिंदूस देत, अशी बादशाहाची कृपा हिंदुलोकांवर होती. याशिवाय हिंदूंनीं फौजेसहित आपल्ये चाकरीस असावें ह्मणून कित्येक

जहागिरी

जहागिरी इनामें देत असेत. त्यानिमित्त चाकरी करितां हिंदुलोकांस बहुत फौज ठेवावी लागत नव्हती. त्यासमयीं फलटण देशाचा जहागिरदार विजापूरकराकडे होता. त्यापासून बादशाहा पन्नासों स्वारांची चाकरी घेत असे; आणि मराठे पेशवे यांचे वेळेस त्या जहागिरदारापासून ३५० साडेतीनशें स्वारांची चाकरी पेशवे घेऊं लागले. पेशवे यांचे पूर्वी इदिलशाही बादशाहींत मराठे लोकांस बर्गी असें नांव नुसतें मानानें देविलें होतें. तें आतां बहुतकरून प्रसिद्ध नाहीं. असें वाटतें कि, जसें यांतस बारभाई नांव हलकें आहे, तसेंच त्या वेळेस बर्गी नांव कितनीस उणें असेल. प्रायः तें नांव कर्नाटक प्रांतींचे बंडकर्णार्ये त्यांस होतें. त्यांत कोणी मोठे मोठे जहागिरदारही होते; असें असतां सन १५७७ पंधराशें सत्याहत्तरांत त्या बर्ग्यांतील अधिकारी यांणीं कर्नाटकांत मोठें बंड उत्पन्न केलें. तेव्हां विजापूरचा इदिलशाह बादशाहा याणें तें बंड मोडावयाकरितां लष्कर पाठविलें तें एक वर्ष पर्यंत लढलें; परंतु उपाय चालेना. ते समयीं बादशाहानें कोणी एक बाबूपंत नामें ब्राह्मण सहाय केला. त्याचे हातानें त्या बर्ग्यांतील बहुतेक अधिकारी आपल्ये हस्तगत करून कपटानें मारिले. यानंतर ते बर्गीलोक विजापूरचा इदिलशाहा याचेच आश्रयानें निजामशाहा बादशाहाशीं लढूं लागले. विजापूरकर व अहमदनगरकर यांचे लष्करांत बहुतकरून मराठेलोक फार होते. कांकि त्यांचीं राज्यें महाराष्ट्र देशांत होतीं. गोंवळकोंडकर यांचे लष्करांत मराठेलोक बहुत नव्हते. विजापूरकर, व अहमदनगरकर, व गोंवळकोंडकर, यांतियांजवळ मराठेलोक होते. परस्परें युद्धप्रसंग पडला असतां, आपल्ये जातीचा लोभ न धरितां लढत असत. भाउबंदकी संबंधी द्वेष पडला, किंवा बापलेकांत विनुष्ट पडलें असतां, भाउबंद, व बापलेक, याणीं परस्परें निकरानें लढावें. अशी एक मराठी लोकांत चाल होती. ती, यांचे पूर्वींचा बामणी वंशाचे राज्या पासून चालत आली. तीचा प्रतिबंध त्या वेळेचा बादशाहानें न केला. कांकि ते आपल्ये जातींत भांडूं लागले; ते दुसऱ्याशीं काय लढतात, असें समजून, सोडिली नाहीं. तशीच रक्षिली. विजापूरकर, व अहमदनगरकर, यांचे राज्यांत मराठे सरदार कोण कोण होते. त्यांचा तपशील मग येईल. आधीं विजापूर, व अहमदनगर, व गोंवळकोंडा, या तिन्हीं राज्यांत किती बादशाहा झाले, तो विस्तार. त्यानंतर फिरंगीलोक कोंकणांत आले, तें प्रकरण. त्यापुढें मराठे सरदार यांचें वर्तमान लिहिलें जाईल. प्रथम विजापूर, व अहमदनगर, व गोंवळकोंडा, या तिन्हीं राज्यांत बादशाहा किती झाले तो प्रकार.

| विजापूर | अहमदनगर | गोंवळकोंडा |
|---|---|---|
| विजापूरचा बादशाहा पहि- | अहमदनगरचा बादशाहा | गोंवळकोंड्याचा बादशाहा |
| ला सुलतान यूसफ आदिल- | पहिला मलिक अहमद. | पहिला कुतुबउल्मुल्क ना- |
| शाहा. तो १४८९. चौदाशें ए- | तो, निजामउल्मुल्क बहिरी | ते १५१२ पंधराशें बारांत |
| कुण | असे. | आला |

## विजापूर.

कृष्णानदीत तक्ताधिपती आला. आणि १५१० पंधराशें दहांत मरण पावला.

त्याचा पुत्र दुसरा सुलतान इस्मायल आदिलशाहा. त्याचे जागीं बसविला. तो १५३४ पंधराशें चौतिसांत मेला.

त्याचा पुत्र तिसरा सुलतान मल्लू आदिलशाहा त्याचे ठिकाणीं स्थापिला. तो १५५५ पंधराशें पंचावन्नांत पदच्युत केला.

त्याचा भाऊ चवथा सुलतान इभ्राहीम आदिलशाहा स्थापिला. तो १५५७ पंधराशें सत्तावन्नांत मेला.

त्याचा पुत्र पांचवा सुलतान् आदिलशाहा झाला. तो, १५८० पंधराशें ऐशींत कारभाऱ्यांनीं कपटानें मारिला.

त्याचा पुत्र साहावा सुलतान् इभ्राहीम् आदिलशाहा. तो. त्याचे स्थानीं बसविला. त्याचे मरणाचा प्रकार पुढले भागीं येईल.

## अहमदनगर.

असें नांव पावून. १४७७ चौदाशें सत्याहत्तरांत राज्य करूं लागला; आणि १५०८ पंधराशें आठ सुमारें तेव्हां मृत्यु पावला.

त्याचा पुत्र दुसरा सुलतान बुऱ्हाण निजाम आला. तो. १५५३ पंधराशें त्रेपन्नांत मरण पावला.

त्याचा पुत्र तिसरा सुलतान हुसेन निजामशाहा बसविला. तो. १५५६ पंधराशें छप्पन्नांत मृत्यु पावला.

त्याचा पुत्र चवथा सुलतान मोर्तिजा निजामशाहा झाला. तो, त्याचे पुत्रानें १५७७ पंधराशें सत्याहात्तरांत मारिला; आणि आपण तक्ताधिपती झाला. त्याचें नांव सुलतान हुसेन निजामशाहा बादशाहा. त्याणें दोन महिने राज्य केलें. नंतर कारभाऱ्यांनीं त्यास मारिलें.

त्याचा भाऊ साहावा सुलतान इस्मायल निजामशाहा झाला. तो, तक्ताधिपती असतां, त्याला त्याचे बापानें का-

ढून

## गोंवळकोंडें.

झाला. तो १५५१ पंधराशें एकावन्नांत कारभाऱ्यांनीं मारिला.

त्याचा पुत्र दुसरा सुलतान जमशीद. तो, सात महिने राज्य करून मेला.

त्याचा भाऊ तिसरा सुलतान इभ्राम कुतुबशाहा बादशाहा झाला. तो १५८१ पंधराशें एक्याऐशींत मृत्यु पावला.

त्याचा पुत्र चवथा सुलतान महंमद कुली कुतुबशाहा झाला. तो, मेल्यानंतर त्याचा भाऊ सुलतान् अबदुल्ला कुतुबशाहा* झाला.

* इतकीं प्रकरणें मनइछावी ग्रंथकाचें मूळापासून मोंगलाशेंपर्यंत झाल्यीं या खेरीज राहिल्यीं तीं पुढचे भागीं येतील.

दून दिला; आणि आपण तें
पद घेतलें, त्याचें नांव सुलता-
न बुराहाण निजामशाहा, तो मा-
नवा आला; आणि १५९४ पंध-
राशें चौऱ्याण्णवांत मरण पा-
वला.

सन् इशवीशकाचे १४९८ चौदाशें अठ्याण्णवांचे पांचवे महिन्यांत फिरंगी पोर्तुगीस लोक, यांचा जातीचा एक वास्कोदिगा नामें मोठा सर्दार, बरोबर फिरंगी लोक घेऊन जाहाजांत बसून आला, तो केरळ देशीं समुद्रतीरीं एक कलिकत नामें शहर आहे तेथें उतरला; आणि युद्ध न करितां त्या देशांत आपल्ये लोकांसहित सुखवस्ती राहिला. त्याचा स्वभाव सुखवस्ति राहावें असा नव्हता, यास्तव १५०७ पंधराशें सातांत चौल शहराजवळ मिसरी लोकयांचे लढाऊ गलबतांची व पोर्तुगीस लोकांचे लढाऊ गलबतांची गांठ पडतांच उभयतां मोठ्ये निकरानें लढले. नंतर निजाम उल्मुल्क बहिरी यांशीं पोर्तुगीस लोकांनी सख्य केलें; आणि समुद्रांत व मुलखांत उपद्रव करूं लागले. ते सन् १५०८ पंधराशें आठांत दाभोळचे खाडींतून येऊन, दाभोळ लुटून, गेले. ते समयीं, त्यांचे हातीं कांहीं मुलुख लागला नव्हता. नंतर, तुळव्याचा तिमोजी नामें एक समुद्रांतला लुटारू होता, तो पोर्तुगीस लोकांचा अल्फान्सो आल्बरकर्क नामें सरदार होता, त्यास मिळाला, मग त्याचे मसलतीनें सन् १५१० पंधराशें दाहांचे दुसरे महिन्याचे २१ सत्ताविसाव्ये तारिखेस छापा घालून, गोवें घेतलें, तें त्यावेळेस विजापूरचे राज्याखालीं होतें, ह्मणून, विजापूरचा बादशाहा यूसफ आदिलशाहा फौजेसहित आला; आणि त्याणें लढून, गोवें घेतलें. त्यानंतर त्याच वर्षाचे दाहाव्ये महिन्याचे २५ पंचविसाव्ये तारिखेस गोवें पोर्तुगीस लोकांनीं पुनः घेतलें, तें आजपर्यंत त्यांजकडेच आहे. त्या पुढें सन् १५३२ पंधराशें बत्तिसांत ते लोक जाहाजांतून आले. ते चिंचणीतारापुरीं येऊन उतरले; आणि त्यांणीं तेथपासून वसईपर्यंत मुलुख लुटला. ते वेळेस वसईचा किल्ला नवाच बांधलेला होता, तो पाडिला; आणि ठाणें व मुंबई शहर यांची खंडणी घेतली. त्यापुढें दोन वर्षांनीं दमान घेतलें. त्या समयीं गुजराथेंत सुलतान बाहादुर नामें बादशाहा होता, तो दिल्लीचे बादशाहाशीं लढून, केवळ हीनबळ झालेला, असा पाहून, फिरंगी लोक त्याला ह्मणूं लागले. कीं आह्मांस वसई परगणा द्या; आणि काठेवाडांत दिउ येथें किल्ला बांधावयास जागा, आणि आवंत्यानचे जाहाजांचे जकातींत आह्मास कांहीं विभाग असावा, ह्मणजे आह्मीं दिल्लीचे बादशाहाशीं लढाई करावयास तुमचे कुमकेला येऊं या प्रमाणें त्याचें बोलणें मान्य करावयास सुल्तानास मोठ्या अडचणीमुळें अगत्य पडलें. नंतर ते पोर्तुगीस

लोक

लोक कित्येक वर्षे लोकांस उपद्रव नकरितां. आपल्ये मुलखाचा बंदोबस्त करित होते. पुढें सन १५४८ पंधराशें अठ्येचाळीसांत त्याणीं समुद्रतीरचा मुलुख बाणकोटा पासून गोमंतकपर्यंत लुटला, आणि जाळिला; ता, तेसमयीं विजापूरचे राज्याखालीं होता. त्या पुढें १५७१ पंधराशें एकाहात्तरपर्यंत त्या लोकांचें वर्तमान विशेष ल्याहावें असें झालें नाहीं. त्या वर्षी विजापूरच्या बादशाहा, व अहंमदनगरचा बादशाहा, हे दोघे मिळोन फिरंगी लोकांशीं लढायी करावयास गेले. ते गोवें, आणि चौलबाहर, या दोहोंस वेढा घालून लढूं लागले; परंतु पोर्तुगीस लोकांपुढें त्यांचें बळ चाललें नाहीं. ते आपणाच पराभव पावले; आपल्ये जातिस्वभावाप्रमाणें, उगेच बोलूं लागले. कि यांचें युद्ध, शौर्ययुक्त नाहीं. हे कपटानें लढतात. असें भाषण करित करित पळून गेले.

आतां, मराठे सरदार यांचें वर्तमान. विजापूरचे बादशाहाचे चाकरीस मराठे सरदार मुख्य होते. एक चंद्रराव मोरे, दुसरे रावनाईक निंबाळकर, ज्यांस फलटणराव हिस्सणत होते. तिसरे जुझारराव घाटूग, चौथे राव माने, पांचवे घोरपडे, साह्यवे डफळे, सातवे सावंत बहादर वाडीचे देशमुख, वगैरे विजापूरकरांकडे होते. अहमदनगरकरांजवळ होते त्यांत एक रावजाधव, दुसरे राव भोंसले, आणि दुसरे बहुत न्यून पदाचे होते. विजापूरवाल्यांचे चंद्रराव मोरे यांचें मूळ असें आहे कीं, पूर्वी, कर्नाटकांत एक मोरे आडनावाचा नाईक होता. त्याला यूसफुआदिलशाह विजापूरचा बादशाह याणें हिंडी पायदळ फौज १२००० बाराहजार देउन, निरा आणि वारणा या दोहों नद्यांचे मधला मुलुख, जो घ्यावयास कठीण फार अडचणीचा असा होता, तो घ्यावयाचें काम सांगीतलें. ते समयीं, त्या मुलुखांत शिरके यांचे मूळपुरुष होते, आणि त्यांचे सहाय जे होते ते एक गुजर, दुसरे मामुलकर, तिसरे मोहिते, चौथे महाडिक, वगैरे असतां मोरियाणीं तेथें जाउन ते शिरके व त्यांचे सहाय जिंकून तो मुलुख घेतला. एवढें काम केलें ह्मणून बादशाह याणें त्याचे नावाला चंद्रराव असें पद जोडून त्यास जावळीचा राजा केला. ते मोरे त्या पुरुषापासून पुढें सात पुरुषपर्यंत तेथेंच होते; त्याणीं तें राज्य उत्तम नीतीनें केलें ह्मणून, बहुत लोक येउन तो मुलुख वस्तीस योग्य नसतां तेथेंच राहिले. त्या बादशाहानें ठेविलेलें चंद्रराव असें नांव मोरे यांचे सातां पिढ्यांस चालिलें. ते बादशाहाचे आज्ञेंत वागत ह्मणून बादशाह त्यांचे मुलुखाचा वसुल, आपलें स्वामित्वमात्र राखावयास फार थोडा घेत असे. ज्यांस फलटण नाईक ह्मणत तेच निंबाळकर; त्यांचे कुळाचें पूर्वीचें नांव पंवार असें होतें; त्यांचा मूळपुरुष निंबाळीक गावीं राहात होता; त्या गांवास आतां निंबळक ह्मणतात. हें कुळ मराठी लोकांत पुरातन आहे; याचे पहिल्ये पुरुषांस फलटणदेशचे देशमुखीचा विभाग होता. सन सोळाशें चाळीस सुमारें विजापूरचे बादशाहानें त्यांस सरदेशमुखी दिली; त्याणीं आपलें नांव बदलून दुसरें केलें नाहीं. जे पहिले

नाईक

नाईक असें होतें तेंच चालविलें. सन सोळाशें सुमारें त्या कुळाचा एक पुरुष वंगोजी
नाईक होता, त्याला लोक जगपाळ ह्मणत. तो मोठी पुंडाई करीत असे. त्याची बहीण
शिवाजी महाराजाची मायआजी. मल्लावरीचे देशमुख जुझारराव, ते घाटगे यांचे
कुळांत श्रेष्ठ होते; त्यांचें राहाणें ग्वदांव देशीं असे; त्यांचे देशाची मर्यादा व निंबाळ-
कर यांचे देशाची मर्यादा या दोहोंमध्यें महादेवाचा डोंगर. ते घाटगे मान परगण्या-
चे देशमूख होते. त्यांचे मूळपुरुषास ब्राह्मणीवंशाचे बादशाहानें मनसब दिल्ही हो-
ती. ती तारीख कोणती व तो बादशाह कोणनावाचा होता तें कळत नाहीं. विजापुरचा
बादशाह इब्राहीम आदिलशाह, याणें घाटगे यांस *सरदेशमुखी व जुझारराव अ-
सें नाव, सन सोळाशें सहिसांत दिल्हें. पूर्वीपासून घाटगे यांचे कुळाचा स्वभाव आप-
ल्ये आपल्यांत भांडावें असा लोकांत प्रसिद्ध आहे. माने यांचे मूळपुरुष ह्मसवडचे दे-
शमूख होते, त्यांची जागा व घाटगे यांची जागा दोन्हीं शेजारीं होत्या. ते विजापूरकरा-
जवळ †शिलेदारी करून विख्यात झाले. घोरपडे यांचें मूळचें उपनाव भोसले होतें.
त्यांचा एक पुरुष कोंकणचा मोठा कठीण किल्ला घ्यावयाकरितां, घोरपडीचे कमरेस
व आपल्ये कमरेस एक दोरी बांधून, घोरपड किल्यावर चढवून त्या दोरीवरून आप-
ण किल्यावर गेला; आणि तो किल्ला घेतला. ह्मणून त्याचें नाव घोरपडे पडलें आहे,
असें बखरेवरून वाटतें. विजापूरचे बादशाहींत त्यांची देशमुखी होती, त्यांचे कु-
ळास नावें दुसरीं, त्या नावांतच दोन होतीं एक ‡कापशी, आणि एक मुधोळ. कापशी
वारणातीरीं होते; आणि मुधोळ घटप्रभेचे कांठीं असत. डफळे विजापुराजवळ ज-
त परगणा आहे तेथचे देशमूख. यांचें पूर्वीचें उपनाव चव्हाण हे डफळापुरीं पाटि-
लकी करीत ह्मणून, यांचें नांव डफळे असें पडलें. विजापूरसरकारांतून त्यांस मन-
सब अधिकार मिळाला होता; परंतु दुसरें कांहीं वेगळें नाव मिळालें नाहीं. सावंत पहि-
लेपासून वाडीचे देशमूख, त्यांणीं पोर्तुगीसलोकांशीं फार चांगली लढाई केली ह्मणू-
न बादशाहानें त्यांचे नांवांस बहादर असें पद जोडिलें त्यापासून सावंत बहादर अ-
सें त्यांस लोक ह्मणूं लागले. त्यांचें मूळचें उपनाव भोंसले. त्यांजवळ नुस्ती पायदळ
फौज होती, आणि त्या मुलुखीं दुसऱ्ये फौजेचा उपयोग नव्हता त्या वाडीवाल्यांस कु-

---

+ मनसब ह्मणजे, मोंगलाईंत स्वारांचे सरदारी सारिखा अधिकार होता, तो कधीं कधीं १०००० दहा हजार स्वारांचा असे. ते लोक त्यांचे खर्चाप्रमाणें त्यास जहागीर देत असत.

---

* सरदेशमुख्यास विजापूरचे बादशाहींत वसुलाचा विभाग किती होता तो कळत नाहीं; परंतु दिल्लीचा औरंजेब बादशाह याचे वेळेस कित्येका सरदेशमुख्याना शेंकडा दोन रुपये प्रमाणें विभाग होता.

---

† शिलेदार ह्मणजे जो आपल्ये स्वतःचा घोड्यावर बसून धण्याची चाकरी करितो तो, आणि जो धण्याचे घोड्यावर बसून चाकरी करितो तो बारगीर.

---

‡ कापशी यांस विजापूरचे सरकारांत सवकस ह्मणत, आणि मुधोळास मानकर ह्मणत.

डाळ

डाळ देश म्हणतात. अहमदनगरचे राज्यांत एक मराठा सरदार मुख्य होता, त्याचें नांव जाधवराव; तो सिंदखेडचा देशमुख. त्याचा मूळपुरुष देवगडचा राजा असेल. असें वाटतें कीं सर्व मराठी कुळांत जाधवरावाप्रमाणें दुसरा प्रतापी नव्हता. सन सदाशें च्या सुमारें निजामशाह बादशहाचे सरकारांतून त्याला दहा हजार स्वारांची सरदारी सांगून त्याचे बंदोबस्तास जहागीर दिली होती. दुसरे मुख्य सरदार भोसले ते मोठे कुलीन होते. असें वाटतें कीं त्यांची जहागिरकी बहुत जागा होती; परंतु त्यांचें राहाव-याचें ठिकाण दवलताबादेजवळ वेरूळ म्हणून गांव आहे, ते. पहिले बाबजी भोसले यांस पुत्र दोघे. त्यांत वडील विठोजी, धाकटा मालोजी. त्याला जगपाळराव नाईक निंबाळकर फलटणचा देशमुख, याची बहीण दीपाबाई दिली होती. तो मालोजी भोसला पंचवीस वर्षांचा झाल्यावर आपल्ये बरोबर कित्येक स्वार घेऊन लुकजी जाधवाचे आश्रयानें मोर्तिजा निजामशाह बादशाह याचे चाकरीस राहिला. हें वर्तमान सन पंधराशें सत्याहात्तरांत झालें. त्या मालोजीस पुत्र नव्हता म्हणून त्याणें मोठी देवसेवा केली; परंतु पुत्र झाला नाहीं. मग अहमदनगरीं एक मुसलमान जातीचा शाहशरीफ नांवें मोठा सिद्ध होता; त्याणें आपल्ये देवाजवळ विनंती करून मालोजीस सांगितलें कीं, तुला पुत्र होईल. नंतर कांहीं दिवसांनीं त्याची स्त्री दीपाबाई प्रसूत झाली. पुत्र झाला. मालोजीनें तो सिद्धाचे प्रसादें करून झाला असें जाणून, त्या मुलाचें नांव शाहाजी ठेविलें. त्यावर दुसरे वर्षीं दुसरा पुत्र झाला. त्याचें नांव शरीफजी ठेविलें. त्या शाहाजी भोसल्याचें जन्म पंधराशें चौऱ्याण्णवांत झालें. मालोजी भोसले उत्तम प्रकारें सरकार चाकरी करून योग्यता पावूं लागले; आणि ज्या जाधवाचे आश्रयानें चाकरी मिळविली तो लुकजी जाधवराव ही त्यावर बहुत कृपा करूं लागला. मालोजीचा पुत्र शाहाजी रूपानें फार चांगला होता. सन पंधराशें नव्याण्णवांत शिमग्यामध्यें मालोजीनें आपल्ये पुत्रास लुकजी जाधवरावाचे घरीं नेलें. तेव्हां जाधवराव त्या मुलाचें रूप पाहून बहुत खुष होऊन त्या मुलास जवळ बोलावून जिजाबाई कन्या मांडीवर होती तिला बोलिला कीं, हा तुला नवरा पाहिजे काय? आणीक मंडळीस म्हणूं लागला कीं, हा जोडा कसा दिसतो. इतक्यांत तीं दोन्ही मुलें एकमेकांवर गुलाल उधळूं लागलीं; तें पाहून सर्व मंडळीस चमत्कार वाटला; आणि हांसूं लागले. तेवेळेस भोसले उभे राहून बोलिले कीं, ऐकाहो सर्व मंडळी, आज पासून जाधवराव आमचे व्याही झाले यास तुम्ही साक्षी आहांत. तेव्हां त्या मंडळींत कोणी कोणी म्हणाले कीं हें ठीक आहे. तें ऐकून जाधवराव खिन्न होऊन उगाच राहिला, कांहीं बोलिला नाहीं. त्यानंतर दुसरे दिवशीं जाधवानें त्यास भोजनास बोलाविलें, तेव्हां तो म्हणाला कीं, तुम्ही व्याही झाल्यावर मी येईन. नाहींतर येणार नाहीं. हें ऐकून किसाप मान्य न केलें; आणि त्याचे स्त्रीनेंही कबूलना-

न राग येऊन बोलिली. कीं असें भाषण विनोदांत ही नकावें; माझे कन्येचे आणि त्याचे योग्यतेस अंतर किती आहे? त्यानंतर मालोजी आपल्ये राहायाचे ठिकाणीं गेला परंतु त्याणें तो अर्थ मनांत धरून त्याचे साधनाकरितां. कांहीं लवाडया करून द्रव्य मिळविलें, तें चांभारगोंद्याचा सावकार शेषाप्पा नाईक याजवळ ठेविलें; आणि लोकांत अशी प्रसिद्धि केली कीं, भवानी आम्हाला प्रसन्न होऊन द्रव्य देऊन बोलली कीं, तुमचे कुळांत एक राजा होईल; तो गायासारिखा गुणवान् होईल; आणि ब्राह्मणाचें पोषण फार चांगलें करील; आणखी त्या पुरुषापासून पुढें २७ सत्तावीस पुरुष पर्यंत त्याचें राज्य निर्बाध चालेल. इतकें केल्यावर आणखी मोठी कीर्ति व्हावी म्हणून कित्येक जागीं देवालयें व तळीं बांधिलीं आणि बहुत घोडे विकत घेतले. ते समयीं, त्या राज्याचें सामर्थ्य कमी होऊं लागलें होतें, तें समजून याणें त्या दर्बारी लोकांस द्रव्य देऊन वश केले होते, त्या योगेंकरून त्याला बादशाहापासून पांच हजार स्वारांची सरदारी, आणि मालोजी राजे असें नांव मिळालें. याखेरीज शिवनेर व चाकण या दोहों किल्यांची, व यांचे खालचे मुलुखाची मामलत प्राप्त झाली; आणि पुणे परगणा व सुपे परगणा त्यास जाहागीर मिळाला. एवढया योग्यतेस आल्यावर बादशाह याचे आज्ञेनें त्याशीं संबंध करावयास जाधवराव सिद्ध झाले मग जाधवरावाची कन्या जिजाबाई व मालोजीचा पुत्र शाहाजी या दोघांचें लग्न मोठया समारंभानें झालें.

सन् पंधराशें नव्वदांत दिल्लीचा मोठा यशस्वी आकबर बादशाह याणें मनांत आणिलें किं, दक्षिणेचे अस्के बादशाह जिंकावे. तेव्हां ते सर्व परस्परें लढत असत, आणि आपसांत आपसांतवैमनस्यें होतीं, म्हणून आकबरास बहुतेक दक्षिणेचें राज्य मिळालें. याखेरीज खानदेश व निजामाचा मुलुख, त्यांत अहमदनगरचा किल्ला आणि कांहीं वराडदेश हे त्याचे हस्तगत झाले. तो बादशाह पंधरा वर्षांत इतकें करून सोळाशें पांचांत मृत्यु पावला. अहमदनगरचा किल्ला जावेळेस आकबराचे लोक मोंगल याणीं घेतला, ते समयीं, तेथचा बादशाहा निजाम् शाह बहादर तो केवळ बाळ होता त्याला त्या मोंगलांनी बंदींत ठेविला. त्याचे पूर्वी अहमद नगरचे राज्यांत दोन फळ्या झाल्या होत्या, एकाचे मुख्त्यार हिंदू होते, एकाचे हबशी, जांत कित्येक श्रेष्ठ मुसलमान होते. त्यांत हिंदूनीं आपल्ये कुमकेस आकबराचा मोंगलांस बोलाविलें, ते त्यांची कुमक नकरितां मुलुखमात्र घेते झाले. तेव्हां, हिंदूचे मोटे मोटे मानकरी यांस पश्चात्ताप झाला, मुसलमान लोक यांचा मुलुख मोंगलानीं घेतला, आणि बादशाह बंदींत ठेविला तरी, ते त्या आपल्या राज्याविषयीं निराश झाले नाहींत ते आपल्ये सामर्थ्यें करून श्रेष्ठत्व पावले. त्यांत एक मोठा कल्पक फार शाहाणा मलीकंबर नामें होता, तो त्या लोकांसह वर्तमान बादशाह याणें घेतलेल्या मुलुखाखेरीज उरलेल्या मुलुखाचा बंदोबस्त राखून राहिला; आणि नवाच एक बादशाह करून

रून त्याचें नांव दुसरा मोर्तिजा निजामशाह असें ठेविलें. अशीक, दौलताबादचे कि-ल्यावर बाहिरी सरकारचा झेंडा लाविला. त्यानंतर तो मल्लीकंबर लवकर प्रसिद्धीस आला. त्या वेळेस, दिल्लीचा तक्ताधिपती जाहानगीर नामें नवा झाला होता, याचे पु-त्रानें बंड उत्पन्न केलें, त्यामुळे त्या मोंगल लोकांस मल्लीकंबराला उपद्रव करावयास अवकाश सांपडला नाहीं. इतक्यांत, मल्लीकंबरानें आपल्या मुलुखाचा बंदोबस्त चां-गला केला, आणि आपली प्रजा व शेजारचे संस्थानी लोक वश करून घेतले; आणि दौलताबादेजवळ एक खिडकी+ नामें शहर वसविलें; त्यांत मोठे मोठे माहाल बांधू-न तो मोठी राजधानी केली. मग त्याणें कित्येक वेळां मोंगल लोकांचा पराभव केला, आणि थोडकेच दिवसांनीं अहमदनगरचा किल्ला व कित्येक वगैरचा मुलुख मों-गलांपासून घेतला; परंतु मोंगलांनीं मल्लीकंबराकडे फार दिवस टिकूं दिला नाहीं, पुनः घेतला. त्या मुलुखांत पहिली रीति अशी होती कीं, जो मरवुलानें काम पत्करील त्याला सामल-त सांगावी, ती मल्लीकंबरानें मोडिली, आणि वसूलाचे कामावर मुखत्यार मुसलमा-न ठेवून ब्राह्मणाचे हातून काम करवीत असे, निरंतर त्याचाच जय असे असें ना-हीं कित्येक वेळां मोंगल लोकांनींही त्याचा पराभव केला. सन् सोळाशें एकवीसांत कित्येक मराठे सरदार त्याची चाकरी सोडून मोंगलांस मिळाले. त्यांत शिंदकेरचा देशमूख लुकजीजाधव होता, त्याचा मोंगलांनीं मोठासंमान करून त्याला मोठी मनसब् दिली त्यावरून असें वाटतें कीं, त्या वेळेस मराठे योग्यतेस येऊं लागले होते. ते समयीं दिल्लींत बादशाहाचे पुत्रानें बंड केलें, त्यामुळें मोंगलांस मल्लीकंबराला उपद्रव करावयास फावलें नाहीं. पुढें सन् सोळाशें सव्वीसांत मल्लीकंबर मरण पाव-ला. त्यानंतर इब्राहीम् आदिलशाह विजापूरचा बादशाह एकाच वर्षानें मेला. त्याणें आणि मल्लीकंबरानें प्रजेस सुख दिलें, म्हणून अद्यापि लोक त्याचे गुण आ-ठवतात. आतां विजापुरीं मोठीं मोठीं घरें व देवालयें मोडलेलीं आहेत त्यांत, इब्रा-हीमाची कबर केवळ नवी बांधल्याप्रमाणें दिसत्ये, आणि फार सुंदर आहे. इब्राही-म आदिलशाह याचा पुत्र महंमद आदिलशाह बापाचे पाठीमागें तक्ताधिपती झाला. तेव्हां, त्याचें वय पंधरा वर्षांचें होतें. त्याचे जवळ शिबंदी पुष्कळ होती, आणि त्याचे जामदारखान्यांत द्रव्य बहुत असे, आणखी, त्याचे राज्यांत प्रजा सुखी हो-त्या मल्लीकंबराचे पुत्र दोघे एक फत्तेखान, एक चंगेज्खान, त्यांत फत्तेखान याणें आपल्ये बापाचा अधिकार जो मोर्तिजा निजामशाहापाशीं होता तो संभाळिला; आणि मोंगलांशीं युद्धें केलीं; परंतु त्याची योग्यता मल्लीकंबराप्रमाणें नव्हती, त्यामु-ळें तो अगदीं बुडाला असता; परंतु खानजाहान् लोदी नामें एक मोंगलांचा मोठा सरदार मुख्य होता त्यास त्याची दया आली, म्हणून त्याणें त्याशीं सल्ला केला. पुढें

+ खिडकी शहराचे नाव औरंगाबाद पडलें त्याचें कारण पुढें येईल.

मोर्तिजा निजामशाह मोठा झाल्यावर एकवर्ष पर्यंत त्याणें फत्तेखानाचे अन्याय ध्यानांत आणून, त्याला सन् सोळाशें एकुणतिसांत बंदीत ठेविला. त्यानंतर लुकजी आधवराव आपला पहिला धणी मोर्तिजा निजामशाह याजकडे यावयाविषयीं इच्छा करूं लागला. तेव्हां, त्याणें तो मोगलास मिळाला ह्मणून त्याचें बोलणें मान्य केल्याप्रमाणें बाह्य आकार दाखवून, मग कोणे एके दिवशीं कांहीं कामासाठीं ह्मणून त्याला त्याचे सोयरे धायरे सुद्धां दौलताबादेंत बोलावून आणून, एकाएकीं दगा करून मारिले. त्यानंतर त्याची स्त्री भर्त्याची फौज घेऊन शिंदखेडीस गेली आणि तीचे बहिणीचा नवरा जगदेवराव आधव याचे आश्रयानें मोंगलाचे लश्करांत जाऊन मिळाली. मग तीचे विनंतीवरून मोंगलानीं जगदेवराव आधव यास लुकजी आधवाचा अधिकार व पांचहजार स्वारांची मनसब दिली. तेव्हां, पासून शिंदखेडचा आधवाचें कुळ मोंगलांचा अभिमान धरूं लागलें. दिल्लीचा बादशाह जहानगीर सन् सोळाशें सत्तावन्नांत मेला. नंतर एकवर्षानें त्याचा पुत्र शहाजहान यास तक्ताधिपती केला ते समयीं, महाराष्ट्र मुलुख जितका मोंगलानीं घेतलेला होता त्याचा अधिकारी खान् जाहानलोदी नामें होता, त्याशीं शहाजहान बादशाह द्वेष करीत असे. त्याणें त्यास धरावयास फौज पाठविली तेव्हां, तो पळून गेला, तो निजामशाह याचे लश्करांत जाऊन त्यांचा आश्रय करून राहिला. ह्मणून, शहाजहान् बादशाह दक्षिणेंत फौज घेऊन चालिला तेव्हां, खान् जहान लोदी निजामशाहास सोडून दक्षिण देशांतच अणखी पळाला. ते वेळेस, त्याचा सहाय शहाजी भोंसला होता. तो शहाजहानाचें मोठें सामर्थ्य पाहून खानजहान् लोदी यास सोडून त्यास मिळाला. तेव्हां तो शहाजी व त्याचे बरोबर जे दुसरे सरदार होते ते बादशाहापासून मनसब व मोठा संमान पावले. असें वर्तमान सन् सोळाशें एकुणतिसांत झालें.
त्या वर्षी, आणि त्याचे पुढचे वर्षी, दक्षिणदेशीं पर्जन्य पडला नाहीं ह्मणून मोठा दुष्काळ आणि महारोग एकदांच पडले. तेव्हां खान् जहान् लोदी सर्वप्रकारें निरुपाय होऊन दक्षिणेंतून निघोन काबुल प्रांतीं जाऊन आफगाण लोकांस मिळावें ह्मणून निघाला. तों त्याला वाटेनें शहाजहान बादशाहाचे सरदार लोक भेटले. मग त्यांशीं व याशीं युद्ध होऊन तो खान् जहान् लोदी मरण पावला. त्यानंतर त्या सरदारांनीं अहमदनगरचा बादशाह निजामशाह याचे कित्येक जहागीरदार व मनसबदार याचे अधिकार व मुलुख घेऊन आपल्या लोकांस दिले. तेव्हां, तो बादशाह आपलें संस्थान जाईल ह्मणून भ्याला, आणि जो बंदीस ठेवलेला फत्तेखान् यास सोडून पहिलेप्रमाणें त्याला वजीरीचें काम सांगितलें. अशी त्या बादशाहाची अनीती पाहून एक त्याचे लश्करचा तकरीबखान नामें मोठा सरदार होता तो, त्याची चाकरी सोडून मोंगललोकांकडे जाऊन मिळाला. ते समयीं विजापूरकर

व अहमदनगरकर हे आपल्या आपल्या मध्यें एकमत्त होउन मोंगलांचा पराभव करावा अशी इच्छा करूं लागले, आणि तो विचार शेवटास न्यावयाकरितां त्यांस असें दिसूं लागलें कि, जो पूर्वी विजापूरकरांचा व मोंगललोकांचा तह ठरलेला होता तो कामास येईल. तो तह असा कीं, विजापूरकर व मोंगललोक या दोघांनीं मिळून अहमदनगरचें राज्य बुडवून तो मुलुख उभयतां वाटून घ्यावा. त्यांत धारवाड किल्ला, व अणीक कांहीं मुलुख, व सोलापूर किल्ला विजापूरकरांचे वांट्यांत यावा. नंतर विजापूरकरांनीं आपलें लश्कर रणदुल्लाखान सरदार बरोबर देऊन मोंगलांकडे पाठविलें. तो सरदार असें बोलिला कीं, आह्मी पूर्व संकेताप्रमाणें आलों, तुह्मीं धारवाड किल्ला आमचे स्वाधीन करा. ते समयीं ते मोंगल लोकांचे सरदार त्यांस किल्ला एकाएकी देईनात. इतक्यांत, अहमदनगरकरांनी विजापूरकरांस सोलापूर किल्ला घ्यावयास कबूल केला. त्या योगेंकरून त्या उभयतांची मसलत पक्की झाली असतां, कांहीं दैवगतीनें मोंगललोकांचें लश्कर व विजापूरकरांचें लश्कर या दोहोंत कांहीं कलह उत्पन्न होउन, मोठें युद्ध जाहालें. त्यांत विजापूरकर पराभव पावला. तेव्हां, ती मसलत सहजच व्यर्थ झाली, आणि तो दुष्ट फत्तेखान् याणें आपल्यें धण्यास कैद केला. आणखी त्याचे गळ्यास दोरीचा फांस घालून मारिला; आणि मानकरी सरदार जे त्याचे इष्ट होते तेही मारिले असें त्या फत्तेखानानें दुष्कर्म केल्यानंतर मोंगलांचा बादशाहा शहाजहान् याजकडे आपल्या कर्माची क्षमा होण्याविषयीं विनंती पत्र पाठविलें कि, मीं हें कर्म तुमचा कार्याकरितां केलें, आणि त्याचे स्थानीं त्याचा पुत्र तुमचें उत्तर येई तोंपर्यंत बसविला आहे. तेव्हां, शहाजहानानें अहमदनगरचा मुलुख फार घेतला होता; परंतु कित्येक अवघड किल्ले त्या फत्तेखानाकडेसच राहिले होते, ह्मणून, बादशाहानें त्याचें पत्र मान्य केलेंसें दाखविलें, आणि उत्तर दिलें कीं, जर त्याचे आमदारखान्यांतले चांगले चांगले अलंकार व त्याचे उत्तम हत्ती असतील ते आह्माकडे पाठवाल तर, तुह्मीं केलेलें आह्मीं मानुं. त्या उत्तराबरोबर कित्येक जहागीरांची सनद व मोठे संमानाचें सूचक कांहीं अलंकारादिक पाठविलें. त्यास देणें दिलें त्यांत पूर्वी शहाजी भोंसल्यास दिलेला कांहीं मुलुख होता, ते समयीं, फत्तेखान् निरुपाय होउन बादशाहानें लिहिल्याप्रमाणें पाठवून देता झाला. नंतर अहमदनगरचा बादशाहा लहान ह्मणून तें राज्य फत्तेखानाकडेस राहिलें. हा प्रकार पाहून शहाजी भोंसला अत्यंत खिन्न झाला आणि महंमद आदिलशाह विजापूरचा बादशाह याचा आश्रय धरून चाकरीस राहिला. त्या वेळेस, विजापूरचा मुख्य कारभारी मोठा सुज्ञ मुरारपंत नामें ब्राह्मण होता, त्याणें शहाजीचे मसलतीनें फौज तयार करून दौलताबाद घ्यावयास पाठविली. त्या वेळेस, फत्तेखान दौलताबादेंत होता, त्याणें आपलें संरक्षण करावयाकरितां मोंगलांनीं यावें ह्मणून त्यांस दौलता-

वाट किल्ला घावयास केला, त्यावरून, मोंगललोक दौलताबादेस येउन पोंचले नाहीं तों तोंच, विजापूरचें लष्कर दौलताबादेंत आलें. तेव्हां, शहाजीचें व दौलताबादच्या लोकांचें मोठें युद्ध झालें; त्यांत शहाजीचा पराभव होऊन मागें आठ कोस हटला. नंतर, हें काम पराक्रमानें होणार नाहीं असें समजून, तह करणें इत्यादि युक्ती चालवावयास फत्तेखानाला निरोप पाठविला, कीं, तुह्मीं त्यांस किल्ला दिला असतां उभयपक्षीं हित नाहीं, हीच मसलत कीं, दोघांनीं मिळून त्याला त्याचें पूर्वस्थान दाखवावें, आणि तुमचा व आमचा पहिला संकेत असाच होता. तें ऐकून त्याणें मान्य केलें. नंतर, ते मोंगललोक आल्यावर त्यांवर हे दोघे मिळून तोफा सोडूं लागले, तेव्हां, मोंगलांचा सरदार मोहबतखान् तो क्रोधयुक्त होऊन निश्चय करिता झाला कीं, फत्तेखानाचें पारिपत्य अवश्य केलें पाहिजे. मग मोंगल लढूं लागले तेसमयीं, ते किल्लेकरी महत्संकट सोसून अठ्ठावन्न दिवसपर्यंत टिकले. नंतर, त्यांची बेगमी सरली यास्तव त्याणीं किल्ला मोंगलांस दिला. तेव्हां, मोंगलांनीं फत्तेखानाला त्या अधिकारावरून काढिला, आणि त्याचे हातचा स्थापिलेला मुलगा ग्वाल्हेर किल्ल्यावर बंदींत ठेविला. पुढें फत्तेखान् वेडलागून मेला. यानंतर, शहाजीचे मनांत आलें कीं, अहमदनगरचे बादशाहाचा कारभार आपण करावा. ह्मणून निजामशहाचे स्थानीं दुसरा तक्ताधिपती केला, आणि कित्येक ब्राह्मण जवळ बाळगून राज्य करायास आरंभ केला. आणि फौज जमा करून कित्येक किल्ले हस्तगत केले, व जागोजाग नव्या बादशाहाचा अंमल बसवूं लागला. ते समयीं, शाहाजाहान् बादशाह याणें दक्षिणेचें सगळें राज्य, आपला पुत्र, अथवा दुसरा कोणी आत्मीय, यांवांचून तिसऱ्यास दिलें असतां, त्यापासून आपणास अपाय होईल. असें समजून पुत्र औरंगजेब् लहान, यास्तव तो मोठा होई तोंपर्यंत, राज्याचे विभाग दोन करून एक खान्‌डौरान्, दुसरा खान्‌जमान्, यां दोघांस ते अधिकार दिले. त्या विभागांचा प्रकार असा; खानदेशाचा जितका मुलुख पूर्वीं मोंगलांकडे होता तो, व जालनपरगणा, व वऱ्हाडचा पैनघाट भाग, इतके मुलुख मिळून एक भाग. दुसरा जो मुलुख निजामशाहा बादशाह अहमदनगरकर यापासून घेतला होता तो. असे दोन दोघांचे स्वाधीन करून सांगितलें कीं, उभयतां पश्चिमेचा बंदोबस्त ठेवून शहाजीला जिंकावयास अनुकूळ असावें. त्या वेळेस शहाजी भोंसला मोठें सैन्य जमा करून विजापूरकरांचे आश्रयानें मुलखांत उपद्रव करीत होता; त्यासाठीं शाहाजाहानास मोठा राग आला, कां कीं, दौलताबाद किल्ला जरी हस्तगत झाला तरी, राज्याचा बंदोबस्त होईना, ह्मणून शाहाजाहानानें मोठें सैन्य मिळवून निश्चय केला कीं, अहमदनगरचें राज्य घ्यावें याकरितां दक्षिणेचीं राज्यें बुडालीं तरी चिंता नाहीं. पुढें शाहाजाहानास तें राज्य बुडवावें हें योग्य दिसत नव्हतें. तें कशासाठीं तें कळत नाहीं. कोणजाणे काहीं राजकारणार्थ, किंवा काहीं नीतिसाठीं. प्रथम विजापूरकराकडे वकील पाठवून बोल

णें म्हटिलें कीं, अहमदनगरकरांचे किल्ले तुम्ही घेतले आहेत ते सर्व सरंजाम सुद्धां आमचे स्वाधीन करा. त्यांत मुलुखमैदान नामें एक मोठी तोफ जी परिंड्याहून विजापुरास नेली, ती द्यावी. यास्तव शहाजीचे मसलतीस लागूं नये. याप्रमाणें वागल्यानंतर, निजामशाहीतील जितका कोंकणपट्टी मुलुख पाहिल्ला होता तितका व सोलापूर किल्ला तुम्हाला देऊं; नाहीं तर अगदीं बुडवून टाकूं. हें बोलणें त्यांणी मान्य केलें नाहीं. तेव्हां, शहाजहाननें फौज जमा करून त्या लष्कराचे भाग चार केले. त्यांतले दोन शहाजी भोसल्यावर नेमिले. आणि दोन विजापूरकरांवर योजिले. ते वेळेस नासिक, व चांदोर, या जवळचे जितके शहाजीचे किल्ले होते ते, मोंगलांचे सरदार यांणीं घेतले. हें वर्तमान सन सोळाशें पस्तिसांत झालें. त्यावेळेस खयरत्तारखान मोंगलांचा सरदार विजापूरचे राज्यांत शिरला. आणि त्याणें नळदुर्ग घेतला, आणखी सोलापूर, व बेदर, या दोहों मध्यें मुलुख अ तोही घेतला. सेय्यदखान जहान यांचे समोर शहाजी लढला नाहीं, एकाएकीं छापा घालीत असे. याप्रमाणें फार दिवस लढला. तो पहिल्यानें अहमदनगरासमीप होता, मग लढतां लढतां शेवटीं चांभारगोंदें, आणि बारामती या दोहों मुलुखांचे मध्यें हटून गेला. नंतर, मोंगल मोठा सामर्थ्यवान म्हणून मिरज, व कोल्हापूर, या दोहों मुलुखांमध्यें राहिला. तेव्हां, विजापूरचें लष्कर शहाजीस अनुकूल होतांच, त्या खानजहानाचें सामर्थ्य चालेनासें झालें. तेव्हां मोंगलांचे दरबारांतून त्यास आज्ञा अशी झाली कीं, मिरज, व कोल्हापूर, व रायबाग, या तिहीं शहरां जवळचा मुलुख उद्धस्त करावा. त्याणें त्याप्रमाणें करून कित्येक लोक धरून आपल्या बरोबर नेले. याशिवाय खानडौरान, खानदेशांतून लष्करसहित वाटेनें मुलुखास उपद्रव करीत विजापुरास येऊन पोंचला. तो विजापूरहि घेता; परंतु त्या बादशाहानें संभोंवतें दहा कोसपर्यंत अन्न पाणी मिळेनासें करून ठेविलें होतें म्हणून, विजापूर त्याचे हातीं येईना. यास्तव खानडौराननें त्याशीं सल्ला केला. ती तारीख सन सोळाशें छत्तीस. या सल्ल्याचा प्रकार अवश्य जाणावा. कांकिं, जापासून शिवाजी महाराज यांचें माहात्म्य उत्पन्न झालें. त्या सल्ल्याचा प्रकार असा: परिंडा, सोलापूर, व त्यां खालचा मुलुख व नळदुर्ग ठाण, व कल्यान परगणा, व बेदर मुलुख. याशिवाय कोंकणाचा कल्यान परगणा, आणि नीरा नदी, व भीमा नदी, या दोहों मधला मुलुख, इतकें राज्य विजापूरकराकडे असावें. यास्तव शहाजीचे किल्ले जितके असतील ते मोंगलांस दिले असतां, त्यास अभय आहे. आणखी विजापूरकरांनीं वर्षास वीस लक्ष होन मोंगलांस खंड द्यावा. विजापूरकर सल्ला करितात हें वर्तमान शहाजीच्या कळतांच, तो कोंकणांत जाऊन आपल्ये किल्ल्यांचा बंदोबस्त करूं लागला. तेव्हां मोंगलांनीं त्याचा त्रिंबक किल्ला, व शिवनेर किल्ला, व कोंकणाचा कित्येक मुलुख घेतला. ते समयीं, शहाजीनें मोंगलांचे बादशाहास विनंती केली कीं, माझे अपराधांची क्षमा करून मला आपल्ये चाकरीस ठेवा-

वें

वें. यांनी तारीख सन सोळाशें सततीस. बादशाहानें आपल्या चाकरीस त्याला ठेविलें नाहीं. विजापूरकरांचे चाकरीस राहावें अशी आज्ञा दिली. त्यावरून शहाजी विजापूरकरांचा आश्रय करून राहिला. मग त्याणें स्थापिलेला बादशाह लहान होता तो मोंगलांचा सरदार खानजमान याणें धरून ग्वालेर किल्ल्यावर पहिले दोन मुलगे होते तेथें नेऊन ठेविला. असें अहमदनगरचें राज्य आणि बादशाह बहिरी वंश्य होते तें बुडालें.

या भागाचे अनुक्रमणिकेंत तालिकोटाचे लढाईचा प्रकार आहे परंतु ग्रंथपर्यंत लिहिला नाहीं याकरितां लिहिला जातो. तो असा कीं, पूर्वीं हिंदूंचें विजयानगराचें मोठें राज्य कर्नाटकांत कानडे लोक यांणीं स्थापिलेलें होतें. मग सन पंधराशें चौसष्टांत दक्षिणेचे सर्व बादशाह मिळून त्या लोकांशीं जाऊन लढले. तो युद्ध परस्पर फार मोठा झाला. ते समयीं तें राज्य अगदीं बुडालें. लढाई तालीकोटाजवळ झाली. त्या तालीकोटाचें नांव राक्षिनागडी असें कोणी बखरेंत लिहितात.

सन सोळाशें सततीसापासून सन सोळाशें अठ्ठावीसपर्यंत झालेलीं सर्व वर्तमानें मिळून भाग तिसरा.

## तिसऱ्या भागाची अनुक्रमणिका

शहाजी विजापूरकराचे चाकरीस राहिल्यावर कसकसा वागत होता १ मग त्याणें दुसरी बायको केली २ त्याचा पहिल्या बायकोचे पुत्र दोघे. एक संभाजी. एक शिवाजी ३ दुसरीचा एक व्यंकोजी ४ तो शहाजी कर्नाटकांत गेला ते समयीं त्याणें आपली पहिली बायको जिजाबाई व पुत्र शिवाजी, यांस आपले जहागीर ठिकाण पुणें येथें पाठविलीं; आणि त्यांचा बंदोबस्त दादोजी कोंडदेव यास सांगितला ५ विजापूर सरकार व गोंवळकोंड सरकार यांची लक्षें कोणे प्रकारचीं होतीं ते ६ मोंगल दक्षिणेचे वसूलाचा बंदोबस्त करिता झाला तें, आणि त्याणें फसली तारीख कधीं पासून स्थापिली तें वर्तमान ७ दादोजी कोंडदेव याणें वसूलाचा बंदोबस्त कसा केला तो ८ मावळे लोक यांची हकीकत ९ शिवाजीचे सरक्षक यांणीं त्याचे बाळपणीं त्याला कोणते प्रकारें वागविलें ते १० त्या शिवाजीचे पक्षपातें पहिले तिघे कोण होते ते प्रकरण ११ त्याणें तोरण्या किल्ला घेतला १२ तो आपणाकडेसच राहावा म्हणून बादशाह यास काय काय समजाविलें तें १३ राजगड किल्ला शिवाजीनें बांधिला तें १४ दादोजी कोंडदेवाचा मृत्यु १५ चाकण व कोंडाणें किल्ला, यांचे लोक शिवाजीनें आपणास अनुकूळ केले १६ सुपे परगणा व पुरंदर किल्ला शिवाजीनें घेतल्याचा प्रकार १७

भाग

## भाग तिसरा.

ज्या समयीं शहाजी विजापूरकरांचे चाकरीस राहिला तेव्हां, त्यांचा प्रधान मुरारपंत याणें मोठ्या संतोषानें त्याला ठेविला; आणि सुपें परगणा, व पुणें परगणा त्यास दिला. कां कीं, त्याचे गुण व चातुर्य, तो मुरारपंत जाणत होता. पुणें व सुपें त्याचें वडिलें ठिकाण म्हणून त्याला दिलें. यानंतर, मुरारपंतानें भीमा व नीरा या दोहों नद्यांचे मध्यला जो विजापूरकरांस नवा मिळालेला मुलुख, त्याचा बंदोबस्त शहाजीचे साहाय्यानें केला, तेणेंकरून शहाजीचें चातुर्य फार प्रकट झालें. म्हणून तो मुरारपंत त्यावर बहुत संतुष्ट होऊन, जे समयीं माघारा बादशाहापाशीं आला, ते समयीं, बादशाहाजवळ त्याची फार स्तुती केली. नंतर, बादशाहाचें लष्कर कर्नाटकांत आल्ये वेळेस, बादशाह याणें शहाजीला त्या लष्कराचा दुसरा अधिकार दिला आणि त्याचा मित्र रणदुल्लाखान होता, त्याला त्या लष्कराचा मुख्य अधिकारी केला. यानंतर, त्यांचा जय झाल्यावर शहाजीला त्या मुलुखांत कोल्हार, बंगलोर, उसकटा, बाळापूर, आणि सेरा, हे पांच परगणे बादशाहानें जहागीर दिले. याशिवाय +कराड परगण्यांत बावीसां गांवांचे देशमुखीची सनद दिली. त्याला बादशाह याणें दोहों जागीं जहागीर दिल्याचें कारण असें असेल; शहाजीनें समजावें कीं, बादशाह याचे मुलुखाचे रक्षणें करून माझा मुलुखाचें संरक्षण होईल.

शहाजी भोंसला याणें मोंगलांची चाकरी सोडल्यापासून त्याचे सोयरे शिंदकेरचे देशमुख जाधव, यांचें व शहाजीचें वांकडें पडलें. मग जे समयीं मोंगलांशीं शहाजीचें युद्ध झालें ते समयीं, जगदेवराव जाधव शहाजीची स्त्री जिजाबाई तिचा चुलता, मोंगलांकडून शहाजीशीं लढत होता. संन सोळाशें तिसांत शहाजीनें दुसरी स्त्री मोहिते यांची कन्या केली; तेणेंकरून जिजाबाईला विषाद आला, यास्तव दुसरा कोणी आप्त याचे घरीं जाऊन राहिली. ती तीन वर्षें तेथेंच होती, नंतर मोंगलांनीं तें स्थान घेतलें परंतु मोंगलांजवळ भोंसले व जाधव होते त्यांणीं तिला सोडविली; आणि शहाजीच्या कोंडाणें किल्ला येथें पोंचविली. तिचे दोघे पुत्र, त्यांत वडिल संभाजी, धाकटा शिवाजी, याचें जन्म ‡शिवनेर किल्ल्यामध्यें संन सोळाशें सत्ताविसांत झालें. थोरला पुत्र संभाजी बापास फार प्रिय होता; त्याला आपण कोठेंही गेला असतां बरोबर नेत असे; आणि शिवाजी आईजवळ होता. त्याला आई मोंगलांचे हातीं न लागूं देतां फार युक्तीनें जपत असे. नंतर जेव्हां शहाजी मुरारपंताबरोबर विजापुरास गेला, तेव्हां शिवाजीला घेऊन जिजाबाई त्याबरोबर गेली. ते वेळेस शहाजीनें पुत्र शिवाजी यास सातां वर्षांनीं पुनः पाहिला. त्यापुढें शहाजीजवळ जिजाबाई व शिवाजी फार दिवस राहिलीं नाहींत.

---

+ कराड शहर साताऱ्याचे दक्षिणेस पंधरा कोस आहे.

---

‡ शिवनेर किल्ला पुण्याचे उत्तरेस पंचवीस कोसांवर आहे त्याची पेठ जुन्नर.

सईबाई निंबाळकरांची कन्या शिवाजीला केली, तेथपर्यंत शहाजी यांनी विजापुरी होती; नंतर कर्नाटकांत शहाजी जावयास निघाला, ते वेळेस जिजाबाई व शिवाजी पुण्यास रहावयास गेली. शहाजीची दुसरी स्त्री तुकाबाई मोहित्यांची कन्या, तिचा पुत्र व्यंकोजी. याशिवाय एक संताजी नामें शहाजीच्या दासीचा पुत्र होता.

जे कोणी मराठे सरदार असतात ते बहुत करून ब्राह्मण कारकून बाळगतात; त्यांत शहाजीजवळ ब्राह्मण बहुतच होते. त्यामध्यें दोघे अत्यंत विश्वासू एक दादोजी कोंडदेव, आणि दुसरे नारोपंत हणमंते. त्यामध्यें नारोपंत हणमंते यांस कर्नाटकचे जहागिरीचा बंदोबस्त सांगीतला; आणि दादोजी कोंडदेव यांस पुणें प्रांतींचा व बारा कोंकण मुलुख यांचा बंदोबस्त सांगीतला. तो दादोजी कोंडदेव वसुलाचे कामांत निपुण होता, त्याचे हातून लागवट चांगली होऊन उत्पन्न अधिक होत असे. नंतर शहाजीच्या शौर्यावरून प्रसन्न होऊन, बादशहानें इंदापूर परगणा, व बारामती परगणा, व पुण्याजवळचे मावळांतली तळवट जमीन, पुणें प्रांतींचे जाहागिरीला अधिक लावून दिली. तसी दादोजी कोंडदेव याचीही योग्यता त्या मुलुखाच्या संरक्षणें करून वाढली.

त्यावेळेस गोवळकोंडे दरबारी, आणि विजापुरचे दरबारीं आप आपल्या राज्यांची मर्यादा कर्नाटकापर्यंत होती. ती बादशाह्या कायमची करीत होते. ते दोघे जर सांगतलों तीं सावधपणानें वागते, तर उपयोगी होते, तें टाकून कर्नाटकांत आणखी आणखी मुलुख घेऊं लागले; त्यादोघांस उपयोगाचें इतकेंमात्र झालें कीं महंमद आदिलशाहा विजापुरचा बादशाह, याणें गोवळकोंड्याचा कुतुबशाह बादशाह, याचे कन्येशीं आपलें लग्न केलें.

महंमद आदिलशाह जातीनें शूर नव्हता. त्याचे लष्करास सरदार संभाळीत होते. त्याणें विजापुरची रचना मात्र फार चांगली केली आणि त्या शहरांत पाण्याचे नळ बांधून आणिले ते अद्यापि आहेत.

मोंगलांच्या बादशाह शाहाजहान याणें दक्षिणेच्या बादशाहांशीं सल्ला केल्यावर आपले नवे घेतलेले मुलुख यांचा बंदोबस्त करूं लागला. तेव्हां पूर्वी जे दक्षिणेचे दोन भाग केलेले होते, ते एकत्र करून, त्याचा अधिकारी पुत्र औरंगजेब, यास केला. त्या शाहाजहानाचे राज्यांत दक्षिणेंत बादशाहीचे मुलुखाचे हिशेबाची रीति नवी झाली. त्याचा करणार तोडरमल्ल नामें मोठा बुद्धिवान एक हिंदू होता. त्याणें उत्तम मध्यम कनिष्ठ जमिनी पाहून, त्यांचे उत्पन्नाच्या अर्धांशापासून सप्तमांशपर्यंत घ्यावा असें ठरविलें. त्यांत जो हिस्सा सरकारी, तो ऐवजाचे रूपानें घ्यावा असें केलें. याप्रमाणें कित्येक वर्षे गेल्यानंतर सरकारचे दप्तरांत जमिनीच्या सर्व उत्पन्नाचा आकार करून जो हिशेब ठरला त्याचा चतुर्थांश सरकारानें घ्यावा असें करून

रून रहाणी करणें टाकिलें जो नवथाई विशेष आला तोच मार्ग पाहिला ही रीति शहाजहानानें नीरेचे उत्तरेच्या मुलुखांतही स्थापिली तेथें ती रीति पुरती होण्यास वीस वर्षे लागलीं ती रीति टंका या नामें प्रसिद्ध होती टंका असें नांव पडलें याचें कारण असें कीं त्यापूर्वी नाण्याचा टका घेत होते ती चाल मोडून याणें टक्याचे रुपें घ्यावें असें करून त्याचें नांव टंका असें ठेविलें त्याचा सुमार सन सोळाशें अठतीस त्याच वेळेस मराठी लोकांत फसलीशक चालू झाला दादोजी कोंडदेव याचा मुलुख मोंगलाचे मुलुखाजवळच होता परंतु त्याणें मलीकंबरी रीति चालविली ती अशी कीं प्रतिवर्षी पाहणी करून शेताचे पाहणीचा वसूल घ्यावा कधीं जिनस न घेतला तर त्याचा पैका घेत असें दिसतें कीं मोंगलाचे रीती पेक्षां दादोजी कोंडदेव याची रीति शेतकरी यांस भारी पडे परंतु तो मुलुख फार सुखकारक यावरून असें वाटतें कीं त्या मुलुखाला ती रीती योग्यच होती.

मावळांत रहाणारे जे लोक होते ते केवळ दरिद्री परंतु शरीरेंकरून सुदृढ त्याणीं अति मेहनत करावी तेव्हां त्यांस उदरनिर्वाहापुरतें मिळत असे मग तो मुलुख जेव्हां दादोजीचे स्वाधीन झाला तेव्हां त्याणें त्या लोकाची अवस्था अशी पाहिली कीं ते झोंपड्यांतून रहातात आणि जांस वस्त्रें व पात्रें नाहींत त्याणीं हिंस्र प्राणी यांपासून शरीराचें रक्षण झालें पाहिजे या साठीं सर्वांनीं शस्त्रें मात्र बाळगलेलीं होतीं तेव्हां त्याणें त्या लोकांचे पोषणाकरितां कित्येक वर्षे त्यापासून वसूल घेतला नाहीं. आणि त्यांखेरीज दुसऱ्या लोकांकडचा वसूल जमा करावयाचे कामावर कित्येक ते मावळी लोक चाकरीस ठेविले. त्या योगें ते सहज पोसले गेले.

जे समयीं जिजाबाई व शिवाजी यांजबरोबर दादोजी कोंडदेव पुण्यास गेले. तेवेळेस त्या दादोजीनें पुण्यांत एक मोठा वाडा बांधिला; आणि त्यांत जिजाबाई व शिवाजी यांस ठेवून, आपण शिवाजीला जे गुण धनीपणाचे उपयोगी ते शिकविता झाला.

बहुधा मराठे सरदार यांस लिहितां आणि वाचतां येत नाहीं; ते असें समजतात कि हें काम कारकुनानें करावें; त्यांत शिवाजीला तर कधीं आपलें नांवही लिहितां येत नव्हतें. परंतु शौर्योपयोगि जें धनुर्विद्याइत्यादि कौशल्य त्यांत प्रवीण होता; जसें त्याला घोड्यावर बसतां येत होतें तसें कोणत्याहि मराठी सरदारास येत नसे. त्या शिवाजीला बाळपणीं भारती युद्धकथा व भागवती युद्धकथा अत्यंत प्रिय असेत. पुढें त्याचे मोठेपणांतही त्याणें कोठें कथा होत्ये असें ऐकिलें म्हणजे, जरी वाटेमध्यें कांहीं मोठें भय असलें तरी तें न मानितां तो कीर्तनास जाई; त्याची हिंदूचे धर्मावर प्रीति होती आणि मुसलमानाचे धर्माचा तो लहानपणापासून तिरस्कार करी. जेव्हां त्याचें वय सोळा वर्षांचें आलें तेव्हां त्याणें अप्रयोजक लोकांची संगत

धरिली

धरिली. आणि बादशाहाची आज्ञा न मानितां आपण नवेंच बंड करील असें दिसूं लागलें.

तेव्हां दादोजी कोंडदेवानें त्या शिवाजीचें असें विपरीत लक्ष्य पाहून त्याला आपल्या युक्तीचा कांहीं चांगला उपदेश वारंवार केला आणि त्याची चित्तवृत्ती मुलुखाचे बंदोबस्ती कडे व्हावी ह्मणून जाहागिरीचे बंदोबस्ताचें काम त्यावर टाकूं लागला; तेणेंकरून त्याचा मान वहूत झाला आणि मराठे सरदार लोक त्याचे भेटीस येऊं लागले. तोही त्यांचा संमान करी; त्यायोगें ते सरदार लोक त्यावर प्रीति ठेवीत होते; कांकीं तो सर्वांशीं लीनपणानें वागत असे. असें असतांही त्याला लोक ह्मणत कीं कोंकणांत जे दरवडे पडतात त्यांत शहाजीचा पुत्र याचें बळ आहे.

तो शिवाजी मावळे लोकांवर निरंतर प्रीति करीत असे, कांकीं ते लोक वेडे आणि केवळ मूर्ख दिसत, परंतु त्यांचे योग्य त्यांस कांहीं काम सांगितलें असतां त्याणीं तें काम अतिसावधपणानें करित असावें. त्यांना मावळच्या सर्व चोरवाटा ठाउक होत्या ह्मणून शिवाजी त्यांस आपल्ये शिकारीचे कामांत घेई; त्याणीं त्याला अस्के डोंगरी किल्ले माहीत करून दिले. त्यानंतर त्याला असें वाटलें कीं जर यांतून एक किल्ला आपणास मिळेल तर त्या लाभास उपमा नाहीं

त्या वेळेस मुसलमान लोकांचे राज्यांत डोंगरी किल्ल्यांचा बंदोबस्तांची दक्षता नव्हती कांकीं ते जागे पर्जन्यकाळीं वस्ती करणारास रोगकारक. आणि त्या लोकांस यत्न नकरितां राज्य आलें ह्मणून त्यांना डोंगरी किल्ल्यांचें माहात्म्य वाटत नव्हतें.

ज्या समयीं शिवाजीनें आपणास किल्ला असावा असें मनांत आणिलें, त्या वेळेस त्याचे जहागिरींत किल्लेकरी बादशाह याजकडचे होते; कोंडाणें* किल्यावर अधिकारी मुसलमान असे, आणखी पुरंदरावर नुसरपताचा ठेवणाईत नीळकंठराव नामें ब्राम्हण होता. ते दोघे किल्लेकरी व शहाजीचें कुळ यांचा स्नेह होता. मावळांत तिघे शिवाजीचे सोबती प्रसिध्द होते एसुर्जी कंक, दुसरे तानाजी मालुसरे, तिसरे बाजी फासलकर. मिळून तिघे.

जे समयीं शिवाजी लश्कर मिळवूं लागला. तेव्हां ते तिघे पहिल्यानें त्यास मिळाले; त्याणीं संन सोळाशें शेचाळिसांत तोरणा किल्याचे लोक वश करून, तो किल्ला शिवाजीला देवविला.

त्यानंतर शिवाजीनें विजापुरास वकिल पाठवून बादशाहास विनंती केली कीं, मी किल्ला घेतला हा आपल्ये राजधानीपासून फार लांब आहे आणि एथचे लोक-मोठे उत्पाती; यास्तव ही जागा विश्वासू सेवकाचे स्वाधीन असल्यास राज्याचा बंदोबस्त उत्तम होईल. त्यावरून किल्ला त्याकडे असावा अशी आज्ञा झाली नाहीं; परंतु त्याणें बादशाहाचे दरबारी लोकांस लांच दिला त्यामुळें त्या दरबारी ती गोष्ट

---

* कोंडाणें किल्यास हालीं सिंहगड ह्मणतात

पुनः

पुनः निघाली नाहीं आणि किल्ला त्याकडेच राहिला. अशीं कित्येक वर्षें गेल्यावर शिवाजीनें मावळे लोक चाकरीस ठेवून, किल्ल्याची दागदुजी केली.

मग कोणे एके दिवशीं त्या किल्ल्यांत खणूं लागला तों त्याला दैवयोगें करून कित्येक काळचा कोणी ठेवलेला मोहारांचा हांडा सांपडला.

तेव्हां त्याणें युक्तीनें लोकांत अशी प्रसिद्धी केली कीं भवानी आम्हाला प्रसन्न झाली ती द्रव्य देत्ये हें ऐकून लोक त्याला भजूं लागले.

तेव्हां शिवाजीनें दारू गोळी व शस्त्रें इत्यादि युद्धोपयोगी पदार्थ विकत घेऊन तोरणायाचे आग्नेयी दिशेस दीड कोसावर मोरबद नामें उंच डोंगर आहे त्यावर अति मेहनतीनें मोठ्या त्वरें करून दुसरा किल्ला बांधिला, आणि त्याचें नाव राजगड ठेविलें हें वर्तमान संन सोळाशें सत्तेचाळिसांत झालें.

तो किल्ला बहुतेक बांधला गेला इतक्यांत विजापुरी बादशाहास तें वर्तमान कळलें तेव्हां त्याणें शिवाजीला मनाई पत्र पाठविलें आणि कर्नाटकांत शहाजीला लिहिलें कीं हें तुमचे पुत्रानें तुमचे आज्ञेवांचून केलें नसेल; यावरून त्याणें उत्तर दिलें कीं हा अपराध मजकडे नाहीं, परंतु माझा पुत्र सरकारचा विश्वासू चाकर आहे त्याणें कांहींतरी सरकारहित पाहिल्यावांचून केलें नसेल.

जे समयीं शिवाजी किल्ला बांधावयास लागला तेव्हांपासून दादोजी कोंडदेव याणें वारंवार हितोपदेश केला कीं असानें सर्व कुळ बुडेल; शिवाजीनें तें ऐकून मान्य केल्याप्रमाणें दाखविलें, तेव्हां दादोजी असें समजला कीं हा आपल्ये मनांतील अर्थ सिद्धीस नेईल माझें ऐकणार नाहीं, असें त्याचे मनांत येतांच त्याला अत्यंत चिंता लागली, आणि वार्धक्यामुळें दुखणें लागलें तेणें करून तो आसन्नमरण झाला ते समयीं शिवाजीला बोलावून आणिलें आणि बोलिला कीं मी आपल्ये धण्याचे हिताविषयीं तुम्हाला निषेधित होतों, परंतु आतां माझी विनंती ऐकावी, आपण स्वतंत्रपणानेंच वागावें, परंतु गाई व ब्राह्मण व प्रजा यांचा प्रतिपाळ करून मुसलमानांपासून हिंदूंचीं देवस्थानें रक्षावीं, इतकें बोलून आपलीं सारीं कुटुंबांचीं माणसें शिवाजीचे हातीं देऊन प्राण सोडिला.

शिवाजीचे मनांत पूर्वींच होतें कीं आपण स्वतंत्रपणानें असावें त्यावर दादोजीनें आपल्ये अंतकाळीं सांगितलें त्यावरून त्याचे मनांत विशेष आलें. आणि दुसरे जे त्याचे जहागिरींत अधिकारी होते तेही दादोजीनें शेवटीं सांगितलेलें ऐकून शिवाजीस अनुसरले.

असें वाटतें कीं प्रथम शिवाजी आपलें मात्र हित इच्छित होता तो दादोजीनें शेवटीं सांगितलें तें ऐकून. आपला मुलुख व गाई ब्राह्मण सुखी असावे असें मनांत आणूं लागला असेल तेव्हां त्याचा स्वभाव श्लाघ्य होऊं लागला

दादोजी कोंडदेवाचे मरणानंतर, शिवाजी आपले पित्याचे जहागिरीचा वसूल पित्याचेच नावें घेऊं लागला, परंतु शहाजीचेही आज्ञेंत वागूं नये असें त्याचे मनांत होतें, कांकीं दादोजी कोंडदेव मेल्यावर, त्याणें कारकून पाठवून जहागिरीचा वसूल खर्चास मागीतला; शिवाजीनें उत्तर केलें कीं एथचा पैका एथेंच पुरत नाहीं, त्यानंतर आणखी कित्येक वेळा शहाजीनें द्रव्य मागावयास कारकून पाठविले, परंतु शिवाजीनें दिलें नाहीं.

त्या शहाजीचे जहागिरींत दोन अधिकारी होते, एक फिरंगोजी नरसाळा चाकणचा किल्लेकरी; दुसरे बाजी मोहिते तुकाबाई शहाजीची दुसरी स्त्री तिचे बंधू ते सुपेपरगणा याचे मामलतदार; हे दोघे शिवाजीला अनुकूल नव्हते. यासाठीं वकील पाठवून फिरंगोजी वश केला, आणि चाकण किल्ला व त्याखालचे कित्येक गांव घेतले; मग त्यालाच त्या मामलतीची सनद दिली.

बाजी मोहिते याजवळ सुपेपरगणा यामध्यें उत्तम स्वार तीनशें होते, तो कधींही वश होउन शिवाजीला वसूल देईना, ह्मणून शिवाजी मावळे लोक बरोबर घेऊन रात्रीस सुप्यांत शिरून, बाजी मोहिते व त्याचे मुख्य कारभारी यांस धरून कैद केले, आणि जे चाकरी करावयास अनुकूल झाले त्यांस चाकरीस ठेविले; जे वश न झाले ते शहाजीकडे कर्नाटकांत पाठविले. या प्रमाणें चाकण किल्ला व सुपेपरगणा आपल्ये सत्तेंत आणिला; या खेरीज कोंडाणें किल्ल्याचे मुसलमानानें बहुत लांच घेऊन किल्ला शिवाजीला दिला; त्याचे नांव शिवाजीनें सिंहगड असें ठेविलें. सुपेपरगणा, व चाकण किल्ला. या दोहों पेक्षां सिंहगड किल्ला मिळाला तो मोठा लाभ.

पुरंदर किल्ल्याचा अधिकारी, मुरारपंताचे हातचा ठेवणाईत निळकंठराव तो दादोजी कोंडदेव मृत्यु पावला त्याच सुमारें मेला; त्याचे पुत्र तीन त्यांत जो वडील त्याणें विजापुरचे आज्ञेची वाट न पाहतां, आपल्ये बापाचें काम संभाळिलें; तेव्हां त्याचे कनिष्ठ बंधू दोघे, त्याणीं आपणास त्या अधिकारांत व गुरें चरावयास कुरणांत कांहीं विभाग असावा ह्मणून वाद आरंभिला; तेव्हां तो देईना, यास्तव त्यांहीं शिवाजीला विनंती केली कीं आमचे कलहाची मध्यस्थी आपण करावी. असें ते ह्मणतांच त्याणें मान्य केलें, आणि त्यांस असें समजाविलें, कीं मला आंतून पक्ष तुह्मां दोघांचा, बाह्य तर निक्षाईतपणानें तिघे सारिखे.

यानंतर सुप्यास जातों असा आकार दाखवून लष्करासहित पुरंदर किल्ल्याखालीं येऊन उतरला, तेव्हां त्याणीं त्यास बोलावणें पाठविलें; तें असें कीं आपण थोडके शिपाई बरोबर घेउन किल्ल्यावर यावें, नंतर तो त्याप्रमाणेंच वर गेला. आणि रात्रीस बोलतां बोलतां त्या तिघांतला थोरला भाऊ निजावयास गेल्यावर याणें त्या दोघां भावांस अशी मसलत दिल्ही कीं, याला जर बंदीस घातला तर

आ तनच एकेक. कदाचित त्याचे शिपाई कांहीं गडबड करितील तर मी मावळेलो-क वरते आणांच मोकळून बंदोबस्त करवितों. तेव्हां त्या दोघांहीं मान्य केलें, त्यावरू-न त्याच रात्रींत मावळेलोक किल्याचे माचीस, व बाळकिल्यांत नेऊन, पहांटेस किल्ला आपण घेतला; आणि त्या शिपायांचा बंदोबस्त केला. तेव्हां त्यांस असें समजलें कीं आ-हीं दिघेही बादशाही, किल्याचा धणी शिवाजी; तर शिवाजी त्यांस ह्मणाला कीं, मीं आपल्या हिंदुधर्माचे रक्षणार्थ अशीं कामें करितों; तुह्मीं माझे चाकरीस रहावें, तुम-चे किल्ल्याचे बदल, तुह्माला किल्ले गावें इनाम देतों.

तेव्हां त्याणीं तें मान्य करून त्याचे चाकरीस राहिले.

अशा युक्तीनें एकही मनुष्य न मरतां युद्ध केल्या वांचून, चाकण किल्ला व निरा नदी या दोहों मधला मुलुख शिवाजीनें घेतला.

त्या वेळेस महंमद आदिलशाह विजापुरकर आपल्ये नगरची शोभा स्वस्थपणें बसून करीत होता, त्याला शिवाजीचें कृत्य कळलें असल्ये तरी तो असें मानित असेल कीं जों पर्यंत शहाजी जहागिरदार आपल्ये लष्करांत आहे तों पर्यंत चिंता नाहीं; इकडे शिवाजी तर केवळ व्याघ्राप्रमाणें लपून लपून जेथे जेथे कार्य साधेल तेथें तेथें युक्तीनें कार्य करून घेणार, असा त्याचा स्वभाव बादशाहाचे ध्यानांत आला नाहीं.

---

येतसों बाणें अठ्ठ्याकिसांपासून सोळाशें सत्तावेन पर्यंत आलेलीं वर्तमानें मिळून भाग चवथा.

## चवथ्या भागाची अनुक्रमणिका.


शिवाजीनें घेतलेल्या मुलुखाचे सभोंवते, कोण कोण अधिकारी व जहागिरदार होते तो प्रकार. १

वाडीचा सावंत आणि जंजिऱ्याचा शिद्दी, यांचें प्रकरण. २

शिवाजीनें छापा घालून बादशाह याचा खजीना लुटला. ३

त्या शिवाजीनें कित्येक किल्ले युक्तीनें घेतले. ४

कालियानी परगणा घेतला तो विस्तार. ५

विजापुरचे बादशाहानें शहाजीला कैद करून विजापुरीं आणविला. ६

त्याची सुटका कोणे प्रकारें झाली तें. ७

तो शहाजी कर्नाटकांत गेला आणि आपला पुत्र संभाजी यास कोणी किल्लेदाराचे पारिपत्यास योजिला तो मृत्यु पावला. ८


शिवाजीनें

शिवाजीनें जावळीचा राजा यानाने मारीवला. आणि त्याचा मुलुख घेतला. ९

शिवाजीनें प ल्हा पेशवा शामराज नामें ब्राह्मण केला. १०

संवत् सोळाशें छत्तिसांपासून मोगलाची वर्तणूक कशी झाली तें. ११

गोवळकोंड करांचा कारभारी मिर्जुमला याचें वृत्त. १२

शहाजहान दिल्लीचा बादशाह दुखण्यांत पडला. १३

तो जीवंत असतां त्याचे पुत्र चवघे ते राज्याची इच्छा करूं लागले. १४

त्या चवघांजणांत एक औरंगजेब नामें होता त्याचे स्वभावाचें वर्णन. १५

त्याणें बळेंच आपणास बाप असतां राज्याभिषेक करून घेतला. १६

## भाग चवथा.

एथपर्यंत दक्षिणेचा हद्दी व अधिकारी यांचा प्रकार लिहिला. परंतु शिवाजीनें घेतलेल्या मुलुखाचे सभोंवते कोणकोण जहागिरदार होते. यांचें वृत्त लिहिल्यावांचून शिवाजीचें संपूर्ण वर्तमान कळणार नाहीं. यास्तव तें लिहिलें पाहिजे त्याचा प्रकार असा, संवत् सोळाशें अठ्ठ्याऐंशीस. निरेचे दक्षिणतीरीं पूर्वेचे आगीं शिंगळपर्यंत. आणि दक्षिणेस कृष्णेचे उत्तरेचा डोंगर पर्यंत, मुलुख, बंडाळ नामें हरणस मावळचा देशमूख याजकडे होता; त्याखेरीज रोहिडा किल्ला त्याचे स्वाधीन असे. तो शिवाजीला छत्रिनी जाणून निरंतर फौज बाळगीत असे.

वांईमध्यें विजापूर सरकारचा मोकासेदार होता. त्याचे स्वाधीन किल्ला पांडवगड, व कमळगड, व कित्येक किल्ले असत.

घांटमाथा कृष्णेपासून वारणेपर्यंत मुलुख, चंद्रराव मोरे जावळीचे राजे याजकडे होता. कोल्हापूर परगणा व मोठा सुदृढ पन्हाळा किल्ला. कोणि मराठा सरदार बादशाह यांचा ठेवणाईत होता त्याचे स्वाधीन असत.

पूर्वी विजापुरचे सरकारांत जो मुलुख होता त्यांत कित्येक स्थळें जहागीरदार. व वतनदार देशमूख यांजकडे असेत; परंतु रत्नागिरी, व राजपूरी, व दाभोळ, व अंजनवेल, व इतर त्यांचे खालचा मुलुख बादशाह याचे सरदारांकडे असे. याखेरीज मुख्य सरदार वाडीचे देशमूख सावंत, ते तेथचे पुरातन वतनदार. असे शृंगारपुरीचे वतनदार पुरातन दळवे होते.

याशिवाय पहिला अहमदनगर सरकाराकडे कालीयान परगणा, त्याचे भाग दोन, एक उत्तरेस भिंवडी पासून नागोठणेपर्यंत; दुसरा दक्षिणेस. उत्तरेचा भाग व त्यांतले सारे किल्ले एक बादशाहाचा मुसलमान सरदार होता, त्याजकडे असत. दक्षिणेचा भाग कोणि एका शिद्याला जहागीर देऊन, त्याणें जंजिरा गलबतें ठेऊन. मावकारी गलबतांचें संरक्षण करावें. आणि जे मकेस तीर्थयात्रे करितां जाणारे, त्यांस पोंचते करावे; असें काम त्यास सांगीतलें होतें. जंजि-

ऊं गलबती चाकरी जहागिरी सुद्धां, एकासच वंशपरंपरेनें घावी असें नव्हतें; कोणी ए- ख्यादा योग्य शिद्दी पाहून त्याला देत असत. त्या सरदारांचें राहावयाचें मूळस्थान, दंडा राजपूर.

त्यावेळेस जो मुख्य शिद्दी सरदार होता, त्याचें नांव फत्तेखान. त्याचे स्वाधी- न नळें घोंसाळें, रेडी, वगैरे कितिएक स्थानें होतीं. याप्रमाणें शिवाजीनें घेतलेल्या मुलुखाचे आसमंतात राहाणारे संस्थानी होते.

आतां पुनः शिवाजीचें वर्तमान. तो मावळे लोक चाकरीस ठेऊन, कोंकणचे लोकांचें वर्तन आपणास कळावें, व त्याणीं वश व्हावें म्हणून कितिएक ब्राह्मण कार- कून कोंकणांत पाठवीत असे; नंतर त्याला असें समजलें कीं कालियानीचा सुभेदार, मुल्लाना आमेद, तो विजापुरास मोठा खजीना पाठवितो; तेव्हां त्या शिवाजीनें सुपेप- रगण्यांतले तीनशें घोडे घेतलेले होते, त्यांवर आपले विश्वासू चारगीर बसवून कि- तिएक मावळे लोक बरोबर घेऊन, एकाएकीं वाटेंत छापा घालून, तें द्रव्य त्या स्वारांज- वळ सारीं सामग्री ओझीं होतसें, वांटून दिलें; आणि मोठ्ये त्वरेनें राजगडास ने- लें.

हें छाप्याचें वर्तमान विजापुरीं कळल्यावर शिवाजी मोठा पुंड असें लोक स- मजून आश्चर्य करितात, तों दुसरें वर्तमान गेलें कीं शिवाजीनें कांगोरी, तुंग, तिको- ना, भोरप, कुंवारी, लोहगड, आणि राजमाची, हे सात किल्ले बलात्कारें घेतले, या- खेरीज कोंकणांत गेलेले जे त्याचे कारकून, त्याणीं तेथचे लोक वश करून नळें, घोंसा- ळें, आणि रेडी, हे किल्ले घेतले; आणि मावळे लोक याणीं कितिएक मोठीं मोठीं कोंकणचीं शहरें लुटून, तें द्रव्य राजगडास नेलें.

शिवाजीचे कारकून मंडळींत एक दादोजी कोंडदेवाचे शिक्षेचा, कारकून, मो- ठा चतुर आणि शूर, आबाजी सोनदेव नामें होता; त्याणें कांहीं शिपाई लोक बरोब- र घेऊन, अकस्मात् कालियानीस जाऊन तेथचा सुभेदार यास कैद केला; तेव्हां ते- थचे आसमंतात किल्ले सहज सहीं झाले.

शिवाजीला आपलें ऐश्वर्य, इतकें वाढेल असें वाटत नव्हतें; तों, हें आनंदा- चें वर्तमान ऐकतांच, अत्यंत हर्षेकरून युक्त होत्साता कालियानीस जाऊन, त्या आ- बाजी सोनदेवाचा बहुत संमान करून त्यालाच त्या मुलुखाचा सुभेदार केला. त्यानं- तर, त्या मुलुखाचे वसुलाचें काम चालविलें; तें असें शिवाजीनें पुरातन चाली क- शा होत्या त्या ध्यानांत आणून, त्या चालविल्या; आणि देवस्थानांचें व ब्राह्मणांस जें पूर्वीचें दिलेले तें तसेंच चालविलें.

शिवाजीनें जा शिद्याचे किल्ले घेतले होते, तो मोठा शूर होता म्हणून, त्याचे भयानें त्या किल्ल्यांचे बंदोबस्त करितो. घोंसाळ्याजवळ बिरवाडी किल्ला, आणि रेडी

जवळ

जवळ लिंगाणा किल्ला, असे दोन बांधिले.

जो मुल्लाना सुभेदार आबाजी सोनदेवानें कैद केला होता, त्याचा शिवाजीनें मोठा संमान करून माघारा विजापुरास पाठविला; तो तेथें पोंचल्याचे पूर्वींच तें स्थान शिवाजीनें घेतल्याचें वर्तमान बादशाहास कळलें होतें, यास्तव त्याला दुसरा कांहीं अधिकार मिळाला नाहीं बादशाहाची भेटमात्र झाली.

त्यावेळेस विजापुरचा महंमद आदिलशाह बादशाह याणें शिवाजीचा बाप शहाजी, याचें ऐश्वर्य कर्नाटकांत फार वाढिवलें होतें; तो बादशाह असें समजला कीं हें बंड शहाजी अनुकूळ झाल्यावांचून होणार नाहीं; म्हणून त्याच समयीं शिवाजीकडे, फौज नयोजितां, बाजी घोरपडा मुधोळकर नामें एक मोठा सरदार शहाजीबरोबर असे, त्याला सांगोन पाठविलें कीं, शहाजीस कैद करावा; त्यावरून त्याणें त्याला भोजनास बोलावून आणून दग्यानें कैद केला.

त्यानंतर संन सोळाशें एकुणपन्नासांत शहाजीला विजापुरीं बादशाहाजवळ नेला, तेव्हां बादशाहानें त्याला आज्ञा केली कीं हें बंड तूं मोडावेंस; कांकीं हें तुजपासूनच उत्पन्न झालें, तेव्हां तो बहुत प्रकारें विनंती करून बोलिला कीं शिवाजी माझाही बहुत उपमर्द करितो, परंतु तें बादशाह याला सत्य वाटेना; यास्तव त्याला चिरेबंदी कोठडींत घालून त्या कोठडीचें दार श्वासमात्र जाईसें छिद्र ठेवून बंद केलें, आणि सांगीतलें कीं शिवाजी अमुक दिवसांत अपराधांची क्षमा मागावयास न आल्यास हेंही छिद्र बंद होईल. हें वर्तमान शिवाजीला कळल्यावर, त्याचे मनांत आलें कीं, क्षमा मागावयास जावें, परंतु त्याची स्त्री सईबाई तीणें मसलत दिली कीं विजापुरचें सरकार केवळ अविश्वासास्पद आहे, त्यास हेंच बरें कीं आपलें महत्व वाढवावें, आणि त्यांस भयप्रदर्शन करावें. तेव्हां शिवाजीनें मोंगलांचा आश्रय करून शहाजहान दिल्लीचा बादशाह यास आपल्ये बापाचे मुक्ततेविषईं पत्र पाठविलें; त्यांत मीं तुमची चाकरी करीन म्हणून लिहिलें, त्यावरून त्याणें विजापुरचे बादशाहास कांहीं सूचना लिहिली असेल. तीव मुरारपंत नामें विजापुरकरांचा मुख्य कारभारी होता, त्याचें व शिवाजीचें इष्टत्व होतें तें, या दोहीं योगांहीं शहाजीला कोठडींतून काढून किल्यामध्यें बंदींत ठेविला. अशी त्याची सुटका झाल्यावर शिवाजी मोंगलांचे चाकरीस कांहीं निमित्तें करून बोलीप्रमाणें जाईना, आणि वकील पाठवून बोलणें लाविलें कीं, अहमदनगर व जुंनर परगणा यांत आमची पहिली चाकी राहिली आहे, ती द्यावयास आज्ञा व्हावी. तेव्हां शहाजहानाचें उत्तर गेलें किं तुह्मीं एथें येऊन, भेटल्यानंतर तुमचें देण्याचा विचार केला जाईल,* असें संन

---

* हें शहाजहानाचें उत्तर पत्र व आणखी कित्येक शहाजहानाचीं व औरंगजेब बादशाह यांचीं पत्रें, मुंबईचे किल्यांत साहेबांचे पुस्तकसंग्रहस्थानीं आहेत.

सोळाशें पंन्नासांत घडलें.

यापुढें चारवर्षें पर्यंत शहाजी विजापुरीं कैदेंत होता, तेव्हां विजापुरकरांस असें वाटलें कीं शहाजीला जर उपद्रव केला, तर शिवाजी मोंगलांस मुलुख देईल, शिवाजीला असें वाटलें कीं मी जर विजापुरकरांशीं वांकडा वागेन, तर बापास पीडा होईल; म्हणून त्या दोहों वर्षांत वडूनकरून दंगा झाला नाहीं; परंतु एक हिंदू बाजी शामराज नामें होता, त्याणें शिवाजीला महाडाहून धरून बादशाहाकडे न्यावयाचा बेत केला, तो सिध्धीस गेला नाहीं.

शहाजी बंदींत असतां, त्याणें कित्येक वेळा कर्नाटकांत जावयास बादशाहाजवळ आज्ञा मागीतली. परंतु बादशाहानें दिली नाहीं; शेवटीं कर्नाटकांत मोठें बंड उत्पन्न झालें, त्या मुळें बादशाह त्याचें बोलण्यास अनुकूळ झाला, परंतु आधीं शपथ घेतली कीं मुधोळकर जहागीरदार याशीं तुझें वैमनस्य नसावें. याप्रमाणें करार ठरवून शहाजीची सुटका संन सोळाशें त्रेपन्नांत झाली.

तो सुटतांच त्याणें शिवाजीला पत्र पाठविलें कीं तूं जर माझा पुत्र खरा आहेस तर मुधोळकराचें पारिपत्य कर, ही शहाजीची आज्ञा शिवाजीनें मनांत राखून, कशा प्रकारें सिद्धीस नेली. तें वर्तमान पुढें लिहिण्यांत येईल.

मग शहाजी कर्नाटकांत गेला, ते समयीं त्याणें असें पाहिलें कीं तेथचे मंडळाधिपती आपल्या आपल्यांत भांडतात, त्यामुळें आपल्ये जहागिरीस उपद्रव लागला; यासाठीं त्याणें आपला थोरला पुत्र संभाजी यास एक कानिकगिरीचा किल्लेदार याचें पारिपत्य करावयास पाठविला, तो जाऊन त्याशीं लढला, तेव्हां त्यापासून पराभव पावून संभाजी आपले बरोबरचे कित्येक लोक सुध्धां मेला गेला.

त्यानंतर कर्नाटकांत फार दंगे झाले तेणेंकरून विजापुरचे दरबारांत शिवाजीचे चौकशीविषयीं अवसर झाला नाहीं.

तो शिवाजी बापाची मुक्तता ऐकून, कोंकणांतील घेतल्या खेरीज उरलेलीं स्थळें व संपूर्ण घाटमाथा घ्यावयास मसलत अगरवी करूं लागला, त्यांत प्रथमतः जावळी परगणा आपल्ये हातीं यावयाविषयीं उद्योग केला, तो असा त्या मुलुखाची माहितगारी व्हावयाकरितां गुप्त पहाणी करावयास एक रघोबल्लाळ नामें ब्राह्मण व संभाजी कावाजी नामें एक शूद्र असे दोघे कारकून तेथचे राजे चंद्रराव मोरे यांचे कन्येशीं आपण विवाह करणार. असें निमित्त करून त्या बोलण्यासाठीं म्हणून पाठविले; त्यांबरोबर पंचवीस मावळे लोक दिले, ते कारकून त्याकडे जातांच त्या राजानें त्यांचा संमान केला. ते कित्येक दिवस बोलणें करीत तेथे राहिले, शेवटीं शेवटीं त्या ब्राह्मणाचे मनांत आलें कीं चंद्रराव मोरे यांस मारून टाकावयास अवघड नाहीं; हें त्या शूद्रासही ठीक वाटलें मग शिवा-

जीला

जीला याप्रमाणें लिहिलें. त्याणें उत्तर दिलें कीं हें योग्य आहे आम्ही तुमचे साह्या-
यास लश्कर घेउन येतों. त्यानंतर शिवाजी राजगडाहून पुरंदरास आला. तेथून रा-
त्रीस निघोन कृष्णेचे उगमीं महाबळेश्वर देव आहे तेथें रानांत त्याचे लोक गुप्तरूपें
राहिले होते, त्यांत आऊन मिळाला. नंतर रघोजीला ही गोष्ट सिद्धता समजली,
तेव्हां तो त्या कावाजीला बरोबर घेऊन मोऱ्याचे घरीं जाऊन, त्यास ह्मणाला कीं
आपण व आपले बंधू उभयतांशीं एकांत करावयास आलों, त्यांहीं तें मान्य क-
रून दोघे भाऊ त्याशीं बोलावयास एकांतस्थळीं गेले, तेव्हां रघोजी बल्लाळ याणें
त्या राजाचे काळजांत खंजीर खुपसून त्याला मारिला आणि संभाजीला कावाजीनें त्याचा भा-
ऊ मारिला, नंतर ते दोघे तेथून पळून रानांत गेले, तेथे त्यांचे साह्यास शिवाजी-
चे लोक येत होते त्यांची गांठ पडली.

इकडे जावळीमध्यें लोक राजाचे मरणाचा विस्मय करितात,तों शिवाजी-
चे लोकांनीं येऊन हल्ला केला; ते समयीं हिंमतराव नामें त्याचा प्रधान, व त्या राजा-
चे पुत्र होते, त्यांहीं यांशीं बहुत निकरानें युद्ध केलें; शेवटीं तो हिंमतराव मेला तेव्हां
तें युद्ध मोडलें. आणि तें स्थान शिवाजीचे हातीं लागलें. यानंतर वासोटा कि-
ल्ला शिवाजीनें घेतला तेणेंकरून आवळी मुलुख संपूर्ण शिवाजीचे स्वाधीन झा-
ला

शिवाजीनें दुसरा रोहिडा किल्ला घेतला तो प्रकार असा; मावळे लोक बरो-
बर घेऊन, रात्रीस जाऊन,ते किल्ल्याचे लोक सावधनसतां, किल्ल्यास शिडी लावू-
न वर चढून गेले; तेथें हरणस् मावळचा देशमूख बंडाळ, उपनांवाचा होता;
त्याणें त्या लोकांचा तो कोलाहल ऐकून हत्यार घेऊन उठला आणि लढूं लागला
त्याचे बरोबर जे लोक होते तेही बहुत लढले शेवटीं तो बंडाळ पडला तेव्हां तें यु-
द्ध संपलें; त्यांत आवळीचा देशपांड्या बाजी परभू नामें होता,त्याचें शौर्य पाहून,
शिवाजीनें त्याचा संमान केला आणि त्याचा अधिकार त्याकडे ठेवून तो आपले
जवळ चाकरीस ठेविला.

यानंतर सन सोळाशें छप्पन्नांत शिवाजीचे मनांत आलें कीं निरा व को-
यना या दोहीं नद्यांचे कांठीं जो आपला मुलुख आहे तो. व पारघाट, याची वाट,यां-
चे संरक्षणार्थ एक किल्ला कृष्णेचे उगमीं बांधावा; मग त्या कामावर एक आपल्ये
छपेंतला देशस्थ ब्राह्मण मोरोत्रिंमळ पिंगळे नामें योजिला; त्या किल्ल्याचें नाव प्र-
तापगड ठेविलें. त्या वेळेस एक शामराज नामें शिवाजीचा मुख्य कारभारी हो-
ता त्यास पेशवेपद देऊन, त्याचे स्वाधीन कित्येक फौजेची सरदारी ठेविली.

इतके दिवस शिवाजी विजापुरचे राज्यांत मात्र उपद्रव करीत होता;
मोंगलांचे वाटेस गेला नाहीं. यापुढें सन सोळाशें सत्तावन्नांत मोंगलांचाही रा-

ज्यांत

ज्यांत उपद्रव करूं लागला; असें त्याचें धैर्य आणि रीतिविपर्यास झाला.

संन सोळाशें छत्तिसांत मोगल लोकांनीं दक्षिणेचा बादशाहाशीं स्नेह केला. त्यापासून ते दक्षिणेत उपद्रव नकरितां, आपल्ये राज्याची बळकटी करित होते; त्यांचा धनी औरंगजेब तो दिल्लीचा बादशाहाचा पुत्र होता. त्याणें व्यापारी लोकांस हित, आणि प्रजेस सुखकारक, असे नवे कायदे केले; आणि जें मल्लीकंबरानें वसविलेलें खिडकीशहर त्याची राजधानी केली, तिचें नाव औरंगाबाद ठेविलें. परंतु तो युद्धनिपुण होता तेणेंकरून त्याचे मनांस युद्धावांचून उगेंच राहणें आवडत नव्हतें; यास्तव त्याणें संधि पाहून गोंवळकोंड सरकाराशीं कलह आरंभिला, तो प्रकार असा, संन सोळाशें पंचावन्नांत गोंवळकोंडेचा बादशाह कुतुबशाह, याशीं, आणि याचे वजिराचा पुत्र याशीं, वितुष्ट पडलें होतें; तेव्हां त्या बादशाहानें कांहीं निमित्त त्यावर आणून, त्यास शिक्षा दिल्ही. म्हणून त्या वजीरास राग आला त्याणें औरंगजेब बादशाह याचा आश्रय केला, आणि त्याचा पिता दिल्लीचा बादशाह शहाजहान् त्याजकडे फिर्याद केली. त्यावरून शहाजहानानें कुतुबशाह याला निषेधपत्र पाठविलें, त्याणेंकरून त्याला राग आला त्याणें वजीरपुत्र कैद केला, आणि त्याचे पित्याचे दौलतीची जप्ती केली.

त्या वजिराचें नाव मीरजुमला, त्याचा परिचय सर्व मुसलमानी दरबारांत होता; तो पहिला जोहारीपणा करीत असे, यास्तव. हिरे इत्यादि जवाहीर विकावयास मोठ्मोठ्ये दरबारीं त्याचें जाणें घडे; शेवटीं तो आपलें चातुर्य व धनसंपत्ती या दोहों योगांहीं कुतुबशाह याचा वजिर झाला. त्याचे पुत्राचें नाव महंमद आमीन.

जेव्हां औरंगजेब यास कळलें कीं आपला पिता दिल्लीचा बादशाह, याची कुतुबशाह याणें अमर्यादा केली, तेव्हां औरंगजेब याणें तो अमर्यादेचा प्रकार विस्तृत करून, शहाजहानास विनंतीपत्र लिहिलें; त्यावरून बादशाह याची आज्ञा झाली कीं सैन्य तयार करून, मीरजुमला याचा अंगीकार करावा, तेव्हां औरंगजेब याणें आपला पुत्र सुलतान महंमद, याजबरोबर फौज देऊन हैदराबादेस लग्नाचें मिष करून पाठविला; त्या मागून आपण मोठी सेना घेऊन, त्याचे पाठोपाठ निघाला.

तो कुतुबशाह असें जाणत होता कीं हा लग्नास येतो आहे, मग जेव्हां हैदराबादेचा दरवाजाजवळ आला तेव्हां त्याला त्याचा वैरभाव समजला; ते समयीं कुतुबशाह याणें तो वजिराचा पुत्र, महंमद आमीन, यास सोडिला, आणि त्याचे बापाचा दवलतीची जप्ती उठविली; आणखी त्याच वेळेस आपले सरदार यांस युद्धाचे कुमकेस बोलावणें पाठविलें; ते सरदार येऊन पोंचले नाहींत तों सुलतान

महंमद

महंमद याणें हैदराबाद शहर लुटलें, आणि त्या बादशाहास पीडा करून, करार करविला कीं. आपली कन्या सुलतान महंमदास द्यावी व खंडणीची बाकी एक कोटि रुपये द्यावे. हें वर्तमान दिल्लीच्या बादशाह शहाजहान यास समजल्यावर, त्याणें मान्य करून वीस लक्ष माफ करून ऐंशीं लक्ष घेतले.

यानंतर सन सोळाशें छप्पन्नांत. औरंगजेब व मीरजुमला हे दोघे एकचित्त होऊन मसलत करिते झाले, कीं विजापूर व गोंवळकोंडें हीं दोन्हीं राज्यें मोंगलांचे सत्तेंत आणावीं; नंतर कांहीं दिवसांनीं मीरजुमला यास दिल्लीचे बादशाहानें बोलावून नेला. आणि आपल्ये वजिरीचें काम सांगीतलें; त्यापासून तो बादशाहाजवळ बोलत असे कीं. हीं दोन्हीं राज्यें आपल्ये सत्तेंत असावीं तें बोलणें बादशाह मानीत नसे; पुढें महंमद आदिलशाह विजापुरचा बादशाह, त्याच वर्षाचे अकरावे महिन्याचे चवथ्ये तारखेस मेला; तेव्हां बादशाह याणें तें मान्य करून विजापुरावर लष्कर योजिलें, त्यांत मीरजुमला मुख्य करून औरंगजेब त्या स्वारीं केला; मग ते दोघे एकचित्त होऊन तो मीरजुमला औरंगजेबाचे आज्ञेंत वागूं लागला.

इकडे विजापुरीं महंमद आदिलशाह याचा पुत्र, अल्ली आदिलशाह तक्ताधिपती झाला. त्याणें दिल्लीचे बादशाहाचें अनुमोदन घेतलें नाहीं. त्यावरून मोंगल हा त्याचा पुत्र नव्हे असें लटकेंच निमित्त करून युद्धास गेले; असें निर्निमित्त युद्ध कधीं झालें नव्हतें.

ते मोंगल विजापुरीं येतात, असें समजतांच, त्याणीं युद्धाची सिद्धता यथा शक्ति केली; परंतु अवकाश केवळ थोडा ह्मणून मोंगलांशीं मेदानांत युद्ध करावयाजोगी फौज मिळाली नाहीं. यास्तव आपल्ये मुलखाचे मर्यादेंत आणि वाटेवर. अवघड अशीं जितकीं स्थानें होतीं. तितक्ये जागीं फौज पाठवून बंदोबस्त ठेविला. आणखी जे कांहीं घोडेस्वार उरले होते त्यांचा मुख्य, खान् महंमद सरदार, व दुसरे मुसलमान सरदार होते ते बरोबर देऊन त्यांस आज्ञा केली कीं जास्थळीं युद्ध प्रसंग होईल, तेथें तुह्मीं कुमक करावी; त्या वेळेस विजापुरकरांचे मराठे जहागिरदार लोक. सर्जेराव घाटगे, व बाजी घोरपडे निंबाळकर. वगैरे कित्येक फौजेसहीत येऊन कुमक करिते झाले.

सन् सोळाशें सत्तावन्नांचे तिसरे महिन्यांत लष्कर सहीत औरंगजेब पूर्वेचे वाटेनें विजापुरकरांचे मुलखांत शिरला. आणि तत्काळ कालियान किल्ला घेतला, व ज्याचा विजापुरकरांस मोठा भरंवसा होता, असा जो बेदर किल्ला, तोही एका दिवसांत घेतला. नंतर कलबुर्गा किल्ला एकाएकीं हल्ला करून घेतला. असा प्रवेश झाल्यानें, औरंगजेब यास आनंद वाटला, परंतु जे विजापुरकरांचे स्वार

कुमकेस फिरत असत त्यांचा उपद्रव फार आगं लागला; तेव्हां त्याणें जो विजापुरचा मुख्य कारभारी खान महंमद नामें सरदार होता, त्याला कांहीं देऊन तो आपल्ये शर्ती प्रमाणें लढेनासा केला. त्या मुख्याची वृत्ति पालटतांच, दुसरे जे सरदार होते, ते त्याचे कुमकेवांचून हीनबळ जाले; तेव्हां तो औरंगजेब मोठ्या त्वरेनें विजापुरास गेला, त्या मुळें तेथचे लोक यांस त्याला दाणापाणी मिळेनासें करावयास फावलें नाहीं; त्याणें लागलाच शहरास वेढा घातला, आणि मोठे निकरानें युद्ध आरंभिलें, ते समयीं विजापुरकर त्याशीं बहुत आर्जवानें सल्ल्याची गोष्ट बोलूं लागले; परंतु त्या औरंगजेबाचे मनांत तें राज्य अगदीं बुडवावें असें होतें, यास्तव तो ऐकेना; इतक्यांत त्याची बहीण रोषनारा बेगम होती, तिणें दिल्लीहून पत्र पाठविलें कीं शहाजहानाचे शरीरास फार असमाधान जालें; तो लेख पाहतांच, औरंगजेबानें त्यांपासून कांहीं द्रव्य घेऊन जो त्यांचा मुलुख घेतला होता तो त्यांचे स्वाधीन करून, आपल्ये फौजेसुद्धां विजापुराहून निघोन माघारा दिल्लीस गेला.

दिल्लीचा बादशाह शहाजहान याचे पुत्र चवघे त्यांत एक बापापाशीं दाराशेखो नामें होता; एक सुलतान सुजा, तो बंगाल्याचा स्थानाधिपति, एक औरंगजेब, एक सुलतान मुराद, तो गुजराथेचा तक्ताधिपति, हे चवघेही आपल्ये बापाचा अंतकाळ जवळ आला असें जाणून, आपणास दिल्लीचें तक्ताधिपत्य मिळावें ह्मणून सैन्यें सिद्ध करिते जाले. त्यांत जो दाराशेखो नामें शहजादा जवळ होता, तो बापाची शक्ति क्षीण पाहून राज्यकारभार आपण करूं लागला, तो स्वभावें करून सरळ होता; औरंगजेब मोठा कपटी, तो मुसलमान लोकांस निरंतर असें समजावित असे, कीं आपले वडील धर्माचे कामांत सावधपणा ठेवीत नाहींत, मी हें राज्य अशासाठीं इच्छितों कीं आपला धर्म उत्तम प्रकारें चालवावा; नंतर आपला भाऊ सुलतान मुराद यासही तसेंच समजाऊन, भुलथाप दिली कीं तुह्मीं व आह्मीं एकचित्त असतां मीं धर्मकृत्यें मात्र चालवीन तें त्यास मान्य वाटलें आणि दोघे मिळून दाराशेखोशीं युद्धें करून कित्येकवेळा त्याचा पराभव केला; शेवटीं तो परागंदा जाला, नंतर औरंगजेब याचे हातीं सांपडला, त्याणें तो मारून टाकला. इतक्यांत शहाजहान समाधान पावला त्याणें वारंवार पुत्रांस आज्ञा केली कीं तुह्मीं आपआपल्ये संस्थानीं जा, परंतु ते आईकनात, शेवटीं औरंगजेब याणें सर्व आपल्ये हातीं आणून बापास आपलेजवळ बंदींत ठेविला; आणि सुलतान मुराद याचें लश्कर वश करून घेतलें, व त्यास कैद केला; तेव्हां संन सोळाशें अट्ठावन्नांत तो औरंगजेब दिल्लीचा तक्ताधिपति जाला, यानंतर त्याणें दक्षिणेहून मीरजुमला यास बोलावून आणिला, आणि दोघे मिळून जो उरलेला सुलतान सुजा नामें तिसरा भाऊ त्याचे पाठीस लागले, तो पळून बंगाल्याचे पलिकडे आराकान प्रांतीं गेला; त्यास तेथें को-

णीं

णी दुष्टानें मारिला, याप्रकारें औरंगजेब यास कोणी प्रतिस्पर्धी नाहीं असा तो दि-
ल्लीचा तक्ताधिपति झाला.

सन सोळाशें सत्तावन्नांपासून सोळाशें बासष्ट प-
र्यंत झालेलीं सर्व वर्तमानें मिळून भाग पांचवा.

## भाग पांचवा अनुक्रमणिका.

शिवाजीनें औरंगजेबाशीं नम्रभावेंकरून बोलत असून, मोंगलांशीं कृत्रिम केलें. १

त्या शिवाजीनें आपल्ये लश्करांत स्वार वाढवून, पठाण मुसलमान लोक चाकरीस ठेविले. २

विजापुरचे मानकरी लोकांत वेमनस्यें पडलीं त्यापासून काय झालें तें. ३

शिवाजीचा शामराज पेशवा राजपुरचे शिद्दीपासून पराभव पावला; त्यावर शिवाजीचा राग होऊन त्याणें मोरोत्रिंमल पिंगळे नामें दुसरा पेशवा केला. ४

वाडीचे सावंत पहिल्यानें शिवाजीस मिळाले, मग लवकरच विजापुरकरांकडचे झाले. ५

विजापुरकरांकडून शिवाजीचे पारिपत्यास मोठें सैन्य आलें. ६

त्या सैन्याचा मुख्य सरदार आफसुलखान तो शिवाजीनें कसा युक्ती करून मारिला तें प्रकरण. ७

शिवाजीनें विजापुरचा रुस्तमजमान सरदार याचा पराभव करून विजापुरचे दरवाजापर्यंत मुलुख लुटला, व त्वरेनें कोंकणांत जाऊन राजपुरी व दाभोळ लुटलीं. ८

त्या शिवाजीचे पारिपत्यास पुनः दुसरें मोठें सैन्य नेमून, त्याचा मुख्य सरदार शिद्दीजोहर केला, त्याणें पन्हाळ्याकिल्ल्यावर शिवाजी असतां त्या किल्ल्यास वेढा घातला. ९

असें असतां तो शिवाजी वांचला कसा, व त्याचा कारकून हरणस मावळचा देशपांड्या बाजीपरभू याणें काय काय पराक्रम केला तें. १०

विजापुरचा बादशाह अल्ली आदिलशाह याणें शिवाजीनें घेतलेला मुलुख आपण सैन्यसुद्धां येऊन सोडविला तें. ११

पुनः शिवाजीनें कित्येक किल्ले घेतले तें व त्याचे बापास ज्याणें धरून विजापुरीं नेलें तो बाजीघोरपडा त्यास सांपडला त्याला मारून, त्याचें गांव मुधोळ तें जाळिलें. १२

सांवतांचा वाडीप्रांत शिवाजीनें घेतला तो प्रकार. १३

विजापुरकरांशीं तह केला तें वर्तमान. १४
शहाजी शिवाजीचे भेटीस आला तें प्रकरण. १५
रायगड किल्ल्याची गोष्ट. १६
शिवाजीनें लश्कर किती होतें तें व त्याचे मुलखाची हद्द किती होती तें. १७

## भाग पांचवा.

औरंगजेब जा वेळेस विजापुरकरांशीं लढूं लागला त्या वेळेस त्याला शिवाजीनें विनंतीपत्र पाठविलें कीं, मीं मोंगलांचा चाकर आहें त्यास विजापुरकरांचा जो मुलुख मी घेतलेला आहे, त्याचे संरक्षणाविषयीं मला कृपा करून सनद द्यावी; तेव्हां औरंगजेब याणें त्यास तो मुलुख दिला आणि आज्ञा केली कीं दाभोळ व त्या खालचा मुलुख, दिल्लीचा सरकारचा असून तेथे विजापुरकर उगेच सत्ता करितात, त्यास तोही मुलुख घ्यावा; नंतर शिवाजीनें औरंगजेब याचें लश्कर दूर, आणि विजापुरकरांचे शहास गुंतलें, असें जाणून आपले स्वार पुंडाई करून वाढवावे असा मनसोबा करून, त्याणें संन सोळाशेंसत्तावन्नांत मोंगलांशीं कृत्रिम केलें, तें असें रात्रीस फौजेसहित एकाएकीं जाऊन जुन्नर शहर अगदीं लुटलें. तेथून तीन लक्ष होन व दोनशें घोडे व कित्येक मोठे मोठे अलंकार व कित्येक उंच उंच वस्त्रें इत्यादि संपत्ति घेऊन पुण्यास गेला, आणि तेथे त्याचे दुसरे लोक होते, त्यांजवळ ती सर्व टोलत देऊन राजगडास पाठविली, मग आपण चोरवाटेनें जाऊन अहमदनगरास दाखल जाला; त्याची इछा अशी होती कीं त्या नगराची पेंठ सगळी एकाएकीं लुटून तें द्रव्य न्यावें तो त्याचा मनोरथ पूर्ण झाला नाहीं; त्यास लाभ मोठा झाला तो असा, सातशें घोडे व चार हत्ती सांपडले, तितकेच घेऊन पळाला; कां कीं त्या किल्ल्यांतून स्वार आले ते त्याचे लोकांस ठार मारूं लागले.

नंतर शिवाजीनें पुण्यास येऊन कित्येक बारगीर व कित्येक शिलेदार चाकरीस ठेविले; त्यांत एक शिलेदार माणकोजी दटोंदा नामें त्याचे बापाचे वोळखीचा होता त्याला सरनोबत पद दिलें; पुढें तो मेल्यावर तें पद मोठा धाराशूर नेताजी पालकर नामें होता त्यास दिलें.

यानंतर मोंगलांनीं विजापुरचें राज्य बुडविलें ह्मणजे पुढें आपणास भय होईल, असें समजून शिवाजीनें औरंगजेबास बहुत आर्जवें करून विनंतीपत्र लिहिलें कीं निश्चय मीं यापुढें तुमचे आज्ञेबाहेर वागणार नाहीं, माझे अपराधांची क्षमा असावी. या लेखाचे दृढीकरणार्थ कांहीं बोलणें करावयाकरितां शिवाजीनें आपला परम विश्वासू रघुनाथपंत नामें वकील पाठविला; नंतर मोंगलांनी विजापुरकरांशीं सल्ला केला व शहाजहानाचे शरीरीं समाधान नाहीं, असें वर्तमान कळल्यावर दुसरा वकील कृष्णाजी भास्कर नामें पाठविला त्याणें बोलणें लाविलें

कीं

कीं आह्मीं आपल्ये चाकरीकरितां पुष्कळ स्वार जमा केले आहेत त्यास जेसमयीं आपण बाहेर निघतील तेव्हां आज्ञा झाल्यास आह्मीं आपल्ये मुलखाचा बंदोबस्त राखूं; अशी चाकरी आमचे हातून घडली असतां, आमची पहिली तुमचे मुलखीं देशमुखी होती ती, आह्मास द्यावी. याखेरीज दुसरें असें समजाविलें कीं कोंकणांत आदिलखान आहे त्याची वर्तणूक नीट नाहीं त्यास तो जर मुलुख आमचे स्वाधीन होईल तर प्रजा सुख पावेल.

त्या वेळेस ओरंगजेब आपले भावांशीं कलहास गुंतला होता, ह्मणून शिवाजीचें इतकें धट्टाईचें बोलणें कांहीं कार्यांतरीं लक्ष्य ठेवून मान्य केलें; त्यावरून शिवाजीनें कित्येक नवे लोक चाकरीस ठेवून ज्यांचा बंदोबस्त चांगला नव्हता असे समुद्रतीरचे कित्येक किल्ले घेतले; तेथे कांहीं गलबतें बाळगून चांचेपणा करूं लागला.

यानंतर ओरंगजेब आतांच विजापुरकरांनीं दूर केलेले पायदळ पठाण लोक आले ते, शिवाजीनें सातशें चाकरीस ठेविले; त्या पूर्वीं त्याणें कधींही मुसलमान लोक चाकरीस ठेविले नव्हते. ज्याणें चंद्रराव मोऱ्यास मारिलें तो राघोबल्लाळ त्यांचा मुख्य सरदार केला, मग ते लोक त्याचे फार कामास पडले.

ओरंगजेब निघून गेल्यावर विजापुरीं मानकरी लोकांत वैमनस्य पडलें होतें, ते सर्व मिळून जर शिवाजीचें बंड मोडिते, तर तो प्रकार उत्तम होता, परंतु तें टाकून, आपआपल्यांत एकमेकाचा नाशास प्रवृत्त झाले, तेथचा मुख्य वजीर खानमहंमद, त्याणें आपले धण्याचा घात केला ह्मणून, तो आला ह्मणजे त्याचें पारिपत्य करावें, असा त्या दरबारीं निश्चय ठरला होता; त्याची शिक्षा नीतीनें करावी तें न केलें, त्याला अभय देऊन बोलाविला, तो विजापुरचा दरवाजाशीं येतांच त्यास हत्तीवरून ओढून मारिला. अशी अव्यवस्था होण्याचें कारण असें कीं तेथचा तक्ताधिपति अल्पवयाचा होता; आणि कारभारी लोकांत वैमनस्यें पडलीं असत.

शिवाजीचे मनांत होतें कीं सारी कोंकणपट्टी घ्यावी यास्तव त्याणें आपला शामराज पेशवा शिद्दीचा मुलुख घ्यावयास पाठविला. त्या वेळेस फत्तेखान नामें शिद्दी होता, त्याणें लढून त्या शामराजाचा अगदीं मोड केला; हें वर्तमान सन सोळाशें एकुणवन्नासांत घडलें

हा शिवाजीचे फौजेचा पहिला मोड झाला यावरून त्याची उत्साहशक्ति क्षीण झाली.

त्याणें शामराज पंत पेशव्यास माघारां बोलावून नेला, आणि त्याचा अधिकार मोरोत्रिंमल पिंगळे यांस दिला; याशिवाय ते मोड झालेले जे लोक त्यांचे कुमकेस दुसरी फौज पाठविली, त्या मोडाचे पूर्वीं वाडीचे सावंत याणीं शिवाजीची

उत्तम

उत्तम तयारी व विजापुरकर केवळ आळशी असें पाहून आपण शिवाजीला मिळावें अशा मसलतीनें वकील पाठविला; तेव्हां असें ठरलें कीं सावंतांची देशमुखी सोडून अर्धावरहल शिवाजीनें घेऊन त्यांचें रक्षण करावें. असें ठरल्यावर ते सावंत यांस पुढें थोडकेच दिवसांनीं असें वाटलें कीं आह्मीं जें केलें तें ठीक नव्हे. ह्मणून विजापुरकरांशीं पहिले प्रमाणें मिळाले.

जें दुसरें लश्कर मोड झालेल्या लोकांचे कुमकेस बरोबर रघुनाथपंत देऊन पाठविलें तें पावसाळा येई तों पर्यंत जय पावलें नाहीं, नंतर ते लोक निघोन आपल्ये मुलखीं गेले.

शेवटीं विजापुरचे दरबारांत असा निश्चय झाला कीं शिवाजीचें बंड अवश्य मोडिलें पाहिजे; तेव्हां त्याणीं सैन्य सिद्ध केलें. तें असें पांच हजार स्वार. आणि सात हजार पायदळ. व कित्येक तोफा. व कित्येक जेजाला. व कित्येक बाण, तयार करून कोणी एक मोठा कुलीन आफसुलखान नामें मुसलमान मुखत्यार केला; तो बादशाहाची आज्ञा घेऊन निघते समयीं. आपले जातीचा गर्विष्ठपणानें बोलिला कीं शिवाजी केवळ क्षुद्रजीव आहे यास बांधून स्वामीचे सिंहासनाचे पायरीवर आणून टाकीन.

मग पर्जन्य काळ गेल्यावर, सन सोळाशें एकुणसाठांत तें लश्कर पंढरपुरावरून वाईस आलें; तें शिवाजीला कळतांच तो प्रतापगडीं जाऊन राहिला. आणि तेथून वकील पाठवून त्या आफसुल खानाशीं फार गरीबाईचें बोलणें लाविलें; तें असें कीं तुज सारिखा महा प्रतापी सरदार. याशीं माझी लढाईची शक्ति किती; जर तुमचे योगें करून बादशाह माझे अपराधांची क्षमा करील, तर मजवर मोठे उपकार होतील; त्यास हें सिद्ध झालें ह्मणजे तुह्माला मीं आपला सर्व मुलुख देईन, तो आफसुलखान उन्मत्त पणानेंच आपणास राजकार्यदक्ष असें मानित होता. त्यावरून शिवाजीचें ज्ञान गणित नसे; त्याला पूर्वीं काहीं दिवस वांई परगण्याची मामलत होती, त्यावरून त्याला असें ठाऊक होतें कीं हा मुलुख केवळ पराक्रमें करून घ्यावयास अवघड आहे; हीं सर्व कारणें आणि शिवाजीचें गरीबीचें बोलणें मिळून त्याचें मन कांहींसें प्रसन्न झालें; तेणेंकरून त्याणें गोपीनाथपंत नामें एक कारकून कांहीं बोलणें करावयाकरितां पाठविला, तो पार गांवास पोंचल्यावर शिवाजी त्याचे भेटीसाठीं किल्ल्यावरून खालीं उतरला, तेव्हां तो ब्राह्मण शिवाजीशीं बोलिला कीं आफसुलखान शहाजीचा इष्ट आहे, तो तुमचा नाश इछीत नाहीं, तुह्मीं लढाई न करितां जर मुलुख द्याल तर तो बादशाहाकडून क्षमा करवील; आणि तुह्माला कांहीं जहागीर देववील, ही गोष्ट शिवाजीचे मनास आली, तेव्हां त्याणें तो वकील व त्या बरोबरचे लोक यांचे संमानार्थ स्थळादिकाचा

दिकाचा बंदोबस्त केला. आणि त्या कारकुनास त्या लोकांपासून कांहीं दूर वेगळी राहावयाजागा दिली. असें करून रात्रीस कोणाला कळूं न देतां, त्या ब्राह्मणाकडे शिवाजी येऊन बहुत नम्रतेनें दंडवत करून बोलिला कीं, तुह्मी ब्राह्मण आहां शूद्रांचे गुरू आहांत; त्यास मी आपणास विनंती करितों कीं मला भवानी प्रसन्न होऊन बोलिली, कीं तूं गाई आणि ब्राह्मण यांचा प्रतिपाळ कर. यास्तव मी जें कर्म करितों; तें केवळ गाई ब्राह्मणांचा पालनार्थच करितों; त्यास जर तुह्मी माला अनुकूळ व्हाल तर तुह्मास आपले भाग्यांत व सोयऱ्यांत सुखी ह्मणवून राहावयास हिंवरें गांव जहागीर करून देईन. त्यावरून तो ब्राह्मण वश होऊन त्याणें शिवाजीला निष्कपटपणाविषयीं शपथ दिली. मग ते दोघे मसलत करूं लागले कीं सांप्रत जें भय निर्माण झालें आहे, याचें निवारण कसें करावें; त्यांत त्या ब्राह्मणाचे अटकळींत असें आलें कीं आफसुलखान यास शिवाजीशीं एकांतांत आणावयाचें अवघड नाहीं, तेव्हां शिवाजीनें आपला वकील कृष्णाजी भास्कर त्या गोपिनाथपंता बरोबर आफसुलखानाकडे पाठविला. त्याणीं त्यास असें सांगीतलें कीं तुह्माला शिवाजी फार भितो, कदाचित् तुह्मी जाऊन जर त्याला अभय द्याल, तर तो विश्वासें करून आपले स्वाधीन होईल, आणि युद्ध न करितां मुलुख देईल.

असें त्यांचें सकृत्रिम बोलणें आफसुलखानानें सत्य मानिलें. आणि असावधपणें त्या गोपिनाथपंतानें सांगीतल्याप्रमाणें वर्तूं लागला, तेव्हां विजापुरकरांचें लश्कर जावळीस गेलें ते समयीं शिवाजीनें मोरोपंत व नेटाजी पालकर व पुष्कळ मावळे लोक कोंकणांतून आणून, प्रतापगड व जावळी या दोहों जागीं गुप्त ठेविले.

यानंतर आफसुलखान भेटीची तयारी करून बरोबर दीड हजार फौज घेउन, प्रतापगडाजवळ आला; तेव्हां गोपिनाथपंतानें शिवाजी भिईल असें समजावून फौज मागें ठेवविली. आणि एक हत्यारबंद बरोबर घेऊन, एकटा आफसुलखान यास त्या हत्यारबंदासुद्धां भेटीचा संकेताचे मांडावर नेवून शिवाजी येतो ह्मणून वाट पाहात बसले.

इकडे किल्ल्यामध्यें शिवाजीनें स्नान करून नित्य नियम उरकून, मातेचा चरणावर मस्तक ठेवून आशीर्वाद घेतला; आणि आंगांत चिलखात चढवून, त्यावर आंगरखा घालून, त्याचे उजव्ये अस्तणींत गुप्त विचवा नामें शस्त्र घातलें; आणि डाव्ये हातीं वाघनखें घेतलीं; आणि भेटीस निघाला. त्या बरोबर त्याचा पुरातन विश्वासू शिपाई तानाजी मालुसरा हत्यारबंद होता. तें भेटीचें स्थान जवळ आलें तेव्हां शिवाजी दचकत दचकत येऊं लागला, तेंव्हां गोपिनाथपंतानें असें समजाविलें कीं तो तुमचे जवळचा हत्यारबंदास भितो, कांकीं त्याची आकृती फार

सुकुमार

सुकुमार आणि धाकटा आहे. याकरितां हा एकीकडे झाला पाहिजे, त्यावरून त्याला अमळसा दूर केला. नंतर शिवाजी व आफसुलखान एकमेकास भेटतां भेटतां शिवाजीनें आफसुलखानाचे पोटांत, वाघनखें खुपसलीं; तीं बळकट लागलीं; परंतु तो आफसुलखान त्वरेनें त्यापासून दूर होऊन, तरवार उपसून शिवाजीला वार करून, अरे घात आहे, अरे घात आहे, असें बोलिला. त्याच वेळेस शिवाजीनें त्यास आपल्ये अस्तणींतला बिचवा काढून मारिला, तेव्हां तो भूमींवर पडला; त्याणें जो शिवाजीस वार केला तो त्याचे चिलखाता मुळें लागुला नाहीं, इतकें सर्व एका क्षणांत जालें. तो त्या आफसुलखानाचे बरोबर आलेला हत्यारबंद सैयदबंधू नामें होता, तो आपल्ये धण्याजवळ आला इतक्यांत त्याचे हातची तरवार शिवाजीनें घेतली. घेतांच तो तानाजी व शिवाजी, हे दोघे त्या एकल्या बरोबर लढूं लागले; आणि त्यास कित्येक वेळा बोलले कीं तुला, आतां आह्मीं जीवदान देतों; त्याणें त्या बोलण्याचा धिक्कार करून त्यांशीं लढून मेला, असा तो स्वस्वाम्यभिमानी परम योग्य ह्मणून, त्याचें नांव लिहिलें; तो मृत्यु पावला ते समयीं शिवाजीचे लोक आले, त्याणीं त्या आफसुलखानाचें शिर कापून किल्ल्यावर नेलें.

तें शिर किल्ल्यावर नेतांच संकेताप्रमाणें तोफेचा बार केला; तो बार होतांच, एकाएकीं प्रतापगडचे व आवळीचे लोक येऊन, आफसुलखानाचे लष्करावर छापा घातला; तेव्हां त्या लष्कराचा बहुत नाश जाला, त्या वेळेस शिवाजीला चार हजार घोडे व कांहीं हत्ती व कांहीं उंटें आणि बहुत द्रव्य, व तोफा व जेजाळा वगैरे, पुष्कळ सरंजाम सांपडला.

अशा अधर्में करून वैभव संपादन केलें असतांही, त्याचे जवळचा लोकांहीं त्याची प्रशंसा केली; त्याणीं धर्माधर्माचा विचार चित्तांत आणिलाच नाहीं. त्या छाप्यांत कित्येक लोक धरून नेले, त्यांतून जे कोणी गेले त्यांस दुःख न देतां शिवाजीनें जाऊं दिले. त्यांत एक झुंझारराव घाटगा नामें सरदार मोठा कुलीन होता, त्याचें आणि शहाजीचें इष्टत्व होतें, त्याणें राहावें ह्मणून शिवाजीनें फार आग्रह केला, परंतु तो ऐकेना, तेव्हां त्याचा मोठा संमान करून त्याला बादशाहाकडे जाऊं दिला.

याखेरीज त्या धरलेल्या लोकांत आफसुलखानाची स्त्री व पुत्र सांपडलेलीं, एक शिवाजीचा सरदार खंडोजी कांकडा नामें असे, त्याचे स्वाधीन होतीं; त्याणें त्यांपासून कांहीं लांच घेऊन, सोडून दिलीं; यास्तव शिवाजीनें त्या कांकड्याचें डोकें मारिवलें.

त्या लढाईंत जे जखमी जाले त्यांचा शिवाजीनें मोठा संमान करून त्यां-

स कित्येक अलंकार वस्त्रें दिलीं; या योगें करून त्यांची मोठी कीर्ति जाली. आणि शिपाई लोक युद्धाविषयीं तयार आले.

अद्यापि शिवाजीचे पुरुष त्या आफझुलखानाचे तरवारेस अमूल्य मानून फार जपतात.

तो गोपीनाथ पंत दगा केलेला त्यास संकेताप्रमाणें शिवाजीनें हिवरें गांव देऊन, मोठा संमान केला. आणि सरदारीचा अधिकार देऊन आपल्ये चाकरीस ठेविला.

यानंतर शिवाजीनें पन्हाळ्याचा किल्लेदार वशकरून तो किल्ला घेतला. नंतर कृष्णेचे उभयतीरची खंडणी घेत चालिला; या खेरीज कोंकणचे व सह्याद्रीवरचे कित्येक किल्ले त्यास लढाई नकरितां त्या लोकांनी दिले; परंतु रांगणा व खेळणा हे दोन किल्ले युद्धकरून घेतले; त्या वेळेस त्या खेळण्या किल्ल्याचें नाव विशाळगड पडलें. तें अद्यापि तसेंच चाललें आहे. हें वर्तमान सन सोळाशें एकुणसाठांचे बाराव्ये महिन्यांत विजापुरीं कळलें, तेव्हां त्या बादशाहानें आपला सरदार मिरजेस, रुस्तुलजमान नामें होता, त्यास आज्ञा केली कीं कोल्हापुरचे बंदोबस्तास निघावें तेव्हां त्याजवळ तीन हजार स्वार आणि कांहींसें पायदळमात्र होतें. तो पन्हाळ्याजवळ येतांच शिवाजीनें आपले स्वार जमाकरून त्याचा अगदीं पराभव केला, आणि कृष्णेचा पार घालविला.

यानंतर पायदळ आणून शिवाजीनें विजापुर पर्यंत खंडणी घेतली. आणि अतित्वरेनें माघारां विशाळगडास गेला कीं ज्याचे पाठीस कोणी सरदार लावावयास अवकाश आला नाहीं.

त्यानंतर सन सोळाशें साठांचे पहिल्या महिन्यांत, शिवाजीनें कोंकणांत समुद्रतीरीं राजपूर व दाभोळ हीं दोन्हीं स्थानें लुटून बहुत द्रव्य राजगडास नेलें हें सारें शिवाजीचें कृत्य विजापुरीं कळल्यावर तेथचे दरबारी लोकांत जें पूर्वीं वैमनस्य पडलें होतें तें मोडून, सर्व एकचित्त होऊन कर्नाटकांत कर्नोळास एक जोहर नामें शिद्दी मोठा विख्यात पुरुष होता, त्याज बरोबर आफझुलखानाचे दुप्पट फौज देऊन शिवाजीचे पारिपत्यास योजिला; तेथें असें ठरलें होतें कीं आधीं पन्हळा किल्ला घ्यावा, मग तो शिवाजीचे जवळ पोंहचतांच दंडाराजपुरचा फत्तेखान शिद्दी, व वाडीचा सावंत या दोघांनां जोहर शिद्दीचे कुमकेस यावयास आज्ञा करावी.

इकडे शिवाजीनें कोंकणांत बंदोबस्तासाठीं राजपुरचे शिद्दीवर रघुनाथपंत योजिला, आणि कालियानी व भिंवडी यांचे संरक्षणार्थ आबाजीसोनदेव नेमिला; आणिक वाडीचा सावंतावर बाजीफासकर सरनोबत यासपा-

ठविला;

ठविला. मोरोपंत यास देशांत सिंहगड व पुरंदर व प्रतापगड यांचे. व मुलखाचे रक्षणार्थ आज्ञा केली. शिवाजीनें पन्हळा किल्ला असा सुदृढ कीं कोणाचे हातीं लागावयाचा नाहीं. याप्रमाणें समजून तेथें आपण मोठ्या बंदोबस्तानें राहिला.

त्या शिवाजीनें विजापुरकरांचें लश्कर येताना वाटेनें त्यास कांहीं उपद्रव केला नाहीं. मग जेव्हां तें अगदीं जवळ येऊन पडलें. तेव्हां नेटाजी पालकर याज बरोबर स्वार देऊन त्या लश्करासभोंवत्या मुलखांत स्वांच्या मारून लुटून ओस पाडून. त्या लश्करास, धान्यादि मिळेनासें केलें; आणि रात्रीस किल्ल्यांतून मावळे लोक कुमकेस पाठवून छापा घालवी. अशा प्रकारें त्या लश्कराचा फार नाश केला; शेवटीं त्या शिद्दीजोहरानें आपल्ये लश्करांत अशी आज्ञा केली कीं असें घातकर्म करणारा जो तो सांपडला असतां त्याला जीवंत ठेवूं नये, आणि किल्ल्यास वेढा असा घातला कीं अगदीं दुसर्याचा प्रवेश आंत नहोय. असे चार महिने राहिले तेव्हां शिवाजीस असें समजलें कीं मीं या किल्ल्यावर राहिलों हें ठीक नकेलें, कांकीं आतां आपल्यास पळायास वाट नाहीं व मुलखांत काय होतें आहे तें समजत नाहीं; त्यास आतां कसातरी आपला जीव वांचेल अशी युक्ति करावी.

इकडे चार महिने झाल्यावर त्या वेढा घालणारांस असें वाटलें आतां शिवाजी आपल्ये हातीं लागला; तेणेंकरून त्यांस बहुत आनंद जाला. आणि अत्यंत सावधपणानें बंदोबस्त करूं लागले.

जो शिवाजीचा मुलुख कोंकणांत होता तेथें ते समयीं जागोजाग युद्धें होत होतीं; फत्तेखान शिद्दीनें कित्येक वेळा रघुनाथ पंताचा पराभव करून. लढाऊ गलबतें पाळगून त्याचे मुलखांत जाऊन कित्येक जागीं उपद्रव केला.

याखेरीज वाडीचे सावंताशीं बाजिराव फासलकर लढाई करीत होता. ती लढाई अशी झाली कीं दोनीं लश्करांच्या सारखा नाश जाला आणि दोहोंकडचे दोघे मुख्य सावंत व फासलकर हे पडले.

शिवाजीचे मनांत आलें कीं आतां आंतच राहून मरावें हें योग्य नाहीं. कसेंतरी बाहेर पडावें; ह्मणून शिद्दीजोहरास निरोप पाठविला, कीं जर माझे जीवास+ भय नसेल, तर मी तहाचें बोलणें करावयास येतों; मग त्याचें अभयवचन ऐकून. बरोबर थोडकीं माणसें घेऊन संध्याकाळच्या थोडा दिवस असतां शिवाजी किल्ल्याखालीं उतरला तो जेथें शिद्दीजोहराचें सैनिकांनीं मोरच्या बांधिला होता. त्या जवळ त्या शिद्दीजोहराशीं व शिवाजीशीं भेट जाली; तं:

+ मराठी लोकांत अद्यापि असा विश्वास आहे कीं शिद्दीलोक वचनाचे खरे प्रमाणिक.

तर

तर त्या दोघांचें बोलणें झालें त्यावरून लोकांस असें वाटलें कीं आतां शिवाजी युद्ध करीत नाहीं; तो तर आपलें बोलणें युक्तीनें बहुतेक मोठीं मोठीं कलमें बोलून कांहीं हलकीं कलमें राहिलीं तीं युक्तीनें न संपवितां संध्याकाळ आला म्हणून, उद्यां बोलेन असें समजावून, माघारा किल्ल्यावर गेला; तेव्हां ते घेरा घातलेले लोक असें समजले कीं आतां किल्ला हस्तगत जाला; त्यास इतःपर बहुत सावधपणा राखण्याचें कारण नाहीं. त्यावरून ते असावध राहिले.

तो त्यांची असावधता पाहून बरोबर मावळे लोक घेऊन रात्रीस अंधारांतच निघोन किल्ला उतरोन त्या लोकांस कळूं न देतां रांगण्याकडे पळाला. तो बहुत दूर गेल्यावर लोकांस समजलें. तेव्हां त्याचे पाठीमागून त्या शिद्दीजोहराचे स्वार व पायदळ लोक धांवले; त्याणीं रांगण्याचे अलीकडे तीन कोस सुमारें एके खेंडींत चढतांनां पाहिला, तेव्हां, त्याणेंही त्यांस पाहिलें; मग त्या खेंडींतच मावळे लोक ठेवून त्यांस सांगीतलें कीं मी जों पर्यंत किल्ल्यावर जाऊन तोफांचे बार पांच करीन तों पर्यंत तुह्मीं हे येताहेत यांशीं येथूनच लढत असावें, त्या वेळेस त्या मावळ्यांचा मुख्य बाजीपरभू यास करून, आपण किल्ल्यावर गेला.

नंतर त्या लोकांशीं तो परभू दोन प्रहर पर्यंत मोठ्या शौर्यें करून लढला. त्याणें कित्येक वेळा त्या मोंगलांस हटिवलें; शेवटीं दुसरी मोठी फौज आली तेव्हां फार मोठें युद्ध जालें त्यांत ते मावळे लोक अर्धे पडले. आणि तो परभूही पडला, ते समयीं त्याणें किल्ल्यावरचे तोफेचे पांच बार ऐकिले.आणि बोलिला कीं आतां मी सुखी आलों; इतकें करून प्राण सोडिला. हें सर्व वर्तमान विजापुरचे बादशाहास कळलें तेव्हां त्या शिद्दीजोहराविषयीं त्याचे मनांत वांकडें येऊन तो रागें भरला; कांकीं त्यास असें वाटलें कीं याणें कांहीं लांच घेऊन शिवाजीला सोडून दिला. मग सन सोळाशें एकसष्टांत तो बादशाह आपण आंगें सैन्य घेऊन कराडास आला, तेथें जे कोणी सभोंवते संस्थानीं लोक होते त्याणीं त्याचे सेवेंत तत्पर असून असें समजाविलें कीं आह्मास शिवाजीचा पक्ष किमपि नाहीं. तो शिद्दीजोहर बादशाहाचे भेटीस आला, त्याणें बादशाहाचे मनांतील संशय उडविला, आणि आपण आपल्ये ठिकाणीं कर्नोळास गेला.

मग त्या बादशाहानें रांगणा किल्ला व विशाळगड या दोहों खेरीज, शिवाजीचा पन्हाळा व त्या संबंधीं कित्येक किल्ले घेतले; पुढें पर्जन्यकाळ जवळ आला तेव्हां फौजेसहित कृष्णेचे कांठीं चिमळगेशाहरीं जाऊन राहिला. तो शिवाजी बादशाहाचे सन्मुख कधींही लढला नाहीं; परंतु कांहीं संधी पाहून सन

सोळाशें

सोळाशें बासष्टांत त्याणें राजापूर लुटून तेथें कोणी इंग्रेज लोक व्यापारी राहात होते ते धरून नेऊन कैदेंत ठेविले.

यानंतर शिवाजीनें शृंगारपूर युद्ध करून घेतलें. तेथें दळवे नामें एक पाळेगार होता. तो युद्धांत पडला. याप्रमाणें शिवाजीनें हिंदूंचीं दोन ठिकाणें घेतलीं. एक जावळी एक शृंगारपूर. तें हिंदु लोकांस फार अयोग्य वाटलें; यास्तव तें लोकांचे मनांतलें जावें ह्मणून शिवाजी केवळ धार्मिकपणा करूं लागला; तो असा कीं आपणास तुळजापुरचे भवानीचे दर्शनास जावयास फावेना ह्मणून प्रतापगडास मोठ्या समारंभानें देवीची स्थापना केली; आणि रामदास नामें एक महासाधू ब्राह्मण होता तो गुरू केला. हीं दोन कारणें आणखी तिसरें कारण असें. शृंगारपुरचे रहाणारे सुर्वे नामें मराठे होते ते वश केले. त्यामुळें जे शृंगारपुरचे रहाणार लोक ते शिद्दीचे मुलखांत रहावयास गेले नाहीं तेथेंच राहिले.

मग कर्नाटकप्रांतांत कित्येक जागीं बंडें उत्पन्न झालीं. तेणेंकरून विजापुरचे दरबारांत असा विचार पडला कीं आधीं शिवाजीचें पारिपत्य करावें किंवा त्या बंडाचे पारिपत्यास जावें इतक्यांत वाडीकर सावंतांनीं लिहून पाठविलें कीं आह्माला तुमची कुमक असेल तर आह्मीं शिवाजीला जिंकूं; त्यावरून असा निश्चय ठरला कीं बादशाहानें फौज घेऊन कर्नाटकांत जावें. आणि बाजी घोरपडा मुधोळकर व बाल्लोळखान मुसलमान या दोघांहीं सावंतांचे कुमकेस असावें. तेव्हां बादशाह कर्नाटकांत चालिला. इकडे शिवाजीवर जाणाराची तयारी होऊं लागली ते समयीं बाजी घोरपडा आपल्या कांहीं कामानिमित्त आपल्ये ठिकाणीं गेला. हें वर्तमान कोणी शिवाजीस सांगीतलें तें ऐकतांच तो शिवाजी कांहीं लोक बरोबर घेऊन मोठ्या त्वरेनें चोरवाटेनें जाऊन अकस्मात मुधोळ शहरीं पोंहचला. तेथें छापा घालून तो मुधोळकर व त्याचे कित्येक भाऊबंद व कित्येक शिपाई लोक मारून टाकिले. आणि लवकर निघून विशाळगडीं माघारा गेला.

इकडे बादशाह कर्नाटकांत गेला तेथें रायचूर व तुर्गळ हीं दोन्हीं ठिकाणें घेऊं लागला. तेथें शिपाई लोक होते त्याणीं मोठ्या शौर्येंकरून लढाई केली; आणि त्या बादशाहानेंही महत्प्रयास करून तीं स्थानें घेतलीं, हें वर्तमान सन सोळाशें बासष्टांत घडलें. त्या शिद्दीजोहरास बादशाहाचें भय पडलें, तें असें तो समजला कीं बादशाहाचे मनांत माझे विषयीं संशय आहे. त्यास त्याचा विश्वास धरूं नये ह्मणून त्याणें बंडाचा आश्रय केला. नंतर त्याणें अशी संधी पाहिली कीं जुझारराव घाटगे व फलटणचे रा-

व

व नाईक निंबाळकर या दोघांचें लष्कर बादशाहाचे लष्करापासून दूर आणी त्या दोहों लष्करामध्यें तुंगभद्रा नदी इतकें आणून एकाएकी जाऊन त्या लष्करावर छापा घालून, मोठी गडबड करून त्यां लोकांस पिटून लाविलें; इतक्यांत तो बाळोलखान नवें सैन्य कुमकेस घेऊन माघारा उलटला, आणि त्या जोहराचे सैन्याचा नाश केला.

यानंतर ते शिद्दी जोहराचे लोक आपल्ये जिवाचे रक्षणार्थ बादशाहानें क्षमा करावी ह्मणून आपला धर्णी शिद्दी जोहर यास मारिला; त्या योगेंकरून तिकडचें बंड बहुतएक मोडलें; परंतु त्याची समाप्ती व्हावयास दोन वर्षें लागलीं, तोंपर्यंत बादशाह तेथेंच होता, नंतर विजापुरीं आला तरी त्यांतील कांहीं कामें राहिलीं.

बादशाहाचें लश्कर कर्नाटकप्रांतीं बंड मोडावयास गुंतलें तेणेंकरून शिवाजीला मोठा उपयोग जाला तो असा कीं त्या बादशाहानें जे सरदार शिवाजीवर नेमिले होते त्यांसही त्याला आपल्ये कुमकेस बोलावून बंडाचे बंदोबस्तास न्यावें लागलें तेव्हां शिवाजीनें जाऊन वाडीचे सांवताचा मुलुख घेतला ते वेळेस सांवत पळाले त्यांणीं गोव्यांचे पोर्तुगीस लोकांकडे जाऊन त्यांचा आश्रय केला परंतु शिवाजीनें त्या लोकांस भय दाखविताच त्यांणीं हांकून दिले तेव्हां सावंत शिवाजीला शरण गेले ते समयीं शिवाजीनें त्यांचें देशमुखीचें वेतन त्यांस दिलें त्यापासून ते शिवाजीचे चाकर जाले.

यानंतर शिवाजीनें रेडी व सिंधुदुर्ग, ज्यास माल्वणही ह्मणतात, हे दोन किल्ले बांधिले आणि कुलाबा व सुवर्णदुर्ग व विजेदुर्ग, हे किल्ले नीट केले; आणखी कित्येक लढाऊ गलबतें केलीं तीं पुष्कळ आलीं तेव्हां त्याचें ठेवण्याचें मुख्य ठिकाण कुलाबा, जो मुंबईचे दक्षिणेस बागकोसांवर आहे तो केला; आणि त्यांचे मुख्य सरदार दोन केले, एक दर्यावसागर, आणि एक मैनाक भंडारी ते फार चांचेपणा करीत असत; त्यांच्या उपद्रवास भिऊन गोव्यांचे पोर्तुगीस लोकही त्यांस तोफा वगैरे कित्येक युद्धोपयोगी पदार्थ देऊन त्यांशीं इष्टत्व राखीत. असें जाल्यावर विजापुरचे बादशाहाचा वजीर, अबदुल महंमद, याणें शिवाजीशीं गुप्तपणें, तहाचें बोलणें लाविलें; त्यांत बारीक गोष्टी काय काय होत्या त्या आतां समजत नाहींत; परंतु असें दिसतें कीं त्याचा घटक शिवाजीचा बाप शहाजी असेल; कांकीं ते समयीं शहाजीनें कर्नाटकांतून बादशाहाचा निरोप घेऊन बरोबर पुत्र व्यंकोजी घेतला, आणि मोठ्या समारंभानें शिवाजीचे भेटीस आला. मग दोन महिने राहून बहुत आनंदें करून कित्येक अपूर्व पदार्थ शिवाजी पासून घेऊन, त्याणें बादशाहाचे भेटीस नेले.

त्यापासून शहाजी जीवंत होता, तोंपर्यंत बादशाह आणि शिवाजी यांची परस्परें प्रीति होती.

शहाजीची व शिवाजीची भेट जाली, त्याच सुमारें, शिवाजी राजगडाहून निघून रेडी किल्ल्यावर रहावयास गेला. त्या किल्ल्याचें नाव बदलून रायगड असें दुसरें ठेविलें; तेथें राजकारभाराचे उपयोगी हवेल्या बांधिल्या, आणि मोठी मेहनत करून तो असा सुदृढ केला कीं कोणाचे हातीं लागूं नये.

त्या वेळेस शिवाजीचे मुलखाची मर्यादा इतकी होती, काली यानी पासून गोंवेपर्यंत कोंकणपट्टी; घाटमाथा, भीमेपासून वारणेपर्यंत. त्याचे मुलखाची विशेष रुंदी सुप्यापासून जंजिऱ्यापर्यंत होती. तो धुंडाई करी ह्मणून त्याचें थोडकें राज्य असून त्याजवळ फौज फार असे त्याचें पायदळ पन्नास हजार होतें, आणि सात हजार स्वार होते; असा तो शिवाजी पराक्रमी जाला यास्तव विजापुरकरांनीं त्याशीं इष्टत्व केलें; तेणेंकरून तो रिकामा जाला ह्मणून, त्याचे मनांत आलें कीं आतां मोंगलांशीं युद्ध करावयाची मसलत करावी.

---

सन सोळाशें बासष्टांपासून जालेलीं वर्तमानें मिळून भाग सहावा.

## सहाव्या भागाची अनुक्रमणिका.

शिवाजीनें मोंगलांच्या मुलुख घेण्याचा उद्योग केला. १

ह्मणून त्यावर औरंगजेब बादशाह याणें षाइस्तेखान नामें सरदार याची योजना दिल्लीहून केली. २

त्या षाइस्तेखानानें पुण्यास येऊन, चाकण किल्ला घेतला. ३

त्यापुढें शिवाजीनें काय पराक्रम केला तें प्रकरण. ४

दिल्लीहून बादशाहानें त्या षाइस्तेखानाला माघारें बोलावून सुलतान माजुम नामें दुसरा सरदार दक्षिणेस योजिला. ५

शिवाजीनें सुरत लुटली. ६

शहाजीचा मृत्यु. ७

शिवाजीनें आपल्ये नावास राजा असें पद जोडून आपल्येच नावें शिक्के चालविले. ८

जे लोक मक्केस तीर्थयात्रे करितां जाणार ते शिवाजीचीं लढाऊ गलबतें जाऊन, लुटले. ९

तो शिवाजी अहमदनगर लुटून, माल्वणापाशीं गलबतांवर चढून समुद्रांतून जाऊन गोव्यांचे दक्षिणेस बारशिलोर नामें शहर होतें तें लुटिता जाला. १०

शिवाजी म

शिवाजीस जिंकावयास, राजा जयशिंग व दिलीरखान हे दोघे त्याला नकळतां त्याचे मुलखीं जाऊन पोंचले. ११

त्याणीं कांहीं स्थानें घेतलीं म्हणून शिवाजीला भय प्राप्त जालें. १२

पुरंदर किल्ल्यास घेरा घातला तें वर्तमान. १३

शिवाजी युद्ध सोडून राजा जयशिंग व दिलीरखान, या दोघां सरदारांचा आज्ञानुवर्ती जाला; आणि त्याणें त्या वेळेस कांहीं ठराव करून घेतला. १४

त्या वरून विजापुरकरांचा व त्या सरदारांचा युद्ध प्रसंग घडला. १५

त्या पुढें शिवाजी बादशाहाचे भेटीला दिल्लीस गेला; तेव्हां औरंगजेबानें त्याला बंदींत ठेविला असतां, त्याणें आपला जीव कोणत्या प्रकारें वांचविला. १६

विजापुरकरांशीं जयशिंग लढला त्याचा विशेष प्रकार. १७

त्या जयशिंगानें विजापुरास घेरा घातला असतां त्यांहीं तो मागें हटविला. १८

तो जयशिंग माघारा दिल्लीस जात असतां वाटेनें मृत्यु पावला. १९.

## भाग सहावा.

शिवाजीनें मोंगलांस जिंकावया करितां मोठें सैन्य जमा केलें, त्यांत पायदळाचा सरदार मोरोपंत केला. आणि नेटाजी पोलकर स्वारांचा सरदार केला, त्या मोरोपंतानें पर्जन्यकाळीं जुन्नराचे उत्तरेकडचे कित्येक किल्ले घेतले, मग पाउसकाळ गेल्यानंतर चांगले मार्ग जाल्यावर नेटाजी पालकरानें स्वारांसहित औरंगाबादेपर्यंत मोंगलांचा मुलखांत जाऊन मोठी लुटालुट करून बहुत द्रव्य घेऊन माघारा पुण्यास गेला. तो त्या मुलखांत कोठेही फार वस्ती करीत नसे, आणि वाटेनेंही सरळ मार्ग सोडून वांकडे तिकडे मार्गें करून भलत्या गांवांहून भलतेच गांवीं जावें असें करीत फिरला; तेणेंकरून मोंगलांचे सरदारांस त्याला धरावयास अवकाश सांपडला नाहीं, म्हणून तो ती सर्व लूट घेऊन स्वस्थपणें पुण्यास पोंचला; हें वर्तमान सन सोळाशें बासष्टांत जालें. त्या वेळेस दक्षिणेंत षाइस्तेखान नामें मुसलमान सुभेदार होता, त्यास दिल्लीचा तक्ताधिपतीनें आज्ञा केली कीं शिवाजी फार अमर्याद जाला आहे त्यास तूं त्याचे मुलखीं जाऊन तो मुलुख बलात्कारें करून घे; तेव्हां तो षाइस्तेखान मोठें सैन्य जमा करून औरंगाबादेहून निघाला, त्याणें अहमदनगर व पेरगांव यांवरून येऊन पुणें शहर घेतलें.

यानंतर तो जुन्नर किल्ला घ्यावयास निघाला, त्या वाटेंत लहानसा चाकणचा किल्ला होता तो पाहून त्यास असें वाटलें कीं हा लहान किल्ला

आणि

आणि माझें येवढें मोठें सैन्य आहे, यास्तव एथचे लोक भिऊन मला किल्ला देतील; परंतु तेथचा किल्लेकरी फिर्डोजी नरसाला नामें, मोठा शूर तो सोळा वर्षे तेथचा अधिकार मुख्यत्वें करून करीत होता; तो किल्ला देइना, तेव्हां तो याइस्तेखान आपल्ये सैन्यासुद्धां दोन महिने त्या किल्ल्याशीं लढला, तरी किल्ला आला नाहीं. तेव्हां ईशानी दिशेचे बुर्जाखालीं सुरुंग पाडून तो बुरुज उडविला, उडतांच त्या मोंगलानीं मोठा हल्ला केला, आणि एकाएकीं धांवले, परंतु तो फिर्डोजी व त्याचे लोक मोठे पराक्रमी, ते त्या मोडक्या बुर्जाचे शिखरावर चढून त्याणीं कित्येक वेळा त्या मोंगलांस मागें हटविले; याप्रमाणें युद्ध दिवस मावळे तों पर्यंत जालें, नंतर रात्रीस ते मोंगल लोक लढेनातसे जाले. तेव्हां किल्लेकरी सहज राहिले. मग दुसरे दिवशीं फिर्डोजीनें आपल्या संतोषानें किल्ला दिला. असें त्याचें शौर्य म्हणून षाइस्तेखानानें त्यास आपल्ये चाकरीस ठेवावयासाठीं फार आग्रह केला, परंतु तो राहिना यास्तव त्याचा मोठा संमान करून त्याला जाऊं दिला; तो जाऊन शिवाजीस मिळाला, तेथेंही त्याचा फार मान होउन त्याची योग्यता वाढली.

त्या षाइस्तेखानाला चाकणचा किल्ला घ्यावयास इतके श्रम जाले त्यावरून त्याचे मनांत आलें कीं डोंगरी किल्ले फार उंच आणि मोठे कठीण, ते आमचे हातीं कसे लागतील, म्हणून त्याणें औरंगजेबास लिहून पाठविलें; त्यावरूनही त्याला तें काम मोठें कठीनसें वाटलें नाहीं; कांकीं तो मराठी लोकांस केवळ अप्रयोजक मानी, तथापि त्याणें जोनपुरचा राजा यशवंतशिंग रजपूत, यास षाइस्तेखानाचे कुमकेस सैन्यासहित पाठविला. तो येऊन पोंहचला तोंपर्यंत खानाचें लष्कर पुण्याजवळ उगेंच पडलें होतें. इतक्यांत नेताजी पालकरानें औरंगाबादेजवळचा व अहमदनगराचे सभोंवता मुलुख मारल्यान लुटून जाळून ओस पाडला; परंतु त्याला पहिल्या प्रमाणें नीकळेपणानें दंगा करावयास फावलें नाहीं. कांकीं मोंगलांनीं त्यास पिटून लाविलें, तेव्हां त्याचे कित्येक स्वार पडले आणि त्यालाही जखमा लागल्या. तें मोंगलांचें लश्कर जेव्हां समीप आलें तेव्हां शिवाजी राजगड सोडून सिंहगडास गेला. तेथें त्याला असें वर्तमान कळलें कीं षाइस्तेखान पुण्यामध्यें जी हवेली दादोजी कोंडदेवानें जिजाबाईस रहावयाकरितां बांधलेली आहे, तींत राहिला. तेव्हां त्याला धरून न्यावयाची मसलत करूं लागला; तो षाइस्तेखानही शिवाजीजवळ आहे त्यास तो कोणे वेळेस घात करील अशा संशय धरून पुण्यामध्यें परवानगीखेरीज कोणी मराठा येउं देत नसे. मग कांहीं सिद्धता करून सन सोळाशें त्रेसष्टाचे चवथे महिन्यांत शिवाजी

वाजी पंचवीस मावळे लोक बरोबर घेऊन पुण्यांत मोठ्या युक्तीनें कोणी मराठ्याचें लग्न होत होतें त्याचे सोयऱ्यांत मिसळून शहरांत शिरला. नंतर रात्रीस हळूच जाऊन त्या हवेलीचे माडीवर एक संयपाकघर होतें त्याची एक खिडकी फोडून आंत गेला; तो फोडीत होता तेव्हां त्या षाइस्तेखानाचा बायकांनीं ऐकिलें, त्यांहीं त्यास कळविलें, तें ऐकतांच तो षाइस्तेखान एका खिडकीला दोर लावून त्या दोरावरून उतरूं लागला इतक्यांत शिवाजी आला, त्याणें त्यास तरवारेचा वार केला, तेणें करून त्याचें एक बोट तुटलें आणि तो वांचला. त्याचा पुत्र आबुलफत्तेखान व त्याचे जवळचे कोणी शिपाई होते ते शिवाजीनें जिवें मारून टाकिले. तो असा नाश करून त्या मावळ्या लोकांसहित निघाला; त्याणें वाटेंत कित्येक शिपाई लोक ठेविले होते ते त्यास मिळाले. मग त्या लोकांनीं पुण्यांपासून दोन कोसांवर जाऊन आपणास मोंगलांचें भय नाहीं असें लोकांस कळवाया करितां चुडी पेटवून सिंहगडास गेले. मग दुसरे दिवशीं सकाळीं ते मोंगलांचे स्वार तरवारा चमकावीत, आणि नगारा वाजवीत, त्या किल्ल्याजवळ आले; त्यांस केवळ समीप येऊं दिले; मग एकाएकीं किल्ल्यावरून तोफांचा भडमार करून त्यानां अत्यंत घाबरे करून माघारे हटविले; त्यांत एक कार्टोजी गुजर नामें शिवाजीचा सरदार होता, त्याणें फारच पाठ घेतली, आणि दूर पिटून घालविले.

याशिवाय कांहीं कांहीं पराभव जाल्यानें तो षाइस्तेखान उदासचित्त होऊन, त्याणें केवळ अप्रयोजकपणें ओरंगजेबास पत्र पाठविलें कीं यशवंतशिंग फितुरी, आणि लश्करी लोक कुमार्गवर्ती जाले; त्यावेळेस काश्मीरास जाण्याची सिद्धता करीत होता, तेसमयीं त्याला खानाचा पराभव आणि यशवंतशिंगाशीं व त्या खानाशीं वैमनस्य पडलें असें समजलें, तेव्हां तो ओरंगजेब दिल्लींत होता, त्याणें सुलतान माजम नामें मुसलमान यास दक्षिणेचा सुभेदार करून त्याचे हाताखालीं यशवंतशिंगानें वागावें असें केलें; आणि षाइस्तेखानास बंगाल्याची सुभेदारी सांगीतली.

यानंतर यशवंतशिंगानें सिंहगडास घेरा घालावयाचा अल्पसा उद्योग केला, परंतु तो शेवटास गेला नाहीं. मग ते मोंगल लोक मोठीं मोठीं पतकें चाकणेस व जुनरास ठेवून, मोठें लश्कर घेऊन ओरंगाबादेस गेले.

त्यापुढें शिवाजीनें कालियानीजवळ व दंडाराजपुरापाशीं लश्कर जमा करून असें दाखविलें कि पोर्तुगीस लोकांचीं वसई किल्ला व चौल घेणार परंतु त्याचे मनांत सुरत लुटावयाची होती; तेसमयीं तेथें वकून संपन्नी होती ला शोधास त्याणें बहिर्जी नामें एक जासूद पाठविला होता तो सर्व मराठा

लोकांत

लोकांत प्रसिद्ध होता.

याप्रमाणें तयारी करून शिवाजी निघाला तो उत्तरेकडे जाऊं लागला, ते समयीं लोकांत असें दर्शविलें कीं शिवाजी देवदर्शनार्थ नाशिकास जातो, त्यावरून लोक कल्पना करूं लागले कीं तो उगाच देवदर्शनास जातो आहे. इतक्यांत एकाएकी चार हजार स्वारांसहित तो सुर्तेस जाऊन दाखल जाला तेथे कांहीं मोठीशी अडचण न पडतां, सहा दिवस मनास येईल तसें शहर लुटून सावकाशपणें तें द्रव्य नेऊन. रायगडीं ठेविलें. तेवेळेस ती नवी राजधानी केली होती. तेव्हां सुर्तेंत कित्येक मोठीं मोठीं भांडारें इंग्रेजी लोकांचीं व दच् लोक यांचीं होतीं; तेथे जे लोक होते त्याणीं युद्ध करून तें द्रव्य रक्षिलें. त्याबरोबर आणिकही जवळचे जवळचे लोकांचीं द्रव्यें राखलीं; नाहींतर त्यास अतिधन सांपडलें असतें. तो शिवाजी सुर्तेस दाखल जाला हें वर्तमान सन सोळाशें चौसष्टांचे पहिल्या महिन्याचे पांचव्ये तारखेस घडलें.

शिवाजी जेव्हां सुर्तेहून माघारा रायगडास गेला, तेव्हां त्याला वर्तमान कळलें कीं शहाजी तुंगभद्रेचे कांठीं बेदनुराजवळ बसवे पटन नामें गांव आहे, तेथें शिकारीस गेला असतां दैवगतीनें घोड्यावरून पडून मृत्यु पावला, यानंतर शिवाजी आपल्या बापाची क्रिया होई तों पर्यंत सिंहगडास होता, मग रायगडास जाऊन आपल्ये राज्याचा बंदोबस्त करीत कांहीं महिने तेथे राहिला. तो बंदोबस्त जाल्यावर आपल्या नावास राजा असें पद जोडून आपल्या नावाचा शिक्का चालवूं लागला.

तेच समयीं त्या शिवाजीनें आणखीं कांहीं कृत्य केलें तें असें सन सोळाशें चौसष्टांच्या आठव्या महिन्यांत अहंमदनगरची पेठ लुटून औरंगाबादेचे सभोंवताले मुलखींही धामधूम केली; त्या वेळेस विजापुरकरांचे दोघे सरदार फौजेसहित पन्हाळ्याजवळ राहिले होते त्याणीं शिवाजी फार दूर गेला असें पाहून कोंकण पट्टी जी पूर्वींची त्यांची होती ती घ्यावयाविषयीं भगीरथप्रयत्न केला तेव्हां त्यांचा हातीं कांहीं कांहीं स्थळें लागलीं; तों अकस्मात् शिवाजी मोठें सैन्य घेऊन आला आणि मोठी लढाई करून त्यांचा पराभव केला. त्या शिवाजीचें युद्धादिप्रसंगीं जेथे जेथे प्रयोजन लागे तेथे तेथे तो प्रकट होई; यास्तव त्या वेळेचे लोकांत जर कोणास असें भासलें असलें किं, शिवाजीला एक शरीर नाहीं ते बहुत आहेत. तर तें आश्चर्य नव्हे, असा त्या शिवाजीचा सावधपणा.

त्या शिवाजीचा लढाऊ गलबतांनीं कित्येक दुसरीं गलबतें जिंकून बहुत द्रव्य जमा केलें होतें आणि मोंगल लोकांचा जहाजांवर बसून मकेस जा

णारे कित्येक यात्रेकरू द्रव्यवंत लुटून धरून नेऊन त्यांस बंदींत ठेवून त्यांपासून फार पैका घेऊन सोडून दिले.

पुढें सन सोळाशें सासटांचे पहिल्या महिन्यांत, शिवाजीला असें समजलें किं मोंगलांनीं जें लश्कर जुनरजवळ ठेविलें होतें, तें मोठें वाढविलें; ह्मणून तें आपणास बाधक आहे किं काय, त्या शोधासाठीं सिंहगडास जाऊन राहिला. तेह्मां तें लश्कर आपणास बाधक नाहीं असें जाणून दुसऱ्या कांहीं कार्याविषयीं उद्युक्त जाला, तो असा किं मोंगलांस जिंकावयास जातो असें दाखवून, एकाएकीं फौजेसहित कोंकणांत जाऊन माल्वणापाशीं ती फौज जहाजांवर चढविली; आणि गोव्यांचे दक्षिणेस साठ सत्तर कोसांवर बहुत द्रव्य भरलेलें बारशिलोर नामें शेहर होतें, तेथे जाऊन तें शहर लुटून पुष्कळ द्रव्य घेऊन चार हजार फौजेसहित गोकर्णमहाबळेश्वरीं उतरला. तेथून बहुतेक जहाजें परतविलीं, आणि आपण फौजेसहित, त्या देवाचे दर्शनास गेला. मग त्या फौजेच्या लहान लहान टोळ्या करून मुलखांत गावें लुटावयास पाठविल्या, त्या मुलखीं पेंठांचे गांव बहुत होते ते लुटून फार द्रव्य आणिलें, मग पायवाटेनें आपलें लश्कर पाठवून आपण जहाजावर बसून माघारां रायगडास चालिला. तेह्मां त्या जळमार्गांत मोठा वारा येऊन तें गलबत दक्षिणेस हटविलें; तें कित्येक दिवस कडेस लागलें नाहीं ह्मणून तो फार दुःख पावोन असें समजला किं ही माझी जळमार्गाची पहिलीच खेप यांत मला भवानी अनुकूळ नाहीं, तिचा क्रोधें करूनच मी एवढ्या संकटातें पावलों.

यापुढें त्या शिवाजीवर समुद्रांतल्ये संकटापेक्षां मोठें विघ्न आलें होतें तें असें एक मिरजा राजा जयशिंग रजपूत दुसरा दिलीरखान नामें आफगाण हे दोघे औरंगजेबानें मोठी फौज देऊन, शिवाजीला जिंकावयास पाठविले.

जर कोणी ह्मणेल किं त्याचे इतके अन्याय होईपर्यंत तों परियंत औरंगजेबानें कां पारिपत्य केलें नाहीं तर त्याणें असें समजावें किं तो औरंगजेब कृत्रिमानें तक्ताधिपति जालेला यास्तव त्याला आपलाच बंदोबस्त राखणें अवघड पडलें होतें.

त्यावेळेस औरंगजेबानें ब्रह्मदेशीं लोकांचे बादशाहाशीं कांहीं बोलणें लाविलें होतें तेंही एक निमित्त पारिपत्य नहोण्यास; आणि तो औरंगजेब असें मानी किं, आपण जेह्मां मनावर घेऊं, तेह्मां सगळी दक्षिण एकदांच घेऊं; आणि ह्मणे किं शिवाजी आह्मास डोंगरी उंद्रासमान आहे.

त्या

त्या शिवाजीनें आपणास राजा ह्मणविलें, आणि सुरत लुटली असे कित्येक अन्याय केले असतां. औरंगजेबास ते मोठेसे वाटले नाहीं परंतु त्याणें मकेस जाणारे यात्रेकरु लोक लुटले. त्यावरून तो क्रोधाविष्ट फारच झाला; कांकिं. त्याणें केवळ धार्मिक साधुपणाचें सोंग केलें होतें. ह्मणून त्याला शिवाजीचा पारिपत्यास अवश्यउद्युक्त व्हावें लागलें.

जे दोघे सरदार बरोबर फौज देऊन दक्षिणेंत शिवाजीवर नेमिले होते, ते मोंगलांत मोठे प्रबळ असत; त्याणीं पूर्वी औरंगजेबाची अवज्ञा केली होती. यास्तव त्यांस दूरचे चाकरीवर नेमिलें, आणि त्या कामास पुरेसें सैन्य दिलें नाहीं, कांकिं त्याचा मनोदय त्यांस वाढवायाचा नव्हता, त्याची मसलत अशी असेलसें वाटतें किं दक्षिणेचें राज्य समयास आपल्ये हातीं लागेल असें रक्षावें.

या पुढें औरंगजेबाचे ते दोघे सरदार लश्कर घेऊन निघाले तेव्हां राजा जयशिंग याचा पुत्र रामशिंग यास औरंगजेबानें आपले जवळ ठेवून घेतला; तो बाह्यत्कारें तर, स्नेहानें ठेविला, परंतु मनांत असें होतें किं,त्याचे बापापासून कांहीं अपाय नव्हावा.

ज्या समयीं शिवाजी जहाजावर चढून गोव्यांचे दक्षिणेस जाऊं लागला, तेसमयीं ते औरंगजेबाचे दोघे सरदार लश्करासहित नर्मदेस येऊन पोंहचले; तें वर्तमान शिवाजीला कळलें नाहीं, मग तो जेव्हां माघारां रायगडास आला तेव्हां. त्यास समजलें किं. त्या दोघां सरदारानीं पुण्यांस येऊन पुरंदर किल्ला,आणि सिंहगड यांस घेरा घातला, आणि त्यांचे कित्येक लोक राजगडासही पोंहचले.

तो राजा जयशिंग मोठा विख्यात आणि जाजवळ फौज पुष्कळ,असा अकस्मात आल्यानें शिवाजी फार भ्याला आणि कांहीं मसलत करावयाकरितां आपले मोठे मोठे मानकरी रायगडास बोलाविले; तेही भयपावोन एकचित्त मसलत होईना, मग लोकांमध्यें वर्तमान असें उठलें किं भवानी शिवाजीचे स्वप्नांत येऊन बोलिली किं, हा जयशिंग हिंदूचा राजा आहे यापुढें तुमचें कांहीं चालावयाचें नाहीं, ह्मणून हे सारे एकचित्त होईनात असे रायगडचे दरबारी लोक शंकित झाले, परंतु पुरंदरकर किमपि भ्याले नाहीं. ते मोठया धैर्यानें लढत होते; त्यांत मुख्य किल्लेकरी महाडचा देशमुख बाजीपरभू+नामें होता, त्याजवळ मावळे लोक व हेटकरी लोक होते, त्याणीं फार दिवस किल्ला र-

+ हा बाजी परभू जाणे पूर्वी पन्हाळ्यावर रक्षिलें, तो नव्हे; आणि त्याचा कोणी संबंधीही नव्हे.

क्षिला;

क्षिला; शेवटीं दिलीरखान किल्ल्याचे माचीचा बुर्जाखालीं सुरंग पाडूं लागला असतां, कित्येक वेळा त्या हेटकऱ्यानीं व मावळ्यानीं किल्ल्याबाहेर येऊन छापा घातला तथापि त्या सुरुंग फोडणारानीं आपला अर्थ सिद्धीस नेला. तेव्हां त्या किल्ल्याची माची त्यांचे हातीं लागली आणि ते किल्ल्यावर जाऊं लागले; तेव्हां त्या दिलीरखानाचे लोकांस असें वाटलें किं किल्ला हस्तगत जाला; त्यावरून आपला सावधपणा टाकून निर्भयपणें लुटूं लागले. तेव्हां त्या हेटकरी लोकांनीं गोळ्यांचा भडमार असा केला किं, त्या लोकांस आपले जिवाचे रक्षणार्थ कोठेतरी आश्रय पहावा लागला; त्याच वेळेस मावळे लोकांचा सरदारानें सारे मावळे लोक जमा करून हातीं तरवारा घेऊन त्यांवर एकदांच पडला; तेव्हां मोंगलांचे जे लोक उभे राहून लढले ते मारले गेले; वर्कड पळाले तेव्हां दिलीरखान किल्ल्याखालीं, हत्तीवर बसून आपल्या लोकांचें चातुर्य पहात होता; मग त्याणें आपल्या मोंगलांचा पराभव जाला असें पाहून आपले जवळचे पठाणाचे टोळीस बोलाऊन, त्या पळालेल्या लोकांस धीर देऊन, आपले हातचे धनुष्याचा ठणत्कार करीत ते सारे लोक आपले हत्ती पुढें चालविले; तेव्हां ते जय पावलेले मावळे लोक अत्यंत धैर्ययुक्त होत्साते, असे लढले किं त्या पठाणांतलेही कित्येक शूर मागें हटूं लागले. त्या समयीं तो दिलीरखान याणें आपले हत्तीवरून मावळे लोकांचा सरदार मोठा पराक्रमी असा पाहून, त्याला तीर मारिला तेणेंकरून तो तात्काळ मृत्यु पावला, तेव्हां ते सारे मावळे लोक पाठ दाखवून माघारे थाले किल्ल्यावर पळून गेले, नंतर मोंगल लोक फिरून माचीवर चढले, परंतु त्याणीं पुनः वरून, गोळ्यांचा मार केला तेव्हां ते मातब्यान माघारे हटले. ते समयीं दिलीरखान असें समजला किं या किल्ल्याचे उत्तरेकडून लढाई करणें उपयोगी नाहीं मग त्या किल्लेचा ईशानीकडे वेगळा लहानसा वज्रगड नामें किल्ला आहे, त्याला शिडी लावून वर चढून तेथून त्या किल्ल्याचे थाले किल्ल्यावर तोफांचा मार चालविला; तो कित्येक दिवस पर्यंत तसाच चालला होता. परंतु त्या किल्ल्याचा फारसा नाश जाला नाहीं; आणि पावसामुळें मोंगल लोकांचा उपाय चालेना. असें असतांही पुरंदरकरानीं उदास चित्त होऊन शिवाजीला पत्र पाठविलें किं, आतां आमचा उपाय नाहीं किल्ला शत्रूस देतों. तेव्हां शिवाजीचें उत्तर आलें किं तूर्त देऊं नये, त्यावरून किल्ला त्याणीं तसाच रक्षिला.

जेव्हां जयसिंग शिवाजीचे मुलखांत आला तेव्हां पासूनच शिवाजीनें त्याशीं सल्ल्याचें बोलणें लाविलें होतें तेव्हांपासून तो त्याणें पूर्वी केलेली

हातिमें जाणून, आपले बंदोबस्तांत किमपि उणें पडों देत नव्हता. तें पाहून शिवाजीनें मोंगलांशीं चाकरीचा करार केला होता त्या प्रमाणें सरळभावें करून चालूं लागला. तो सन सोळाशें पांसष्टांचे सातवे महिन्यांत थोडके लोक बरोबर घेऊन जयशिंगाचे लश्करांत पोंहचला. त्याणें त्याचा सन्मान करून भेटून आपले उजव्ये बाजूस बसविला. मग दुसरे दिवशीं शिवाजी पुरंदरास दिलीरख्यानाचे भेटीस गेला तेव्हां जयशिंगानें शिवाजीशीं मसलत करण्याचा विचार त्यास न पुसोन केला म्हणून त्याचे मनांत राग होता यास्तव त्याणें शिवाजीला असें सांगीतलें किं आह्मी किल्ला बलात्कारें करून घेऊं, आणि तथचे लोकांस मारून टाकूं. ते समयीं शिवाजीनें त्याशीं आर्जवाच्या गोष्टी बोलून किल्ल्याची किल्ली त्याचे स्वाधीन केली, तेव्हां असें ठरलें किं मोंगलांचे जितके मुलुख शिवाजी कडे होते ते सारे द्यावे, आणि जे निजामशाई मुलखांतले किल्ले बत्तीस शिवाजी कडे होते त्यांतले वीस मोंगलांस द्यावे, त्यांत पुरंदर व सिंहगड द्यावा; बाकी जे उरले बारा ते शिवाजीनें दिल्लीचा बादशाहापासून चाकरी करितां जहागीर करून घ्यावे. ते वेळेस शिवाजीचा पुत्र संभाजी आठां वर्षांचा होता. त्यास पांच हजारी स्वारांची मनसब द्यावी, असें ठरलें होतें. ते वेळेस जो मुलुख शिवाजी कडे होता, त्याचा वसूल एक लक्ष सुमारें होन येत, आणि तो जयशिंगाचा आश्रयानें मोंगलांचे लश्करांत फिरत असे असा तो अनर्थ शांतीनें पावला.

याशिवाय शिवाजीनें औरंगजेबास विनंती पत्र लिहिलें किं विजापुरचे बादशाहाकडे जो मुलुख आहे, त्यांत मला चौथ पैकीं चवथाई; आणि सरदेशमुखीचा दहावा अंश. द्यावा; हीं दोन्हीं मिळून उत्पन्न सुमार होन पांच लक्ष या प्रमाणें शिवाजीनें औरंगजेबास मागून त्याला स्वामिल वर्षास तीन लक्ष होन द्यावे, असे चाळीस लक्ष पर्यंत भरणा होई तों देत असावें, असें कबूल केलें. या वेळेस औरंगजेबाचे मनांत होतें किं विजापुरचें राज्य बुडवावें. म्हणून त्याणें तें मान्य करून लिहिलें किं एक हप्ता आतांच द्यावा, व विजापुरकरांचा मुलुख घेण्याविषयीं राजा जयशिंग यास फौजेसहित सहाय व्हावें याशिवाय शिवाजीनें जयशिंगाशीं ठरविलें तेंही मान्य केलें.

मग शिवाजी आपले पहिले करारा प्रमाणें दोन हजार स्वार आणि आठ हजार पायदळ बरोबर घेऊन जयशिंगाची कुमक करित होता. त्याणें प्रथम फलटण घेतलें, व त्याचे मावळे लोक यांणीं ताटोरा किल्ला शिडी लावून घेतला.

इकडे विजापुरकर आदिलशाह याणें आपली सेनेची सिद्धता करून

मोंगलानीं

मोंगलांनीं आपले विजापुरीं नयावें म्हणून फार फार बोलणें केलें; आणि पूर्वींचें राहिलेलें जें स्वामित्व संबंधी देणें, तेंही तक्ताधिपतीला द्यावयास सिद्ध जाला; परंतु जयशिंग ऐकेना, तो अकुंठित गतीनें मंगळवेढ्या पर्यंत पोंचला, तेथें विजापुरकरांचे स्वार आले; त्यांची व यांची गांठ पडतांच, ते मोठ्या शौर्यें करून लढले; त्यांत अबदुलमहंमद विजापुरच्या प्रधान तो मुख्य सरदार, त्याचे आज्ञेंत तें लष्कर वागत असे. या खेरीज जे दुसरे सरदार होते ते एक अबदुलकरीम, व बालोलखान, व खवासखान, व शिद्दी अजीस, तो शिद्दीजोहराचा पुत्र; व व्यंकोजी राजा भोंसला, तो शिवाजीच्या भाउबंद होता; आणि रातोजी मान्या, म्हसवाडच्या देशमूख; या दोघांहीं विजापुरकरांचे फौजेंत मराठे स्वारांचें आधिपत्य स्वीकारिलें, याणीं व यांजवळचे मराठ्यां लोकांनीं, त्या लढाईत मोठी शौर्य केली.+

शिवाजी व त्याचा सरदार नेटाजी पालकर या दोघांहीं मोंगलांचा पक्ष स्वीकारिल्यावर, हे आपले पराक्रमें करून मोठे विख्यात जाले; ते असे किं जांची कीर्ति औरंगजेबापाशीं जाउन, तो प्रसन्न जाला; आणि त्याणें शिवाजीला बहुमान सूचक वस्त्रें पाठविलीं. या खेरीज जांमध्यें शिवाजीची बहुत प्रकारें स्तुती, असें एक पत्र पाठविलें.

मग कांहीं दिवसांनीं दुसरें एक पत्र पाठविलें, त्यांत असें लिहिलें, किं तुम्हीं येऊन भेटावें नंतर तुमचा मोठा संमान होईल; आणि तुम्हाला जा वेळेस दक्षिणेस जावयाचें असेल, त्या वेळेस कांहीं अडचण पडणार नाहीं. या पत्राचा मजकूर व जयशिंगाची मसलत यांवरून शिवाजीचा निश्चय जाला, किं दिल्लीस जावें; तेव्हां त्याणें आपले सारे मानकरी लोक यांस सांगून पाठविलें किं सर्वांहीं रायगडीं येऊन हजीर व्हावें; मग ते सारे येऊन हजीर होत, तावत्काळ पर्यंत, त्याणें आपल्या अवघ्यां किल्ल्यांचा बंदोबस्त आपण जाऊन केला.

नंतर रायगडीं येऊन त्याणें सर्व मानकरी यांचे समक्ष मोरो त्रिमल पिंगळे व आबाजी सोनदेव, व आनाजी दत्तो, या तिघांजणास आज्ञा केली कीं, मीं दिल्लीस जाऊन येईन तों पर्यंत, तुम्हीं मुख्यत्वें करून कारभार करावा. मग तो संभाजी नामें पुत्रास बरोबर घेऊन सन सोळाशें सदसष्टांचे तिसरे महिन्यांत दिल्लीस जावयाकरितां निघाला. त्याचे बरोबर पांचशें स्वार व एक हजार मावळे लोक होते; मग तो दिल्ली जवळ गेला तेव्हां औरंगजेबानें ग-

---

\+ त्या लढाई वरून विजापुरकरानें रातोजी मान्यास कांहीं इनाम मुलुख जहागीर दिला, त्याची सनद अद्यापि त्यांचे वंश्यांजवळ आहे.

मशिंग

मशिंगराजा जयशिंगाचा पुत्र व दुसरा एक लहानसा सरदार, असे दोघे त्याचे भेटीस सामोरे पाठविले, आपण किंवा आपले जवळचा कोणी मोठा माणूस न पाठविला. हा अपमान शिवाजी मनांत समजला परंतु सहन केलें. यापुढें शिवाजीनें जेव्हां दरबारांत बादशाहास नजर दिली, तेव्हां त्यास पांचहजार स्वारांचा मनसबदारांचे पंगतींत बसविला, तेव्हां शिवाजीला राग आटपेना. यास्तव जेत्या ओळींत बसलेले होते लोक, त्यांशीं आपली खिन्नता समजेसें, कांहीं बोलिला; त्यांहीं नें बादशाहास कळविलें.. त्यावरून दरबारी लोक आपआपले घरीं गेल्यावर, बादशाहयाचा असा निरोप गेला किं. शिवाजीनें फिरून दरबारीं येऊं नये. तेव्हां शिवाजीचे मनांत कांहीं भय उत्पन्न जालें, त्याणें औरंगजेबास विनंती केली किं. मीं स्वामीची सेवा कशी केली, व आज्ञेप्रमाणें निघोन आलों कसा, तें सर्व ध्यानांत आणावें; आणि जर माझे चाकरीचें येथें प्रयोजन नसलें, तर माझे मुलखीं मला माघारें जावयास आज्ञा द्यावी. मीं व माझे बरोबरचे लोक यांस एथचें पाणी मानत नाहीं. त्यावरून औरंगजेब कांहीं स्पष्ट उत्तर देईना, आणि शहरचा कोंतवालास सांगीतलें न किं शिवाजी जा हवेलींत आहे, ती सभोंवती चवकी बशीव आणि जर तो कुठे वाडया बाहेर जाऊं लागला, तर तो आपले हातचा सुटून जाईना, असा बंदोबस्त राख. त्याणें याप्रमाणें केलें तेव्हां. शिवाजीनें पुनः विनंती केली किं, हा जुलूम मजवर गुदरला; त्यास जे माझे बरोबरचे लोक आहेत, यांस तरी माघारें जावयास आज्ञा द्यावी. ही विनंती औरंगजेबानें तात्काळ मानिली, आणि लोक जाऊं दिले. मग आतां शिवाजी पक्का हातीं लागला, असें मनांत समजून. मोठा हर्ष पावला; शिवाजीनें तर आपल्ये मसलती करितां तसें केलें. त्याचे लोक गेल्यावर तो तेथचे दरबारी मोठे मोठे मान करी लोक यांचे घरोघर नित्य नित्य जाऊन त्यांस कित्येक पदार्थ भेटी देऊन त्यांशीं स्नेह पाडूं लागला; मग जेव्हां बहुत स्नेही जाले, तेव्हां, आपले शरीरास समाधान नाहीं असें सोंग करून थोडकेच दिवसांत केवळ मरणोन्मुख आल्या सारिखें दाखविलें. पुढें थोडकेंसें समाधान जालेंसें करून दाखविलें. आणि कित्येक ब्राह्मणास धर्म केला; नंतर कित्येकां वैद्यांस नजरा पाठविल्या; याखेरीज आपले इष्ट यांचे घरोघर व कित्येक देवस्थानी व ब्राह्मण व फकीर, वगैरे कित्येक गरीब लोक, यांस मिठाई वगैरे पदार्थ द्यावयाकरितां मोठे मोठे बुरडी पेटारे भरून पाठवूं लागला; असें कित्येक दिवस चालविलें. मग एके दिवशीं आपला पुत्र व आपण दोघे दोहों पेटाऱ्यांत निजून, माणसांकडून ते पेटारे शहरा बाहेर, एकीकडे आपले संकेत स्थळीं नेववून. तिथे बाहेर निघोन दोघे एका घोडयावर बसून पळाले; ते दुसरे दिवशीं मथुरेस जाऊन

रून पोंहचले, तेथें कोणी दक्षणी ब्राह्मणाचे घरीं पुत्रास ठेवून, आपण आपले बरोबरच्या लोकांसहित गोसाव्यांचा वेष धरून, तीर्थें करीत करीत, माघारा दक्षिणेस गेला. तो शिवाजी सासष्टांचे बाराव्या महिन्यांत रायगडीं पोंहचला.

शिवाजी दिल्लीहून माघारा आपल्या मुलखीं रायगडास आला, तेव्हां त्याणें पाहिलें किं, सर्व गोष्टी आपणास अनुकूळ आहेत; त्या अशा, जयशिंगानें विजापुरास वेढा घातला होता, तो तेथें जय पावला नाहीं, व त्या मोंगल लोकांचें काम फार धिमें यास्तव गोवळकोंडच्या बादशाहानें आपला एक मोठा सरदार फौजेसहित विजापुरकरांचे साहाय्यास पाठविला; मग तो जयशिंग पुरंदर व सिंहगड इत्यादि किल्ल्यांतून आपले लोक ठेवून, माघारा दिल्लीस गेला. हें वर्तमान सन सोळाशें सदसष्टांत घडलें. तो जयशिंग गेल्यावर मोरोत्रिमळ पिंगळे याणीं ते मोंगल हांकून दिले; आणि शिवाजी कोंकणांत आल्यावर, थोडक्याच दिवसांत कालियानी परगणा बहुतेक हस्तगत जाला.

औरंगजेब शिवाजी पळून गेला ह्मणून फार खिन्न जाला, परंतु आपले मनांत शिवाजीचा मोठा संमान करून पाठवावयाचा होता; असें दाखवून, जयशिंगाचा पुत्र रामशिंग शिवाजीला पळून जाण्यास अनुकूळ होता त्याला दरबार मना केलें, आणि त्याचा बाप जयशिंग पराभव पावला या निमित्तें करून माघारा दिल्लीस बोलाविला, नंतर त्या कामावर सुलतान माजुम नामें दुसरा सरदार नेमिला; तो सुलतान पूर्वीं दक्षिणेस पाठविला असतां, जेव्हां जयशिंग नेमिला, तेव्हां त्यास माघारा बोलावून नेला; तो जयशिंग याचा पराभव जाल्यावर पुनः पाठविला. तेव्हां तो दक्षिणेहुन माघारा दिल्लीस येत असतां वाटेसच त्यास असमाधान होऊन मृत्यु पावला.

## सन सोळाशें सदसष्टांपासून सोळाशें एकुणहात्तर पर्यंत जालेलीं वर्तमानें मिळून भाग सातवा.

### सातव्या भागाची अनुक्रमणिका.


सुलतान माजुम आणि जशवंतशिंग यांचे स्वभावाचा प्रकार. १

त्याचे योगें करून शिवाजीस बादशाहापासून कांहीं उपकार घडला. २

विजापुरकरांशीं आणि मोंगलांशीं सल्ला जाला. ३

विजापुरकर व गोवळकोंडकर याणीं वर्षास शिवाजीला खंडणी द्यावी असा नेम ठरला. ४

गोवें आणि जंजिरा यांस घ्यावयास शिवाजी गेला परंतु जय पावला नाहीं.

नाहीं. ५

शिवाजी आपले मुलखीं वसुलाचा व लश्कराचा बंदोबस्त करीत असतां लोक नानाप्रकारचा अटकळी करीत होते तें. ६

त्याणें नवे कायदे चालविले तो प्रकार. ७

त्याचेजवळ राज्यकारभार चालविणारे कोण कोण कसे कसे होते तें प्रकरण. ८

## भाग सातवा.

दक्षिणेच्या अधिकारी सुलतान माजुम नामें यास औरंगजेबानें पुनः केला, त्याचे बरोबर दुसरा जशवंतशिंग आला ह्मणून, शिवाजी आनंद पावला, कांकिं दिल्लीमध्यें त्याचें त्याशीं इष्टत्व पडलें होतें. त्या जशवंत शिंगास लोक थोर कुलीन ह्मणत होते. परंतु तो कृपण होता, तो गुण रजपुत लोकांमध्यें बहुधा असतो. तो हिंदूंचे धर्मास फार मानीतअसे. औरंगजेबाचा विश्वास त्यावर नव्हता; कांकिं तो पूर्वी त्यास प्रतिकूळ होता.

सुलतान माजुम तर, बहुतप्रकारें उत्तम गुणवंत होता, पण मोठा उधळा आणि अत्यंत विषयी असे; तो कांहीं कार्याविषयीं वश करून घ्यावयास केवळ सुलभ असे; तो बहुधा जशवंतशिंगाचें बोलणें मानीत होता.

या दोघांचा स्वभाव पाहून शिवाजी असें समजला किं, यांनां कांहीं द्रव्य दिलें असतां, आपलें कार्य सिद्धीस जाईल. ह्मणून त्याणें कित्येक द्रव्य खर्चून सुलतान माजुमास विनंती केली किं, दिल्लीचे बादशाहाचे चाकरीविषयीं माझें मन निष्कपट आहे; त्यास, तुह्मी मजविषयीं बादशाहास विनंती करून मजवर पहिल्या प्रमाणें त्याची कृपा होई असें करावें. तेव्हां सुलतान माजुमानें बादशाहास कांहीं लिहिलें, त्यावरून शिवाजीला राजा असें पद प्राप्त जालें; आणि पुणें व चाकण व सुपें परगणा, हे त्यास मिळाले. यांतील पुरंदर व सिंहगड हे औरंगजेबानें आपल्यास ठेविले, त्या शिवाजीचा पुत्र संभाजी यास पूर्वी देऊं केलेली मनसब दिली; आणि वराडांत एक जाहागीर खेरीज दिली.

त्या औरंगजेबाची एवढी कृपा होण्याचें कारण असें दिसतें किं, शिवाजी कधींतरी दिल्लीस येईल मग दगा करावा असें त्याचे मनांत असेल; कांकिं त्याचा पहिल्यापासून असा दुष्ट स्वभाव होताच.

सन सोळाशें अडसष्टांमध्यें, विजापुरकरांचा वकील आग्रें शहरांत येऊन औरंगजेब आणि अली आदिलशाह विजापुरकर, यांशीं तह जाला. इतःपर युद्ध नव्हावें ह्मणून विजापुरकरानें औरंगजेबास सोलापुर परगणा, व कि-

ल्ला

ला, यांचा वसूल एकलक्ष ऐशीं हजार होन येत होता तो देऊं केला. त्याच वेळे-
स जशवंतशिंगाचे आश्रयानें शिवाजी विजापुरकरांकडे चौत व देशमुखी मागूं
लागला; तेव्हां त्याचे बदल दरसाल तीनलक्ष रुपये गुप्तपणें द्यावयाचे केले. हें
वर्तमान लोकांत प्रसिद्ध होऊं दिलें नाहीं; कां कि पूर्वी मुसलमानांनीं हिंदू जिंकि-
ले होते, त्यांस खंडणी देणें, ह्मणजे त्या लोकांस केवळ लज्जास्पद होई. गोंव-
ळकोंडच्या बादशाह तोही अशाच कांहीं निमित्तें करून, शिवाजीला वर्षास पां-
च लक्ष रुपये देऊं लागला.

त्यानंतर शिवाजीचे मनांत आलें किं गोवें एकाएकीं छापा घालून घ्या-
वें; परंतु ते पोर्तुगीस लोक त्याची मसलत समजून सावध जाले, मग त्याणें
जंजिरा घ्यावयाचा उद्योग केला, तो बहुत युद्ध जालें तरी हातीं लागला नाहीं.

मग शिवाजी दोन वर्षे पर्यंत रिकामा होता, तेव्हां कित्येक लोक कल्प-
ना करूं लागले किं याणें एवढा लौकिक मेळवलेला जो, तो आतां व्यर्थ जाईल.
कां किं हा अगदीं रिकामा बसला ह्मणून. शिवाजी तर उगाच राहिला नव्हता,
तो आपले राज्याचे व लश्कराचे वर्तणुकेचे कायदे कांहीं नवे नवे करून, कांहीं
कांहीं जुने मोडून, चौकशी करीत होता. त्या कायद्यांचा प्रकार लिहिला पा-
हिजे, कां किं त्यापुढें जे मराठे राजे जाले, ते त्या कायद्याप्रमाणें चालत होते.

शिवाजीचा प्राबल्यास मूळ मावळे व हेटकरी लोक, ते पायदळ; त्यांचे
योगेंकरून मोठे मोठे किल्ले घेऊन, मग मुलुख लुटून तें द्रव्य त्या घेतलेल्या
किल्ल्यांवर नेऊन ठेविता जाला. इतके दिवस त्याणें स्वार फारसे बाळगले
नव्हते, आणि यापूर्वी त्याचा लौकिकही मोठा जाला नव्हता; तो यापुढें फार-
च वहाडला.

शिवाजीचे मावळे लोक घाटमाथां रहात होते, व हेटकरी कोंकणांत रा-
हात असत. ते हत्यारें वगैरे सरंजाम आपला बाळगीत असत, परंतु दारू
गोळी वगैरे सरकारचें मागोन घेत. त्यांचीं वस्त्रें एकसारिखीं नव्हतीं. बहु-
धा ते लोक मल्लासारिखे मांडचोळणें घालून कांचे भिडवीत; आणि डोकीस
पागोटें सर्वांचा असे, आणखी कित्येक अंगरखे घालीत, आणि कित्येक धोत्रें
पांघरत. त्यांची हत्यारें तरवार व ढाल व बंदूक, याप्रमाणें असतां, दहामध्यें
एक तीरकमाण बाळगी; कां किं रात्रीस बंदुकेचा बारानें लोक सावध न व्हावे
याकरितां. ते हेटकरी लोक बंदुकेच्या कामांत मोठे निपुण होते; परंतु त्यांस
मावळे लोकांप्रमाणें तरवार घेऊन दुसऱ्याचे अंगाशीं अंग भिडवून, युद्ध करतां
येत नव्हतें. हेटकरी लोक व मावळे लोक यांस जसें मोठे मोठे कडे चढून जा-
तां येत होतें, तसें इतर लोकांस येत नव्हतें. त्यांमध्यें दहा लोकांत एक ना-

ईक

ईक. पनासांस एक ह्वालदार. शंभरांस एक जुमलेदार, हजारांस, एक हजारी नामें. सरदार असे, त्याहून मोठा पांचहजारी असे. त्यापेक्षां सरनोबत नामें मुख्य असे.

त्याचे स्वारांत दोन भेद होते, एक बारगीर. एक शिलेदार; बारगीर सरकारचे घोड्यावर बसणारे, आणि शिलेदार आपल्या घोड्यावर बसणारे होते; त्यांत बारगीर यांचे समुदायांस पागा अशीं नावें ठेवून, युद्ध प्रसंगीं शिलेदारांचे वर्तणुकेचा बंदोबस्तास, त्या पागांची नेमणूक करीत असे.

मराठे स्वार यांचीं वस्त्रें अशीं; चोळणा, व रूंदार अंगरखा, व कंबरबंध. त्यांतच तरवार बळकट बांधित; आणि पागोट्याचे वेढे डोकीवरून हनवटी खाल्हून घेऊन. कान सुद्धां झांकून मोठ्या बंदोबस्तानें बांधीत; आणि मिशा मोठमोठ्या राखीत. बहुत करून त्या लोकांचें हत्यार भाला, त्याविषयीं ते बहुत कुशळ असत, आणि कित्येक ढाल तरवारवाले व कित्येक बंदुकवाले होते. त्यांत पंचविसां स्वारांस एक हवलदार असे, आणि सवाशें स्वारांस एक जुमलेदार; पांचां जुमलेदारांस एक सुभेदार, दरसुभेदारास एक एक हिशेब लिहिणार व एक एक त्या हिशेबाची चोकशी करणारा शिवाजीनें ठेवून दिलेला असे; ते लिहिणारे व चोकशी करणारे ब्राह्मण किंवा परभू असत. दहा सुभेदारांस एक मुख्य सरदार, त्याचें नाव पांच हजारी असे. त्याचेजवळ सरकारचा ठेवणाईत, हिशेबाची चोकशी करणारा. मुजुमदार नामें असे. तो ब्राह्मण, आणि त्याचे हाताखालीं आमीन नामें सरकारचा परभू असे. या खेरीज कित्येक सरदारांजवळ कित्येक सरकारी कारकून व कित्येक त्या सरदारांचे खासगीचे कारकून असेत. याशिवाय सर्व मोठे मोठे सरदार यांजवळ गुप्तरूपें करून बाहेरची बातमी कळविणारे जासूद होते; शिवाजीजवळ एक बहिरजी नामें जासूद होता; लोक कल्पना करीत कि भवानी येऊन शिवाजीला अत्यंत गुप्त वर्तमान कळवित्ये, त्याचें कारण तो बहिरजी जासूद होता. सरनोबत दोन असेत. एक स्वारांचा असे, एक पायदळाचा असे.

जेव्हां शिवाजी फौज ठेवूं लागला तेव्हां कोणी आपला जुना चाकर आमीन घेतल्यावांचून नवा ठेवीत नसे. कोणास कांहीं लूट किंवा शत्रूच्या कांहीं जिन्नस सांपडला असतां त्याणें तो जिन्नस सरकारांत नेऊन द्यावा; मग त्याचे योग्यते प्रमाणें त्यास कांहीं भाग देऊन त्याची प्रशंसा करावी अशी चाल होती. शिवाजीनें शत्रूस लुटावयाची मनाई केली नाहीं, परंतु गाई व शेतकरी लोक व बायका यांस उपद्रव करूं नये; आणि मुसलमान लोक व त्यांचे पक्षपाती कोणी द्रव्यवंत हिंदु लोक यांस धरून नेऊन पैका घेऊन सोडावे असें होतें. शिवा-

जी

जीचे लष्करांत कोणी बायको बरोबर नेऊं नये, जर कोणी नेली तर त्याचें डोकें मारावें असा नेम होता. कोणी शिपाई शौर्य करून लढत असून जर त्यास मार लागला तर, त्याला नावारस चढवून कांहीं बक्षीस देत असे. तो शिवाजी बहुधा कोणास जहागीर देत नसे कांकिं आपल्या मुलखांत जहागीरदार फार नवाढावे असें त्याचे मनांत असे. सर्व किल्ल्यांस ब्राह्मण व रामोशी व महार व मांग हे शिबंदी खेरीज असेत; त्यांनां किल्ल्याचे समोंवतीं वेतनें दिलीं असत. त्यांणीं किल्ल्याची चौकशी राखावी असें होतें, जे ब्राह्मण होते त्यांस सबनीस ह्मणत; त्यांणीं तेथील धान्यादिकाचा बंदोबस्त राखावा; आणि किल्ल्यांत रहावें. इतर जे रामोशी व महार आणि मांग यांस गडकरी ह्मणत; त्यांणीं बाहेर राहून बाहेरची चौकशी करावी; ते गडकरी किल्ला ह्मणजे केवळ आपली माता असें मानीत असत.

प्रतिवर्षी दसऱ्यास शिवाजी मोठा समारंभ करी, त्या वेळेस आपल्ये सर्व लष्कराची हजिरी घेत असे, घोडें व माणूस व शस्त्रें यांचा खुणा लिहीत असे; हजीरी जाल्यावर ते लोक बहुधा स्वारीस जात असत.

प्रतिवर्षी सरकारांत हिशेबाची चौकशी होऊन कोणाचें देणें राहिलें असल्यास, प्रांतांतील वसूल जमा करणारास त्याचा पैका द्यावयास आज्ञा देई परंतु गांवांस उपद्रव करीत नसे.

शिवाजीनें जे वसुलाचे कायदे केले त्यांस मूळ दादोजी कोंडदेवानें जो नेम ठरविला होता तें. तो दर वर्षास पिकाची पहाणी करून वसूल ठरवित असे, असें वाटतें किं जमिनीचें उत्पन्न त्यांतील तीन भाग रैतेस उरवून, दोन सरकारानें घ्यावे असें होतें, कधीं नवा मुलुख शिवाजीचे हातीं लागला असतां, लष्करादि संबंधी खर्च घ्यावयाची चाल असल्यास ती मोडी. आणि मखलानें वसूल घेणें आढळलें असतां तेंही मना करी.

त्याचे मुलखीं सर्व देशमुख व देशपांडे यांहीं आपला हक्क जो घेणें, तो त्यांणीं सरकारची आज्ञा जाल्यावांचून घेऊं नये असें होतें.

शिवाजीचे कित्येक मानकरी लोक मसलत करीत किं, लष्करास खर्चाची नेमणूक परभारां गांव गंना करावी; परंतु तें शिवाजीचा मनास येइना कांकिं ते लोक स्वयें सत्ता करूं लागतील, आणि रैतेस उपद्रव होईल. त्या शिवाजीनें विजापुरचे मुलखांत अशी अवस्था पाहिली होती; याच विषयीं त्याणें जेथें आपली फौज ठेवायास योग्य नाहीं, असा किल्ला अथवा भुंडकोट पाहिला असतां, खणून टाकी. त्याणें घेतलेल्या नव्या मुलखीं जें जें देवस्थानाकडे पूर्वी कोणी दिलेलें तें तें नसत तसें चालविलें.

शिवाजीनें

शिवाजीनें वसुलाचे कायदे फार सुलभ केले म्हणून, मराठे लोक त्याची प्रशंसा करीत, आणि या योगें प्रजेस सुख होतें असें म्हणत; परंतु त्याचें कर्म येवढें वर्णनीय नव्हतें. कां कीं तो स्वयें पहाणी करावयास रिकामा नव्हता; त्यामुळें त्याचे कायदे चांगले असले तरी लोकांस सुख होणें दुर्लभ. त्या वेळेचा एक मुसलमान बखर लिहिणार होता, आणि एक इंग्रेज मुलुख पाहावयाकरितां गेला होता; त्याचा लेखा वरून असें वाटतें दुसऱ्या मुलखापेक्षां, शिवाजीचे मुलखीं प्रजा बेजार होती. आणखी त्या मुसलमानाचेही बखर लिहिण्यांत असें किं, शिवाजी मोठा नाशक. त्या शिवाजीचा हातीं जे विजापुरचे मुलुख लागले होते, त्यांतील पहिली मखल्याची चाल मोडून प्रतिवर्षी पहाणी करून वसूल घेतल्या मुळें, तेथचे प्रजेस मात्र, हितावह पडलें असेल.

शिवाजीचा राज्यांत मुलुखसंबंधें किंवा द्रव्य संबंधें, फिर्यादेची पंचाईत करीत. इतर न्याय बहुधा शास्त्ररीती पाळून करीत; आणि पूर्वीं मुसलमानानीं आपले कुराणांतली जी रीति लाविली होती, तीही थोडीशी घेत; आणि मनसोबी करीत. या दिवसांत हिंदूचे शास्त्रास आणि मराठे लोकांचे रीतीस अंतर दिसतें, त्याचें कारण हेंच असेल.

शिवाजीनें आपला राज्य कारभार चालवाया करितां, आठ प्रधान केले. त्यांचीं नामें आणि कार्यें, यांचा विस्तार असा. पहिला प्रधान पेशवा, तो सर्व श्रेष्ठ; त्याणें सर्व चौकशी करावी. दुसरा, मजीमदार, त्याणें सर्व जमाबंदी करून, खर्चाची चौकशी राखावी. तिसरा सुर्णीस त्याणें दप्तराचें रक्षण करावें, आणि स्मरणार्थ सर्व संदांचा नकला सरकारचे वहीवर लिहाव्या. चवथा वांकनीस, त्याचें काम खासगी शिबंदी व खासगी दप्तर यांची सर्व बंदोबस्ती राखावी. पांचवा सरनोबत तो लश्करांत मुख्य, त्याणें मुख्यपणानें लश्करांत काम करावें. साहावा डबीर त्याणें पर राज्याची चौकशी करीत असावें, आणि परकी राजाशीं कांहीं काम पडलें असतां तें त्याणें करावें; व कोणी बाहेरचा वकील आला तर त्याशींही बोलणें त्याणेंच करावें. सातवा न्यायाधीश तो न्याय करणारा. आठवा न्यायशास्त्री, त्याणें शास्त्रार्थसंबंधी कामें करावीं. शिवाजीचे वेळचीं या आठां प्रधानांचीं नावें; पेशवे मोरो त्रिंमल पिंगळे. मजीमदार आबाजी सोनदेव, कालियानी परगण्याचा सुभेदार. सुरणीस आनाजी दत्तो; वांकनीस दत्ताजी पंत. सरनोबत दोघे, एक स्वारांचा प्रतापराव गुजर. दुसरा पायदळाचा येसजी कंक. डबीर सोमनाथ पंत. न्यायाधीश दोघे, एक निराजी रावजी, दुसरा गोमाजी नाईक. न्यायशास्त्री शंभुपाध्ये पहिले, आणि त्याचे पाठी मागें रघुनाथ पंत झाले; या अष्टप्रधानांतले न्यायाधीश व न्यायशास्त्री या दोघां वांचून, बरकडांस शिवा

जीचा

जीचा लश्करांत अधिकार होते, त्यामुळें त्यांस वकुधा आपआपले अधिकार सं-भाळावयास फावत नव्हतें; यास्तव ते आपआपला एकेक कारकून ठेवून कामें चालवीत होते. त्यांत ज्याला मोर्तब ठोकावयाची आज्ञा होती, त्याला मुतालिक ह्मणत. यांचीं व्यवहारी नावें. अशीं कारभारी व दिवाण, फडनीस, सबनीस, कारखाननीस, चिटनीस, जामदार, पोतनीस, यांत फडणीस याणें खर्चाची चौकशी करावी. सबनीस याणें दप्तराची चौकशी राखावी. कारखाननीस-याणें किल्ल्याचे व लश्कराचे उपयोगी अन्नादि सर्व पदार्थांचा बंदोबस्त राखावा. चिटनीस याणें कागदपत्र आलेलें व कुठें पाठवावयाचें याचा बंदोबस्त राखा-वा. जामदार याणें नाण्यावांचून सर्व प्रकारचें जवाहीर व अळंकार संभाळावे. पोतनीस याणें पैका संभाळावा.

शिवाजी आपले जवळ निरंतर फडनीस, व जामदार, व चिटनीस, व फा-रशी कागदपत्र वाचणारा फारसनीस, असे ठेवीत असे, त्यांत जो चिटनीस, तो बाळाजी आनाजी नामें परभू होता. त्याला शिवाजीनें एकवेळ मुंबईस कांहीं कामांसाठीं इंग्रेजी सरकारांत पाठविला होता, तेव्हां तो साहेब लोकांस मोठा च-तुरसा वाटला.

फडनीस बाळकृष्ण पंत हणमंते, तो शहाजीचा मुख्य कारभाऱ्याचा भा-ऊबंद होता.

ज्योत्यानाईक पुंडे, चांभारगोंदेकर जांजवळ शहाजीचे लग्नाचे पूर्वीं, मा-लोजी भोंसल्याचा पैका होता, त्यांचा नातू तो शिवाजीचे जवळचा जामदार.

सन सोळाशें सत्तरां पासून सत्त्याहात्तर पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग आठवा.

## अनुक्रमणिका.

पूर्वी असें वाटत होतें कि आतां दक्षिण देशीं बहुत दिवस पर्यंत उपद्रव होणार नाहीं परंतु त्यास अंतर पडलें.

तानाजी मालुसरा याणें सिंहगड घेतला आणि त्याच वेळेस तेथेंच मृत्यु पावला.

आणखी कित्येक किल्ले शिवाजीचे हस्तगत झाले.

जंजिरा शिवाजीनें घेतलाच असता, परंतु तिघां शिद्दीं मुळें, त्याचे हातीं लागला नाहीं.

ते

ते शिद्दी आपला मुलुख मोंगलांस देऊन, त्यांचे चाकरीस राहिले.

शिवाजी सुरत लुटून माघारा गेला त्यावेळेस त्याला धराययाकरितां, मोंगल जे गेले ते त्याणें जिंकिले.

शिवाजीनें खानदेश लुटला आणि वसुलाची चवथाई प्रतिवर्षी घेत जावी असें ठरविलें. व औंडा पाटा व साल्हेर हे किल्ले घेतले.

मोंगललोक शिवाजीस जिंकावयाचा आळस किंनिमित्त करीत होते तें.

मोंगलांचा राज्यांतून दक्षिणदेशाच्या कांहीं नवा बंदोबस्त झाला तो.

मराठेलोक व मोंगल लोक यांचे युद्धांत मराठे लोक जय पाऊन मोठे विख्यात झाले तें प्रकरण.

शिवाजीचें आणि इंग्रेजांचें कांहीं बोलणें झालें तें.

शिवाजीनें गोंवळकोंडयामध्यें स्वारी केली असतां, त्याचें पाठीमागें जंजिऱ्याहून आणि सुर्तेहून लढाऊ गलबतें येऊन समुद्रतीरचे त्याचे गांव लुटले.

विजापुरच्या बादशाह अल्ली आदिलशाह याचा मृत्यु.

शिवाजीनें हुबळी शहर लुटलें; आणि विजापुरचे सरकाराशीं युद्ध केलें.

शिवाजी आणि प्रतापराव यांमध्यें कांहीं वैमनस्य पडलें.

शिवाजीनें कांहीं क्रोधेंकरून निरोप पाठविला म्हणून तो प्रतापराव विजापुरचे लश्कराशीं अविचारानें युद्ध करून मृत्यु पावला.

त्या युद्धांत मराठे सरदार कोण कोण होते त्याणीं आपलें लश्कर वांचवून विजापुरकरांच्या लश्कराचा पराभव केला; आणि शिवाजीनें त्यांचा संमान केला.

शिवाजीला राज्याभिषेक झाला.

त्याणें इंग्रेजलोकांशीं तह केला, व कित्येक नवे किल्ले बांधिले.

त्या शिवाजीचा शरीरीं सातारयामध्यें समाधान नाहींसें झालें.

## भाग आठवा.

सन सोळाशें सत्तर सुमारें, असें दिसत होतें कीं इतःपर दक्षिणेंत बहुत दिवस गडबड होणार नाहीं; कांकीं विजापुरकर व मोंगल यांचा सल्ला झाला, आणि शिवाजीस जें मिळालें आहे तितक्यानेंच तृप्ति होऊन तो स्वस्थ राहील; हा एक सुमार. असें असतां औरंगजेबास समजलें कीं आपला पुत्र सुलतान माजुम जो दक्षिणेच्या मुख्य अधिकारी केला तो व जशवंतशिंग हे शिवाजीपासून कांहीं पैका घेतात; यावरून त्याणें शिवाजी कांहीं घात करील, असें समजून पुत्रास लिहिलें कीं शिवाजी व त्याचे कित्येक सरदार व मु-

रव्य

ख्य कारभारी धरून अवश्य कैद करावे.

तेव्हां शिवाजी औरंगजेबाचा दीर्घद्वेष समजून, पुनः पहिल्या प्रमाणें सावध पणानें वागूं लागला. ते समयीं त्याचे मनांत आलें कीं पहिल्यानें पुरंदर आणि सिंहगड हे दोन्ही किल्ले घ्यावे. कांकिं पुणें आणि चाकणेस आपली येण्याजाण्याची सोय नाहीं. त्या वेळेस सिंहगडचा सरदार, उदेभान नामें होता, त्याचे हाताखालीं निवडक रजपुत लोक होते, आणि तो मोठा विख्यात शूर होता; आणखी तो किल्ला फार अवघड, ह्मणून लोक असें समजत किं या किल्ल्याचा घेण्याचा उद्योग व्यर्थ आहे. परंतु तो किल्ला घ्यावयास सुलभ होण्याचें कारण हेंच कीं किल्ला सुदृढ ह्मणून ते किल्लेकरी असावध होते; यावरून शिवाजीनें तानाजी मालुसरे सरदार याशीं मसलत केली, कीं छापा घालून किल्ला घ्यावा; तेव्हां असें ठरलें कीं, तानाजी मालुसरे याणीं आपला कनिष्ठ बंधू व एक हजार मावळे लोक बरोबर घेऊन त्या कामास जावें.

तो सिंहगड सह्याद्रि पर्वताचा पूर्वेचे आंगीं पुरंदर किल्याचा डोंगराचें टोंक लागलें आहे. तेथें आहे. त्याचे दक्षिणेस व उत्तरेस, सह्याद्रीचा संबंध नाहीं, अर्ध अर्ध कोस उंच कडा तुटलेला आहे. त्यास पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे, मोटे मोटे पर्वत यांचा धाकट्या धाकट्या टेंकड्या लागलेल्या आहेत; तो अर्ध कोस चढून गेल्यावर, केवळ भिंती प्रमाणें सभोंवता सारखा तीस तीस हात पर्यंत उंच असा काळा दगड आहे. त्यावर चिरेबंदी भिंत आणि जागोजाग बुरूज आहेत. त्यांचे आंत किल्ल्यावरची जागा त्रिकोण आहे, तीचे सभोंवता भिंतीच्या घेर कोश सवा कोश सुमारें आहे. अशा अवघड किल्ल्यांत दरवाजावांचून प्रवेश होणार नाहींसें दिसतें. त्या किल्ल्या वरून पूर्वेकडे पहावें तों, तेथें एक लहानसें लवण आहे; त्यांतून नीरा नदी चालत्ये, तें ठिकाण पाहोन मनास आनंद वाटतो. उत्तरे कडे मोठें मैदान आहे, तिकडे समूर पुणें शहर दिसतें; तें पुणें पूर्वीं लहानसें गांव होतें, परंतु त्या स्थानाचा योग असा होता कीं, काळें करून ती मोठ्या राजाची राजधानी होईल. त्या सिंहगडाचे दक्षिणेस आणि पश्चिमेस मोठे मोठे पर्वत आकाशास लागल्यासारिखे उंच दिसतात, त्या लगत्यास रायगड आहे.

त्या रायगडाहून तानाजी मालुसरे, माघ कृष्ण नवमीस, एक हजार मावळे लोक बरोबर घेऊन चोरवाटेनें रात्रीस सिंहगडाजवळ येऊन पोंहचतांच, त्या हजार लोकांचे दोन भाग करून, एका भागाचे पुढें चालविले. ते जेथें भिंती सारिखा काळा दगड तीसतीस हात उंचीचा आहे तेथे जाऊन पोंहचले, आणि दुसऱ्या भागाचे अंमळसे मागून चालविले; ते कांहींसे मागें राहिले. जे पुढें जाऊन पोंहचले, त्यांतील कोणी एक चतुर माणूस आपल्ये कमरेस दोरीची शिंडी बांधून घेऊन वर चढला; मग त्या शिडीवरून एक एक माणूस जाऊन, तीनशें लोक चढले; आणि

लपून

ल्पून राहिले; आपणखी लोक चढत होते तों किल्यांत कांहीं तयारीची गडबड होत आहे असें समजून ते मावळे लोक एक माणूस आपल्याकडे येतो आहे असें दृष्टीस पडताच, त्याला आपल्ये लोकांस कांहीं शब्दादिखुणेनें वर्तमान कळवायास वेळ नसां पडूं देतां मावळे याणीं तत्काळ मारिला. असें अम्हांही किल्लेकरी अधिक सावधगिरीत आहेत असें मावळ्यांस वाटलें. तेव्हां जे जवळ मावळे होते, ते घेऊन, तानाजी मालुसरा जिकडे ती गडबड होत होती तिकडे चालिला; तो कांहींसा पुढें गेला तों, त्या किल्लेकऱ्यानीं अकस्मात हिलालांचा व चुडींचा मोठा उजेड केला. तेव्हां ते रजपूत लोक तयार होऊन येतात. व कित्येक कंबरा बांधितात. व मावळे त्यांवर चालून जातात, तों ते सारे एकसमयावच्छेदें करून, दृष्टीस पडले. तेव्हां तें युद्ध मोठ्या निकराचें झालें. त्यांत मावळ्यांपेक्षां रजपूत फार होते, तरी मावळ्यांचा जय होईलसें दिसूं लागलें; इतक्यांत तानाजी मालुसरा पडला, तेव्हां मावळे लोक जिकडे दोरीची शिडी होती तिकडे पळून गेले, ते त्या भिंतीशीं जाऊन पोंहचतात तों सुऱ्याजी मालुसरा तानाजीचा भाऊ. बाकी मावळे लोकांसहित येऊन पोंहचला; तो हे लोक पळतात असें पाहून मोठ्यानें ओरडून निषेध करून बोलिला, कीं तुमचा बापाचें प्रेत महार नेऊन अमंगळ जागीं टाकितील; त्या दोषाचे अधिकारी मात्र तुह्मीं व्हाल; आह्मी तर दोरीची शिडी तोडिली, आतां मोंगल तुह्माला मारितील. किंवा तुह्मीं त्यांला माराल. असें ह्मणून आपल्या बरोबरचे लोकांसहित त्या लोकांस पुनः युद्धास नेले; तेव्हां ते लोक एकदांच हर हर महादेव ह्मणून मोंगलांचा पराभव करिते झाले, असा तो किल्ला घेतला. मग दिवस उगवल्यावर असा ठिकाणा लागला कीं मावळे लोक तीनशें पडले; व रजपूत पांचशें पडले, यां खेरीज दोन तीनशें सुमारें रजपूत जीव घेऊन पळाले. ते किल्याचे भिंतीवरून बाहेर उड्या टाकून मृत्यु पावले.

त्या मावळे लोकांचा असा नेम होता कीं जय झाला ह्मणजे घर किंवा दुसरें कांहीं आग घालून पेटवून जय झाल्याची खूण करावी, त्याप्रमाणें त्याणीं तेथें एक मोठें छापरी घर होतें तें जाळिलें, तेव्हां शिवाजी आपल्या लोकांचा जय झाला असें समजून बहुत आनंद पावला, परंतु तानाजी पडला असें ऐकिल्यावर कष्टी होऊन बोलिला कीं गड सांपडला पण सिंह गेला, नंतर त्याणें सर्व मावळे लोक यांस एकेक रुप्याचें कडें दिलें; व सुर्याजीस किल्लेदार केला.

यानंतर एका महिन्यानें सुर्याजीला पाठवून छापा घालून पुरंदर किल्ला घेतला; तेथें फारसें युद्ध करावें लागलें नाहीं. कोंकणांत माहुली किल्ला घ्यावयास बरोबर फौज देऊन मोरोपंत पाठविला, त्याला तेथें दोन महिने युद्ध करावें लागलें त्या युद्धांत मोरोपंताचें एक हजार माणूस मेलें; नंतर किल्ला हस्तगत झाला.

यानंतर

यानंतर करनाळा किल्ला घेतला. आणि त्या वर्षाचा सहाव्या महिन्यापर्यंत कालियानीचा संपूर्ण परगणा हस्तगत केला. त्याच वर्षांत शिवाजीनें लोहगड ही घेतला. आणि जंजिरा घ्यावयास फौज घेऊन चालिला; त्यापूर्वी त्याणें नऊ वर्षें मोरचा लावून. प्रतिवर्षी त्या किल्ल्याशीं युद्ध चालविलें होतेंच; परंतु या वेळेस जितकें सामर्थ्य असेल. तितकें खर्चून किल्ला घ्यायाचाच, असा निश्चय केला; आणि तेथें जाऊन युद्ध चालविलें. तेव्हां तेथें फत्तेखान शिद्दींचा मुख्य होता. तो किल्ला यावयास तयार झाला. परंतु दुसरे तेथें तिघेजण मोठे मोठे शिद्दी होते. ते असें समजले कीं, याणें किल्ला दिला म्हणजे. धणी आम्हास देहांत दंड करील; यास्तव त्याणीं आपले जातीचे लोक वश करून घेतले, आणि फत्तेखानास कैद करून किल्ला दिला नाहीं; आणि सुरतेस एक मोठा मोंगलांचा सरदार होता त्याला लिहिलें, कीं या समयीं जर तुह्मीं आमचे कुमकेस याल तर आम्हाकडे विजापुरकरांचा मुलुख आहे हा, आणि जितकीं लढाऊ गलबतें आह्माजवळ आहेत तीं तुह्माला देऊं. तें त्याणीं मान्य केलें, तेव्हां किल्ला हातास न येतां शिवाजी उठून गेला. त्या तिघां शिद्दींचीं नावें. एक शिद्दी संभोळ, एक शिद्दी याकुद, एक शिद्दी खेरू.

त्या वर्षी पर्जन्यकाळ पुर्ता गेला नव्हता, तोंच शिवाजी पंधरा हजार फौज घेऊन सुरतेस आला; त्या वेळेस तेथें फौज नव्हती म्हणून. तीन दिवस सावकाशपणें शहर लुटून मनांस येईल तसें पुष्कळ द्रव्य जमा केलें; चवथे दिवशीं बऱ्हाणपुराहून त्याला कांहीं लिहिलें आलें, त्यावरून आपली सारी फौज घेऊन. साल्हेर किल्ल्याचे वाटेनें आपल्ये मुलुखीं चालिला. तो सुरतेहून निघताना तेथचा लोकांस पत्र देऊन निघाला. त्यांत असें लिहिलें होतें कीं. तुह्मीं प्रतिवर्षी बारा लक्ष रुपये **खंडणी द्याल तर मजपासून तुह्माला उपद्रव होणार नाहीं.**

शिवाजी लशकर सुद्धां चांदोर पावेतों पोहचला तेव्हां. त्यास समजलें कीं, एक मोंगलांकडचा पांच हजार स्वारांचा सरदार आपल्ये पाठिमागें लागला आहे या खेरीज समूर एक मोठी फौज नाशिकाचे वाटेवर. पिंपरीच्या घाटाशीं येऊन वाट पाहात बसली आहे. ते समयीं शिवाजीनें आपल्या फौजेच्या चार टोळ्या करून. एकीस तें सारें द्रव्य संभाळून न्यावयाचें संपिवलें; इतरांस त्या सरदारांवर जावयाचें काम नेमिलें, त्या तीन्हीं तिहीं कडे जाऊन मोंगलांशीं युद्ध करूं लागल्या इतक्यांत त्या एका टोळीनें तें द्रव्य नेऊन कोंकणांत पोंहचविलें. नंतर शिवाजी समूरचे फौजेस आणि पाठीस लागलेल्या सरदारांस जिंकून कोंकणांत गेला. त्या मोंगल लोकांत एक मराठी फौजेची टोळी होती. तीमध्यें मुख्य मकुरच्या देशमुखाची स्त्री असे. तीचा भ्रतार पूर्वींच गत झाला होता; शिवाजीनें त्या बाईचा संमान करून तिला तीचे मुलखीं पाठविली.

यानंतर

यानंतर शिवाजीनें आपला सरदार प्रतापराव गुजर याजबरोबर फौज देऊन खानदेश लुटावयाकरितां पाठविला; तेथेंही मोंगलांचें लश्कर नव्हतें, म्हणून यथेच्छ लूट केली. या लोकांचे जाण्यांत विशेष हा, कीं याणीं जातानां गांवोगांव लोकांपासून लिहून घेतलें कीं, आह्मीं शिवाजीस व शिवाजीचा सरदारांस वसुलाची चवथाई देऊं; आणखी आपण लिहून दिलें किं, जे चवथाई देतील त्यांस दुसरा कोणी उपद्रव करील तर त्यापासून संरक्षण करूं. आणि चवथाई दिल्याची पावती देत जाऊं. त्यापुढें मराठे लोक मोंगलांचे मुलखीं चवथाई घेत होते. परंतु त्याचा आरंभ तोच.

सन सोळाशें एकाहत्तराचे प्रारंभीं, मोरोपंतानें कित्येक किल्ले घेतले, त्यांत औंडा पट्टा आणि साल्हेर हे तीन श्रेष्ठ.

असा शिवाजीचा जय होत चालिला असतां, मोंगल लोक कसे उगे राहिले. असें कोणी ह्मणेल तर त्याचें कारण असें समजावें कीं, शिवाजी आणि सुलतान माज़ुम. यांची मैत्री आहे, असें लोकांस दिसत होतें. आणखी जशवंतशिंग शिवाजीचा हितकर्ता होता; तें सर्व लोक जाणत असत. तो सुलतानास मसलत देई कीं, दिल्लीहून कुमकेस फौज मागावी; कुमकेस दुसरी फौज आल्यावांचून युद्ध करूं नये: आणि तो पक्कें जाणत होता कीं मागीतली असतांही घातशंकेनें ओरंगजेब देणार नाहीं. त्या सुलतान माजुमानेंही, त्याची मसलत ऐकिली; त्यावरुन लोकांस असें वाटूं लागलें कीं, शिवाजीशीं मिळून बापाशीं युद्ध करून, स्वतंत्रपणानें असावें, असें सुलतानाचे मनांत आहे. हें खरें असेल कीं नसेल हें समजत नाहीं; परंतु इतकें खरें असेल, कीं बाप मेल्यावर आपण तक्ताधिपती न झालों तर दुसरा होईल तो आपल्यास मारील; ही एक शंका होती यास्तव शिवाजीचें बंड उपयोगी पडेल ह्मणून तें तसेंच रक्षिलें; आणि त्याचे पारिपत्याचे मिषेंकरून, आपले जवळ पुष्कळ फौज असावी: कांकिं समयीं आपल्या कामावर पडेल. हा मनसोबा त्याला शेवटास न्यावयास अवकाश पडला नाहीं, कांकिं थोडकेच दिवसांत ओरंगजेबानें. जशवंतशिंगास आपल्ये जवळ बोलावून नेला; आणि मोहाबतखान नामें दुसरा एक सरदार चाळीस हजार फौज बरोबर देऊन, दक्षिणेंत पाठविला. तो सुलतान माजुमास विशेष मानीत नसे.

त्या मोहाबतखानानें दक्षिणदेशीं येतांच औंडा, पट्टा, हे किल्ले घेतले; मग पर्जन्यकाळ गेल्यावर, दिलीरखानाबरोबर अर्धें लश्कर देऊन, चाकणचा किल्ला घ्यावयास पाठविला; आणि आपण अर्धें लश्कर घेऊन साल्हेर किल्यास वेढा घातला. हें वर्तमान सन सोळाशें बहात्तरांत घडलें. तेव्हां शिवाजीनें मोरोपंत व प्रतापराव गुजर यांजबरोबर वीस हजार स्वार देऊन, आज्ञा केली कीं मोंगलांस हांकून

कून घ्यावे, ही बातमी मोहाबतखानास कळल्यावर, त्याणें आपल्यादळेबरचे लोक आपल्याजवळ थोडकेसे ठेवून बहुतेक युधास पाठविले; त्या दोहों लस्करांची साल्हेर किल्ल्याजवळ गांठ पडली. तेसमयीं प्रतापराव पुढें होता, त्याणें आपल्या लोकांस आज्ञा केली कीं मोंगलांनीं हल्ला केला असतां, आपण मोड झाल्याप्रमाणें कांहींसें पळाल्यासारिखें करून ते आंगावर घेऊन त्यांचा बंदोबस्त मोडला म्हणजे, आपण हल्ला करावा; मग त्या लोकानीं तसेंच केलें; तेणेंकरून मोंगलांचा फार नाश झाला तेव्हां मोंगल आपला मोडलेला बंदोबस्त नीटकरीत करीत मोठया शौर्यें करून लढले; परंतु उपाय चालेना. त्या युद्धांत त्यांचे मोठे मोठे सरदार वेर्चास मेले. आणि कित्येक जखमी झाले; कित्येक कैदेंत सांपडले. मराठ्यांकडचा एक, नरराव कांकडे नामें, पांच हजार स्वारांचा सरदार पडला, आणि पांचशें लोक मेले.

त्यापूर्वीं कधींही मोंगलांशीं मराठे लोक असे झटून लढले नव्हते. म्हणून त्या युद्धापासून मराठे मोठे विख्यात झाले. त्या लढाईचें फळ असें कीं, साल्हेर किल्ल्या सभोंवता मोंगलांचे लश्कराचा वेढा होता, तो काढून मोंगल लोक पिटून लाविले. ते औरंगाबादेस पळून गेले.

जे लोक शिवाजीचे कैदेंत सांपडले ते रायगडास नेऊन ठेविले; मग त्यांचा जखमा बऱ्या झाल्यावर जे चाकरीस राहिले ते ठेविले, आणि जे नराहीत, त्यांस मोठये संमानानें आपले ठिकाणीं जाऊं दिले. त्या दिवसापासून विजापुरकराचे लश्करी लोक, व मोंगल लोकांचे लश्करी लोक, त्यांची चाकरी सोडून शिवाजीस भेटून, त्याचे चाकरीस राहूं लागले.

यानंतर शिवाजी पोर्तुगीस लोकांपाशीं खंडणी मागूं लागला; तेव्हां त्याणीं मान्य नकेलें, म्हणून वसईजवळचा साष्टी परगण्यांत घोडबंदर किल्ला आहे तो घ्यावयास गेला, परंतु तो त्याचे हातीं लागला नाहीं; त्या लोकानीं त्यास मागें हटविला. त्यावेळेस मुंबेमध्यें इंग्रेज लोक इतकाजवळ शिवाजी आला म्हणून भिऊन, आपल्या किल्याचा बंदोबस्त करूं लागले. इतके दिवस इंग्रेज व शिवाजी यांचें कधीं युद्ध झालें नव्हतें; कांकीं परस्परें दोघांस एकमेकाची गरज होती, ती अशी, मुंबईचे लोक, धान्य आणि जळण शिवाजीचा मुलखांतून आणीत असत; आणि मराठे लोकांस त्यांपासून असा उपयोग होई, कीं ते लोक मोंगलांचीं लढाऊ गलबतें मुंबेवरून पुढें शिवाजीचा मुलखाकडे जाऊं देत नव्हते; म्हणून त्यांचा व शिवाजीचा सल्ला होता. यामागें एकवेळ सन सोळाशें एकसष्टांत शिवाजीनें राजापुर लुटलें. तेव्हां इंग्रेजाचें द्रव्य दहा हजार होन सुमारें गेलें होतें; तें घ्यावयाकरितां त्याणीं उद्योग कित्येक वेळा केला, परंतु त्याणें दिलें नाहीं; मग या वेळेस त्याशीं तह करून

पक्का

पैका घ्यावयाचा उद्योग नवीन केला. त्यांस शिवाजी ह्मणाला कीं आह्माला जंजिरा घ्यावयास तुह्मीं कुमक कराल तर होन देईन; हें जर मर्जीस येइना तर राजापुरीं फिरून कोठी करून पहिल्या प्रमाणें व्यापार चालवावा; ह्मणजे होन देतों. त्यावर इंग्रेजानें उत्तर केलें कीं, मीं व्यापार करावयासच एथें आलों, जो आमचे वाटेस जातो त्यावर मात्र आह्मीं शस्त्र धरितों. निर्निमित्त उपद्रव करावा, असें आमचा धर्मांत नाहीं. आतां आह्मीं राजापुरीं व्यापार चालवूं, परंतु इतःपर उपद्रव होणार नाहीं. असा पक्का जामीन पाहिजे; तेव्हां ती गोष्ट तशीच राहिली.

इतक्यांत मोंगलांचे मुलखांत कांहीं विशेष बंदोबस्त झाला. तो असा, औरंगजेबानें सुलतान माजूम व मोहाबतखान यांस आपल्याजवळ बोलावून नेले, आणि गुजराथेचा अधिकारी खानजहान बहादुर तो दक्षिणेचा अधिकारी करून पाठविला. तो दक्षिणेस येउन असें समजला कीं, शिवाजीचा वाटेस जावयाजोगें आपल्या जवळ सैन्य नाहीं; यास्तव आपल्या मुलखाचें मात्र संरक्षण करावें. ह्मणून त्याणें कित्येक देशांत जावयाचा घाटांचा वाटा बंद केल्या. तेव्हां शिवाजी दुसरी नवीच वाट काढून फौजेसहित घाटावर जाऊन अहंमदनगर व औरंगाबाद यांचे आसमंतात लुटूं लागला; तेव्हां त्याचे पारिपत्याकरितां खानजहानानें, चहूंकडे लोक पाठविले, परंतु त्याची कुठेहीं गांठ पडली नाहीं. मग पर्जन्यकाळ जवळ आला ह्मणून, भीमेचे कांठीं पेडगांवा पाशीं छावणी करून राहिला, तेथें एक किल्ला बांधून त्याचें नाव बहादरगड ठेविलें. तो मोंगलांचा सरदार किल्ला बांधित असतां, शिवाजी गुप्तरूपें लश्करसहित गोंवळकोंडयांत शिरला. आणि तेथून पुष्कळ खंडणी घेऊन स्वस्थपणें रायगडास गेला. यानंतर मोंगलांचाही मुलखांत शिवाजीनें स्वार पाठविले, त्याणीं जेथें बळ चालेल तेथें लुटावें, आणि मोंगलाचे लश्कराची गांठ पडली असतां, ती लूट बरोबर घेऊन पळावें, यांतच त्या लोकांस पुरुषार्थ आहे, असें वाटत असे.

शिवाजी गोंवळकोंडयांत होता इतक्यांत समुद्रतीरचे त्याचा गांवाचा फार नाश जाला; तो असा, सुरतेचीं आणि जंजिऱ्याचीं लढाउ गलबतें येऊन, ते गांव लुटले; परंतु तेणेंकरून त्याचें बळ किमपि उणें झालें नाहीं; कांकीं त्या हानिपेक्षां गोंवळकोंडयांत लाभ विशेष झाला.

सन सोळाशें बहात्तरांचा बाराव्या महिन्याचे पंधराव्ये तारिखेस, विजापुरचा बादशाह अल्ली आदिलशाह याचे शरीरास वायूचा उपद्रव होऊन, एकाएकीं हातपाय गेले; तेव्हां त्याणें आपल्या राज्याचा कांहीं बंदोबस्त करून मग थोडकेंच दिवसांनीं मरण पावला. त्याला पुत्र एकच पांच वर्षांचा सुलतान शिकंदर नामें होता. आणि एक कन्या होती. त्या वेळेस त्याचा वजीर अबदुल-

महंमद

महंमद तो मोठा कुलीन आणि सुज्ञ होता, परंतु त्या कालानुरूप त्यामध्यें सामर्थ्य नव्हतें, दुसरे मोठे मोठे तिघे मुत्सद्दी होते. एक खवासखान, दुसरा अबदुल करीम त्यालाच बालोळखान ह्मणत, तिसरा मजाफेरखान, हे तिघेही सरकारचें हित न पहातां आपलें मात्र प्राबल्य असावें असें इछीत होते. तो वजीर अल्पसामर्थ्य होता, यामुळें त्याला त्या मोठमोठया तिघांस आज्ञेंत वागवावयाची शक्ति होईना; आणि ते तर आपलें माहात्म्य वाढवावें ह्मणून अमार्गवर्ती झाले, तेणेंकरून आंतल्यें आंत वैमनस्यें पडलीं, यास्तव त्या राज्याची दशा अशी जाली कीं बाहेर शिवाजी आणि मोंगल ते राज्य घ्यावयास टपलेले; आणखी आंत फितुर होता. यावरून असें दिसूं लागलें, कीं हें राज्य शीघ्र लयास जाईल. असें असतां अबदुल महंमद याणें बादशाह मरते समयीं, मसलत दिली कीं सुलतान शिकंदर प्रोढ होई तों पर्यंत, खवासखान यास मुख्य करावा. आणि जे दुसरे दोघे मुख्य राहिले, त्यांस व मला मुलखामध्यें जागोजाग वेगळा वेगळा अधिकार द्यावा. तेव्हां बादशाह निरुपाय होऊन मान्य केलें; आणि खवासखानाला जवळ बोलावून त्याचे हातांत पुत्राचा हात दिला; आणि वजिरानें मसलत दिली होती, त्या प्रमाणें वागावयाची आज्ञा दिली. मग बादशाह मृत्यु पावल्यावर तो खवासखान मुख्य झाला: त्याणें तिघां मुख्यांतील, एक मजाफेरखान यास मात्र कर्नाटकांत पाठविला; दुसरे दोघे मोंगलांचे आश्रयेंकरून प्रबळ होतील, अशा भयानें ते आपल्याजवळ ठेविले, यांचे यांजवळ ब्राह्मण आश्रित होते. त्या योगें करून तेथचें बारीक वर्तमान शिवाजीला कळत असे. त्या शिवाजीला विजापुराची अशी अवस्था समजतांच, त्याणें असें मनांत आणिलें कीं, पूर्वीं जो अबदुल महंमद याशीं तह ठरविला होता, तो बादशाह याचें मरण पर्यंत झाला; आतां आपला लाभ साधावा हेंच मुख्य.

या प्रमाणें निश्चय करून सन सोळाशें ब्याहात्तरांच्या तिसऱ्या महिन्यांत, शिवाजीनें विशाळगडास मोठें सैन्य जमा केलें. त्यांतून कित्येक लोक पाठवून पन्हाळा किल्ला छापा घालून घेतला, परंतु त्याचे मनांत हुबळी नामें मोठें शहर जामध्यें व्यापार मोठा चालतो आहे. तें लुटावयास फार अगत्य होतें. तें काम त्याणें आनाजी दत्तो यास सांगीतलें; त्याणें तेथें जाऊन तें शहर लुटून असें द्रव्य जमा केलें कीं, ज्याचा अदमास करितां येत नाहीं. मग ते लोक तेथून गेल्यावर, तेथें संरक्षणार्थ पूर्वींपासून राहिलेले, जे विजापुरकरांचे लोक होते. त्याणीं जें शेष राहिलें द्रव्य तें सर्व नेलें. या खेरीज शिवाजीनें विजापुरकरांच्या समुद्राचे तीरच्या मुलुख लुटावयास कित्येक गलबतें पाठविलीं; आणि गांवोगांव देशमुखादि अधिकाऱ्यां यांस मसलन

लन

लत दिली कीं विजापुरकरांचे लोकांस हांकून तुह्मीं स्वतंत्रपणानें वागावें. त्या वेळेस वेदनूरच्या राणा याणें हुबळी शहराची ती दशा पाहून शिवाजीला शरण आला आणि खंडणी द्यावयास कबूल करून अभय मागीतलें.

त्यावर दिडा महिन्यानें मावळे लोक पाठवून शिवाजीनें परळी किल्ला घेतला. त्यानंतर सातारा किल्ला. जास विजापुरचे सरकाराचा बंदोबस्त असे. त्यास घेरा घातला; तो चार महिने लढला मग शिवाजीचे हातीं लागला. त्या किल्ल्याचा एक विशेष आहे तो असा. जापासून फितूर इत्यादि अन्याय झालेले. असा जो सरकारचा महाअपराधी त्याला सातान्यावर+ बंदींत ठेवावा. अशी चाल कित्येक पिढ्या विजापुरकरांची होती. ती आदिलशाई वंशापासून. किंवा त्याचे अगोधर पासून चालत आली. तो किल्ला याणें घेतला आणि मोठा हर्ष पावला परंतु त्याचे वंशय त्यांत पुढे बंदीस पडतील तें त्याला समजलें नाहीं.

त्यावर्षीं पर्जन्यकाळामध्येंच. चंदन. वंदन, पांडवगड, नांदगिरी. आणि ताटोरा हे पांच किल्ले शिवाजीचे हस्तगत झाले.

इकडे विजापुरांत सुलतान शिकंदर बादशाह लहान ह्मणून जो मुख्य केलेला. खवासखान होता; त्याणें शिवाजीचें असें सामर्थ्य जाणून एक फौज पाठविली. ते लोक जाऊन पन्हाळ्या किल्ल्याचा आसमंतात मुलुख घेतला. इतक्यांत शिवाजीकडचा प्रतापराव गुजर विजापुराचे सभोंवता लुटूं लागला; आणि मोठा उपद्रव करूं लागला. तेह्मां विजापुरकरानें आपलें लश्कर माघारें बोलाविलें. प्रतापराव याणें त्या लश्कराची वाटच बंद केली. आणि त्यांस दाणापाणी मिळेना असें नानाप्रकारें दमविलें. तेह्मां त्या विजापुरकरांचा लश्करांत मोठा सरदार अबदुल करीम होता, तो त्या प्रतापरायाशीं आर्जवाच्या गोष्टी बोलून आपलें लश्कर वांचवून विजापुरीं गेला. त्यावरून शिवाजीला मोठा राग येऊन, त्याणें त्यास निर्भर्त्सना करून लिहिलें तेणें करून प्रतापराव फार खिन्न होऊन शिवाजीची आज्ञा नसतां. वराडांतील पेनघाट मुलखांत सैन्य चालविलें.

त्यापुढें आबदुल करीमानें प्रतापराव दूर गेला असें समजून सन सोळाशें चौऱ्याहात्तरांचा दुसऱ्या महिन्यांत. पुनः सैन्य घेऊन पन्हाळ्या किल्ला घ्यावयास चालिला. तो त्या किल्ल्याचे जवळ जाऊन पोंहचला तों प्रतापराव पुष्कळ सैन्यसहित तेथें त्याचे दृष्टीस पडला. त्यास त्यापूर्वीं शिवाजीचा निरोप आला होता कीं. असा अमार्गवर्ती जो तूं. तो विजापुरकरांचें लश्कर लुटल्याशिवाय मला तोंड दाखवुं नको; यास्तव तेणेंकरून तो आपला बंदोबस्त न पहातां. एकाएकीं त्या

+ अपराधी लोकांस बंदींत ठेवावयाचा असा सातारा विजापुरकरांचा; तसाच पूर्वीं लोहगड अहमदनगरकराचा होता.

लश्करावर

लश्करावर उडी घालून आपण मृत्यु पावला; आणि त्याचे सैन्याची दुरदशा झाली. ते लोक पळाले ते पन्हाळ्याचे तोफेखाली गेले, तेव्हां त्यांस आश्रय सांपडला. ते वेळेस एक मराठा हंसाजी मोहिते नामें पांच हजार स्वारांचा सरदार होता, तो अकस्मात आला, त्याणें विजापुरकर यांचे लोक मराठे लोकांचे पाठीस लागलेले आणि बंदोबस्त रहित असे पाहून आपण हल्ला केला, मग त्यांचा मोड होऊन मराठी लोकांनीं माघारें उलटून आपल्ये पाठीस लागणारांस पळविले ते समयीं विजापुरकरांचा सरदार मोठ्या लज्जेनें माघारा विजापुरीं गेला.

त्या हंसाजी मोहित्याचे लोकांत, दोन सरदार, मोठ्या शौर्येंकरून लढले; तो एक संताजी घोरपडा; आणि दुसरा धनाजी जाधव; त्या पुढें ते दोघे अशा आचरणें करून मोठे विख्यात जाले.

जेंजें हंसाजी मोहित्यानें कार्य केलें तें तें शिवाजीला मोठें हर्षास्पद जालें; तेणें करून त्याणें त्याचें हंबीरराव असें नवें नांव स्थापून, लश्करचे सरनोबतीचा अधिकार दिला. त्या प्रतापराव गुजरानेंही पूर्वीं मोठीं मोठीं कामें केलीं होतीं आणि या वेळेस तर मृत्युच पावला; यास्तव त्याची फार फार प्रशंसा करून, शिवाजीनें त्याचे सोयरे धायरें सहित त्याचा मुलां माणसांचें पोषण केलें; आणखी त्याची कन्या व आपला पुत्र राजाराम, यांशीं विवाह केला.

तो प्रतापराव मृत्यु पावला त्याच सुमारें आबाजी सोनदेवाचा काळ आला त्याचा पुत्र रामचंद्र पंत तो मुजूमदार केला. त्या शिवाजीची चाल अशी होती कीं गुणी असल्या वांचून पुत्रास बापाचा अधिकार देऊं नये.

शिवाजी फार दिवस आपणास राजा महाराज ह्मणवीत असे, आणि आपले राज्यांत त्याणें नव्या टंकशाळा घातल्या होत्या; आणखी तो ब्राह्मणास ह्मणूं लागला कीं तुह्मीं मला राज्याभिषेक करून जा दिवशीं मी तक्ताधिपती होईन तो वर्षारंभ दिवस करावा; त्या वेळेस काशीहून एक गागाभट नामें मोठा विद्वान ब्राह्मण आला होता; त्यास तें काम सांगीतलें, त्यास, त्याणें शास्त्रार्थ बहुत पाहून सन सोळाशें चौऱ्याहात्तरांचे सहाव्ये महिन्याचे सहाव्ये तारिखेस शके पंधराशें शाण्णवांचे ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीचे दिवशीं सुमुहूर्तीं रायगडीं शिवाजीस यथाविधि राज्याभिषेक केला.*

पूर्वीं कारभारी यांचीं अधिकार संबंधी नावें फारशी शब्दांनीं होतीं; मग शिवाजीला राज्याभिषेक झाल्यावरतीं बदलून नवीं संस्कृत ठेविलीं. तीं नावें शिवाजी जीवंत होता तों पर्यंत चालत होतीं, त्या पुढें अष्टप्रधानाचीं नावें राहिलीं;

---

* त्यापुढें पंधरा दिवसांनीं शिवाजीची आई जिजाबाई मेली ह्मणून त्यास पुनः राज्याभिषेक केला, परंतु वर्षारंभ दिवस जो पहिला राज्याभिषेक झाला तोच ठेविला दुसरा न केला.

त्या

त्या नावांचा तपशील आणि त्या अधिकाऱ्यांचीं नावें अशीं.

| फारशी | संस्कृत | मूळचें |
|---|---|---|
| पेशवा | मुख्यप्रधान | मोरोपंत पिंगळे |
| मजीमदार | पंत अमात्य | रामचंद्रपंत बहूतकर |
| सुरणीस | पंत सचीव | आनाजी दत्तो |
| वाकनीस | मंत्री | दत्ताजी पंत |
| सरनोबत | सेनापती | हंबीरराव मोहिते |
| डबीर | सुमंत | जनार्दनपंत हणमंते |
| न्यायाधीश | न्यायाधीश | बाळाजी पंत |
| न्यायशास्त्री | पंडितराव | रघुनाथ पंत |

यानंतर शिवाजीनें ‡सुवर्णतुलापुरुषदान केलें, आणि मोठा विधी करवून आपणास उत्तम रजपूत ह्मणविलें; आणखी नाना गुणयुक्त महत्वप्रतिपादक श्रीमंत इत्यादिपद विशिष्ट आपलें नाव लिहावयाची चाल केली.

पूर्वीं शिवाजी सन्सोळाशें त्र्यहात्तरांत जेव्हां विजापुरकरांशीं युद्ध करूं लागला तेवेळेस, त्याणें मोंगल लोकांशीं तह केला होता ह्मणून ते लोक त्यास उपद्रव करित नव्हते; परंतु सन सोळाशें पंचहात्तरांत मोंगलांच्या दिलीरखान नामें सरदार याणें शिवाजीचा मुलखास उपद्रव केला; तेंच तह मोडावयास शिवाजीला मिष झालें; त्याणें मोरोपंतास पाठवून पुनः औंडा, पटा हे किल्ले घेतले, आणि हंबीरराव सेनापती याणें सुर्तेजवळच्या घाटावर जाऊन आपल्ये फौजेच्या वेगळ्या वेगळ्या टोळ्या करून बऱ्हाणपुरपावेतों मुलुख लुटला; तेथून पुढें माहूर पर्यंतही लुटित गेला. त्यांतलीच एक टोळी जाऊन भडोज परगणा लुटला. त्या पूर्वीं कोणी मराठा नर्मदा उतरून पलीकडे गेला नव्हता. त्या शिवाजीनें आपण अंगें जाऊन पन्हाळा व तातोरा यामध्यें ठाणें बसवून कोंकणांत पोंडा किल्ल्यास वेढा घातला. तो शिवाजी फौजेसहित कोंकणांत गेला असें पाहून, विजापुरकरांकडचे सरदार निंबाळकर व घाटगे व फलटनराव मलावरीचे देशमुख यांणीं शिवाजीनें बसविलेलें ठाणें उठवून त्या संबंधी मुलुख घेतला.

हंबीरराव गोदावरी उतरून माघारा आल्यावर दिलीरखान मोठ्या निकरानें त्याचे पाठीस लागला; परंतु त्याणें जी लूट मिळविली होती ती मोठ्या

---

‡ रायगडीं शिवाजीला राज्याभिषेक झाला, ते समयीं इंग्रेज लोकांशीं आणि शिवाजीशीं तह झाला. त्या कामास मुंबईहून एक साहेब गेला होता. त्याणें शिवाजीचा तुळेस सोळा हजार होन लागलेले पाहिले.

कष्टानें

कष्टानें वांचवून रायगडास नेली. त्यासमयीं मोंगलानीं कालीयानी परगणा लुटला; शिवाजीनें पोंडा किल्ल्याचा बुरूज सुरुंगानें उडवून तो किल्ला घेतला. त्यानंतर त्याणें दक्षिण कोंकणांत जाऊन कित्येक ठिकाणें लुटून, कित्येकांजागची खंडणी घेऊन, घाटावर जाऊन सुंडाप्रांतांतील द्रव्य घेऊन रायगडीं फिरून आला.

विजापुरांत जो मुख्य झालेला खवासखान होता, तो शिवाजीचा भयानें राज्याचे रक्षणाचें अगत्य सोडून केवळ आपल्याच हितासाठीं खानजहानाबरोबर तहाचें बोलणें करूं लागला, कीं इतःपर आह्मीं तुमचे ह्मणवून राहूं आणि सुलतानशिकंदर बादशाह याची बहीण पादशाह बिबी, औरंगजेबाचा पुत्रास देऊं. हें वर्तमान विजापुरकरांचे मानकरी लोकयांस समजतांच त्याणीं मारेकरी घालून त्या खवासखानास मारून टाकिला. नंतर अबदुलकरीम कारभार चालवूं लागला, त्याणें मुलखाचे रक्षणाविषयीं आज्ञा केलेली खवासखानापेक्षां सरदार लोक विशेष मानीत होते. नंतर जेव्हां दिलीरखान विजापुरचे मुलखांत गेला तेव्हां अबदुलकरीम लशकर सुद्धां युद्धास सिद्धच होता, मग त्याची आणि याची कित्येक वेळा लढायी झाली, आणखी विजापुरकरांचा कांहींसा जय झाला. तेव्हां दिलीरखानही तो अबदुलकरीम त्याचे जातीचा ह्मणून त्यास कांहीं अनुकूळ झाला; तेणेंकरून त्यास तह करणें सुलभ पडलें.

सन सोळाशें शाहात्तरांत, तारोरा व पन्हाळा यांचे मधला मुलुख शिवाजीनें तिसऱ्यानें घेतला. आणि विजापुरचे जहागिरदारांचा उपद्रव नलागावा, ह्मणून किल्ले बांधिले. त्यांचीं नावें वर्धनगड, भूषणगड, सदाशिवगड, मचिंद्रगड, हे चार किल्ले फार मोठे नव्हते, परंतु मुलखाचें रक्षणास मोठे उपयोगी पडत, अशा जागीं बांधिले होते; आणि त्यांचे संबंधीं जो मुलुख त्यांचा वसूल पुष्कळ उत्पन्न होत असे. असा बंदोबस्त करित असतां त्या शिवाजीचा शरीरीं समाधान नाहींसें झालें; तेणेंकरून तो सानाऱ्यास कांहीं महिने पडला होता, तेव्हां त्याणें बहुत देवसेवा अनुष्ठानें करविलीं; आणि त्या दुखण्यांतच त्याणें कर्नाटक प्रांतीं जाऊन तें राज्य घ्यावयाची अशी मोठी मसलत केली. कीं त्या पूर्वीं कधीं केलीच नव्हती. ती सुलभ करावयास त्याणें काय काय कामें करून शेवटास न्यावयास उद्युक्त झाला, तें पुर्तेपणें समजावयाकरितां पूर्वीं लिहिलेल्या वर्तमानांतील कांहीं प्रकरणाची सूचना लिहिली पाहिजे; ती या भागाचे पुढचा भागीं लिहिण्यांत येईल.

सन सोळाशें शाहात्तरांपासून, ऐंशीपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग नववा.

## अनुक्रमणिका.

शिवाजी कर्नाटकप्रांत घ्यावयास गेला तो प्रकार.

तो शिवाजी तिकडे जाताना, वाटेनें देवस्थान पाहून, तपस्या करावयास गेला.

त्याणें कर्नाटकीं जाऊन युद्ध कोणे प्रकारें केलें तें.

आणि त्याचा सावत्र भाऊ व्यंकाजी याशीं बोलणें झालें तें प्रकरण.

मोंगल आणि विजापुरकर मिळून, गोवळकोंडेकर यांचें राज्य बुडवायास सैन्य पाठविलें.

परंतु तें कार्य शेवटास गेलें नाहीं.

अबदुल करीमाचा मृत्यु आणि त्याचे जागीं मसाउदखानाची स्थापना.

व्यंकाजी शिवाजीचा लष्करावर छापा घालून आपणच पराभव पावला तो प्रकार.

जनार्दन पंत, व हंबीरराव, व मोरोपंत, यांणीं युद्धें कशीं केलीं.

सुलतान माजूम यास दक्षिणेचा अधिकार मातस्यान दिला तें वर्तमान.

मोंगलांचें लष्कर विजापुर घ्यावयास आलें म्हणून मसाउदखानानें शिवाजीपाशीं कुमक मागीतली.

तो शिवाजी मोंगलांचे मुलखीं जाऊन उपद्रव करिता झाला.

आणि तेथून लूट घेऊन माघारा येत असतां वाटेंत मोंगलांचा लष्करापासून मोठें संकट पावला.

नंतर, महत्त्वशौर्येंकरून, आणि जासुदांचे चातुर्येंकरून, तो, व त्याचें सैन्य वांचलें.

संभाजीची वागणूक.

मोंगलांनीं विजापुरचा घेरा उठविला, नंतर शिवाजीनें विजापुरकरांस कुमक केली होती, तीपासून काय लाभ पावला.

तेणेंकरून व्यंकाजी निरुत्साह झाला, यास्तव त्यास शिवाजीनें हितोपदेशार्थ पत्र लिहिलें.

त्या शिवाजीचा मृत्यु, व त्याचा स्वभावाचें वर्णन.

तो मेल्यानंतर तख्ताधिपती कोण कोण झाले तें वर्तमान.

## भाग नववा.

पूर्वी औरंगजेबानें आपल्ये मनांत निश्चय केला कीं सर्व दक्षिणेचें रा-
य आपल्ये सत्तेंत ठेवावें, मग तो आपलें राज्य संभाळीत असतां कालें करून
ां विसरला असेल, असें समजूं नये. पहिल्यापासून त्याची मसलत अशी
ोती कीं, दक्षिणचे अधिकारी व राजे, हे आपआपल्यांत कलह करून हीनब-
ळ झालेले तसेच राखावे; नंतर जेव्हां आपले चित्तास येईल त्यासमयीं आ-
ण जाऊन घेतां येईल. तें काम त्याला दुसऱ्यास सांगतां येईना, कांकीं ज्या-
ा हातीं तें राज्य लागेल तोच सबळ होईल. अशी मनांत शंका होती; या वरू-
च समजतें, कीं शिवाजीनें एव्हडी धामधूम केली असतां मोंगलांनीं त्का-
ळ बुडविला नाहीं. शिवाजी गोंवळकोंडकरांशीं आणि विजापुरकरांशीं कल-
करी त्यांतही औरंगजेब आपलें हितच जाणत असे; आणि या कामासाठीं
ाचा उद्योगही असाच होता, कीं आपले वकील राज्यांत पाठवून कांहीं युक्ती-
ं वैमनस्यें पाडवावीं; त्याला असें वाटे कीं अशाच आचरणें करून आपलें क-
याण होईल. परंतु याणें करूनच आपलें अहित आहे असें न समजला; कां
ो कुकर्में अंगीकारिलीं असतां, कोणेकेसमयीं तींच त्या कारणास बाधक हो-
ात. शेवटीं त्याचीं कुकर्में त्याला घातक झालीं. यावरून अर्थ असा दिसतो
ों उत्तमाचरण केवळ एकाचेच उपयोगीं पडतें असें नाहीं मोठ्या बादशाहा-
ासून गरीबरयेतपर्यंत सर्वांचे उपयोगीं सारिखें पडतें.

विजापुरीं अबदुलकरीम याणें मोंगलांशीं आणि आपणाशीं सल्ला रा-
वला होता परंतु त्यांशीं बहुत काळपर्यंत मैत्री ठेवावी असें त्याचे मनांत नव्ह-
ं; कां कीं त्याणें आपले हिताचा युक्ती वेगळ्याच कल्पिल्या होत्या. त्याचे लोक
मोंगलांचे लोक एकाजातीचे होते, त्याणें मोंगलांशीं सल्ला केला त्याचें कारण
ेच असेल; नाहींतर तो आपल्या शहाणपणानें, शिवाजीशीं तह करता, कां
ों शिवाजीचा हिताचें आणि त्याचा हिताचें कारण एकच होतें. आणखीं
ोंगल त्यास बुडवावयास पहात होते.

गोंवळकोंडें तेथील मानकरी लोक बहुतां दिवसांपासून, मोंगलांस
ारा झालेले होते; जासमयीं कुतुबशाह मेला, त्यासमयीं औरंगजेब समज-
ला कीं आतां आपणास हित होईल, कांकीं तेथचा नक्ताधिपती होणार कु-
ुबशाहाच्या जांवाई अबूहुसेन तो केवळ विषयी होता. मग तो बादशाह
ाल्यावर त्याणें आपले सर्व दुर्गुण टाकून उत्तमप्रकारें राज्यकारभार चालवूं ला-
ाला. तेव्हां औरंगजेबाची निराशा झाली; त्या अबूहुसेनाजवळ मसलत

देणार

देणार ब्राह्मण दोघे भाऊ होते, एक अकण्णापंत, एकमादण्णापंत, त्यांत मादण्णापंत फार चतुर होता परंतु त्याचा स्वभाव ब्राह्मणाचे जातीप्रमाणेंच, कुटिल मार्गानुसारी असे. त्या दोघांचे मसलतीनेंच तो अबूहुसेन बहुधा वागे. याप्रमाणें दक्षिणेचा राज्यांत वर्तणुकी झाल्या, त्या बहुतेक लिहिल्या आतां शिवाजी कर्नाटकांत गेला तें प्रकरण.

सन सोळाशें शहात्तरांचे अखेरीस शिवाजी तीस हजार स्वार आणि चाळीस हजार पायदळ बरोबर घेऊन गोंवळकोंडयास जाऊन पोंहचल्यावर तेथल्या बादशाहाशीं मादण्णापंताचे योगेंकरून तह केला; आणि त्यापासून तोफा वगैरे सरंजाम घेऊन. सन सोळाशें सत्याहत्तरांचा तिसऱ्या महिन्यांत तेथून निघून कृष्णेचे पलिकडे उतरून गेला; तिकडे जातांना त्या वाटेच्या एके बाजूस देवस्थान श्रीशैल नामें आहे, तेथें आपण लश्कर सोडून एकदा देवसेवा करावयाकरितां गेला, तो बारा दिवस पर्यंत मोठें दुर्घट तप करून शेवटीं तरवार काढून प्राण देऊं लागला; ते समयीं भवानी प्रत्यक्ष येऊन वारणपूर्वक बोलिली कीं, राजा प्राण देणें योग्य नाहीं, कांकीं तुझा हातून अद्यापि हिंदुधर्म वाढावयाचा आहे; असें त्या वेळेचे लोक बोलत होते. इकडे इतक्यांत तें लश्कर कर्नाटकचा पेनघाट मुलखांत पोंहचलें होतें, तेथें शिवाजी जाऊन त्यास मिळाला. मग जिंजी नामें विजापुरकरांचा किल्ला होता तेथचे सरदारानें विजापुरचे मुख्याचे आज्ञेवरून किल्ला दिल्हा. तेथे कोणी मावळा सरदार शिवाजीनें ठेविला, आणि आपल्या देशचा कायद्याप्रमाणेंच तेथें वसुलादिकाची रीति चालविली, त्या कामावर ब्राह्मण ठेविला.

यानंतर विजापुरकरांचा एक पांच हजारां स्वारांचा सरदार तो शिवाजीचा निवारणाचा उद्योग करूं लागला. तेव्हां शिवाजीनें त्याचा पराभव करून त्याचे घोडे घेतले. त्या शिवाजीनें आपल्ये पाठिमागें कांहीं सैन्य ठेवून आपण पुढें आला होता. त्या सैन्यानें विलोर किल्ल्यास वेढा घातला असतां, शिवाजी तंजोर प्रांत हस्तगत करावयाचा यत्न करीत होता; त्याणें आपला सावत्र भाऊ व्यंकोजी यास त्रिवादें येथे भेटावयास बोलाविलें. कीं तुह्मीं एथे येऊन भेटावें, ह्मणजे वडिलांचे मुलखाचा विभाग करून घेऊं. तेव्हां तो निरुपाय होऊन आला. त्यास शिवाजी मोठ्या समारंभानें भेटला, आणि त्याजवळ मुलखाची अर्धी वांटणी मागीतली; परंतु तो ऐकेना तेव्हां शिवाजीचे मनांत आलें कीं बलात्कारावांचून मसलत सिद्धीस जात नाहीं; तथापि तो आपले संतोषें करून भेटीस आला ह्मणून शिवाजीनें त्यास माघारा तंजोरास जाऊं दिला; परंतु मनांत असा निश्चय धरिला कीं, एक तंजोर न घेतां जितका शहाजीचा

जहागीर

जहागीर मुलुख आहे तो सारा घेऊं. त्या वेळेस त्याणें व्यंकाजीस पत्र पाठविलें कीं माझेजवळ मुलुख पुष्कळ आहे, आणखी मुलखाची इछा नाहीं. परंतु माझी वतनाची जागा जर मी न घेतली तर मला योग्य नव्हे. त्यास कलह न करितां तंजोराचा अर्धा भाग व आरणी किल्ला व अणीक किल्ले व वर्कड मुलखांतील अर्धा भाग बरोबर द्यावा.

यानंतर शिवाजी विल्लोरास आला, आणि थोडकेच वेळांत त्याणें तीन किल्ले घेतले; आणखी एक वेदोभास्कर नामें ब्राह्मण आरणी किल्ल्याचा अधिकारी शहाजी पासून होता, तो येऊन शिवाजीस किल्ला देऊन आपण त्याचे चाकरीस राहिला; मग त्याच वर्षी शहाजीचे जहागीर प्रकरणी कोल्हार व बंगलोर, व उसकटा, व बाळापूर, व शेरा, हे सर्व घेतले; आणि त्याचे स्वार सर्व कर्नाटक प्रांतांत जाऊन, विजापुरकरांचा मुलखीं सरदेशमुखी व चौथ निमित्तेंकरून लुटते झाले.

शिवाजी या मोहिमेस निघाल्याचे पूर्वी, त्याणें खानजहान नामें मोंगलांचा सरदार होता त्याशीं स्नेहाचा तह केला होता; हें तहाचें वर्तमान औरंगजेबास कळलें तेव्हां तें त्यास मान्य वाटलें नाहीं. त्या वेळेस त्याचा दिलीरखान नामें दुसरा सरदार याणें मसलत केली कीं आह्माला विजापुरकरांचें लश्कर सहाय झालें असतां, आह्मीं गोंवळकोंडयाचें राज्य अगदीं निर्मूळ करूं. तेव्हां औरंगजेबानें त्या खान जहानास बोलावून आणून त्याचे जागीं दिलीरखानास पाठविला. याप्रमाणें मोंगल आणि विजापुरकर मिळून गोंवळकोंडकरांचा द्वेष करावयाचें कारण असें; गोंवळकोंडकरांनीं शिवाजीशीं स्नेह केला होता त्यांचा मादण्णापंतानें हीं दोन्हीं लश्करें एकदांच येऊन मोठा अनर्थ करितील असें समजून मोठें सैन्य जमा केलें होतें; मग ती दोन्हीं लश्करें आलीं तेव्हां, त्याणें आपल्या सैन्याचे सामर्थ्येंकरून त्या दोहीं लश्करांचा पराभव केला. त्यांत विजापुरकरांचा असा नाश झाला किं, त्यांतले कित्येक लोक लश्कर सोडून पळाले आणि जे राहिले ते रोजमुरा मिळेना ह्मणून युद्धास झटेनासे झाले. या खेरीज अबदुल करीम याचे शरीरीं समाधान नाहींसें होऊन सन सोळाशें अठ्याहात्तरांचे पहिले महिन्यांत तो मरण पावला. तेव्हां दिलीरखानाचा योगेंकरून शिद्दीजोहराचा जांवाई मसाउद खान शिद्दी तो अबदुल करीमाचा अधिकार चालवूं लागला. नंतर दिलीरखान पेरगांवीं लश्कर सुध्दां गेला.

हें सर्व वर्तमान शिवाजीला कळल्यावर तो आपल्या मुलखाकडे जाऊं लागला तेसमयीं त्याणें आपला भाऊ संताजी नामें, तो शहाजीचा दा-

सीपुत्र

र्सा पुत्र यास आणि रघुनाथनारायण व हंबीरराव सेनापती, यांस तें कर्नाटकचें काम सोपवून, आपण सातारा चालिला; तो बिल्लारी जवळ येऊन पोंहचला, तेथचा देसाई अधिकारी तो मरण पावला होता, आणि त्याची स्त्री तें स्थान संभाळून असे. तेथें त्या शिवाजीचा लष्करचें बुणगें मारिलें गेलें; तेव्हां शिवाजीनें तिला तें वर्तमान कळविलें; परंतु तिणें तें मनावरच आणिलें नाहीं. तेव्हां शिवाजीनें त्या किल्ल्यास घेरा घालून सत्तावीस दिवस युद्ध करून घेतला. मग कोपाळ नामें दुसरा किल्ला आणि बहादुरबेंडा हे घेतले; तेव्हां जनार्दनपंत सुमंत यास तेथचा बंदोबस्त राखावयास सांगून, पुढें चालिला. तो तुर्गल शहरीं पोंहचल्यावर व्यंकाजीनें पाठिमागें राहिलेल्या लष्करावर छापा घालून तोच पराभव पावला. असें वर्तमान शिवाजीला कळलें तेव्हां त्याणें त्यास लिहिलें कि तुमचे योग्यतेस्तव मला बलात्कारें करून मुलुख घ्यावा लागला; आणि आता तुमचे दांडगाईमुळें माझासरदारांसही तुमचें पारिपत्य करावें लागलें आतां तुम्हीं सावधपणानें विचार केलात, तर तुमचा आणि माझा स्नेह असावा याणें करूनच कल्याण; असें तुमचे ध्यानांत येईल; आतां मी तुम्हाशीं स्नेह करावयास सिद्ध आहें. परंतु तुम्हास वडिलांचा जितका मुलुख आहे तो सर्व माझे स्वाधीन करावा लागेल; आणि मग मी तुम्हांस योग्य असा दुसरा कांहीं मुलुख देईन. त्यानंतर व्यंकाजीनें रघुनाथ नारायणाचे योगेंकरून वडिलांचे वेळेचा अळंकारादिकांचा आणि मुलखाचा अर्धभाग करून दिला, आणि कांहीं द्रव्य देऊन शिवाजीस वश केला. तेव्हां त्याणें तंजोर आणि दुसरा संपूर्ण वडिलांचे परगण्यांतील कर्नाटकचा मुलुख त्याकडे राखिला; नंतर शिवाजी रायगडीं आगोठीस पोंहचला. इतकें काम करावयास त्याला दीड वर्ष लागलें होतें.

तिकडे कर्नाटकांत हंबीरराव व जनार्दनपंत यांणीं विजापुरकरांचें लष्कर तुंगभद्रा व कृष्णा या दोहीं मध्यें होतें तेथें जाऊन छापा घातला; आणि पांचशें घोडे व पांच हत्ती आणिले. त्यांकडील कोपाळ व बिलारी, याचे सभोंवते मोठे मोठे प्रबळ जे दंगा करणारे देशमुख होते, ते शिवाजीनें वश करून घेतले.

शिवाजी कर्नाटकांत होता ते वेळेस मोरोत्रिंमल पेशवे याजकडे जो मुलुख सोपविला होता तो युक्तीनें संभाळून जंजिरा याचा शिद्दीशीं मोठ्या निकरानें लढत होता त्या शिद्दीस मोंगलांचा आश्रय असे; तेसमयीं त्या ठिकाणीं शिद्दी संभोळ होता, तो औरंगजेबानें दूर करून त्याचेजागीं शिद्दी कासीम नामें दुसरा ठेविला. आणि त्याचे नावास याकूदखान असें पद जो-

डिलें

डिलें तें पूर्वी शिद्दी संबोळ याचेंही नावास होतें.

त्या वेळेस विजापुरकरानीं रजा दिलेले स्वार मोरोपंत ठेवूं लागला. कां कीं त्यास दिलीरखान येउन छापा घालील असें भय होतें; परंतु दिलीरखानानें जो दक्षिणेचा बंदोबस्त केला होता, तो औरंगजेबाचे मनास न येऊन त्याणें त्याचा तो अधिकार काढून सुलतान माजुमास दिला; आणि माल्क्यान त्यास दक्षिणेंत पाठविला; परंतु युद्धादिकामें दिलीरखानाकडेच राखिलीं होतीं. त्या वेळेस विजापुरचे मानकरी लोकांत वैमनस्यें पडलीं होतीं, ते लोक आपला मुख्य मसाउदखान याशीं वक्र होते; परंतु मोंगलाशीं फारच द्वेष करीत असत, असें असतां औरंगजेब याचा वकील विजापुरीं होता, तो मसाउदखानाचे स्थापनसमयीं जो करार केला होता, त्याप्रमाणें बादशाह बिबी अल्ली आदिलशाह याची कन्या मागूं लागला, आणि बोलिला कीं, न द्याल तर आमचें लश्कर आणून राज्य घेऊं. तेव्हां तो मसाउदखान तें मान्य करिना, यास्तव औरंगजेबाचें लश्कर विजापुरावर येऊं लागलें. इतक्यांत ती बादशाह बिबी आपल्ये सुशीलपणेंकरून मनांत समजली कीं मी जर संतोषानें मोंगलांस जाऊन मिळाल्यें तर माझे भावाचे जीवास आणि राज्यास भय नाहीं, म्हणून दिलीरखान औरंगजेबाचें लश्कर घेऊन येत होता, त्यांत जाऊन मिळाली. हें वर्तमान सनसोळाशें एकुणऐशींत घडलें, याप्रमाणें तिणें अनर्थोपशम यत्न केला परंतु तो उपयोगी पडला नाहीं; कांकीं त्या दिलीरखानानें तिचाबरोबर कांहीं लोक देऊन औरंगाबादेस पाठवून आपण पुढें चालिला.

अशा संकटसमयीं त्या मसाउदखानानें शिवाजीस मदत मागीतली. तेव्हां त्याणें मान्य करून पन्हाळ्यास पुष्कळ स्वार जमा करून विजापुराकडे चालिला; तो जवळ येऊन पोंचला तेव्हां त्यास समजलें कीं मोंगलांचें लश्कर बहुत मोठें आणि त्यांत पठाण फार आहेत. त्यांपुढें एकाएकीं युद्ध करावयाचा उपाय नाहीं; यास्तव तो भीमा उतरोन पलिकडे जाऊन मोंगलांचे मुलखांत दंगा करूं लागला. मग पुढें जाऊन गोदावरीचे उत्तरेस आलनेर शहर लुटलें; त्या शिवाजीला त्याचे जासुदानीं जिथें जिथें द्रव्य होतें त्याचा ठिकाणा लावून कळविलें होतेंच; त्यावरून त्यासमयीं त्याणें द्रव्याविषयीं पिशाचीही स्थानें सोडिलीं नाहींत. असें तीन दिवस झालें. सुलतान माजुम तेसमयीं औरंगाबादेस होता. त्याणें तेव्हांच त्याचें पारिपत्य करावें परंतु तें घडलें नाहीं मग तो शिवाजी तें द्रव्य घेउन रायगडास जाऊं लागला असतां संगमनेरास पोंचला; तेसमयीं त्याचे पाठिमागें मोंगलांचें सैन्य आलें तेथें मोठें युद्ध झालें. त्यांत मराठे लोकांचा पराभवच व्हावा इतक्यांत शिवाजीनें अत्यंत शौ-

र्यं करून

र्येकरून अटून युद्ध केलें आणि त्यास मागें हटवून आपण वाट चालूं लागला; तो बहुत दूर गेला नाहीं तों आणिक मोंगलांचें लष्कर आलें; त्यापुढें त्याचा उपाय चालेना. तेसमयीं त्याचे जासुदानीं मोंगलांचा लष्करास सांपडेनाशा चोरवाटानीं नेऊन, त्या शिवाजीचें लष्कर वांचविलें; तें पन्हा किल्यास स्वस्थपणें पोंचलें. मग मोंगलांचें सैन्य औरंगाबादेस माघारें परतलें. त्यानंतर शिवाजीनें चांगला समय पाहून पन्ह्याचे जवळ आसमंतात किल्ले होते ते घ्यावयाचा उद्योग केला तें काम मोरोपंतास नेमिलें.

शिवाजी पन्हाकिल्यावर असतां मसाऊदखानानें त्याला बहुत आर्जवाचें पत्र लिहिलें, कीं तुम्हीं यासमयीं कृपाकरून मला कुमक केलीत तरच, माझें राज्य राहील नाहींतर मोंगलांचें कार्य शेवटास जाईल अवकाश राहिला नाहीं. तेव्हां शिवाजी लश्कर सुद्धां उठून विजापुरीं जाऊं लागला, तेव्हां त्याला वाटेनें असें वर्तमान समजलें कीं आपला वडील पुत्र संभाजी, जाणें ब्राह्मणस्त्रीस बलात्कारें भोगिली यास्तव पन्हाळा किल्ला यावर बंदींत ठेविला होता; तो तेथून पळून जाऊन, दिलीरखानास मिळाला, यास्तव शिवाजीनें विजापुरीं जावयाचें काम हंबीरराबास सांगीतलें. आणि आपण संभाजीला माघारा आणावयाकरितां पन्हाळ्या कडे गेला.

तो संभाजी दिलीरखानानें प्रीतिपूर्वक संभाळिला, आणि औरंगजेबास पत्रीं लिहिलें कीं, हा संभाजी आपल्या हातीं लागला आहे, याचें खूळ माजविलें असतां, हे दोघे पिता पुत्र युद्धें कर्ता कर्ता हीनबळ होऊन मराठे लोक सहज निःसत्व होतील. ही कल्पना औरंगजेबाचे मनास आली नाहीं; त्याणें उत्तर पाठविलें कीं असें केलें असतां, बंड मात्र वाढेल; तें कामाचें नाहीं.

या उत्तरावरून असें दिसतें कीं औरंगजेब पहिल्यापेक्षां शहाणा झाला; परंतु पूर्वीं बंडकरणारे मराठे लोक प्रबळ झाले नव्हते, तेव्हांच त्याणें आपल्या मुसलमान लोकांचीं राज्यें रक्षुन, बंडें मुळींच वृद्धिंगत होऊं दिलीं नसतीं; तर मराठे लोक इतके सामर्थ्यवंत झाले नसते; शेवटीं तो औरंगजेब त्या बंडांचा पावल्यें करूनच नाश पावला.

त्या दिलीरखानानें औरंगजेबाकडून पत्राचें उत्तर आलें नाहीं, तोंच आपल्ये कल्पनेनें वागावयास प्रारंभ केला; तो असा संभाजीचें नाव ठेविलें कीं. हा मराठ्यांचा राजा, आणि आपलें कांहीं सैन्य देऊन शिवाजीच्या किल्ला गोपाळगड. यास घ्यावयास पाठविला तो त्याणें किल्ला घेतला.

हंबीरराव जो लश्कर सुद्धां विजापुरकरांचे कुमकेस जात होता, त्याला वाटेनें मोंगलांचे स्वार नउहजार भेटले. तेव्हां तेथें युद्धप्रसंग होऊन मोंगलांचा

स्वारांचा

स्वारांचा अगदीं पराभव झाला. त्यानंतर हंबीरराव तेथून पुढें जाऊन दिलीरखानाचे लश्कराजवळ राहिला, आणि त्यांस नाना प्रकारें उपद्रव देऊं लागला.

मोरोपंत यास किल्ले घ्यावयाचें काम सांगीतलें होतें त्याणें आहुंत किल्ला, आणि नलावागड, हे दोन्हीं घेतले; नंतर आपल्या लश्कराच्या लहान लहान टोळ्या करून अवघा खानदेशभर पसरल्या, आणि ते लोक जेर केले.

दिलीरखान विजापुर घ्यावयाविषयीं यत्न करीत होता फारच परंतु, लश्करास अन्नादि सामग्री शिवाजीच्या उपद्रवामुळें कमी येऊं लागली यास्तव उपाय चालेना; तेव्हां निराश होऊन विजापुरचे सभोंवता घेरा घातला होता तो उठवून, मुलुख लुटूं लागला. तो कर्नाटक प्रांतांतही जाऊन उपद्रव करूं लागला. तेथे जनार्दनपंत होता त्याणें कोणे एके वेळेस, त्या दिलीरखानाजवळ फार फौज नाहीं अशी संधी पाहून, सहा हजारां स्वारांनशीं छापा घातला. तेणें करून त्याचा फार नाश झाला आणि तो पळाला.

दक्षिणेंत असें वर्तमान झालेलें ऐकून, औरंगजेबानें सुलतानमाजुमास माघारा बोलावून नेला; आणि त्याचे जागीं पुनः खानजहान पाठविला त्याच वेळेस दुसरी आज्ञा आली, कीं संभाजीला कैद करून दिल्लीस पाठवून द्यावा; परंतु दिलीरखान संभाजीला अनुकूळ होता म्हणून ती औरंगजेबाची आज्ञा शेवटास जावयाचे पूर्वींच, त्याला पळून जावयास अवकाश सांपडला. मग शिवाजी आणि संभाजी एकचित्त झाले; परंतु संभाजीचा दुःस्वभाव गेल्याची संशयनिवृत्ति होई तों पर्यंत, त्याला शिवाजीनें पन्हाळ्या किल्ल्यावर रहावयाची आज्ञा दिली.

शिवाजी जा समयीं विजापुरकरांस वश झाला, ते समयीं असा नेम ठरला होता कीं कोपाळ, व बिल्लारी, या दोहों ठिकाणां संबंधें जो मुलुख आहे तो शिवाजीचे स्वाधीन व्हावा; या खेरीज द्रविड देशांतील जितका मुलुख शिवाजीनें घेतला होता त्याविषयीं विजापुरकरानीं स्पर्धा न करावी; आणखी तंजोर वगैरे जितका मुलुख शहाजीच्या कर्नाटकांत जहागीर असेल तितका तसाच असावा. या प्रमाणें बंदोबस्त झाल्यावर शिवाजी विजापुरीं जाऊन त्या मसाउदखानाशीं व त्याशीं एकांत झाला.

त्या शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकाजी त्याला असें वाटलें कीं विजापुरकर शिवाजीला इतके अनुकूळ झाले, त्यास आतां आपला स्वतंत्रपणा राहिला नाहीं; मग निरिच्छ झाला आणि राज्यकारभार टाकून विरक्ताप्रमाणें वर्तूं लागला; ते समयीं शिवाजीनें त्याला हितोपदेशार्थ पत्र लिहिलें त्या पत्रांतील अर्थ लिहिला आहे.+

---

\+ त्याकडून फार दिवस पत्र आलें नाहीं, तेणें करून आमचे चित्तास सुख वाटेनासें

यानंतर [illegible] अल्पकाळ गडावर आला तों [illegible] असा रायगडीं असतां त्यास गुडघी रोग झाला. तो प्रतिदिवशीं वृद्धिगत होऊन, मग त्याचाच प्राबल्येंकरून फार मोठा ज्वर आला; तो सहा दिवस सोसून सातव्या दिवशीं मृत्यु पावला. तो दिवस सन सोळाशें ऐशींच्या चवथ्या महिन्याची पांचवी तारीख. तो मेला त्या वेळेस त्याचें वय त्रेपन्ना वर्षांचें होतें.

शिवाजी मोठा चमत्कारिक पुरुष होता, त्याचीं कित्येक कृत्यें सदोष होतीं तथापि त्याचे शौर्यादि गुण लेखांत असून लेख पूर्ण व्हावा हें उत्तम दिसतें, त्यास त्याचे गुण पूर्णपणें ध्यानांत आणावयाकरितां, पहिल्यापासून त्याचा कृत्यांचा विचार केला पाहिजे. प्रथमतः मावळे लोक अर्धे नग्न आणि अरण्यांत रहाणारे, अशांची संगत धरून त्या शिवाजीनें आपल्या मोठेपणाचे वृद्धीस आरंभ केला तो असा, त्याणें शीतोष्ण पर्जन्य यांचें सहन करून आपल्या कार्यासाठीं त्या रानवट लोकांचीं मनें वश करून घेतलीं. याप्रमाणें आपले अर्थसिद्धीस न्यावयाकरितां, जाजा कल्पना त्याणें केल्या, त्या पुढें दुसरा कोणी करील असें दिसत नाहीं. तो युद्धप्रसंगांतही प्रजेच्या बंदोबस्तांत अंतर पडूं देत नसे; अणखी प्रजांच्या हितार्थ त्याणें नवे नवे कायदे केले होते; आणि संकटसमयीं त्याणें आपला जीव बहुत युक्तीनें वांचविला. चोरघस्तीनें किल्ला घेणें, किंवा मुलुख हस्तगत करणें, आणखी धाकट्या परगांच्या बंदोबस्त राखणें, इत्यादि लहान मोठ्या सर्व कामाविषयीं त्याचें चातुर्य सारिखें होतें. तो मोठ्या योग्यतेस आला आणि त्याजवळ बहुत द्रव्य झालें तरी, त्याणें आपल्या कायद्याखेरीज खर्च केलाच नाहीं. अणीक जें विशेष द्रव्य मिळविलेलें त्यापैकीं शिपाई लोकांस देऊं केलें, लोभेंकरून आपणास ठेविलें नाहीं. या गुणावरून असें वाटतें कीं तो अद्वितीय पुरुष होता. परंतु राज्यकार्य करण्यांत, त्याचे बुद्धीस सरळमार्गापेक्षां कुटिलमार्ग चांगला वाटे; हा एक त्याचा दोष,

---

से जालें, तुह्माविषयीं आह्मास रघोपंतानें लिहिलें आहे कीं तुह्मीं निरिच्छ होऊन पहिल्याप्रमाणें आपल्या शरीरास जपत नाहीं; आणि मनोत्साह योग्य दिवसही मानीत नाहीं; तुमचें लश्कर उगेंच बसलें आणखी तुह्मीं राज्यकारभार टाकून, विरक्ताप्रमाणें वागूं लागलां. यायोंकरून मला मोठी चिंता वाटते; आह्मी असें ह्मणतों कीं आपले वडील किती सावध होते आणि तुमचा असा स्वभाव कसा झाला; हें तुह्मास योग्य नव्हे. त्यास आजपासून हें विरक्तपण टाकून स्वस्थपणें प्रजेचें पालन करावें. आणि आपलें सैन्य चांगलें राखून उत्तम कामामध्यें सत ठेवावें. सर्व कारभारी यांजपासून चाकरी घेऊन आपली प्रतिष्ठा संभाळावी; जो माझा कनिष्ठबंधू तूं आहेस त्या तुझी स्तुती मीं कानानें ऐकेन तर मला बहुत आनंद होईल. रघुनाथपंत तुह्माजवळ आहे तो माझाप्रमाणें तुमचा उपयोगी पडेल; जें करणें तें त्यास विचारून करावें, सारांश आळशीपणा करूं नये, तारुण्य बहुत उपयोगाचें आहे, यांत वैराग्य कामाचें नाहीं; आतां तुह्मी सावधपणा धरून मला त्याचा प्रत्यय दाखवा.

आणि

आणि त्याणें कित्येक वेळा आपलें क्रौर्य, आणखी घातकपणा प्रसिद्ध करून दाखविला.

त्या शिवाजीची स्तुती करणारे जे मराठे लोक ते ह्मणतात कीं तो अवतारी पुरुष होता. तो आपल्ये कुटुंबांत केवळ साधा, आणि भिडस्थपणानें वागत असे; बाहेर तर सर्वांशीं प्रिय भाषण करी, परंतु कोणाच्या वर्चडपणा होउं देत नसे. त्याचा स्वभाव शीघ्रकोपी असे, परंतु त्याचे सोयरे धायरे व पदरचे लोक यांचे हिताचें फार अगत्य बाळगी. त्याची आकृति लहान. आणि बळापेक्षां चापल्य विशेष होतें; त्याचें मुख सुरेख होतें त्यावरूनच तो गुणवानसा वाटे. त्याचे उंचीपेक्षां हात लांबीस अधिक होते. त्याणें आपल्ये तरवारेचें नांव भवानी ठेविलें होतें, ती तरवार अद्यापि सातान्यांत त्याचे वंशय देवीप्रमाणें पूजितात.

शिवाजीला चौघी स्त्रिया होत्या. एक सईबाई निंबाळकरांची कन्या, एक सोयराबाई ती शिर्के यांची कन्या, एक पुतळाबाई मोहित्यांची कन्या, आणि चवथी एक होती. त्यांत दोघी शिवाजी असतांच मरण पावल्या; आणि सोयराबाई व पुतळाबाई या दोघी होत्या; त्यांत पुतळाबाई शिवाजीचा मरणानंतर महिनां+दीड महिन्यानें सती गेली; सोयराबाई तिचा पुत्र राजाराम, संभाजीची आई सईबाई ती अगोदरच मेली होती. शिवाजीचे मरणापूर्वी आनाजीदत्तो व मोरोपंत वगैरे कोणी मोठे मोठे लोक जवळ असतां शिवाजी बोलिला कीं, माझ्या मरणानंतर संभाजीचा दुष्टस्वभावेंकरून राज्यास अपाय होईल, असें दिसतें. ही गोष्ट सोयराबाईस कळली तेव्हां तिचे मनांत आलें कीं संभाजी एकीकडेस करून आपला पुत्र राजाराम यास तक्ताधिपती करावा; यास्तव तिणें सर्व प्रधान वश केले, त्यावरून असें ठरलें कीं ते प्रधान ह्मणाले, राजाराम लहान आहे तों पर्यंत त्याचे नावें आह्मीं राज्य कारभार चालवूं. ही मसलत सिद्धीस न्यावयाकरितां जनार्दनपंत सुमंत, यास पन्हाळा किल्ल्यास लश्कर सुद्धां पाठविला. आणि रायगडास शिबंदी नवी ठेविली; आणीकही लश्करांचा कांहीं कांहीं बंदोबस्त ठेविला. त्या वेळेस पन्हाळ्यावर संभाजीचा बंदोबस्तास जो हिराजी फरजंत होता, त्यास या साऱ्या मसलतीचें पत्र पाठविलें; तें जासूद किल्ल्यांत देत असतां त्या संभाजीचे हातीं लागलें; तेणेंकरून त्याला सर्व विदित झालें. तेव्हां त्याणें तेथची शिबंदी व-

+ दीड महिन्यानें सती जावयाचें कारण असें, शिवाजी मरण पावला हें वर्तमान त्याचे कारभारी याणीं संभाजीस न कळावें ह्मणून गुप्त रक्षिलें. त्याचाच कोणी भाऊबंद शहाजी भोंसला नामें होता त्याचे हातून त्याचें दहन वगैरे अत्यंत गुप्तपणें करविलीं.

श करून घेतली आणि जे तेथें मुख्य सरदार दोघे होते ते जिवें मारिले; आणखी आपण किल्ल्याचें स्वामित्व करूं लागला. तेव्हां कोणी शत्रु मित्र नजाणतां किल्ल्याचा बंदोबस्त ठेविता झाला. तेव्हां जनार्दनपंत सैन्यासहित आला त्याणें किल्ल्या सभोंवता घेरामात्र घातला, आणि तेथें उगाच महिना दोन महिने राहून, शेवटीं आपण जाऊन कोलापुरांत राहिला. इतक्यांत रायगडीं राजारामास तख्ताधिपती करून राज्यकारभार चालविला, तो सुमार सन सोळाशें ऐशींचा सहावा महिना. नंतर थोडक्यांच दिवसांनीं पेशवे आणि सचिव यांमध्यें वैमनस्य पडलें.

इकडे पन्हाळ्यावर संभाजी होता त्याणें जनार्दन पंताचे लश्करांतले कितेक लोक वश केले, आणि आपल्या किल्ल्यांतील कित्येक मावळे लोक बरोबर घेऊन, रात्रीस त्या लश्करांतून कोलापुरांत जाऊन जनार्दन पंतास धरून पन्हाळ्यावर नेला. हें वर्तमान मुलखांत प्रसिद्ध झालें तेव्हां हंबीरराव सेनापती संतुष्ट होऊन बोलिला कीं हा शिवाजीचा पुत्र खरा, आणि त्यापासून त्या सेनापतीनें त्या संभाजीची चाकरी धरिली. तसाच मोरोपंतही त्यास अनुकूळ जाला; हंबीरराव संभाजीचे भेटीस गेला तेव्हां तो पन्हाळा सोडून रायगडीं जावयास निघाला. तो तेथें जाऊन पोंचला नाहीं तोंच तेथील शिबंदीनें त्याचें अगत्य धरिलें; आणि इतरही लश्करें त्यास राजी झालीं, तो संभाजी सन सोळाशें ऐशींचा सहाव्या महिन्यांत रायगडीं दाखल झाला.

---

सन सोळाशें ऐशीं पासून, सोळाशें एकुणनव्वद पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून, भाग दहावा.

## अनुक्रमणिका.

संभाजी राज्य घेत असतां, त्याणें काय काय निर्दयपणा केला.

त्याणें स्वदेशापासून शिद्दीला हांकून घावयाचा उद्योग केला, परंतु तो व्यर्थ गेला.

औरंगजेबाचा पुत्र सुलतान महंमद आकबर, तो आपल्यें संरक्षणार्थ, संभाजीजवळ राहिला.

त्या संभाजीचा सावत्र भाऊ राजाराम यास अधिपती करून संभाजीला काढावा असें त्याचे जवळच्या लोकांहीं योजिलें, त्यावरून संभाजीनें कित्येक लोक जिवें मारिले.

मोंगलांचें

मोंगलांचें लश्कर कोंकणांत गेलें, तें संभाजीनें मागें हटविलें.

त्याणें शिद्दीचा जंजिऱ्यास घेरा घातला; आणि उठून गेला.

मग पोर्तुगीस लोकांशीं युद्ध करूं लागला.

त्याचा वजीर कलुशा याची गोष्ट.

पूर्वी शिवाजीचे वेळेस जो लश्कराचा बंदोबस्त होता, तसा संभाजीचे राज्यांत चालिला नाहीं; त्याचा परिणाम कसा झाला तें प्रकरण.

औरंगजेब दक्षिणेस आला त्या वेळेस, देशाचा प्रकार काय होता तो.

औरंगजेब अहमदनगरास आला त्या वेळचें त्याचे संपत्तीचें स्वरूप कथन, केलें तें प्रकरण.

मोंगलांचे लश्करानें काय आचरण केलें तें.

औरंगजेबानें गोंवळकोंडकरांशीं सल्ला केला.

विजापुर मोंगलांनीं घेतलें तो प्रकार; त्यावर तें राज्य बुडून शहर ओस पडलें.

पहिला झालेला सल्ला मोडून गोंवळकोंडें औरंगजेबानें घेतलें, त्यावरून तें राज्य बुडालें.

हंबीरराव मराठा सेनापती शिरजीखानास जिंकून आपण मरण पावला तो प्रकार.

कर्नाटकांत काय काय वर्तमान झालें तें.

संभाजी केवळ अयोग्य, असें समजून सुलतान महंमद आकबर निघोन गेला.

नंतर दक्षिण देशाची दुर्दशा झाली, तें प्रकरण.

इंग्रेज लोकांनीं समुद्रांत उपद्रव केला, तो प्रकार.

संभाजी आपल्या वजिरासुद्धां औरंगजेबाचे कैदेंत सांपडला.

त्या दोघांचें मरण.

## भाग दहावा.

संभाजी शिवाजीचें मरण कळल्यावर केवळ पराक्रमें करून वागूं लागला; त्यावरून लोक कल्पना करूं लागले, कीं आतां याणें आपलें दुर्लक्षण टाकिलें; आणि त्याप्रमाणें त्याची स्तुतीही करीत होते; परंतु तो रायगडीं पोंचतांच त्याचें क्रूरपण लोकांत प्रसिद्ध झालें. तें असें: आनाजी दत्तो, याचे बिडी घालून बंदींत टेविला; आणि त्याची सारी दौलत घेतली; आणि त्याचा आपला सावत्र भाऊ राजाराम, त्यालाही बंदींत ठेविला; आणि त्याची आई सोयराबाई

सोयराबाई, ती आपल्या समूर आणून तिला नानाप्रकारें अमर्याद बोलून, असें ठरविलें कीं, हिणें आपला पती विष घालून मारिला; त्यास आतां हीचे हाल करून मारावी. अशी आज्ञा केली. तेणें करून ती मरण पावली. आणखीजे तिजकडचे सरदार होते. त्यांचीं डोकीं मारिलीं. आणि एक सरदार फारच तिचा अगत्याचा होता. त्याचा कडेलोट केला. अशा क्रूरपणानें तो लोकांचा मनांतून उतरला. तेव्हां ते लोक याचा प्रारंभच दुःशकुन असें ह्मणूं लागले, मग सन सोळाशें ऐशींचा आठव्या महिन्यांत त्याला राज्याभिषेक झाला, त्यापासून मुलखांत लोकांसही दुःशकुन दिसूं लागले.

संभाजीस राज्याभिषेक झाल्यावर, प्रथम त्याणें जंजिऱ्याचा शिद्दीशीं युद्ध केलें. तें युद्ध पूर्वी शिवाजी असतांही, निरंतर चालत होतें: शिवाजीनें आपल्या मरणाचे पूर्वी एक वर्ष, मुंबईचे जवळ लहान लहान दोन बेटें आहेत, एकाचें नाव उंदेरी, एकाचें नाव खांदेरी, त्यांत शिवाजीनें उंदेरी बेटावर किल्ला बांधिला, तो शिवाजी पासून घ्यावयास उद्युक्त झाले; परंतु तो अर्थ सिद्धीस गेला नाहीं. नंतर दुसऱ्या खांदेरी बेटावर शिद्दीनें किल्ला बांधिला; तो घ्यावयाचा उद्योग शिवाजीनें केला, तोही सिद्धीस गेला नाहीं. असे ते दोघे किल्लेदार लढत होते.

सन सोळाशें एक्यायशींत संभाजी पन्हाळ्यास जाऊन राहिला; तेथे त्यास असें वर्तमान समजलें कीं, ओरंगजेबाचा पुत्र महंमद आकबर याणें बंड करून बापाशीं लढणार होता तें त्यास कळलें, तेव्हां पळून आपणाकडे आश्रय मागावयास आला; यास्तव आपला कोणी मोठा मानकरी त्याचे भेटीस पाठवून, त्याची दुसरे गांवीं राहावयाची सोय केली; परंतु आपण कांहीं कामानिमित्त गेला नाहीं. इतक्यांत, आनाजीदत्तो याचा पक्षपाती लोकांनीं, त्या महंमदाशीं राजाराम याचा हिताविषयीं संभाजीचा घाताची कांहीं मसलत केली. तें वर्तमान संभाजीस कळून, त्याणें महंमदास अपराधी जाणला; इतक्यांत त्याणेंच संभाजीस कळविलें कीं, इकडे याप्रमाणें वर्तमान आहे; तेव्हां संभाजी मोठ्या समारंभानें त्याचे भेटीस गेला. मग त्याणें आनाजीदत्तो व, शिरके कुळांतील जे मुख्य सांपडले. ते व परभू बाळाजी आजी चिटनीस व त्याचा पुत्र, व त्याचा दुसरा कोणी एक भाऊबंद, इतके हत्तींचा पायीं दिले. यानंतर शिरके कुळांतील जे कोणी मोठे मोठे राहिले, ते भयें करून पळाले; आणि कित्येक मोगलांचा चाकरीस राहिले. त्याचा अशा अन्याय कर्मांहीं सारे लोक त्यास कंटाळले. कां कीं आनाजीदत्तो शिवाजीचे वेळेस बहुत उपयोगीं पडला; आणि तो जातीचा ब्राह्मण होता.

त्यावेळेस संभाजीचे जवळ हिंदुस्थानांतून आलेला कन्होजा एक ब्राम्हण कलुशा नामें होता, तो गुप्तपणें संभाजीस मसलत देत असे. त्याप्रमाणें संभाजी वागे. त्याणें शिकविलें कीं, मोरोपंत पिंगळा पेशवा, यास बंदीस घालावा; कांकिं, त्याणें आनाजी दत्तो, याचा मरणावरून तुमची फारनिर्भत्सना केली, आणि आपणही कंटाळला असें दर्शिवलें ह्मणून.

त्यासमयीं रघुनाथ नारायण हणमंते, याणें आपलें संस्थान, दुसऱ्यास संभाळावयास सांगून, कर्नाटकांतून निघोन, संभाजीचे भेटीस रायगडीं आला. त्याणें आपल्ये बरोबर कांहीं वसुलाचें द्रव्य आणिलें होतें, ह्मणून संभाजी त्याचा संमानास मोठें दरबार जमा करून भेटला. तो रघुनाथ नारायण, मोठा धैर्यवान होता; त्याणें त्याच समयीं अनीतीविषयीं संभाजीस निषेधिलें, आणि बोलिला कीं, जर तुह्मीं पुरातन सेवकांचा असा घात कराल तर लवकरच नाश पावाल.

तो रघुनाथ नारायण एवढ्या धैर्यानें बोलिला त्या गोष्टीचें आश्चर्य वाटेलच; कांकीं त्याचा भाऊ जनार्दन पंत तोही संभाजीचा बंदीत होता; परंतु विचारें करून पाहिलें असतां, संभाजीस अशी शंका होती कीं, जर यास कांहीं उपद्रव केला, तर, कर्नाटक प्रांत हातचा जाईल. यास्तवच त्याणें जनार्दन पंत व मोरोपंत पिंगळे, यांस सोडिलें. आणि रघुनाथ नारायणाचा संमान करून कर्नाटकांत जाऊं दिला. तो जातांनां वाटेनेंच मृत्यु पावला; तरी जनार्दन पंताला संभाजीनें त्याचे जागीं स्थापिला. याशिवाय संभाजीनें त्यावेळेस कर्नाटकचा हरजी राजा जास रघुनाथ नारायणानें आपल्ये जागीं ठेविला होता, तो तसाच रक्षिला. यावरून संभाजीचें आचरण कांहींसें बरें दिसूं लागलें. परंतु तें टिकलें नाहीं; त्या कलुशाचा संगतीनें नष्ट झालें.

संभाजी आणि महंमद आकबर, यांची मैत्री झाली त्या वेळेस, लोक कल्पना करूं लागले कीं, हा ओरंगजेबाचें राज्य घेऊन, महंमदास स्थापील. परंतु त्याणें आपल्या नीचपणाप्रमाणें केवळ क्रोधवश होऊन गर्विष्ठतेनें, मोठीं मोठीं कामें टाकून शिद्दीच्या अतिद्वेष करावा हेंच मोठें कार्य, असें मानून, जंजिरा मात्र घ्यावयाविषयीं बहुत श्रम केले. परंतु तोही अर्थसिद्धीस गेला नाहीं. त्यानंतर त्याणें लढाऊ गलबतें जमा करून, शिद्दीचा लढाऊ गलबतांशीं युद्धें केलीं; त्यांतही ठाण्याचे खाडी जवळ संभाजी पराभव पावला. तेव्हां तो क्रोधयुक्त होऊन, तेथें इंग्रेज व पोर्तुगीस लोक होते, त्यांस बोलूं लागला कीं, तुह्मीं माझा पक्ष स्वीकारीत नाहीं, आणि माझा शत्रूला आश्रय देतां; यास्तव तुह्मांही शत्रूच आहांत. हें वर्तमान सन सोळाशें ब्यायशींत घडलें.

नंतर

नंतर पोर्तुगीस लोकांचे गांवांस तो उपद्रव देऊं लागला; आणि मुंबेचा वांकणांत घारापुरी नामें एक बेट आहे, तेथें मुंबैस उपद्रव करावयाकरितां किल्ला बांधित होता; परंतु त्यास असें वर्तमान समजलें कीं, औरंगजेब मोठ्या तयारीनें येतो आहे; तेव्हां तें काम तसेंच राहिलें.

संभाजीचा कारकिर्दीत मोरोपंत पिंगळा बंदीस घातल्यापासून मुख्य कारभारी कलूषा झाला. पुढें बंदांतून सुटल्यावर मोरोपंत लवकरच मेला. कलूषाशिवाय संभाजी दुसऱ्याचें ऐकत नसे; आणि त्याचे वर्गावांचून कोणी समूर आला असतां, त्यावर रागें भरून त्याचें पारिपत्य करी. संभाजी इतका त्या कलूषाचा स्वाधीन झाला, त्यावरून लोक ह्मणत कीं यास कांहीं तरी, पक्कें वशीकरण साधलें आहे. त्या कलूषास लोक फार निंदीत होते, परंतु तो मोठा मनमिळाऊ होता, आणि तो कवी असे, परंतु राजकारभारास अयोग्य होता; त्यास संभाजीनें प्रधानांमध्यें पंडितराव असें पद दिलें. प्रधान असा दुष्ट, आणि राजा या प्रकारचा, तेणेंकरून शिवाजीचे वेळेस जे बंदोवस्त होते, ते सर्व मोडूं लागले. त्यांत प्रथमतः लष्कराचा बंदोबस्त बिघडला, तो असा, जे लष्करचे चाकर शिपाई लोक होते, त्यां खेरीज लोकांत ही, ज्याचा मनास येईल त्याणें स्वारी निघाली ह्मणजे बरोबर जावें. कोणास कांहीं लूट सांपडली असतां, त्याणें ती संभाजीस कळवूंच नये; आणि लष्करामध्यें वायकाही बरोबर न्याव्या; आणखी लोकांचा बायका धरून नेऊन विकाव्या. स्वारी माघारी आली ह्मणजे लोकांस पैका द्यावयास मिळेना ह्मणून, लूट करावयाची आज्ञा दिली होती.

संभाजी भलत्याच जागीं खर्च करीत होता यामुळें, थोडक्याच दिवसांत खजिना संपला असतां, त्या कलूषानें त्यास बुद्धि शिकविली कीं, स्वारी केल्यानें द्रव्य मिळत नाहीं, तर रैतेपासून वसूलच अधीक घ्यावा. तेव्हां त्याणें तसेंच केलें, परंतु जमाबंदीचे वेळेस असें समजलें कीं, शिवाजीचे वेळेपेक्षां जितका चढ केला, तितका तोटा आला. त्यावरून तो समजला कीं, यांत सुभेदार, व पाटील, व जमेदार, इत्यादिकांचें कांहीं कृत्रिम आहे; यास्तव त्यांस दूर करून, सर्व कामें मरयत्यानें सांगीतलीं; तेव्हां रैतेनें त्रासें करून गांव टाकिले; येणेंकरून संभाजीचा राज्यांत नाशप्रसक्ति झाली. या खेरीज त्याचवेळेस औरंगजेब दक्षिण घ्यावयाकरितां दिल्लीहून बऱ्हाणपुर पावेतों आला होता. तें वर्ष सन सोळाशें ऱ्यायशीं. त्यावेळेस गोंवळकोंडकरांचें व विजापुरकरांचें काय काय वर्तमान होतें तें समजलें पाहिजे.

हैदराबादेंत अबूहुसेन बादशाह होता, त्याजवळ बहुत द्रव्य आणि

सेना

सेना मोठी होती; व त्याचा कारभारी अत्यंत शहाणा, हिंदू ब्राह्मण, मादण्णापंत नामें होता, तो त्या राज्यांत जितके हिंदुलोक होते, त्यांस अत्यंत प्रिय वाटे; परंतु तेथचा मुसलमानास तो जातीचा ब्राह्मण, आणि डोयजड ह्मणून फारच विषमवाटे; याखेरीज औरंगजेबाचा वकिलानीं, तेथचा कारभारी लोकांनवेम नस्यें पाडिली; तथापि, अबूहुसेन त्या मादणापंताची योग्यता जाणून, त्या वांचून दुसऱ्याचा विश्वास धरीत नव्हता.

यापूर्वी गोंवळकोंडयाचें राज्य ह्मटलें आहे, तें, हैदराबादचें असें समजावें.

विजापुरास औरंगजेबाचा वकील होता, त्याचें नाव, मलिरवबेररवोरदार, त्याणें त्या दरबारचे कित्येक कारभारी, व कित्येक सरदार लोक वश केले; त्यांमध्यें एक मुसलमान शिरजीरवान नामें सरदार तो त्या सर्वांपेक्षां प्रतापी होता, त्याशीं पूर्वी मसाउदरवानाचें, सेनेसंबंधें कांहीं वांकडें पडलें होतें, ह्मणून, त्याणें एक सैयद मरवदूम मानकरी यास मसाउदरवानाचे जागीं स्थापावयाची योजना केली होती; आणि तो मसाउदरवान, राज्यकारभार टाकून, शिवाजी मेल्यावर एका वर्षानें विजापुर सोडून आंदोणीस जाऊन राहिला होता, तेव्हां तेथचा राज्यकारभार कोणी चालविला तें कळत नाहीं; परंतु इतकें समजतें कीं, औरंगजेबाचा वकिलानें, विजापुरकर, व मराठे लोक यांशीं स्नेह नसावा ह्मणून, शिवाजीनें घेतलेला, कृष्णेचे कांठचा मुलुरव होता, तो, त्यांस माघारा घ्यावयास शिकविलें; त्यावरून त्याणीं फौज पाठवून, तो मुलुरव घेतला, तेणेंकरून त्यांचे स्नेहांत तूट पडली; असें त्या वकिलाचें छत्य शेवटास न जातें तर, हैदराबादचा कारभारी मादण्णापंत याचे बुद्धीस आलें होतें कीं, हे दोन्ही एकचित्त करून औरंगजेबाचें कांहीं चालू देऊं नये, ती मसलत उपयोगास पडती परंतु तें नघडलें. याखेरीज विजापुरचे राज्याचा नाशाचें कारण अणिक एक झालें, तें असें, शिवाजी असतां, त्या मसाउदरवानानें कित्येक स्वार दूर केले, ते, शिवाजीकडे जाऊन राहिले; तो निवर्तल्यावर, ते संभाजीजवळ होते; त्याचवेळेस विजापुरचे मनसबदारही कित्येक संभाजीकडे राहिले होते, असेच मराठे मनसबदार निजामशाहींत होते जे त्यांचे कित्येक भाऊबंद संभाजीचा लश्करांत चाकरीस राहिले होते, यावरून, कित्येक ते लोक आपल्या वतनासाठीं निरंतर भांडत, आणि त्यावादाकरितां जो सबळ पक्ष असेल, तिकडे मिळोन वतन घ्यावयाचा अभिमान शेवटास न्यावा ह्मणून, कित्येक आपला धर्महीं टाकीत असेत.

औरंगजेब बऱ्हाणपुरास येऊन कित्येक महिने मुलरवाचा वसुलाचा

बंदोबस्त

बंदोबस्त व हिंदुलोकांवर जिजीयानामें कर बसविणें,+ व दक्षिणेंत स्वारी घालावयाची तयारी करीत होता. प्रथम त्याणें सुलतान माजूम यास शाहअलं असें मोठें पद देऊन, संभाजीचा मुलखांतील दक्षिणे कडचा मुलुख घ्यावयास पाठविला, आणि त्याचे उत्तरे कडे खानदेश लगत्याचे किल्ले व मुलुख घ्यावयास, सुलतान आजीम यास पाठविला, आणि आपण बह्राणपूर सोडून औरंगाबादेस आला. मग सुलतान माजूम आंबेदराघाटानें कोंकणपट्टींत आऊन, कालियानी परगण्यांतून, रायगडापासून वेंगुर्लें व मालवण पर्यंत मुलुख लुटून जाळून टाकिला, सुलतान् आजिम साल्हेर किल्ला घ्यावयास गेला, त्याचे हातीं तो किल्ला दग्यानें सहज लागला; परंतु पुढें पुढें त्याचें कांहीं कार्य सिद्धीस गेलें नाहीं तोंच औरंगजेबानें, त्यास मायारां बोलावून, त्याचे जागीं शाबूदिन खान नामें दुसरा सरदार पाठविला. तो फार गर्वानें आला, परंतु जय न पावला. रामशेज किल्ल्याजवळ त्याचा फार नाश होऊन तो मागें हटला.

इतक्यांत सुलतान माजूम आपण मुलुख ओस पाडिल्यानें, आणि संभाजी विशाळगडीं होता, त्याचा लोकांचा उपद्रवामुळें, उपाशीं मरूं लागला. तेव्हां औरंगजेबानें शाबूदिनखान यास घाटाचा वाटा मोकळ्या करायास पाठविला, आणि सुरतेचा जो मुख्य अधिकारी त्यास आज्ञा केली, कीं गलबतांत दाणा भरून दंडाराजपुरी व वेंगुर्लें, यास पोंचता करावा. तें निकडीचें काम म्हणून त्या सुरतवाल्यानें एकेक गलबत भरून पाठविलें, तें वर्तमान संभाजीचा लढाऊ गलबतांस कळून, त्याणीं तीं गलबतें बहुतेक लुटलीं; त्यांतलीं कांहींशीं गलबतें जाऊन पोंचलीं, नितक्यानें साहित्य पुरेसें झालें नाहीं, म्हणून सुलतान माजुम सैन्यसुद्धां आंबेघाट चढून कृष्णेचे कांठीं वळवें गांव यास पर्जन्यकाळीं राहिला; हें वर्तमान सन सोळाशें चौऱ्यायशींत घडलें.

जो शाबूदिन खान सुलतानाचे कुमकेस पाठविला, त्याची व संभाजीची गांठ पडली, तेव्हां त्या दोघांचें कांहींसें युद्ध होऊन, शाबूदिन जय पावला. हें वर्तमान औरंगजेबास कळून, तो मोठा लाभ नसतांही शाबूदिन, त्याचे कृपेंतला व त्याजवळ अस्सल मोंगल होते त्यांचें मन संतुष्ट व्हावया करितां, त्या शाबूदिनाचा मोठा संमान करून, त्यास गाजीवदिन, असें नवें नाव दिलें; त्या पुढें दक्षिणेंत जें निजामउलमुलुख नामें कुळ विख्यात झालें, त्याचा तो शाबूदिनखान मूळपुरुष.

मग पाउसकाळ गेल्यानंतर औरंगजेब दक्षिणेंत मोठ्या समारंभा-

+ जिजियाकर म्हणजे, आजवळ हजार रुप्ये त्याणें वर्षास साडेसाहा रुपये द्यावे.

नें चालूं लागला.

तेव्हां त्याणें आपल्या राज्यांतल्या सर्व प्रांतांतील सैन्य वळून जमा केलें होतें. त्यांत उत्तरेकडचे लोक यांचीं शरीरें मोठीं आणखी आंगांतून चिलखातें चढविलेलीं तीं जड लोखंडाचीं व त्यांचे घोडेही, मोठे मोठे आणि पुष्ट, असें पाहिलें असतां दक्षणी लोक त्यांपुढें केवळ सुकुमार दिसत; तसेंच पायदळांमध्यें, कित्येक चापाचे बंदुकवाले, व कित्येक तोड्याचे बंदुकवाले, व कित्येक तीरकमाणवाले असत. त्यांचा सरंजाम बहुत उत्तम होता, आणि लहान व मोठ्या तोफा पुष्कळ असत; व गोलंदाजांमध्यें फिरंगी होते; या खेरीज कित्येक ओझीं वहावयाचे, व कित्येक लढाऊ असे हत्ती बहुत होते. त्या औरंगजेबाचा दिल्लीमध्यें असा बेत चालत होता, त्यांत किमपि अंतर न पडतां, प्रवासांतही तसाच चालत असे. त्याचा शिकारखानाही बरोबर होता. त्याचा डेऱ्यांचा सभोंवती लावायाची कनाथ सोळाशें हात लांब होती; त्याचा कचेरीचा डेऱ्यांत व एकांतीं मसलत करावयाचा डेऱ्यांत, त्याचें बसावयाचें रत्नजडीत सुवर्णाचें अत्यंत सुंदर सिंहासन मांडलेलेंच असे, या खेरीज अंतःपुरसंबंधी विषयोपभोगार्थ, कित्येक डेरे असत; आणि स्नान संध्ये सारिखें त्या लोकांचें कांहीं नित्यकर्म आहे, त्या कामाचेही कित्येक होते, तितक्या ठिकाणींही विलायती सखलादा व मखमालेचीं आस्तरणें, इत्यादिक व सुवर्णयुक्त नानाप्रकारचीं वस्त्रें मोठीं मोठीं उंच परिपूर्ण, जांचा तोटाच नाहीं.

त्यांत जावयाचे वाटेवर दोहीं बाजूनें, तोफा ओळीनेंच उभ्या केलेल्या; त्यांमधून आंत जातांच पहिला डेरा नगारखान्याचा लागावा; त्याहून पुढें गेलें ह्मणजे खासगीचा चवकीचा लोकांची पहारा करावयाची जागा, त्या कामावर नित्य नवा उमराव जात असे.

त्याचे भोजन संबंधीं डेरे, मेवा मिठाई खावयाचा व पाणी गार करून ठेवावयाचा, व तांबूल भक्षणाचा या सर्व प्रकरणीं निरनिराळे डेरे असत. त्याचा वाटेनें याप्रमाणें सरंजाम होता ह्मणून आश्चर्य वाटेल; परंतु असें समजावें कीं, असेंच त्याचे लहान मोठे सर्व पदार्थ दुहेरी होते; तेणेंकरून त्याची स्वारी कधीं मुकाम सोडून दुसरे मुकामीं गेली असतां, कोणत्याही गोष्टीची त्यास न्यूनता नसे. स्वारी मुकामीं येऊन पोंचली ह्मणजे पन्नास तोफा सोडाव्या असा नेम होता. या खेरीज तो आपल्ये राजधानींत असतां, त्याचा जा जा रीति चालत होत्या, त्या मार्गानेंही सर्व तशाच चालत असेत.

त्यास अशी संपत्ती असोन, तो स्वयें सर्व विषयोपभोग लोकप्रशंसे

साठीं. गरिबाचे प्रमाणें करी; तेणेंकरून, त्याची प्रजा त्यास फार मानीत असे. या प्रमाणें खटलें त्याणें प्रवासांतही बरोबर चालविलें, त्यावरून त्याचे सरदार ही आपआपलें खटलें वाढविते झाले. त्या योगानें लश्कराचा पसारा भारी होऊन, खर्च फार लागूं लागला; यास्तव थोडक्याच अवकाशानें द्रव्याचा तोटा आला; आणि लश्कराची कांहीं मसलत त्वरेनें होइनाशी झाली.

सुलतान माअज़्म वाळव्यामध्यें राहिला असतां, त्या गांवांचे जवळचा आसमंतात् मुलुख त्याचे हातीं लागला तितका त्याणें घेतला. त्यापासून, विजापुरकरानीं दिलेल्या वतनादिकांचा सनदांत, त्याणें आपलें नांवमात्र घातलें; आणि पूर्वींचा नेमाप्रमाणें, चालविलें, तें हा काळमर्याद चालत आलें.

त्या सुलतान माजुमाचे लश्करांत, पर्जन्यकाळाचे शेवटीं, कांहीं रोगेंकरून लोक बहुत मेले तेणेंकरून, लश्कर कमी झालें. असें असतांही बादशाहाची अशी आज्ञा आली कीं, विजापुरकरांचा शिवाजीनें घेतलेला निर्ऋती दिशेचा मुलुख, संभाजीकडे आहे, तो सर्व घ्यावा. असें लिहिलें येतांच तो तेथून निघोन गेला; त्याणें गोकाक व धारवाड व हुबळी हीं तीन्हीं घेतलीं. अणीकही, मुलुख घ्यावा परंतु रोगामुळें माणसांचा तोटा पडला; आणि घेतलेल्या मुलखांत जागोजाग रक्षणार्थ, माणसें ठेवून, त्यास आपलेंच संरक्षण करावयाचें कठीण पडलें. यास्तव कंटाळून तो माघारा अहमदनगरास आला. हें वर्तमान सनसोळाशें पंचायशींत घडलें.

त्याच वर्षीं संभाजीचा, हंबीरराव कोंकणांत लश्करसहित होता; त्यास वर्तमान कळलें कीं, खानदेशांत कोणी रक्षक नाहीं; त्यावरून त्याणें लश्कराचा लहान लहान टोळ्या करून, उत्तरेकडे जाऊन ते सर्व लोक बह्राणपुरावर एकेजागीं मिळविले, आणि तें शहर लुटलें. तेथें त्यास बहुत द्रव्य मिळालें, नंतर तो तेथून माघारें येताना त्याणें बह्राणपुरापासून, नाशिकपर्यंत, मुलुख लुटून जाळून टाकिला. तेव्हां औरंगाबादेहून, खानजहान नामें सरदार आला, तो त्याचे पाठीस लागला; परंतु त्याची व याची गांठ पडली नाहीं.

त्यापुढें कांहींएक महिने गेल्यानंतर, औरंगजेब लश्करसुद्धां सोलापुरास+ गेला; आणि जुनरास जें लश्कर मोंगलांचें होतें तें औरंगाबादेस पाठविलें. तेणेंकरून उत्तरेचीवाट मोकळी सांपडली ह्मणून, मराठे लोकांनीं मोठ्या त्वरेनें तापी व नर्मदा उतरून जाऊन, भडोच लुटली. त्यावेळेसही तेथचें द्रव्य ते स्वस्थपणें आपल्या मुलखीं घेऊन गेले. आणि त्यांबरोबर

---

\+ तें सोलापुर पूर्वीं, सुलतान आजिमानें घेतलेलें होतें.

होता जो महंमद आकबर, त्याला बादशाहाचें पद देऊन, हाच बादशाह,औ-रंगजेब नव्हे, असें लोकांत प्रसिद्ध केलें.

वऱ्हाणपूर व भडोज हीं दोन्हीं औरंगजेबाचा अविचारानें लुटलीं गेलीं; कांकीं, तो दुसरीं राज्यें घ्यावयाचा उद्योग करीत असतां त्याणें आपल्या राज्याचा बंदोबस्त चांगला ठेविला नाहीं.

औरंगजेबाचे मनांत पूर्वीपासून फार दिवस होतें कीं, विजापुरकरांचें राज्य बुडवावें; यासाठीं, त्याणें सन सोळाशें शायशींचा प्रारंभीं, आपला पुत्र, आजिमशाह, यास बरोबर सैन्य देऊन विजापुरावर पाठविला. त्याचे आद-ले वर्षी तेथें पर्जन्य कमी पडला, तेणेंकरून त्या मुलखीं पीक थोडें झालें होतें; तेंही त्याणीं जमाकरून किल्ल्यांत नेलें. ह्मणून आजिमशाह याचे लष्क-रास अन्न मिळेनासें झालें. तेव्हां बादशाह याणें सोलापुराहून पाठवावें. परंतु तें घडेना कांकीं तिकडेही तोटा पडला होता; यारवेरीज, विजापुरक-रांचे लष्करी लोक आजिमशाहाचा लष्करावर स्वाऱ्या घालीत; त्यामुळें त्या लश्कराचा फार नाश झाला. असें पाहून बादशाहानें अहंमदनगरास गा-जिवदिन सरदार होता. त्यास आज्ञा केली कीं, वीसहजार बैल गोण्या भ-रून, त्यांबरोबर आपण सैन्यसुद्धां जाऊन विजापुरावर सुलतानआजि-मास पोंचत्या कराव्या. अशी आज्ञा पोंचतांच तो तेथून धान्य घेऊन निघा-ला. तें वर्तमान विजापुरकर यांस कळलें. तेव्हां त्याणीं तो अर्थ सिद्धीस गेला असतां, आपणास बाधक होईल, असें जाणून त्यांवर सैन्य पाठवि-लें. त्या दोहीं लश्करांची गांठ पडतांच, मोठें युद्ध होऊन, विजापुरकर पराभव पावले; तेणेंकरून आजिमशाह याजवरचें मोठें अरिष्ट टळलें; त्याची बायको जानी बेगम, ती त्या लश्कराबरोबर त्याकडे जात होती, ती त्या लढाईत हत्तीवर बसून, मध्यें शिरून, आपल्या लोकांस धीर देत होती; हा येक त्या युद्धांत मोठा चमत्कार झाला.

यानंतर औरंगजेबही विजापुरास येऊन पोंचला; तें शहर मोठें विस्तीर्ण यास्तव सर्वसैन्यानें त्याचा तट वेष्टिला. नंतर त्याणें तो कोट ढांसळावयाकरितां, जागोजाग मोरचे लावून, खेंडारें पाडिलीं.परंतु ह-ल्ला नकेला; कांकीं त्यास असें पक्कें समजलें होतें कीं, या लोकांस अन्न मिळेनासें झालें ह्मणजे, थोडकेच दिवसांनीं कंटाळोन आपल्याआपण कि-ल्ला देतील. शेवटीं त्याच वर्षाचा दहाव्या महिन्यांत त्याणीं आपल्या सं-तोषानें किल्ला दिला. औरंगजेबानें शिरजीखान नामें एक विजापुरक-रांचा मोठा सरदार होता, त्याला मोठी मनसब देउन रुस्तुमखान अ-

सें

सें त्याचें नवेंच नांव करून, आपल्ये चाकरीस ठेविला. त्याखेरीज त्याचे दुसरे जे कोणी मोटे मोठे सरदार होते तेही ठेविले.

यानंतर तें राज्य बुडून, तेथचे रहाणारे लोक आगलेच निघून गेले. आणि शहर ओस पडलें. त्या नगराचा तट चिरेबंदी आहे, तो अद्यापि नवा केल्यासारिखा दिसतो; आणखी त्यांत मोठे मोठे मनोरे व उंच उंच घुमट आहेत ते फार दूरून दिसतात. तेथें जाणारास तें शहर बाहेरून पाहून असें वाटतें कीं एथें वस्ती मोठी दाट आहे; मग आंत जाऊन पाहिलें असतां, जिकडे तिकडे कोस कोस पर्यंत ओसाडी आणि मोठमोठ्या हवेल्या मोडक्या, त्यांतून रानें वाढलेलीं दृष्टीस पडतात; तेणेंकरून चित्त उदास होतें; तेथें रहाणारे लोक केवळ गरीब, आणि ती वस्ती अगदीं थोडी. त्या शहराचा घेरा पंधरा कोसांचा, त्याचा मध्यभागीं किल्ला आहे, त्याला दुहेरी तट, आणि त्या सभोंवता खंदक आहे. त्या किल्ल्यांत मुख्य बादशाह रहावयाची जागा पुरातन बांधलेली अति सुंदर आहे, ती आतां मोडलेली दिसत्ये; शहरासभोंवता+ एकेरी कोट, त्याचे बाहेरून खंदक आहे.

असा विजापुरचा नाश करून औरंगजेबानें गोंवळकोंड्याचा नाशाविषयीं उद्योग केला. त्यापूर्वी नुक्ताच सुलतान मा'जुमानें त्यांशीं सल्ला केला होता, तो न मानितां त्याणें अयुक्त केलें, तें असें, त्याचा वकील तेथें होता त्यास लिहिलें कीं, अबूहुसेनास कांहीं भयप्रदर्शनादि करून, त्यापासून कांहीं द्रव्य व अलंकारादि, आह्मासाठीं घ्यावें; त्यावरून त्याणें त्या प्रमाणें केलें. तेव्हां त्याणें भिऊन आपल्या बायकोचा अंगावरचा अळंकारांसहित जामदारखान्यांतले, सर्व अळंकार व द्रव्य आपणास बादशाह प्रसन्न होईल अशा आशेनें दिले. तथापि औरंगजेबानें तें सर्व घेउन, युद्धाची तयारी केली; आणि मुलखांत असें विदित केलें कीं, अबूहुसेन बादशाहपदवीस केवळ अयोग्य; जाणें आपल्ये जातीखेरीज ब्राह्मण मुख्य प्रधान केला; आणि आमचा धर्म मानित नाहीं असा जो संभाजी त्याशीं सख्य केलें, यास्तव आह्मीं त्याशीं युद्ध करणार. हें वर्तमान सन सोळाशें सत्त्यायशींत घडलें. त्यासमयीं, अबूहुसेनाजवळचे कित्येक लोक त्यास सोडून गेले; आणि कोणी इमानी चाकर होते ते मात्र थोडके

---

+ तें शहर बाजिरायाचें राज्य गेल्यापासून, सातान्याचा राजाचे स्वाधीन झालें, त्यापासून त्याणें आपल्या महत्वानुरूप, तेथचा कांहीं बंदोबस्त करून त्यांतील उत्तम स्थळांची दागदुजी केली; त्यांत महंमद आदिलशाह याची कबर आहे तिचा एकशें चवतीस हात उंची, आणि एक्यायशीं हात रुंद घुमट आहे.

से

से त्याजवळ राहिले.

मग तो अबूहुसेन, त्या राहिलेल्या लोकांसह वर्तमान गोंवळकोंड्यांत राहून, सात महिने पर्यंत मोठ्या शौर्येंकरून लढला. शेवटीं तो किल्ला मोंगलानीं दगा करून घेतला. आणि तो अबूहुसेन धरून दौलताबादचा किल्ल्यामध्यें औरंगजेबानें बंदींत ठेविला. तो मेल्यावर, प्रौढप्रतापी, सदय, तानाशा असें त्याचें नांव पडलें. त्याचें मूळ काय तें आतां समजत नाहीं, परंतु असें वाटतें कीं, कोणी एक हुसेनाचा अत्यंत हितकर्ता त्या नावाचा त्याचा गुरू असेल.

पूर्वीं औरंगजेब गोंवळकोंड्यास घेरा घालूं लागला, त्यासमयीं, विजापुरास त्याणें आपला एक फौजदार+ ठेविला होता. आणि दुसरा फौजदार, काशीमरवान नामें कृष्णेचे दक्षिणेस पाठविला. आणीक विजापुरकरांचा पहिला चाकर, शिरजीरवान नामें होता तो, संभाजीला जिंकावयास नेमिला, दुसरा एक, गाजीवदिन, त्याला विजापुरचे अग्नायी दिशेस योजिला. अशाप्रकारें विजापूर व गोंवळकोंडे संबंधें मुलुख, आपल्ये हातीं लागावा ह्मणून, औरंगजेबानें यत्न केला. त्याचा फौजदारानीं काय काय केलें तें वर्तमान आधीं लिहिलें पाहिजे; मराठी लोकांचें वृत्त पुढें लिहिण्यांत येईल.

मोंगलांचा सरदार गाजीवदिन यास आंदोणी किल्ल्यांत विजापुकरांचा पुरातन मुख्य कारभारी मसाउदरवान होता, त्याणें युद्ध करून परिणाम नीट होणार नाहींसें जाणून किल्ला दिला. परंतु औरंगजेबाचे चाकरीस राहिला नाहीं. विजापूर व कलबुरगा, या दोहोंमध्यें सगर नामें किल्ला आहे, तेथें एक बाराहजार बेरडांचा नाईक पाळेगार होता, आणि तो किल्ला मोठा सुदृढ असे. आणखी ज्याचे सभोंवतीं झाडी व दाट रान बहुत होतें. असें असतांही, त्या नाइकानें मोंगलाचें नांव ऐकूनतांच भिऊन किल्ला दिला. त्या औरंगजेबाची रीति अशी होती कीं, कोणी आपल्या संतोषेंकरून स्थान दिलें तर, त्याचा मोठा संमान करावा. ह्मणून त्याणें मोठे मोठे लोक व मनसबदार हांसतील, हा अर्थ मनांत न आणितां, त्यास मनसबदारांचे पदवीस चढविला. नंतर तो बेरड थोडकेच दिवसानीं, कांहीं आजार होऊन मृत्यु पावला. त्याचा पुत्र पेमनाईक, त्यास मोठ मोठ्या माणसांत वाग-

+ फौजदार ह्मणजे ज्यास लष्करांत चाकरी असून प्रांतांतील वसुलाची जमाबंदीं त्याचे हातून होत असावी.

णें ठीक पडेना, यास्तव त्यांतून निघून यांकीणकेरा गांवीं राहून पाळेगारपणा करूं लागला. त्यापुढें विसांवर्षांनीं असें झालें कीं, एवढा मोठा औरंगजेब, परंतु त्यासही त्याचा पारिपत्या करितां स्वारी करावी लागली. ती त्याची शेवटची मोहीम.

गोंवळकोंडें घेतल्यानंतर, बादशाहाचें लश्कर विजापुराकडे येऊन उतरलें. मग तेथून चहूंकडे राज्याचा संपूर्ण बंदोबस्तास निरनिराळ्या स्वांऱ्या नेमिल्या. या योगेंकरून व पूर्वीं जा स्वांऱ्या पाठविल्या होत्या, त्यामुळें गोंवळकोंड्याचा पूर्वेचा मुलुख, व राजमंड्री शहर, व बंदर मासुलीपटन. बंदर गांजाम, त्याचे स्वाधीन झालें. आणि खडपा, व खोनजेबेराम, व पुनामाळी, यांचे कारभारी येऊन मिळाले. याखेरीज विजापूर व गोंवळकोंड संबंधीं जो मुलुख कर्नाटकांत होता, तोही बादशाहाचे हातीं लागला.

मोंगललोक याणीं जेव्हां नवा प्रांत हस्तगत केला, तेव्हां जा प्रकारें त्याणीं प्रजापालन केलें तो विस्तार असा. फौजदार याणें, लश्करचें काम संभाळावें; आणि शहरामध्यें चोरादिकांचा उपद्रव होऊं देऊं नये. त्यास सर्कारचा वसुलापैकीं चवथाई देत असत, दुसरा खालसा दिवाणनामें एक कारभारी होता, त्याणें सर्व जमाबंदीची चौकशी करावी; त्याकडे लश्कर संबंधीं काम नाहीं.

औरंगजेब असा मुलुख घेत असतां संभाजीनें अंगें कांहीं उद्योग केला नाहीं; त्यावरून त्या वेळचे लोक कल्पना करूं लागले, कीं कलूषाचे जादुगिरीमुळें, तो उगाच राहिला. परंतु असें नव्हे; तो संभाजी आपले दुष्ट स्वभावेंकरून, आणि मद्यपानादिव्यसनेंकरून अप्रयोजक झाला होता. तो कोणे एके समयीं सावध होई, त्याजवळ त्याचा वडिलांचे वेळेचे शाहाणे माणूस त्याचे चाकरीवांचूनही त्याजपाशींच राहिलेले होते, परंतु त्या कलूषाचे भयानें आणि याचे अव्यवस्थितपणेंकरून, ते आपआपले ठिकाणीं उगीच राहिले.

जेव्हां औरंगजेबानें विजापूर घेतलें, ते समयीं तेथचे सर्व मराठे मनसबदार याणीं पत्र लिहिलें कीं आम्हीं तुमचे चाकरीस रहावयास सिध्द आहों; तेव्हां औरंगजेबानें त्यांस आज्ञा दिली कीं, संभाजीला जिंकावयास पाठविला जो शिरजीखान, त्यास वांई पाशीं जाऊन मिळावें. शिरजीखान आला तो वांईस पोंचला. परंतु ते लोक संकेताप्रमाणें आले नाहींत. तेव्हां संभाजीच्या हंबीरराव, याणें त्यास जिंकिला. परंतु त्याच युद्धांत तो मरण पावला. याप्रमाणें मराठ्यांचा जय झाल्यानंतर त्याणीं

णीं त्याच्यापाठवून विजापुरसंबंधें कित्येक मुलुख घेतला; आणि त्यांतील कांहीं स्वार औरंगजेब गोंवळकोंडयास घेरा घालीत होता, तेथेंजाउन पोंचले. परंतु युद्ध नकरिता मागें फिरले. या खेरीज संभाजीनें मोरोत्रिंमळ पिंगळे याचा भाऊ केसोपंत पिंगळा पेशवा, मुख्य सरदार याचा हाता खालीं संताजी घोरपडा देऊन कर्नाटकांत पाठविला. नंतर त्याणें हरजी राजा महारीक यास मिळून शहाजीचा जहागीर संबंधें कर्नाटकांतील व्यंकाजी भोंसलेंकडे आहे तो मुलुख घ्यावा अशी आज्ञा होती, तें लश्कर जिंजी पर्यंत पोंचलें.

तिकडे व्यंकाजी पूर्वींच समजला कीं आपणास वडिलांची जहागीर संभाजी जिरूं देणार नाहीं ह्मणून, तें लश्कर आलें नाहीं तोंच त्याणें ह्मैसुरचा चिक्‌घो नामें राजा, यास, तीन लक्ष रुपयानां बंगलोर शहर विकत देऊं केलें. तें वर्तमान जिंजीस पोंचलें, तेह्मां ते लोक अशी इछा करूं लागले, तो अर्थ सिद्दीस गेला नाहीं. तोंच आपण जाऊन शहर घ्यावें, असेंच मोंगल लोक इछीत होते; अशा समयीं केसोपंत व त्याचा पुतण्या, निळोपंत, या दोघांच्या कांहीं कज्जा होऊन मराठे लोक लवकर न पोंचले, इतक्यांत मोंगल जाऊन पोंचले. त्याणीं शहर घेऊन, त्या राजाला तीन लक्षांस विकलें तेह्मां मराठे लोक तें बंगलोर हातीं लागत नाहींसें समजून ह्मैसुर प्रांतीं जाऊन, तेथची खंडणी घेत कांहीं महिने राहिले. नंतर मोंगलानीं गोंवळकोंडें घेतलें. असें त्यांचें प्राबल्य जाणून ते माघारें जिंजीस गेले.

नंतर सन सोळाशें अठ्यायशींत हरजी राजा यास कळलें कीं, मोंगलांस मोठे मोठे जहागिरदार व मनसबदार मिळाले, त्यावरून तो भ्याला; आणि केसोपंताशीं त्याणें सख्य केलें. मग ते दोघे जाऊन, कांहीं मुलुख घेतला, परंतु मोंगल येतात आणि आपल्ये मंडळींत वैमनस्यें पडलीं आहेत, असें समजून तो घेतलेला मुलुख सोडून, पालियानदीचे कांठीं कित्येक महारिकाचे किल्ले होते तेथें जाउन राहिले.

यानंतर त्याचवर्षीं कर्नाटकचा बहुतां दिवसांचा उसकटा परगणा होता, तो ह्मैसुरचा राजानें व्यंकाजी पासून घेतला. तेवेळेस संभाजीचें लश्कर जवळच होतें, परंतु त्याणीं व्यंकाजीला कुमक केली नाहीं; कांकीं मराठे लोक भाउबंदकी संबंधें, भांडत असले ह्मणजे द्वेषास्तव ते आपला नाश जरी झाला तरी होउं देतात. हा त्यांचा जातिस्वभाव आहे. अशा द्वेषामुळें, कर्नाटकांत गेलेले जे मराठे होते, ते हीनबळ होऊं लागले. इकडे देशामध्येंही ते लोक एकचित्त नसतां, तें

राज्य

राज्य दुसऱ्या कांहीं कारणानें राहिलें. नाहींतर तेव्हांच राज्य बुडून औरंगजेबाची मसलत सिद्धीस जाती; आणि ते पूर्वीप्रमाणें अप्रसिद्ध झाले असते.

संभाजीनें राज्यकारभारांत चित्त ठेविलें नव्हतें; तो विशाळगडास अथवा पन्हाळ्यावर किंवा संगमेश्वरीं, एक बाग होती, तेथें राहून काळक्रमणा करी. आणि त्याचा वजीर कलूषा राज्यकारभारापेक्षां संभाजीची मर्जी संभाळावयास फार जपत असे; आणखी, जो याचा आश्रय करून राहिला होता, आणि समयविशेषीं यास कांहीं वर्तमान कळवून, याचें मोठें हित केलें तो महंमद आकबर, याच्या स्वभावास कंटाळून, त्याणें याला सोडिलें. आणि राजापुराजवळ एका इंग्रेजी जाहाजावर बसून फारशी लोकांचें एक इस्पाहान नामें शहर आहे, तेथें जाऊन त्या बादशाहाचा आश्रय करून वीस वर्षे त्यापाशीं राहून, सन सत्राशें सहांत, तेथेंच मृत्यु पावला.

शिवाजीच्या मरणापासून लष्कराच्या बंदोबस्ताची अनवस्था झाली, तो प्रकार उत्तरोत्तर वृद्धिंगत झाला; तेणेंकरून संभाजीचें राज्य बुडूं लागलें. तें संभाजीस हित नव्हतें; परंतु मुलखांत बंडउत्पन्न करायास मोठें उपयोगी झालें; कांकीं ज्याजवळ भाला व घोडा असे, तो त्या मराठा लोकांत शिरून, एकाच दिवसाचे लुटीनें द्रव्यवंत होई, याप्रमाणें जिकडे तिकडे बहुत दिवस युद्धप्रसंग पडल्यामुळें, अशी फौज झाली कीं, मुलखाचा सर्व वसूल रोजमुऱ्यास पुरेना. यास्तव रजा द्यावी लागली, ते लोक बहुतकरून मराठे होते; त्यांस शिवाजीच्या पराक्रमेंकरून, व राज्यांत किल्ले पुष्कळ, या योगें व आपले जातीचे मराठे नामांकित फार होते त्यांस बुद्धि शिकविणार ब्राम्हण, यास्तव ते गर्वास चढले असत. आणि एक वर्तमान असें होतें कीं, हिंदूंच्या मनुष्यमात्रीं, मोंगल कर बसविणार म्हणून. मराठे मोंगलांशीं वक्र होते. ह्या सर्व गोष्टींचा उपाय करावयास औरंगजेबाला सामर्थ्य होतें, कांकिं त्याजवळ द्रव्य बहुत व फौज मोठी, आणि सर्व मुलखांतील वृत्त त्यास विदित होत असे, आणखी कोणासही पदास चढवावयाची शक्ती त्यास होती. परंतु तो स्वजातिधर्माभिमानी, आणि मोठा गर्विष्ठ होता; म्हणून त्याची शक्ति हितोपयोगी झाली नाहीं. व त्यास बंडांचा बळाचा सुमार सांपडला नव्हता, तीं बंडें आपले स्थापित राजांचे हातूनच त्याणें मोडवावीं, तें न करितां बहुतां दिवसांचीं संस्थानें बुडूं दिलीं. आणि त्यांचे जागीं दुसरे कोणी न स्थापितां

तां गर्वेकरून असें मानिलें कीं, आपणच सर्व संभाळूं. आणि त्याणें आप-
ले जवळचे कित्येक फौजेसही रजा दिली. तेव्हां ते तात्काळ जाऊन ब-
डाला मिळून त्याचे शत्रू झाले. याखेरीज कित्येक अंमलांतून ब्राह्मण
ठेवावयाचे जागीं, त्याणें आपल्ये जातीचे मुसलमान ठेविले; तेणेंकरून
जी अव्यवस्था झाली, ती, त्याला आटोपेना. जे त्याचे जातीचे, आजेरी हो-
ते, ते, त्याची कीर्ति वर्णीत. परंतु ब्राह्मण, व मराठे लोकांतील जे श्रेष्ठ होते,
ते समजले कीं, आतां मोंगल लवकरच बलहीन होतील; तेव्हां मोठमो-
ठे मानकरी, इफळे, व घाडगे, व माने, व निंबाळकर, वगैरे, सर्व मिळून,
आपल्ये शिबंदीसहवर्तमान, बंडास अनुसरले. ते समयविशेषीं, मोंग-
लांस, अनुकूळ किंवा प्रतिकूळ होत असत. ते सर्व लोक संभाजी व मान-
करी लोक यांचे पदरचे होते; यास्तव तेवेळेस पेंढार बहुत नव्हते; तेवेळेस
मोंगलांचा फौजदारांची शिबंदी होती, ती फुटकळ्या लुटारूंस्या उपायचाल्ह
देत नव्हती; जे फुटकळ लुटारू, तेच पेंढारी.

ते समयीं असें झालें कीं, मराठे मानकरी लोकांनीं, औरंगजेबाकडे
वकील पाठवून त्यास असें समजाविलें कीं, आम्हीं जन्मभर तुमचे सेवे
विषयीं तत्पर असूं; परंतु त्यांचा मुलखांत लोक पाठवून ते मुलुख लुटीत
तें कदाचित् प्रकट झालें असतां, वकिलाकडून तेथचा कोणा मोठ्या मा-
णसास, लाच देऊन छपवीत. बादशाहानें फौजदारांस आज्ञा केली होती
कीं, मराठे मानकरी चाकरींत वागत असतां, त्यांचा मान रक्षावा. मान-
करी फौजदारांशीं स्नेहाचा गोष्टी सांगत, आणि वकीलतर, बादशाहाचे
दरबारीं त्याणीं केलेलीं कृत्यें छपवीत. त्याणेंकरून त्यांचे मुलुख निरु-
पद्रव असत; आणि जेव्हां ते मोंगलांचा मुलखीं जाऊन लूट करीत,
तेव्हां त्यास समजे कीं, हे मराठे आहेत; परंतु कोणाकडचे, तें समज-
त नसे.

याशिवाय औरंगजेबानें दक्षिणेंत कित्येक अमलदारांस फौजेचा
खर्चास मुलुख आपलें स्वामित्व ठेवून, दिला होता. तेथचा वसूल पुरेसा येई-
नासा झाला; म्हणून ते लोक लांचादिकुकर्मेंकरून, पैका जमा करूं लागले.
तेणेंकरून देशाची दुर्दशा झाली.

मोंगलांचा राज्यांत अशी रीति होती कीं, एखादी वतनी जहागीरगि-
कारी झाली असतां, त्याचा अधिपती दुसरा केला तर, त्याला तदुपभोगा-
र्थ, पत्र दिल्याचे पूर्वी, त्यापासून साडेसात वर्षांचें उत्पन्न अगोदर घ्यावें.
त्यांत चौथाई प्रथम घेऊन बाकी ऐवज हप्तेबंदीनें घेत. याप्रमाणे सर-

कारात

कागद घालें लागें. खरीज दस्तुरी वगैरे निमित्तेंकरून कारभारी लोक, पैका काय घेत होते. अशा अनीतीमुळें, हा अनर्थ झाला कीं, निरंतर वतनास-जनी इत्यादि उपद्रव होऊं लागले. तेणेंकरून लोक बेजार झाले; बादशाह वृद्ध दशेनें अशक्त झाला होता, त्याला पहिल्याप्रमाणें चवकशी राखवेना; त्याणें एकादी आज्ञा केली असतां, लिहिणारांनीं त्या कामास ही वर्ष वर्ष लावावें. अशी बंडाळी विजापुर व गोंवळकोंडें घेतल्यापासून बारा वर्षें पर्यंत होती. नंतर तीं सर्व अनर्थ कारणें वृद्धिंगत होऊन, मोंगलांचें राज्य-नाश पावूं लागलें. असें उत्तम प्रकारें बांधलेलें मोठें उंच घर प्राचीन असलें तरी चांगलें दिसतें, परंतु त्याला डागडुजी करून उपयोग नाहीं, कां कीं, तें आपल्या जीर्णतेनेंच पुढें थोडक्याच दिवसांनीं पडावयाचें. असें तें राज्य जहालें होतें.

औरंगजेब विजापुरी एक वर्ष लश्कर सुद्धां राहिला होता, त्याणें जा फौजा तेथून चहूंकडे पाठविल्या होत्या, त्याजस पावल्या; त्यांत संभाजीचा मुलखांत मात्र बळकट बळकट कित्येक किल्ले राहिले होते; तेही घ्यावयास औरंगजेब कांहीं सिद्धता करीत होता, ती अशी कीं ते किल्ले निश्चित हातीं लागावे; इतक्यांत त्याचे फौजेंत कांहीं मोठा रोग उत्पन्न होऊन, फार लोक मेले; तेव्हां तो तेथून अकलूज नामें शहर निरेचे कांठीं आहे तेथें जाऊन राहिल्यावर तो रोग गेला. असें सन सोळाशें एकुणनव्वदांत घडलें.

त्याच सुमारें समुद्रांत इंग्रज लोक उपद्रव करीत होते. म्हणून औरंगजेबानें तिकडे मन लाविलें; आणि त्यांचा व्यापारांची कित्येक स्थानें, त्याचा मुलखांत होतीं; तीं जप्त केलीं. व जंजिऱ्याचा शिद्दी, याकुतखान, त्यास आज्ञा केली कीं, मुंबईंतून इंग्रजांस घालवून दे. त्याणें जाऊन माजगांव व शिवचा किल्ला व माहीम घेतले; आणि मुंबई किल्ला घ्यावयास नऊ दहा महिने झटला, परंतु कांहीं उपाय चालेना. शेवटीं इंग्रज लोकांचें व औरंगजेबाचें कांहीं बोलणें ठरून, तो निघून गेला.

औरंगजेब अकलुजेस जाऊन राहिल्यावर बहुत वेळां मराठी लोकांचे उपद्रवाचें वर्तमान त्याला कळलें; त्यांत नाशिकाजवळ मोठा समुदाय जमला होता. त्याचा पारिपत्यास तिकडे फौज होती ती पुरेना; तेव्हां औरंगजेबानें त्या बंदोबस्ताकरितां आपला पुत्र आजिमशाह यास बरोबर फौज देऊन रवाना केला; आणि वजिराचा पुत्र आसदखान याजबरोबर दुसरी फौज देऊन कोंकण प्रांतास पाठविला. आणखी कोल्हापूर परगणा आसपास अ

बहुतेनाचा

नाचा तकरीबखाननामें. कोणी एक मोठा सरदार होता; त्यास तेथची फौजदारी द्यावयाचा करार करून पाठविला. त्यापूर्वींच कोल्हापुरसंबंधें जो सोपा मुलुख, तो मोंगलानीं घेतला होता. परंतु पन्हाळा आदिकरून अवघड जागीं. मराठे लोक होते.

तकरीबखान तेथें जाऊन तो सर्व ठिकाणांची बातमी घेत असतां, असें त्याला समजलें कीं. संभाजी थोडकेसे लोक बरोबर घेऊन. केवळ असावधपणें संगमेश्वरीं राहिला आहे, त्यावरून त्याणें त्यास धरून आणावा, असा बेत केला नंतर त्याणें आपला पुत्र. इखलासखान. व मोठे मोठे अत्यंत विश्वासू, असे थोडकेच स्वार व बाटाडे बरोबर घेऊन. कोलापुराहून मोठ्ये धैर्येंकरून निघाला; तो संभाजीचा लोकांस बातमी कळूं न देतां, संगमेश्वराजवळ पोंचला; तेव्हां संभाजीचा जासुदानीं, त्यास वर्तमान कळविलें कीं. मोंगल जवळ आला. ते समयीं तो मद्यपानें करून, उन्मत्त जहाला होता. यास्तव त्यास ओरडून बोलिला कीं. मूर्ख हो. अशा वेडेपणानें कां बडबड करितां, मुसलमान येथें काय येणार आहेत. असें फिरून बोलिलां तर मी तुमचीं नाकें कापीन. इतकें झाल्यावर थोडक्याच वेळांत तकरीबखानाचा पुत्र कांहीं स्वारांसहित मोठ्या त्वरेनें बापाचा पुढें घोडी पिटील संभाजीचा वाड्यांत जाऊन पोंचला ते वेळेस जे लोक तेथें सांपडले ते मारून टाकिले; इतक्यांत मागून तकरीबखानही आला; तेव्हां उरलेले लोक बहुतेक पळाले. परंतु कलूषाजवळ कांहीं होते. ते संभाजीचा रक्षणार्थ लढूं लागले; मग कलूषास तिराची जखम लागतांच, तेही पळाले तेसमयीं संभाजी सावध होऊन आपला वेष बदलून तेथून निघावयास सिद्ध झाला; परंतु त्याचा अंगावर मोठे उंच उंच अळंकार होते ते त्याला टाकवेनात. त्यामुळें हाच संभाजी असें समजून त्यास धरिला. त्या बरोबर कलूषा आणि दुसरे चोवीस असामी धरले गेले.

मग तकरीबखानानें त्यास कोलापुरीं नेऊन औरंगजेबास कळविलें नंतर तेथून आज्ञा आली कीं. त्यास बहुत बंदोबस्तानें हुजूर आणावा तेव्हां बादशाह अकलूजेहून निघून, इंद्रायणी व भीमा यांचा संगमाजवळ तुळापुरीं+ आऊन उतरला होता. तिकडे तकरीबखानानें त्यास नेलें; ते

\+ तुळापुराचें पहिलें नागरगांव असें नाव होतें. मग शाहाजीच्या मनांत आलें कीं. हत्तीचें वजन किती असतें तें पहावें म्हणून, तेथें नदीमध्यें नावेंत हत्ती घालून त्याचा भारानें जितकें नावेचा अंगाला पाणी लागलें तितकी खूण करून हत्ती काढून, त्या खुणे बरोबर पाणी येई तोंपर्यंत दगड घालून, त्या दगडांचें वजन केलें तो हत्तीची तुळा झाली. त्या दिवसापासून त्या गांवाचें नाव तुळापुर ठेविलें.

कलुषा नवक

लष्करा जवळ पोंचल्यावर ते सारे बंदिवान, तुमक्या बांधून उंटावर बसवून, बरोबर वाद्यें वाजवीत लष्करांतून बादशाहाचे हुजूर नेले; ते पाहून औरंगजेबानें आज्ञा केली कीं, एक्हां कैदेंतच असूं द्यावे. मग विचार करून यांचा अन्यायानुरूप शासन केलें जाईल. नंतर ते तसेंच कैदेंत ठेविले.

त्यापुढें मोंगलांत जे श्रेष्ठ माणूस होते त्याणीं बादशाहास असें समजाविलें कीं, संभाजीचा जीव रक्षावा; तेणेंकरून, त्याचा राज्यांतले अवघड किल्ले सर्व आपल्ये हातीं येतील. ही मसलत औरंगजेबाचाही मनास येऊन, त्याणें संभाजीला निरोप पाठविला कीं, तूं मुसलमान हो म्हणजे तुझा जीव वांचेल. त्यावर त्याणें उत्तर दिलें कीं, बादशाहाला सांगा कीं, जर तू आपली कन्या देशील तर बाटेन, असे दुष्ट जे तुम्ही मुसलमान लोक, त्या तुमचा पैगंबराचा धिक्कार असो. मग तो आपली अन्यायकर्में स्मरून, पश्चात्ताप पावून; जे जवळ दरस्तास मागत होते, त्यांस नाना प्रकारें शिव्या देऊं लागला; त्या अशा कीं, जो कोणी त्यांतल्या एखादा क्रोधें करून मारीलच.

तें उत्तर औरंगजेबाला समजतांच, त्याला बहुत राग येऊन त्याणें अशी आज्ञा केली कीं, त्याला लष्कराच्या बाजारांत नेऊन, प्रथम त्याचे डोळे लोखंडाचे डागण्यानें भाजावे; नंतर जीभ कापावी; मग डोकें मारावें. अशी आज्ञा देण्याचें कारण, केवळ बादशाहाचा रागच नव्हे, असें केलें असतां हिंदुलोकांत दहशत पडेल असेंही त्याचें मनांत होतें. त्यावरून त्याला तुळापुरींच, लष्कराच्या बाजारांत नेऊन आज्ञेप्रमाणेंच मारिला. त्याचा वजीर कलुषा तोही त्याबरोबरच मारिला; हें वर्तमान सन सोळाशें एकुणनव्वदांत घडलें.

संभाजीची गोष्ट लिहिली आहे, त्यावरून असें दिसतें कीं, त्यामध्यें कांहींसें शौर्य होतें; आणि चातुर्य नेमस्तच असेल; परंतु हे त्याचे गुण, क्रूरपण आणि व्यसनें करून व्यर्थ गेले. असें वाटतें कीं, तो जर आणीक कांहीं वांचता, तर आणखीही पापच करता. तो मेल्याचे पूर्वींच तीन वर्षे त्याच्या जातीचे मराठे लोक त्याला कंटाळले होते; परंतु जा समयीं त्याच्या मरणाचा प्रकार समजला, ते समयीं तो शिवाजीचा पुत्र यास्तव सर्वांस क्रोध आला; औरंगजेब तर चिंतित होता कीं, हिंदूंत दहशत पडावी. परंतु तें सिद्ध न होतां, केवळ द्वेष मात्र वाढला.

सन सोळाशें एकुणनवदांपासून सत्राशें सात पर्यंत, झालेली वर्तमानें मिळून भाग अकरावा.

## अनुक्रमणिका.

मराठ्यांनीं रायगडीं मसलत करून संभाजीचा पुत्र शिवाजी, तो मोठा होई तो पर्यंत राजाचा सावत्र भाऊ राजाराम तो धणी केला.

मोंगलांनीं रायगड घेतला तेथें संभाजीची स्त्री येसुबाई, व पुत्र शिवाजी उभयतां सापडलीं. तीं त्यांणीं औरंगजेबाकडे नेलीं.

राजाराम जिंजीस गेला तेथें त्याणें शिवाजी प्रमाणें, अष्टप्रधानादिकरून, आपलें माहात्म्य वाढविलें.

मोंगलांनीं जिंजीस घेरा घातला तें काम कांहीं निमित्तानें राहिलें.

मराठे मोंगलांचा मुलखीं, घांस दाणा घेऊं लागले; तन्निमित्त औरंगजेब ब्रह्मपुरीं जाऊन राहिला.

इंग्रेज लोक व पोर्तुगीस लोक यांचें कांहीं वर्तमान.

संताजी व धनाजी उभयतां कर्नाटकांत जाऊन मोंगलांशीं युद्ध करून जय पावले.

मोंगलांचा सरदारास जिंजी घेणें आवश्यक पडलें ह्मणून, त्याणें राजारामास काढून लाविला; आणि जिंजी घेतली.

मराठ्यांनीं सातान्याची राजधानी केली.

राजारामाचा अष्टप्रधानांत कांहीं बदली झाली.

कान्होजी आंगरे व शिधोजी गुजर यांची गोष्ट.

संताजी घोरपडा कोणे प्रकारें मरण पावला तें प्रकरण.

राजाराम मोठें लश्कर जमा करून, खानदेशांत व वराडांत खंडणी घेऊं लागला.

औरंगजेबानें कर्नाटकांतून जुल्फिकारखान बोलावून आणून राजारामाचे पाठीस लाविला.

औरंगजेब फौजेसुद्धां सातान्यास आला त्याणें युद्ध करून किल्ला घेतला.

राजाराम याचा मृत्यु.

त्याची स्त्री ताराबाई तिणें राज्य चालविलें.

मराठ्यांचें प्राबल्य व मोंगलांची बलहीनता.

मराठे लोक कोणकोणत्या कारणार्थ, एकचित्तें करून वागले तें प्रकरण

कारण

औरंगजेब विजापुरीं येऊन, मग त्याणें वाकिणकेरा गांवास घेरा घात
ला ती गोष्ट.

मोंगलानीं घेतलेले किल्ले मराठ्यांहीं लढून माघारें घेतले.

औरंगजेब अहंमद नगरीं येऊन मृत्यु पावला.

## भाग अकरावा.

शिवाजीची स्त्री सोयराबाई मेल्यापासून, तिचा पुत्र राजाराम त्यापा
सून आपणास कांहीं विघ्न नव्हावें ह्मणून संभाजीनें त्याला रायगडीं बंदींत
ठेविला. पुढें कांहीं दिवसांनीं त्याची स्त्री मृत्यु पावली; नंतर दोन करून
दिल्या. पहिली ताराबाई मोहित्यांची कन्या; दुसरी राजसबाई घाटगे यां
ची मूल. ते घाटगे कागलकर. राजाराम बंदींत होता त्याच किल्ल्यावर संभा
जीची स्त्री. येसुबाई. व पुत्र शिवाजी असे, त्या उभयतांशीं, तो राजाराम स्ने
ह पूर्वींपासूनच करीत होता. पुढें संभाजी मेल्यावर मराठ्यांचे मुख्य मान
करी होते, ते सर्व मिळून. येसुबाईच्या विद्यमानें, रायगडीं मसलत ठरली
कीं शिवाजी प्रौढ होई तों पर्यंत, राजाराम धणी करावा. ते समयीं मुला
चें वय सहा वर्षांचें होतें. त्याचेंच पुढें शाहू असें नाव चालिलें. त्या मस
लतींतील मानकरी यांचीं नावें; जनार्दनपंत हणमंते, प्रह्लादनीराजी
तो न्यायाधीशाचा पुत्र. रामचंद्रपंत बहुरकर, खंडोबल्लाळ चिटनीस
महादाजी नाईक पानसंबळ. संताजी घोरपडे, धनाजी जाधव. ख
ंडेराव दाभाडे.

असें आहे. संकटसमयीं थोरलोक एकत्र मिळून विचार करितात
त्यांत जो उत्तम बुद्धिमान असतो, तो सर्वांचीं चित्तें स्वाधीन करून घेतो, म
ग ते सर्व त्याचे आज्ञेप्रमाणें वागूं लागतात. तशीच, या आठांमध्यें प्रह्ला
दनीराजीची बुद्धि विशाळ होती; ती अशी कीं तेथें नानाप्रकारचीं संकटें
असतां. त्याणें स्वस्थचित्तें करून संपूर्ण बंदोबस्त केला. तीं संकटें अशीं
कीं. जामदारखान्यांत द्रव्य नव्हतें; आणि कोठींतलें धान्यही सरलें होतें;
व लष्कराचा बंदोबस्त नाहींसा झाला होता; आणखी शत्रूचें प्राबल्य;
याप्रमाणें अडचण असून त्याणें प्रथम किल्ल्यांत शिबंदी ठेवून शिवाजी
च्या रीतिप्रमाणें बंदोबस्त केला; आणि कोठींत दाणा भरला.

त्यानंतर असा नेम ठरविला कीं. शत्रूंच्या बातमीदारांस ठिकाणा न
लागावा ह्मणून. राजारामानें सर्वदा एके ठिकाणीं राहूं नये; रायगडापास

न

न विशाळगड पर्यंत जे शिवाजीचे बांधलेले किल्ले आहेत तेथें चाकून पाकून रहावें. अशी मसलत झाल्यावर येसुबाई पुत्रासुद्धां रायगडीच राहिली; आणि राजाराम कुटुंबसुद्धां विशाळगडास गेला. ते समयीं लष्करच्या सरदारांस आज्ञा जहाली कीं, कालानुरूप सावधपणानें वर्तावें; आणखी स्वार लोक यांणीं बहुत करून, राजाराम यापासून दूर राहूं नये.

तेसमयीं मोंगलांचें लश्कर, औरंगजेबानें कोंकण घ्यावयास पाठविलें होतें, तें पर्जन्यकाळ गेल्यावर रायगडास येसुबाई व तिचा पुत्र शिवाजी आहेत अशी बातमी घेऊन, किल्ल्यास वेढा घातला. तेव्हां त्यांचे कुमकेस जंजिऱ्याचा शिद्दीही आला होता; त्यांणीं तेथें कित्येक महिने श्रम केले परंतु कांहीं उपाय चालेना; शेवटीं कोणी एक मराठा शिवाजीचे वेळेचा जुना चाकर होता, त्याला वांईचा देशमुखी संबंधें कांहीं खटल्यानिमित्त राग येऊन त्याणें कित्येक निवडक मावळे लोक हाताखालीं घेऊन, मोंगलांशीं सख्य करून वांईचा देशमुखी विषयीं करार करून घेतला, नंतर त्याचे छतीनें तो किल्ला थोडकेच दिवसांनीं मोंगलांचे हातीं लागला. असें सन सोळाशें नव्वदांत घडलें.

तेव्हां तेथें संभाजीची स्त्री येसुबाई व पुत्र शिवाजी, उभयतां मोंगललोकांचा हातीं सांपडलीं; तीं त्याणीं औरंगजेबाचा लश्करांत नेलीं. त्यावरून औरंगजेबानें त्या सरदारांचा संमान केला; आणि त्या पुत्राचे ठिकाणीं प्रीति ठेवून, त्याचें शाहु असें नाव चालविलें. येसुबाई व औरंगजेबाची कन्या, बेगमसाहेब. यांचा स्नेह झाला.

यानंतर मोंगलांनीं मिरज. व पन्हाळा घेतला; तेव्हां मराठालोकांत असें ठरलें कीं, राजारामानें जिंजीस जावें. त्यावरून राजाराम याणें, प्रल्हाद निराजी, व संताजी घोरपडे, व खंडेराव दाभाडे, व धनाजी जाधव, व खंडो बल्लाळ, व दुसरीं केवळ विश्वासू अशीं एकवीस माणसें बरोबर घेतलीं; आणि वाण्याचा वेषानें निघाला. तो निर्विघ्नपणानें तेथें जाऊन पोंहचावा. असा त्यांणीं शहाणपणानें बंदोबस्त केला होता; तथापि औरंगजेबास तें कांहीं वर्तमान कळलें. तेसमयीं त्याचा फौजदार कर्नाटकांत होता. त्यास व दुसरे त्याचे सरदार जे तिकडे होते त्यांना, त्याणें आज्ञा केली कीं, राजाराम तुमचे मुलखीं गेला आहे त्यास धरून आणा. त्यावरून बंगलोर शहराजवळ राजाराम उतरला; आणि तो आपल्या पायं माणसा करून धुवरीत होता; तेव्हां लोकांनीं वळखिला कीं, हा कोणी मोठा नाणूस आहे; मग त्यांणीं तेथचा सरदारास बातमी कळविली. इतक्यांत

खंडोबल्लाळ

खडोबहाळ समजल्या कीं. आतां आह्मास मोंगल येऊन धरितील; यास्तव तेसमयींच राजारामाबरोबर संताजी घोरपडे व धनाजी जाधव देऊन तेथून पळविले. व आपण मंडळी सुद्धां तेथेंच सैंपाक करीत बसून. बेत केला कीं. जर कोणी आपल्यास धरून नेऊन विचारूं लागले तर सर्वांचें उत्तर एक ह्मावें; कीं आह्मांस कांहीं ठाऊक नाहीं. असा निश्चय ठरल्यावर मोंगल आले. आणि त्यांस धरून मारझोड करून पुसूं लागले; परंतु ते सर्व एकचित्त. यास्तव त्यांस कांहीं ठिकाणा लागूं दिला नाहीं. तेव्हां त्यांणीं त्यांस सोडिले; नंतर ते सर्व संकेतानुरूप जिंजींत एके जागीं जमले.

राजाराम मुलुख सोडून गेल्याचे पूर्वी. प्रल्हाद निराजीचे मसलतीनें असा बेत झाला होता कीं. मोरेत्रिमलाच्या पुत्र निळोपंत यास पेशवा करून; रामचंद्र पंत बहुरकर यास हुकुमतपणाचें पद देऊन, विशाळगड, व रांगणा. व इतर जे मराठ्यांचे किल्ले, व मुलुख त्यांचा बंदोबस्त सांगीतला. शिधोजी गुजर. व कान्होजी आंगऱ्या यां दोघांस लढाऊ गलबतांचें काम सांगीतलें आणि एक ह्मातारा महादाजी नाईक पानसंबळ नामें शिलेदार मराठी लोकांत मोठा विख्यात होता, तो सेनापती केला. मग थोडकेच दिवसांनी तो मरण पावला; नंतर संताजी घोरपडे यास तो अधिकार दिला.

राजाराम जिंजीस पोंचल्यावर थोडकेच दिवसांत, तो अल्पबळ असूनही. त्याणें आपलें महत्व वाढावें ह्मणून. शिवाजी प्रमाणें आपल्या जवळ मोठे मोठे अष्टप्रधानादि असावे, असें जाणून त्याणें नवे अष्टप्रधान केले. ते असे जनार्दनपंत हणमंते अमात्य; शंकराजी मल्हार सचिव; रामचंद्र त्रिंबक पुंडे मंत्री महादाजी गदाधर सुमंत; निराजी रावजी न्यायाधीश. श्रीकराचार्य पंडितराव; पेशवा व सेनापति ते पूर्वींच केलेले होते, ते व हे मिळून आठ झाले. त्यांत प्रल्हाद निराजी मोठा चतुर असे. आणि राजाच्या उपयोगी बहुत पडला होता. यास्तव त्याला पेशवेपणाचें पद असावें परंतु ते रिकामें नव्हतें. ह्मणून प्रतिनिधी असें नवेंच पद करून. त्याला सर्व प्रधानावर्ती स्थापिला. संताजी घोरपडे सेनापति यांस नवें हिंदुराव ममलकत मदार असें नाव ठेवून, नगारा व जरिपटक्याचें निशाण दिलें; धनाजी जाधव यास जयसिंगराव असें नवें नांव ठेवून. तो आणि संताजी घोरपडे यां दोघांस माघारें महाराष्ट्र मुलखीं फौज ठेवून मोगलाचा मुलुख लुटावयाकरितां पाठविले.

असा बंदोबस्त झाल्यावर त्या प्रधानांनीं जिंजीमध्यें राजाराम तख्ताधिपती करून. ते आप आपल्या कामांत मोठ्या सावधपणें करून वागूं ला-

गले

गले; आणि गुप्तरूपेंकरून आपल्ये जातीचे मराठे मानकरी लोक, यांस सोन्याचीं कडीं व मोठे मोठे पोषाक व गेरे पाठवून, त्यांस राजाराम तक्ताधिपति केला, हें आनंदाचें वर्तमान कळविलें. याशिवाय जो आपला मुलुख मोंगलानीं घेतला होता, त्यांत व जो मोंगलांचाच मुलुख होता त्यांत कित्येक ठिकाणें जहागीर इनामें करून त्यांचा सनदाही, कित्येक मानकरी यांस पाठविल्या. तें देणें ते वेळेस लोकांचे उपयोगी पडलें नाहीं, परंतु राजारामास उपयोग झाला, तो असा ते लोक संतुष्ट होऊन आपणास याप्रमाणेंच पुढें मिळेल या आशेनें त्यांचे वकील व लोक कित्येक जिंजीस गेले आले असें होऊं लागलें; तेणेंकरून तो महत्वास चढला.

हें वर्तमान औरंगजेबास कळून त्याणें जुलफिकारखान सरदार कर्नाटकांत अशा अभिप्रायानें पाठविला कीं, एक जिंजी शहर घेतलें म्हणजे सारे मराठे एकेजागीं सांपडतील. परंतु ती त्याची कल्पना व्यर्थ गेली; कांकीं, तेसमयीं विजापुरकरांचें व गोंवळकोंडकरांचे कित्येक लोक, मराठेलोकांचा नावेंकरून, नाशीक, व बेदर, व भीर, एतत्संबंधें संपूर्ण मुलखीं एकसमयावच्छेदें करून, उपद्रव करीत होते. याशिवाय जे त्यांर शिवाजीचे पहिले चाकर होते तेही येऊन संताजी व धनाजी यांस मिळाले.

औरंगजेबाचा सरदार जुलफिकारखान जिंजीस गेला तो तें मोठें शहर पाहून, समजला कीं याचा वेढयास आपलें इतकें लश्कर पुरणार नाहीं; ह्मणून त्याणें औरंगजेबास लिहिलें कीं, सैन्य अणीक पाहिजे तें येई तोंपर्यंत आपण जिंजीजवळ थोडकीशी फौज ठेवून, दक्षिणेंत स्वाऱ्या घालून खंडणी घ्यावयास निघोन, तंजोर, व त्रिचनापालीचे राजे यांपासून खंडणी घेतली.

याप्रमाणें कर्नाटकाचें वर्तमान असतां महाराष्ट्र देशांत रामचंद्रपंत किल्ल्याचा वसुलाच्या व शिबंदीच्या बंदोबस्त उत्तमप्रकारें करीत होता. त्याणें मोंगलांचा लश्कराचा कित्येकजागीं टोळ्या होत्या त्या खराब केल्या; नंतर जिंजीहून संताजी घोरपडे व धनाजी जाधव येऊन मिळाले. तेव्हां त्याणें विचार केला कीं मोंगलांचा फौजदार वाईस आहे तो धरून आणावा; त्यावरून ते संतुष्ट होऊन तात्काळ तें काम त्या सरदारानीं शेवटास नेलें. तें असें तो फौजदार व त्याचे सर्व लोकही छापा घालून धरून आणिले. नंतर रामचंद्रपंत, व संताजी, व धनाजी, या तिघानीं आपले कित्येक लोक मोंगलांचे मुलखांत चौथ व सरदेशमुखीचा भाग घ्यावयास पाठविले; त्याणीं आज्ञेप्रमाणें येऊन, आपणास घांस दाण्याचा निमित्तेंकरून सर-

कार

कार आजेग्वेराज स्वतंत्रपणें कांहीं घेऊं लागले. असे वागणारे जे त्यांत मुख्य तीन पवार, व थोरात, व आठवले; त्यांस राजाराम उंच वस्त्रें वगैरे कांहीं बक्षिसें कामानुरूप पाठवीत असे. त्याणें पंवाराचें विश्वासराव असें नवें नांव ठेवून, थोरातास दिनकरराव असें ठेविलें; व आठवले यांस समशेरबहादर असें नांव दिलें.

रामचंद्रपंतानें आपल्या लश्करांत धनगर लोकांवर बहुत प्रीति ठेविली होती; त्यांत कित्येक त्याचा आश्रयें करूनच मोठ्या पदवीस चढले. त्याचा कारकून संकाजी नारायण नामें मोठा शहाणा होता, त्याणें त्याचवर्षीं सन सोळाशें श्याण्णवांत मोंगलांपासून राजगड घेतला; ह्मणून रामचंद्रपंतानें त्यास वांई परगण्याची मामलत सांगितली. त्याच सुमारें परशुराम त्रिंबक याणें मोंगल असावध पाहून, त्यांपासून पन्हाळा किल्ला घेतला; ते समयीं संताजीही निरुद्योग बसला नाहीं; त्याणें जाऊन मिरज घेतली; तेव्हां रामचंद्रपंत समजला कीं, याला तेथची देशमुखी द्यावयाजोगें धण्यानें आपणास सामर्थ्य दिलें आहे, आणि यांत स्वामीचें हित होईल ह्मणून, तो अधिकार त्यास दिला. मग संताजी व धनाजी यांणीं आपली पूर्तता होई असें सैन्य जमा करून आपला धणी राजाराम यास हितावह व्हावया करितां, गोदातीरीं मोंगलांचा मुलुख होता, तेथें उपद्रव करावयास गेले; तो मुलुख स्वस्थ होता आणि तेथें दाणे सस्ते असत; त्याप्रमाणें इतर मुलखीं कांहीं कारणामुळें मिळत नव्हते; ते तेथें जाऊन प्रकट होतांच औरंगजेबानें त्यांवर सैन्य पाठविलें; परंतु ते लोक पहिल्याप्रमाणें न भितां युद्धास उभे राहून तीन वेळा मोंगलांचा पराभव करून प्रतियुद्धीं त्यांचे मोठे मोठे सरदार यांस धरिले; आणि त्यांपासून बहुत द्रव्य घेऊन सोडिले. त्यावरून औरंगजेब समजला कीं, हे पूर्वींचे अल्पसार असून, होतां होतां मोठे प्रबळ झाले. त्या मराठी लोकांमध्यें संताजी मोठा योग्य सरदार असे, तो तारतम्य व्यवस्था निपुण, आणि रागीट होता; तसाच धनाजी जाधवही मोठा योग्य असून, कांहीं मासोसक असे; यास्तव तो संताजीपेक्षां लघु असतांही. त्यावर लोक मोठी प्रीति करीत होते.

असे मराठ्यांचे सरदार उत्तरे कडे उपद्रव करीत असतां, औरंगजेब आतां काय करावें असा सचिंत होऊन लश्कर सहित भीमातीरींच दुसरे जागीं जाऊन उतरला; मग त्याणें असा निश्चय केला कीं, अगोदर जिंजी घ्यावी, तेव्हां कामबक्ष नामें आपला पुत्र याज बरोबर फौज देऊन त्यास आसदखान वजीर याचे आज्ञेप्रमाणें वागावयास सांगून, त्या दोघांस जिंजीवर पाठविले.

ले. त्याणीं तेथें जाऊन शहरास वेढा घातला; असें सन सोळाशें त्र्याण्णवांत घडलें.

जुलफिकारखान बादशाहानें जिंजीवर पहिल्या नेमला असतां, त्यावर आपला पुत्र मुख्य करून पाठविला; तें त्यास अपमानास्पद होऊन, त्याचें चित्त उदास झालें; आणि वजीर जो पाठविला तो त्याचा पक्षपाती होता तो समजला कीं, ही एवढी अनीति बादशाहाची प्रियजी बायको तिजकडून झाली.

जुलफिकारखान उदासचित्त झाला असें वर्तमान ऐकून, राजाराम राजाचा प्रधानांनीं मोठ्या हर्षानें यांनच आपला अर्थ साधून घ्यावा ह्मणून उद्योग केला; शेवटीं जुलफिकारखान व राजाराम यांचा आंतून गुप्तपणें तह ठरला, कीं, कामबक्ष जी मसलत करील ती युक्तीनें मोडावी; तें न साधलें तर त्याणें राजारामास ती बातमी कळवावी. असें सन सोळाशें चौऱ्याण्णवांत घडलें. त्याच वर्षी औरंगजेब भीमेचा कांठ सोडून, गलगल्यास गेला. त्या जाण्यांत मसलत अशी असेल कीं, आपण दक्षिणेंत शिरलों ह्मणजे मराठे लोक तिकडे येतील, परंतु तसें न झालें. घोरपडा सैन्यसहित उत्तरेसच होता; रामचंद्रपंत सेनेसुद्धां पूर्वेकडे सोलापुरपर्यंत मुलुख लुटीत राहिला. मग औरंगजेब ती कल्पना सिद्धीस गेली नाहीं ह्मणून पुनः भीमातीरीं ब्रह्मपुरीस जाऊन उतरला; तो तेथें लश्कराचे उपयोगी पडतील अशीं कितिएक मोठीं मोठीं घरें बांधून, कांहीं वर्षे राहिला. तेव्हां त्या औरंगजेबानें तेथूनच आपला सर्व राज्यकारभार चालविला.

त्यापुढें दोन वर्षे पर्यंत महाराष्ट्र मुलखीं कांहीं विशेष वर्तमान झालें नाहीं; पोर्तुगीस लोकांवर औरंगजेबाचा राग होऊन, कोंकणांत मात्र त्यांचे कित्येक गांव लुटले; ते समयीं कित्येक ते लोक समुद्रतीरीं दमन व वसई, या दोहों किल्ल्यांत राहून वांचले. त्याच वेळेस औरंगजेब समुद्रतीरांतील उपद्रवामुळें इंग्रेज लोकांसही क्रोधें करून मुंबईतून हांकून द्यावयास इच्छीत होता; परंतु मुंबई स्थान घ्यावयास अतिशय अवघड याकरितां औरंगजेबानें तो उद्योग केला नाहीं.

नंतर महाराष्ट्र मुलखांत संताजी घोरपड्यानें फार उपद्रव केला, आणि जे मोंगल त्याचे पाठीस लागले होते, त्यांस, समय विशेषीं जिंकून त्यांपुढें उपाय नचाले अशा समयीं पळून त्याणें आपल्या सामर्थ्याप्रमाणें त्यांचा नाश केला. शेवटीं वीस हजार स्वार बरोबर घेऊन औरंगजेबाचें थोरलें लश्कर पूर्वेकडे टाकून साताऱ्यावरून कर्नाटकांत शिरला. मग जिंजीजवळ गेला तेव्हां त्या लश्कराचा निमग थोडा लश्कर, धनाजी जाधवाबरोबर देऊन, जिंजीस मोंगलांना

घेर

घेरा घातलेल्या लश्करावर छापा घालावयाकरितां जलद पुढें पाठविला. तो जातांच प्रथम जिंजीजवळचें एक मोंगलांचें ठाणें त्याणें मारिलें: तेणेंकरूनच मोंगल समजले कीं मराठे जवळ आले; त्यावेळेस त्या शहरांत जे राजारामाचे लोक होते तेही बाहेर निघून मोंगलांस मारूं लागले; तेव्हां आसमंतात त्यांचीं ठाणीं होतीं तीं एकत्र करून बंदोबस्त करावयास त्यांनां अवकाश सांपडला नाहीं. त्यायोगें त्यांचा फार नाश झाला; इतक्यांत संताजी घोरपडा जिंजीकडे हळूहळू येत होता, तो, रवोवरपाकपर्यंत पोंचला, तेथें अलीमर्दनामें मोंगलांचा फौजदार होता तो मोठें सैन्य जमाकरून त्याशीं लढला; परंतु त्याचा अगदीं मोड होऊन. तो संताजीनें धरून, त्यापासून द्रव्य घेऊन सोडिला. मग जिंजीचा सभोंवतीं दूर दूर जितकीं मोंगलांचीं ठाणीं होतीं तितकीं संताजी व धनाजी या दोघांनीं मिळून मारून हटवलीं. तीं जिंजीजवळ गेलीं तेव्हां कामबक्ष याचे जवळचे जे स्वार होते ते कांहीं वैमनस्यामुळें लढेनात, आणि त्यांस बाहेरचें वर्तमान मराठे लोक कळूं देइनात: आणखी वदंता अशी उठविली, कीं औरंगजेब मेला; त्यावरून त्यालोकांचा मनांत भय आणि संशय एकदांच उत्पन्न झालें. त्यासमयीं जिंजींतले मराठे लोकही त्यांवर स्वाऱ्या घालून, मारीत होते. तेव्हां जसे जिंजी सभोंवता वेढा घालून मराठे लोक मोंगलांनीं पूर्वीं कोंडले होते, तसेच, तेही मराठ्यांचा वेढ्यांत सांपडले. यास्तव उदास चित्त होऊन, शहरास भोंवते मोर्चे होते ते मोडून त्या तोफा लढाईचा उपयोगी नाहींतशा करून, तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां असें ठरलें कीं, मोंगलांस न अडवितां, वांदिवाश गांवापावेतों जाऊं द्यावे. मग तेथें औरंगजेबाचें लिहिलें येई तोंपर्यंत, त्यांस त्याच जागीं राहूं द्यावे.

तो तह औरंगजेबाचा मनास न आला. त्याणें कामबक्षनामें आपला पुत्र व आसदखान वजीर, माघारें बोलाऊन, पुनः जुल्फिकारखानास जिंजी घ्यावयाचें काम सांगीतलें; आणि आपण भीमातीर सोडून लश्कर सुद्धां विजापुरास गेला.

तेसमयीं संताजी घोरपडा कर्नाटकांत स्वाऱ्या घालून विजापुरसंबंधें मुलुख उद्ध्वस्त करीत होता; त्याचा शासनार्थ बादशाहानें विजापुरांतून मोठें सैन्य पाठविलें. त्याशिवाय त्या मुलखीं काशीमखान नामें मोंगलांचा फौजदार होता. त्याला आज्ञा दिली कीं, तूं त्या सैन्यास कुमक कर. त्यावरून तें लश्कर व तो फौजदार हे सर्व मिळून संताजीला शोधूं लागले असतां, तो त्या लश्करावर अकस्मात येऊन पडला. आणि बहुत लोक मारिले; त्यापुढें मोंगल लोकांचे लश्करांत मोठे मोठे सरदार फार होते, त्या मुळें त्यांचें एकचित्त वागणें

गणें होईना; तें आपणास मोठें हितावह, असें समजून, मराठे लोक त्या लश्करावर दिवसा छापा घालीत, आणि रात्रीं बाणानीं भार्जीत; असा उपद्रव त्या लोकानीं तीन दिवस सोसला; नंतर दादेरीनामें एक लहानसा किल्ला आहे तेथें जाऊन त्या आश्रयानें आसमंतात् राहिले. मग थोडकेच दिवसानीं त्यांस अन्नादिकाचा तोटा पडला, तेव्हां त्या किल्ल्यांत काहीं धान्यादि होतें तें लुटलें जाईल ह्मणून त्या किल्लेकर्यानीं दरवाजा बंद केला असतां, तेथचा वाण्यानीं भिंतीवरून फार महाग विकलें; तरी सरलें. त्या लश्कराचे कुमकेस औरंगजेबानें दुसरें लश्कर पाठविलें तें त्यास जाऊन मिळालें नाहीं तोंच, संताजीनें वाटेंतच त्याशीं लढाई करून जिंकिलें. तें वर्तमानही मोंगलांस कळूं दिलें नाहीं, नंतर ते लोक अगदीं निराश होऊन, मराठ्यांस शरण गेले; त्यांत कासीमखान प्रमाणिकपणें मोठ्या योग्यतेनें, स्वामिसेवा केलेला होता; त्याला तें शरणजाणें फार वाईट वाटलें ह्मणून, विषखाऊन मेला. इतर जे मोठे मोठे सरदार होते, त्यांपासून खंडणी घेऊन लुटून सोडिले, ते औरंगजेबाकडे गेले असतां, त्यांवर त्याची इतराजी होऊन, त्याणें ते पदच्युत करून तेथून दूर देशीं अल्पाधिकारीं योजिले. इतक्यांत जुलफिकारखान जिंजीस जाऊन त्या शहरास वेढा घालावयाचें काम आळसत करीत होता, त्यावरून औरंगजेब समजला कीं, त्याचा राजारामाशीं कांहीं स्नेह असेल, हें वर्तमान जुलफिकारखानास कळलें तेव्हां त्याणें राजारामाला सांगीतलें कीं, आतां मला या शहरास घेरा अवश्य घातला पाहिजे; त्यास तुह्मी पळा मीं तुह्माला अनुकूळ आहें; तेव्हां राजाराम आपले सोयरे शिरके बरोबर घेऊन, विशाळगडीं गेला, ते समयीं जुलफिकारखान व राजाराम यांचा असा करार ठरला होता कीं, शहर घेतल्यावर राजारामाचीं मुलें व स्त्रिया काहीं निमित्तेंकरून शिरक्यांचे स्वाधीन करावीं, असें सन सोळाशें सत्याण्णवांत झालें. मग सन सोळाशें अठ्याण्णवांचे पहिल्या महिन्यांत जुलफिकारखानानें जिंजी शहर भिंतीला शिडी लावुन घेतलें; त्यांत राजारामाचीं बायका, मुलें, व मोठे मोठे सरदार सांपडले; त्यांतील तीं मुलें आणि बायका तेथें कोणी शिरके कुळाचे गृहस्थ होते त्यांचे स्वाधीन केलीं तीं त्याणीं राजारामाजवळ पोंचवलीं. आणखीं जे उरले थोर सरदार माणूस त्यांत कित्येक कैद केले, ते असे कीं जन्मभर. कित्येक जिवें मारिले. कांकीं आपणाविषयीं बादशाहाचे मनांत फितुराचा संशय आलेला गेला पाहिजे ह्मणून. जे मारिले त्यांत प्रह्लाद निराजीचा पुत्र नारोप्रह्लाद होता. प्रह्लादनिराजी, प्रतिनिधी, त्यानंतर आगोदरच मरण पावला.

राजाराम जिंजीहून गेल्याचा अगोदर पासूनच संताजी व धनाजी यांचें वांकडें पडलें होतें; परंतु तें प्रकट झालें नाहीं. कांकीं प्रह्लादनिराजीचा मसलतीनें राजाराम कोणाचाही पक्षपात धरीत नसे, मग तो प्रतिनिधी मेल्यावर जे संताजीचे शत्रू होते त्यांचा बुद्धीस लागून राजारामानें धनाजीचा पक्ष धरिला. त्या वेळेस औरंगजेबानेंही मराठ्या लोकांत वैमनस्य पडलेलें ऐकून आपल्या वकिलादिकांकरून त्या वैमनस्याची वृद्धी करविली, अशा निमित्तेंकरून संताजीचा लश्कराचे लोकही त्या संताजीवर प्रीति करिनात असे झाले; ते कोणे एके दिवशीं धनाजीचा लोकांस मिळून, संताजीला धरून कैद करावयाचे मसलतींत पडले; तें संताजीस कळलें तेव्हां तो आपले विश्वासू लोक थोडकेसे बरोबर घेऊन पळाला. त्या वेळेस मराठ्यांचा लश्कराचे दोन भाग झाले, त्यांतील एक भाग कर्नाटकांत जुलफिकारखानावर गेला; आणि दुसरा साताऱ्यास गेला. तेथें राजाराम विशाळगडाहून आला असे, त्याला रामचंद्रपंतानें मसलत दिली होती कीं, साताऱ्याची राजधानी करावी. संताजी पळाल्या तेव्हां राजारामानें कांहीं लोक त्याचे पाठीस लाविले.

अष्टप्रधानांतला अमात्य जनार्दनपंत हणमंत्या मेला, तेव्हां त्याची पदवी रामचंद्रपंतास देऊन, त्याचा मुख्य कारभारी शंकराजी नारायण त्याला सचिव पद दिलें. पहिला सचिव जेव्हां मोंगलांनीं पहिल्यानें जिंजीस वेढा घातला, तेव्हांच तो आपला अधिकार टाकून काशीस गेला.

जनार्दनपंत हणमंत्या पहिला अमात्य, त्याचा पुत्र तिमोजी हणमंत्या, तो मोंगलांचे कैदेंत जिंजीमध्यें सांपडला होता, तथापि कांहीं चातुर्यकरून, पळाला तो राजारामास येऊन भेटला; त्याचा बापाचा अगत्यास्तव आणि कल्पनेस आलें कीं, हा मोठा चतुर होईल म्हणून तो प्रतिनिधी केला.

मराठ्यांचा लढाऊ गलबतांचा सरदार, शिधोजी गुजर तो त्याच संधीस मरण पावला; तो जंजिऱ्याचा शिद्दीशीं निरंतर लढत असे, त्याचा सोबतीं कानोजी आंगऱ्या, त्याणें शिद्दी व मोंगल वइरकोणी लोक यांचीं कित्येक मोठीं मोठीं जहाजें घेतलीं होतीं; आणखी मुंबेपासून मलबारलगत त्रावनकोरपर्यंत गांवें लुटून बहुत द्रव्य मिळविलें. तो बहुधा सुवर्णदुर्ग आणि विजेदुर्ग या दोहों ठिकाणीं राही. परंतु त्याचें शिवाजीचे वेळेचें रहावयाचें मुख्य ठिकाण कुलाबा. वाडीचे देशमुख सावंत ते समयविशेषीं मोंगलांचा पक्ष स्वीकारीत; परंतु आंतून राजारामाकडचे असत. कारवारच्या देसाई, तो कोणाचा पक्ष न धरितो. स्वतंत्रपणें आपण राजा असें म्हणवीत होता.

संताजी घोरपड्याचे पाठीस लोक लागले असतां तो फार दिवस कोणाचा हातीं सांपडला नाहीं तेव्हां बहुतेक लोक कंटाळून, त्या यत्नाच्या आव्हेर करूं लागले; परंतु एक नागोजी मान्या नामें म्हसवाडच्या देशमुख होता, तो आपल्याच द्वेषामुळें त्याची पाठ सोडिना, तेव्हां तो संताजी कोणे एके दिवशीं पळतां पळतां फार श्रमी होऊन, शत्रु दूर असेल, अशी अटकळ करून ओढ्यांमध्यें स्नानास उतरला; ते समयीं नागोजीनें तो असावध गांठून, त्याचें डोकें कापून औरंगजेबाचा लश्करांत नेऊन बादशाहाचे हुजूर ठेविलें. तेव्हां औरंगजेबानें त्याची प्रशंसा करून, त्याचा संमान केला, आणि तो आपल्ये चाकरीस ठेविला. संताजी अशा दुर्मरणानें मेल्यावर, कित्येक जे त्याचे जुने चाकर पहिले त्याला सोडून राहिलेले होते, ते परम क्रोधाविष्ट होऊन सर्व एकत्र मिळून, त्याचे दोघे पुत्र राणोजी व पिराजी, यांस घेऊन संताजीचा कुळाचा झेंडा लाविला. आणि स्वतंत्रपणेंच मोंगलांचा मुलखीं उपद्रव करूं लागले.

सन सोळाशें नव्याण्णवांत राजाराम साताऱ्यांतून लश्कर सुद्धां उत्तरेकडे जावया करितां निघाला, त्याला वाटेनेंच खानदेश, व गंगथडी, व वराड, या मुलखांतून उपद्रव करीत राहिलेले जे मराठे सरदार लोक होते ते सर्व येऊन मिळाले. त्यांचीं नांवें, परसाजी भोंसले. हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदा, आठवले समशेर बहादर, वगैरे जमून शिवाजीचा वेळेपेक्षां राजारामाचें लश्कर मोठें झालें. मग ते गंगथडींत शिरून चौथ व सरदेशमुखीचा अधिकार संबंधें वसूल घेऊं लागले; तेव्हां जा रैतेनें तें मान्य केलें ते व जे मोंगलांचे ठाणें करी शिबंदि वाले त्याणींही तें मान्य केलें असतां, त्यांशीं त्याणीं द्वेष न केला. आणखी जे कोणी मानिनात ते मारून टाकिले. त्या वेळेस त्या वसुलाचा बंदोबस्त शिवाजी प्रमाणें ठेविला होता, तो असा. जेथें वसूल उगवला तेथें उगवून घेतला, जेथें हातास लागेना तेथच्या करारनामा करून घेतला. या प्रमाणें नांदेर, व वराड, व खानदेश. इतक्या जागीं केलें. तें काम थोडकेंसें राहिलें असतां, राजाराम तेथून माघारें परतला; तो वाटेनें येताना, त्याणें बागलाण मुलखींची बाकी राहिलेली घ्यावयास, खंडोजी दाभाडा ठेविला; खानदेशांतली घ्यावयास नेमाजी शिंदा, आणि वराडचे करितां, परसाजी भोंसला; आणि गंगथडीचे साठीं, हैबतराव निंबाळकर, असे ठेविले. त्यांत परसाजी भोंसल्याचें सेनासाहेबसुभा, असें नांव ठेविलें. आणि हैबतराव निंबाळकर याचें सरलश्कर असें नांव ठेवून, त्या दोघांस जरिपटक्याचीं निशाणें दिलीं. मग तेथून माघारें येत असतां वाटेनें जालना शहर लुटूं लागला होता; इतक्यांत जुलफिकारखान कर्नाटकांतून अकस्मात येउन त्यावर

पडला,

पडला त्याणें परम पौरुषें करून मराठे पिटून लाविले.

राजारामाचा लश्करावर जुलफिकारखान अकस्मात् येऊन पडण्याचें मूळ असें: धनाजी जाधव कर्नाटकांत शिरून उपद्रव करूं लागला असतां, त्यावर औरंगजेबानें मोठा सरदार जास मराठे लोक फार भीत होते असा जुलफिकारखान पाठविला; त्याणें कित्येकवेळा धनाजीचा पराभव केला, इतक्यांत खानदेशामध्यें राजारामानें बहुत उपद्रव केला असें वर्तमान औरंगजेबास कळलें तेव्हां त्याणें आपणाजवळ ब्रह्मपुरीं जुलफिकारखानाला बोलाविला; आणि आपला नातू आजिमशाहाचा पुत्र, व तो जुलफिकारखान यांजबरोबर सैन्य देऊन, मुलखांत मराठ्यांचा स्वांऱ्या जा फिरत होत्या त्यांचा बंदोबस्तास पाठविले; आणि आपण किल्ले घ्यावयाचें काम स्वीकारलें. अशीं दोन लश्करें दोहीं कडे निघालीं, जुलफिकारखान जालनास जाऊन, राजारामाशीं लढला आणि औरंगजेबानें जाऊन वसंतगडास घेरा घातला; तेथें मोठे मोठे मोरचे लावून तिहीं दिवसांत किल्ला हस्तगत करून, मोठ्या हर्षानें तेथून साताऱ्यास आला. त्या किल्ल्यावर जे मराठे होते त्यांची अटकळ अशी होती कीं, बादशाह आधीं पन्हाळा किल्ला घ्यावयास जाईल, म्हणून तेथें अन्नाची मात्र दोन महिन्यांची बेजमी केली होती.

तेसमयीं औरंगजेबानें साताऱ्यास घेरा घातला तो असा, उत्तरेचे आंगीं आपण उतरला; त्या जागीं आतां करंजें गांव आहे; आजिमशाह पश्चिमेस उतरला तेथें एक लहानसा गांव आहे, त्याचें नांव तेव्हां पासून शहापूर असें पडलें. दक्षिणेस शिरजीखान उतरला होता, आणि पूर्वेस तरबीयत् खान सरदार उतरला; अशीं चहूं दिशांस चार ठाणीं बसवून, त्यांचा मधून कोणाचेंही जाणें येणें न व्हावें म्हणून दुसऱ्या लहान लहान टोळ्या मध्यें मध्यें जागोजाग बसविल्या. तेसमयीं त्या किल्ल्यावर प्रयागजी नामें शिवाजीचा वेळेचा एक परभू असे. त्या किल्ल्याचा डोंगराची उंची नेमस्तच आहे; परंतु वरून सभोंवता तीस तीस हात कडा तुटलेला सारिखा, काळा दगड आहे; त्यावर तट फारसा उंचा नाहीं; त्या किल्ल्याचा एक ईशानी दिशेचा कोन, लांबीस आणि उंचीस अंमळसा अधिक आहे; त्याचा आकार बुर्जासारिखा दिसतो; आणि सभोंवता तुटलेल्या कड्यापेक्षां, त्या जागचा कडाही अधिक तुटलेला दिसतो. त्या टोंकावर बुरूज बांधला आहे, तें ठिकाण किल्ल्याचा साऱ्या जाग्यापेक्षां मोठें अवघड. असें असून तरबीयत् खानानें नेम केला कीं, हा कोंपरा सुरुंग लावून पाडून वाट करीन; अशी त्याची प्रतिज्ञा झाल्यावर, युद्धास आरंभ होऊन; साडेचार महिने लोटले; तो प्रयागजी

परभू

परभू असा पराक्रमी होता कीं, मोंगलांस एक पाउलभर जागा आटपायाला, महत्प्रयास पडे, जा पुढे उपाय चालेना. कदाचित मोंगल हल्ला करूं लागले तर, तो आपले सारे लोक जमा करून मोठमोठाले दगड किल्ल्याचे भिंतीवरून खालीं टाकी, त्या दगडानीं तोफांपेक्षां त्याचें काम अधिक होई. तो असा पराक्रमें करून लढत असतांही आंतली बेजमी सरली; म्हणून किल्ला द्यावयास सिद्ध झाला परंतु तेथून जवळच परळी किल्ला, त्यावर परशुराम त्रिंबक होता. त्याणें आजिमशाहास कांहीं युक्तीनें वश करून किल्ल्यावर अन्नादिक साहित्य पोंहचतें केलें; हें वर्तमान सनसत्राशें भरतां घडलें. ते समयीं राजाराम सिंहगडीं दुखण्यां पडला होता.

तरबीयतखान याणें नेम केल्याप्रमाणें साडेचार महिन्यांत त्याईशानीच्या कोंपऱ्याखालीं दोन सुरुंग तयार केले; तेणेंकरून मोंगलांस असें वाटलें कीं, निःसंशय कार्य आतां सिद्धीस जाईल; आणि तो चमत्कार पहावयास औरंगजेबही बसला होता. आणि त्या बेताप्रमाणें तो कोंपरा उडाला म्हणजे, त्वरित हल्ला करावयाकरितां, लोक तयार करून डोंगराच्या एका बाजूस लपून बसविले. याशिवाय अशी कांहीं युक्ती केली, कीं, त्या किल्ल्यावरचे बहुतकरून लोक औरंगजेबाची स्वारी पहावयाकरितां, त्या बुरजावर जमावे. त्याप्रमाणें तेही तसेच त्या ठिकाणीं जमले; त्यांत प्रयागजीही आला होता; ते समयीं मोंगलांनीं त्यांतल्या एका धाकट्या सुरुंगाला आग लाविली; तेव्हां त्या दारूच्या जोरानें त्या जागीं डोंगरास तडा गेला. आणि त्या धक्यानें त्या आंगची वरली भिंत वरच आंतल्या आंगीं पडून, ती जखालीं सांपडून माणसें बहुत मेलीं. इतक्यांत ते हल्ला करून वर जावयास सिद्ध केलेले लोक कांहींसे जवळ गेले; तों दुसऱ्या मोठ्या सुरुंगास आग घातली, तो सुरुंग तयार करतांना कांहीं बेत चुकला होता, यास्तव त्याचा नेट वरचे आंगीं बुरजाकडे न पोंहचला, आणि मोठा भयंकर शब्द होऊन बाहेरच्या आंगीं तो सुरुंग मोंगलांकडे उडाला; तेणेंकरून मोंगल दोन हजारांवरही, कांहीं मेले गेले.

पहिल्या सुरुंगानें वरची भिंत पडली तेव्हां तो प्रयागजी तेथेंच देवीच्या देवळाजवळ त्या भिंतीखालीं सांपडला, तेव्हां त्याला तेथून खणून बाहेर काढिला; त्याचा आंगास कांहीं लागलें नव्हतें, आणि देवीजवळ होती; म्हणून त्या सर्व मराठ्यांनीं तो उत्तम शकून मानून निश्चय केला कीं, आपणास देवी अनुकूळ आहे, यास्तव त्यांस किल्ला द्यावयाचा नाहीं. इतकें झाल्यावर आजिमशाह पुनः त्यांस धान्यादि पोंचतें होऊं देईनासाजहाला;

झाला; तेव्हां त्या आजिमशाहाचेच द्वारें किल्ला घ्यावा, असा मराठ्यां लोकांचा विचार होऊन त्याच वर्षाचा चवथ्या महिन्यांत त्यांणीं मोंगलांस किल्ला दिला; तेव्हां ओरंगजेब समजला की, आजिमशाहाचे योगें किल्ला हस्तगत झाला.म्हणून बहुत संतुष्ट होऊन त्याचा कांहीं मान केला आणि किल्ल्याचें नांव आजिमतारा असें ठेविलें.

सातारा हस्तगत झाल्यावर, ओरंगजेबानें परळी किल्ल्यास घेरा घातला; तेथचे किल्लेकरी मोठ्या शौर्यानें दीड महिना लढून शेवटीं किल्ला रिकामा टाकून पळाले; ते समयीं पर्जन्यानें बहुत उपद्रव केला तेव्हां मोंगलांनीं तात्काळ तो डोंगरांचा मुलुख सोडिला आणि माननदीचा कांठीं कवासपुरामध्यें जाऊन राहिले.

पूर्वी लिहिलें कीं, राजाराम सिंहगडीं दुखण्यांस पडला, त्या दुखण्याचें कारण असें, जालनाहून झुलफिकारखान त्याचे पाठीस लागला होता त्यामुळें त्याला रात्रदिवस पळावें लागलें; तेणें करून त्यास बहुत श्रम होऊन, तो उरीं भरला; त्या विकारानें तेथेंच तो एका महिन्यानें मरण पावला. नंतर एका महिन्यानें सातारा मोंगलांचे स्वाधीन झाला.

राजाराम कांहींसा शूर होता, त्यास मुलखी कारभाराचें चातुर्य नव्हतें; त्याणें प्रल्हाद निराजीचा शहाणपणानें राज्य केलें; आणि संताजीचा नाश केला, हा मात्र त्यापासून अधर्म घडला. एरवीं तो दयाळू आणि उदार होता, त्याचा मरणाचें वर्तमान ओरंगजेबाचा लशकरांत कळलें तेव्हां त्यांस असें वाटलें कीं, आतां मराठे सहज जिंकले जातील; म्हणून मोठा आनंद पावले परंतु त्या आनंदाप्रमाणें तें त्यांचा उपयोगी न झालें. राजारामाचे दोन पुत्र होते त्यांत वडील शिवाजी तो राजाराम मेला ते समयीं दहा वर्षांचा होता; त्याची मातुश्री ताराबाई ती मोहित्यांची कन्या, धाकटा संभाजी तो त्या वेळेस तीन वर्षांचा, त्याची माता राजसबाई ती घाटगे यांची कन्या. रामचंद्रपंत अमात्य, व शंकराजी नारायण, व धनाजी जाधव, यांचा विचारानें ताराबाईनें आपला पुत्र गादीवर बसवून, राजसबाईला बंदींत ठेविली.

निमाजी हणमंत्या मोठा चतुर निघेल म्हणून, राजारामानें त्यास प्रतिनिधी केला होता; परंतु तो तसा झाला नाहीं म्हणून ताराबाइनें तें पद परशुराम त्रिंबकास दिलें; त्यापुढें ताराबाई एकाच किल्ल्यांत निरंतर रहात नसे, असाच धनाजी जाधवही कधीं एके जागीं राहिला नाहीं, आणि चोहींकडे स्वार पाठवून मुलखांत स्वांऱ्या घालीत असे; या खेरीज निंबाळकर

व भोंसले वगैरे मोठे मोठे सरदार सर्वत्र चौत व सरदेशमुखी व फौजेस घासदाणा अशीं निमित्तें करून खंडणी घेत होते.

असा निरंतर उपद्रव होऊन दक्षिणेचा वसूल फार थोडा होऊं लागला तो औरंगजेबाचा लश्करास पुरेना तेव्हां त्याणें कधीं कधीं फौजा पाठवून हिंदुस्थानांतून आपलें खासगीचें द्रव्य आणविलें; तेंहीं कित्येक वेळा मराठ्यांनीं छापा घालून नेलें, तेवेळेस मोंगल लोक आपल्या पहिल्या चालीप्रमाणें लढत नव्हते.

यापुढें औरंगजेब वार्धक्यामुळें राज्याचे उपयोगी नाहींसा झाला; त्याचा पुत्र तोही राज्य कारभारास ठीक नव्हता. त्यामुळें बादशाह निवर्तल्यावर राज्य कोणे रीतीचें होईल तें कळेना; म्हणून जे कोणी कारभारी होते ते पहिल्याप्रमाणें राज्यकारणीं तत्पर असेनात्से झाले. अशानें त्यांची आंतून बलहीनता, व मराठे लोक पराभव पावतां पावतां युद्धनिपुण झाले; या निमित्तांहीं तें राज्य बुडूं लागलें होतें. त्या वेळेस जर मराठे लोक एकचित्त होऊन, उत्तम प्रकारें प्रजासंरक्षणाचा विचार करते, तर सर्वत्र त्यांचीच सत्ता झाली असती, परंतु तें झालें नाहीं; ते लोक बहुधा लुटीचा कामास मात्र एकत्र मिळून मसलत करीत; आणखी जास वाटे कीं मोंगलांस मिळावें यांत आपलें हित आहे; तो तिकडचा पक्ष स्वीकारी, त्यायोगें त्या लोकांचें कांहींसें महत्व राहिलें होतें.

त्याकाळीं मराठ्यांत कोणी स्वहितावांचून प्रजेचें किंवा स्वामीचें हित पाहिलेंच नाहीं. तो प्रकार असा, मोंगलपक्षी मराठे व ताराबाईचा पक्षाचे मराठे यांउभयतांची मार्गानें जात असतां जर कधीं गांठ पडली तर परस्परें मोठा सत्कार होऊन, एकत्र भोजनें होत आणखी उठून जातां जातां थट्टेनें मुसलमान लोकांप्रमाणें, अलहमदिलिल्लाहे असें म्हणत; आणि देवासही प्रार्थीत कीं, असा उपयोगी जो औरंगजेब बादशाह तो, बहुत दिवस वांचो.

औरंगजेबानें बहुतेक मोठे मोठे किल्ले घेतल्यावर तो कित्येक महिने जुनरास राहिला होता; मग पूर्वेस मराठ्यांनीं असा दंगा केला कीं, त्याचा कर्नाटकापर्यंत उपद्रव लागेल, म्हणून त्याचा निवारणार्थ तो लश्कर सुद्धां तेथून निघून विजापुरीं गेला. तेसमयीं त्याजबरोबर त्याचा प्रिय कामबक्षनामा पुत्र होता, त्याची इच्छा अशी होती. कीं आपण स्वतंत्रपणें विजापुरचें राज्य करावें; या हेतूस्तव त्याणें औरंगजेबास मसलत दिली, कीं मराठी लोकांशीं सल्ला असावा, मग धनाजी जाधवाचा द्वारें तें सल्ल्याचें बोलणें

ळणें लाविलें. त्यावेळेस दक्षिणेचा सहा सुभ्यांतील वसुलापैकीं दहावा भाग चौत व सरदेशमुखी संबंधें, मराठ्यांस औरंगजेब देणार होता. ते समयीं धनाजीजवळ मराठे लोक फार जमले असत ते आपण प्रबळ असें जाणून, बादशाहापाशीं ज्यास्तेदेशीज आणखी कांहीं मागूं लागले; तेव्हां त्याणें जाणलें कीं, मराठ्यांची मसलत दगा करावयाची असेल. म्हणून पहिले सल्ल्याचें बोलणें करावयास पाठविलेले जे वकील त्यांस माघारे बोलावून नेले; मग तें सर्व काम तसेंच राहिलें.

इकडे कर्नाटकांत लुटारू फार झाले, त्यांत वाकिणकेराचा नाईक मोठा प्रबळ. आणि त्याचा मराठे लोकांशीं अत्यंत स्नेह असे; यास्तव औरंगजेबानें विजापूर सोडून लश्करसुद्धां तिकडे स्वारी केली; तो जागा विशेष दृढ नव्हता. त्यास भुय् कोटमात्र होता, तथापि त्या नायकानें औरंगजेबाच्या कांहीं उपाय चालूं दिला नाहीं. बाहेरून धनाजी जाधव मोंगलांस चैन+ पडूं देइनासा झाला, तेव्हां औरंगजेब बादशाह याणें जुलफिकारखान वगैरे आपले मोठे मोठे सरदार बोलावून महल्लयास मांडिला; ते समयीं तो नाईक किल्ला रिकामा टाकून पळाला.

इतक्यांत मराठ्यांनीं देशामध्यें बहुत उपद्रव केला तो असा; रामचंद्र पंतानें पन्हाळा किल्ला व पवनगड घेतला; आणि परशुराम त्रिंबक याणें वसंतगड व सातारा घेतला; तेव्हां ताराबाई पन्हाळ्यावर आपणास रहावयाची जागा करून तेथें राहिली. त्यापासून तीचें मन त्या रामचंद्र पंताविषयीं सुप्रसन्न झालें; इतके किल्ले मराठ्यांनीं घेतले, त्यांत सातारा किल्ला घेण्याचा पर्याय असा; पहिला मावळे लोकांची कारकुनी केलेला आनाजी पंत नामें एक ब्राह्मण होता, तो मोंगलांनीं जिंजी घेतली तेव्हां तेथें बंदींत सांपडला असतां कांहीं युक्तीनें तेथून पळाला; त्याला वाटेनें मोंगलांचे लोक साताऱ्याचे बदलीस जात होते ते भेटले, त्यांस त्याणें कांहीं गोष्टी सांगून व कांहीं गाणें गाऊन. त्यांचीं मनें वश केलीं; त्याणें करून त्यांणीं त्याला आपल्या बरोबर नेऊन, त्यास राहायाला जागा साताऱ्यावर दिली. तो तेथें राहिला. त्याणें मोठ्या युक्तीनें मावळे लोक वर घेऊन, मग तेथचे सर्व मोंगल मारून टाकिले.

यापुढें सिंहगड व राजगड वगैरे कित्येक किल्ले मराठ्यांनीं मोंगलांपासून घेतले तो विस्तार विशेष लिहावासा नाहीं. त्या समयीं औरंगजेब

---

\+ त्या वेळेस मोंगल लोक आपल्यामध्यें कधीं घोडा पाणी पियावयास नेला असतां तो पाणी न पियी तर थट्टेनें त्यास म्हणत कीं, तूं पाणी कां पीत नाहींस तुला धनाजी पाण्यांत दिसला कीं काय. ते लोक इतकें धनाजीचें भय बाळगीत होते.

मरण पावला हें मात्र मोठें प्रकरण झालें.

तो औरंगजेब फार वृद्ध झाला, आणि त्यापासून मराठ्यांचा हातीं किल्ले लागले तेणें करून ते प्रबळ झाले; यास्तव बादशाह मनांत बहुत खिन्न होऊन सन सत्राशें सातांत तो माघारा अहंमदनगरीं+ आला आणि पूर्वीं वीस वर्षांचे पाठिमागें मोठ्या थाटानें ज्या जागीं उतरला होता, त्याच जागीं डेरा दिला, परंतु ते समयीं तें माहात्म्य नव्हतें. तो तेथें त्या डेऱ्यामध्यें येतांच आपल्या जवळचा लोकांशीं बोलिला कीं, या भूतळावर माझें जें हिंडणें होतें तें आज संपलें; याच जागीं माझा मृत्यु जगदीशानें नेमिला आहे. मग पुढें थोडकेच दिवसानीं सनसत्राशें सातांचा दुसऱ्या महिन्याचे एकविसाव्ये तारिखेस, तो तेथेंच मृत्यु पावला. जर कोणी ह्मणेल कीं, औरंगजेबाचे गुण व स्वभाव कसे होते, तर त्याणें समजावें कीं, तो मोठा चतुर असून पापास भीत नसे. त्याचें अर्थीच लक्ष्य, परमार्थीं चित्त ठेविलेंच नाहीं. ज्याणें आपला लोभीपणा साधूचा सोंगानें छपविला, असाजो तो, प्रथम राज्य करूं लागला तेव्हां त्याची राज्यकारभाराविषयीं दक्षता व त्याची विद्या, व पर्याप्त संपत्ती असून ज्याचें स्वयें अनपेक्षासारिखें वागणें, इत्यादि प्रकारांहीं त्यावेळचे लोक त्याला बहुत मानीत; पुढें त्याणें ती वर्तणूक टाकिली तरी, त्याचा पहिल्या आचरणाचें स्मरण लोकांस होतें त्यावरून त्याचा शेवटपर्यंत लोकांत मान राहिला. त्याणें शहाणपणेंकरून विजापुरकर व गोवळकोंडकर या दोघांचा बळानें पृथ्वीतळीं बंडें मोडावीं, तें नकरितां तींच राज्यें बुडविलीं; तेणें करून बंडें प्रबळ झालीं, हा त्यापासून राजनीती विषयीं मोठा प्रमाद घडला.

औरंगजेब निवर्तला तेसमयीं त्याचे पुत्र तिघे होते; एक सुलतान माजुम, एक आजिमशाहा, एक कामबक्ष; त्यांतला सुलतान माजूम उत्तरे कडे काबुलमुलखीं अधिकार करीत होता. आजिमशाह बाप मेल्याचे पूर्वीं त्याजवळ येऊन राहिला होता. आणि ते समयीं कामबक्ष बादशाहानें विजापुरीं पाठविला होता. मग बादशाह मरण पावला त्यासमयीं आजिमशाह जवळ होता यास्तव बादशाहाचें तें सारें सैन्य त्याचे स्वाधीन झालें. जुलफिकारखान तर मुलखांत उपद्रव करणारे धनाजी वगैरे मराठे यांचा पाठीस लागला असे. तो औरंगजेब मेल्याचें वर्तमान ऐकतांच त-

+ औरंगजेब लश्कर सुद्धां अहंमदनगरीं आला तेवेळेस मराठ्यांनीं त्याला वाटेस गाठला, तेव्हां त्यांचें व याचें युद्ध झालें, तेसमयीं मोंगलांस युद्ध करतां करतां दम धरवेनासा झाला, तेव्हां ते लढतां लढतांच तेथून पाय काढून अहंमदनगरीं गेले, तेव्हां मराठे असे प्रबळ झाले होते.

न्काळ त्यास सोडून आजिमशाहास जाऊन मिळाला.

---

सन सत्राशें सातांपासून सनसत्राशें वीसपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग बारावा.

## अनुक्रमणिका.


शाहूला शाहू असें नांव कोणे प्रकारें प्राप्त झालें तें प्रकरण.

तो शाहू दिल्लींतून सुटून आपल्या राज्यावर आला, तेसमयीं ताराबाईनें तो खोटा म्हटला म्हणून युद्ध झालें.

अक्कलकोटच्या राजाची मूळपीठिका.

बाळाजी विश्वनाथ याचा उद्भव.

मोंगललोक व शाहू यांची वर्तणूक.

धनाजी जाधवाचा मृत्यु.

ताराबाईनें पन्हाळा किल्ला घेतला, आणि कोल्हापुराची राजधानी करून तेथें राहिली.

ताराबाईचा पुत्र शिवाजी याचा मृत्यु.

संभाजी राजा होऊन ताराबाई बंदीस पडली.

चंद्रसेन जाधव आणि बाळाजी विश्वनाथ यांचा वाद होऊन जीं जीं वर्तमानें झालीं तें.

निजामउल्मुल्ख याची गोष्ट.

मोंगल व मराठे यांचें युद्ध.

निजामउल्मुल्खानें कोल्हापुरकरांचा पक्ष धरिला, आणि शिधोजी घोरपड्यानें संभाजीचा पक्ष स्वीकारिला.

मराठेलोक यांमध्यें फार अव्यवस्था झाली.

कान्होजी आंग्र्यानें बहिरोपंत पेशव्याचा पराभव केला.

नंतर बाळाजी विश्वनाथानें कान्होजीशीं तह केला. तेणेंकरून मराठ्यांस हित होईल असें जाणून, शाहूनें बाळाजीला पेशवाई दिली.

मग तो पुरंदरचें आधिपत्य पावला.

नंतर मराठ्यांची कांहीं व्यवस्था दिसूं लागली तो तपशील.

शाहूचे स्वभावाचें निरूपण.

फेरुकशेर पातशाहानें मराठेलोक आपणास अनुकूल कावयाचा


उद्योग-

उद्योग केला तो पर्याय.

त्याणें सैयदहुसेन अलीखानाशीं कत्रिम केलें तो विस्तार.

शाहू व सैयदहुसेन यांशीं तह होउन सैयद दिल्लीस गेला आणि फेरु- कशेरास पदच्युत करून दुसरा बादशाह स्थापिला.

बाळाजी विश्वनाथ चौथ व सरदेशमुखी व स्वराज्य यांचा सनदा घेउन सातान्यास आला.

नंतर मराठे लोक राज्यांतील वसूल जमा करूं लागले तो प्रकार.

कान्होजी आंग्र्याची गोष्ट.

## भाग बारावा.

पूर्वी मोंगलांनीं रायगड घेतला तेसमयीं तेथें संभाजीचा पुत्र व स्त्री सांपडलीं, तीं त्याणीं बादशाहाकडे नेलीं; असें मागें लिहिलें. तीं उभ- यतां ओरंगजेबानें आपल्या कुटुंबाचा माणसांत ठेविली. त्यांवर बादशाहा- ची कन्या बेगमसाहेब अत्यंत प्रीति करूं लागली; आणि त्या पुत्राला सा- रा वेळ आपल्याजवळ बाळगीत असे; तेथें ओरंगजेब येई तेव्हां त्या मुलास पाहून बहुत संतुष्ट होत्साता, त्याचा बापाचा चोरटेपणा मनांत आणून, त्याला साबाचा नावें, शाहू म्हणून थट्टेनें हाक मारी; मग तो मोठा झाला, तरी त्याणें आपलें तेंच नांव चालविलें. पुढें ओरंगजेबानें त्या मुलाचीं दो- न लग्नें केलीं; तीं एक संबंध शिंदखेरचा जाधवांचा कन्येशीं, दुसरा क- ण्हेरखेरचे पाटील शिंदे यांची कन्या. मग बादशाहानें ते उभयतां जा- धव व पाटील यांचा संमान करून पदवीस चढविलें. शाहूयास अक्क- लकोट, व इंदापूर, व नेवासें, व सुपें, जहागीर करून दिलीं. याशिवाय आपल्या कमरेची एक तरवार, व दुसऱ्या दोन तरवारा दिल्या; त्यांत एक शिवाजीजवळ भवानी नामें पहिली तरवार होती ती, व दुसरी आफजु- लखानाची, शिवाजीनें त्यास दग्यानें मारून घेतलेली; या दोनी रायगडीं सांपडलेल्या होत्या; अशा तीन झाल्या. त्या अद्यापि सातान्याचा राजा- जवळ आहेत. पुढें ओरंगजेब बादशाह मरण पावला ते समयीं आजि- मशाहानें त्या शाहूला आपल्या बरोबर नर्मदेचा उत्तरेस नेला; तो आ- जिमशाह, सुलतान माजूम नामा त्याचा भाऊ, त्याशीं युद्ध करावयास जा- त होता.

मोंगलांचें लशकर देशांतून उठून गेलें, तें ताराबाई व तिचे अष्ट प्र-

धान

धान यांस मोठें हितावह झालें. तें असें. पुण्याचा फौजदार खोदीरखान, त्यास धनाजीजाधवानें जिंकून चाकण किल्ला घेतला; आणि जे इतर मराठे सरदार होते ते मोंगलांचा मुलखीं उपद्रव करीतच होते. हें वर्तमान आजिमशाहास कळलें. तेव्हां त्याणें जुलफिकारखानाचा मसलतीनें, शाहूची आई व भाउ व बायका यांस आमिनकीस ठेविली. कीं दंगा नव्हावा, अशा बेतानें शाहूस सोडिला. त्यावेळेस त्याणें बादशाहाजवळ कबूल केलें कीं, जर मी राज्यपदवी पावलों तर तुमचा आज्ञेंत वागेन. त्यावरून आजिमशाह ही बोलिला कीं, तूं जर तसा वागलास, तर तुझा बापानें घेतलेला विजापुरचा मुलुख, तो, व भीमा, आणि गोदावरी या दोहों मध्यें जितका मुलुख आहे, त्यांतील कांहीं तुला देईन. असा नेम ठरवून आजिमशाहानें शाहूला सोडिला.

तो शाहू तेथून मुक्त झाला, नंतर त्याणें दोन मराठे सरदार वराड, व खानदेश, यांत अधिकारी होते; त्यांस निरोप पाठविला कीं, मीं तुम्हाकडे येतों तुम्हीं मला अनुकूळ व्हावें; असें त्याचें सांगणें जातांच ते येऊन शाहूला भेटले; तेव्हां त्याणें ते वश करून घेतले. यानंतर हैबतराव निंबाळकर, व नेमाजी शिंदा, व गैरे कित्येक मराठे सरदार त्यास तसेच अनुकूळ झाले. मग शाहूनें ताराबाईला पत्र लिहिलें कीं, मी आपल्ये जागीं येतों, माझें पद माझे स्वाधीन करावें; तेव्हां ताराबाईचा मनांत त्यास तें पद द्यावेंसें नव्हतें, म्हणून ती म्हणे कीं हा शाहू नव्हे; दुसरेंच कांहीं थोतांड असेल. आणि तिणें आपले अष्टप्रधान मिळवून त्यांपासून शपथ घेतली कीं, तुझा पुत्राचा पक्ष स्वीकारूं. इकडे शाहूचा मनांत अगोदर असें होतें कीं ताराबाइनें ठरविलें कीं, हा शाहू नव्हे, तें लोकांचा मनांतील जावयाकरितां कांहीं दिवस गोदावरीचा कांठीं राहून, आपण शाहू खरा असें लोकांस कळवावें; परंतु त्याजवळ पंधरा हजार फौज जमली यास्तव तो युद्धासच निघाला. इकडून ताराबाईकडचे प्रतिनिधी व धनाजीजाधव दोघेजण सैन्य घेऊन निघाले. तेवेळेस रैतेचें चित्त ताराबाईकडेसच होतें; याकरितां शाहूचें लश्कर वाटेनें येत असतां कोणएके गांवीं त्यावर तेथच्ये गांवकरी यांणीं तोफांचे बार केले. तेव्हां तो गांव त्याणें लढून घेतला. तें युद्ध होत असतां त्या गावांतून कोणी एक बायको आपला मूल कडेवर घेऊन बाहेर निघाली ती शाहूसमूर जाऊन त्यापुढें मूल ठेवून बोलिली कीं, मी हा आपला मूल तुमचा सेवेस अर्पिला. तो शाहूनें घेऊन, त्याजागीं आपणास प्रथम जय प्राप्त झाला म्हणून, त्या+ मुलाच्यें नांव फत्ते-

\+ त्या मुलाचें पहिलें उपनांव लोखंडे असें होतें.

शिंग

शिंग ठेविलें; आणि त्यास भोंसले असें आपलें उपनाव दिलें. नंतर अक्कलकोटचा राजा त्यास केला. तो फत्तेशिंग अक्कलकोटकर भोंसले यांचा मूळ पुरुष.

शाहूचें व ताराबाईचें लश्कर यांची एकत्र गांठ पडतांच, शाहूचें व धनाजीचें कांहीं बोलणें होऊन, असा निश्चय ठरला कीं समयविशेषीं धनाजी शाहूचा पक्ष स्वीकारील; मग पुण्याचे उत्तरेकडे पंधरा कोसांवर लढाई झाली; त्यांत प्रतिनिधी होता त्याणें पाहिलें कीं, धनाजी तत्पक्षी झाला तेव्हां तो आपले लोक एकीकडे निराळे जमवून सातान्याकडे पळाला. मग शाहू व धनाजी मिळून चंदन व वंदन हे दोन्ही किल्ले घेतले, तेथें ताराबाईकडचा कित्येकां सरदारांचीं मुलें माणसें सांपडलीं; तीं त्याणें बंदीत ठेविलीं. नंतर पुढें जाऊन सातारा किल्ला घेतला, तो असा; तेथें एक मुसलमान सरदार होता, त्याणें युद्ध नकरितां तेथचा अधिकारी ब्राह्मण असे त्यास कैद करून किल्ला दिला. हें वर्तमान सन सत्राशें आठांत घडलें. तो शाहू सातान्यास पोंहचतांच त्याणें आपली गादी स्वीकारिली. आणि आपणास मराठयांचा राजा ह्मणवूं लागला, आणखी त्याणें गदाधर प्रल्हादास प्रतिनिधी करून बहिरोपंत पिंगळा याला पेशवा केला; सेनापती धनाजी जाधव होताच, त्याला प्रांतांतील वसूल जमा करावयाचें काम सांगितलें. त्या वेळेस दंग्यामुळें, मुलखाची लावणी नीट झाली नव्हती ह्मणून, जेथें सांपडे तेथें कांहीं घेत; भर वसूल उत्पन्न होइना. त्या कामावर धनाजीनें दोन कारकून ठेविले; एक आबाजी पुरंदरे, सासवडच्या कुळकरणी, दुसरा श्रीवर्धनच्या कुळकरणी त्याचें नाव बाळाजी विश्वनाथ भट, तोच पुढें पेशवा झाला; तें श्रीवर्धन चोलप्रांतीं आहे.

इकडे मोंगलांकडे काय काय वर्तमान झालें तें प्रकरण असें सुलतान माजूम व आजिमशाह हे दोघे आग्राजवळ लढले; त्या युद्धांत सुलतान माजूम जय पावला, आणि आजीमशाह व त्याचे दोन पुत्र व कित्येक मोठमोठे सरदार मरण पावले. कामवक्ष तर बादशाह मेल्यावर आपणास, आपणच बादशाह ह्मणवूं लागला; तेव्हां मोंगल व कित्येक मराठे लोकही त्यास अनुकूळ होते. परंतु त्याची वृत्ती ठीक नाहीं असें पाहून, त्या लोकांनीं पुढें त्याचा पक्ष सोडिला. सुलतान माजूम तर जय पावला असतांही उत्संकळ नव्हता, मोठ्या धिमेपणानें दक्षिण जिंकावयास निघाला; तो आपला भाऊ कामवक्ष यास विजापुर व हैदराबाद या दोहों संस्थानांची बादशाही देणार होता; परंतु तो तें कांहीं ऐकेना आणि युद्धास सिद्ध झाला तेव्हां सुलतानानें

त्यावर

त्यावर जुलफिकारखान पाठविला; तो व कामबक्ष उभयतां हैदराबादेजवळ लढले, त्या युद्धांत कामबक्ष मेला.

तो जुलफिकारखान आग्राजवळचे लढाईंत आजीमशाह याच्या लष्करांत होता; त्याणें त्या वेळेस मोठें शौर्य केलें; शेवटीं आजीमशाहाचा अगदीं नाश झाला तेव्हां तो युद्ध टाकून निघून गेला; त्यावरून मग सुलतान माजुमानें त्याला बोलावून आणून सर्व दक्षिणेचा अधिकार त्यास दिला. आणि, मीरउल अमराव असें त्याचें नांव नवें केलें. असा त्यास सुलतान प्रसन्न झाला म्हणून, तो सुलतान माजुमाकडचा झाला. तो जुलफिकारखान हैदराबादचे लढाईस गेला तेसमयीं शाहुराजानें त्याचे कुमकेस फौज पाठविली; तोही शाहूचें इष्टचिंतित असे; त्याणें बादशाहास असें समजाविलें कीं, जर तुम्ही शाहूला अनुकूळ व्हाल तर तो आपल्या प्रजेमध्यें मान्य होईल, तेणेंकरून आपलें हितच घडेल. त्यावरून बादशाह शाहूला दक्षिणेचा सरदेशमुखीची सनद द्यावयास सिद्ध झाला; मराठे पहिले सरदेशमुखी बळेंच करीत होते. परंतु जुलफिकारखानाचा बोलण्यावरून, बादशाह शाहूला त्या अधिकाराची सनद देत होता; तेव्हां ताराबाईच्या वकिलांनी बादशाहाच्या वजिरास समजाविलें कीं ताराबाईच्या पुत्र मुख्य धणी, यास्तव सुलतानानें ताराबाईच्या पुत्र शिवाजी याचे नावें सनद तयार केली, आणि तेसमयीं असा नेम केला कीं, तुर्त सनद द्यावयाची नाहीं; उभयतां लढून जो ठरेल त्यास देउं.

त्याच वर्षी पर्जन्यकाळीं शाहूनें ताराबाईशीं युद्ध करावयास चंदन व वंदन येथें लश्कर तयार करून ठेविलें; मग दसरा झाल्यावर लढाईची सिद्धता केली, तोंच प्रथम पन्हाळा व विशाळगड हे दोन्हीं किल्ले शाहूचा स्वाधीन झाले. मग रांगणा किल्ला घ्यावयास गेला तेथें ताराबाई होती. ती शाहू जवळ आला असें समजून तेथून पळून माल्वणास गेली. पाठीमागें तेथचा किल्लेकरी रांगणा किल्ला देइना म्हणून युद्धाचा उद्योग मांडिला तोही सिद्धीस जाइना; कां कीं, तो किल्लेकरी मोठा शूर होता आणि पर्जन्यकाळही समीप आला असे, याकरितां शाहू तेथून निघून कोल्हापुरीं गेला. त्यावर पाउस काळ गेला नंतर पुनः तो कल्प निघाला होता, परंतु मोंगलांचा कांहीं सांगण्यावरून, त्याला ताराबाईस जिंकणें आवश्यक न पडलें; त्या बोलण्याचा प्रकार असा; तेसमयीं सुलतान माजूम माघारा हिंदुस्थानांत गेला त्याजबरोबर जुलफिकारखानही निघाला; तेव्हां त्याणें आपल्या अधिकारीं दाउदखान पनी नामें दुसरा एक

मुसलमान ठेवून, त्याला दक्षिणेच्या सर्व अधिकार असून त्याजेशज दक्षणपुर-
याही अधिकार दिला. आणि शाहूचे पक्षी जे मराठे त्यांस सांगीतलें कीं,तु-
झास दाउदखान प्रतिवर्षी वसुलापैकीं चतुर्थांश देत जाईल. त्यावरून अ-
र्थात् ताराबाईचें स्वामित्व नाहीं असें सिद्ध झालें, ह्मणून शाहू समजला.

नंतर सन सत्राशें नवांच्या समाप्तीस शाहू कोल्हापुर सोडून माघारा सा-
ताऱ्यास आला; मग त्याणें आपणास दोन बायका केल्या, एक शिरके यांचा कु-
ळाची दुसरी मोहित्यांची; त्याचा पहिल्या दोघी स्त्रिया दिल्लींतच होत्या; मग
पुढें थोडक्याच दिवसांत त्यांतली एक मेली. ती शिंद्यांची कन्या होती. ध-
नाजी जाधव यास फार दिवस बरें वाटेनासें होऊन कोल्हापुराहून माघारा
साताऱ्यास येत होता तो वाटेनें वारणेचे कांठीं त्याच वेळेसच मृत्यु पावला.
त्याजबरोबर बाळाजी विश्वनाथ श्रीवरधनकर होता; तो त्याचा शरीरास
बरें नाहींसें होतांच, त्याचा सर्व अधिकार आपण संभाळूं लागला. तेह्मां
धनाजीचा पुत्र चंद्रसेन जाधव व कित्येक त्याचे पदरचे ब्राह्मण ते त्याविषयीं
मात्सर्य करूं लागले.

तो शाहू कोल्हापुर सोडून साताऱ्यास येतांच पन्हाळ्याचा हवलदारा-
शीं त्याचें कांहीं बोलणें झालें त्यावरून आणि पुढें सावंत यांचा साहाय्यें करू-
न ताराबाई मालवणाहून निघून पन्हाळ्यास आली. ती तेथें येऊन पोंह-
चतांच त्या हवलदारानें किल्ला तीच्या स्वाधीन केला; मग ती माघारी मालव-
णीं नजातां कोल्हापुरच आपलें संस्थान करून राहिली. वे समयीं राम-
चंद्रपंत व शंकराजी नारायण हे दोघे तिचा पक्षाचे होते, त्यांत शंकराजी नाराय-
ण, हा सचिव, याचा मुलखांत शिवाजी प्रथम राज्य करूं लागला ह्मणून म-
राठे लोक यांस असें वाटे कीं हें आपल्या राज्याचा आरंभाचें मूळ ठिकाण,
यास्तव शाहूला तो मुलुख घ्यावयाचें काम आधीं करावें लागलें. याक-
रितां त्याणें पुण्याहून लश्कर पाठवून पहिल्यानें राजगड घेतला, त्या शि-
वाय जे त्याचे दुसरे किल्ले राहिले होते, त्यांतून सामान फार भरलेलें आणि
शिबंदी मावळे लोक बहुत असत, ह्मणून असाध्यसें समजून तें काम टा-
किलें. असें असतां शाहूला वर्तमान कळलें कीं, सचिवपंतानें ताराबाईचा
पक्ष स्वीकारीन ह्मणून शपत वाहिली. तेणेंकरून त्यास महत्पश्चात्तापहो-
ऊन, त्याणें सन्यास करून जळसमाधि घेतली. हें वर्तमान सन सत्राशें
बारांचा पहिल्या महिन्यांत घडलें. त्याच महिन्यांत ताराबाईचा पुत्र शि-
वाजी यास देवी येऊन मेला. तेह्मां रामचंद्रपंत ताराबाईला राज्य कार्यां-
तून काढून, राजसबाईचा पुत्र संभाजी यास शिवाजीचे जागीं स्थापून मोठ्या

दक्षतेनें

दक्षतेनें आपण कारभार करूं लागला.

सचिव पंत मेला. तें शाहूस हर्षास्पद होऊन, करवीरस्थताराबाई वगेरे यांस विघ्न झालें. शाहूनें चतुरपणानें आपला भलेपणा व स्वामित्व लोकांत प्रकट व्हावें याकरितां. तेवेळेस नारोशंकर नामें त्या सचिवाचा पुत्र दोन वर्षांच्या असतां, त्याचा नावें सचिवपणाचीं वस्त्रें पाठवून, त्याचा कारभाऱ्याचा हातून तें काम घेऊं लागला.

त्याचा अशा आचरणानें, सचीव आज्ञेंत वागूं लागले, परंतु प्रतिनिधी वागेना; तो वश झाला पाहिजे म्हणून शाहूनें उद्योग केला तो असा. त्याणें परशुराम त्रिंबक प्रतिनिधी याला कैदेंतून सोडून, आपला प्रतिनिधी गदाधर प्रल्हाद यास दूर करून त्याचे जागीं परशुराम त्रिंबक यास नेमित असतां त्याणें त्या अधिकारीं आपला पुत्र योजिला. त्याणें विशाळगडीं जाऊन, त्याचा सारा मुलुख त्याचे हातीं लागतांच ताराबाईचा पक्ष स्वीकारिला; तेव्हां तीणें त्यास कोल्हापुरच्या प्रतिनिधी केला. असें होतांच शाहू समजला कीं, हें कृत्रिम परशुराम त्रिंबकाचेंच असेल; याकरितां त्यास पुनः कैदेंत ठेवून जिवानशीं मारावा असें शाहूचा मनांत होतें, परंतु त्याजवळचे कारभारी याणीं त्यास असें समजाविलें कीं, जर तुह्मीं यास माराल तर लोकांचें मन तुह्मावरचें उतरेल; त्यासजरी त्याचा अन्याय असला तरी नमारावा हेंच योग्य तें शाहूच्या विचारास येऊन त्यास कैदेंत ठेविला.

दिल्लीचा दरबारांत कांहीं प्रकरणीं, व्यत्यय आला म्हणून दाउदखानाला दक्षिणेचा अधिकार टाकून गुजराथेंत जावें लागलें; यास्तव मोंगल व मराठे यांचा तह होऊन मोंगल मराठ्यांस चौथ व सरदेशमुखी संबंधें जें देत होते, त्यांतही कांहीं अंतर पडलें. म्हणून शाहूनें चंद्रसेन जाधव सेनापती यास मोंगलांचा मुलखांतून, तो चौथ व सरदेशमुखी व घासदाणा संबंधें ऐवज जमा करून आणावया करितां फौज देऊन पाठविला. त्याबरोबर त्याचा बापाच्या कारकून, बाळाजी विश्वनाथ यास देखरेख करावयास दिला; त्या दोघांचें वैमनस्य पूर्वीं धनाजीला समाधान नाहींसें झालें तेव्हांपासूनच पडलें होतें. मग या चौकशीचा निमित्तें करून फारच द्वेष वाढला. नंतर कोणे एके दिवशीं बाळाजी विश्वनाथाचे स्वार हरणाचे पाठीस लागले असतां त्यांशीं जाधवाचा स्वारांचा कांहीं कलह उत्पन्न होऊन, जो त्यांचा द्वेष गुप्त होता तो प्रकट झाला. तेव्हां बाळाजी विश्वनाथ आपला जीव रक्षावयाकरितां पळाला. तो सासवडांत सचिवाच्या कारभारी होता, त्याजवळ जाऊन त्याचें बहुत आर्जव करून पुरंदर किल्यावर आपणास

पणास आश्रय मागूं लागला; त्याणें जाधवाचा भयेंकरून त्यास किल्ल्यावर चढू दिला नाहीं. त्या वेळेस त्याचे पाठीस लागलेले जाधवाचे स्वार ही त्याचे दृष्टीस पडले; तेव्हां तो बाळाजी विश्वनाथ व त्याचे दोघे पुत्र बाजिराव आणि चिमणाजी, व थोडकेसे लोक त्याबरोबर होते ते समूरच्या खोऱ्यांत पांडवगड आहे, त्या ठिकाणीं जावयाचा विचार करून कांहींसे तिकडे गेले; तेथेंही जाधवाचे लोक त्यांचा शोध करीत होते. ते त्यांस उमगले; मग थोडकेसे दिवस कुठेतरी दडून राहिले. त्यांत एक पिल्लाजी जाधव, एक दुमाल नामा, असे दोघे मराठे होते. त्याणीं कबूल केलें कीं, आम्ही आपल्या भाउबंदांकडचे कांहीं शिपाई जमा करून तुम्हाला पांडवगडास पोंहचवून देऊं; या कार्याकरितां मरून जाऊं, अशी शपथ दिल्ही. नंतर त्याणीं त्याप्रमाणें लोक मिळविले. आणि बाळाजी विश्वनाथास घोड्यावर नीट बसतां येत नव्हतें असें असतांही, त्यास अश्वारूढ करून दोहीं बाजूनें माणसांकडून धरवून, जाधवांच्या लोकांशीं वाटेनें लढत लढत त्याला पांडवगडीं पोंहचविला. तेथें किल्लेकरी होता त्याणें शाहूचे आज्ञेस्तव तो संरक्षिला. तेव्हां चंद्रसेन जाधव याणें त्या किल्लेकऱ्यास फार निकड लाविली, कीं याला लवकर माझा स्वाधीन कर; नाहींतर मी शाहूचा पक्ष टाकीन. तेव्हां शाहूनें हैबतराव निंबाळकर सरलष्कर अहंमदनगरीं होता त्याला सातान्यास बोलाविला आणि पांडवगडास लिहून पाठविलें कीं, बाळाजी विश्वनाथाला जाधवाचे हातीं देऊं नये; नंतर जाधवास कळलें कीं, हैबतराव फलटनास येऊन पोंहचला; तेव्हां तो पांडवगड सोडून देउरास गेला. तेथें निंबाळकर हैबतराव आणि चंद्रसेन जाधव या उभयतांचा लष्करांची गांठ पडून, मोठें युद्ध झालें; त्यांत जाधव पराभव पावला. तो कोल्हापुरास गेला, त्याजबरोबर सरजेराव घाटगा होता; त्याचें वडिलांचे वेळेचें कांहीं वेतन कागलमांतीं होतें, त्याविषयीं सनद राजसबाईचा पुत्र संभाजी याणें त्यावेळेस दिल्ही. त्यापुढें घाटगे व जाधव उभयतां मिळून, चेनकुलिचखान नामें दक्षिणेचा नवा अधिकारी आला होता त्याचे भेटीस निघून गेले. त्याणें जाधवाचा मान केला; आणि आपल्ये चाकरीस रहावयास सांगितलें. तें त्याणें मान्य केलें, म्हणून त्याचे जवळच्या लोकांचा पोषणार्थ बाळकीं शहर संबंधें मोठा मुलुख जहागीर करून दिला. याप्रमाणें सन सत्राशें तेरांत घडलें.-

तेवेळेस मोंगलांतजें वर्तमान झालें, तो प्रकार असा. सुलतान माजुम सन सत्राशें बारांत मेला तेव्हां त्या तख्ताचा आधिपत्याविषयीं, त्याचे पुत्र

भाडूं

भांडूं लागले; त्यांत कोणासही तें प्राप्त न होतां तेथें दोघे सैय्यद होते ते मोठे शूर असत; एकाचें नांव आबदुलखान, एक हुसेन अल्लीखान, त्यांणीं सुलतान माजुमाचा नातू (पुत्राचा पुत्र) फेरुकशेर, यास तक्ताधिपती केला. त्याच कलहांत, जुलफिकारखान याचें डोकें मारलें गेलें. नंतर दक्षिणेचा अधिकारी दाउदखान याची बदली होऊन त्या जागीं चेनकुलिचखान याची योजना झाली; त्यांत विशेष हाच कीं, तो चेनकुलिचखान दक्षिणेचा अधिकारी मोठा विख्यात झाला. तोच हैदराबादचा तक्ताधिपतींचा मूळपुरुष, त्याचें मोठ्या पदवीस चढणें, याचा विस्तार असा. त्याचा बाप गाजीवदीन नामा, त्याचें पूर्वीचें नाव मीरकमर अदीन तो तरुण होता तेव्हांच औरंगजेबानें चेनकुलिचखान असें त्याचें नवें नांव ठेवून त्याला पांचां हजारां स्वारांची मनसब, आणि विजापुरची सुभेदारी दिली; पुढें औरंगजेब मेल्यावर, फेरुकशेराचा स्थापनाविषयीं, त्या सैय्यदांची कुलिचखानानें मदत केली; त्याचा आणि जुलफिकारखानाचा द्वेष होता, ह्मणून फेरुकशेर याणें हा आपला हितकर्ता असें जाणून, याला जुलफिकारखानाचा अधिकार दिला; आणि त्याचा नांवास निजाम उलमुलुख, असें पद जोडिलें. यावरून असें दिसतें कीं, एकाचा द्वेष करणारे किंवा प्रीति करणारे असे जे दोघे ते परस्परें एकमेकाचे मित्र होतात; याप्रमाणें गरीब व संपन्न यांची रीति सारिखीच आहे.

आधव सेनापती व घाटगे उभयतां चेनकुलिचखानाकडे गेले; त्यांचे बरोबर रंभाजी निंबाळकर नामें तिसरा एक मराठा गेला होता, तो थोडक्या दिवसांत मोठा विख्यात होऊन, रावरंभा असें नांव पावला.

दक्षिणेचा अधिकारी निजाम उलमुलुख औरंगाबादेस जाऊन पोंहचला, त्याणें त्यासमयीं शाहूचा हैबतराव निंबाळकर सरलश्कर याचा उपद्रवशमनार्थ, फौज पाठविली. तें वर्तमान ऐकून हैबतराव सरलश्कर गोदावरीचा कांठ सोडून भीमातीरीं गेला. त्याचा पुष्टी करणार्थ शाहूनें बाळाजी विश्वनाथ याजबरोबर सैन्य देऊन त्याचा नावास सेनाकृत असें नवें पद जोडून पाठविला. तो हैबतराव सरलश्करास भेटतांच उभयतांचा विचार ठरला, असा कीं, पुरंदर किल्ल्याजवळ जाऊन, मोंगलांचा लश्कराची वाट पहात रहावें; नंतर त्याप्रमाणेंच पुरंदराजवळ युद्ध प्रसंग होऊन, मराठे आपला जय झाला असें ह्मणूं लागले; परंतु त्यांचें लश्कर तेथून मागें हटून, साळप्याचा घाटाजवळ गेलें; ते समयीं मोंगलांचा लश्करात रंभाजी निंबाळकर मराठा, व त्याचे लोक होते त्याणीं लढाई झाल्यावर पुणें परगणा घेतला; त्यावरून निजाम उलमुलुखानें त्यास पु

ण्या

ण्याजवळच जहागीर दिली; यानंतर शाहूचा आणि मोंगलांचा कांहीं तह होऊन, मोंगल माघारे औरंगाबादेस गेले.

त्यावेळेस दक्षिणेचा राज्याची फार अव्यवस्था झाली; ती अशी कोणी सरदार शाहूकडचे, आणि कोणी संभाजीकडचे; असे दोन पक्ष होऊन, आणखी जो कोणी बलाढ्य मराठा असे, तो स्वतंत्रपणेंच वागे. असा स्वसत्तेनें वागणारा दमाजी थोरात नामें सरदार रामचंद्रपंताचे पदरचा; तो पाटसे जवळचा हिंगणगांवची गढी नीट करून, त्याचा आसमंतात वीस कोस पर्यंत सत्ता करीत असे. त्याचा स्वभाव द्वाड होता, अद्यापि मराठी लोकांत त्याची कथा अशी आहे कीं त्याणें कोणे एके समयीं बाळाजी विश्वनाथाशीं बेल भंडार करून अभयवचन दिलें असतां, पुढें त्या प्रसंगीं असें उत्तर केलें कीं, भंडार ह्मणजे हळद ती काय? आह्मी नित्य खात नाहीं? तसाच बेल ह्मणजे वृक्षाचीं पानें, तीं माझें काय करितील?

दुसरा एक स्वतंत्रपण करणारा उदाजी चव्हाण नामें बत्तीसशिराळेचा गढींत असे; त्याणें असा उपद्रव केला कीं, शाहूला त्याचा शमनार्थ शिराळें व वराड यांची चवथाई द्यावी लागली. त्या दोघां खेरीज दुसरेही कित्येक लहान, मोठे मराठे होते ते आपणास संभाजीचे पक्षी ह्मणवीत; त्यांत कान्होजी आंग्र्याही होता. त्याचे हातीं सांवताचे वाडीपासून, मुबईपर्यंत मुलुख असतांही, तो कल्याण परगणा घ्यावयाचा उद्योग करीत होता. त्या संकटसमयीं, बाळाजी विश्वनाथानें शाहूशीं मसलत केली कीं, या वेळेस मोठा पराक्रम केला पाहिजे, नाहीं तर राज्य बुडेल. त्यास आधीं दमाजी थोरात जिंकावा, असा बेत होऊन तो सैन्य घेऊन निघाला. त्यास थोरातानें कांहीं तहाचें बोलणें व्हावयाचें ह्मणून बोलाविलें, मग दग्यानें तो बाळाजी विश्वनाथ व त्याचे दोघे पुत्र एक बाजीराव, व एक चिमणाजी, व त्याचा मित्र आबाजी पुरंदऱ्या, इतके बंदींत ठेविले. नंतर त्यांस सोडावयाकरितां बहुत द्रव्य मागों लागला, आणि फार उपद्रव केला. तो त्याणीं सोशीला, तेव्हां शाहूनें त्यांचा मुक्तते साठीं भुर्दंड मागीतल्या प्रमाणें भरून, त्यांची सुटका केली, उपरांत सचिवपंतास आज्ञा दिली कीं, तुह्मीं थोरातास जिंका; तो तेथें जाऊन युद्ध झालें, तेव्हां थोरातानें सचिव व त्याचा मुतालीक, उभयतां धरून हिंगणगांवचा किल्ल्यांत कैद केले.

इकडे सातान्यास शाहूनें दोन स्वाऱ्या तयार केल्या, त्यांत एक बहिरोपंत पिंगळ्या पेशवा नेमला; त्याणें कोंकणात जाऊन कल्याण परगणा रक्षावा. दुसरा बाळाजी विश्वनाथ याणें शंभुमहादेवाच्या डोंगराकडचा उप-

द्रव

द्रव करणारा, कृष्णराव खटांवकर, त्यावर जावें. तो ब्राह्मण असा धीट झाला होता कीं जो शाहूचा लश्करावर ओढा पावेतों चालून आला. त्याचा बाळाजी विश्वनाथानें अगदीं पराभव केला असतां, शाहूनें तो शरण आलासा पाहून त्याचा अन्यायाची क्षमा केली, आणि खटांव गांव त्यास इनाम करून दिला. तो अद्यापि त्याचे वंश्य अनुभवितात. त्या लढाईत बाळाजी विश्वनाथ जय पावला, त्याचें मुख्य कारण परशुराम त्रिंबकाचा दुसरा पुत्र श्रीपतराव त्याचें शौर्य. तो जा वेळेस निघाला त्यासमयीं त्याचा बापानें त्याला साताऱ्यांतच सांगीतलें कीं, तुझा वडील भावानें दगा करून ताराबाईचा पक्ष स्वीकारिला; तेणें करून हा एवढा अनर्थ प्राप्त झाला; त्यास जर तूं या वेळेस, मोठें शौर्य करिशील, तरच माझी येथून सुटका होईल. असें त्यास पित्याचें सांगणें होतें, ह्मणून तो मनापासून लढला; त्यावरून शाहू प्रसन्न होऊन, त्याचा बापाला सोडून त्याची प्रतिनिधीपणाची पदवी पुनः त्यास दिली.

बहिरोपंत पिंगळा आंग्र्यावर गेला होता, त्याची व आंग्र्याची लढाई कोंकणांत झाली. त्या युद्धांत आंग्र्यानें तो बहिरोपंत धरून कैदेंत ठेविला. आणि शाहूचे किल्ले, लोहगड व राजमाची हे दोन्ही घेतले; आणखी लोकांत वर्तमान उठविलें कीं, आतां सातारा घ्यावयास जाणार. तेव्हां शाहूनें आपले सर्व लोक साताऱ्याजवळ जमा केले. त्यांत मुख्य बाळाजी विश्वनाथ केला, तो आंग्र्याचा पराक्रम जाणत होता, ह्मणून युद्धापेक्षां तह करावा हेंच चांगलें असें समजून, त्याणें आंग्र्याशीं तह केला. तो प्रकार असा, शाहूनें मोठे अवघड असे[+] दहा किल्ले, आणि अंमळसे सवघड असे सोळा किल्ले व त्यांसंबंधें गांवें दिलीं. या खेरीज त्यास लढाऊ गलबतांचें मुख्यत्वही दिलें; आणि त्याचें पूर्वींचें नाव सरखेल असें होतें, तें तसेंच स्थापिलें. आंग्रे याणीं, बहिरोपंत पेशवा सोडावा, आणि राजमाची खेरीजकरून जे शाहूचे किल्ले घेतले ते द्यावे, आणि शाहूचा पक्ष धरावा, संभाजीचा धरूं नये.

याप्रमाणें शाहूचा व आंग्र्याचा तह होऊन शाहूचा मुलुख आंग्र्यानें माघारा दिला. त्यांत आंग्र्याबरोबर कांहीं मुलुख शिद्दीनें घेतला होता, तो ही शाहूकडे गेला. त्यावरून शिद्दी आंग्र्याशीं लढूं लागला, तेव्हां आंग्र्याचा कुमकेस बाळाजी विश्वनाथ गेला. मग ते शिद्दीचा मुलखांत शिरले तेव्हां तो लवकरच शरण आला.

असें उत्कृष्ट कार्य करून बाळाजी विश्वनाथ माघारा शाहूकडे साता-

+ त्यांतील कुलाबा सुवर्णदुर्ग विजेदुर्ग जयगड देवदुर्ग कनकदुर्ग फत्तेगड उचितगड यशवंतगड.

त्यास

त्यास सन सत्राशें चवदांत गेला. तेव्हां शाहूनें त्याचा मोठा मान करून त्याला पेशवाई दिली; आणि त्या बाळाजीच्या मित्र आबाजी पुरंदऱ्या तो त्याचा मुतालीक केला. आणखी +रामचंद्र पंत भानू, त्यास पेशवा याची फडणिशी दिली. पहिला पेशवा बहिरोपंत पिंगळा तो दूर केला.

चंद्रसेन जाधव सेनापती त्याणें शाहूच्या पक्ष टाकिल्या पासून, तें पद मानाजी मोऱ्यास दिलें. परंतु तो तादृश नव्हता ह्मणून बाळाजी विश्वनाथ पेशवे व हैबतराव निंबाळकर उभयतां पुनः थोरातास जिंकाव्या करितां नेमिले. तेसमयीं बाळाजी विश्वनाथास विचार पडला कीं, जर आह्मीं एथें युद्ध प्रसंग केला तर तो थोरात सचिव पंताला मारून टाकील. हें भय, व सचिवाची मातुश्री येसूबाई तीणें बाळाजीची फार प्रार्थना केली होती, यास्तव, त्याणें थोराताशीं कांहीं युक्तीचें बोलणें करून आधीं सचीव सोडिवला. नंतर युद्ध केलें, तेव्हां थोरातास तें लश्कर मोठें ह्मणून मैदानांत लढवेना, याकरितां तो किल्ल्यांत जाऊन लढूं लागला, मग तोफा लावून किल्ल्याचा तट पाडून, आंत शिरले; आणि थोरातास कैद करून, किल्ला पाडून अगदीं नाहीं असा केला. येसूबाई आपला पुत्र सुखी आला असें पाहून, बहुत उपकारी होऊन, पुणे परगण्यांत जितके सचिव पंताचे हक्क होते, ते सारे बाळाजी विश्वनाथास दिले. तेवेळेस बाळाजीचीं कुटुंबाचीं माणसें सासवडीं होतीं. या देण्याखेरीज कधीं संकटसमयीं फार उपयोगीं पडेसा अत्यंत सुदृढ असा पुरंदर किल्ला, समयविशेषीं, मुलां माणसांचा संरक्षणासाठीं दिला. तो शाहूच्या आज्ञेवांचून देवेना, ह्मणून बाळाजीनेंही शाहूला हेंच निमित्त समजाविलें कीं, समयीं हा किल्ला आमच्या माणसांचा रक्षणास उपयोगी; त्यावरून शाहूनें किल्ला पेशव्यास द्यावा ह्मणून आज्ञा दिली. तो शाहू इतका वश झाला, आणि पेशव्यास पुरंदर दिला ही, आपल्या वंशाचा बंधाचे सांखळीची, पहिली कडी त्याणें आपल्या हातें घडली.

सन सत्राशें पंधरांत, सरलश्कर राजानें आपणास सेनापतित्व दिलें नाहीं ह्मणून, राजाशीं कलह करून निघाला; तो गोदावरी तीरीं जाऊन राहिला; त्यावर पुनः त्याचें सख्य झालें नाहीं. त्यावेळेस पुणे परगण्यांत, मोंगलांकडचा बाजीकदमनामें, मुख्य अधिकारी होता. तो पेशव्यानीं आह्मी रंभाजी निंबाळकरास उपद्रव करणार नाहीं, असें कबूल करून वश केला. नंतर त्या अधिकाऱ्यानें पेशव्याचा पक्षपात धरिला. तेव्हां तो परगणा पेशव्यांचा हातीं लागला; त्या पासून पेशवे उत्तम प्रकारें प्रजापालन करूं ला-

---

\+ रामचंद्र पंत भानु नाना फडनीसाचा मूळ पुरुष.

गले असतां चोराचें पारिपत्य प्रथमतः केलें.

बाळाजी विश्वनाथ पेशवा. याचें बळ त्यादिवसापासून वाढलें; आणि कोणतेंही मोठें कार्य त्याचे मसलतीवांचून होईना असें झालें; व शाहूराज्यकारभारांत मनांतून कोणाशीं वक्र नसे. त्यावरून बाळाजी विश्वनाथही तसाच वागे; त्याणें शिवाजीचे कायदे मनांत उत्तम मानिले होते. परंतु संभाजीपासून अशी चाल पडली होती कीं, कोणी मोठ्या सरदारानें पराक्रमें करून घेतलेला मुलुख त्यास देत; त्याप्रमाणें निरुपाय होऊन हाही कोणास सदा देई. यानिमित्तें राज्य बळहीन असतें.

त्यावेळेच्या प्रतिनिधी व अष्टप्रधान यांचीं नांवें.

प्रतिनिधी, परशुराम त्रिंबक.

पेशवा, बाळाजी विश्वनाथ.

अमात्य. अंबाराम बापूराव हणमंते.

सचिव. नारोशंकर.

मंत्री, नारोराम शेणवी.

सेनापती. मानशिंग मोरे.

सुमंत, आनंदराव.

न्यायाधीश. होनाजी अनंत.

पंडितराव, मुद्गलभट्ट उपाध्याय.

त्याच वर्षी, परसोजी भोंसले व हैबतराव निंबाळकर मेले; तेव्हां शाहूनें परसोजीच्या पुत्रास त्याचा मुलुख देऊन, त्याचें सेनासाहेब सुभा असें पदही दिलें. त्याप्रमाणें हैबतराव निंबाळकराच्या पुत्रास देईना; त्याचें पद व मुलुख दावलशी सोमवंशी, यास दिला. यास्तव तो विमनस होऊन त्याणें शाहूचा पक्ष टाकिला, आणि मोंगलांच्या सरदार चंद्रसेन जाधव, याचा पक्ष धरिला. त्यापुढें तो हैदराबादच्या निजामउल्मुलुखापासून, बारशी आदिकरून मुलुख जहागीर पावला.

त्यावेळेस शाहू राज्यकारभार आपल्या कारभाऱ्यांकडे संपवून, आपण स्वस्थपणें महालांत असे किंवा शिकारीस हिंडे; तो बाळपणीं औरंगजेबाचे घरीं मद्यविषयोपभोगांत होता; त्यावरून ती सवय त्याला लागली; ती त्याचे मोठेपणीं ही जाईना; म्हणून तो स्वसंतोषें वागण्यांत प्रीति ठेवी. त्याला शिवाजीप्रमाणें, घाटमाथा किंवा कोंकणांत आरोंच संचार करणें आवडत नसे; आणि त्याचे वकील व मानकरी लोक व कारभारी. आपआपल्या कामासाठीं फार नम्रतेनें. आर्जवी गोष्टी बोलत; त्यांतो सत्य मानून. सर्व

कामें

कामें त्यांचे हातून करवी; तो असें न समजला कीं सर्व कामें दुसऱ्याचे हातीं दिलीं असतां, तोच प्रबळ होऊन, आपल्या महत्वाची हानि होईल. याप्रमाणें वर्तमान असतांही, मराठे लोक त्यावेळेस प्रबळ होऊं लागले. शाहू चातुर्याविषयींतर मध्यम होता, परंतु मोठा धार्मिक असे, आणि ब्राह्मणाचें फार पालन करी. आणखी मोंगललोक त्या शाहूच्या बहुत मान राखीत, तेणेंकरून मराठ्यांचें विशेष प्रावल्य झालें; आणि त्याची प्रजा त्यास बहुत मानूं लागली. शाहूचापूर्वी शिवाजीपासून जितके तक्ताधीश झाले; ते स्वतंत्रपणा करीत, परंतु शाहू आपण हिंदूंचा तक्ताधिपति असून आपणास दिल्लीचा बादशाहाचा आश्रित ह्मणवी.

त्यासमयीं मोंगलांचा फेरुकशेर बादशाह यास जा दोघां सैयदांचा आश्रयानें पूर्वी तक्त प्राप्त झालें, ते आपणास डोयजड होतील; अशा शंकेनें त्याचा मनांत आलें कीं, दोघे वेगळे करून बळहीन करावे. यास्तव त्यांत अल्पवयस्क जो सैयद हुसेन अलीखान नामें होता, त्याला दक्षिणेचा अधिकारी करून रवाना केला. आणि पहिला दक्षिणेचा अधिकारी दाउदखान मोठा शहाणा, त्याणें मराठी लोकांशीं स्नेह ठेविला असे; त्याला आपण गुजराथेचा अधिकारी केला होता, त्यास गुप्तलिहिलें कीं, मीं एथून सैयद पाठविला आहे, तर तुह्मीं दक्षिणेचें अधिष्ठान त्याचे हातीं लागूं देऊं नये; ह्मणजे सहा सुभे दक्षिण तुह्मास मिळेल. त्यावरून दाउदखानानें कुमकेस मराठे सरदारांस बोलावून, युद्धाची तयारी केली. तेव्हां मराठी सरदारांपैकीं नेमाजी शिंदा मात्र दाउदखानास मिळाला, त्याला बरोबर घेऊन सैयदाशीं लढला. तेवेळेस शिंदा एकीकडे उभा राहिला; लढला नाहीं कांकीं, त्याचा मनांत जो सबळ पक्ष दिसेल, तिकडे मिळावें असें होतें. नंतर युद्ध होऊन दाउदखान पडला; तेव्हां तो शिंदा सैयदास भेटून त्याजवळ राहिला. हें वर्तमान सन सत्राशें सोळांत घडलें.

सैयदहुसेन अल्ली याणें दक्षिण सुभा घेतल्यावर, प्रथम खंडेराव दाभाडे याचा पारिपत्यास फौज नेमिली; कारण, कीं, त्याणें सुर्तेपासून बऱ्हाणपुरपर्यंत वाटसरूलोकांस बहुत दिवस उपद्रव केला तो असा; कीं, त्याणें जागोजाग आपल्या लोकांचा टोळ्या करून ठेविल्या असत, ते लोक कोणी वाटेनें जाई, त्यापासून खंडणी घेऊन, त्यास पुढें जाण्याचें दस्तक देत; तें न केल्यास लुटीत. त्यांचा पारिपत्यास फौज पाठविलेली आठहजार होती, ती जवळ आली हें वर्तमान कळतांच, दाभाड्याचे लोक त्यांचे तोंडावर आऊन, भ्याल्या सारिख्या आकार दाखवून पळाले; आणि त्यास आगा

वर

वर येऊन त्यांचा बंदोबस्त विस्कळीत झाला असा पाहून, मागें उलटले आणि एकाएकी हल्ला करून, त्यांचा असा पराभव केला कीं, त्या सैनिकांचीं वस्त्रें देखील लुटलीं. यापुढेंही दाभाडयाची मोंगलांशीं लढाई अहंमदनगराजवळ झाली. तेथेंही तो जय पावोन, मग साताऱ्यास जाऊन शाहूला भेटला. तेव्हां शाहूनें त्याचा मोठा मान करून, त्यास सेनापतित्व दिलें. व पहिला सेनापति मानशिंग मोऱ्या होता, तो योग्य नव्हे ह्मणून दूर केला.

फरुकशेर सैयदाचा अनिष्टाविषयीं दाउदखान मेल्यावर मराठ्यांस ही गुप्त लिहीत असे; याप्रमाणें बादशाहाचें कृत्रिम आणि दाभाडयाचा जय, या दोहों कारणानीं मराठे प्रबळ होऊन सरदेशमुखी बळेंच करूं लागले. पूर्वीं दाउदखानानें त्यांस चौथाई मात्र दिली होती.

याप्रमाणें बादशाह कृत्रिमी आणि मराठीलोकांचा मोठा उपद्रव, या दोहों अडचणीमुळें, सैयदहुसेनाचा मनांत आलें कीं, शाहूशीं स्नेह करावा, त्या वेळेस त्याजवळ शंकराजी मल्हार नामें कारकून होता, तो पहिला शिवाजीजवळ असे; त्याला राजारामाचे वेळेस सचिवपद प्राप्त झालें होतें, परंतु तो संकटसमयीं राजारामास जिंजींत सोडून, आपण वाराणशीस गेला. त्यानंतर त्यास तेथें उगेंच रहावेना, ह्मणून सैयदहुसेन दक्षिणेस आला, तेव्हां त्यास मिळून मानक्यान दक्षिणेस आला. त्याचे स्नेही साताऱ्यांत बहुत होते, यास्तव हुसेन अल्लीनें त्याला शाहूशीं तहाचें बोलणें करावयाकरितां पाठविला. तेव्हां सहासुभे दक्षिणेची चौथ व सरदेशमुखी व हैदराबाद आणि विजापुर संबंधें कर्नाटक, व म्हैसूर, व त्रिचनापल्ली, व तंजोर, या संबंधें मुलुख, व खानदेश खेरीज करून, दक्षिणेंत शिवाजीनें जो मुलुख घेतला होता, त्याची सनद शाहू मागूं लागला. याशिवाय गोंडवण, व वराडयांतील मुलुख, सेनासाहेबसुभा, व कान्होजी भोंसला याणीं घेतलेला; तो ही मागीतला; आणि आपली मुलें माणसें दिल्लींत होतीं तीं लवकर आह्माजवळ पोंहचतीं करावीं असें सांगीतलें; आणखी आपण कबूल केलें, कीं याप्रमाणें सारीं कामें झालीं असतां, मोंगलांस मुलुखसंबंधें वर्षास दहालक्ष रुपये खंडणी देऊं; आणि सरदेशमुखीबाबद मुलखांत चोरीचाउपद्रवांचा बंदोबस्त ठेवुं; कदाचित चोरी झाली तर तें नुकसान भरून देऊं. याशिवाय सरदेशमुखीचा उत्पन्नापैकीं, शेंकडा, सहाशें एकावन्नाचा मानेंकरून, नजर देऊं.+ चौथबाबद पंधराहजार फौजेनिशीं बादशाहाची

+ मोंगललोकांची रीति अशी होती कीं कोणास अधिकार दिला ह्मणजे त्यापासून याप्रमाणें नजर घ्यावी.

चाकरी करूं, याशिवाय कोल्हापुरकर संभाजी, राजारामाचा पुत्र; याचे लोक विजापुर सुभा व हैदराबाद या दोहों जागीं उपद्रव करीताहेत ते हाकून देऊं, हें न घडे तर तत्संबंधें जें नुकसान असेल तें भरून देऊं, म्हणून करार केला, हें सर्व शाहूचें बोलणें सैयद हुसेन अल्लीखानानें प्रायः मान्य केलें, असें सन सत्राशें सत्रांत वर्तलें.

असा तह झाल्यावर, सैयद अल्लीहुसेनाकडे शाहूनें मराठे स्वार दहा हजार पाठविले. त्यांज बरोबर, सरदार संताजी व परसाजी भोंसले, व उदाजी पंवार, व विश्वासराव वगैरे होते, हा तह दिल्लीच्या बादशाह फेरुकशेर यास कळल्यावर, सैयदाच्या द्वेषास्तव त्याला ठीक वाटलें नाहीं; त्यावरून सैयदास समजलें कीं, बादशाह आपला पुर्तेपणें द्वेष करितो, यास्तव त्याणें नेम केला, कीं हा बादशाह पदच्युत करील, म्हणून आपल्या कुमक मागीतली. शाहूनें ही ते आपणास साह्य होतावह असें समजून खंडेराव दाभाडे व बाळाजी विश्वनाथ, हे दोघे सरदार बरोबर मोठी सेना देऊन त्याचे कुमकेस योजिले. ते निघते समयीं शाहूनें बाळाजी विश्वनाथास सांगीतलें, दौलताबाद वचांदा किल्ला कसें ही करून घ्यावा व बहुत दिवस मराठे गुजराथ, व माळवा, या दोहों जागची खंडणी वर्षास कांहीं एक प्रकारें घेत आले; त्याची सनद मिळवावी.

सैयद हुसेन मराठी फौज बरोबर घेऊन दिल्लीस चालिला; दिल्लींत फेरुकशेर बादशाह होता त्यास कृत्रिमाचें शहाणपण होतें, परंतु संकटसमयीं त्याची बुद्धि स्थिर नसे: यास्तव जेणें करून आपणास उपयोग होईल, तें त्याला समजेना; आणि कोणाचा विश्वासही वाटेना, यास्तव त्याणें सारे हितकारक लोक दूर केले. मग दोघे सैयद मिळून बादशाहास धरून मारून टाकिला. त्यानंतर सातां महिन्यांत दिल्लीमध्यें दोन बादशाह होऊन मृत्यु पावले.

त्यानंतर सन सत्राशें एकोणिसांत, रोषनइख्त्यार नामें, सुलतान माजुमाच्या नातू (पुत्राचा पुत्र) त्याचें महंमदशाह असें नवें नांव ठेवून, दोघां सैयदानीं तो बादशाह केला. परंतु त्या दोघां वांचून कांहीं एक कार्य होत नसे. ते उभयतां प्रायः दुसऱ्याचे बुद्धीनें चालत नसत. इतकें मात्र असे कीं, मोठे मोठे सरदार यास आपले अंगत्य असावें हें त्यांचे मनांत होतें याकरितां, निजामउलमुलुख मोठा नामांकित म्हणून, त्यास वश करावयाचा उद्योग केला. तेव्हां तो त्यांस मनापासून वश न झाला, याचें कारण असें कीं, तो दक्षिणेंत अधिकारी असतां बादशाहानें त्याचा अधिकारावर सैयद नेमिला,

आणि

आणि त्याला मुरादाबादेस पाठविला.

तो निजामउलमुलुख मुरादाबादेस राहून त्या प्रांताचे कित्येक उन्मार्गवर्ती जमेदार यांचीं पारिपत्यें करून मोठ्या योग्यतेस चढला. मग फेरुकशेर याणें त्यास दिल्लींत आपल्याजवळ बोलावून नेला. तो तेथें कित्येक दिवस बेरोजगार होता; नंतर त्याला बादशाहानें माळवे प्रांतीं सुभेदारी देऊन पाठविला. तो मोठा शहाणा आणि धैर्यवंत असे, त्याला अधिक योग्यतेस चढावयाची आशा होती, परंतु त्याचे अटकळींत आलें कीं, थोडक्याच दिवसांनीं नवी मुद्रा होईल. ह्मणून तो तेथें कांहीं गडबड न करितां, तो समय येण्याची वाट पाहात उगाच राहिला.

बाळाजी विश्वनाथ फौजेसहित, महंमदशाह बादशाह होई तों पर्यंत दिल्लींत राहिला. नंतर तेथून निघावयाची आज्ञा घेतली, आणि सेनाखर्च सैयदापासून घेऊन, शाहूचीं मुलें माणसें तेथें होतीं तीं बरोबर घेऊन निघाला. ते समयीं पूर्वी तह केल्याप्रमाणें चौथ व सरदेशमुखी, व स्वराज्य, यांच्या सनदा घेतल्या; आणि वराड संबंधीं मुलुख व गुजराथ व माळवा यांचे खंडणीच्या सनदांविषयीं, आपला वकील तेथें ठेविला, परंतु त्यास त्या प्राप्त जाल्या असतील, असें दिसत नाहीं.

बाळाजी विश्वनाथ दिल्लीस निघाला ते समयीं, त्याणें आपला दिवाण आबाजी पुरंदऱ्या, तो मुतालिक+ केला. तथापि त्या मुतालिकानें सर्व कारभार बाळाजी विश्वनाथाचा नावेंच चालविला. नंतर पेशवा दिल्लीहून सनदा घेऊन सातारांस आल्यावर, वसुलाचा बंदोबस्ताविषयीं कांहीं कांहीं नवे कायदे करूं लागला. तो प्रकार ध्यानांत आणिला असतां असा अर्थ दिसतो, कीं, जे लेखनविद्यानिपुण ब्राह्मण असतील ते श्रेष्ठ व्हावे, आणि तद्विद्यारहित सैनिक शूद्रादि त्याणीं त्यांचे स्वाधीनपणें वर्तावें, व समयविशेषीं हिंदूनीं मोंगलांसही उलट गोष्ट सांगावी.

त्या वसुलाचे कायद्याचा विस्तार असा, प्रथम दक्षिण सहा सुभ्यांची ‡सरदेशमुखी ती राजाचें वेतन असें केलें; तेणेंकरून राजा बहुत संतुष्ट व्हावा, आणि दुसरेही मराठे राजे त्याचे वंशांत होतील ते प्रसन्न व्हावे ह्मणून केलें; कांकिं, मराठे लोक वेतनाविषयीं अत्यंत लुब्ध असें बाळाजी विश्वनाथास ठाऊक होतें.

---

\+ मुतालिक ह्मणजे, मोठा अधिकारी याणें आपल्या कामावर सरकारास बदलदिला तो.

---

‡ सरदेशमुखी ह्मणजे ओऐन वसुल त्यापैकीं दहा रुपये शेंकडयास देणें.

त्यासमयीं

त्यासमयीं उत्पन्न पूर्वीचा ठरलेल्या नेमाची चवथायी, जमा व्हावयास अवघड पडे; परंतु मराठे लोक यावत् जमेचा ठरावाप्रमाणें आह्माला आमची चौथायी द्यावी असें बोलत. आणि जितका ऐवज देत तितका घेऊन बाकी ऐवज आमच्या सरकाराकडे येणें राहिला ह्मणून सांगत; तेणेंकरून मराठ्यांनी मोंगलांस समयविशेषीं आर्जवेंकरून किंवा बलात्कारेंकरून मागावें; असा मार्ग नीट झाला. याप्रमाणें चतुर्थांश जाऊन बाकी तीन भाग राहिले त्यांपैकीं एक फौजदाराचा हक्कास जायी; मग दोन उरत तो ऐवज कोणी एकठिकाणचा बादशाहाचे खजिन्याकडे सर्व जायी. कांहीं एक जागींचा जहागिरदाराचे देण्यासच खर्चे, कांकिं बादशाहानें त्यांस खर्चास देविला होता. त्याच निमित्तेंकरून पेशवे व निजामउलमुलुख यांचे राज्यांत जहागिरसंबंधें मुलुख जप्त करणें किंवा माघारा देणें, याची रीति अशी पडली होती किं, कोणी एक मुलखीं जहागिरदारच तें सर्व घेई; कोणे एके जागीं बादशाहच घेई; यापुढें काळेंकरून पेशव्यांचा मुलुख सरकार इंग्रेज बहादुर यांणीं घेतला, तेव्हां कोणे एके गावीं, कुळकरणी यांस बोलावून मागले लेख काढविले, त्यांत दोन भाग जहागीर, असें लिहिलें होतें; परंतु याचे कोणास व त्याचें निमित्त काय तें त्या लेखांत नाहीं ह्मणून कुळकरणी यांस विचारिलें किं, हे दोन भाग द्यावे कोणास व देण्याचें निमित्त काय; त्यावरून त्याणीं उत्तर केलें किं, आह्मास हें कांहीं ठाऊक नाहीं; आमचे वडिलांनीं लिहिलें आहे इतकें मात्र जाणतों. यावरून असें वाटतें किं, जे दोन भाग राहिले ते सर्व कोणी एक ठिकाणीं पूर्वीं जहागिरदारच घेत असेल; मग कांहीं निमित्तेंकरून, बादशाह याणें तो मुलुख घेतला तरी तो लेख राहिला.

जितका मुलुख स्वराज्य, त्याचा वसुलाची चौथ तिला राजाची बापती असें नवें नांव ठेवून, तो राजाचा हक्क ठरविला. आणि तीन हिस्से राहिले, त्यास मोकासा नाव ठेविलें. याशिवाय साहोत्रा + व नारगोंड ⊞, नामें दोन हक्क राजाचे होते ते स्वराज्याचे यावत् जमेवर असत, त्यापैकीं साहोत्रा शाहूनें पंतसचिवास दिला; आणि नारगोंड दुसऱ्या कोणास दिला.

त्यावेळेचे प्रधान व प्रतिनिधी यांचीं वेतनें राजा आपल्या खजिन्यांतून देई. या खेरीज त्यांस कांहीं गांव इनाम होते.

---

+ साहोत्रा ह्मणजे शेंकडा साहा रुपये.  ⊞ नारगोंड ह्मणजे शेंकडा तीन रुपये.

सन सत्राशें विसांपासून सत्राशें सवीस पर्यंत जालेलीं वर्तमानें मिळून भाग तेरावा.

## अनुक्रमणिका.

निजामउलमुलुखानें सैयदाचे आज्ञेंत वागणें सोडून, मनांत दक्षिण यावयाचा निश्चय केला.

त्यानंतर तो सैयदाचा सरदाराशीं युद्ध करून जय पावला.

सैयद हुसेन अलीखान, आपल्या बादशाहा सहित, निजामउलमुलुखाचा पारिपत्यास दिल्लीहून निघाला. तो वाटेनें शत्रूचा मारेकऱ्यानीं मारिला.

तदनंतर सैयद अबदुलखान, तो निजामउलमुलुखाशीं युद्ध करीत असतां पराभव पावून त्याचे कैदेंत सांपडला.

त्यावरून दिल्लीमध्यें लोकांनीं बादशाहाचे प्रसन्नते साठीं मोठा उत्साह केला.

परशुराम त्रिंबक, व बाळाजी विश्वनाथ, व खंडेराव दाभाडे, यांचा मरणामुळें मराठी दरबारांत काय काय वर्तलें तें.

बडोदेकर गाइकवाड यांचा मूळ पुरुष, दमाजी गाइकवाड, याचे मरणाचा प्रकार.

निजामउलमुलुख, यास बादशाहानें वश करून आपली वजिरी दिली.

त्यानंतर तेथील दरबारी लोकानीं त्याचा नाशाचा उद्योग केला.

गुजराथेचा अधिकारी, हैदर कुलीखान, त्याचा नाशाविषयीं निजामउलमुलुखास बादशाहानें गुप्तपणें आज्ञा केली.

तो निजामउलमुलुखाचे हातून पराभव पावला.

मग बादशाहानें निजामउलमुलुखास वकीलमुतलख, नामें मोठी पदवी दिली.

बाळाजी विश्वनाथाचा पुत्र, बाजिराव याचें वागणें.

होळकर व शिंदे यांची उत्पत्ती.

उदाजी पवाराची वर्तणूक.

बाजिराव बाळाजी विश्वनाथाचा पुत्र याणें काय काय मसलत केली; तीचा प्रतिपंथी जाला श्रीपतराव, तें प्रकरण.

शकरखेराजवळचे लढाईचा प्रकार.

सुरतेचा अधिकारी, रुस्तुम अली, तो पिलाजी गाइकवाडाचे घातास प्रवर्तला.

प्रवर्तला.

अंमदाबादचा अधिकारी आमेदखान, तो कांताजी व पिलाजी यांस चौथ देता जाला.

तो ऐवज जमा करते समयीं, त्याउभयतांचा कलह होऊन, कांताजीचा विभाग माहीनदीचे वायव्येस ठरला; व आग्नेयीकडचा विभाग पिलाजीचा ठरला.

अंमदाबादेस, शाहाबागेजवळ लढाई जाली तें.

गुजराथचे व्यवस्थेचा प्रकार.

बाजिरावानें माळव्या मुलखीं स्वारी घातली.

## भाग तेरावा.

सन सत्राशें विसांत, दिल्लीमध्यें जे दोघे सैयद फेरुकशेराचे जागीं, दुसरा बादशाह करून, आपण मुख्यत्वें करून राजकारभार करीत होते; त्यांवर मानकरी लोक व बादशाह यांची मनापासून प्रीती नव्हती. कांकिं, त्यांचा स्वतंत्रपणें वागण्याचा उद्योग होता; ते दुसर्यांचें मन वश करण्याविषयीं तत्पर नव्हते. यास्तव मानकरी लोक व बादशाह, हे त्यांचा बाह्यात्कारें मान करीत; परंतु रयत, त्यांस मनापासून मानित असे; तेव्हां माळव्याचा मुख्य अधिकारी, निजामउलमुलुख, याणें तें सर्व वर्तमान जाणून नेम केला किं, आपण सैयदाधीनत्व टाकून, आपण स्वतंत्रपणें वागावें. असा निश्चय होऊन त्याणें आपल्या नावास, आसीफजा, असें पद जोडून बरोबर बारा हजार सैन्य घेऊन नर्मदा उतरून, आशीरगडचे किल्लेदारास, कांहीं द्रव्य देऊन तो किल्ला घेतला. त्यानंतर बह्राणपूर व खानदेश सुभाही त्याचे हातीं लागला. आणि शाहूचे कित्येक सरदार[+] बिथरलेले होते, ते व कोल्हापुरकर संभाजी याजकडचेही कित्येक सरदार जाऊन, त्या निजामउलमुलुखास मिळाले.

त्यासमयीं दोघा सैयदांचीं दोन लश्करें वेगळीं वेगळीं होतीं, तीं थोडक्या अंतरानें असत; त्यांत एक माळवाल्गत लश्कर होतें, त्याचा मुख्य सरदार दिलावरखान असे, दुसरें औरंगाबादेस होतें, त्याचा मुख्य सरदार, अलंअल्लीखान, तीं दोन्हीं लश्करें एकत्र मिळालीं असतीं तर, निजामउलमुलुखास भारी जालीं असतीं; परंतु तो दिलावरखान अभिमानें करून औरंगाबादचा अलंअल्लीखानास, न मिळतां एकटाच निजामउलमुलुखावर बह्राणपुरीं चालून गेला.

+ शाहूचे जे सरदार, निजामास मिळाले त्यांत चंद्रसेन जाधव निंबाळकर, हैबतराव सरलश्कराचा पुत्र; व रायरंभा निंबाळकर हे दोघे मुख्य.

त्याचा

त्याचा युद्धांत जयन होतां. तो मृत्यु पावला.

हें वर्तमान औरंगाबादेस कळलें ते समयीं. अलंअह्लीखानानें आपलें लश्कर तयार करून बह्राणपुरावर चालिला. त्याजबरोबर शाहूचें +मराठी लश्कर. शंकराजी मल्हार जो शाहू कडचा औरंगाबादेस वकील होता, त्याणें जमा करून पाठविलें; या खेरीज, सातार्याहून खंडोजी दाभाड्या, बरोबर स्वार देऊन पाठविला.

निजामउलमुलुखयास मोंगलाचें लश्कर येतेंसें कळतांच, तो लश्कर सुद्धां तेथून निघोन. यांचा लश्करावर चालून आला तेव्हां त्या लश्करांचा युद्ध प्रसंग, वराडपैनघाट संबंधी बाळापुराजवळ जाला. त्यांत निजामउलमुलुखानें कांहीं युक्ती करून, त्याचें लश्कर अडचणीच्या जाग्यांत नेऊन, मग उलटून मारून जिंकिलें. ते समयीं अलंअह्लीखानानें मोठें शोर्य केलें; परंतु त्याचे बहुतेक लोक पळाले, व कित्येक शत्रूस मिळाले, व त्याचे कुमकेस आलेले परमविश्वासू मराठे लोक होते, ते त्यासभोंवते असून लढून मरून गेले, तेव्हां तो मृत्यु पावला. त्या लढायींत मराठे उत्तम प्रकारें लढले, त्यांत कोणी मोठा सरदार नमेला; एक शंकराजी मल्हार मात्र फार जखमी होऊन, केवळ मरणोन्मुख होत्साता शत्रूंचा हातीं लागला.

हें वर्तमान दिल्लीस गेल्यावर दोघां सैयदांस भय वाटलें; परंतु बादशाह अंतःकरणीं आनंद पावला. तेव्हां त्या सैयदांचा बहुत विचार होउन असें ठरलें किं, सैयदहुसेन अह्लीखान. धाकटा भाऊ याणें बरोबर सेना घेउन निजामउलमुलुखाचा पारिपत्यास बादशाहासहित निघावें; नंतर तो त्या प्रमाणें सिद्धता करून वडील भाउ सैयद आबदुलखान याचा पायीं पडून, धणी बादशाह यास घेऊन निघाला. तो कांहीं मजला चालून पुढें गेला; तेव्हां, निजामउलमुलुखाचे कोणि मित्र व त्याचे मुलखीं राहाणारे मोठे मोठे लोक, एकत्र मिळून मसलत करून, सैयदहुसेनास मारेकरी घालून, मारून टाकिला. नंतर त्या मसलत करणारांनीं तें सर्व लश्कर वश करून घेतलें, आणि त्यांतील सैनिकांस असें समजाविलें किं, बादशाह धणी, यास प्रतिबंधक असा जो चाकर तो मारावा हेंच उचित; कांकिं स्वामीचा स्वतंत्रपणास, व्यत्यय नसावा. त्यास थोरला सैयद आबदुलखान यास मारिला असतां बादशाह सुख पावेल. अशी मसलत देऊन, ते लोक त्या लश्करांत मिळून, सैयद आबदुल्लास मारावयाकरितां बादशाहा बरोबर दिल्लीस जाऊं लागले.

---

+ त्या लश्करांत सेनासाहेब सुभा कान्होजी भोंसला, व हैबतराव निंबाळकर, हे मोठे सरदार.

तेव्हां त्या सैयदाजवळ बहुत दवलत होती, त्यास हें वर्तमान कळतांच त्याणें पुष्कळ खर्च करून, थोडकेदिवसांत मोठें सैन्य जमा केलें; आणि महंमद शाह बादशाह नको. असें करून, तो सैयद आणी धाकट्या सैयदास मारिला; त्यांचा पारिपत्यासाठीं दिल्लीहून निघाला. त्याची व यालोकांची बल्लाणपुराजवळ गांठ पडली, तेथें मोठ्या निकरानें युद्ध आलें; तें असें कि, आंत जय कोणाचा होईल तो सुमार कळेना, शेवटीं आबदुलखानाच्या लश्कराचा पराभव आला. आणि तो घायाळ होऊन शत्रूंच्या हातीं लागला. तेसमयीं बादशाह निरंकुश होत्साता. परम हर्ष पावोन, त्या मारेकरी मंडळांत एक महंमद आमीनखान नामें होता तो वजीर केला. आणखी दुसरेहि त्या समुदायांतील कितिएक पदवीस चढविले. नंतर बादशाह मोठ्या उत्साहेंकरून, आपल्या राजधानीस गेला. तेव्हां तेथचा नागरिकांहीं, बादशाहाचे संतोषार्थ कितिएक दिवस मोठा उत्साह केला, तो असा कि जामध्यें आनंदावांचून दुसरा शब्द कानीं पडेना; या शिवाय कितिएक मुलखींच्या मोठ्या मोठ्या लोकांनीं, उत्साहपूर्वक सेवातत्परतेच्या अर्थाचीं पत्रें, बादशाहास पाठविलीं. त्यांत निजामउलमुलखाचेंहि पत्र होतें, आणि शाहूच्या वकिलहि स्वामीचें कल्याण चिंतित होता. त्यानंतर त्या सर्व लोकांचा पत्रानुरूप उत्तरें, बादशाहाचे दरबारी लोक याणीं महंमदशाह याचे नावें लिहून पाठविलीं.

तेसमयीं तो नवा केलेला वजीर अकस्मात मेला. त्याचा अधिकार बादशाहानें निजामउलमुलुखास दिला. त्याणें पूर्वी बंड उत्पन्न केलें तें बादशाहाचे उपयोगीं पडलें. तो निजामउलमुलुख यास वजिरी प्राप्त जाली तरी तो आपल्या जहागिरीचा बंदोवस्ता करितां, सन सत्राशें बेवीस पर्यंत दक्षिणेंत राहिला.

त्या मारेकरी मंडळींत, एक हैदरकुलीखान होता, त्यास गुजराथेचा अधिकार दिला. दुसरा सादतखान त्याला आधीं आग्रें शहर दिलें, मग बंगाल्या संबंधी उद्प्रांत दिला. त्या दोघांत, सादतखान पुढें मोठा विख्यात आला; तो उदचा बादशाहाचा मूळपुरुष; त्याची संतती अद्यापि आहे.

मोंगलांकडचें वर्तमान असें असतां मराठ्यांचे मुख्य प्रधान, परशुराम त्रिंबक, व खंडेराव दाभाडे, व बाळाजी विश्वनाथ, हे मृत्यु पावले. त्यामुळें त्यादरबारचे व्यवस्थेंत कांहीं अंतर पडलें, तो प्रकार असा, प्रतिनिधीचा दुसरा पुत्र-श्रीपतराव, तो बापाचे जागीं स्थापिला. बाळाजी विश्वनाथाचा वडील पुत्र बाजिराव, त्यास ती पदवी बाळाजीचा पाठिमागें सातां महिन्यांनीं प्राप्त जाली. बाळाजी विश्वनाथ सन सत्राशें वेविसांचे दहावे महिन्यांत, कारभाराचा

या शीण होऊन मरण पावला.

खंडेराव दाभाडा मेल्यावर, त्याचा पुत्र त्रिंबकराव, त्यास सन सत्राशें एकविसांचे पांचव्या महिन्यांत. बापाचा अधिकार मिळाला. खंडेराव दाभाडे मेल्याचे अगोधर, त्याचा सरदार दमाजी गाइकवाड होता; त्याणें मोठें शौर्य केलें, ह्मणून खंडेरायानें शाहूस सांगीतलें, यास्तव शाहूनें त्यास खंडेरावाचा हाताखालीं दुसरा अधिकार देऊन, समशेर बहादर असें नाव ठेविलें. तो बडोद्याचा गाइकवाडांचा मूळ पुरुष; अद्यापि त्याचे वंश्य बडोद्याचे अधिकारी आहेत. तो दमाजी खंडेराव दाभाडा मेला त्याच सुमारें मृत्यु पावला. त्याचे जागीं त्याचा पुतण्या पिलाजी गाइकवाड यास बशिवला.

सन सत्राशें बेविसांत, निजामउलमुलुख आपल्या जहागीर मुलखाचा बंदोबस्त करून दिल्लीमध्यें वजिरीचा अधिकारावर गेला. तो स्वभावें करून निरसद होता; त्याला हास्यविनोदादिप्रीति नसे, आणि बादशाह व त्याचे दरबारी लोक यांस विनोदादि प्रकार प्रिय होते; त्यामुळें तो त्यांस आवडेना. पुढें त्याणें ती बादशाहाची चाल मोडावयाचा उद्योग आरंभिला; तेव्हां ते दरबारी लोक व बादशाह यांचे मनांत आलें किं तो दूर करावा; यास्तव मसलत केली. तो प्रकार असा, त्यावेळेस कुलीखान गुजराथेमध्यें अमदाबादेस अधिकार करीत होता; त्यापासून कांहीं चूक जाली यास्तव बादशाहाचे दरबारी लोकांनीं त्यास असें भय दाखविलें किं, वजीर निजामउलमुलुख तुझें पारिपत्य करील. इकडे निजामउलमुलुखास त्याचा कांहीं चाहाड्या सांगीतल्या, या प्रकारें त्या उभयतांचें वांकडें पाडून ते लोक व बादशाह मिळून निजामउलमुलुखास आज्ञा दाखविली किं, तुला गुजराथचा अधिकार देऊं; त्यावरून तो फौज घेऊन कुलीखानाचा पारिपत्यास निघाला त्या युद्धास बहुत दिवस लागतील, किंवा त्यांत निजामउलमुलुख मेला जाईल, अशी बादशाहाची, व त्या मुत्सदी लोकांची अटकळ होती. ते वेळेस हैदरकुलीखानाजवळ फौज व सरंजाम चांगला होता; परंतु त्याचे कित्येक विश्वासू लोक निजामउलमुलुखानें वश करून घेतले. तेव्हां तो वेड्याचें सोंग घेऊन दिल्लीस पळून गेला हें वर्तमान निजामउलमुलुख समजून, तो उज्जनीस राहिला; तेथें त्याचे भेटीस कित्येक गुजराथचे मोठे मोठे मानकरी लोक आले, ते समयीं त्याणें त्या मुलखाचा बंदोबस्तास जामध्यें धान्यादि उत्पन्न पुष्कळ असे त्यांतीलच पांच परगणे आपल्याकडे खासगत जहागीर करून ठेविले; त्यांत एक ढोळका, दुसरा भडोज, तिसरा जंबूसर, चवथा मखबुलाबाद, पांचवा बळसार, याप्रमाणें केलें. आणि अमदाबादेस आपलें काम चालवावयाकरितां, आपला

पला हस्तक पुतण्या ठेवून आपण सन सत्राशें तेविसांत माघारा दिल्लीस गेला. तेथें त्याचा व बादशाह याचा स्वभावास पडेना ह्मणून तो वजिरीचें काम टाकून, वकील मुतलख नामें, दुसरा अधिकार स्वीकारून राहिला; तथापि त्याचे चित्तास तेथें राहाणें आवडेनासें जालें, ह्मणून पुढें थोडकेच दिवसांनीं कोणे एके समयीं शिकारीचें निमित्त करून दिल्लीबाहेर निघाला, आणि दक्षिणेंत आपले मुलखीं जाऊन राहिला. त्यानंतर तो आपणास बादशाहाचा चाकर ह्मणवी, परंतु तेव्हांपासून स्वतंत्रपणें वागूं लागला, व त्यापुढें पुनः दिल्लीस गेला नाहीं. ते समयीं नर्मदेचे उत्तरेकडचा जितका मुलुख, पूर्वीं मोंगलांनीं यत्नेंकरून घेतला होता, तो सर्व निजामउल मुलुखाचे हातीं लागला.

असें हिंदुस्थानचें वर्तमान असतां, बाजिराव पेशवेपण पावला. नंतर कांहीं अवकाशानें तो लश्कर घेऊन दक्षिणेंतून खानदेशीं जाऊन, तेथचा मोकासेपणाचा वसूल घेत होता; त्याचे मनांत होतें कि, माळवा मुलुख आपले हस्तगत व्हावा, परंतु त्यास प्रतिवर्षीं सातान्यास एकवेळ जावें लागत होतें, त्या अडचणीमुळें तो त्याच्या मनसोबा अकरायर्षें शेवटास गेला नाहीं. त्याणें पूर्वीं सन सत्राशें चोविसांचे सुमारें किति एकवेळा बऱ्हाणपुरचा सुभेदार व माळव्याहून आलेले मोंगलांचे मोठे सर्दार यांचा पराभव केला; त्यांतल्या एका लढाईमध्यें, बाजिरायाचे दोघे सरदार पुढें सरून मोठ्या शौर्यें करून लढले, ते कांहीं दिवसांनीं पुढें विख्यात जाले; त्यांत एक मल्हारजी होळकर, दुसरा राणोजी शिंदा. त्यावेळेस मल्हारजी होळकर शिलेदारी करित होता, तो जातीचा धनगर असे, त्याचा बाप निरानदीचे कांठचा होळ गांवचा चौगुला. राणोजी शिंदा याचे पूर्वज सातान्याजवळ कण्हेरखेडीं रहात होते, तो शिंदा पूर्वीं मोंगलांचीं चाकरी विश्वासूपणेंकरून मोठ्या पदवीस चढला असतांहि, पुढें दरिद्रदशा प्राप्त आली तेव्हां तो बाळाजी विश्वनाथाजवळ बारगिरी करीत होता, त्यानंतर बाजिरायाजवळ त्याची जोडा उंचलायाची चाकरी स्वीकारून राहिला; मग त्याची वर्तणूक चांगली पाहून, त्याणें त्यास उत्तरोत्तर पदवीस चढविला. त्याच सुमारें धारेचे पवार योग्यतेस चढले. त्यांचा मूळ पुरुष उदाजी पवार, विश्वासराव त्याचा बाप, तो रामचंद्रपंत अमात्यानें योग्यतेस चढविला होता. ती धार ह्मणजे, माळव्यांत पुरातन मोठा किल्ला आ-

---

+ शिंद्याचीं कुळें दोन आहेत, एकाचें नांव कण्हेरखेडकर, दुसऱ्याचें नांव रविराव ह्मणतात.

हे

हे.

बाजिराव फार दिवस असें इछित होता कि, हिंदुस्थानांत जाऊन मोंगल जिंकावे, परंतु त्यास अवसर सांपडला नाहीं मग जेव्हां पिलाजी गाइकवाड गुजराथेंत स्वतंत्रपणें वागूं लागला, व उदाजी पवार माळवा मुलुख आणि गुजराथ प्रांत लुटूं लागला व दिल्लीचा दरबारांत बादशाहाशीं आणि निजामउलमुलुखाशीं बिघड जाला; तेव्हां तो असें समजला कि, हा समय आपल्या कार्यसाधनास योग्य आहे, परंतु त्यास कोणी बाहेरचा प्रतिपंथी नसतां, प्रतिनिधीच त्याविषयीं कांहींसा वक्रपणा करीत असे. बाजिराव शूर होता, आणि त्याचे बाळपणापासून बापानें त्यास राज्यकारभारांत शहाणा करून तो लहान असतां आपले बरोबर दिल्लीस नेला; तेसमयीं कांहीं मसलतसंबंधें बाळाजी विश्वनाथ व जयपुरकर राजा जयशिंग, या उभयतांची गांठ पडली, त्या योगें बाजिरायाचा व जयशिंग याचा परिचय जाला होता. असा बाजिराव राज्यकारभार, व मसलत, व शौर्य, या तिहिं प्रकरणीं निपुण असे. तो जातीचा कोंकणस्थ ब्राह्मण यास्तव गोड बोलणें हा त्याचा निसर्गसिद्ध गुण होता. आणि शिपाईपणांत तर मराठयां सरदारांप्रमाणें प्रवीण असे; आणि अल्पोपायसाध्य जें तें टाकून महदायाससाध्य आणि जांत लाभ मोठा असें जें कार्य त्यास झटावें; अशी त्याची बुद्धी होती, त्याणें एखादी मसलत केली तर ती शेवटास नेण्याविषयीं तो मोठा अभिमान बाळगी. त्यासारिखा मसलत शेवटास नेणारा ब्राह्मणजातींत केवळ दुर्लभ. तो नित्य शाहूस ह्मणे कि मोंगल अत्यंत आळशी, आणि अशक्त जाले आहेत त्यांस हिंदूचा मुलखांतून हांकून द्यावयाचा समय हाच, हल्लीं मराठे लोक वेगळीं वेगळीं बंडें करिताहेत ते सारे एकत्र होतील तर मोंगलांस लाऊन देतां येतील, आणि मराठे विख्यात होतील. अशी तो मसलत देत असे परंतु प्रतिनिधी राजास ह्मणे कि, असें करणें तें केवळ वेडेपणाचें काम. शिवाजीनें करनाटकांतील घेतलेला जो मुलुख आपल्या हातचा गेला तो घेऊन, मग या उद्योगास लागावें. याप्रमाणें त्याचें बोलणें पडत असतां, शाहूजवळ कोणे एके दिवशीं ते दोघे आपापल्या प्रकारें बोलतांना, बाजिरायानें शाहूचा वडिलांचें शौर्य बहुत वर्णिलें; आणि बोलला कि, शिवाजीची बुद्धि प्रतिनिधीसारिखी असतीतर त्याणें करनाटक घेतल्याचे पूर्वी त्याचे मनांत येतें कि आधिं विजापूर व गोंवळकोंडें घ्यावें मग हळूच युक्तीनें करनाटकांत प्रवेश करावा. परंतु तें न झालें, तो थोर बुद्धीचा, त्याणें एकदांच करनाटक सर केलें. त्यास, जसा पुरातन आणि मोठा विस्तार

वंत

वंत वृक्ष असतो, तो बुडाशीं तोडिला ह्मणजे त्याचा सर्व विस्तार पानां फुलां सहित हातीं लागतो, तसें हें राज्य प्राप्त होईल. त्यास जर मला आज्ञा द्याल तर कृष्णेपासून अटकनदीपर्यंत, तुमचा झेंडा मी लावीन. हें बोलणें ऐकून शाहू फार संतुष्ट होऊन लाभाशायुक्त होत्साता बोलिला किं, तुमचे वडील मोठे कुलीन, आणि तुह्मींही त्यांचे पुत्र योग्यच आहांत, त्या तुह्माला अटकेचा पलिकडेही कदलीखंडपर्यंत झेंडा लावावयास माझी आज्ञा आहे.

इकडे मुसलमानांत निजामउलमुलुख बाहेर गेल्यानें दिल्लीचे दरबारी लोक व बादशाह यांचा मनांत घातशंका उत्पन्न होऊन, हैदराबादचा सुभेदार मबारीजखान, त्यास लिहिलें किं तुह्मीं फौज ठेवून निजामउलमुलुखास त्याचे स्थानीं जाऊं देऊं नका; हें काम तुमचे हातून शेवटास गेलें तर तुह्मास दक्षिणसहा सुभे अधिकार मिळेल. असें पत्र, व त्या अधिकाराची सनद बरोबर पाठविली.

नंतर मबारीजखानानें फौज तयार केली, तेव्हां निजामउलमुलुखानें त्याशीं तह करावयाविषयीं फार उद्योग केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं सन सत्राशें चोविसांचे आठव्या महिन्यांत, शकरखेराजवळ उभयतांची लढाई जाली, तेसमयीं मबारीजखानानें मोठें शौर्य केलें परंतु त्याचा जय जाला नाहीं. तो लढतां लढतां मेला, आणि त्याचे दोघे पुत्र मेले व दोघे फार जखमी जाले. तो पडला तेव्हां निजामउलमुलुखानें त्याचें शिर कापून दिल्लीस पाठविलें, आणि पत्र लिहिलें किं, स्वामींचा दैवयोगें करून आह्मीं हा बंडवाला मारिला.

यानंतर निजामउलमुलुख हैदराबादेस गेला तेथें ख्वाजाआहद नामें एक मबारीजखानाचा पुत्र होता त्याशीं सल्ला करून, गोंवळकोंडा व सर्व इतर किल्ले हस्तगत केले. हें वर्तमान ऐकून दिल्लीचा बादशाहानें निजामउलमुलुखाचे दोहो जागचे अधिकार मागें घेतले; एक गुजराथचा व एक माळव्याचा. त्या दोन जागीं दोघे नवे अधिकारी पाठविले. गुजराथेस सरबुलंदखान, व माळव्यांत राजा गिरधर, ते जाऊन त्या स्थानीं पोहोचले. त्यांत राजा गिरधर यास माळवा घ्यावयाचें अवघड नपडलें, कां किं, तेथें फौज नव्हती; परंतु गुजराथेंत निजामउलमुलुखाचा पुतण्या आमेदखान होता. त्याला तें स्थान युद्धावांचून देववेना; आणि आपलें बळ कमी, यास्तव तो ती राजधानी अमदाबाद टाकून दोहदास गेला. तेथें कांताजी कदम बांडे नामें, एक शाहूचा सरदार होता, त्यास गुजराथचे चवथाई

ची

ची आज्ञा दाखवून आपल्या कुमकेस घेतला; आणि माघारा उलटून अमदाबादेजवळ येऊन सरबुलंदखानाचे लश्करा बरोबर लढून त्याचा पराभव केला, व सजायतखान नामें अमदाबादेंत सरबुलंदखानानें आपला हस्तक ठेविला होता तो मारून टाकिला. त्यानंतर त्या सजायतखानाचा भाऊ सुरतेमध्यें फोजदारी करीत होता, त्याणें पिलाजी गाइकवाड तेसमयीं सुरतेजवळ होता त्याशीं सख्य करून निश्चय केला किं, आपण उभयतां मिळून आमेदखानास मारूं. त्या वेळेसच पिलाजी गाइकवाड यास निजामउल्मुलुखाचें सांगणें आलें, किं माझा पुतण्या आमेदखान याचें साहाय्य करावें. गाइकवाडानें तें ऐकून घेऊन मनांत विचार ठरविला किं, आपण जो सबळ पक्ष पाहूं तिकडे मिळूं. मग सुरतवाल्याबरोबर निघोन मायीनदीचे पलिकडे आरासगाचीं पोहोंचला. तेथें आमेदखानाचा लश्कराची व त्याची गांठ पडली; तेसमयीं सुरतवाल्याजवळ तोफा फार होत्या त्यामुळें आमेदखानाचा पराभव होऊं लागला, तेसमयीं पिलाजीनें त्यास सांगितलें कीं, तुह्मी त्याचे पाठीस लागा मी तोफा संभाळितों. मग ते त्याचे पाठीस लागले तेव्हां याणें तोफांचे गाडे उलटे फिरवून आमेदखानाचा पक्ष धरिला. तेव्हां त्या सुरतवाल्यावर दोन्ही लश्करें पडलीं, तरी त्याणें मोठें शौर्य केलें, परंतु त्याचे लोक फार मेले गेले, आणि थोडकेसे राहिले त्यां सह वर्तमान पळावयास अवसर सापडेना, असें पाहून, तो आपणास तोडून घेऊन मेला.

त्यापुढें सन सत्राशें पंचविसांत कांताजी व पिलाजी दोघे मिळून, गुजराथची चवथाइ घेऊं लागले, परंतु त्या दोघांत मुख्यत्वें कोणी वागावें या विषयीं निरंतर कलह असे. शेवटीं खंबायतचे जवळ दोघे लढले त्या युद्धांत पिलाजी पराभव पावला. तेसमयीं आमेदखानानें विचार केला किं, एखादे वेळेस या दोघांतून कोणी तरी माझा पक्ष सोडील यास्तव त्याणें असा ठराव केला किं, मायीनदीचे आग्नायी दिशेचा विभागाची चवथायी पिलाजीनें घ्यावी व वायव्येचा विभागाची कांताजीनें घ्यावी. या प्रमाणें नेम जाल्यावर पिलाजी सुरतेकडे निघाला. आणि कांताजी खानदेशामध्यें आपले जहागिरीचे जागीं गेला.

असें आमेदखानाचें प्राबल्य पाहून दिल्लीचा बादशाहानें तें बंड मोडावयास सरबुलंदखानाबरोबर लश्कर देऊन पाठविला. तो मोठा समर्थ होता, आणि आमेदखानानें आपल्या कुमकेस मराठे सरदार बोलाविले, ते येऊन पोहोंचले नव्हते, असून आमेदखान अमदाबादेंत थोडकीशी

फौज

फौज ठेवून, आपण तें ठिकाण सोडून मागें हटला. तो कांहीसा दूर गेल्यावर त्याला वर्तमान कळलें किं मराठे माथी नदी उतरून आलिकडे आले; मग ते व आपण मिळून पुनः माघारा उलटून अमदाबादेवर आला, तो शहराजवळ शाहाबागेंत आऊन उतरला. त्याच दिवशीं सरबुलंदखानाचा लष्करची बिनी आदालजच गांवीं येऊन पोंहोंचली. मग ते आमेदखान जवळ आहेसा समजून, आपल्या भोंवता चर खणूं लागले. त्यावरून मराठे सरदार समजले किं, ते आमचा भयानें हें काम करितात. नंतर आमेदखानानें मराठेसरदारांसहित एकाएकी हल्ला करून त्या बिनीवाल्यांचा पराभव केला; परंतु याचे लोक व मराठे बहुत मेले त्यावरून मराठे हल्ला करावयास त्याला पुनः अनुकूळ होइनातसे झाले. मग आमेदखान पेंढारी लोकांप्रमाणें वागूं लागला; त्याबरोबर कांताजी दपिलाजींहि पर्जन्यकाळपर्यंत लुटित होते मग पांढर्‍या कावळ्यांकडे गेले.

याप्रमाणें गुजराथचें वर्तमान असतां, व मोंगल लोकांत कलह असतानां, बाजिरायानें दोनवेळा माळव्यांत स्वार्‍या घातल्या. तेथें राजा गिरधर होता त्याणें कांहीं अडचण केली ती नमानितां, दोन्ही वेळा लुटून बहुत द्रव्य नेलें.

---

सन सत्राशें सत्ताविसांपासून, सत्राशें चौतीसपर्यंत झालेलीं
वर्तमानें मिळून भाग चौदावा.

## अनुक्रमणिका.

निजामउलमुलुखानें, आपलें बळ वाढवायाकरितां, मराठी सरदार लोकांत कलह उत्पन्न व्हावा म्हणून काय काय उद्योग केला तें प्रकरण.

त्याणें प्रतिनिधीचा योगें शाहूशीं तह करून; हैदराबादचे चौथाईची सोडचिठ्ठी घेतली.

तो तह पेशव्याचे मनास आला नाहीं.

निजामउलमुलुखानें शाहू आणि संभाजी या उभयतां बंधूंत वैमनस्य पाडावयाचा यत्न केला तो पेशव्यानीं व्यर्थ पाडिला.

त्यावरून पेशवे व निजामउलमुलुख यांचें युद्ध झालें.

नंतर निजामउलमुलुख याचा बाजिराव पेशवे यांचा शहाणपणापु-

हें उपाय चालेना ह्मणून तहाचें बोलणें करूं लागला.

बाजिराव गुजराथची चौथ व सरदेशमुखीची सनद पावला.

कोल्हापुरच्या राजा संभाजी व प्रतिनिधी हे उभयतां युद्ध करून संभाजी पराभव पावला.

पेशवे बाजिराव व सेनापती दाभाडे या दोघांचें युद्ध झालें त्यांत बाजिरायाचा जय होऊन दाभाडा मृत्यु पावला.

निजामउलमुलुखाची वर्तणूक.

गुजराथ मुलखांत पिलाजी गाइकवाड, व ओलपुरच्या राजा आभीशिंग, यांचा युद्ध प्रसंग घडला.

त्यापुढें आभिशिंगानें पिलाजीशीं तह करावयाचे निमित्तें करून, मारेकरी पाठवून त्यास मारिला.

बुदलखंड मुलखीं राजा चतुरसाल्ल याणें पेशव्यास कुमकेस घेऊन मोंगलास बुदलखंडांतून पार केला, यास्तव त्याणें बाजिरावाला कांहीं मुलुख बक्षीस दिला.

राजा जयशिंग यास माळव्याचें आधिपत्य प्राप्त झालें, तें त्याणें बाजिरावास दिलें.

## भाग चौदावा.

निजामउलमुलुखास दिल्लीचा बादशाहाचें भय तादृश नव्हतें; परंतु मराठे लोक प्रबळ होऊन, मुलखांतून मनस्वी वसूल घेऊं लागले, त्यामुळें त्याचा मनांत भीति उत्पन्न झाली; तिचा निवारणार्थ अंतःकरणांत विचार करूं लागला कीं, कोणे प्रकारें मराठे लोकांत वैमनस्यें पडतील, आणि आपल्या राज्याचा बंदोबस्त चांगला होईल; अशी योजना करित असतां प्रथमतः त्याचा कल्पनेस आलें कि हैदराबाद आपली राजधानी एथची चौथाची मराठे घेतात, तीचा बद्दल दुसरें कांहीं द्यावयास कबूल करून त्यांचें एथें चौथाची संबंधें येणें जाणें आहे तें बंद करावें. मग त्याणें प्रतिनिधीचा द्वारें, शाहूशीं बोलणें करून असें ठरविलें कीं, शाहूनें हैदराबाद संबंधें चौथ व सरदेशमुखी बद्दल कांहीं द्रव्य व इंदापुराजवळ कांहीं मुलुख जहागीर करून घ्यावा. याशिवाय त्याणें प्रतिनिधीलाही वऱ्हाड मुलखीं कांहीं जहागीर करून दिली. हें वर्तमान ऐकून बाजिरायास मोठा राग आला त्याचा मनांत होतें कि, निजामउलमुलुखाचा राज्यांत आपला प्रवेश आहे, तो नाहींसा नव्हावा. तद्विपरीत प्रतिनिधीनें केलें. त्यामुळें त्याचें व प्रतिनिधी-

चें

चें वैमनस्य पडलें; तें वर्तमान निजामउलमुलुखाला कळतांच, त्याणें मनांत विचार केला किं, आपणास यासमयीं चंद्रसेन जाधव, व रावरंभा निंबाळकर, व दाभाडे, व पिलाजी गाइकवाड, हे सरदार अनुकूळ आहेत, व कोलापुरचा मुख्य संभाजी तोही वश आहे; त्यास शाहू व संभाजी यांमध्यें पुनःकलह उत्पन्न करावयास हाउत्तम समय प्राप्त झाला. यास्तव त्याणें संभाजीला निमें वसूल मागावयास शिकवून, तो कज्जा मोडावयाचा मिषेंकरून तिऱ्हाइतपणें आपण मध्यें शिरून; उभयतांस सांगीतलें कीं मला तुह्मी दोघे सारिखे. त्यास वसूल तुर्त मजकडे जप्त असूं द्या; मग मी तुमचा न्याय करीन. या प्रमाणें बोलून, त्याणें शाहूकडचे मोकासेदार व सरदेशमुखी जमा करणारे दूर केले.

असें निजामउलमुलुखाचें कृत्रिम बाजिरायापुढें चालेना; त्याणें शाहूला समजाविलें कीं हा पक्का वंचक आहे; न्यायकरणारा नव्हे. तुमचा कलहांत आपला लाभ समजून आपणच हें काम उत्पन्न करून, युक्तीनें आंत शिरला आणि तुमचा मुलुख हाताखालीं घातला. त्यावरून शाहूस बहुत राग येऊन त्याचा मनांत आलें किं निजामाशीं युद्ध करावयास आपण आंगें जावें यास्तव बाजिरायास बोलिला किं, मी करितों या कामास अंतःकरणपूर्वक तुमचें अनुमोदन असावें. त्यावर त्याणेंउत्तर केलें किं, आपण हिंदूंचे राजे, त्यास आपल्या सारिख्यानीं प्रसंगपडल्यास, बादशाहाशीं लढावें; या कामाविषयीं आज्ञा केल्यास मी सर्व बंदोबस्त करीन. तेव्हां शाहूनें त्यायुद्धाविषयीं त्यास मुख्यत्व दिलें. या प्रकरणावरून असें दिसतें किं, बाजिरायाची मसलत हीच, कीं निमित्तमात्र राजा असून राज्यसुख आपणास असावें. हातर ब्राह्मणजातीच्या स्वभावच आहे किं, आपणास चाकर ह्मणवून, मुख्यत्वें वर्तावें.

यानंतर तिकडे निजामउलमुलुख्याची तयारी होत असतां बाजिराव त्याचा अगोधर तयार झाला; मग निजामाचा लश्कराची गांठ पडल्यावर बाजिरायानें त्याशीं थोडकीशी लढाई करून पळाला; आणि असें दाखविलें कीं वऱ्हाणपूर लुटावयास जातो; तो खानदेशांत शिरल्यानंतर आपले पाठिमागें निजामउलमुलुख जवळच आहेसा समजून, कांहींसे लोक वऱ्हाणपुरचा वाटेकडे त्याला ठकवावयास पाठविले. आणि आपण अतित्वरेनें मोठ्या सैन्यासहित गुजराथेंत शिरून, तो मुलुख अगदीं लुटला. आणि तेथच्या अधिकारी सरबुलंदखान यास समजाविलें कीं, आह्मीं निजामउलमुलुखाचे मसलतीनेंच हें काम करितों.

हिकडे वऱ्हाणपुरचा वाटेवर, निजामउलमुलुख याचे दिवस किमपि यत्नसिद्धि नहोतां व्यर्थ गेले. मग तो समजला किं, आपणास मराठ्यांनीं ठकविलें, नंतर माघारा फिरून निश्चय केला किं, आतां दक्षिणेंत जाऊन पुणें जाळून टाकावें; तो आमेदनगरास येऊन पोंहचला नाहीं तों त्यास वर्तमान कळलें किं, बाजिराव लश्कर सहित कासारबारीचा घाटानें येऊन मुलुख उद्ध्वस्त केला. तेव्हां निजामउलमुलुख माघारा फिरून गोदावरी उतरून पलिकडे गेला; तेथें बाजिरायानें त्याशीं हलकी हलकी लढाई करून, त्यास आपल्या आंगावर घेऊन, अशा जागीं नेला किं जा स्थळीं अगदीं पाणी नाहीं त्या ठिकाणावर त्याचा लश्करास घेरा घालून, त्याचे लोक जे धान्य, तृणादि सामग्री, आणावयास जाणारे त्यांस उपद्रव करूं लागला. मग निजामउलमुलुखाला तह करणें प्राप्त जालें. तो प्रकार असा, बाजिराव त्यास म्हणूं लागला किं, कोलापुरकर संभाजी आमचे हातीं द्यावा; व आमचे मराठे वसूल जमा करणारे त्यांस कोणतीहि अडचण नपडावी याकरितां त्या मुलखांतील किल्ले आमचे स्वाधीन असावे. नंतर निजामानें संभाजी खेरीज करून वरकड कबूल केलें. तेसमयीं बाजिरायानें त्यास सांगितलें कीं संभाजी आमचा स्वाधीन असल्यास कांहीं चिंता नाहीं. कां किं, तो आमचा धण्याचा भाउ; त्यास तो आह्माजवळ धण्याचा मानानेंच असेल. तेव्हां निजामानें कबूल केलें किं, आह्मीं त्यास पन्हाळ्यावर पोंहचवून देऊं. नंतर शाहू व संभाजी उभयतां एकचित्त होऊन, कलह मिटावा. हें वर्तमान सन सत्राशें अठ्ठाविसांत घडलें. त्यापुढें बाजिराव व निजामउलमुलुख एकमेकांस भेटले, तें त्या उभयतांचें परस्परें प्रथम दर्शन.

गुजराथेचा सरबुलंदखान याणें दिल्लीचा बादशाहास बहुत प्रकारें विनंती करून बोलणें लाविलें कीं, माझा मुलखाची हेराणगत जाली, यामुळें वसूल जमा होत नाहीं, त्यास स्वामींनीं द्रव्य देऊन यासमयीं माझें रक्षण करावें. परंतु बादशाहानें त्या मागण्याचें कांहीं उत्तर दिलें नाहीं, आणि बाजिरायाचा भाउ चिमणाजी आपा याणें लश्कर सहित पिटलादेस येऊन त्या शहराची खंडणी घेतली, व ढोलका परगणा लुटला. व आपल्या भावाचें सांगणें आणविलें किं, आह्मास गुजराथेची चौथ व सरदेशमुखी घाल तर माझा भाऊ तुमचा मुलखाचें संरक्षण करील, त्यावरून सरबुलंदखानास तें कबूल करणें प्राप्त जालें. मग त्याणें सुरत खेरीज करून सर्व मुलखीं वसूल व जखातवसूल, याची चौथ व सरदेशमुखी दिली,

दिली, आणि अमदाबाद शहर संबंधें कांहीं दिलें व कांहीं न दिलें. असें सन सत्राशें एकुणतिसांत झालें. तेसमयीं चौथीचा नेम गेनजमेचा ठरावा प्रमाणें नक्कता; जे वर्षी जें उत्पन्न होई त्याची चौथायी देत असत. या बदल बाजिरायानें अडीच हजार स्वार ठेवून मुलखाचा बंदोबस्त राखावा असें कबूल केलें.

मग बाजिराव चिमणाजीचा पुष्टीकरणार्थ उत्तरेकडे गेला; तेसमयीं कोल्हापुरकर संभाजीला बाहेर निघावयास संधि सांपडली. तो बरोबर लश्कर घेऊन आपल्या परिवारासहित वारणानदीचा उत्तरकांठीं उतरला, आणि मुलुख लुटूं लागला. तेसमयीं शाहूजवळ प्रतिनिधी पूर्वी निजामउलमुलुखाशीं मसलत केल्यामुळें आपल्या किमतींतून उतरलेला होता, त्यास असें वाटलें कि, हे समयीं संभाजीचा पराभव केला तर आपली योग्यता कमी झालेली पुनः वाढेल. यास्तव तो जाऊन संभाजीचा छावणीवर पडला. आणि संभाजी व उदाजी यांस पन्हाळ्याकडे पिटून लाविलें; व त्यांचीं कुटुंबाचीं माणसें धरून आणिलीं, त्यांत ताराबाई व तिची सून राजसबाई सांपडल्या त्या सातार्यावर नेऊन ठेविल्या. नंतर शाहू व संभाजी यांचा तह झाला त्यांत त्याणें कित्येक मुलुख शाहूला दिला, शाहूनेंही त्यास दिला; तो प्रकार असा तुंगभद्रेजवळचें कोपाळ शहर शाहूनें संभाजीस दिलें, त्याबदल आपणास कोंकणचा रत्नागिरी किल्ला घेतला; मग साळशीपासून आंकोलेपर्यंत कोंकण पट्टी कोल्हापुराकडे लावून दिली; संभाजीनें मिरज व तासगाव व आथणी व इतरही कृष्णेचे उत्तरेकडचे गांव व विजापुराचा खालचा कित्येक गढ्या शाहूस दिल्या. हें वर्तमान सन सत्राशें तिसांत घडलें.

नंतर सन सत्राशें एकतिसांत असें झालें कि, निजामउलमुलुख पूर्वी बाजिरायास भेटला असतांही, त्याला याणें नाश केल्याचें स्मरण होतें; यास्तव तो आपलें आंग न दाखवितां, दुसर्याकडून तो सूड उगवावयाविषयीं विचार करायास लागला असतां, त्यास खंडेराव दाभाडा त्या कामाचे उपयोगीसा वाटला. त्याचें व बाजिरायाचें पहिलेंच वांकडें पडलें होतें, बाजिराव चौथायी, व सरदेशमुखीची सनद पावला त्या दिवसापासून दाभाडा फौज ठेवायास लागला होता, त्याणें सेना पसतीस हजार जमविली. आणि निजामउलमुलुखाचा आनुकूल्येंकरून पुढें कुमक मिळेल असें समजून, तो दक्षिणेकडे निघावयास सिद्ध झाला. त्याणें लोकांत विदित केलें कि आमचा धणी मराठा याचें राज्य बाजिरायानें घेतलें. तें स्वामीचें स्वामीस देववावयास जातों; याविषयीं पिलाजी गाइकवाड व कांताजी व र-

पुजी कदम बांडे, व उदाजी, व आनंदराव पंवार+ व चिमणाजी‡ पंडित वगैरे कित्येक लोक मला सहाय आहेत.

या प्रमाणें सेनापती दाभाडे यांकडील वर्तमान असतां, बाजिरायानें लोकांस विदित केलें किं, सेनापती निजामउलमुलुखास मिळून मराठ्यांचा राज्याचे दोन विभाग करूं इछितो; हें कर्म केवळ हिंदु धर्मास विरुध्द आहे; त्यास यासमयीं माझेजवळ फौज आहे ती त्याचे निमेही होईलशी नाहीं तथापि त्याचे पारिपत्यास मी विलंब न करितां जाईन. इतकें करून बाजिराव पुण्याहून निघाला तो नर्मदा उतरोन पलिकडे गेला, तेव्हां त्याची बिनी पुढें चालून होती तीवर पिलाजीचा पुत्र दमाजी गाइकवाड याणें हल्ला करून त्या बिनीवाल्याचा पराभव केला. तो त्यास प्रथम अपशकून जाला तथापि, तो न मानून त्याणें नेम केला किं, इतःपर समूर लढावयाचें; तेव्हां दाभाडे यांचे नवे नवे ठेविलेले लोक उभे राहिनांत, त्यांबरोबर कांताजी पळाला; तेव्हां खंडेरावाचे पुरातन चाकर होते ते त्याचा पुत्राचा संरक्षणार्थ युद्ध करीत राहिले. तो त्रिंबकराव दाभाडा हत्तीवर बसला होता त्याणें आपले लोक पळतात असें पाहून आपल्या हत्तीचे पाय सांखळ्यानीं बांधिले आणि धैर्यैकरून त्याच जागीं युद्धास उभा राहिला. तेव्हां बाजिराव हिकडे घोडयावर बसला होता त्याणें आपल्या सामर्थ्याप्रमाणें बहुत यत्न केला, परंतु जय कोणाचा होईल हें फारवेळ समजेना; शेवटीं त्रिंबकराव धनुष्याची दोरी ओढित असतां, त्याला दैवयोगेंकरून गोळी लागून मेला. तेव्हां त्याचे लोक पळाले, आणि बाजिराव याचा जय सांग जाला. ती लढाई बडोदें व दुभाय या दोंहीमध्यें जाली; त्यांत दाभाडे यांचा पक्षाचे जे पडले त्यांत एक जाउजी दाभाडा, दुसरा मलोजी पवार तिसरा पिलाजी गाइकवाडाचा पुत्र, व खंडेराव* दाभाडाही पडला आणि उदाजी पवार व चिमणाजी पंडित, हे दोघे कैदेंत सांपडले; आनंदराव पवार व पिलाजी गाइकवाड वगैरे जखमी जाले परंतु धरले नगेले ते वेळेस बडोदें व दुभाय हीं दोन्हीं पिलाजीचे स्वाधीन होतीं, तीं आपणास असावीं असें

---

+ त्यापूर्वी पिलाजी व पवार यांचीं युद्धें होतीं परंतु ते या कामाकरितां त्यासमयीं एकचित्त जाले.

---

‡ चिमणाजी पंडित तो मोठा उत्पाती असे त्याणें गुजराथेंत लुटालूट बहुत केली त्यास चिमणाजी दामोदरही म्हणत.

---

* खंडेराव दाभाडा सेनापती मेल्यावर त्याचा पुत्र यशवंतराव तो लहान म्हणून तो अधिकार त्याचा आईनें संभाळिला.

बाजिरावाचा चित्तांत आलें परंतु कांहीं तह होऊन तो पर्जन्यकाळ गेल्यावर माघारा सातार्यास आला. निजामउलमुलुखानें बाजिरायाचा नाशाविषयीं असें कृत्रिम केलें, तें सिद्धीस नजाऊन उलटी त्यासच नाशशंका प्राप्त झाली. ती अशी त्याचा कपटावरून बाजिरायाचा मनांत आलें कि, निजामाचें पारिपत्य करावें, परंतु तो मोठा सामोपायचतुर त्याणें कांहीं युक्ती करून बाजिरायाचें चित्त मोंगल जिंकावयास गुंतवून आपल्येवरचा तो राग दूर केला, मग त्याउभयतांचा तह जाला त्यांत असें ठरलें किं, निजामउलमुलुखानें आपल्यामुलखीं निश्चिंतपणें रहावें; व बाजिरावयाणें दक्षिणेंत मुख्य पेशवा होऊन वागावें.

दिल्लीमध्यें बादशाह याणें ऐकिलें किं, सरबुलंदखानानें गुजराथची चवथाई व सरदेशमुखी मराठ्यांस दिली. तेणेंकरून तो बहुत क्रुद्ध होऊन, त्याणें जोतपुरचा राजा आभीशिंग याज बरोबर लश्कर देऊन गुजराथेंत पाठविला, आणि सरबुलंदखानाला माघारा बोलाविला, तो दिल्लीस पोंचल्यावर त्याचा अपमान केला.

माळवे मुलखीं राजा गिरधर होता, तो उदाजी पवार, व चिमणाजी पंडित यांशीं युद्ध करून मृत्यु पावला होता; परंतु त्याचा कोणी आप्त दया बाहादूर नामें असे तो मराठ्यांशी लढून बहुत वेळा त्याणें मागें हटविले. शेवटीं सन सत्राशें बत्तिसांत बाजिरायाचा भाउ चिमणाजी आपा, व पिलाजी गाइकवाड, व मल्हारराव होळकर, यां बरोबर लढाईकरून मृत्यु पावला. यानंतर बाजिराव नर्मदा उतरला, आणि माळव्याचें लश्कर आपल्ये स्वाधीन करून घेतलें; मग आपला भाउ, व पिलाजी जाधव, यांस आपल्याहितार्थ सातार्यास पाठविलें. त्यांसच कोंकणाचा बंदोबस्त राखावयास सांगीतला.

गुजराथेंत पेशवा गेल्यानंतर आभीशिंग राजाचा फोजदारानें बडोदें किल्ला पूर्वीं मोंगलानीं गाइकवाडापासून घेतलेला होता, तो घेतला. तथापि तेथचे प्रजेस त्यापेक्षां पिलाजीचें अगत्य असे. त्याणें कित्येक जागीं आपलीं ठाणीं बसविलीं होतीं याकरितां त्याशीं तह करावयाचा निमित्तेंकरून त्याणें कित्येक माणसें पाठविलीं. त्याहीं कित्येकवेळा त्याशीं बोलणें करून कोणे एके दिवशीं त्याशीं त्याचें बोलणें होऊन त्याचा निरोप झाल्यावर बाहेर निघोन कांहीं वस्तु आंत राहिल्याचें मिष करून, त्यांतील कोणी एक वाड्यांत जाऊन तो कांहीं गोष्ट पिलाजीचे कानांत सांगावयाचा आकार दाखवून, त्याजवळ गेला आ

णि

णि अकस्मात् खंजीर काढून त्याचा काळजांत खुपसला; तेणें तो मृत्यु पावला. त्या वेळेस तो मारेकरीही तेथें कोणी पिलाजीचा होता त्याणें मारिला, तेव्हां ते वर्कड लोक पळाले. हें कृत्य तारसरा परगण्यांतील डाकुर गावीं झालें.

आभीशिंगानें पिलाजीचा मरणें करून आपणास जो लाभ चिंतिला होता, तो त्यास प्राप्त न जाला; कांकि पिलाजीचा मित्र पाद्रागांवचा देसाई दिला नामें होता. त्याणें त्या सर्व मुलखांत भिल्ल व कोळी उठविले; मग चांगला समय पाहून, देसायानें पिलाजीचा भाऊ महादाजि गाइकवाड, यास निरोप पाठविला किं बडोदें घ्यावयास हा वेळ उत्तम आहे. त्यावरून तो आला आणि बडोदें घेतलें. त्या पासून त्याचे वंश अद्यापि बडोद्यांत आहेत. त्यावेळेस पिलाजीचा वडील पुत्र होता, तो, सोनगडाहून मोठें लष्कर घेऊन आला आणि बडोद्याचा पूर्वेस जोतपुर पर्यंत स्वाऱ्या घातल्या. तेव्हां आभीशिंगानें अमदाबादेंत आपला कोणी विश्वासू ठेवून आपण आपल्या जोतपुर मुलखीं जाऊं लागला.

माळव्याचा सुभेदार दयाबहादुर मेल्यानंतर त्याचे जागीं दिल्लीचा बादशाहानें महंमदखान बंगश नामें एक नवा सुभेदार पाठविला, तो बुंदलखंडीं जाऊन राजा चतुरसाल याचा मुलखात उपद्रव करूं लागला. तेव्हां त्या चतुरसालानें बाजिरावाकडे कुमक मागीतली; ते समयीं पेशवा त्याचे साहाय्यास जाऊन बंगषाला त्याचा मुलखांतून पार केला. त्यावरून तो राजा प्रसन्न होऊन, त्याणें बाजिरावयास आपला पुत्र मानिला. आणि त्यास एक किल्ला व झांशीजवळ कांहीं प्रांत असा दिला किं ज्याचें उत्पन्न वर्षास सवादोन लक्ष रुपये होत. पुढें काहीं अवकाशानें तो राजा मेला, ते समयीं त्याचे पुत्र दोघे होते, त्यांचे प्रमाणेंच बाजिरावाला त्याणें आपल्या राज्याचा तिसरा वांटा दिला.

माळव्यामध्यें महंमदखान बंगश मेल्यावर तो अधिकार व आग्रें या दोहों अधिकारांवर बादशाहानें राजा जयशिंग सन सत्राशें चवतिसांत पाठविला; त्याचा व बाजिरावाचा पूर्वीं पासून स्नेह होता; ह्मणून ती जागा त्यास मिळाल्यानें मराठे हर्ष पावले; परंतु तो बादशाहाचा हस्तक ह्मणून मराठ्यांचें बोलणें सारें स्वीकारीना. नंतर त्याचा पुढचे वर्षीं बाजिरायाचें व त्याचें कांहीं बोलणें होऊन, त्याणें माळव्याचें राज्य बाजिरायास दिलें, आणि बादशाहास समजाऊन तोही वश केला.

सन सत्रारों चवतिसां पासून, सत्राशें चाळीस पर्यंत, झालेलीं वर्तमानें मिळून, भाग पंधरावा.

## अनुक्रमणिका.

मराठी लोकांची वर्तणूक.

रघुजी भोंसल्यास सेनासाहेब सुभा पदवी, प्राप्त झाली.

वाडीचे सावंत, व आंग्र्या, व शिद्दी, यांचें वर्तमान.

बाजिराव पेशवा माळव्या मुलखांतून; माघारा आला तें वृत्त.

मल्हारजी होळकर याणें मुलखांत स्वाऱ्या घातल्या तें प्रकरण.

दिल्लीचा बादशाहानें, निजामउल्मुलुख आपणास वश व्हावा म्हणून उद्योग केला तो विस्तार.

बाजिरावास खर्चाची अडचण पडली; यास्तव त्याणें बादशाहापाशीं तह करून माळव्या मुलखीं कांहीं अधिकार पावला.

त्याशिवाय त्यास दक्षिणेंतही सरदेशपांडेपणा मिळाला.

मोंगल व बाजिराव, या दोहीं पक्षीं युद्धाची सिद्धता झाली, तेव्हां निजामउल्मुलुखानें मोंगलांचा पक्ष स्वीकारिला.

बाजिरावानें पराक्रमें करून दिल्लीचा दरवाजापर्यंत प्रवेश केला तो प्रकार.

आंग्र्याची हकिगत.

बाजिरावानें निजामउल्मुलुखाचा लष्करास भोपाळाजवळ घेरा घालून असा उपद्रव केला कीं, त्यास याशीं तह करावा लागला.

पोर्तुगीस लोक, व इंग्रेज लोक, यांची वर्तणुक.

पेशवे, व रघुजी भोंसले यांचें युद्ध जालें तें.

दिल्लीमध्यें व्हारशी मुलखाचा नादरशाह नामा बादशाह, आला; त्यामुळें मोंगल लोक संकट पावले तें प्रकरण.

मग थोडकेच दिवसांनीं त्याणें दिल्लीचें तक्त मोंगलांस माघारें देऊन; आपण आपले मुलखीं गेला.

मराठ्यांनीं वसई किल्यास घेरा घातला ती कथा.

पेशव्यांनीं दक्षिण घेतल्याचे पूर्वी माळवा व बुंदेलखंड या दोहों मुलखीं काय काय बंदोबस्त केला तो प्रकार.

पेशवा हिंदुस्थानांत संचार करूं लागला.

मराठ्यांनीं

मराठ्यानी संभाजी आंग्र्यावर कांहीं मसलत केली होती ती, बाजिरायाचा मरणामुळें सिद्धीस न गेली.

हिंदुस्थान व दक्षिण देश आदिकरून सर्व मुलखांचा राज्यांचीं वर्तमानें.

बाजिरायाचा स्वभावाचें स्वरूप कथन, व त्याचे पुत्र बाळाजी बाजिराव, व रघुनाथराव, व जनार्दनबावा समशेर बहादुर यांची गोष्ट.

## भाग पंधरावा.

एथपर्यंत मराठे लोक याणीं गुजराथेंत कोण कोणत्या प्रकारें प्रवेश केला; तें व माळव्यांत आपल्या आधिपत्याचा पाया घातला तें सांगीतलें. आतां वराड व कोंकण यामध्यें त्याणीं कसकसा संचार केला तो प्रकार समजला पाहिजे, नंतर माळव्यांत उत्तरे कडे जीं मराठ्यानीं मोठीं मोठीं कार्यें केलीं तीं लिहिलीं जातील.

पेशवा शाहूचा जवळ नसतां, सेनासाहेब सुभा कान्होजी भोंसला याणें त्याची कांहीं आज्ञा मानिली नाहीं यास्तव शाहूनें त्यास सातार्यामध्यें कैद केला; आणि त्याच्या भाउबंद रघुजी भोंसला यास ती पदवी दिली. त्या रघुजीनें पूर्वीं गोंडवणांत कोणि एका मुसलमानाजवळ कांहीं दिवस थोडक्या लोकानशीं चाकरी केली होती; तो अधिकार लहान म्हणून तो पुरुष प्रसिद्धीस आला नाहीं; परंतु त्यास कांहीं काम संपविलें असतां, तो तें काम चांगलें करित असे; आणि तो शिकारीचा कामाविषयीं मोठा धीट असे; यास्तव शाहू त्याला आपल्याबरोबर शिकारीस नेई. मग त्यावर त्याची फार प्रीति बसली; नंतर त्याणें आपल्या बायकोची बहीण शिर्क्यांची कन्या त्यास देवविली; आणि वराडची सुभेदारी सांगीतली. त्याबदल त्याकडून कबूल करविलें किं, नेहेमीं पांच हजार स्वारानशीं चाकरी करावी; व वर्षास नऊ लक्ष रुपये सर्कार पोत्यास पोहोंचवावे. शिवाय कधीं पेशवा मोहिमेस निघेल, तेसमयीं त्याबरोबर दहाहजार स्वारासहित जावें; याप्रमाणें त्याणें कबूल केलें. त्यावेळेस त्याचा परम मित्र श्रीपतराव प्रतिनिधि, तो राजानें कोंकणांत पाठविला होता, तो जर त्यासमयीं जवळ असता तर आपल्या स्नेहास्तव रघुजीला इतकें कबूल करूं न देता.

कान्होजी आंग्र्याचे दोघे पुत्र कोंकणांत असत, त्यांत वडिल सखाजी तो कुलाब्यांत होता; धाकटा संभाजी तो सुवर्णदुर्गीं रहात असे. का-

न्होजी

न्होजी आंग्र्या जीवंत असतां मुंबैचा इंग्रेजांनीं त्यास जिंकावयाचा मोठा उद्योग केला; परंतु सिद्धीस गेला नाहीं. मग कान्होजी+ मेल्यानंतर त्याचा थोरला पुत्र सखोजी तोही मेला. त्यामागें धाकटा संभाजी याणें आपले सावत्र भाऊ तिघे होते, त्यांतला वडील आपल्यापाशीं ठेविला आणि त्यापेक्षां धाकटे दोघे येसाजी व मानाजी ते कुलाब्यास पाठविले; त्यांत येसाजीला मुलखाचा बंदोबस्त सांगितला, आणि मानाजीस किल्याचा व फौजेचा बंदोबस्तास नेमिला. मग त्याउभयतांमध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन, मानाजीनें कपटेंकरून पोर्तुगीस लोकांस किल्यांत आणून येसाजीचे डोळे काढवून बंदीत ठेविला. नंतर संभाजी मानाजीचा पारिपत्यास गेला, तेव्हां त्याणें पेशव्याचा आश्रय केला, यास्तव संभाजीला माघारें जावें लागलें. पेशव्यानें मानाजीची कुमक केली, त्याबद्दल त्याणें त्यास, कुतला व राजमाची हे दोन किल्ले दिले.

त्यावेळेस जंजिर्यामध्यें, शिद्दीचा अंमल बसला होता; त्याशिद्दीस मोंगलांनीं शिद्दी याकूट असें नवें नाव दिलें होतें, त्याशीं व मराठ्यांशीं निरंतर युद्धप्रसंग होई, परंतु त्या याकुटानें कधींहि औरंगजेबानें दिलेला आपला मुलुख मराठ्यांचा हातीं लागूं दिला नाहीं. आणि तो कधीं कधीं शाहूचा मुलखांतून स्वार्या घालून खंडणी घेत असे; त्याला जिंकावयाविषयीं शाहू व त्याचे दरबारी लोक फार इछित होते; परंतु त्यापुढें कांहीं बळ चालेना तेव्हां कांहीं कपटेंकरून जिंकावा अशी प्रतिनिधीनें मसलत केली, तो प्रकार असा, त्या शिद्दीजवळ त्याचा परम विश्वासू याकुबखान नामें मुसलमान असे, तो समुद्रांत चांचेपणा करून मोठा विख्यात जाला होता; त्याचे वडील व तो गुहागरचे पाटील; ते जातीचे कोळी, याचे लहानपणी याला मुसलमानांनीं स्वारी घालून धरून नेला, आणि आपला धर्म शिकविला. त्यास प्रतिनिधीनें वश केला मग सांगितलें किं, शिद्दीचें आधिपत्य नाहींसें जालें असतां यांतले कांहीं किल्ले आह्मास देऊन बहुतेक राज्य तूंच संभाळावेंस. ही मसलत सिद्धीस न्यावयाकरितां प्रतिनिधीबरोबर लश्कर देऊन सनसत्राशें तेविसांमध्यें कोंकणांत पाठविला. तेव्हां शिद्दीचा मुलखांत गरीब गुरीब रयत लोकांस मात्र उपद्रव जाला परंतु किल्ला त्याचे हातीं लागला नाहीं. आणि त्या शिद्दीपुढें प्रतिनिधीचें बळ कांहींच चालेनासें जालें. तेव्हां तो तेथून चिपोळणास जाऊन उतरला; आणि गोवळकोट किल्यामध्यें

+ कान्होजी आंग्र्या सन सत्राशें अठ्ठाविसांत त्यानार्यामध्यें मृत्यु पावला.

आपले

आपले लोक ठेविले. तथेंही शिद्दीनें छापा घालून गोंवळकोट घेतला. अशी त्याणें प्रतिनिधीची दुर्दशा केली; हें वर्तमान समजून शाहूनें त्याचे कुमकेविषयीं चिमणाजी आपास आज्ञा केली परंतु तो ऐकेना, शेवटीं प्रतिनिधी रुष्ट होऊन माघारा सातार्यास आला.

त्याच सुमारें जंजिर्याचा शिद्दी मेला. त्याचे पुत्र पुष्कळ होते, त्यांत वडील शिद्दी आबदुलरवान नामें होता; त्याचे धाकटे भाउ सारे एक शिद्दी+ रहिमान खेरीज करून मिळाले; आणि त्यास जिवें मारून टाकिला; हें वर्तमान याकुबास कळल्यावर त्याणें शिद्दी रहिमानाचा पक्ष धरून शाहूलासन सत्राशें पस्तिसांत कुमक मागीतली, त्यास शाहू अनुकूळ जाला; त्या वेळेस बाजिराव माळव्याहून येत होता त्यास आज्ञा केली कीं दंडाराजपुरीं जावें; याशिवाय दुसरे जे रिकामे लश्करी लोक होते त्यांस सांगीतलें, कीं, तुम्हीं जाऊन बाजिरावास मिळावें. तो बाजिराव कोंकणांत गेल्यावर शिद्दी रहिमान व याकूब हे त्यास मिळाले. मग तळें व घोंसाळें हे दोन किल्ले घेतले. इतक्यामध्यें प्रतिनिधीही मागून येऊन पोंहोंचला; त्याणें येतांच रायगड घेतला कांकिं तेथचा किल्लेदारास याकुबानें अगोदरच किल्ला द्यावयास सांगितला होता.

त्यानंतर जांहीं आबदुल मारिला; त्यांतील एक भाऊ शिद्दी रह्यान नामें येऊन बाजिरावाशीं लढला, तो मेला गेला. नंतर पेशव्यानें जाऊन जंजिर्यास खुसकीवरून मोरचे लावून तोफांचा मार चालविला; ते समयीं मानाजी आंग्र्याही येऊन समुद्रांतून किल्यास तोफा मारूं लागला. असें असतांही बाजिरावानें सुमार पाहिला कीं, हा किल्ला लवकर सर्वथा, हातीं लागणार नाहीं आणि आपण फार दिवस कोंकणांत राहिलों असतां मोठ्या मोठ्या मोहिमेचीं कामें रहातील. यास्तव त्याणें तेथचे शिद्दी सल्ला करावयास सिद्ध जालेले पाहून सल्ला केला. तो प्रकार असा, तेथें शिद्दी रहिमानाचें मुख्यत्व असावें, व त्याणें अकरा महालांचें उत्पन्न अर्धें घ्यावें. व मराठ्यांस, रायगड व तळें व घोंसाळें व उचितगड व बिरवाडी, हे किल्ले असावे. बाजिराव तें युद्ध असें शेवटास नेऊन मोठा विख्यात होऊन सातार्यास गेला. तेथें शाहूनें त्या बाजिरावानें घेतलेल्या रायगड, इत्यादि ठिकाणांची सुभेदारी दिली.

माळव्याहून बाजिराव निघाल्यावर त्याचा सरदार मल्हारराव होळकर लष्करसहित तेथें होता तो आग्र्याचे पलिकडेही स्वार्या घालून लुटित

+ शिद्दी रहिमान त्यावेळेस जंजिर्यांत नव्हता.

गेला

गेला. तेसमयीं दिल्लीचा बादशाहाचा वजीर खानडौराणनामा होता, त्याचे मनांत आलें कीं, सल्ला करून मल्हारराव यास मागें फिरवावा; परंतु तो हें नसमजला कीं, बंडाचें पारिपत्य केल्यावांचून आधीं तहकरणें ठीक नव्हे; मग त्याचा मनांत विचार होऊन त्याणें आपला भाऊ बरोबर फौजदेऊन मोठा भयंकर आकार दाखवून शत्रूस नर्मदेचा पार करावयास पाठविला. तो निघाला तेसमयीं दिल्लीचा सर्वलोकांस हा जय पावेल, असा भरंवसा होता; परंतु त्याचा तो खटाटोप व्यर्थ जाला. तें लश्कर सरोंज पर्यंत जाऊन मागें फिरलें; आणि दिल्लीचा लोकांस दाखविलें कीं आपण मोठा पराक्रम केला. इकडे मल्हारराव त्यावरोबर सहज हलकें हलकें लढावयास थोडकेसे लोक पाठवि, ते दिवसा त्याशीं कांहींसे लढत, आणि पळत; मग रात्रीस जाऊन त्याचा डेऱ्यावर बाण टाकीत. तो मल्हारराव आपणतर सैन्याचा मोठ्या समुदायासुद्धा उद्योग करून त्या मुलखाचा वसुलाची जमा आपला धनी बाजिराव यास पाठवावयाचें काम चालविलेंच होतें; माळवे मुलखीं व चंबळानदीचे दक्षिणेस मोंगलांचे हातीं कित्येक किल्ले होते, तथापि मुलखाचा नाशाचा बंदोबस्त त्यांचानें करवेना; मराठ्यांखेरीज रोहिले लोकही त्यामुलखीं स्वाऱ्या घालित होते. याशिवाय गुजराथेंतही मल्हारजीनें एकाएकी स्वाऱ्या घालून अमदाबादेचे उत्तरेकडचे कित्येक गांव लुटून माघारा फिरला.

बाजिरावानें फौज फार ठेविली यास्तव तो बहुतां लोकांचा कर्जभरू जाला; मग जा सावकारानीं पहिलें पुष्कळ दिलें होतें ते अणिक देइनातसे जाले. व त्याचे लश्करी लोकांचा रोजमुरा थकला, तेणेंकरून ते लोक त्याचा आज्ञेंत अंतर पाडूं लागले; असें सन सत्राशें छत्तिसांत पडलें. + नंतर त्याणें माळव्याची चौथ व सरदेशमुखीच्या ऐवज जमा करून राजा जयशिंग याचा योगें बादशाहापासून माळवा मुलख आपणास पृथक मागीतला. याखेरीज सरबुलंदखानानें गुजराथची सरदेशमुखी देऊं केली होती, तिची आज्ञा व्हावी असें मागीतलें. तेव्हां बादशाह वजीर याउभयतांचा मनांत आलें कीं याप्रमाणें द्यावें, परंतु त्याचे सरदार तुराणी मोंगल यांचा मनास येईना; म्हणून खानडौराणानें आपला वकील कांहींबोलणें करावयास बाजिरावाकडे पाठविला; त्याचे

---

\+ या वेळेस त्याणें कोणाएका महापुरुषास पत्र लिहिलें कीं, हालीं मी बहुतांचा देणेदार होऊन माझी कुतरओढ जाली, हीच मला नरकयातना शी वाटते, आणि सावकार व शिलेदार याच्या पायां पडतां पडतां माझा कपाळाचें कातडें गेलें.

हातीं

हातीं चौथ व सरदेशमुखीची सनद गुप्त देऊन सांगीतलें कीं समयविशेष पाहून त्यास सनद द्यावी. असें असतां खानडोराणाजवळ बाजिराव याचा वकील होता, त्यास तें वर्तमान कळलें; त्याणें पेशव्यास बातमी पोंहचविली. तें समजतांच बाजिरावाचा मनांत आलें किं, ते आपणास भीतात; त्यास आणखीहि कांहीं मागावें. हातर ब्राह्मणजातीचा स्वभाव आहे, किं कोणी मनुष्य कांहीं द्यावयास सिद्ध जाला ह्मणजे अणीक अणीक मागावें. त्यावर बाजिराव त्यापाशीं फारच मागूं लागला, तो प्रकार असा, प्रथम संपूर्ण माळवा जहागीर द्यावा; व किल्ला मांडु व किल्ला धार व किल्ला रेभीन, व चंबळा नदीचे दक्षिणेचा मुलखाची जहागीर, व फोजदारी; व पन्नास लक्ष रुपये बादशाहानें आपल्या खजिन्यांतून द्यावे. याशिवाय दक्षिण सहासुभ्यांची सरदेशपांडेपणाची सनद द्यावी असें मागीतलें.

त्यानंतर बादशाहानें सहासुभे दक्षिणेचें सरदेशपांडेपण+ मात्र दिलें, आणि सहा लक्ष रुपये नजर घेतली. केवळ सहासुभ्यांचें देशपांडेपणच पेशव्यास मिळालें हें तरी निजामउलमुलुखाचा हेवास्तव खानडोराण याणें देवविलें. कांकिं सहासुभे दक्षिणेंत निजामउलमुलुखाची सत्ता होती; मग निजामास फार वाईट वाटलें तेसमयीं त्याला बादशाह व मोंगल याणीं लिहिलें किं, तूं दिल्लीस लवकर ये; न आलास तर मुसलमानाचें राज्य बुडेल. तेव्हां निजामउलमुलुखानें विचार केला किं आपणास बहुतां दिवसांचे सहाय जे मराठे लोक त्यांशीं लढावें असें आलें, इतकें होऊन तो दिल्लीस गेला. तेथें अनेकप्रकारें त्याचें मन वशकरावयाविषयीं बादशाहानें उद्योग केला तो असा; त्याचा वडीलपुत्र गाजिवदिन त्यास गुजराथ व माळव्याचा अधिकार दिला, त्याशिवाय सर्व मांडलिकानीं त्याचा हाताखालीं वागावें असें सांगीतलें. याप्रमाणें होऊन निजामऊलमुलुखाजवळ फोज चवतीस हजार जमली. त्यावेरीज तोफखानाहि फार चांगला होता.

इकडे बाजिरायानेंहि आपली फोज जमा करून निघाला तो नर्मदेस जाऊन पोंहचला तोंपर्यंत त्याजवळ ऐशीं हजार फोज जमली, तरी त्यांत रघुजी भोंसला व दाभाडे व यशवंतराव व सेनापतीचा कोणी सरदार इतके नव्हते.

बाजिरायानें बादशाहापाशीं अमर्याद मागणें केलें, त्यावरून त्या दर-

---

\+ सरदेशपांडेपणाचा हक्क सरदेशमुखीसारिखाच आहे, परंतु त्यांत प्रति शेंकडा पांच रुपये.

बारीं

वारीं असें ठरलें किं, फार मोठें लश्कर तयार करून त्यास भय दारववावें. नंतर त्याणीं दिल्लीचा सभोंवतें पुष्कळ लश्कर जमा केलें; तें ऐकून बाजिरावानें आपल्या लश्करचें जड सामान आपला मित्र जगतराज नामा बुंदलखंडचा राजा, त्याजवळ ठेवून बरोबर हलकें सामान घेउन आग्रापासून विसांकोसांवर दक्षिणदिशेस यमुनेचे कांठीं उतरला. तेसमयीं त्याचा सरदार मल्हारराव होळकर व दुसरेही मराठे सरदार यमुने पलिकडे दुवाब, येथें उपद्रव करीत होते; तेथें अकस्मात् मोंगलांचें लश्कर येऊन त्यांस यमुनापार केले. त्यावेळेस बाजिरावहि ती जागा ठिक नाहींशी समजून तेथून निघोन ईशानी दिशेस चालिला. तेव्हां ते मोंगलांचे सरदार याणीं बादशाहास लिहिलें किं आह्मीं सर्व मराठे चंबळानदीपार केले ते आपल्या मुलखीं गेले. तेव्हां दिल्लीमध्यें लोकांस मोठा आनंद जाला; आणि खानडौराणाजवळ, बाजिरावाचा वकील होता त्यास निघोन जा अशी आज्ञा जाली. त्याणें जाऊन तें वर्तमान बाजिरावास कळविलें, तेव्हां तो बोलिला किं, आमचे मराठे लोक दिल्लीचा दरवाजाजवळचीं घरें जाळितील, तें पाहून बादशाहास कळेल किं, अद्यापि मराठे हिंदुस्थानांत आहेत. मग तसाच निश्चय करून, रोज वीस वीस कोस मजला करीत आडवाटेनें एकाएकीं दिल्लीचे दरवाजाजवळ लश्करसहित जाऊन डेरा दिला. तेव्हां कित्येक हत्ती व कित्येक उंट शहराबाहेर आले होते ते धरले, व कित्येक हिंदुलोकहि दिल्लींतून बाहेर देवदर्शनास जाणारे ते धरून लुटले. परंतु कोणाचीं घरें जाळिलीं नाहींत; कांकिं असें केल्यास बादशाहाचा राग होऊन पुढें तह करावयास अवघड पडेल; आणि लूट जमा केल्यानें पळून जातां येणार नाहीं, यास्तव बादशाहास पत्र पाठवून सलुख्याचा प्रकार दर्शिवला. अशी त्याची सुशीलता पाहून दिल्लीचे कित्येक मानकरी लोक धैर्येंकरून आठहजार लश्कर बरोबर घेऊन युद्धास निघाले. त्या युद्धांत मोंगलांचा पराभव जाला, मराठ्यांचा इंद्राजी कदम नामें एक सरदार व थोडकेसे लोक पडले. याप्रमाणें बाजिरावाचा जय जाला, तरी तो असें समजला किं, मोंगलांचे लोक चहूंकडून लवकर जमा होतील यास्तव रात्रीसच निघोन गेला. तो ग्वाल्हेरचे वाटेनें रेवारी व मंदावराकडून चालिला. त्याचे पाठिमागें मोंगलांचे कोणी सरदार लागले नाहींत, मग त्यास कळलें किं, या वेळेस आपण दक्षिणेंत अवश्य जावें त्यावेळेस खानडौराणानें बाजिरावास सांगून पाठविलें किं, माळव्याचा अधिकार व तेरालाख रुपये कबूल आहेत. तेव्हां पेशव्यानें त्याजवळ आ-

पला वकील फिरून पाठविला. मग आपण सातान्यास जाऊन राजाची भेटघेतली, आणि तत्काळ तेथून निघोन कोंकणांत गेला.

तेथें सन सत्राशें सत्तिसांत कुलाबा घ्यावयाकरितां मानाजीला पोर्टुगीस लोक अनुकूळ होऊन कुलावा त्याचा हातीं लागला, परंतु त्याणें त्यांस द्यावयाकरितां जो मुलुख कबूल केला होता तो देइना. यास्तव पोर्टुगीस लोक संभाजी आंग्र्यास मिळोन मानाजीपासून कुलाबा घ्यावयास सिद्ध जाले. त्यांचा निवारणार्थ पेशवा गेला; तो तें कार्य सिद्धीस नेऊन त्यांपासून सातहजार रुपये रोख, व तीन हजार रुपयांचें सामान, कांहीं विलायती व कांहीं चिनाची, प्रतिवर्षी द्यावें असा करार ठरविला.

सन सत्राशें अठतिसांत बाजिराव नर्मदापार गेला; त्यावेळेस निजामउल्मुलुख सरोंजेस होता, त्याणें तेचसमयीं शत्रूवर चालून जावें हें योग्य परंतु तसें नकरितां तो चांगला जागा पाहून भोपाळाजवळ बाजिरावाची वाट पाहात राहिला. तेथें त्याचा लश्कराला पुढचे आंगीं ओढा होता; पाठिमागें मोठें तळें असे, याप्रमाणें आश्रय पाहून राहिल्यामुळेंच तो पराभव पावला असें दिसतें. कांकिं, मराठेलोक तेथें जाऊन पोंहचतांच त्यांस वाटलें किं, याणें सुदृढ स्थळ धरिलें; तस्मात् याचा मनांत भय आहे. त्यावरून त्यांहीं त्याच वेळेस हल्ला केला; तेव्हां निजामाकडचे रजपूतलोक पांचशें पडलें; व घोडे सातशें मेले मराठ्यां कडील शंभर पडले, व तीनशें अखमी जाले. तेसमयीं बाजिराव तेथून जवळच दोन बाणाचा टप्प्यावर उभा राहून संधी पहात होता; ती अशी किं, निजामउल्मुलुख आपली जागा सोडून निघाला असतां, त्यावर लश्करासुद्धां एकाएकी पडून त्याचा अगदीं पराभव करावा. अशी आशा धरून राहिला असे, परंतु त्याणें ती जागा सोडिली नाहीं. मग याचा हातून इतकें मात्र जालें किं, याणें आपल्या लश्कराचा टोळ्या सभोंवत्या बसवून निजामाचा लश्करास धान्य तृणादि मिळेनासें केलें. असें निजामास संकट प्राप्त जालें तें वर्तमान दिल्लीस कळल्यावर त्याचे मुक्ततेविषयीं तेथें तयारी होऊं लागली; परंतु बाजिरावास विदित होतें किं, तेथचा मुख्य कारभारी खानडौराण तो निजामाचा द्वेषी यास्तव तेथून धांवणें लवकर येणार नाहीं कदाचित हैदराबाद व औरंगाबाद यांतून कोणी मदत येतील; तन्निवारणार्थ मात्र बाजिरावानें रघुजी भोंसल्यास बहुत आर्जवेंकरून लिहिलें किं, सोनगडीं सेनापती आहे त्याला माझे मदतीस लवकर पाठवावा. असेंच शाहूनेंही बाजिरावाचा पुष्टीकरणार्थ आज्ञापत्र आपल्याहातचें भोंसल्यास पाठविलें; परंतु

त्याणें

त्याणें ऐकिलें नाहीं. बाजिरावाचा भाऊ चिमणाजी आपा तोमात्र लोकज-मा करून तापीचा कांठीं राहिला होता. त्यास बाजिरावानें लिहिलें कीं हे समयीं तुला फौज मिळेल तितकी जमा कर, व दक्षिणेंत बोलावणीं पाठवू-न फत्तेशिंग भोंसले व संभुशिंग जाधव व सरलश्कर यांस आण. बांडे व दा-भाडे व गाइकवाड, हे मजकडे येत नसल्यास तूं आपल्याजवळ ठेवून घे आ-णि तापीवर ऐस; जर या वेळेस सर्व मराठे एकचित्त होऊन मला अनुकूळ झाले तर मुसलमान लोकांस दक्षिणेंतून हांकून द्यावयाची संधी हीच आहे.

निजामउलमुलुख अशा अडचणींत पडला तेव्हां ती जागा सोडून दूर गेला, परंतु त्याजवळ तोफखाना वगैरे बहुत सरंजाम होता त्यामुळें निघून जावयास ठिक पडेना म्हणून तो माघारा फिरून भोपाळ किल्याचे कोटांत गेला; ती जागा पुरेशी नव्हती म्हणून कांहीं लोक बाहेर राहिले. तेसमयीं बाजिरावाजवळ तट पाडावयाजोग्या तोफा नव्हत्या, तथापि त्याणें बाण टाकून व बंदुकांचा भडमार करून त्यास असा बेजार केला कि त्याणें कोणत्याहि प्रकारें निघून जावेंसें आलें. तेव्हां त्याणें आपलें जड सामान भोपाळ व इसलाम गड येथें ठेवून आपणाबरोबर कांहीं तोफा व उंटावरचा जेजाला घेऊन बाहेर निघाला तेवेळेस मराठ्यांनीं त्याचा तोफखाना हल्ला करून घ्यावयाचा उद्योग केला परंतु तो सिद्धीस न जातां त्या तोफा व जेजाला यांचा आश्रयेंकरून ते मोंगललोक रोज दोन कोस असें धिमे चालीनें जातां जातां, दोराई सराई गावां पावेतों पोंहचले. तेथें मोंगल व बाजिराव यांचा तह जाला त्यांत असें ठरलें कि, बाजिरावास चंबळा व नर्मदा या दोहों नद्यांमध्यें जो मुलुख आहे त्याचें आधिपत्य प्राप्त व्हावयास बादशाहास अनुकूळ करावा. याशिवाय पन्नास लक्ष रुपये हि बाजिरावास देण्याचे.

यानंतर बाजिराव चंबळानदीचे दक्षिणेस मुलखाची खंडणी घेत राहिला. इतक्यांत व्यंकटराव घोरपडा कोंकणामध्यें पोर्तुगीस लोक यांचें पारिपत्य करावयास कित्येक स्वार घेऊन गोव्यांकडे चालिला. दुसरा खंडोजी मानकर कोंकणचे उत्तरेस लश्करसुद्धां त्या लोकांचे किल्ले घ्यावयास निघाला. त्याशीं त्या पोर्तुगीसांनीं फार शौर्येंकरून युद्ध केलें, परंतु मराठ्यांचे कित्येक मुख्य सरदार चिमणाजी आपा व होळकर व शिंदे वगैरे सरंजाम घेऊन कोंकणांत गेले. त्याशीं युद्ध करतां करतां पोर्तुगीस लोक बहुतेक मेले गेले; तेसमयीं प्रायः त्यांचे किल्ले मराठे

लोक

लोक यांणीं घेतले.

त्या वेळेस मुंबई शहर हें लहानसें गांव होतें, त्यांत इंग्रेज लोक असत, त्यांशीं व पोर्तुगीस लोकांशीं कांहीं वैमनस्य पडलें यास्तव त्यांस गुप्तपणें मराठ्यांचा पक्ष होता, त्या वैमनस्याचें कारण असें. सोळाशें एकसष्टांत इंग्रेजांचा बादशाह याणें पोर्तुगाल मुलखाचा बादशाहाचे कन्येशीं विवाह केला. तेव्हां त्याणें त्या जांवयास मुंबई व त्यासंबंधें मुलुख आंदणामध्यें दिला. त्यानंतर दुसरे वर्षी इंग्रेज लोक पांचशें मुंबईस आले आणि पोर्तुगीस लोकांपाशीं साष्टी मागूं लागले तेव्हां ते म्हणाले कीं साष्टीशीं आणि मुंबईशीं संबंध नाहीं, हें बेटच निराळें आहे. असें बोलून देईनात शेवटीं त्यांपासून मराठे साष्टी घेऊं लागले तेव्हां इंग्रेज कांहींसा हर्ष पावले; कांकिं, ते असें समजले किं, मराठ्यांपासून पुढें कधीं तरी हें स्थान आपणास प्राप्त होईल. आणि हालीं याचें पारिपत्यहि जालें.

याप्रमाणें कोंकणांत पोर्तुगीस लोकांशीं आणि मराठ्यांशीं युद्ध होत असतां सेनासाहेब सुभा याचा पुतण्यानें कोणाची आज्ञा न घेतां हिंदुस्थानांत अल्हाबादपर्यंत स्वाऱ्या घालून मुलुख लुटला. तेणेंकरून बाजिरावास फार राग येऊन त्याणें त्याचा पारिपत्यास औजी कावरे नामें सरदार पाठविला, त्याला रघुजी भोंसल्यानें जिंकिला; मग बाजिराव त्याचा सूड घ्यावयास निघाला. तेसमयीं त्याला वर्तमान कळलें किं फारशी लोकांचा नादरशाह नामा बादशाह दिल्लीस येऊन, त्याणें मोंगलांचा पराभव करून दिल्ली शहराची खंडणी बादशाहाकडे मागूं लागला. व खानडोराण मृत्यु पावला, मग तेथून पुढें गेला तों दुसरें वर्तमान समजलें किं, त्या नादरशाहानें दिल्लीचा बादशाहास कैद करून तेथचे राहाणारे लोक आठ दहा हजार सुमारें मारिले. आणि शहर लुटलें हें ऐकून बाजिरावास मोठा विचार पडला, आणि त्यास असें वाटूं लागलें किं, हा कोण मोठा शत्रू आला आहे, यापुढें सेनासाहेबसुभ्याचा पुतण्या रघुजी भोंसला याचें पारिपत्य करावयास जाणें हें केवळ कनिष्ठ कार्य, व पोर्तुगीस लोकांशीं युद्ध करणें तेंही अल्प कृत्य. कदाचित् तो बादशाहास मारून आपणच गादीचा अधिष्ठाता होईल, त्यापुढें तिसरें वर्तमान आलें किं, एक लक्ष फारशी जमा होऊन दक्षिणेस येताहेत. तरी तो किमपि नभितां पुढें गेला, तेसमयीं त्याणें आपला भाऊ चिमणाजी आपाहि कोंकणांतून बोलावून बरोबर घेतला; आणि सर्व लोकांत विदित केलें किं, जे कोणी हिंदू व मुसलमान असतील

त्या

त्या सर्वांहीं येऊन माझें साहाय्य केलें असतां शत्रूस घालवून देतां येईल. मी तर आपले मराठे लोक या कार्याकरितां नर्मदानदीपासून चंबळा नदीपर्यंत पसरणार. अशी बाजिरायानें तयारी केली; तों होळकर वशिंदा हे दोघेहि त्यास येऊन मिळाले. तेव्हां असें वर्तमान आलें किं, तो नादरशाह आपल्या संतोषानें दिल्लीचें तक्त बादशाहास माघारें देऊन लश्कर सुद्धां निघोन आपले मुलखीं गेला. तेसमयीं त्याणें बाजिराव व शाहू व दुसरे जे कोणी हिंदूंचे मांडलिक होते, त्यांस पत्रें पाठविलीं किं, मी हा बादशाह पुनः तक्ताधिपती केला. इतःपर हा मला बंधूसमान यास्तव तुह्मीं सर्वांहिं याचे आज्ञेंत वागावें. जर कोणीं याची आज्ञा मान्य नकरिल तर पुनः मी माघारा येऊन त्याचें पारिपत्य करीन.

पोर्तुगीस लोकांची व मराठ्यांचीं कोंकणांत युद्धें जालीं, त्यांत मराठ्यांहीं वसई किल्ला घेतला. त्या युद्धांत परस्परें युद्धनिपुणतेची पराकाष्ठा जाली; त्यानंतर तसा यत्न मराठ्यांनीं केलाच नाहीं. सन सत्राशें एकुणचाळिसांचा दुसऱ्या महिन्याचे सत्राव्ये तारिखेस चिमणाजीआपाचा विर्नावाला शंकाजीनारायण याणें वसई किल्यास खुसकीवरून घेरा घातला; व त्या किल्ल्यास जा आंगीं पाणी आहे, तेथें मानाजी आंग्र्या येऊन त्याणें तो घेरा पुरा केला. तेव्हां तेथचा किल्लेदारानें आर्जवेंकरून विनंती केली किं, तुह्मीं जंजिऱ्याचा शिद्दीशीं जसा करार केला तसाच आह्माशीं कराल तर किल्ला देतों, परंतु चिमणाजीचा मनास ती गोष्ट येईना: कांकिं, त्यास असें वाटलें किं. असलें सुदृढ स्थळ यांचे हातीं असतां आह्मीं घेतलेला जो मुलुख आहे तो हे आमचे मागें घेतील, आणि पर्जन्यकाळाचा पूर्वीं हें काम शेवटास न गेलें तर हा सर्व उद्योग व्यर्थ जाईल. याकरितां अनेकप्रकारें यत्न चालविला; तो असा मैदानामध्यें जागोजाग मोर्चे बांधून एकामोर्चाहून दुसऱ्या मोर्चास किल्लेकरांचा तोफांचा मार चुकवून जावया करितां जमीन खणून मोठे मोठे चर पाडून वाटा केल्या. तेव्हां किल्लेकरानीं त्यांवर गरनाळांतून कुलपी गोळे, वदगड व गैरे त्या चरांचा वाटेवर टाकून रोज रोज ते लोक बहुत मारिले. व त्या किल्ल्यांत तोफा बहुत होत्या, तथापि मराठ्यांनीं फार तोफा आणून त्यांचा तोफांचा उपाय चालेनासा केला. आणि किल्ल्याचा तटाला भोंक पाडिलें; परंतु त्यांतून आंत शिरतां येईना. तेव्हां किल्ल्यांत जाण्यास सुगम वाट नाहीं म्हणून त्या कोटा खालीं सुरुंग पाडूं लागले.

ले, तेव्हां किल्लेकरानीं त्या सुरुंगाचा सुमारें आंतून सुरुंग पाडून त्यांचा यत्न व्यर्थ केला. असें बहुत वेळा जालें शेवटीं मराठ्यांनीं मसलत केली कि, एकदांच पांच सुरुंग उडवून तरास मोठें खेंडार पाडलें ह्मणजे मार्ग मोठा होईल.

नंतर पांच सुरुंग तयार केले त्यांत तीन जवळ आणि दोन दूर; त्या दोहोंतल्या एकाला पहिल्यानें आग घातली, तो चांगला नउडाला. मग जे सरसे सरसे तीन होते त्यांस एकदांच आग घातली. तेव्हां त्यांतील दोन उडून त्यांचें खेंडार मोठें पडलें. तेसमयीं मराठे किल्ल्यांत शिरावयाकरितां जवळ गेले; तों तिसरा सुरुंग उडाला त्यांत सांपडोन ते फार मेले गेले व किल्लेकरानींही गरनाळांचा गोळ्यानीं व बंदुकांचा मारानें फार हैराण केले, त्यावेळेस ते सर्व मराठे मागें हटले. तेव्हां किल्लेकरांनीं त्या खेंडारांतून चढून जावयाचा उपाय चालेनासा बंदोबस्त केला. त्या नंतर पांचां सुरुंगांपैकीं एक राहिला होता, त्याचें काम मल्हारराव होळकरानें पक्कें केलें होतें; त्यास आग घातली. तेव्हां तो चांगला उडाला त्याणें अर्धा बुरूज कोसळला. तेसमयीं मराठ्यांनीं मातब्बर हल्ला केला तेव्हां पोर्तुगीस लोकानीं मातीचा टोपल्या भिंती सारख्या रचून तेथून तोफा लागू करून आपला जीव वांचविला, व मराठ्यांस जवळ येऊंच दिले नाहींत मग त्यांस खाण्यापिण्याचा तोटा पडून बहुत श्रमी जाले आणि त्या युद्धास आरंभ होऊन, तिसरा महिना भरला असामयीं त्यांहीं मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें त्यांत असें ठरलें कि, आठां दिवसांत, पोर्तुगीस लोक आपलीं मुलें माणसें काढून किल्ला रिकामा करून देतात. त्या किल्ल्याच्या युद्धामध्यें मराठ्यांचे लोक पांच हजारांवर मेले गेले. पोर्तुगीस लोकांचे मेलेले व जखमी मिळून आठशें जाले. या युद्धाशिवाय कोंकणांत मराठे व पोर्तुगीस लोक यांचीं युद्धें जालीं, तीं व हें मिळून मराठ्यांचें माणूस बाराचौदा हजार सुमारें मेले.

इराणी लोकांचा बादशाह याणें दिल्ली सोडल्यानंतर बाजिरावानें दिल्लीचा बादशाहाचे प्रसन्नते विषयीं पत्र लिहिलें व एकशें मोहरा नजर पाठविल्या. नंतर बादशाहाकडून बाजिरावास बहुमानाचें उत्तर व वस्त्रालंकारादि उत्तम प्रकारचें प्राप्त जालें. परंतु निजामाचा बोलण्याप्रमाणें माळव्याची सनद न मिळाली. त्यावरून पेशवा याणें निजामास घातकीसा जाणून, मनांत विचार केला किं, सर्व दक्षिणेंत

निजामाची

निजामाची सत्ताच नाहींशी करावी. त्यावेळेस निजाम आणि त्याचे बहुतेक लोक हिंदुस्थानांत होते; यास्तव त्याकार्यास ती संधी उत्तम, परंतु तेसमयीं बाजिरावाचे मोठे मोठे सरदार लश्करासहित कोंकणांतून आले नव्हते; ह्मणून बाजिराव माळव्याचा बंदोबस्त करीत राहिला, व त्या मुलखाचे पश्चिमेस चंबळेचे कांठीं कोटापासून आल्हाबादपर्यंत मुलखाचा अधिकारी रजपूत त्याशीं स्नेह रक्षित होता; त्यांत विशेष इतकाकिं, बुदलखंडचा राजानें समयीं बाजिरावाचा मार्ग मोंगलांस बुदलखंड न देतां, दोन महिनेपर्यंत बाजिरावाचे कुमकेची मार्गप्रतीक्षा करीत लढावें, तों पावेतों कुमक न पोंहचल्यास, तह करून मग कुमक मिळाल्यावर पुनः लढावें. याप्रमाणें ठरलें, असा उत्तरेचा बंदोबस्त करून त्याच वर्षाचे समाप्तीस, बाजिराव दक्षिणेंत ओरंगाबादेजवळ निजामउलमुलुखाचा पुत्र नाशिरजंग नामा, दहाहजार सैन्यासहित होता, तेथें जाऊन त्यासभोंवता घेरा घातला, परंतु थोडक्याच दिवसांत त्या नाशिरजंगाचे कुमकेस एक मोठें सैन्य येऊन तो मराठ्यांचा हातचा सुटोन गोदावरीपलिकडे अमदानगरचे वाटेनें मुलखांस उपद्रव देत चालिला. तो अमदानगरीं जाऊन पोंहचला नाहीं तोंच बाजिरावाचे मदतीस चिमणाजी आपाचें मोठें लश्कर येऊन पोंहचलें. मग बाजिरावानें त्याशीं युद्ध करून त्यास पुढें जाऊं न देतां माघारा गोदावरीकडे परतविला. त्यावर कित्येक महिने त्या उभयतांचें युद्ध तसेंच होत असून त्यांतील एकासहि किमपि अर्थलाभ न होतां दोघांचा तह होऊन ठरलें, किं इतःपर रैतेस कोणी उपद्रव करूंनये, व मोंगलांनीं बाजिरावास नर्मदेचे कांठीं जहागीर द्यावी. मग बाजिराव मनोदयानुरूप अर्थसिद्धी पावला नाहीं ह्मणोन फार खिन्न होऊन पुण्यास व सातान्यास न जातां एकाएकी त्या लश्करासहित हिंदुस्थानांत जावयास निघाला. तेसमयीं त्याचा पुत्र बाळाजी बाजिराव, त्यास नानासाहेब ह्मणत, तो कोंकणांत आंग्र्याशीं लढत होता त्याचे कुमकेस चिमणाजी आपा गेला; तेथें त्या नानासाहेबाशीं रेवदंडा किल्ला घ्यावयाची मसलत करीत बसले होते, तेवेळेस वर्तमान आलें किं, बाजिरावास नर्मदेचे कांठीं सन सत्राशें चाळिसांचे चौथ्या महिन्याचे अठ्ठाविसावे तारिखेस देवाज्ञा जाली. असें ऐकतांच शंकराजी नारायण विर्नीवाला त्यास कोंकणची सुभेदारी दिली. आणि खंडोजी मानकर यास लश्करचा मुखत्यार केला; मग चिमणाजी आपा व त्याचा पुतण्या नानासाहेब पेशवा हे उभयतां बाजिरावाचें उत्तरकार्य करून सातान्यास आले.

बाजिरायाचें मरण तें मोठें प्रकरण यास्तव त्यासमयीं मराठ्यांची हकिगत काय काय होती ती समजायाविषयीं, तेव्हांचे हिंदूतील सर्व अधिकारी कसकसे वागत होते तें प्रथम समजलें पाहिजे.

दिल्लीमध्यें तेवेळीं महंमदशाह नामें बादशाह होता त्यास नादरशाहानें बंदीस घालून त्या राजधानींतले कित्येक लोक मारिले व शहर लुटून द्रव्य नेलें; त्या शहराचे उत्तरेकडील काबूल व तारा, व मुलतान, हे मुलख घेऊन त्याणें आपल्या मुलखाकडे लाविले होते; त्यावरून बादशाहाचें तेज कमी होऊन दिल्लीचाजवळ दुसरीं कित्येक नवीं नवीं राज्यें होऊं लागलीं होतीं, तीं प्रबळता पावतीलसें दिसूं लागलें, त्यांत एक रोहिला असे; त्याचा मुळ पुरुष हिंदुस्थानचे अहीर जातीचा होता, जसा मराठ्यांमध्यें धनगर तसा त्यांत तो. त्याचे लहानपणीं कोणी एका अफगाणानें आपल्याजवळ त्यास अल्लीमहंमद रोहिला असें नाव ठेवून, बाळगला. मग तो मोठा जाल्यावर अफगाणाचा स्वारांची सरदारी करीत होता. त्यानंतर त्याणें कित्येक मुलखाचा उत्पन्नाचा चढ पत करून मुलुख आपल्या हातांखालीं घातला मग पैका द्यावयाचा समयीं युद्धास सिद्ध जाला. त्याचा पारिपत्याविषयीं वजिरानें आपला कोणी मुखत्यार पाठविला; त्याचा त्याणें पराभव केला. हें वर्तमान दिल्लीपासून पन्नास पंचावन्न कोसांवर दक्षिणेस जालें.

दुसरा शूद्रामध्यें जाट नामें जाति, असा कोणी एक इंदसकांठचा राहाणार; त्याणें घेऊन आग्रे व जयपूर यांचें आधिपत्य औरंगजेबाचे समाप्तीस केलें. पुढें त्याचे मरणानंतर त्याणें त्याच गडबडींत आपलें आधिपत्य सुदृढ करून, मग जेव्हां मराठे चंबळा नदी उतरून पलिकडे गेले तेव्हां त्यांचा व आपला एक लाभ पाहून त्यांशीं स्नेह केला.

दक्षिणेंत व करनाटकांत स्वराज्य व जहागीर सोडून निजामउलमुलख आणि मराठे निमेनिमे वाटून घेत होते, बाजिराव मेल्यानंतर तो निजामउलमुलख कित्येक दिवस दिल्लींत होता; त्याचे नावास बादशाहानें अमीरउलउमरा असें पद जोडिलें होतें; त्याला वर्तमान कळलें, किं, आपला पुत्र नाशीरजंग नावाचा दक्षिणेंत आहे तो माझी सत्ता नाहींशी करून, आपण कारभार करणार. तें बंड मोडाया करितां निजाम दक्षिणेस निघाला; तेसमयीं त्याणें बादशाहास विनंती केली किं, मला जें पद दिलें तें माझा वडील पुत्र गाजीउद्दिन यास असावें.

करनाटकांत विजापूर, व गोंवळकोंडें येथें जे पहिले मुख्य अधिकारी

कारी होते त्यांची संतती पुष्कळ झाली असे; त्यांस स्वतंत्रपणें वागण्याची चाल पडली होती.

इंग्रेज व फ्रांशीसही या मुलखांत असत, परंतु ते आपला पराक्रम न जाणतां किंवा जाणत असून स्वार्थसाधनास युद्धादिकेंकरून झटत नव्हते; आर्जवानें अथवा लांच देऊन कार्य करून घेत. त्यांशीं कोणी वक्र झाला तर तात्काळ युद्धास सिद्ध होत. त्यावेळेस असें असतां पुढें त्यांचा योग असा होता कीं, या मुलखीं सर्व मोठ मोठ्या कामांत त्यांहीं प्रवीण व्हावें.

पूर्वी सनसत्राशें एकुणचाळिसांत इंग्रेजांनीं आपल्या व्यापाराच्या साधनास चिमणाजी आपाचा स्नेहानें पेशवा अनुकूळ करून घ्यावयास वसईमध्यें चिमणाजीशीं कांहीं तह केला होता.

पोर्तुगीस लोक मराठ्यांलोकांशीं बहुत युद्धें करून केवळ बळहीन झाले होते.

बाजिराव रूपानें फार चांगला होता, त्याची बोलण्याची किंवा कोणत्याही कार्य करण्याची ढब शिपायाप्रमाणें दिसे; आणि तो लष्कराबरोबर असतां ऐश्वर्याचा उपभोगासाठीं आपल्या सेवेंत बहुत माणसें बाळगीत नसे. जें त्याचा शिपायास दुःख तें तो अंगें अनुभवीत असे. याविषयीं कथा आहे कि पूर्वी त्याची आणि निजामउलमुलुखाची भेट झाली नव्हती तेव्हां निजाम यानें कोणा एका मोठ्या चितार्यास सांगितलें कीं, तूं जाऊन बाजिराव पेशवा यास पाहा आणि तो तुझा दृष्टीस जें काम करताना जसा पडेल तसें त्याचें चित्र काढून मला आणून दे. मग त्या चितार्यानें तसें चित्र काढून आणिलें तें असें होतें कि, बाजिराव घोड्यावर बसून भाला आंगाशीं धरून जोंधळ्याचीं कणसें हातावर चोळून खात खात चालिला आहे, व त्याचा घोड्याचे पायबंध व मेखा तोबर्यांत भरून तोबरा घोड्यावर बांधून घेतलेला होता. त्याचा जातीचे ब्राह्मण ह्मणतात कीं, तो द्रव्यलोभी असे, आणि आपल्या कित्येकां जातिधर्मांसही मानीत नसे; व तो शिपाईपणांत विशेष प्रीति ठेवून दुसरीं राज्यकारभारादि कामें तुछ मानी. हें त्या लोकांचें बोलणें सत्य जरी असलें तरी त्याकडे दोष नाहीं; कांकिं त्यावर बहुतवेळ्रां संकट पडलें होतें. तो राज्य मिळवण्याविषयीं लोभी खरा, परंतु मराठे एकचित्त वागविणें व निजामाच्या मनसोबा समजून त्याचें निवारण करावयाचे कामांत दक्ष होता यास्तव त्याणें आपल्या मराठ्या लोकांचें फार हित केलें. त्याचे मरणानंतर त्याचे जागीं बाळाजी बाजिराव नाना त्याचा वडीलपुत्र, तो स्थापिला. दुसरा रघुनाथराव तो युद्धांचीं कार्यें करून नामांकित झाला. तिसरा जनार्दन बावा तो लहानपणींच मेला.

चौथा यवनींचा राजा झाला तो समशेर बहादूर.

सन सत्राशें चाळिसांपासून सत्राशें एकुणपन्नासपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग सोळावा.

## अनुक्रमणिका.


कर्नाटकांत मराठ्यांचा प्रवेश.

रघुजी भोंसला याणें बाळाजी बाजिराव यास पेशवाई न मिळावी म्हणून राजाजवळ उद्योग केला तो शेवटास न गेला.

चिमणाजी आपा याचा मृत्यु.

पेशवा राजापासून महल्लाभाची सनद पावला.

भास्करपंत बंगाल्यांत शिरला.

दमाजी गाइकवाडानें माळव्यांत स्वाऱ्या घातल्या.

अल्लीवेरदीखानानें भास्करपंतास बंगाल्यांतून काढून दिल्यावर, रघुजी भोंसला याणें स्वयें स्वारी केली.

तेव्हां दिल्लीचा बादशाहानें पेशव्यास माळव्याचा अधिकार व इतर लाभाची आशा दाखविली यास्तव त्याणें अल्लीवेरदीखानाचा पक्ष स्वीकारून रघुजीला तेथून घालविला.

मग पेशवा बादशाहापासून माळव्याची सनद पावोन सातार्यास आला.

त्यापुढें रघुजी भोंसले आणि बाळाजी बाजिराव पेशवे यांची कांहीं समजूत पडली.

निजामउलमुलुख याची कांहीं गोष्ट.

रघुजीचा भास्करपंत, व मोठेमोठे मानकरी मराठे सर्दार पुनः बंगाल्यांत गेले ते अल्लीवेरदीखानाचा कपटानें घातेंकरून मारिले गेले.

आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली याची गोष्ट.

दिल्लीचा बादशाहाचा मृत्यु, आणि त्याचा पुत्राचें स्थापन.

निजामउलमुलुखाचा मृत्यु.

नाशिरजंग मोठें सैन्य घेऊन कर्नाटकास चालिला.

राजाराम राजा कसा प्रकट झाला तें प्रकरण

त्यानंतर सातार्यास सकवारबाईची व ताराबाईची काय वर्तणूक झाली ती.


बाळाजीनें

बाळाजीनें सहु वार बाईला कोणे प्रकारें भर्ता घालविली तो विस्तार.

## भाग सोळावा.

रघुजी भोंसले व पेशवे यांमध्यें कलह उत्पन्न झाला तो, क्षारसी लोकांचा नादरशाह नामा बादशाह, दिल्लीस आल्यामुळें कांहीं दिवस राहिला होता; पुढें त्या उभयतांची गांठ पडली तेव्हां तो कज्जा अगदीं मोडला. त्यासमयीं त्या दोघांची काय मसलत झाली ती पुर्तेपणें समजत नाहीं, परंतु असें वाटतें किं, बाजिरावाचा मनांत हिंदुस्थान घ्यावयाचें, व कर्नाटक, आणि बंगाला, आपल्या सत्तेंत आणावा अशीं मोठ मोठीं कार्यें करावयाचीं होतीं, त्या मसलतींत त्यास घेतला असेल. त्यानंतर कर्नाटकांत लश्करसुद्धां रघुजी भोंसला शिरला त्याचें कारण तेंच दिसतें.

त्या लश्करांत राजा, व पेशवे, व प्रतिनिधी, व फत्तेशिंग भोंसला, व इतर मराठे सरदार यांचे शिपाई होते त्यांत संताजी घोरपड्याचा वंश्य मुरारराव घोरपडा असे. त्याणें राजाचा पक्ष तेसमयीं नूतन स्वीकारिला; पूर्वीं राजानें त्याचा वडिलांस विटविले होते. तो यांस मिळाला तेवेळेस आपलें सेनापतित्व मागूं लागला. तें न देतां तुंगभद्रेजवळ कांहीं परगणे देऊन वश केला. मग तें लश्कर पन्नास हजार जमून कर्नाटकांत गेलें; तें दामलचरीचा घाटाजवळचे आडवाटेनें जाऊन एकाएकी दोस्तअल्लीनवाब+ जेथें लश्करसहित होता तेथें प्रकट झालें. नंतर त्यांशीं युद्ध होऊन दोस्तअल्ली मेला, आणि त्याचा दिवाण मीरआसद नामा तो धरला गेला. त्यानंतर मराठे त्या मुलखीं जिकडे तिकडे पसरले, आणि खंडणी घेऊं लागले; शेवटीं दोस्तअल्लीचा वडील पुत्र सफदरअल्ली त्याणें द्रव्य देऊन मराठे तेथून निघावे असें केलें. तेसमयीं सफदरअल्लीचें व भोंसल्याचें बोलणें झालें त्यांत करार ठरला किं तृचनापलीचा अधिकारी चंदासाहेब यास मराठ्यांनीं माल्ल्यान येऊन जिंकावा. त्या चंदासाहेबाविषयीं सफदरअल्लीचा मनांत पूर्वीपासून कांहीं शंका होती. त्यानंतर मराठे करारप्रमाणें सफदरअ-

---

\+ दोस्तअल्ली सादतउल्ला खानाचा पुतण्या, पूर्वीं सन सत्राशें सहांत कर्नाटक पेनघाट मुलखीं दाउदखानानें आपल्या अधिकारावर सादतखान कारभारीयास ठेवला; नंतर तो सादतखान मेल्यावर दोस्तअल्ली दिल्लीचा बादशाह यांचे व निजामउलमुल्कख याचे आज्ञें वांचून आपल्या मुलखाची जागा पावला.

ल्लीचा

ढीचा मुलुख सोडून माघारें महाराष्ट्र मुलुखीं सवायशे कोस जाऊन, शि-वगंगेचे काठीं उतरले; परंतु त्यांचा मनसोबा होता कि, आपण येथें कांहीं दिवस राहून तो चंदासाहेब असावध आहे असा जाणून एकाएकी जा-ऊन जिंकूं.

इतक्यांत रघुजी भोंसला तेथून निघोन सातान्यास आला, आणि बाळाजी बाजिराव यास पेशवे पदवी नदेतां बापुजी नाईक बारामतीक-र, यास पेशवा करावा असा राजाजवळ उद्योग करूं लागला; परंतु त्यास प्रतिनिधी अनुकूळ नव्हता; व चिमणाजी आपा आपल्या पुतण्याचें हित करणारा ह्मणोन शाहूला समजाविलें कि, बापुजी नाईक पेशवाई करितां, द्रव्य पुष्कळ देईल; इतका यत्न केला तो शेवटास नजाऊन सनसत्राशें चाळिसांचा आठव्या महिन्यांत शाहूनें बाजिरावाचे जागीं बाळाजी बाजि-राव स्थापिला. बापुजी नाईक बारामतीकर आपल्या मनोदयानुरूप का-र्य सिद्ध न झालें यास्तव बाळाजीस बाजिरावाचा कर्जाविषयीं फार त-गादा करूं लागला; त्यामुळें त्यास बहुत संकट प्राप्त झालें, तेव्हां त्याचा दिवाण महादाजी पंत पुरंधऱ्या याणें त्या संकटापासून बाळाजीची मु-क्तता केली, यास्तव तो त्याचा मोठा उपकार मानून, त्याचे ठायीं अत्यंत प्री-ति करूं लागला.

रघुजी भोंसला याणें योजिलेलें कार्य सिद्धीस नगेलें ह्मणून बापु-जी नाईक बारामतीकर यास आपले बरोबर घेऊन त्रचनापलीचे मो-हिमेसंबंधें लाभ साधावयास पुनः कर्नाटकास चालिला. त्या बरोबर प्र-तिनिधी श्रीपतराव, व फत्तेशिंग भोंसला हेही गेले. तें लष्कर तंजो-रास पोहचलें तेव्हां त्यामुलखीं मराठे होते ते आपल्या मनांतील वैम-नस्यें टाकून दक्षिणदेशीचे मराठे आपले भाउबंद यांस मिळाले. त्यानं-तर कर्नाटकीं काय काय युद्धें झालीं तें समजत नाहीं; परंतु इतकें ठाऊक आहे कि, सन सत्राशें एकेचाळिसांचा तिसऱ्या महिन्यांत त्रचनापली म-

---

* बापुजी नाइकाशीं आणि बाजिरायाशीं कांहीं वैमनस्य पडलें होतें, त्याचें कारण असें, बापुजी नाईक मोठा द्रव्यवान होता; त्यापासून बाजिरावानें कर्ज घे-तलें तें माघारें धावयास मिळेना.

---

⊞ त्या वेळेस दिसण्यामध्यें त्या प्रांताचा धणी शिवाजीचा भाउ व्यंकाजी त्या-चा नातू (पुत्राचापुत्र) होता परंतु मुख्यत्वें मुसलमान असे, तो व्यंकाजी याचा-धाकटा पुत्र तुकाजी याचा वेळेपासून तंजोरांत शिलेदारी करीत होता, असें सम-जावें.

राठ्यांचा

राठ्याचे हातीं लागला. तेव्हां तेथचा धणी चंदासाहेब होता, तो रघुजी भोंसल्यानें कैद करून साताऱ्यास पाठविला; आणि मुरारराव घोरपडा त्या किल्ल्याचा मुखत्यार करून ठेविला. त्या जवळचे शिबंदीस दरमहा शाहूकडून पोंहचत असे; परंतु ते लोक पेशव्याचे होते. कर्नाटकचे खंडणी पैकीं प्रतिवर्षी वीस हजार रुपये बाळाजी बाजिरावास देत जावे, असें ठरलें हा एक पेशव्यास त्या वर्षी लाभ झाला.

त्याच वर्षाचा पहिल्या महिन्यांत चिमणाजी आपा मृत्यु पावला. तो मराठे सरदारांत मोठा मान्य असे, कांकिं, त्याणें पोर्तुगीस लोकांचा पराभव करून आपल्या जातींत लौकिक मिळविला. परंतु एवढी त्याची योग्यता असेलच असें ह्मणतां येत नाहीं. त्याणें जाणिलें किं, पायदळ व तोफा यांचा बंदोबस्त चांगला असल्या वांचून युद्धाचें साहित्य ठीक नाहीं, ती कल्पना बहुधा बरी दिसल्ये, परंतु ती मराठयांस योग्य नव्हे; ते आंग धट्टाईनें मारामारीविषयीं समर्थ. चिमणाजीचा पुत्र सदाशिव[+] चिमणाजी भाऊ याणेंही ती बापाची कल्पना उत्तम मानून, पुढें विसांवर्षांनीं आपले मोठेपणीं, त्या प्रमाणें सिद्धता करून पानपतचे लढाईत त्याच चुकीनें लश्करसहित नाश पावला, असें दिसतें. चिमणाजी आपा मेल्याचे आगोदर खंडोजी मानकर याणें त्याचे आज्ञेवरून पोर्तुगीस लोकांचा रेवदंडा किल्ला राहिला होता तो घेतला, तेणेंकरून दमान व गोवें यांमध्यें त्या लोकांची सत्ता किमपि राहिली नाहीं.

बाळाजी बाजिराव आपल्या चुलत्याचा मरणानंतर एक वर्ष सुमारें मुलखाचा बंदोबस्त करीत सातारा व पुणें येथें राहिला होता. त्याणें शाहूस आपली गरिबाई दाखवून, पोर्तुगीस लोकास जिंकून घेतलेला मुलुख होता त्याची सनद पावला. व गुजराथ खेरीज करून नर्मदेचा उत्तरे कडचा मुलखाची खंडणी जी घ्यावयाची ती व वसूल जमा करावयाचा जो तो त्याचा हातून व्हावा असेंही शाहूनें केलें.

शाहूनें त्याच समयीं एवढें दिलें तेणेंकरून पेशव्याचा प्रबळतेस फार उपयोग झाला. तो ध्यानांत यावयाकरितां आधीं बंगाल्यांतील वर्तमान कांहीं लिहिलें पाहिजे तें असें. सन सत्राशें चाळिसांत बंगाल्याचा नवाब सुजाउद्दीन खान नामें होता; त्याणें बाहार सुभ्यामध्यें कोणीएक आपला हस्तक अल्लीवेरदीखान नामें ठेविला. तो सुजाउद्दीन मेल्यावर त्याचा पुत्र तक्ताधिपती झाला; परंतु अल्लीवेरदीखान त्यास

+ सदाशिवचिमणाजीस भाउसाहेब ह्मणत.

मानीना

मानीना; पुढें त्या उभयतांचें युद्ध होऊन तक्ताधिपती मरण पावला. आणि अल्ली वेरदीखान यास तें आधिपत्य प्राप्त झालें. त्यावेळेस उरसा सुभ्यामध्यें कोणी एक पहिल्या नवाबाचा हस्तक मुरशेद कुली नामें असे त्याचा दिवाण मीरहबीब नामें होता; त्याशीं अल्लीवेरदीखानानें युद्धकरून सुभ्याचा पार घालविला; तो तेवेळेस पळूनजाऊन मग थोडकेशा दिवसानीं पुनः येऊन अल्ली वेरदीखानाजवळच चाकरीस राहिला. त्या पुढें बंगाल्यांत मराठे लोकांची सत्ता व्हावयास तो उपयोगी पडला, त्याचा प्रकार असा, मुरशेद कुली अल्ली वेरदीखानानें मुलखांतून पारकेल्यावर मीरहबीबानें वराडांत रघुजी भोंसल्याचा हस्तक भास्करपंत होता, त्यास मसलत दिली किं, कटा सुभा लुटावा; तेव्हां भास्करपंतानें आपला धणी करनाटकांत गेला, त्याचे आज्ञेसाठीं वाट पाहिली इतक्यांत अल्लीवेरदीखान लष्कर सहित येऊन, तो सुभा घेतला. तों मीरहबीब जाऊन त्यास मिळाला. यावरून त्यावेळेस बंगाल्याचा मर्यादेंत शिरणें राहिलें; परंतु भास्कर पंताचा मनांत ती इच्छा होऊन थोडक्या वेळानें लष्कर घेऊन कांहीं एक निमित्तेंकरून पूर्वेकडे चालिला. तो निघून गेला तेव्हां पेशवा हिंदुस्थान आपल्यासत्तेंत आणावयाची वाट पहात होता, तो त्याच समयास उत्तम मानून निघाला, आणि गराव मंदेला किल्ला हस्तगत केला. तेव्हां पाउसकाळ जवळ आला म्हणून नर्मदेचा कांठीं छावणी केली. मग दसरा झाल्यावर आल्हाबादेस स्वारी घालावी अशी मसलत होती, इतक्यांत दमाजी गाइकवाड व बाबुराव सदाशिव माळव्यामध्यें पेशव्याचे मुलखीं लुटूं लागले; यास्तव पेशवा आल्हाबादेची मोहिम टाकून माळव्याकडे गेला. त्यासमयीं पेशवा पूर्वेस न जातां माळव्यांत गेला, तें रघुजी भोंसल्याचें चातुर्य; कांकिं, पेशवे पूर्वेस नजावे आणि तो सर्व लाभ आपणाच घ्यावा अशी त्याची मसलत होती.

इकडे भास्करपंत बंगाल्याकडे जात असतां, बाहार परगणा यामध्यें स्वारी प्रथम घातली, त्यावेळेस अल्ली वेरदीखानाचा पुतण्याचा पुत्र कटा प्रांतामध्यें कांहीं बंड करीत होता, तें मोडावयास अल्लीवेरदीखान बाहारांतून कांहीं सैन्य घेऊन कटा प्रांताकडे गेला. मग तें बंड मोडून तो मोरशेदाबादेस जाणार होता, परंतु मराठे बाहारांत शिरल्याचें वर्तमान ऐकून, त्यांचा पारिपत्याकरितां त्वरेनें आला; तेसमयीं मराठी लष्कर सुमारें दहा बाराहजार होतें, परंतु लोकांमध्यें पन्नास हजार अशी आवाई असे.

अल्ली

अल्लीवेरदीखान यापाशीं तीन साडेतीन हजार सुमारें स्वार व चार हजार सुमारें पायदळ असे तरी त्याणें मराठ्यांवर चालून जावयाविषयीं विलंब न केला. परंतु त्याचा जय न झाला; त्याचा लष्करासभोंवता मराठ्यांचा वेढा पडून त्याचें सर्व सामान लुटलें; तेणेंकरून ते बहुत कष्ट पावले, आणि कित्येक मेले गेले; व कित्येक पळाले. शेवटीं स्वार व पायदळ मिळून त्यापाशीं तीन हजार उरले. तेव्हां त्याणें विचार केला किं, मराठ्यांचे हातीं लागावें त्यापेक्षां युद्ध करून मरावें अथवा त्यांस मारून वाट धरावी, यांत उत्तम आहे. असा निश्चय करून मोठ्या निकरानें युद्ध करतां करतां खटवा पर्यंत पोंहचला. त्या युद्धांत अल्लीवेरदीखानाचा लष्करांत मीरहबीब होता, तो पहिले दिवशींच युद्धाचे प्रसंगीं प्रारंभींच धरिला; त्यानंतर त्याणें मराठ्यांचा पक्ष स्वीकारून अशीं उत्तम कामें केलीं किं, भास्करपंत नामें त्या लोकांत मोठा सरदार होता त्याचा तो परम विश्वासू जहाला. अल्लीवेरदीखान खटव्यास पोंहचला. त्यासमयींच मीरहबीब याणें त्यापासून कांहीं शिपाई मागून घेऊन मोरशेदाबादेस चालिला; तेथें त्याचा भाउ कैदेंत होता त्यास सोडविला, आणि त्या शहरचा रहाणारा जगतशेट अलमचंद नामें मोठा सावकार होता, त्याचें घर लुटून पंचवीस लक्ष रुपये काढून भास्करपंतास जाऊन मिळाला. त्यास द्रव्याचा लोभ दाखवून बंगाल्यांत राहून घेतला.

तेव्हां त्याचा मसलती प्रमाणें भास्करपंत माघारा फिरून कांहीं युक्तीनें हुगळी शहर हस्तगत केलें. त्यापुढें खटव्यापासून मिदनापूर पर्यंत बहुतेक मुलुख त्याचे हातीं लागला. त्यावेळेस हुगळीचे नदींत पाणी भरून आलें; यास्तव नदी उतरून पार जाघेना तेणेंकरून मोरशेदाबाद परगण्यामध्यें प्रवेश झाला नाहीं. असें असतां दिल्लीहून बादशाहाचा कोणी कारभारी बंगाल्याची खंडणी मागावयास अल्लीवेरदीखानाजवळ आला. तेव्हां त्याणें उत्तर केलें किं, जोंपर्यंत मला मराठ्यांचा उपद्रव असेल, तावत्काळपर्यंत अनुकूलता नाहीं यावेळेस हेंच योग्य किं, स्वामींनीं माझा पुष्टीकरणार्थ लष्कर पाठवून रक्षण करावें. असें त्यास बोलून वराड प्रांतांतील रघुजी भोंसल्याचा मुलुख लुटावयाकरितां पेशव्यांस सुचना केली, आणि त्या कामाकरितां कांहीं द्रव्य पाठविलें तें त्यास न पोंहचतां उद प्रांताचा नवाबानें मध्येंच लुटून नेलें.

अल्लीवेरदीखान याणें पेशव्यास आणि बादशाहास कुमक मागीतली, तथापि आपल्या कामांत अत्यंत सावधपणें राहिला तो असा.

आपले

आपले मुलखाचे शिपाई आज्ञेंत वागणारे असे सारे जमा करून पाउसकाळ जातांच, खटव्यामध्यें भास्करपंताचा लश्करावर एकाएकी जाऊन पडावयाची तयारी सर्वप्रकारें केली. आणि नदीचें पाणी उतरलें नसतांहि हुगळीची नदी व आजीनदी यांमध्यें होडयांचे पूल बांधून दोन्हीं नद्या उतरून पलिकडे जाताना आजीनदीचा पूल कांहींसा तुटला तेणेंकरून पंधराशें माणसें वाहून गेलीं; एवढें विघ्न झालें तरी, तो रात्रीसच भास्करपंताचा लश्करावर अकस्मात् छापा घालून, मग त्याणें मराठ्यांस असें भयप्रदर्शन केलें किं ते लोक लढाई नकरितां पूर्वेकडे रानांत पळून गेले. त्यांचा कित्येक वेळ अल्लीवेरदीखानास ठिकाणा लागला नाहीं, मग तो तेथून माघारा गेल्यावर ते मराठे मिदनापूर परगण्यांत शिरले; मग अल्लीवेरदीखान आपल्या पाठीस लागला असें पाहून ते त्याशीं विशेष युद्ध नकरितां, आपले स्थानीं वराडांत माघारे गेले. ते ठिकाणीं पोंहचल्याचे पूर्वीच रघुजी भोंसला आपल्या लश्करासुद्धां करनाटकांतून येऊन वराडास पोंहचला होता; त्याचा दिवाण भास्करपंत याणें बंगाल्यांत सत्ता केली त्या पुष्टीकरणार्थ निश्चय करून तो जा वाटेनें पूर्वी बंगाल्यांत गेला होता, त्याच वाटेनें भोंसलाहि जाऊं लागला. हें वर्तमान दिल्लीचा बादशाहास कळलें त्याणें उदधा नवाब सफदरजंग यास आज्ञा केली किं, मराठ्यांस आपली मर्यादा सोडून, बाहेर जाऊं देऊं नये; याशिवाय त्या कामास पेशव्यानें अनुकूल व्हावयाविषयीं बोलणें लाविलें, व तो वश व्हावा म्हणून अल्लीवेरदीखानाकडील आजिमाबादेचा खंडवसूल व्हावयाचा होता त्यापैकीं चवथाई ऐवज घ्यावयाविषयीं बाळाजी बाजिराव यास पत्र पाठविलें. त्याखेरीज माळव्याची सनद देऊं असें वचन दिलें. या आशेनें पेशवा माळवा मुलुख सोडून सन सत्राशें त्रेचाळीसांत आल्हाबादेवरून मोरशेदाबादेस पोंहचला. तो तेथें असतां त्याणें अल्लीवेरदीखानास बादशाहानें आपणास देवविलेल्या पैक्याची निकड लाविली. कांकि, त्यास ठाउक होतें किं, राजास जें कांहीं मागणें तें संकटसमयीं मागीतलें असतां, तो उदारपणें देतो. दुसरें रघुजी भोंसला मोठ्या सैन्यासहित मोरशेदाबादेवर युद्धास येणार हेंहि त्यास कळलें होतें, तेव्हां अल्लीवेरदीखानानें हिशेब चुकवून देतों असें कबूल केले; ती बातमी रघुजीस कळली तेसमयीं रघुजी भोंसला मोरशेदाबादेकडे येत होता तो डोंगराकडे पळून माघारा गेला. ते समयीं अल्लीवेरदीखान मोठ्या त्वरेनें त्याचे पाठीस लागला. त्यावरून बाळाजी बाजिरावानें कल्पना केली किं, मराठे

यांचे

यांचें लश्कर बंगालीलोकांचे हातीं लागणार नाहीं; ह्मणून आपण लश्कर सुद्धां निराळ्या वाटेनें बंगाल्याचा लश्करापुढें जाऊन रघुजीचा पाठीस लागला. नंतर त्यास गांठून उभयतांचें युद्ध होऊन रघुजी पराभव पावला. त्यानंतर बाळाजी आपणास पादशाहानें माळव्याचा अधिकार देऊं केला होता, ती सत्ता सुदृढ करावयास सन सत्राशें चाळिसांत गेला. तो माळव्यास जाऊन पोंहचला तेव्हां, महंमदशाह बादशाह यास बाळाजीला तो अधिकार द्यावयाचें अगत्य मोठें पडलें कांकि, बाळाजीनें त्याचे सेवेंत अंतर किमपि नकेलें; तथापि त्यास एवढा मुलुख दिल्यानें, आपला मान हलका होईल ह्मणून, आमदनामें आपला पुत्र तो त्या अधिकारीं नाममात्र मुख्यत्वें कल्पून माळव्याची सनद बाळाजीस दिली. त्यानंतर पेशवा बाळाजी सातान्यास येऊन, त्याणें आपल्या मर्यादेप्रमाणें राजास हिशेब दिला. ते वेळीं आपण राजाचा मुख्य सरदार अशा अर्थें समजाविलें; परंतु पुढेंही त्या राजाची तादृश सत्ता नाहींशी झाली तरी प्रतिवर्षीं स्वयें जाऊन त्याप्रमाणें हिशेब समजावीत असे.

पेशव्यानें रघुजी भोंसल्याचा पराभव केला तेव्हां रघुजीनें पेशव्याकडे वकील पाठवून स्नेह करण्याचें बोलणें लाविलें, किं, तुह्मीं राजनीतिप्रमाणें जी कांहीं वर्तणूक करितां ती माझा व सर्व मराठे लोक यांचा हितास फार उपयोगी, असें मला आतां समजलें. याप्रमाणें बोलण्यांत अंतःकरणाची निर्मळता दाखविली असतांही तो भोंसला पुण्यावर लश्कर सहित येत होता. अशा समयीं प्रतिनिधी शरीर प्रकृतीनें असावध झाला असे; त्याचा मुतालीक यमाजी शिवदेव, तो रघुजीस अनुकूल न होतां दाभाडयास अनुसरोन पेशव्याशीं वक्र झाला असे, आणि दाभाडा पुण्यावर येणार होता. तेव्हां पेशव्यानें हा सर्व प्रकार ध्यानांत आणून विचार करूं लागला किं, रघुजीला यासमयीं बंगाला द्यावा किंवा सर्व मोठे मोठे मानकरी मराठे सरदार लोक यांशीं लढावें; असें मनन करून या दोहोंमध्यें रघुजीस बंगाला द्यावा हेंच बरें पडेल, याप्रमाणें निश्चय ठरून रघुजी आणि पेशवा यांचा तह राजा मध्यस्थ होऊन झाला. त्यांत पेशव्यानें आपला पूर्वजांचा संपादित जो मोकासा व आपण मिळविलेली जहागीर आणि पूर्वजार्जित जा जहागिरी त्या व कोंकण आणि माळव्याचें आधिपत्य, याशिवाय आल्हाबाद, व आग्रें, व आजमीर, यांची खंडणी आणि पाटणाप्रांतांतील तीन तालोके व अर्काट परगणा यांतील जमेपैकीं वीस हजार रुपये; याखेरीज रघुजीचे सत्तेंतील कित्येक गावें, हें सर्व पेशव्यानें अनुभवावें

तावें अशी राजानें सनद दिली. रघुजीस सनद दिली किं, लखनाऊ, व पाटणें, व पेनबंगाला, याचा वसूल, व खंडणी त्याणें घ्यावी. याखेरीज वराडापासून कटाक पर्यंत खंडणी जमा करावयाचें काम रघुजी भोंसल्यानें करावें. याप्रमाणें राजानें उभयतांस दोन संदा दिल्या, त्यावेळेस असें ठरलें किं, दमाजी गाइकवाडानें माळव्यांतील खंड घेतल्याचा हिशेब पेशव्यास दाखवून तो ऐवज त्याचे हवालीं करावा. असेंच दाभाडयाकडेही राजाचें देणें पुष्कळ होतें परंतु त्यावेळेस ती चौकशी झाली नाहीं.

मराठयांमध्यें असें वर्तमान असतां, निजामउलमुलुखाचा पुत्रानें बंड केलें, तें मोडावयाकरितां तो निजाम दिल्लीहून निघोन ओरंगाबादेस गेला, तेथें युद्धप्रसंगें महत्प्रयासेंकरून पुत्र स्वाधीन करून घेतला. नंतर असें पाहिलें किं, कृष्णेचे दक्षिणेस मोंगलांचे सत्तेंतील मुलखीं अव्यवस्था, व कर्नाटकप्रांतांत अर्काटचा नवाब सफदरअल्ली, यास त्याचा मेव्हणा मोर्तिजाखान याणें घातेंकरून मारिला, हें सर्व ध्यानीं आणूनऐसें समजला किं, यासमयीं आपलें आधिपत्य स्थापावयास संधि ठीकहीच आहे. म्हणून सन १७४३ शें त्रेचाळिसांत हैदराबादेहून मोठें लश्कर जमा करून कर्नाटकांत चालिला, तो तेथें कित्येक मुलुख घेऊन एका वर्षानंतर त्याणें मराठे सातान्यास मोठी सेना जमा करिताहेत असें आणून त्याचा मनांत कांहीं शंका उत्पन्न झाली यास्तव तो तेथून माघारा फिरून हैदराबादेस निघाला; तेसमयीं आपला हस्तक अनवारउदीन याला कर्नाटकपेन घाटीं ठेविला, आणि आपला नातू हीदायत मोयदीनखान, त्यासच मजफरजंग म्हणत. त्या नामें तो मोठा विख्यात होता; त्याला कर्नाटकउंच प्रदेश जास बालाघाट म्हणतात, तेथें स्थापून त्यास आदोणी परगणा जहागीर देऊन त्याचें रहावयाचें मुख्य स्थान विजापुर+ केलें. आणि आपण हैदराबादचा वाटेनें जात असतां त्यास असें वाटलें किं, आपल्यावर मराठे यांची मसलत नाहीं म्हणून आपल्या राज्याचा बंदोबस्त करीत तेथेंच राहिला. तेव्हां निजामउलमुलुख आपली मर्यादासोडून दूर आहे असें समजून मराठयांहीं त्या मुलखीं जाऊन कांहीं स्वार्थ साधावा परंतु तें न झालें, कां किं, रघुजी भोंसला याणें आपल्या सत्तेंत आणिलेला जो बंगाल्यासंबंधी मुलुख होता तो त्याचे हातून गेला असें त्यास तो मातब्यान हस्तगत कराया-

---

\+ अनवारउदीन याचें पहिलें रहायाचें ठिकाण, दाउदखान वनेवायतें नामें यवनजातिविशेष नवाब याचे वेळेपासून झालेली अर्काट प्रांतीं पुरातन राजधानी होती, तीच त्याला रहावयास मुख्य जागा केली.

विषयीं

विषयीं उद्युक्त झाला. पेशव्यास शंका उत्पन्न झाली कि, आपण कबूल केल्याप्रमाणें रघुजीचें निवारण नझालें यास्तव आपणास बादशाहाचा शब्द लागेल. याकरितां दक्षिणेंत कामें बहुत आहेत असें मिष करून उत्तरेस गेला नाहीं.

रघुजी भोंसला वराडांत पाउसकाळीं पोंहचला, मग पर्जन्यकाळ गेल्यावर त्याणें आपला प्रधान भास्करपंत व कित्येक नामांकित सरदार यांजबरोबर वीस हजार स्वार देऊन उरसा प्रांतांतून बंगाल देशांत पाठविले. तेथें अह्लीवेरदीखानानें त्यांशीं युद्धाविषयीं आपल्या लश्कराची तयारी केली, परंतु कपटानें आपलें कार्य साधावयाकरितां त्यास तुमचा आमचा तह असें समजावून, भास्करपंत व त्याचे बरोबरचे मोठे मोठे सरदार वीस आसामी मेजवानीस बोलावून त्यांवर मारेकरी घालून ते एकवीसही मारून टाकिले. तेणेंकरून मराठ्यांचें लश्कर युद्ध नकरितां ज्या वाटेनें आलें त्या वाटेनें माघारें गेलें; तें जातांना त्यांतील कित्येक लोक वाटेंत निराळे सांपडले ते गांवकरी लोकांनीं यासास्तव मारिले.

त्यासमयीं मराठे यांचें कार्य सिद्धीस नगेलें तथापि ते आपला समय पाहात बसले, मग पुढें थोडक्याच वेळानें त्यांस तसाच समय अढळला. तो असा, अह्लीवेरदीखानाच्या लश्करांत आफगाण लोक होते ते कांहींसा दंगा करूं लागले; त्यांचा पारिपत्यास अह्लीवेरदीखान उरसाप्रांतीं बंदोबस्तास ठेविलेल्या शिपायांतील कांहीं लोक बरोबर घेऊन तेथें हिंदू अधिकारी ठेवून आपण त्यांवर गेला. हें वर्तमान रघुजीला जासुदांनीं कळवितांच त्याणें उरसाप्रांतीं स्वारी घालून कित्येक परगणे हस्तगत केले; आणि बाकी मुलखाची खंडणी तीस कोटी रुपये मागूं लागला. तेवेळेस अह्लीवेरदीखान याणें कांहीं युक्तीनें त्यास भुलवून, कित्येकदिवस पैका नदेतां घालविले; मग आफगाण लोक स्वाधीन जह्यात्यावर त्यास असें उलट उत्तर दिलें किं, जेणेंकरून उभयतांचा तह राहिला नाहीं. मग दोघांचा युद्धास प्रारंभ होऊन कित्येकावेळानें मराठे लोकांचा कांहींसा मोड होऊन युद्ध राहिलें. कांकिं, त्यावेळेस रघुजीस आपल्या मुलखीं जावें लागलें, त्याचें कारण असें कीं, गोंडवणांतील देवगडचा तक्ताविषयीं तेथचा राजाचे पुत्र भांडूं लागले; त्यासमयीं तो राजा मेला होता, त्याचें नाव बखतबुलंद, तो पूर्वीं औरंगजेबानें बाटविलेला असे; त्याचा पुत्रांत एक वलीशाह नामा होता त्याणें आपले दोघे भाऊ कैद केले, आणि दुसरा एक चांडाचा राजा नीळकंठशाह होता, तोही

तोही औरंगजेबानें बाटविलेला होता त्याला आपल्या स्नेहांत घेऊन, मराठे यांस चौथ व सरदेशमुखी नद्यावी असें केलें याप्रमाणें ते दोघे स्वतंत्रपणें वागूं इच्छित असतां, त्याचा शेवट असा झाला किं, रघुजी भोंसला याणें उभयतांचा मुलुख घेतला. तेव्हां वलीशाहानें आपले दोघे भाऊ बंदींत ठेविलेले होते, त्या एकास रतनपूर दिलें; आणि त्याचा खर्चाप्रमाणें कांहीं पैका आपल्या खजिन्यांतून द्यावयाचा कबूल केला असें सन सत्राशें चव्वेचाळिसांत जालें. अद्यापि त्याचे वंश्य नागपुरांत आहेत, त्यांस आजून त्या देण्यापैकीं कांहीं मिळतें. दुसरा भाऊ अकबरशाह तो निजामाचा आश्रयानें कांहीं वर्षें सुख पावोन मेला गेला.

त्यापुढें सन सत्राशें सत्तेचाळिसांत आफगाण लोकांचा बादशाह आमेदशाह अबदाली,+ तो प्रथम हिंदुस्थानांत स्वाऱ्या घालूं लागला, त्याला पूर्वीं नादरशाह नामा फारशी लोकांचा बादशाहाचा आश्रय असे मग काळेंकरून तो आफगाण लोकांचा बादशाह झाला. त्यानंतर त्याणें सन सत्राशें अठ्ठेचाळिसांत दिल्लीवर स्वारी केली, तेव्हां दिल्लीचा बादशाहानें आपल्यापुत्राबरोबर फौज देऊन त्यास काबुलपर्यंत मागें हटविलें, आणि तो माघारा दिल्लीस येई तोंपर्यंत त्या बादशाहाचा काळ झाला. नंतर तो आमेदशाह त्याच वर्षाचा एप्रेलाचे समाप्तीस तक्ताधिपती झाला. त्याणें निजामउलमुलुखास वजिरीचा अधिकाराविषयीं बहुत आग्रह केला. परंतु तो स्वीकारीना. कांकिं, त्याचें वय फार दिवसांचें होतें, यास्तव तो ह्मणे किं, फार वृद्ध मी झालों आतां या कामास कसा योग्य होईन; तेव्हां आमेदशाहानें ती पदवी सफदरजंगनामा उदचा ⊕ नवाब यास दिली. त्यानंतर दीड महिन्यानें जून महिन्याचे एकुणतिसावे तारिखेस, निजामउलमुलुख ब्रह्मणपुरीं मृत्यु पावला. तेवेळेस त्याचा वयाला एकशें चार वर्षें झेतीं, त्यामागें त्याचे पुत्र सहा होते, त्यांत एकाचें नाव गाजीवदिन, दुसरा नासिरजंग, तिसरा सलाबतजंग, चवथा निजामअल्ली, पांचवा महंमदसरीफ, सहावा मीरमोंगल, यांत प्रथम दोघे एका आईचे दुसरे चार त्यांचा आया निरनिराळ्या होत्या. निजामउलमुलुख मरण पावला, त्यावेळेस गाजीवदिन दिल्लीस होता ह्मणून दुसरा नासिरजंग तोच तक्ताधिपतीपणा करूं लागला. त्यानंतर दोन तीन महिन्या-

---

\+ ते आफगाण लोक यांचा नावें हिंदुलोकामध्यें तीन प्रसिद्ध आहेत, एक दुराणी, अबदाली, गिलजा.

---

⊕ उदप्रांतास अयोध्या ह्मणतात.

नी

नी दिल्लीचा बादशाहानें आपल्या हातचें मान पुरःसर पत्र नासिरजंगाला पाठविलें किं, तुह्मीं भेटीस यावें तेव्हां नासिरजंग नर्मदापावेतों पोहचला नंतर त्यास बादशाहाचें मनायीपत्र आलें; त्याचें कारण काय तें समजत नाहीं. तें पत्र त्याला पावलें असतांही, तो नाशिरजंग उदासचित्त न झाला; कांकि, त्याचा पुतण्या, मुजाफरजंग याणें चंदासाहेबाचे साहाय्यें व फ्रांशीस लोकांचा आश्रयें करून दंगा आरंभिला होता, तें वर्तमान त्यास कळलें त्यानंतर त्यास दुसरें वर्तमान कळलें किं, निजामउलमुलुखानें आपला हस्तक अनवारउदीन कर्नाटकपेनघाटीं ठेविला होता तो मृत्यु पावला, त्यानंतर नाशिरजंगानें रघुजी भोंसल्यास पत्र लिहिलें किं, यासमयीं तुह्मीं लश्कर पाठवून जर माझें साहाय्य कराल तर मी तुह्माला कांहीं मुलुख देईन. याखेरीज जे कोणी मोंगल संबंधी लोक होते त्यांस लिहिलें किं, मी तिकडे येतों, त्यास तुह्मीं मला येऊन मिळायास सिद्ध असा. मग तो दक्षिणेस कर्नाटकाकडे चालिला तेव्हां, ते जाऊन मिळाले; त्यांत मुरारराव घोरपडा असे, त्यास निजामउलमुलुखानें घुटीची जहागीर दिली होती ह्मणून त्याला त्याकडे जाणें अवश्य पडलें. दुसरा म्हैसुरचा राजा, व कित्येक नवाब व अनवारउदीनाचा दुसरा पुत्र महंमद अल्ली तो.

हे सर्व लोक अंगें किंवा लश्कर पाठवून त्याचें साहाय्य करीत असत. महंमद अल्लीचा स्नेहास्तव मद्रासचे इंग्रेज लोकही, त्या नाशिरजंगाचे उपयोगी पडले.

याप्रमाणें निजामाचें लश्कर कर्नाटकीं गेल्यानें पेशव्यास आपलें कार्य साधन करावयाचा अवसर बरा होता, परंतु सातान्यांत कांहीं विशेष वर्तमान झाल्यामुळें त्याला अवकाश सांपडला नाहीं; तो प्रकार असा. शाहुराजा कित्येक वर्षें भ्रांत झाला होता, त्याचा शरीरीं समाधान नाहींसें होऊन ती भ्रांती गेली; ते समयीं त्याजवळ कोणी लोक होते त्यांहीं मसलत केली किं, राजानें दत्तपुत्र घ्यावा. त्याणें तर भ्रांतव्हायाचे पूर्वींच आपला पुत्र मेला तेवेळेस सांगीतलें होतें किं, कोलापुर्करसंभाजीयास जर संतती होऊं लागली, तर मी त्यास आपल्या गादीचा अधिपती करीन. मग संभाजीला पुत्र झाला नाहीं, ह्मणून विचार ठरला किं, मालोजीचा बंधू शहाजीचा चुलता होता, त्याचा कोणी वंश घ्यावा. मग त्याचा शोध बहुत केला परंतु तो कोणास सांपडेना. त्यावर शाहूनें महादाजीपंत पुरंद्ऱ्या, व गोविंदराव चिटणीस, यांस सांगीतलें किं, हालीं ताराबाई सातान्यास आहे तीणें आपला नातू दुसऱ्या शिवाजीचा पुत्र, तो सत्रासें यांत आपले

पले बापाचे पाठिमागें जन्मला; त्यास कुठेतरी लपवून ठेविला त्याचा शोध करून आणावा. तेव्हां ताराबाईस विचारिलें, तिणें सांगीतलें किं, शिवाजी मेला तेव्हां त्याची स्त्री भवानीबाई गरोदर होती; तिला पुत्र झाला मग शिवाजीचे पाठिमागें राजाराम राज्य करीत असतां त्याला कळलें तर तो त्या पुत्रास मारून टाकील यास्तव मी त्याला पन्हाळ्याहून काढून गुप्तपणें नेऊन तुळजापुरीं त्याचा मावशीचे स्वाधीन केला; तिणें तेथून बारशीस नेला, तेथेंही तो अप्रसिद्धपणेंच राहिला. तो अद्यापि आहे.

हें वर्तमान शाहूची थोरली बायको शिरक्यांची कन्या सकवारबाई नामें होती तिला कळलें, तेव्हां ती फार रुष्ट झाली; कांकिं, तिची वासना अशी होती किं, कोणी एखादा लहानसा मूल तक्ताधिपति निमित्तमात्र करून आपण सर्व कारभार चालवावा. तिणें ताराबाईची गोष्ट ऐकून त्याचा निवारणार्थ पत्र लिहिलें किं, हालीं ताराबाईचा नातू निघाला हा खोटा, त्यास तुह्मीं त्याचा निवारणास अनुकूळ व्हाल तर मी तुमचें साहाय्य होईल तितकें करीन; आतांच मला यमाजी शिवदेव, व श्रीपतरावाचा पुत्र, जगजीवनराव प्रतिनिधी, व दमाजी गाइकवाड, हे अनुकूळ आहेत. याशिवाय घाटमाथा व कोंकणांत शिबंदी ठेवावयास कारभारी लोक पाठविले आहेत. याप्रमाणें सकवारबाईनें बंदोबस्त केला, आणि आपला मनोरथ सिद्धीस जावया करितां त्याची प्रसिद्धी लोकांत नव्हावी म्हणून, ती नित्य बोलत असे किं, मी आपल्या धण्याचे बरोबर सती जाईन.

असें असतां बाळाजी बाजिराव, पंस्तीस हजार लश्कर बरोबर घेऊन सातान्यास आला. तो सकवारबाईचा मनसोबा जाणत असे, आणि ती त्यास मारेकरी घालून मारणार हेंही त्यास कळलें होतें; तथापि त्याणें तो द्वेष प्रसिद्ध न केला. कांकिं, ब्राह्मणाचें माहात्म्य फार वाटलें, तें अधिक नव्हावेंसें मराठ्यांचा मनांत आहे, अशी त्याचा चित्तांत शंका होती. यास्तव तो विचार करी किं, आपण सर्वसत्ता करावी किं, ताराबाईचा पक्ष स्वीकारावा; मग तसेंच केलें. सकवारबाई तर सारावेळ राजाजवळच असे कदाचित् ती जवळ नसल्यास तीचा पक्षाचे लोक कोणीतरी जवळ असत; तथापि बाळाजीनें राजाशीं एकांत करून त्यापासून सनद घेतली, किं, मराठ्यांचा सर्व राज्याचा कारभार पेशव्यानें करावा, आणि लोकिकांत राजाचा मानमात्र रक्षावा. ताराबाईचा नातू अधिपती करून, तो व त्यास पुढें संतती होईल तिचा उत्तम रीतीनें सांभाळ करावा. याशिवाय त्या सनदेंत लेख होता किं, कोलापुरसंस्थान संभाजीचें तें पृथक्.

त्यानंतर

त्यानतर लवकरच राजाचा काळ झाला. तेसमयीं सातान्यांत बाळाजीचा स्वारांची टोळी धांवत धांवत येऊन, प्रतिनिधी व त्याचा मुतालिक या उभयतांचा पायांत बिडया घालून दोघास दोहों किल्ल्यांवर दूर दूर ठेविले. तेवेळेस पेशव्याची शिबंदी सातान्या किल्ल्यावर चढली; आणि रामराजा ताराबाइचा नातू तो कोलापुराहून येत होता त्यास आणावयाकरितां कित्येक लोक सामोरे गेले. असें झालें तेव्हां सकवार बाई समजली किं, मीजें मनांत योजिलें तें लोकांत प्रसिद्ध झालें आतां तें कांहीं एक सिद्धीस जात नाहीं बाळाजीनें तर तीणें पहिल्यानें म्हटलें किं, मीं सती जाईन, त्यापासूनच मोठ्या मेहनतीनें तें लोकांत प्रसिद्ध केलें; कांकिं, तीचें सती जाणें त्यास अत्यंत हितावह; यास्तव तिला तें आवश्यक पडावयाकरितां त्याणें तो उद्योग केला. मग शाहू मेल्यावर बाळाजीनें सकवार बाईला कपटानें विनंतीपूर्वक आग्रहाचा निरोप पाठविला किं, मीं तुमचे आज्ञेंत वागणारा इमानी चाकर असतां तुह्मीं कां सती जातां; आपण न जावें. असें तिला सांगोन तिचे भाऊ शिरके, कुवांरजी त्यांस बोलाऊन सांगीतलें किं, तुमची बहीण सती न गेली तर तुह्मीं व तुमचे जातीचे मराठे यांचा मान रहाणार नाहीं; त्यास तिणें तें अवश्य केलें पाहिजे, जर तुह्मीं करवाल तर तुह्मास कोंकणांत जहागीर देऊं, अशा कृत्रिमें करून, बाळाजी बाजिराव पेशवा याणें आपली मसलत सिद्धीस नेली. ती सकवारबाई अशा अडचणी उत्पन्न करून सती घालविली. त्यापेक्षां जर निजकडे कांहीं अन्याय आहे असें मिष करून तिचा शिरछेद करविता तर लोकांत त्याचा पौरुषास एवढें दूषण नलागतें; जां शास्त्रजाणत्यांस हें यावत् वर्तमान ठाउक आहे, ते ह्या केवळ अधर्मसा जाणून या कर्मास अश्लाघ्य मानितात.

सन सत्राशें पन्नासां पासून, सन सत्राशें छप्पन्न पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून, भाग सत्रावा.

## अनुक्रमणिका.

पेशव्यानें रघुजी भोंसला व इतर सरदार वश केले.
पुणें मराठे लोक यांची राजधानी झाली.
पेशवा व सदाशिवराव भाऊ यांमध्यें कांहीं कलह उत्पन्न झाला.

रामचंद्र

रामचंद्रबाबा शेणवी याचा उद्भव.

पेशव्यानें गाजीवदिन निजामउलमुलुखाचा वडील पुत्र, याचा पक्ष अंगीकारिला; आणि फ्रांशीस लोकानीं मुजाफरजंगाचा पक्ष धरून त्यास निजाम पदवी दिली.

मुजाफरजंगाचा मृत्यु, व सलाबतजंगास निजामपदवीचा लाभ.

पेशवा गाजीवदिनाचा कामासाठीं कृष्णेपर्यंत गेला, परंतु ताराबाई व गाइकवाडाचा कृत्रिमामुळें माघारा आला.

राजाराम मोठ्या अडचणीनें बंदींत पडला.

सलाबतजंग फ्रांशीस लोकांचा आश्रयेंकरून गांवें लुटित पुण्याकडे गेला.

रघुजी भोंसल्यानें काय काय संपादन केलें तें प्रकरण.

मीरहबीब याचा मृत्यु.

दिल्लीकडील कांहीं वर्तमान व मराठे त्या कामांत शिरले तो विस्तार.

गाजीवदिन शिंदा व होळकर यांचा आश्रयेंकरून दिल्लीहून दक्षिणेस चालिला. तो आपली निजाम पदवी पावेल असें सिद्ध झालें असतां आपण मृत्यु पावला.

सलाबतजंग निजामपदवी पावल्यावर त्याणें पेशव्यास काय काय दिलें तो प्रकार.

पेशव्यानें कर्नाटकीं स्वारी केली.

पेशव्यानें आपला भाऊ रघुनाथराव गुजराथेंत पाठविला तो तें कार्य करून हिंदुस्थानांत गेला.

रघुजी भोंसल्याचा मृत्यु व त्याचा चौघां पुत्रांची गोष्ट.

पेशवा व ताराबाई यांची समजूत झाली ती कथा.

दिल्लीकडचें कांहीं वर्तमान.

दिल्लीचा आमेदशाह पादशाह याचे गाजीवदिनाचा पुत्रानें डोळे काढून त्यास कैदेंत ठेविला, आणि जानदारशाह म्हणून पूर्वींचा बादशाह याचा नातू तक्ताधिपती केला.

पेशव्यानें आंग्र्याचा मुलुख घ्यावयाविषयीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें करून तें काम झाल्याचे पूर्वींच, त्याला सावनूर घ्यावयाकरितां तिकडे जावयाचें अगत्य पडलें.

इंग्रेजाचीं लढाऊ जाहाजें जाऊन सुवर्णदुर्ग किल्ला घेतला, तो मराठे यांस सोंपविला.

मराठे

मराठे यांणीं आंग्र्याचा मुलुख व किल्ले घेऊन विजयदुर्गास घेरा घातला असतां त्यांचे कुमकेस इंग्रेजांचीं जहाजें जाऊन त्यांहीं मराठे लोक आपल्या लोकांत नघेतां तो किल्ला घेतला.

मराठे लोक जाऊन त्यांणीं सावनूर किल्ला घेतला.

फ्रांशीस लोक यांस दक्षिणेंतून काढावयासाठीं पेशवा व सलाबतजंग यांणीं मसलत केली, ती बसीचा युक्तीपुढें सिद्धीस गेली नाहीं.

पुण्यामध्यें पेशवे, आणि मुंबईचे इंग्रेज यांची समजूत झाली तो प्रकार.

## भाग सत्रावा.

शाहूच्या मृत्यूचे अगोदर पेशव्यानें राजाचें नाव करून यशवंतराव दाभाडे, व रघुजी भोंसले, व इतर जहागीरदार सरदार यांस बोलाविले; तेसमयीं रघुजी भोंसले आणि जहागिरदार आले, परंतु दाभाडे व त्यांचा मुख्य सरदार दमाजी गाइकवाड न आला. यां सर्वांस बोलावण्याचें कारण हेंच किं, यांत आपणाविषयीं कोणकोणाचीं मनें कसकशीं आहेत तें समजावें; व आपला जो कर्तव्यार्थ त्यास ते अनुकूळ व्हावे. त्यांत रघुजी भोंसला तर आपली वृद्ध दशा व बाळाजीचा प्रारब्धाची चढती, व आपणास प्रतिवर्षीं बंगाल्यांत स्वारी करावयाची आवड, व नाशिरजंगाबरोबर आपला पुत्र दहा हजार फौज घेऊन करनाटकांत गेला, त्या योगें त्वसामर्थ्याची न्यूनता; या सर्वप्रकारांहीं पेशव्यास प्रतिकूळ होणें ठीक नाहींसें समजून त्यास वश झाला. परंतु त्याणें एकदां राजारामराजा यास भोंसल्याचा वंश नव्हेसा मानिला; मग ताराबाईचें व त्याचें एकताटीं भोजन झालेलें पाहून मानूं लागला. तेव्हां बाळाजी बाजिराव पेशवा याणे आपली मसलत सिद्धीस गेली तें व रघुजी भोंसला आपणास वश झाला तें प्रसिद्ध व्हावयाकरितां सातान्यांत ठेविला, आणि आपण पुण्यास गेला. तेसमयीं रघुजीस बोलिला किं, तूं दुसरे सर्व जहागिरदार घेऊन पुण्यास ये; मग राजानें सांगीतलेल्या यादीपैकीं राहिलेलीं सर्व कामें करूं. नंतर तो त्याप्रमाणें सर्वांस जमा करून ते व आपण मिळून त्याजवळ गेले. त्यापासून पुणें मराठे लोक यांची मोठी राजधानी झाली. हें वर्तमान सनसत्राशें पन्नासांत झालें.

याप्रकारें बाळाजी बाजिराव पेशवा याचा मनोदयानुरूप सर्व कार्यें झाल्याचे आनंदेंकरून तो पुढें ताराबाई कांहीं गडबड करील किं, नकरील

तें समजलाच नाहीं. ती सत्तर वर्षांची म्हातारी होती, तिणें सूज्ञ आणि जातीची उंच अशा स्त्रीचा अपमान करणारा निःसंशय धोका पावेलसें समजावून त्यास सावध केला. तो प्रकार असा, सिंहगडीं तिचा भर्त्याचें थडें होतें, त्याचें दर्शन घ्यावयाचें मिष करून तेथें गेली. आणि पंत सचिव यास आपल्याकडे अनुकूळ करून घेऊन आपण स्वतः धनीपणा करावयाची मसलत योजिली. तेव्हां बाळाजीनें त्यास फार आग्रह करून पुण्यास बोलावून, तुम्हाला राज्यकारभारांतील बहुत कामें मिळतीलसें सांगून महल्प्रयासें वश केला. आणि सांगीतलें किं, माझ्या मसलतीप्रमाणें राजा रामाला वागवावा.

त्यासमयीं वराड व गोंडवण व बंगाला यांची सनद बाळाजीनें रघुजी भोंसल्यास दिली. या खेरीज प्रतिनिधीची जहागीर वराड प्रांताशीं, लागून होती तीही, रघुजीस दिली. यशवंतराव दाभाडे यांस गुजराथेचा निमे भाग दिला. राणोजी शिंदा त्यावेळेस मृत्यु पावला, त्याचा वडील पुत्र यास बापाचा अधिकार दिला. माळवा मुलुख याची जमा दीड कोट रुपये वर्षास होत, त्यांतून चौऱ्याहात्तर लक्ष होळकारास दिले. आणि साडेपांसष्ट लक्ष शिंद्यास दिले. बाकी साडेदहा लक्ष उरले, ते इतर जहागीरदार यांस वांटून दिले. त्यांत मुख्य आनंदराव पंवार हे सर्व पेशव्यास अनुकूळ होते; यांपासून त्यास विपरीत भावाचें भय नसे, सरलश्कर पदवी सोमवंशीचे कुळांत होती ती घेऊन लिंबाजी निंबाळकर यास दिली. हा सर्व बंदोबस्त राजाचे नावें झाला, परंतु लोकांत प्रसिद्ध होतें किं, हें कर्तृत्व पेशव्याचें.

जगजीवनराव प्रतिनिधी पेशव्यानें कैद केला होता, तो सोडून त्या बरोबर यमाजी शिवदेवही सोडिला. तो सुटका पावल्यानंतर त्याणें पंढरपुराजवळ सांगोला किल्ला आहे तेथें जाऊन बंड उत्पन्न केलें. मग सदाशिव चिमणाजीनें जाऊन त्यास जिंकिला. राजाराम सदाशिव चिमणाजी बरोबर सांगोल्यास होता तेथें त्याणें असें पत्र दिलें किं, सर्व राज्याचा कारभार पेशव्यानें करावा; आणि आपणास साताऱ्या भोंवता थोडकासा मुलुख खासगीकडे असावा; तें पेशव्यानें कबूल केलें परंतु राजाचा खासगीकडे किमपि न दिलें. तो विस्तार पुढें लिहिण्यांत येईल, त्या समयीं राजारामराजा याबरोबर बंदोबस्ताकरितां पुष्कळ सैन्य देऊन साताऱ्यास पोंहचविला.

इकडे पुण्यास पेशवा व त्याचा चुलत भाऊ, सदाशिवराव या उभयतां

तों मध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन त्या पेशव्यानें आपल्याहितार्थ सावधपणें जो जो नेम केला तो तो व्यर्थ होईलसा दिसूं लागला. त्या कलहाचें निमित्त असें, कोणी एक सावंताचे वाडिप्रांतांत आरवली गांवचा कुळकर्णी, रामचंद्र बाबा शेणवी, त्याचें पहिलें नांव रामचंद्र मल्हार होतें, तो आपल्या कुळकर्णी पणाचा हिशेबांत कांहीं न्यून पडलें म्हणून तेथून पळोन सातान्यास आला. त्यासच कचेश्वर बावा अतीतकर याणें आपल्ये चाकरीस ठेविला; त्यानंतर त्यापासून त्याणें बाळाजीच्या बापाचा आश्रय संपादिला होता, पुढें तो कारकुनी व शिपाईगिरी या दोहीं कामांत निपुण असा पाहून त्यास बाजिरावानें शिंद्याचा दिवाण केला. मग राणोजी शिंदा मेल्यावर त्याचा पुत्र जयापा शिंदा याचीही दिवाणगिरी आपण करावी म्हणून सदाशिवराव भाऊ यांस कांहीं लांच दिला, परंतु त्या जयापाचें व याचें वैमनस्य असे आणि मल्हारराव होळकर त्या रामचंद्र बाबास प्रतिकूळ म्हणून बाळाजीनें त्यास दूर केला. तेव्हां सदाशिव रावानें रामचंद्रास आपला दिवाण केला, आणि त्याचे मसलतीनें आपल्या बापाची पदवी मागूं लागला. तें मागणें बाळाजी मान्य करिना, कांकिं, त्यावर महादाजि पंत पुरंदऱ्याचा मोठा उपकार होता त्यास दूर करून ती जागा सदाशिव भाऊला द्यावी लागली. अशा हलक्या कारणानें पुढें द्वेष मोठा वाढला; मग सदाशिव भाऊ व होळकर आणि पेशवा व रामचंद्र यांचीं परस्परें वैमनस्यें पडण्याचें कारण तेंच. त्यामुळें तात्काळ कुप्रसंग आला असता, परंतु महादाजी पंत याचा उत्तमाचरणानें राहिला, तो प्रकार असा, सांगोळी किल्ला घेतल्यानंतर सदाशिवरावानें त्या वैमनस्यासंबंधें कोल्हापुरकर संभाजी याचा पक्ष धरिला, त्याणें त्यास आपला पेशवा करून त्यास पारगड व कलानिधी व चंदगडी हे तीन किल्ले आणि वर्षास पांच हजार रुपये उत्पन्न होत अशी जहागीर दिली, तेव्हां महादाजी पंत पुरंदऱ्यानें आपला अधिकार सोडून जागा रिकामा केला मग तो पेशव्यानें सदाशिव भाऊस दिला. नंतर तो कोल्हापुरकराची चाकरी सोडून पुण्यास येऊन बाळाजी बाजिरावाजवळ मुख्यलें कारभार करूं लागला.

शाहूचा मरणाचे पूर्वीं नाशिरजंग निजामाचा दुसरा पुत्र याणें बापाचा अधिकार चालविला होता, तो नाशिरजंग कर्नाटकीं मोठें सैन्य घेऊन चालिला. असें पूर्वीं लिहिलें आहे; त्यामध्यें गाजीउद्दिन निजामाचा वडील पुत्र तो मल्हारराव होळकर याचा हातें आपल्यास स्वतः निजामपदवी प्राप्त व्हावी म्हणून, पेशव्यास सहाय मागूं लागला. तेव्हां पेशवा याणें ती

गोष्ट

गोष्ट मानून त्याविषयीं दिल्लीच्या बादशाहास पत्र लिहिलें, आणि आपण सैन्य बरोबर घेऊन औरंगाबादेकडे गेला. तेव्हां ताराबाईची प्रसन्नता राखावयासाठीं सिंहगड देऊन त्याबदल तुंग व तिकोना, हे दोन किल्ले पंतसचीव यास दिले. त्याखेरीज सातान्यांतून आपले लोक काढून जे तेथचे पुरातन गडकरी होते त्यांचे स्वाधीन सातारा किल्ला करून, त्याहीं ताराबाईचे आज्ञेंत वागावेसें केलें. त्यावेळेस राजाराम राजा याला किल्ल्याचा खर्च खेरीज करून, खर्चास पांसष्ट लक्ष रुपये वर्षास देऊन मोठ्या संमानानें सातार्‍या शहरांत मोकळेपणें ठेविला होता.

त्याच समयीं नाशिरजंग कर्नाटकांत गेला होता, त्याचा आश्रित रामदास नामें एक ब्राह्मण असे त्याचे द्वारें फ्रांशीस लोकांचा दुपळे नामें कोणी एक सुखत्यार होता, त्याणें त्या नाशिरजंगाचा लष्करांत दंगा उत्पन्न केला. त्या दंगा करण्यांत कोणी एक महंमदखान नामें पठाण, खर्पाचा नवाब होता, त्याणें गोळी घालून नाशिरजंगास मारून टाकिला. त्यानंतर फ्रांशीस लोकांनीं त्याचा भाऊ मुजाफरजंग यास त्या नाशिरजंगाचे जागीं सत्ता असावी असें केलें, आणि त्यास बरोबर घेऊन हैदराबादेकडे चालिले, परंतु त्याणें तें पद बहुत दिवस अनुभवावेंसें न झालें; कांकिं, नाशिरजंगास मारून जो अर्थ व्हावा तो झाला नाहीं म्हणून ते पठाण लोक पुनः कांहीं बंड करूं लागले, त्यांचा पारिपत्याकरितां मुजाफरजंग युद्ध करूं लागला, त्यांत तो जय पावला परंतु त्या कामांतच मेला गेला. त्यानंतर त्याचा भाऊ सलाबतजंग यास त्याची जागा मिळाली; असें सन सत्राशें एकावन्नांत झालें. त्यानंतर तो सलाबतजंग, फ्रांशीस लोकांसहित हैदराबादेकडे जाऊं लागला, तेव्हां तो पेशव्यानें कृष्णेचे कांठीं गांठला. ते समयीं युद्धप्रसंग व्हावाच परंतु त्याच वेळेस सातान्याहून असें कांहीं वर्तमान आलें कीं, जेणें करून बाळाजी बाजिराव युद्ध न करितां सलाबतजंग याणें जो तह केला त्यासच मान्य होऊन मोठ्या त्वरेनें सातान्यास निघाला.

तें वर्तमान असें, पेशवा औरंगाबादेस चालिला तेव्हां ताराबाईनें असें केलें कीं. राजाराम याचें मन स्वतंत्रपणें वागावयाचें आहे किंवा नाहीं, तो शोध केला त्यांत असें दिसूं लागलें कीं, तो केवळ अयोग्य, मग तिणें त्यास समजाविलें कीं मीं सहज विचारिलें; आणि त्याच समयीं दमाजी गाइकवाड यास पत्र लिहिलें कीं, सांप्रत तुम्हास कोण एथें प्रतिपंथी नाहीं, त्यास तुम्हीं लवकर येऊन राजा व मराठे यांचें राज्य ब्राह्मणाचा हातचें सोडवावें, ही गोष्ट दमाजीनें मान्य केली आणि सातान्यास चालिला तो जवळ आलासा समजोन,

ताराबाईनें

ताराबाईनें राजारास शहरांतून आपल्याजवळ सातान्याकिल्ल्यावर बोलावून नेला; आणि त्याची भेट होतांच त्यास अत्यंत निर्भर्त्सना करून बोलिली, कि, अरे तूं शिवाजीचा वंशज नव्हेस, मी आपला मूल गोंधळ्याचे घरीं ठेवून ठेविला होता, त्याणें तो ठेवून आपला पुत्र दिला असेल; त्या तुला चौकशी नकरितां मी एवढ्या पदावर बसवून, आतां परम पश्चात्ताप पावत्यें जो गोंधळ्याचा पोर तो शिवाजीचा वंशज मी केला, त्या पापाचें प्रायश्चित्त मला कृष्णेचे कांठीं जाऊन केलें पाहिजे. असें भाषण करून मग त्याला बंदींत ठेवून किल्ल्याचा हवालदारास आज्ञा केली कीं, जे लोक याजबरोबर आले आहेत त्यांवर बंदुकांचा मारकरून घालवून द्या. आणि शहरांत कोंकणस्थ ब्राह्मणाचे जे पक्षी असतील त्यांचा घरावर तोफांचा मार चालेसा बेत करून ठेवा. हें वर्तमान त्रिंबकपंत जास नानापुरंदऱ्या ह्मणत, तो व गोविंदराव चिटणीस, व इतर जे पेशव्याचे पक्षी सरदार सातान्यास होते त्यांस कळलें; परंतु तें समजले कीं, ही ह्मातारी वेडी झाली ह्मणून तें प्रकरण त्यांहीं तुछ मानिलें. मग जेव्हां असें वर्तमान आलें कीं, दमाजी गाइकवाड फौजेसहित सातान्यास येतो, तेव्हां ते आपले सारे लोक जमा करून कृष्णेचे कांठीं अरळें गांव आहे तेथें जाऊन उतरले. ती सेना वीस हजार मिळाली; मग दमाजी गाइकवाड पंधरा हजार फौज घेऊन साल्प्याचा घाटानें आरळ्याजवळ आला, तेव्हां त्या उभयतां लष्करांची गांठ पडतांच पेशव्याचे लोक त्यांवर जाऊन पडले, परंतु तें पडणें हिंमतीनें नझालें; आणि कांहींसें युद्ध करून लिंबास मागें हटून गेले. दुसरे दिवशीं गाइकवाडाचे लोक त्यांवर पडून त्यांचा अगदीं मोड केल्यानंतर दमाजी सातान्यास जाऊन ताराबाईस भेटला तेव्हां ताराबाईनें सातान्याजवळचे कित्येक किल्ले हस्तगत केले, तिला प्रतिनिधी अनुकूळ होता, हें वर्तमान ऐकून पेशव्याला मोठ्या त्वरेनें सातान्यास यावें लागलें. तो येऊन पोंहचल्याचे पूर्वींच नानापुरंदऱ्यानें गाइकवाडाचे फौजेशीं लढून त्यास सातान्याहून ओरखोऱ्यापर्यंत घालविला होता. मग त्या दमाजी गाइकवाडानें असें पाहिलें कीं, फौजेसहित पेशवा जवळ आला आणि प्रतिनिधीनें बोलिल्याप्रमाणें साहाय्य नकेलें, यास्तव त्याणें पेशव्याशीं तहाचें बोलणें लाविलें; तेव्हां तें पेशव्यानें मान्य केलेंसें दाखवून, त्या बोलण्याचा कामानिमित्त दमाजीनें आपल्याजवळ उतरावयास यावेंसें केलें. नंतर तो त्याप्रमाणें त्याचाजवळ उतरल्यावर मग पेशवा त्यास आपले हातीं पुरता सांपडला असा समजून त्याजवळ गुजराथेबाबद जो पैका यावयाचा होता तो व गुजराथसंबंधी कित्येक मुलुख मागूं लागला. तेसमयीं त्याणें उत्तर केलें कीं,

या

या कानास मी आंगचा धणी नव्हे. त्यानंतर पेशव्यानें गाइकवाडाचीं व दाभाड्याचीं मुलें माणसें तळेगांवीं होतीं त्यांस आज्ञा पाठवून कैद केलीं आणि तेथून काढून लोहगड किल्ल्यास पाठविलीं. मग दमाजी गाइकवाडयाचा लष्करावर छापा घालून दमाजीस कैद करून पुण्यास पाठविला. त्यानंतर पेशवा आपणास ताराबाई वश होऊन सातारा किल्ला हस्तगत व्हावा म्हणून उद्योग करूं लागला परंतु ती ऐकेना, आणि सर्व मराठे लोकही मानीत कीं, स्वतः कारभार संभाळावा हा अधिकार ताराबाईचाच; या शंकेस्तव पेशव्यानें बलात्कारें करून तिला बाहेर न काढिली. असें संकट पेशव्यास प्राप्त झालें तथापि राजास कैद प्रथमच केला त्याचा दोष, त्याजकडे न आला हा एक त्यास लाभच झाला. जसा मोठा अपराधी चोरादि, यास कैदेंत ठेवितात तसाच राजाराम राजा यास ताराबाइनें प्रतिबंधांत ठेविला, त्याचा पायांत बिडी मात्र घातली नव्हती.

त्यानंतर बाळाजी गाजीउद्दिनाशीं कबुलात केल्याप्रमाणें औरंगाबादेस चालिला, तो पुढें वाटेनें जाजा जागीं सलाबतजंगाची सत्ता होती. त्या त्या जागची खंडणी घेत चालिला. त्यासमयीं सलाबतजंग फ्रांशिसांचा सरदार मोठा सावध बसी नामा होता; त्याजवळ फ्रेंच् मुलखीं म्हणारे गोरे लोक शिपाई पांचशें होते, त्याशिवाय हिंदू शिपायी पलटणी लोकही पांच हजार असत, त्याचें सलाबतजंग यास बळ असे, यास्तव तो त्याचे मसलतीनें वागे त्यावरून बाळाजी आपले मुलखीं उपद्रव करितो म्हणून तो आपला मुलुख न रक्षितां मराठ्यांचे मुलखांत जाऊन दंगा करूं लागला आणि ताराबाई व कोल्हापुरकर संभाजी यांहीं आपला पक्ष स्वीकारावासा केला. हें वर्तमान समजून बाळाजीस कांहीं आश्चर्य वाटलें त्याणें येऊन आपले चाळीस हजार स्वार जमा करून मोंगलांचे लष्करावर जाऊन, आपल्या रीतीप्रमाणें समोर न लढतां त्यांस भोंवता घेरा घालून नानाप्रकारें उपद्रव देऊं लागला. परंतु त्या मोंगलांस फ्रांशिसांचें लष्कर व तोफा यांचें बळ चांगलें होतें; त्यायोगें त्यांहीं तो उपद्रव न गणितां वाटेनें गांव जाळीत पुण्याकडे चालिले. शेवटीं मराठे यांणीं मोठ्या निकरानें त्यांवर हल्ला केला. त्यासमयीं मोंगलांचा लष्कराचा नाश वक्त आला, परंतु फ्रांशिसांच्या तोफांचे आश्रयें करून ते वांचले. त्या लढाईंत कोण्हेर त्रिंबक एकबोटे नामें मराठयांचा एक सरदार होता, त्याणें असा पराक्रम केला कीं, त्या दिवसापासून तो पारखे नांव पावला; त्याचा घोड्याचे पायांत रुप्याचें कडें असे. याप्रमाणें मराठे जय पावले तरी मोंगलांचें लष्कर भीमेचेकांठीं

कोरे

कोरेगावांपर्यंत पोहचलें. तेथें सलाबतजंग याशीं पेशवा तहाचें बोलणें करूं लागला, परंतु सलाबतजंगाचा मुलखाचें कांहीं वर्तमान आल्यामुळें पुरता तह न होतां तो मराठ्यांचा उपद्रव सोशीत, माघारा जुनराकडे गेला. नंतर बसीचा मसलतीनें तो पेशव्यानें तहाचें बोलणें लाविलें होतें तें मान्य करून लष्करसहित हेदराबादेस चालिला. हें वर्तमान सन सत्राशें बावन्नांत घडलें.

याप्रमाणें हिंदुमुलखाचे पश्चिमेस वर्तमान असतां, पूर्वेकडे रघुजीनें आपला पुत्र कर्नाटकीं गेला होता तो माघारा आल्यावर त्यास बंगाल्यांत स्वारी करावयास, आणि मीरहबीब याचे साह्यास पाठविला; त्या समयीं अल्लीवेरदीखान निरुपाय होऊन कटाकप्रांतांतील मुलुख सरेकडे बालासोरपर्यंत मीरहबीबाचे स्वाधीन केला. परंतु लौकिकांत आपल्या मानाचा संरक्षणार्थ असें केलें कि, मीरहबीब आपला हस्तक आहे. असें सन सत्राशें एकावन्नांत झालें, तो मीरहबीब एवढ्या योग्यतेस येऊन तीच योग्यता त्याचा नाशास कारण झाली; तें प्रकरण असें, रघुजीचा पुत्र जानोजी याशीं व त्याशीं परस्परें स्पर्धा उत्पन्न होऊन, जानोजीनें त्यावर कांहीं पैका खाल्ल्याचें निमित्त ठेवून त्या मीरहबीबास केदेंत ठेविला, तेव्हां त्यास तो प्रतिबंध सोसेना ह्मणून त्याजवळ जितके लोक होते तितक्यांसहित त्या चौकिदारांवर पडून मृत्यु पावला. अल्लीवेरदीखानानें रघुजीस कटाकप्रांतांतील मुलुख दिला तेवेळेस बंगाला व बहार यांचा चवथाईबदल बारा लक्ष रुपये घेतले; या थोडक्या घेण्याचें कारण असें, पेशवा व सलाबतजंग युद्ध करूं लागले त्यांत आपला अर्थ साधावा असें मनांत आणून, बंगाल्यांत शिरून त्याणें किल्ला गावेलगड व नरनाला व माणिकदुर्ग हे तीन किल्ले घेतले, त्यानंतर मोंगलांचें लष्कर पुण्याकडे चालिलें. असें वर्तमान ऐकून पैनगंगा व गोदावरी या दोहों नद्यांमधल्या मुलखाची खंडणी घेऊन मोंगलांचीं ठाणीं उठवून, आगोआगीं आपलीं ठाणीं बसविलीं.

आतां आधीं दिल्लीकडे काय काय वर्तमान झालें तो प्रकार ध्यानांत आला पाहिजे. आमेदशाह तेथचा तक्ताधिपती झाल्यावर आफगाण लोकांचा बादशाह पुनः दिल्लीस येऊं लागला. त्यास मध्येंच लाहोरचा अधिकार्यानें आपल्या मुलखाची खंडणी देऊन मागें फिरविला. त्यासमयीं दिल्लीमध्यें सफदरजंग नामें वजीर होता त्याचा मनांत आलें कि, रोहिले लोक मोठ्या योग्यतेस येऊन फार उन्मत्त झाले. आणि त्यांमध्यें

तक्ताधिपत्याविषयीं

तक्ताधिपत्याविषयीं तिघे भाऊ भांडतात तस्मात् हा समय त्यांना जिंकावयास उत्तमसा समजून तो लष्कर सहित तिकडे जाऊन त्याणें तो मुलुख घेतला. आणि तेथें कोणी एक आपला हस्तक नवलराई नामें कायत जातीचा ठेवून माघारा दिल्लीस गेला. मग रोहिल्यांहीं मिळून त्या कायताला मारून टाकिला; तेव्हां तो वजीर दुसर्यानें त्यांवर गेला परंतु जय न पावला. अशा अवस्थेंत त्याणें मल्हार राव होळकर व जयापा शिंदा व जाटांचा राजा सुरजमल्ल नामें होता तो, या इतक्यांस सहाय करून माल्यान रोहिले जिंकून तो मुलुख घेतला. आणि त्या साहाय्या बदल होळकर व शिंदे यांस त्याच मुलखाचा बहुतेक भाग दिला. असें कार्य झालें ते समयीं आफगाणाचा बादशाह दिल्लीकडे पुनः आला आणि लाहोर व मुलतान मुलुख घेतला. तेवेळेस दिल्लीचा बादशाहानें आपला वजीर सफदरजंग जवळ नव्हता यास्तव त्यास लवकर यावें ह्मणून बोलावलें. परंतु त्याचें येणें होई तोंपर्यंत दम न धरितां शत्रूस लाहूर व मुलतान मुलुख दिला. मग तो वजीर आल्यावर बादशाहास समजलें किं, आफगाणांचा बादशाह काढून द्यावयाकरितां वजिरानें मराठ्यांस बहुत देण्याची आशा दाखवून सहाय केले होते; त्यांहीं त्या वजिराचा कामासाठीं रोहिल्यांपासून पन्नास लक्ष रुपयांचा कबुलातीचें पत्र घेतलें आणि त्यांचा मुलुख सोडिला. नंतर जेव्हां समजलें किं, आपण केलेला प्रयत्न व्यर्थ गेला; तेव्हां तो सफदरजंग अशा अडचणींत पडला, किं मराठ्यांनां बक्षीस काय द्यावें, व त्यांस काम कोणतें सांगावें. तोंच पेशव्यांकडून सलाबतजंगाला जिंकावयाकरितां आपल्या पुष्टीकरणार्थ शिंदे व होळकर यांस बोलावणें आलें; तेव्हां सफदरजंगानें पेशवे व गाजिवदीन यांचा तहामध्यें, गाजीवदिनास निजांपदवी द्यावयाची कबूल केली होती, तें स्मरून त्या मराठ्यांबरोबरच गाजीवदिनास पाठविला, आणि त्यांस असें सांगीतलें किं, तुह्मीं गाजीवदिनाचा कार्याविषयीं पेशव्याचें साहाय्य करा.

इकडे ओरंगाबादेंत सलाबतजंग होता त्याणें असें पाहिलें किं, आपला भाऊ गाजीवदिन पूर्णबळ झाला, आणि त्यास बव्हाणपुरचा मोंगलही अनुकूळ आहे. ह्मणून त्या सलाबतजंगानें पेशव्याशीं तहाचें बोलणें लाविलें. त्यापूर्वीं पेशव्यानें गाजीवदिनाशीं बोली केली होती किं, तुमची पदवी तुह्मास देवविली असतां वराडाचे पश्चिमेस तापीपासून गोदावरीपर्यंत मुलुख तुह्मीं आह्माला द्यावा. त्यावरून त्यासर्वांस

आप

आपआपलीं योजिलेलीं कार्यें सिद्धीस जातील असा भरंवसा होता. परंतु कालानुकूल्य नसल्यानें यास्तव गाजीवदीन त्या शहरांत निजमअलीच्या मातुश्रीकडे भोजनास गेला तिणें त्याला विष घातलें तेणेंकरून तो त्याच रात्रीस मरण पावला.

यानंतर सलाबतजंग मराठ्यांस गाजीवदिनानें द्यावयाचें कबूल केलें होतें तें न द्यावें अशी इच्छा करूं लागला; परंतु त्यांच्या सामर्थ्यापुढें निरुपाय होऊन कबूल करिता झाला कीं, रघुजी भोंसल्यानें पैनगंगेच्या अलिकडचें आपलें ठाणें उठविलें ह्मणजे माझ्या भावानें करार केल्याप्रमाणें मी पेशव्यास देईन; मग तें रघुजीनें मान्य केलें. नंतर सलाबतजंग निर्बाधपणें निजामपदवी अनुभवूं लागला, आणि होळकर व शिंदे लष्करसुद्धां हिंदुस्थानांत गेले, नंतर पेशवा पुण्यास आला याप्रमाणें सन सत्राशें त्रेपन्नांत घडलें.

पेशवा गाजीवदिनाच्या कामाकरितां औरंगाबादेस गेला असतां. ताराबाईनें मराठे व रामोशी मिळून पांच सहा हजार लोक ठेवून. वांई व सातारा हे दोनही परगणे स्वसत्तात्मक केले. मग पेशवा पुण्यास आला तेव्हां त्याणें असा निश्चय केला कीं. करनाटकीं स्वारी घालावी परंतु त्यास ताराबाईचा बंदोबस्त आधीं करावा हें उत्तम वाटलें. नंतर त्याणें सातार्यास मोठी फौज पाठविली, आणि तेथच्या शिबंदीस बाहेरून अन्न न पोहचेसें करून किल्ला घ्यावा असें केलें. त्यासमयीं त्या किल्ल्याचा हवालदार आनंदराव जाधव नामें होता, त्याणें असें पाहिलें कीं. आतां युद्ध करून परिणाम ठीक नाहीं ह्मणून विचार करिता झाला कीं, राजास काढून ताराबाईच्या हद्दीबाहेर न्यावा; हें वर्तमान तिला कळलें तेव्हां तिणें तेथच्या शिपायांस आज्ञा देऊन, त्या हवालदाराचा शिरच्छेद केला.

यानंतर पेशवा ताराबाईकडील बंदोबस्ताचें काम तसेंच ठेवून, कर्नाटकांत गेला. तो तेथें पहिल्यापेक्षां स्वल्पपणें खंडणी घेऊन श्रीरंगपट्टणाचीही खंड घेता झाला. आणि किल्ला हुली औनोर, तो त्याणें युद्ध करून स्वसत्तात्मक केला. मग सन सत्राशें त्रेपन्नांत पर्जन्यकाळाच्या सुमारें पेशवा पुण्यास आला पुढें पाऊसकाळ गेल्यावर तो गुजराथ घ्यावयास उद्युक्त झाला. तेव्हां त्याणें आपला भाऊ रघुनाथराव याजबरोबर सेना देऊन गुजराथेंत पाठविला.

तेवेळेस दमाजी गाइकवाड पुण्यामध्यें बंदींत होता. त्यास सोडून आपल्या कामांत घ्यावा असा निश्चय करून पेशव्यानें त्याशीं तहाचें बो-

लणें

लणें लाविलें. त्यांत असा नेम ठरला किं. गाइकवाडानें पहिलें देणें खंडणी बाबद पंधरा लक्ष रुपये पेशव्यास द्यावे, आणि आपला गुजराथेंतील मुलुखही निमे द्यावा; त्याखेरीज दुसरा कांहीं मुलुख घेतला असतां त्यासंबंधें जो लाभ होईल तोही अर्धा द्यावा. याशिवाय जे समयीं स्वारीचें काम पडेल ते समयीं दहा हजार फौज चाकरीस पाठवावी. यावेगळे दाभाडे सेनापती यांचे मुतालकी बाबद पांच लक्ष रुपये द्यावे; आणि जितका मुलुख गुजराथेंत आपला भाग आहे त्याबद्दल पंचवीस हजार रुपये द्यावे, याशिवाय गुजराथेंत पेशव्याचे भागीं पेशव्यांस ठाणीं बसवावयाविषयीं सहाय व्हावें; आणि सातार्‍याच्या राजाला प्रतिवर्षी कांहीं खर्चास द्यावें. असें कबूल करून दमाजी मुक्तता पावला. तो मग गुजराथेंत जाऊन, नवें लष्कर ठेवून पुढें पेशव्याचा भाऊ रघुनाथराव तिकडे गेला तेव्हां. तो त्यास मिळून ते दोघे स्वस्थचित्तें मुलखाची खंडणी घेत चालिले. ते अमदाबादेस पोंहचले तेव्हां तेथचे किल्लेकरी त्यांशीं युद्ध करूं लागले; तो मोठा संग्राम होऊन शेवटीं त्या मोंगलांहीं किल्ला पेशव्यांस दिला, तथापि त्या किल्ल्यांत जवान मर्द नामें त्या मोंगलांचा मुख्य होता त्याचा शौर्येंकरून त्यास अमदाबादेचे उत्तरेकडे कित्येक मुलुख मिळाला, त्यांत पटन व वरनगर व राधनपूर व दुसरेही कांहीं परगणे होते; परंतु पुढें दहा वर्षांनीं दमाजीनें त्यांतील बहुतेक परगणे माघारे घेतले. त्या युद्धांत पेशव्याकडचा नारोशंकर+ होता त्याचे स्वाधीन बहुत आरब असत; तो त्या वेळेस आपल्या शौर्येंकरून मोठी योग्यता पावला. याप्रमाणें सन सत्राशें पंचावन्नांत गुजराथची राजधानी अमदाबाद मराठ्यांचे हातीं पुर्तेपणें लागली. तेथें पेशव्यानें श्रीपतराव नामें आपला हस्तक ठेविला, आणि असा नेम ठरला किं, तो सर्व वसूल पेशवा व गाइकवाड या उभयतांहीं समसमान वांटून घ्यावा; आणि त्या किल्ल्याचा एका दरवाजावर मात्र गाइकवाडाचे शिपाई ठेवून वरकड सर्वजागीं पेशव्याचे लोक ठेविले. असा बंदोबस्त झाल्यानंतर रघुनाथराव व दमाजी बडोद्यास जाऊन एकमेकांचा परम सत्कार करून मग ते दोघे परस्परें वियोग पावले तो प्रकार असा. रघुनाथराव आपल्याबरोबर दत्താजी शिंदा यास घेऊन. हिंदुस्थानांत गेला. आणि दमाजी बडोद्यासच राहिला. पेशवा हिंदुस्थानांत गेल्यावर मल्हारराव होळकराचा पुत्र खंडेराव होळकर त्यास मिळाला मग ते दोघे मिळून अजमीर प्रांतांत पसरले, आणि तेथें लुटालूट क-

+ नारोशंकरानें त्यापूर्वी स्वदेशांत मालेगांव किल्ला बांधिला होता.

रून

रून चौथ व सरदेशमुखी घेतली, आणि शत्रु व मित्र समान मानून जेथें जेथें सांपडे तेथ तेथची खंडणी घेत चालिले. तेव्हां आटलोक यांसही खंडणी द्यावी लागली, परंतु ते युद्धावांचून देइनात. त्यांचा किल्ला कुंभेर तेथचे लढाईंत खंडेराव होळकर मृत्यु पावला; नंतर सन सत्राशें चौपन्नांत रघुनाथ राव पुण्यास आला.

असें पश्चिमेकडे वर्तमान होत असतां पूर्वेकडे सन सत्राशें त्रेपन्नांत रघुजी भोंसला कैलासवासी झाला. त्याचे चौघे पुत्र एकाचें नांव आनोजी, एक साबाजी एक मुधोजी आणि एक बिंबाजी, त्यांत दोघे वडील आनोजी व साबाजी ते धाकट्या बायकोचें मूल; आणि दुसरे जे मुधोजी व बिंबाजी लहान होते ते थोर्ल्या बायकोचे. रघुजीनें आपल्या मरणाचे वेळेस त्या चौघां पुत्रांस आपले जवळ जमा करून, चौघांस दौलत व मुलुख वांटून देऊन त्यांत वडील आनोजी तो मुख्य करून त्यास सेनासाहेब सुभा पदवी, पेशव्यानें द्यावी असें केलें; आणि उपदेश केला किं तुह्मां चौघांत कलह नसावा, आणि आपल्ये मराठ्ये जातींत कोणी भांडूं लागले तर तो कज्जा तुटेसा उद्योग तुह्मीं करावा, व सर्वांहीं एकचित्त असून राज्य करावें हेंच श्रेयस्कर होईल. त्यांत विभाग नव्हावे. असें त्याणें सांगीतलें होतें परंतु सर्व जनास विदित आहे किं, जसे अनुभवानें प्राणी सावध होतात. तसे केवळ उपदेशानें सावध होत नाहींत, याचें उदाहरण हेंच किं, रघुजीचा मृत्यूनंतर एकाच महिन्यानें आनोजीस कलहामुळें असें अगत्य पडलें किं, मुधोजीला बलात्कारेंकरून आपल्या आज्ञेंत वागवावा.

यानंतर आनोजी पुण्याकडे आपली सेनासाहेब सुभा पदवी संपादन करावयास निघाला. तो जवळ आला असें वर्तमान सातार्‍यांमध्यें ताराबाईला कळतांच, तिणें पेशव्याचें अभय पत्र घेऊन, राजाराम राजा यास किल्ल्यांत बाबुराव जाधव याचे स्वाधीन ठेवून आपण निघोन पुण्यास आली. तिजबरोबर आनोजीचा भाऊ बिंबाजी भोंसला होता; त्याणें तिचा पक्ष स्वीकारिला असे. आणि तिचें माहेर मोहितेकूळ त्यांचा कोणा सोयर्‍या धायर्‍याचा कन्येशीं विवाह केला होता. ती ताराबाई पुण्यास येऊन पोंहचली तेव्हां पेशव्यानें तिचा असा संमान केला किं. त्याणें जें जें समजाविलें तें तें तिणें संतोषेंकरून मान्य केलें. परंतु प्रथम तिणें जेजोरीचा खंडोबाजवळ पेशव्यास नेऊन कृत्रिम करणार नाहीं अशी शपथ करविली ते समयीं पेशव्यानेंही कबूल करविलें ताराबाई कडून, कीं. बाबुराव जाधव यास दूर करावा; त्या पेशव्यांनें ताराबाईला पक्की जाणली कीं, ही विपरीतकरीअहे;

हे; त्या तिचा स्वभावापासून त्याणें आपला अर्थ साधिला. तो असा; त्याचे मनांत होतें कीं, राजाराम राजा बंदींतून सुटूं नये यास्तव तो पेशवा ताराबाईजवळ त्या राजारामाचा मुक्ततेविषयीं वारंवार विनंती करीत असे, ती तिणें कधींही अंगीकारिली नाहीं.

जानोजी भोंसला याणें सरकारांत राजाचा खर्चाकडे नऊ लक्ष रुपये प्रतिवर्षी यावे व जासमयीं आज्ञा होईल त्यासमयीं दहा हजार फौज चाकरीस पाठवावयाची कबूल करून आपली सेनासाहेब सुभापदवी मिळवून माघारा वराडांत गेला. त्याचा भाऊ बिवाजी तोही त्याचे बरोबरच होता. तो जानोजी माघारा जातांना मोंगल व मराठे यांचा मुलखांतून गावोगांव घांस दाणा घेत चालिला. तेणेंकरून सलाबतजंग त्यावर रुष्ट झाला; त्यावरून जानोजी त्याचा मुलुख लुटूं लागला. तेव्हां सलाबतजंगानें आपला एक सरदार बरोबर थोडकीशी फौज देऊन मराठ्यांवर पाठविला; त्याशीं व जानोजीशीं युद्ध होऊन जानोजी भोंसला पराभव पावला. तो मागे हटून नागपुरपर्यंत गेला, आणि त्याचा दिवाण कैदेंत सांपडला. त्या जानोजीनें जी लूट पहिली जमा केली होती ती नागपुराकडे जातांना त्यास बहुतेक माघारी द्यावी लागली, नंतर तो जानोजी भोंसला नागपुरीं आश्रय पावला.

इकडे दिल्लीमध्यें कारभारी लोकांत वैमनस्यें पडल्यामुळें मराठ्यांस मध्यस्थपणें त्यांत शिरावयाची संधि सांपडली. गाजीवदिन मृत्यु पावल्यावर त्याचा पुत्र मीरशाबुदिन याणें आपणाविषयीं वजिरास मोह उत्पन्न व्हावयासाठीं आपल्या बापाचा शोकेंकरून अत्यंत व्याकुळपणा दाखविला. तेणेंकरून त्या वजिरास त्याची दया आली, त्यायोगें तो आपल्या बापाचें गाजीवदिन नाम पद आणि त्याचा अधिकार अमीर उलउमरा नामें होता तो मिळविला. नंतर तो आपला परम उपकारकर्ता असा जो वजीर त्याचा नाशाविषयीं उद्युक्त झाला; आणि त्याची वजिरीही आपल्या आज्ञेचा भर्तायास देवविली. तेव्हां तो पहिला वजीर व बादशाह यांशीं युद्ध होऊं लागलें, तें सहा महिने पर्यंत दिल्लीचा आसमंतात होत होतें, शेवटीं त्यास कंटाळा येऊन, तो वजीर तें युद्ध टाकून आपलें पहिलें ठिकाण लखनाऊ तेथें जाऊन राहिला. त्याचे पूर्वी मीरशाबुदिन बळेंच त्या युद्धांत शिरला होता; त्याणें आपल्या कुमकेस मल्हारराव होळकर व जयापा शिंदे यांस बोलाविलें, परंतु ते आल्याचे पूर्वींच तो वजीर युद्ध सोडून गेला; मग ते होळकर व शिंदे आल्यावर त्यांनी बरोबर घेऊन वजिराचा पक्षपाती सुरजम

ल्ल याचा पारिपत्यास गेला. तेव्हां सुरजमल्ल आपल्या किल्ल्यांत शिरून युद्ध करूं लागला; तेवेळेस शाबूदिनानें बादशाहाजवळ तोफांविषयीं विनंती केली. तेसमयीं बादशाहास त्या नव्या वजिराचें सांगणें पडलें कीं, हा शाबूदिन सर्व सामर्थ्य आपणासच असावें असें इच्छितो. अशा पुरुषास अनुकूळ होणें ठीक नाहीं. त्यावरून बादशाह याणें तोफा न दिल्या. आणि तेच समयीं त्या सुरजमल्लानेंही बादशाहास शरणागतासारिखें विनंतीपत्र पाठविलें; तेणेंकरून तो बादशाह तो शाबूदिन व मराठे यांचा निवारणार्थ फौजेसहित निघाला. हें वर्तमान मल्हारराव होळकरास कळतांच त्याणें शाबूदिन व जयाप्पा शिंदे हे केवळ अल्पसारसे मानून त्यांस न विचारितां तो एकाएकीं बादशाहाच्या सैन्यावर जाऊन पडला. तेसमयीं बादशाह सावध नव्हता. आणि तोंतर बाण टाकूं लागला; तेव्हां ते लोक भयभीत होत्साते पळूं लागले. तेवेळेस होळकराला त्या लष्करची लूट सांपडली. नंतर तो होळकर दिल्लीस गेला. तेसमयीं शाबूदिनानें बादशाहापाशीं आपणास वजिरी मिळवून आपल्या आतेचा भर्ता जो होता त्यास पदच्युत केला. त्यानंतर त्याणें तो आमेदशाह बादशाह याचे जागीं पूर्वींचा जहानदार बादशाह याचा नातू त्याचें दुसरें अलंगीर असें नाव ठेवून सन सत्राशें चोपन्नांत पांचव्या मे महिन्यांत तो तक्ताधिपती केला. तेचसमयीं त्या पहिल्या आमेदशाह बादशाहाचे डोळे काढून त्यास बंदींत ठेविला. तेच संधींत पहिला वजीर सफदरजंग मरण पावला; त्याचा पुत्र सुजाउद्दवला तो आपल्या बापाचे जागीं उदप्रांताचा अधिकारी झाला.

पेशवा स्वभावेंकरून धिमा असे. आणि दुसर्यांस कामें संपवून आपण स्वस्थ असावें यांत त्याची आवड होती. त्याणें आपला भाऊ रघुनाथराव यास लष्करचें काम सांगितलें. आणि सदाशिव चिमणाजी आपला चुलत भाऊ तो मुलखाचा बंदोबस्तास नेमिला; त्याणें रामचंद्रबाबा शेणवी याणें ठरविल्या प्रकारें तो बंदोबस्त राखिला. मग तो रामचंद्र मेल्यावरही सदाशिव चिमणाजीनें त्या शेणव्यानें स्थापिलेले जे मार्ग होते ते आणि दुसरेही कांहीं उत्तम प्रकारचे नवे नवे नेम केले; तेणें करून प्रजा बहुत दिवसपर्यंत लुटालूट किंवा दुसरा कांहीं दंगा न होतां सुख पावली.

तो पेशवा करनाटकांतून आल्यावर एक वर्षपर्यंत पुण्यांत होता; तेव्हां त्याणें आंग्र्याचा मुलुख घ्यावयाविषयीं इंग्रेजांशीं कुमके-

साठीं

साठीं कांहीं बोलणें लाविलें होतें मग सन सत्राशें पंचावन्नांत पर्जन्यकाळ गेल्यावर तो पेशवा आपलें जें कोंकणांत लश्कर होतें तें वाढवून आंग्र्यावर जावयास तयार झाला; इतक्यांत करनाटकीं कांहीं बंड उत्पन्न झालें तें मोडावयास त्याला आधीं तिकडे जावें लागलें. त्या बंडाचें मूळ असें, सलाबत जंगाजवळ हिंदी पलटनें होतीं. त्यांस पूर्वी हैदराबादेंत निरोप दिला; नंतर त्यांचा मुख्य सरदार मुजाफिरखान नामें होता, त्याणें ते लोक आणून पेशव्याचे चाकरीस ठेविले; मग तो सरदार करनाटकांत गेल्यावर कांहीं रुसव्यामुळें पेशव्याचा पक्ष सोडून सावनुरचा नवाबाची चाकरी धरिली. तेसमयीं पेशव्यानें त्या नवाबास तो आपला सरदार मागीतला; त्याला घुटी व सोंडुरचे घोरपडे मराठे लोक यांचें साहाय्य असे तेणेंकरून तो धीटपणें सरदारास पेशव्याचे स्वाधीन करीना. त्यासाठीं पेशवा याणें, आपलें मोठें लश्कर जमा करून, जानोजी भोंसल्याचे दहा हजार स्वार बलावून आणून, कृष्णेपलिकडे जाऊन बागलकोट घेतला. तेथून पुढें सावनुरास जावयाकरितां हैदराबादेस वकील पाठवून, त्यांस तुम्हाला व आम्हाला या सावनूर संबंधें धक्का समान बसेल; असें समजावून त्या तक्ताधिपतीचीही कुमक घेतली. मग ती व आपली सेना एकत्र करून पुढें जाऊन सावनुरास घेरा घातला.

इकडे कोंकणचे आंग्रे प्रकरणीं पेशव्यांहीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें लाविलें होतें तो प्रकार असा; तुळाजी आंग्र्यानें आपला सावत्र भाऊ संभाजी आंग्र्या तो मरण पावल्यानंतर त्याचा मुलुख, बाणकोट, व सावंताची वाडी यांमध्यें होता, तो आपण वहिवाटीत असे; आणि समुद्रांत स्वतंत्रतेनें चांचेपणाही करीत होता. तो अनर्थ शमवावयाकरितां सन सत्राशें पंचावन्नांत बाळाजी बाजिराव पेशवा व इंग्रेज या दोघांमध्यें असें ठरलें कीं, पेशव्याचीं सारीं लढाऊ गलबतें इंग्रेजांहीं आपल्याकडे घेऊन आपलीं जहाजें एक चव्वेचाळिसां तोफांचें, व एक सोळां तोफांचें, व दोन गरनाळांचीं जहाजें, इतक्यांसहित जाऊन, आंग्र्याचे समुद्रकांठचे किल्ले घ्यावे. असा बेत झाल्यावर मार्च महिन्याचे सव्विसाव्ये तारिखेस त्या कामाविषयीं इंग्रेजांचीं जहाजें निघालीं; परंतु पेशव्यांचा गलबतांस कांहीं निमित्तेंकरून यावयास उशीर लागला. त्या योगें आंग्र्याचीं लढाऊ जहाजें सुवर्णदुर्गाजवळ होतीं तीं इंग्रेजांचा हातीं न लागलीं. त्यानां तीं पळवावयास अवसर सांपडला. मग इंग्रेजांचा मुख्य सरदार कामादोर जेम्स नामें होता तो जयगड पर्यंत त्याचे पाठीस लागला. नं-

तर

तर त्यास तें कांहीं नसांपडतां तो माघारा येऊन, एप्रेलाचे चवथ्ये तारिखेस त्याणें सुवर्णदुर्ग घ्यावयाचा उद्योग आरंभिला. तो प्रकार असा. किल्ल्याचा तटाजवळ त्याणें आपलीं जहाजें नेऊन नांगर केले, नंतर चवथे दिवशीं अंजिरा सुवर्णदुर्ग. व त्याजवळचे खुसकीवरील किल्ले ते त्याचा स्वाधीन झाले. पेशव्यांचीं गलबतें मागून आलीं तीं त्या किल्ल्यांतील तोफांचे मारगिरीखालीं पोंहचलींच नाहींत, त्या जहाजांवरील शिबंदीचा मुख्य नारोपंत नामें होता, त्याणें कित्येक वेळा परमशौर्येंकरून खुसकीवर युद्ध केलीं होतीं; परंतु तो समुद्रांत युद्ध करावयाविषयीं केवळ भित्रा असे. तेसमयीं पर्जन्यकालामुळें विजयदुर्ग घ्यावयास अवसर होइना; तेव्हां इंग्रेजांनीं सुवर्णदुर्ग किल्ला पेशव्याकडील कोंकणचा सरसुभेदार याचा स्वाधीन करून आपलीं जहाजें घेऊन माघारें मुंबईस आले या कामाचा बोलण्यामध्यें असें ठरलें होतें कि, बाणकोट व त्या बाणकोटचा खाडीचे कांठचीं पांच गांवें पेशव्यानीं इंग्रेजास द्यावीं; तीं पर्जन्यकाळ गेल्यानंतर त्यांहीं त्यांचे स्वाधीन केलीं. मग दुसरे वर्षीं विलायतेहून बादशाहाचीं कित्येक मोठीं मोठीं जहाजें मुंबईस येऊन, तीं व दुसरीं मुंबईसंबंधीं लढाऊ जहाजें मिळून चौदा जहाजें विजयदुर्ग घ्यावयास रवाना झालीं. त्यांवर आठशें विलायती लोक, व एक हजार हिंदू पलटनी लोक चढले होते; तीं जहाजें विजयदुर्गासमोर जात तों पर्यंत मराठ्यांहीं आंग्र्याचे दुसरे कोंकणचे किल्ले होते ते घेतले; आणि विजयदुर्गासही घेरा घालून, इंग्रेजी कुमकेची वाट पहात होते; इतक्यांत तीं गलबतें जवळ येतांच त्या किल्ल्यांत तुळाजी आंग्र्या होता, तो मराठ्यांचा लश्करांत जाऊन, इंग्रेजांखेरीज मराठ्यांशीं मात्र तहाचें बोलणें करूं लागला. त्या तहास पेशव्याचे लोक अनुकूळ होऊन त्या किल्ल्यांत बहुत द्रव्य होतें तो सर्व लाभ आपणास घ्यावयाविषयीं इंग्रेजांची कुमक नघेतां, त्यांस युक्तीनें माघारें लावावयास उद्युक्त झाले. हें सर्व वर्तमान इंग्रेजांचा त्या सरदारास कळलें, त्याणें तात्काळ समुद्रांतून किल्लेकरांशीं युद्ध आरंभिलें, आणि आपले शिपायी लोक कांठीं उतरून पेशव्याचें लश्कर व किल्ला या दोहोंमध्यें आपलें ठाणें बसवून, किल्ला खुसकीवरून व समुद्रांतून आपण वेढला. आणि त्या किल्ल्यावर बहुत द्रव्य आहे त्यांत आपली कांहीं वांटणी असावी म्हणून मराठ्यांकडील रामाजी पंत नामें तेथें कोणी मुख्य होता, त्याणें आपले थोडके तरी लोक किल्ल्यांत जावे यासाठीं फार उद्योग केला; त्यांत इंग्रेजांचा कोणी चौकीचा बंदोबस्त राखणारा सरदार होता त्यास युक्तीनें आमचे कांहीं लोक आंत जाऊं दिले असतां, तुह्मांस मुंबईहून दहा हजार रुपयांची हुंडी देऊं असें गुप्त सांगीत

लें,

लें असा लांच देत असतां तो ऐकेना. इतकें होऊन शेवटीं तो किल्ला इंग्रेजांचे अधीन झाला. त्यांत मराठ्यांचें माणूस कोणीही गेलें नाहीं, त्यावरून इंग्रेजांचा सरदारांनीं तेथें द्रव्य दहा लक्ष होतें. त्यापैकीं मराठ्यांस किमपि न देतां त्या लोकांहीं आपणांत वांटून घेतलें. असें झाल्यावर मुंबईचा मुख्य इंग्रेज होता, त्याणें विजयदुर्ग किल्ला फार सुदृढसा आणून तो आपणाकडे घ्यावा आणि मराठयांस बाणकोट द्यावा असें केलें. या कृत्रिमाविषयीं पेशव्यानें इंग्रेजांचा मुख्य बादशाह याजवळ, आणि मद्रासचा मुख्य इंग्रेजांचा कारभारी साहेब होता त्याज पाशीं फिर्याद केली. त्यावरून दोहींकडचें लिहिलें मुंबईचा मुख्यास आलें, तेव्हां त्याणें मराठेही तहामध्यें जो नेम ठरला त्या प्रमाणें वागले नाहींत असें समजावून, त्यावेळेस तें प्रकरण तसेंच रक्षिलें.

करनाटकांत सलाबतजंगाचें लश्कर व मराठे लोक मिळून सावनूर किल्ला बहुधा फ्रांशिसांचा तोफा चालवायाचा कौशल्यें करून घेतला. आणि दुसराही त्याचा मुलुख घेऊन त्या नवाबाशीं त्यांहीं स्नेह केला. तेव्हां जानिमित्त इतका कलह झाला तो मुजाफरखान पुनः सलाबतजंगाचे चाकरीस राहिला. असा सलाबतजंगाशीं आणि पेशव्याशीं स्नेह पडला, त्याचें कारण हेंच दिसतें कि. फ्रांशीसलोक मोठ्या योग्यतेस आले. ते सर्व कांहीं आपल्या सत्तेंत येतील अशा शंकेनें त्यांस काढून द्यावेसें त्यांचा मनांत होतें. त्यावरून ते सावनूर स्थान त्यांचे हातीं येतांच फ्रांशिसांचा मुख्य बसी नामें साहेब होता, त्याला सलाबतजंगानें सांगीतलें कीं. आतां आम्हास तुमचें प्रयोजन नाहीं; तुह्मीं आमचे मर्यादेबाहेर आह्मीं तुह्मास मुलुख+ दिला आहे तिकडे जा. असा निरोप झाला त्यावेळेस बसीजवळ त्याचा जातीचे फ्रांशीस घोडेस्वार दोनशें, व पायदळ सहाशें, याशिवाय पांच हजार पलटणीं हिंदुलोक व उत्तम सरंजामयुक्त त्याचा सेने प्रमाणें त्यास पुरतशा तोफा होत्या; असें त्याचें सामर्थ्य असतां तो बसी समजला कीं, हे मला काढून द्यावयास मिळाले आहेत. आणि जर मी यावेळेस यांची आज्ञा नमानावी तर, मुजाफरखान याजकडे आहे, त्याचे व आपले हिंदी पलटनाचे शिपायी लोक यांचें इष्टत्व आहे; यास्तव निःशंक युद्ध होणार नाहीं, त्यास हेंच उत्तम कीं, आपल्या मर्यादेंत जातों. असें दाखवून, हैदराबादेस जाऊन तेथें

---

+ सनसत्राशें पन्नासांत बसीला लश्करखर्चास दक्षिणेचे पूर्वेकडे समुद्राचे कांठीं राजमंद्री शहर, व शिकेकोळ, व एलोर, इतका मुलुख सलाबतजंग याणें दिला होता.

आपला बंदोबस्त चांगला करावा आणि आपल्या मुख्य ठिकाणची कुमक आणावी; नंतर मागें उलटावें. असें मनांत आणून तो तें सांगणें अवश्य मानून मोठ्या त्वरेनें जाऊन हैदराबादेस पोंहचला. तेथें चांगली बंदोबस्ताची जागा पाहून आपण त्या आपल्या लोकांसहित त्यांत राहून युद्धाची तयारी करूं लागला. आणि तेथें सलाबतजंगाकडचे मुख्य सरदार रामचंद्र जाधव व जानोजी निंबाळकर होते ते वश केले. इतक्यांत मासुलीपट्टणाहून त्याची कुमकही येऊन पोंहचली. त्यानंतर त्याचा असा बंदोबस्त झालेला जाणून, सलाबतजंग त्यास दूर करावयाची मसलत टाकून त्याशीं स्नेह रखिता झाला. मग तो बसी सलाबतजंगाजवळचा कारभाऱ्यांत पहिल्यापेक्षां मान्यता पावोन त्याणें मुजाफरखानाला सलाबतजंगाचे चाकरींतून काढिला. मग त्या मुजाफरखानानें पुण्यास जाउन पेशव्यास बहुत आर्जवून कबूल केलें कीं, इतःपर कृत्रिम न करीतां इमानीपणें चाकरी करीन. त्यावरून तो पेशव्यानें आपणापाशीं रखिला, परंतु सदाशिव चिमणाजी याचा मनास ती गोष्ट आली नाहीं.

पेशवा कर्नाटकांतून जुलाईचे विसाव्ये तारिखेस पुण्यांत आला; नंतर त्याणें मुंबैचा अधिकारी बोंचेर साहेब त्याला बहुत स्नेहयुक्त पत्र लिहून, त्यांत असें समजाविलें कीं, आह्मी पुण्यांस आलों, आतां पूर्वोक्त कामांपैकीं कांहीं बंदोबस्त राहिला आहे तो आपला कोणी साहेब एथें आला ह्मणजे त्याचे विद्यमानें केला जाईल, त्यावरून बेफील नामें व स्पेनसर नामें दोघे साहेब मुंबईहून गेले; ते पुण्यांत पेशवा व रघुनाथराव व सदाशिव चिमणाजी यांस भेटले. मग अकटोबराचे बाराव्ये तारिखेस असा निश्चय ठरला कीं इंग्रेजानीं विजयदुर्ग पेशव्यांस द्यावा; आणि पेशव्यानीं इंग्रेजांस बाणकोट व त्याजवळचे खाडीचा कांठचे दहा गांव द्यावे, याखेरीज आमचें कांहीं मागणें सरकार कंपनी बहादुराकडे राहिलें नाहीं, असें लिहून द्यावें या प्रमाणें तीं सर्व कामें उलगडून ते दोघे साहेब माघारे मुंबईस आले.

सन सत्राशें छप्पंनापासून सन सत्राशें साठपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग अठरावा.

## अनुक्रमणिका.

रघुनाथराव लष्करसुद्धां हिंदुस्थानांत स्वारीस गेला. व पेशवा कर्नाटकांत जाऊन श्रीरंगपट्टनचा खंड घेतला.

खडापाजवळचे लढाईचा प्रकार.

म्हैसुरच्या सरदार हैदर अल्ली याचा उत्कर्ष.

हैदराबादचे दरबारीं कांहीं आभ्यंतरीय कृत्रिम झालें. तें व त्याचा शेवट.

इंग्रेज लोकानीं सुरत घेतली तें प्रकरण.

पुनः मराठे याणीं कर्नाटकांत संचार केला तो व हैदराबादचें कांहीं विशेष वर्तमान.

सदाशिवरावाचा स्वभावाचें निरूपण.

त्या सदाशिवरावास मारेकरी घातला असतां तो वांचला तें प्रकरण.

आमेद नगर मराठ्यांहीं कृत्रिमेंकरून घेतलें.

सदाशिवरावसेनेचें मुख्यत्व पावोन रघुनाथराव कारभार करूं लागला. तो प्रकार.

दक्षिणेंत मराटे व मोंगल यांशीं युद्ध होऊन मराठ्यांस काय लाभ झाला तो पर्याय.

## भाग अठरावा.

सन सत्राशें छप्पन्नाचा पर्जन्यकाळ गेल्यावर. पेशव्यानें आपला भाऊ रघुनाथराव याजबरोबर फौज देऊन त्याची दिवाणगिरी सखारामबापूला सांगून हिंदुस्थानांत पाठविला; आणि आपण मोठें सैन्य जमा करून. कर्नाटकास चालिला. तो सन सत्राशें सत्तावन्नांत अकस्मात श्रीरंगपट्टणाचे किल्ल्याजवळ प्रकट होऊन. आमचा बाकी खंड राहिला असें निमित्त करून अमर्याद पैका मागूं लागला. तो तिकडे जात असतां खर्पाचा नबाब खैरीज करून कृष्णेचा दक्षिणकांठचे नबाब त्याला अनुकूळ झाले; आणि घोरपडाही सहा हजार स्वारांनिशीं येऊन त्यास मिळाला. नंजीराजनामें म्हैसुरच्या राजाचा दिवाण तो बळेंच श्रीरंगपट्टणचा अधिकार.

आपण

आपण चालवीत होता; त्याणें तें पेशव्याचें मागणें पहिल्यानें मान्य केलें नाहीं; परंतु तोफांचा मारापुढें निरुपाय होऊन, आर्जवानें त्याशीं बोलून, तें देणें फार हलकें ठरवून तात्काळ नगद पांच लक्ष रुपये दिले, बाकी ऐवज जमा होई तोंपर्यंत त्यांहीं कांहीं मुलुख वहिवाटावासा केला. यानंतर पेशव्याचा मनांत आलें कीं, पूर्वीं मराठेंचा स्वाधीन जितका कर्नाटकचा मुलुख होता तो आपल्या सत्तेंत आणावा. मग त्याणें शेरा परगणा घेऊन पाउसकाळ पुढें समीप आला ह्मणून तें लश्कर बहुतेक बरोबर घेऊन, माघारा पुण्यास येऊं लागला; तेह्मां बाकी फौज बळवंतराव मेहेंदळ्याचे स्वाधीन करून उसकटा, व बंगळोर, व बाळापूर, व कोल्हार, इतकें घ्यावयासाठीं तेथें ठेविली. त्यानंतर खरपाचा नवाबापासून बळवंतरावानें उसकटा घेतला; आणि अर्काटचा नवाबापाशीं चौथ व सरदेशमुखीबदल बहुत वाद प्रतिवाद करून दोन लक्ष रुपये नगद व अडीच लक्ष मुलखांतून वसूल करून घ्यावे असा निश्चय ठरला. त्या अर्काटचा नवाबास मद्रासचे इंग्रेज लोक अनुकूल होते, त्यांहीं त्यास खंडणी न पडावी ह्मणून यांस सांगितलें कीं, तुह्माला फ्रांशिसांचा मुलखीं स्वारी करावयास हा उत्तम समय आहे. असें त्या इंग्रेजांचें सांगणें बळवंतरावानें न मानितां, जें मागणें केलें होतें तो पैका त्या नवाबास द्यावा लागला. यानंतर खडापापाशीं खरपाचा व करनोळचा या दोहों नवाबानीं मिळोन त्या मेहेंदळ्याशीं युद्धप्रसंग केला; परंतु ते जय नपावतां खरपाचा नवाब मृत्यु पावला, आणि मराठ्यांहीं त्याची राजधानी लुटली. तथापि तत्पक्षी जे लोक होते त्याणीं युद्धें करून तो मुलुख मराठ्यांचे हातीं लागूं दिला नाहीं, इतक्यांत ह्मैसुरचे दरबारीं हैदरअल्ली पुढें मोठ्या योग्यतेस येणारा त्याचे मसलतीनें त्यालो कांहीं पूर्वील खंडणीपैकीं कांहीं नगद पैका देऊन बाकी ऐवजास मुलुख लावून दिला तो माघारा घेतला. त्यावरून पुण्यामध्यें पेशव्यानें सैन्य तयार करून गोपाळहरीस त्याबरोबर देऊन, मेहेंदळ्याचे कुमकेस पाठविला परंतु औरंगाबादेंत मुख्य प्रधान शानवाजखान याणें कांहीं मसलत करून बादशाहास कैदेंत ठेवून त्याचे जागीं त्याचा भाऊ स्थापावा, व त्याचें साहाय्य करणारे फ्रांशीस लोक दक्षिणेंतून काढून द्यावे, अशी योजना करिता झाला. त्या मसलतीस पेशवे मुळापासून अनुकूल असतील ह्मणून गोपाळहरी श्रीरंगपट्टणीं हैदरअल्लीवर जात होता, तो मनाकरून औरंगाबादेकडे पाठविला, नंतर त्या नवाजखानानें कल्पिलेलें कृत्रि-

* फ्रांशीस व इंग्रेज यांशीं त्यासमयीं युद्ध लागलें होतें.

न शवटास न जातां तो फ्रांशीस लोकांचे हातून मेला गेला. त्याचे जागीं प्रधान बादशाहाचा भाऊ सलाबतजंग यास केला. दुसरा भाऊ निजामअली, तो पळून गेला. आणि फ्रांशीस लोक यांचें बळ वाढलें इतक्यांत ते फ्रांशीस यांचा कोणी नवा मुखत्यार येऊन त्याणें इंग्रेजांचें युद्ध संभाळावयास त्या फ्रांशिसांस बोलाविलें. तेव्हां तो बसी फौजेसहित स्वसंतोषें दौलताबाद किल्ला सोडून दक्षिणेंतून निघाला. ते समयीं त्याशीं स्पर्धा करणारे हिंदु व इतर त्यांस मोठा चमत्कार व आनंद वाटला. आणि सलाबतजंगास त्यांपासून उपयोग होई तो आश्रयरहित होऊन, फार श्रमी झाला. ते वेळेस मराठे लोक पुण्यास चालिले असें औरंगाबादेकडचें वर्तमान असतां मुंबईचा इंग्रेजानीं सुरत घ्यावयाची मसलत करून त्याप्रमाणें तयारी करीत होते. त्या वेळेस पेशवा औरंगाबादेचा कामांत गुंतून, त्याला त्या इंग्रेजांचें निवारण करावयास अवकाश सांपडला नाहीं, ह्मणून त्याणें चातुर्य करून तें काम सिद्धीस जाऊं न दिलें, तो प्रकार असा. कल्याणचा सुभेदार शंकराजीपंत त्यास आज्ञा केली कीं, हालीं आह्माला रिकामपणा नाहीं, तोंपर्यंत तुह्मीं इंग्रेजास भुलथापी देऊन तसेंच राखावें. त्यावर त्याणें विनंती केली कीं, तें चालावयाचें नाहीं, कांकीं, ते लोक आपल्या अर्थ शेवटास नेतील. त्यावरून बाळाजी बाजिरावानें आपलें लष्कर कित्येक मजला पश्चिमेकडे चालविलें, आणि पुण्यामध्यें इंग्रेजांचा वकील हिंदू होता त्याकडून इंग्रेजांस असें कळविलें कीं पेशवा लष्कर सुद्धां मुंबईवर जातो, त्या वेळेस इंग्रेजानीं दक्षिणी कारभार किमपि न जाणल्यामुळें तें वर्तमान खरें मानून मुंबैचा बंदोबस्तास लढाऊ गलबतें कांहीं सुरतेस होतीं तींही आणवून, मोठ्या तयारीनें पेशव्याची मार्गप्रतीक्षा करीत तेथेंच राहिले. अशा कारणानें त्या वेळेस तें काम न झालें; परंतु पुढें थोडकेसे महिने गेल्यावर त्यांहीं सुरत घेतली, त्या कामांत इंग्रेजांचे शिपाई व सरदार बहुत मेले गेले. याप्रमाणें सन सत्राशें एकुणसाठांचा चौथा महिना मार्च याचे चवथ्ये तारिखेस इंग्रेजांचे हातीं सुरत लागली.

पेशवा माघारा पुण्यास आल्यावर पर्जन्यकाळ गेल्यानंतर म्हैसुरकरानें खंडणी पैकीं ऐवजास लावून दिलेला मुलुख त्याणें माघारा घेतला होता तो घ्यावयाकरितां गोपाळहरीस पाठविला त्याणें तें कार्य करून बंगलोरास घेरा घातला. ते समयीं म्हैसुरच्या लष्कराचा मुख्य हैदरअली झाला होता. त्याणें पहिल्या कराराप्रमाणें सोळा

लक्ष रुपयांचें सोनें तोलून दिलें, आणि सोळा लक्षांचा हुंडी चिठ्या दिल्या. ते व्हां बाकी वसुलाविषयीं वहिवाटावयास लावून दिलेला मुलुख सोडून, मराठ्यांहीं त्याशीं सल्ला केला.

यानंतर गोपाळहरी तेथून निघाला तो मद्रासेस इंग्रेज होते, त्यांस भोंवता वेढा घालून फ्रांशीस त्यांशीं युद्ध करीत होते, तेथें जाऊन त्या दोघांपासून खंडणी घ्यावयाचा उद्योग करूं लागला, परंतु त्या उभयतांहीं त्याचा धिक्कार करून त्यास लावून दिला. तो सूड उगवावयाकरितां फ्रांशिसांचें स्वाधीन त्रिपुटीचें देवस्थान होतें तें त्याणें घेतलें. तेथचे यात्रेंत पैका बहुत वसूल होत असे. तो जमा करणार होता. परंतु त्याला पुण्याहून माघारें बोलावणें गेलें तेव्हां तेथें थोडकेसे लोक ठेवून तो तेथून निघाला, नंतर अर्काटचा नवाबानें ते लोक तेथून काढून दिले.

फ्रांशीस लोक दक्षिणेंतून गेल्यावर सलाबतजंगाचा भाऊ निजामअल्ली तो पदवीस चढूं लागला; त्यास पेशवा अनुकूळ होता. याशिवाय निजामउलमुलुखाशीं आणि फ्रांशिसांशीं पहिलाच द्वेष असे, त्या निजामाचा हा पुत्र म्हणून इंग्रेज लोकही त्याची कृपा संपादन करावयाकारणें इच्छीत होते. नंतर त्या निजामअल्लीला समजलें कीं, सलाबतजंग बादशाह इंग्रेज व फ्रांशीस हे दोघे लढत असतां आपण हैदराबाद सोडून फ्रांशिसांचे कुमकेस चालिला. तेव्हां तो निजामल्ली आधीं औरंगाबाद घेऊन पुढें हैदराबादेस जाऊं लागला, ते समयीं सलाबतजंग माघारा आपल्या ठिकाणीं आला. नंतर निजामअल्लीस प्रधानकी प्राप्त झाली, आणि सलाबतजंग आपलें पहिलें ठिकाण औरोणी तेथें गेला.

पुण्यामध्यें मुख्यत्वें कारभार सदाशिवराव भाऊ करित होता, त्याचा कारभारी रामचंद्रबाबा शेणवी तो पूर्वी चार पांच वर्षें मेला त्याचें द्रव्य पुष्कळ होतें, तें त्याणें आपल्या भावाजवळ दिलें असे; त्यांतलें तिसरा वांटा त्या भावानें धर्मकृत्यास लाविलें; आणि उरले जे दोन वांटे ते एक रामचंद्रबाबाचा पुत्रास दिला आणि एक आपण घेतला.

सदाशिवराव मोठा लोभी आणि उतावळा परंतु सावध व सुदृढ व स्वभावेंकरून अहंकारी आणि कांहींसा निर्दय असे, तथापि तो सुबुद्धी आणि स्वकीयांविषयीं सुशील होता. तो लोकांपासून पैका खाऊन कामें करी, हा एक त्यास मोठा दोष होता, कांकिं, सरकारचा जो चाकर त्याणें चांगलेंही काम करून मध्यें खाऊं नये. परंतु मराठ्यांमध्यें कारभाऱ्यानें चांगल्या कामांत पैका खाल्ला असतां, तो दोष मानित नाहींत, ही चाल सर्वथा

अनुचित

अनुचित. असें आहे कि, जो उत्तम कामें करून द्रव्य खाईल तो समयविशे-षीं लोभेंकरून वाईट कामही करील.

रघुनाथराव हिंदुस्थानांतून आल्यावर तो व सदाशिवराव यांमध्यें युद्धसाहित्य व सेनाखर्चसंबंधें कांहीं भांडण लागलें. कांकिं. तो सरकार खजिन्यास कांहीं द्रव्य न आणितां कर्ज घेऊन माघारा आला. त्या कलहांत रघुनाथराव कोपेंकरून बोलिला कीं. एवढें चातुर्य तुह्मामध्यें असेल. तर दुसरे स्वारीस तुह्मींच जा. त्या दिवसापासून तो कलह वाढतां वाढतां त्या कुळांतही दोन फळ्या होऊन त्या गोष्टी लोकांत प्रसिद्धीस येऊं लागल्या. शेवटीं ज्यास पेशवा चाकरीस ठेवते समयीं हा माणूस योग्य नव्हे असें सदाशिवरावानें ह्मटलें होतें. तो मुजफरखान याचा कोणी शिपायी संगमावर सदाशिवराव भाऊ आपल्या कचेरीचा डेर्यांत बसला होता तेथें हळूच त्याचा जवळ जाऊन एकाएकीं खंजीर काढून मारूं लागला. तों त्याचा कोणी माणूस जवळ होता त्याचा हात धरून पलिकडे सरला. त्या योगें त्या सदाशिवरावाचें शरीर वांचलें कांहींसें पाठीस मात्र तें शस्त्र लागलें. तेव्हां तो मारेकरीयास मारहाण करून पुसतांच तो कबूल झाला कीं, मला मुजफरखानानें सांगीतलें. त्यावरून मुजफरखानास आणून विचारिलें, ते समयीं तो किमपि नाकबूल न जातां हें मी केलें ह्मणाला. मग तो मारेकरी व तो मुजफरखान. या दोघांस तेथून बाहेर काढून मारिलें. ते वेळेस कोणी एक परभू त्या मुजफरखानाचा चाकर होता त्याजकडेही या प्रकरणीं कांहीं अन्याय लागू झाला; त्यावरून त्याला किल्ल्यावर टाकिला. त्यापुढें त्याचें कांहीं वर्तमान प्रसिद्धीस न आलें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं, कांकीं, मराठे लोक यांची पूर्वोपर चाल अशीच आहे कीं. जो सरकारच्या अपराधी तो एकदां किल्ल्यावर टाकिला ह्मणजे पुनः त्याचें कांहीं वर्तमान दुसर्यास कळत नाहीं.

मग पेशव्याचे दरबारीं असा नेम ठरला कीं. रघुनाथरावानें पुण्यांत राहून मुलखी कामें करावीं. आणि सदाशिवरावानें स्वारीस जावें. नंतर सदाशिवराव लश्कर सहित उत्तरेकडे जावयास सिद्ध झाला, ते समयीं. असें वर्तमान आलें कीं, पूर्वीं सदाशिवरावानें कपटेंकरून आमेदनगर घ्यावयाची मसलत केली होती त्याप्रमाणें मोंगलांचा किल्लेदारानें लांच खाऊन तो जागा सदाशिवरावाचा कारकुनाचे स्वाधीन झाला. हें वर्तमान सलाबतजंग व निजामअल्ली यांस कळलें तेव्हां ते फार क्रुद्ध होऊन पेशव्याशीं युद्ध करावें असें मनावर घेते झाले, परंतु ते समयीं त्याजपाशीं

युद्धा

युद्धाजोगा बंदोबस्त नीट नव्हता; तथापि तें नगर निजामशाही बादशाहींतली पुरातन राजधानी, आणि महत्वयासेंकरून आपल्या हातास आली. ती व्यर्थ गेली हा मोठा अपमान जाणून निश्चय केला कीं, हेच समयीं विलंब नकरितां युद्धास जावें. तेवेळेस जे लोक मिळाले ते लागलेच पुढें रवाना केले. त्याज बरोबर मोठ्या मोठ्या तोफाही चालत्या केल्या. ते लोक बेदरावरून धारूरास जाऊन पोंहचल्यावर मागून सलाबतजंग व निजाम अल्ली हे दोघे सात हजार फौज बरोबर घेऊन जात होते. ते समयीं सदाशिवराव याणें भीमातीरीं जाऊन बहादुरगड घेतला; इतक्यांत त्यास हे दोघे भाऊ थोडकें सैन्य बरोबर घेऊन जाताहेत असें वर्तमान कळलें तेव्हां त्याणें त्यांस नधूनच धरून न्यावयाकरितां आपली एक फौजेची टोळी पाठविली. तेवेळेस त्या दोघां भावांनीं मोठी त्वरा करून आपल्या थोरल्या फौजेंत जाऊन मिळावें तें नकरितां, उदगीर येथें ठाणें धरून राहिले. तेथें सदाशिवरावाचे बिनीवाले पुढें येऊन पोंहचले. त्यांशीं त्या दोघां भावांहीं लढाई करून आपली दारू व गोळी उगीच खरचली. ते बिनीवालेतर मागून सदाशिवराव येऊन पोंहचावा ह्मणून कालक्रमणार्थ हलकें हलकें युद्ध करीत होते. मग सदाशिवराव येऊन पोंहचला त्याजबरोबर चाळीस हजार स्वार व इभ्राहिमखान+ गार्दी नामें पलटणीचा सरदार. त्याजवळ पलटणी शिकविलेले लोक ५००० होते त्यांस गारदी ह्मणत तो ही येऊन पोंहचला. त्यासमयीं ते दोघे भाऊ समजले कीं, आह्मीं ठाणें धरून राहिलों हें ठीक न झालें; मग निजाम अल्ली तह करावयास सिद्ध झाला परंतु सदाशिवराव ऐकेना. तेव्हां त्या दोघां भावांहीं मोठ्या निकरानें इभ्राहिमाच्या पलटनांवर हल्ला केला आणि त्याचीं अकरा निशाणें घेतलीं ते समयीं ते पलटनी लोक फार नाश पावले आणि बहुतेक मेले गेले. तथापि त्या जयाचें फळ त्यांहीं फारवेळ न भोगिलें, कांकिं, इतकें होतें तों मराठ्यांची मोठी एक टोळी येऊन त्यांचे मोंगल सुमारें तीन हजार मारिले. इतकें झाल्यावर निजाम अल्लीनें आपलें अधिकाराचें मोर्तब सदाशिवरावास पाठविलें. त्यांत अर्थ असा किं, आतां तुमचा चित्तास येईल तें करावें; तेव्हां सदा-

---

+ इभ्राहिमखान कांशिसांचे हाताखालीं शिकलेला आणि मुजफिरखान याचा कोणि सोयरा होता. तो पूर्वी सलाबतजंग व निजाम अल्ली यांचें वांकडें पडलें त्यासमयीं निजाम अल्लीजवळ होता मग ते दोघे एक झाल्यावर निजाम अल्लीनें त्यास निरोप दिला, त्यासमयीं त्या इभ्राहिमखानाला सदाशिवरावानें आपल्या चाकरीस ठेविला.

शिवरावानें तह केला तो असा. किल्ला दौलताबाद, व शिवनेरी, व आशीरगड व विजापूर, इतकें मराठयांकडे असावें. याशिवाय मराठयांहीं आमेदनगर जें घेतलें त्याविषयीं मोंगलानीं वाद करूंच नये. याखेरीज विजापूर परगण्यांतील व बेदरचा कांहीं भाग, व औरंगाबाद शहरावांचून तो प्रांत, हरसोल व श्रीतारा रहित. इतकें मराठयांचा स्वाधीन असावें. याप्रमाणें तह होऊन जितका मुलुख मराठयांचे स्वाधीन झाला, तितक्याचें उत्पन्न वर्षास बासष्ट लक्ष रुपये होत असे, त्यांतून एकेचाळीस लक्ष रुपये पेशव्यानें आपल्या लष्करी सरदारास जहागीर करून त्याबद्दल चाकरी फौजेसहीत करावी असें कबूल करून घेतलें. त्याची अशी चाल होती कीं, आपणास मुलुख मिळाला असता त्यांतील कांहीं विभाग आपल्या सरदारांस असावा; यांत अर्थ इतका कीं, तो सरदार आपली चाकरी व मुलखाचा बंदोबस्त चांगला ठेवील आणि सावध असेल.

याप्रमाणें तह झाल्यावर दक्षिणेंत मुसलमानाचा विभाग होता, तो त्यांचा मुलखापासून बहुत दूर, आणि त्यास भोंवता मराठयांचा मुलुख त्यावरून असें दिसूं लागलें कीं, तो जागा किमपि विलंब न लागतां मराठयांचे हातीं जाईल. आणि तो सारा मुलुख एकत्र झाल्यानें पूर्वी शेंकडो वर्षें दुसऱ्यांचे आज्ञेंत वागलेले जे ब्राह्मण लोक, ते स्वतंत्रपणें वागतील असाही अर्थ दिसूं लागला.

असें मराठयांचें प्राबल्य झाल्यानें प्रजेस सुख किंवा स्थैर्य न झालें कांकिं, जेथें जेथें त्यांची सत्ता होई तेथें तेथें लूट व जुलुम व नाश हीं तीनही व्हायाचींच ते लोक धर्मेंकरून प्रजापालन करावयाचा अर्थ मनास आणीतच नसत; अशा अनर्थांत रैतेस सुख कोठून; परंतु जे लोक लष्कराशीं संबंध न ठेवितां शेतें करून आपल्या नीतीनें वागतात ते जें मिळेल तें खाऊन सुखी असतात; आणि ते आपआपल्यांत एकमेकाविषयीं प्रीतिमंत असून परस्परें विश्वास ठेवितात ते लोक आपल्याखेरीज दुसऱ्याशीं व्यवहार करूं लागले असतां दुसरे लोक त्यांचा रीती सारिखे न चालिले तरी त्यांस दूषण ठेवित नाहींत.

बाळाजी बाजीराव आपल्या पुतण्याचा उद्योगें करून इच्छेसारिखा जय पावला असतां हिंदुस्थानांतून पराजयसूचक कांहीं वर्तमान आलें तें पुढचे भागीं विदित होईल.

सन सत्राशें साठां पासून
एकसष्ट पर्यंत आलेलीं वर्तमानें मिळून
भाग एकुणिसावा.

## अनुक्रमणिका.

आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली याणें हिंदुस्थानांत येऊन दिल्ली व मथुरा शहर लुटलें.

रघुनाथराव याणें मुलतान व लाहोर पेशव्याचे सत्तेंत आणिलें तें प्रकरण.

राणोजी शिंदा याचा पुत्रांचें कांहीं वर्तमान.

दिल्लीचा बादशाह अलमगीर यास शाबुदिन वजीर याणें मारून टाकिला.

अबदाली बादशाह याणें मुलतान व लाहोर यांतून मराठयांस घालविलें आणि आपण दिल्लीकडे चालिला.

त्याणें मराठे सरदार यांचा पराभव केला; त्यावरून सदाशिवराव त्याचा पारिपत्यास दक्षिणेहून निघाला.

तो पुढें जात असतां त्यास कित्येक सरदार येऊन मिळाले, त्या योगें त्याचें सैन्य फार वाढलें.

मग त्याणें तिकडे जाऊन दिल्ली हस्तगत केली, आणि नवा बादशाह स्थापिला.

पानपता जवळची लढाई.

त्यांत मराठयांचा बहुत नाश झाला.

आफगाण लोकांचा क्रूरतेचें निरूपण.

बाळाजी बाजिराव पेशवा याचा मृत्यु.

त्याचा स्वभावाचें कथन.

## भाग एकोणिसावा.

सन सत्राशें चोपन्नांत दिल्लीमध्यें शाबुदिन याणें कृत्रिमें करून दुसरा अलमगीर नामें नवा तक्ताधिपती केला; त्यास दिल्लींत ठेवून त्याचा पुत्र अल्लीगोर नामें होता त्यास बरोबर घेऊन, मुलतान व लाहोर यांजकडे गेला. त्याचा मनांत होतें कीं, आफगाणाचा बादशाह आमेदशाह अबदाली याणें हे दोन्हीं प्रांत आमचे घेतले आहेत ते माघारे घ्यावे. ते अबदालीनें घेत-

के ते समयीं तेथें दिल्लीचा बादशाहाचा ठेवणाईत, मीरमनु नामें होता त्याणें तर ते दोन्ही प्रांत पहिल्यानें रक्षिले; मग त्याचा उपाय चालेनासा झाला, तेव्हां त्या आमेदशाह अबदालीचीच चाकरी स्वीकारून त्याकडून ते प्रांत आपणाकडेसच रक्षून त्याच ठिकाणीं राहिला. पुढें तो मेल्यावर त्याचा पुत्र लहान होता ह्मणून अबदालीनें ते प्रांत मीरमनूचे स्त्रीचे स्वाधीन ठेविले. मग तीचें स्वामित्व असतां, त्या प्रांतांची फार अव्यवस्था होऊन, तेथचे रेयत लोक निर्धन झाले. तेव्हां त्यांतील कित्येकां लोकांहीं ते प्रांत टाकून दुर जाऊन, शीख लोकांचा मंडळींत मिळाले. त्यासमयीं त्या बाईला तीचाच कोणी एक सरदार याणें केद करून तिणें आपणास निमे राज्य द्यावें असा करार झाल्यावर सोडिली; आणि त्याप्रमाणें केलें. हें वर्तमान शाबूदिनाला समजलें तेव्हां तो तें राज्य घ्यावयास हा उत्तम समय आहे असें जाणून त्या प्रांताकडे चालिला. तो तेथें जाऊन पोंहचतांच त्याणें तेथें एक फितुरी माणूस याची मैत्री केली; अबदालीची स्वारी त्या मुलखीं प्रथम होण्याचें कारण तोच मनुष्य. त्याचें नाव आदीनाबेगो, त्याशीं स्नेह करून ती मीरमनूची स्त्री धरून दिल्लीस पाठविली; आणि तो आदीनाबेगो तेथचा सुभेदार केला.

हें वर्तमान त्या आमेदशाह अबदालीला कळतांच तो फार क्रुद्ध होऊन मोठें सैन्य बरोबर घेऊन निघाला. तो अटकनदी उतरून निर्भयपणें दिल्लीस पोंहचला, तेथें मुख्य वजीर मीरशाबूदिन याणें आपली गरीबाई दाखवून त्याचें बहुत आर्जव केलें, ह्मणून त्या आमेदशाहानें क्षमा केली. परंतु त्याणें तें शहर लुटून फार नाश केला, आणि मथुराशहराचीही तीच दशा केली अणखी आग्रे शहर याचीही तीच वाट झाली असती परंतु त्या आफगाणाचा लश्करांत असा रोग उत्पन्न झाला कीं, त्या अबदालीला तें वारें बदलायाकरितां आपल्या काबुलप्रांतीं जावें लागलें. तेसमयीं त्या आमेदशाह अबदाली बादशाहानें आपला पुत्र तिमोरशा त्याला मुलतान व लाहोर सहित पंजाब मुलखाचा अधिकारी आपला हस्तक करून पाठविला. आणि दिल्लीमध्यें कोणी मोठ्या योग्यतेस आलेला रोहिला नजीबअदावला नामें होता, त्यास मीरउलउमरा पद देऊन मीरबक्षाची जागा दिली होती तें शाबूदिनाचे मनास ठीक वाटलें नाहीं, याकरितां अबदाली गेल्यावर त्यास पदच्युत करून तें पद आपला कोणी इष्ट यास द्यावें अशी इच्छा शाबूदिनानें धरिली; परंतु अलमगीर बादशाह त्यास अनुकूळ होता, आणि दिल्ली शहर त्या दोघांचे स्वाधीन असे. ह्मणून शाबूदिनानें आपला अर्थ शेवटास न्यावयासाठीं असा निश्चय केला किं, आधीं दिल्ली शहर आपण घ्यावें.

इतकें होतें तों रघुनाथराव सनसत्राशें अब्दालीचे सनातीस मारून घालवून गेला. त्याशीं कांहीं बोलणें ठाकून त्यास आपून दिल्ली येतली; आणि अलमगीरबादशाह यासही आपल्या स्वाधीन ठेविला. मग तो अबदालीचा ठेवणाईत नजीब आटवला त्यास होळकर याचा आश्रयानें जीवसंरक्षणाकरितां पळून जावें लागलें.

यानंतर रघुनाथराव कित्येक दिवस दिल्लीजवळ डेरे देऊन राहिला होता. तों लाहोरीं आदीनाबेगानें आजेंत कांहीं अंतर करून तें लाहोर ठिकाण सोडून तेथून जवळचाच डोंगरीं आऊन राहिला. तेथें राहून जांस पहिलें योगाभ्यासावांचून दुसरें कांहीं ठाऊक नव्हतें असे जे शीखलोक त्यांस युद्धकुशळ करून मग आपणास धरावयाकरितां आले जे अबदालीचे लोक त्यांस मागें हटवून रघुनाथराव यास निरोप पाठविला कीं, यासमयीं तूं माझें साह्याय्य कर आणि हा सारा मुलुख घे. त्यावरून तो संतोषानें तात्काळ तिकडे गेला मग अबदालीचे जे मुख्य होते ते सर्व जिंकून मोठा जयवंत होत्साता लाहोरांत शिरला, असें सन सत्राशें अठ्ठावन्नांत झालें, त्या काळीं रघुनाथराव त्या आदीनाबेगास मुलतान व लाहोरच्या सरसुभेदार करून त्याचा पुष्टीकरणार्थ कित्येक मराठे लोक ठेवून आपण तेथून निघोन पुण्यास आला. त्याणें हिंदुस्थान सोडिल्याचे पूर्वीं दिल्लीजवळ जनकोजी नामें जयापा शिंद्याचा पुत्र त्याजपाशीं कित्येक लष्कर समयविशेषीं लाहोरचा लोकांस कुमक करावयास, व रजपुतांपासून खंडणी घ्यावयास ठेविलें. माळव्याचा बंदोबस्तास मल्हारराव होळकर व दत्तोजी शिंदा यांस ठेविले. तो रघुनाथराव सर्वत्र जय पावोन त्याणें आपणास व मराठयांस मोठी योग्यता संपादिली; परंतु त्याजवळ ऐवज किमपि नव्हता; ऐशीं लाख रुपये कर्ज होतें, त्यावरून त्याशीं आणि सदाशिवरावाशीं भांडण लागलें.

यानंतर जोनपुरचा राजा आभीशिंग मेला तेव्हां त्याचे दोघे पुत्र रामशिंग व बेजीशिंग हे दोघे तक्तासाठीं भांडूं लागले. तेव्हां रामशिंगानें पेशवा सहाय केला, त्याणें राणोजी+ शिंदा जो पूर्वीं बाजिरावाचे वेळेस मोठा विख्यात झाला होता त्याचा पुत्र जयापा शिंदा त्यास आज्ञा केली कीं, रामशिंगाची पुष्टी करून कलह तोडावा. मग त्या शिंद्याचा आश्रयानें तो रामशिंग असें करिता झाला कीं, नागोर किल्ल्यांत आपला भाऊ असतां त्या

+ राणोजी शिंदा शाहू महाराज मेल्यावर पुढें थोडक्या अवकाशानें मेला त्याचे तीन पुत्र एक जयापा एक दत्ताजी एक जोतिबा हे तिघे आणि दोघे दासीपुत्र एक तुकोजी एक महादाजी तुकोजी तो असतांच मेला होता.

किल्ल्यास घेरा घातला. ते समयीं त्या बेजीशिंगानें आपला बाप आभीशिंग याणें पिलाजी गाइकवाड जन्मा ग्राचे नांवें मारिला, तसाच आपला भाऊ रामशिंग मारेकरी घालून मारविला. त्यावर अथापाचें लष्कर मागें हटलें. परंतु पुढें रघुनाथरावानें अजमीर घेऊन आंत पुरची खंडणी ठरविली.

रघुनाथरावानें हिंदुस्थान सोडिलें ते समयीं तेथें दत्ताजी व महादजी शिंदे ठेविले; त्यांस शाबूदिनानें रोहिले जिंकावयास योजिले. त्यांनी प्रथम नजीबअदवला जिंकावा लागला. तो आपणावर एवढें मोठें सैन्य आलेंसें पाहून आपल्या रोहिल्यांसहित गंगेच्या कांठीं ठाणें धरून राहिला; आणि अयोध्येचा नवाब सुजाउदवला यास आपल्ये कुमकेस बोलाविला. तो व रोहिले यांचें पुरातन वैमनस्य होतें. परंतु मराठयांचें प्राबल्य त्या उभयपक्षीं समान बाधक असें समजून त्याणें त्यास सहाय मागीतलें. तो त्यास मान्य होऊन, समीप आल्यावर दत्ताजी शिंद्यानें बुंदलखंडचे सुभेदार पेशव्यांचे ठेवणाईत गोविंदपंत बुंदेले, यांस सांगीतलें कीं, रोहिल्यांचे मुलखीं जाऊन त्या मुलखाचा अगदीं नाश करावा. त्यावरून तो त्या मुलखीं जाऊन तात्काळ त्याणें गंगेच्या पूर्वेकडचे त्यांचे मुलख व दुवाब नामें एक त्यांचा मुलख होता तो ही लुटून उद्वस्त केला. तेवेळेस तेथचा मुख्याला तेथून जाऊन कमाऊ नामें डोंगर आहे तो आश्रय करावा लागला. परंतु त्यासमयीं सुजाउदवला याणें गोविंदपंताचें लष्कर जवळ नेटलें असें पाहून आपल्या लष्करची गोसावी लोकांची मोठी टोळी पाठवून त्याचा अगदीं मोड केला, आणि त्यास गंगेचे पार घालविला.

त्यावेळेस दत्ताजीला असें वर्तमान समजलें कीं, आमेदशाह अबदाली तो मोठें सैन्य घेऊन मुलतान व लाहोर गांवारें घ्यावयास येतो; त्यावरून त्याणें त्या रोहिल्यांशीं तह केला, आणि आपण लाहोरचे मराठे यांचे पुष्टीकरणार्थ निघाला.

असें रोहिले व मराठे व अयोध्येचा नवाब यांचें वर्तमान असतां, दिल्लीमध्यें शाबूदिन याणें अलमगीर बादशाह व आपला सोयरा इंतिजाम आदवला व हल्लीं दिल्लीवर येतो आहे जो आमेदशाह अबदाली, हे तिघे एकमत्त आहेत असें लोकांस विदित करून तो बादशाह व आपला सोयरा या दोघांस मारून टाकिले; आणि त्या बादशाहाचे जागीं औरंगजेबाचा कनिष्ठ पुत्राचा पुत्र त्याचें शहाजहान असें नांव ठेवून तो तक्ताधिपती केला. एवढें दुष्कर्म करून मग मराठे व अबदाली यांचा युद्धांत कोण जय पावेल तें पहावयाकरितां जाटांचा राजा सुरजमल यास तो शरण

रण गेला आणि त्याचा आश्रयानें राहिला.

तिकडे लाहोरामध्यें रघुनाथरावाचे मराठे लोक होते. त्यांस होळकर व दत्ताजी शिंदा यांची कुमक येऊन पोंचल्याचे अगोधरच त्या आमेदशाह अबदालीनें त्यांचा पराभव करून हटविले आणि आपल्या लष्कराची बिनी त्यांचे पाठीस लाविली होती; मग दत्ताजी शिंदे व मल्हारराव होळकर आपल्या मराठ्यांचा कुमकेस येऊन पोंहले आणि तेथें सुमार पाहुं लागले, तों आपली दोघांची फौज तीस हजार आणि ते अबदालीचे बिनीवाले पाठीस लागून आले जे तेंच मुख्य लष्कर; असें समजून मागें हटले. ते यमुनेचा पश्चिमकांठीं चालतानां त्यांचें लक्ष्य आपल्यासमूरचा बिनीवाल्याकडेसच असतां दिल्लीजवळ आमेदशाह अबदाली याणें यमुना उतरून एकाएकी दत्ताजी शिंद्याचा लष्करावर पडोन त्या सैन्याचे दोन भाग मारून टाकिले; बाकी एक भाग उरला. त्या युद्धांत दत्ताजी शिंदा व त्याचा भाऊ जोतिबा हे दोघे मारले गेले.

असें ऐकतांच होळकर आपल्या सेनेसहित लवकर लवकर मागें हटूं लागला तो यमुनेचा पूर्वेकडे शिखंद शहर तेथें पोंहचल्यावर तें स्थळ निर्बाध असें समजला; तथापि त्या ठिकाणींही आफगाणाची एक टोळी आपलें मोठें सैन्य सोडून त्याचे पाठीस लागत फार लांबून आली ती एकाएकी त्यावर पडली. आणि त्याचा बहुत नाश केला.

मागल्या भागीं लिहिलें की, पेशव्यास पराजय सूचक कांहीं वर्तमान समजलें तें पुढचे भागीं लिहिलें जाईल, तो प्रकार हा. हें वर्तमान पेशवा हैदराबादसंबंधें मोठा लाभ मिळवून संतोषें करून सदाशिवरावासहित मांजरा नदीतीरीं डेरा देऊन राहिला होता, तेथें त्यास समजलें. तेव्हां सदाशिवराव नुकता बहुत जय पावला त्यामुळें तो अत्यंत हृष्ट आणि सगर्व ऐसा होत्साता बोलिला कीं, मी व विश्वासराव यांस हे समर्यां हिंदुस्थानांत नेमले असतां आम्हीं गेलेलें स्वरूप पुनः मिळवून आफगाण लोकांस अटकेचे पार घालवून देवूं. असें म्हणतांच पेशव्यानें त्यांस आज्ञा दिली तेव्हां सैन्य तयार होऊं लागलें. ते समर्यां लोकांस असें वाटलें कीं, हे मोठा जय मिळवितील; परंतु असें न समजलें कीं, हा एवढा मोठा सैनिक होऊन चालिला, यास युद्धकौशल्य किमपि नाहीं. अनायासें सिद्ध जो जय नितक्यानेंच तो गर्वास चढला; त्या सदाशिवरावास एकाएकी महत्पदवी प्राप्त होऊन यश आलें, जर लहान कार्यें करून त्याचा पराजय झाला असता तर तो पुढें सावधपणानें वागता. तस्मात् महत्पदारूढ जो मनुष्य त्याचें जें अज्ञान तें त्याची सेना व राज्य यांस परम अपायकारक झाल्यावांचून न रहात नाहीं.

सदाशिवराव व विश्वासराव यांजबरोबर हिंदुस्थानांत सरदार व फौज गेली ती प्रकार असा. निवडक घोडेस्वार मराठे वीस हजार. व कवाईत शिकविलेले पायदळ गार्दी लोक इब्राहिमखान गार्दी याचे व तोफखान्याचे लोक मिळून दहा हजार. याखेरीज ते चंबळानदीचे कांठी पोंहचले नाहींत तों, बाळाजी बाजिरावाचे आज्ञेनें मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदा व दमाजी गाइकवाड व यशवंतराव पवार व आपाजिराव आटवले व अंताजी माणकेश्वर व गोविंदपंत बुंदेले व गैरे सरदार आपआपली सेना घेऊन त्यांस मिळाले. याशिवाय बहुतेक रजपूतराजांनीं आपआपल्या स्वारांची एक एक टोळी पाठविली. याखेरीज पेंढारी पुष्कळ होते.

सदाशिवरावाबरोबरचे जे सरदार होते त्यांत बळवंतराव गणपत मेहेंदळे व समशेर बहादूर व नारोशंकर व विठ्ठलशिवदेव विंचुरकर व त्रिंबक सदाशिव पुरंदरे व कित्येक मराठे कुळांतील श्रेष्ठ लोक होते; आणि होळकराचा स्नेहास्तव, जाटांचा राजा सूरजमल्ल तो तीस हजार सैन्यासहित येऊन मिळाला. तेसमयीं भाऊचा लष्करचा सरंजाम असा थाटाचा केला होता कीं, जसा पूर्वी ओरंगजेबानें केला, त्याप्रमाणें कांहींसा असे; त्यापूर्वी मराठे तसा सरंजाम कधीं घेत नव्हते कामापुरता मात्र घेत. तें लष्कर पुढें चालतें झालें असतां, युद्धाविषयीं परम कुशळ असा सूरजमल्ल याणें जाणलें कीं, भाऊचे स्वाधीन मोठमोठ्या तोफा फार व पायदळ बहुत आणि बुणगेंही पुष्कळ, यामुळें स्वारांस त्यांबरोबर रहावें लागेल आणि युद्धांत त्यांस अडचण पडेल म्हणून त्याणें अशी मसलत केली कीं, मोठ्या मोठ्या तोफा व बुणगें एखाद्या किल्ल्याचा आश्रयानें ठेवावें, आणि आपले व भाऊचे स्वार मिळून पुढें जाऊन त्या अबदालीचा लष्कराचा आसमंतात उपद्रव करून त्याचा धान्यादि बेगमी साहित्याचा नाश करावा; तेणेंकरून तो आपल्या आपणाच मागें हटेल. या मसलतीस होळकरही मिळाला होता, परंतु सदाशिवरावाचा स्नेही रामचंद्रबाबा शेणवी त्याचें व होळकर यांचें वैमनस्य होतें म्हणून त्या होळकराची सदाशिवरावावर प्रीति नव्हती, यास्तव त्या होळकराची मसलत सदाशिवरावास आवडेना; आणि जाटाचें व होळकराचें ऐक्य होतें, त्यावरून त्या सुरजमल्ला विषयींही भाऊचा मनांतून कांहींशी अप्रीति झाली. अणखी त्याणें कवाईत शिकविलेले पलटणी लोक फ्रांशीस लोक यांस बहुत उपयोगी पडलेले पाहिले होते, या सर्व कारणांनीं कदाग्रह घेऊन, होळकर आणि जाट यांची अत्यंत हितावह अशीजी मसलत ती न घेतां. स्वबुद्धीनें वागूं लागला. मग तो त्या लष्करासहित पुढें जाऊन प्रथम तोफांचे मोर्चे लावून दिल्ली घेतली. नंतर पुढें जावें परंतु यमुनेला पाणी ब-

हुत

हुत आलें होतें तेणेंकरून पलिकडे जावयाची सोय नाहींशी झाली म्हणून तेथेंच डेरे देऊन राहिला. त्यावेळेस त्याचा मनांत आलें कीं, विश्वासराव यास दिल्लीचा बादशाह करून सुजाउदवला यास त्याची वजिरी द्यावी परंतु त्या समयीं तें काम कांहीं निमित्तेंकरून राहिलें.

यानंतर त्या भाऊसाहेबाचें लष्कर बेसुमार, व बुणगेंही पुष्कळ यामुळें थोडक्याच दिवसानीं दिल्लीचा आसमंतात धान्यादिकांचा तोटा पडूं लागला. आणि भाऊपाशीं द्रव्याचा तोटा पडेल असा सुमार झाला त्याणें आपल्याबरोबर दक्षिणेंतून येते समयीं दोन कोटि रुपये आणिले होते. याशिवाय होळकर व शिंदे व गोविंदपंत व रजपूत यांजवळ तीन कोटि रुपये होते. तथापि भाऊस वाटलें कीं, खर्चास तोटा पडेल; याकरितां त्याचा मनांत आलें कीं,- बादशाह याचा दिवाणखान्यांत सोन्या रुप्याची शोभा केली आहे ती मोडून द्रव्य करावें; त्यावरून होळकर व सुरजमल्ल यांस फार वाईट वाटून, त्याहीं आग्रहानें विनंती केली कीं, हें आचरण केवळ अयोग्य, आणि नाशकारक होय, असें बहुत प्रकारें सांगितलें तरी तो ऐकेना, मग त्याणें ती सर्वशोभा नष्ट करून त्यास फार लाभ न झाला, असुके सत्रा लक्ष रुपये उत्पन्न झाले. त्या भाऊच्या अशा दुष्टाचरणानें तो सुरजमल्ल आपलें लष्कर घेऊन तेथून निघून चालिला; त्यानंतर त्या लष्करचे रजपूत लोक यांचे मोंगलांचा लष्करांत कोणी स्नेही होते, तेही त्यांचा बोलण्यावरून तें लष्कर सोडून निघोन गेले.

इतक्यांत आमेदशाह अबदाली लष्कर सुद्धां गंगेचे कांठीं येऊन, अनूपशहरासमोर डेरे देऊन उतरला. तो तेथें असतां त्याणें सुजाउदवला आपणाकडे करून घेतला.

मग पर्जन्यकाळ कांहींसा शांत झाल्यावर त्या सदाशिवरावानें अलहगीरनामें दिल्लीचा बादशाह तो ते समयीं तेथें नसतां त्याचा पुत्र मीरजवानखान यास तक्ताधिपती करून +सुजाउदवला त्याचा वजीर असें लोकांस विदित केलें. त्यानंतर नारोशंकरास दिल्लीचा किल्ल्यांत ठेवून आपण लष्करासहित गंजपुरानामें कोणी एक कोट आहे त्यामध्यें पुष्कळ शिपाई लोक व सामान यथास्थित होतें, तेथें जाऊन तोफा लावून तो कोट पाडून तें स्थान घेतलें. इतक्यांत आमेदशाह त्या ठिकाणचा लोकांचे पुष्टीकरणार्थ फार उ-

---

\+ सुजाउदवला तेवेळेस आमेदशाह अबदाली याचा पक्षपाती झाला असतांही, तो त्या युद्धांत पहिल्यापासून तहाचें द्वार झाला होता म्हणून त्याची प्रीती संपादन करावयासाठीं सदाशिवराव उद्योग करीत असे.

लुक

मुक झाला, परंतु यमुनेस उतार नव्हता तथापि तो लश्करसहित यमुनेचा कांठाजवळ जाऊन राहिला. तेथें तह करावयाचें निमित्त करून भाऊला बहुत भुलथापी दिल्या, नंतर दिल्लीपासून दहा कोसांवर एक यमुनेंत उतार शोधून काढिला. आणि आपलें लश्कर बहुतेक यमुनेचा पार उतरून लाविलें. त्या समयीं कोणी तें वर्तमान भाऊस कळविलें. परंतु त्याचें लश्कर बहुतेक उतरून येई तोंपर्यंत भाऊ सत्य मानीना; शेवटीं सन सत्राशें साठांचा महिना दहावा अकटोबर याचे पंचविसाव्ये तारिखेस ते सर्व मुसलमान लोक यमुनेच्या अलिकडे आले.

मग दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्या दोहीं लश्करांचा विनीवाल्यांचा मोठा युद्धप्रसंग झाला. त्यांत दोघेही आपआपला जय झाला असें ह्मणत होते, परंतु ते दोन्ही पक्ष समानच असत; ते समयीं मराठ्यांचा लश्करांत मसलत झाली कीं, उद्यां मुसलमान लोकांवर एकाएकी हल्ला करावा परंतु होळकर ह्मणे कीं, हें ठीक नव्हे, प्रथम त्यांस अनेकप्रकारें उपद्रव करून त्यांस धान्यादिकांचा तोटा पाडावा, या मसलतीस तात्काळ इभ्राहिमखान गार्दी अमान्य होऊन बोलिला कीं, ही तुमची मसलत माझें पायदळ व तोफा शत्रूंचे हातीं शीघ्र सांपडावयास कारण होईल, अशीच आहे, यास्तव जो कोणि या मसलतीस मान्य होईल त्याजवर मी तोफांचा भडमार करीन. असें त्या इभ्राहिमखानाचें बोलणें होतांच तो व होळकर यांचें वितुष्ट मोठें पडलें. तें महत्प्रयासें मिटविलें. तोंपर्यंत मराठ्यांचें लश्कर मागें हटत हटत पानपतपर्यंत गेलें. तेथें इभ्राहिमखानाचे मसलतीनें सदाशिवराव भाऊ याणें आपल्या लश्करास भोंवता खंदक पाडिला. तो खोल आठ हात, आणि रुंद तेहतीस हात. याप्रमाणें केला. तेवेळेस आमेदशाह अबदालीही त्या लश्कराचा जवळ येऊन उतरला त्याणें आपल्या लश्करास भोंवता आश्रय मोठीं मोठीं झाडें पाडून आंत शत्रूचा प्रवेश नव्हावा अशी अडचण केली.

तेसमयीं मुसलमानाचें सैन्य एकेताळीस हजार आठशें स्वार व पायदळ अडतीस हजार इतकें निवडक सैन्य होतें; या खेरीज स्वतंत्र शिपाई लोक जे त्याचा पक्षाचे तेही त्या निवडकां खालोखाल होते, त्याशिवाय तोफा सत्त्याहात्तर होत्या.

मराठ्यांकडे पचावन्न हजार स्वार. व पंधरा हजार पायदळ आणि दोनशें तोफा, या खेरीज पेंढारी, व बुणगें मिळोन दोन लक्ष सुमारानें असतील.

याप्रमाणें दोन्हीं लष्करें बंदोबस्तानें ठाणें धरून राहिल्यानंतर गोविंदपंत बुंदेला यास मोंगलांच्या धान्यादिक गल्लासाहित्याचा नाश करावयाकरितां सदाशिवरावानें पाठविला; तो तेथें जाऊन एका आस्थाईंत आपण हजार लोकांसहित गुप्त राहून बाकीच्या लोकांकडून तें धान्यादिसाहित्य लुटावयाचें काम बहुत युक्तीनें करवीत असतां, कोणी एक आमदशाह अबदालीचा सरदार येऊन एकाएकीं त्यावर पडोन उभयतांची मोठी तोडातोडी होऊन गोविंदपंताचें डोकें तोडून आमदशाह अबदालीकडे पाठविलें. मराठ्यांचा ते वेळेस इतकाच नाश झाला असें नाहीं, त्या गोविंदपंताच्या मरणानंतर कित्येक स्वार आसामीस एकेक रुपयांची थैली घेऊन दिल्लीहून आपल्या मराठ्यांच्या लष्करांत येत होते; ते रात्रीस वाट चुकोन आफगाण लोकांच्या लष्करांत गेले; ते त्या लोकांमध्यें शिरतांच त्यांणीं त्यांस मारून तें द्रव्य घेतलें. ज्यासमयीं गोविंदपंत बुंदेला मारला गेला, त्यापूर्वीं मराठे व मुसलमान यांचा तह होईलसा दिसत होता, कांकि, त्या दोहीं लष्करचे सरदार येऊन एकामेकास भेटत होते; मग तो मेल्यानंतर युद्धाखेरीज उभयपक्षीं दुसरा उपाय नाहींसा झाला. मग तें युद्ध सन सत्राशें साठांच्या महिना अकरावा नवेंबर याचे एकोणतिसाव्ये तारिखेस सुरू झालें. तो प्रकार असा, मराठे लोक पंधरा हजार सुमारें मोठ्या धैर्यैंकरून अबदालीच्या लष्कराचे डाव्ये बाजूस जेथें आमदशाह अबदालीचा वजीर ठाणें धरून राहिला होता, त्यावर पडून आपल्या मोठ्या मारापुढें त्यास उभें राहावेनासें केलें; त्यांत त्या अबदालीचे लोक आफगाण दोन हजारांवर मेले गेले, यानंतर त्या वजिरास अबदालीची कुमक चहूंकडून आली तेसमयीं मराठ्यांस मागें हटावें लागलें. ते वेळस त्यांचेही हजार सुमारें लोक मेले गेले. त्या लढाईंत मुख्यत्वें होळकर होता. त्या दिवसापासून रोज रोज शिपाई व सरदार यांत ज्याच्या मनास येईल, तो इकडून व तिकडून कोणी बाहेर येऊन लढत; असें नित्यशः डिसेंबराचे तेविसाव्ये तारिखेपर्यंत होत गेलें. मग एके दिवशीं त्या अबदालीचा वजीर शावलीखान तो आपल्या बरोबर स्वारांची टोळी घेऊन तेथून निघोन जवळ एक मशीद होती तेथें जात असतां, त्यास पाहून सदाशिवराव व बळवंतराव मेहेंदळे व विश्वासराव व होळकर वगैरे लष्करसहित कित्येक सरदार त्यावर जाऊन पडावयास त्यास भोंवता घेरा घातला. तें पाहून त्याचे कुमकेस अबदालीकडचे लोक, व नजीब अदवला व दुसरेही कित्येक सरदार त्यांवर जाऊन पडले. तेव्हां त्या उभयतांचें युद्ध मोठ्या निकराचें झालें. त्यांत नजीब अदवल्या त्यासमयीं आपल्या लोकांपेक्षा फार पुढें हो-

ऊन

ऊन लढत होता; तेव्हां बळवंतराव मेहेंदळा त्यावर मोठ्या त्वरेनें जाऊन पडला. ते समयीं त्याजवळचे तीन हजार रोहिले मारिले गेले; आणि तोही मराठ्यांचे हातीं लागता लागतां, त्यास गोळी लागून तो मेहेंदळा मृत्यु पावला. तेव्हां सदाशिव रावास ती मोठी हानी वाटली त्या योगें तो फार कष्टी होऊन युद्ध न करितां, तें प्रेत माघारें छावणीस नेलें तेव्हां नजीबअदवला यास मागें सरावयाची संधी सांपडली तेवेळेस युद्ध तसेंच राहिलें; नंतर नित्य नित्य उभयपक्षीं टोळ्यां टोळ्यांचीं युद्धें होत. असें असतां रोहिले लोक व सुजाउदवला हे सर्व मिळून एकदांच उठून मोठेंयुद्ध व्हावें ह्मणून, बादशाहाजवळ फार आग्रह करीत होते; परंतु तो बादशाह फार शहाणा आणि सावध होता. त्याणें आपल्या लष्करांत धान्य पुरतें नाहीं तथापि मराठ्यांपेक्षां अधिक आहे असें असून, आपले लोक युद्धाविषयीं अस्थिर, यावरून मराठे तर फारच उतावळे असें समजून. तो युद्धाविषयीं दिरंग लाविता झाला. त्याची कल्पना ठीक होती कीं, मराठे यांजकडील धान्यादि साहित्य अगदीं खर्चून पुढें उपाशीं मरणार आहेत असें असतां कोणे एके रात्रीं त्यांचा लष्करांतील बुणग्याची टोळी आपल्या बायका मुलांस अन्न नाहीं याकरितां धैर्य करून खंदकांतून पलिकडे उतरले; नंतर पुढें जाऊन धान्याचा शोध करीत असतां आफगाण लोकांनी येऊन त्यांस भोंवता वेढा घालून ते सर्व मारून टाकिले. त्यावर सर्व मराठे लोक आपल्या सरदारांस बोलूं लागले कीं, आतां आह्मीं एथें उपाशीं मरावें हें ठीक नाहीं; आह्मांस त्या युद्धांत मरूं द्या. असें त्यांचें बोलणें ऐकून सरदारांनीं भाऊला सांगीतलें; तेव्हां त्याणेंही तें मान्य केलें आणि सांगीतलें कीं, उद्यां लढाई करावी. अशी आज्ञा देऊन ते दिवशीं रात्रीस सरकार कोठींत जितका धान्यसंग्रह होता तितका सर्वत्रांस वांटून दिला कांकीं, इतके दिवस धान्याचा तोटा होता आतां आज रात्रीं सर्वांनीं स्वस्थ भोजन करून युद्धास सिद्ध व्हावें. मग दुसरे दिवशीं उजेडावयाचे पूर्वीं दोन घटिका रात्रीस सन सत्राशें एकसटांचा पहिला महिना जानेवारी त्याचे साहाव्ये तारिखेस सर्व लष्कर सिद्ध होऊन आपले छावणीपासून डावे बाजूनें निघालें. तें असें पुढें तोफा व जेजाला व उंटावरचे जंबुरे व बाणदार असें चालतें करून त्याबरोबरच इभ्राहिमखान गारदी व त्याचीं पलटनें, त्यामागून दमाजी गाइकवाडाचे स्वार चालिले, त्यामागून वरकडजे मराठे सरदार यांचे स्वार अशा बंदोबस्तानें ते अबदालीचा लष्करावर जाते वेळेस मराठे असे दिसत होते कीं, ते लोक केवळ मरणाचाच निश्चय करून जाताहेत; आपण जय पावों ही गोष्ट त्यांचा मनांत आहे असें त्यांचें चिन्ह दिसत नव्हतें, कांकिं, त्यांचीं पागोटीं पदर सुटलेलीं, आणि तोंडास व हातास हळद लाविलेले असे होते. ते त्यांवर चालून जात असतां ति-

कडे अबदालीचा लश्करांत वर्तमान कळलें तेसमयीं बादशाह तो शोध घ्याव-यास घोड्यावर बसून आपला तळ सोडून अर्धा कोस पुढें जाऊन पाहिलें. तेंव त्याचा मनांत आलें कीं, मराठी लश्कर फार बंदोबस्तानें तळसोडून निघालें ते-संच उभें एथें आहे, असें पाहिलें. त्यांत तोफामात्र पुढें समूर केल्या होत्या; आणि जनकोजी शिंदा तो लश्करचे उजवे बाजूवर होता. आणि इभ्राहिम गार्दी तो डावे बाजूवर होता. मग इकडे अबदालीचें लश्कर तयार झालें त्याचा बंदोबस्त असा; त्यानींही तोफा समूर लाविल्या. आणि त्याचा लश्कराचे उजवे बाजूस आमेदखान बंगष, व रोहिले, व कित्येक मोठे मोठे सरदार होते; मध्यभागीं शाहवलीखान वजीर. व डावे बाजूस आफगाण लोक, व सुजाउदवला, व नजीबअदवला; या सर्वांचे डावे बाजूस एक आफगाणाची निवडक टोळी होती, तिचा सरदार शाहपसंद खान नामें होता. याप्रकारें लश्करी उभयपक्षीं बंदोबस्त असतां प्रथम परस्परें दोहींकडून तोफा चालू झाल्या, इतक्यांत तीं दोन्हीं लश्करें एकामेकांवर चालून येऊं लागले. ते उभयपक्षी लोक तोफा टाकून पुढें सरले असतां मराठ्यानीं एकाएकी मोठा हरहर असा शब्द केला; ज्याची ध्वनी आकाशांत भरली. तेव्हां इभ्राहिमखान गार्दी दमाजी गाइकवाडासहित आपल्या समूरचा रोहिल्यांवर धैर्यानें चालून गेला; तेवेळेस तो आपल्या डाव्या बाजूनें शत्रूचे लोक येतात असें पाहून, त्यांकडे दोन पलटणें यांचा रोख दाखवून आपण पुढें सरला; तो रोहिल्यांवर पडून त्यानें आठ हजार रोहिले मारून टाकिले, परंतु त्याचेंही अर्धे अधीक लोक मारिले गेले; आणि त्या इभ्राहिमखानासही जखमा लागल्या, परंतु जय पावला. मध्यभागीं सदाशिवरावानें आपल्यासमूर मुसलमानाचा लश्कराचे मध्यभागीं शानवाजखान होता त्यावर मोठ्या वेगानें चाल केली. तेसमयीं त्या शानवाजखानाचे जवळ दहा हजार स्वार होते त्याणीं त्या सदाशिवरावावर चालून जावें तें नकरितां ते आपल्या ठिकाणींच उभे राहिले; तेणेंकरून ते स्वार व त्यांतील पायदळ याचा अगदीं मोड करून मराठे त्यांतून पार गेले त्यात मराठ्यांचेही स्वार दोहीं लश्करी लोकांचे धक्काधक्कीनें कित्येक पडले तेसमयीं स्वकीय किंवा परकीय असें त्या उभयपक्षीं लोकांस समजेना. आणि जी धूळ उडाली तेणेंकरून कांहीं त्या गर्दींत दिसेना; तेव्हां मराठे व मुसलमान हातघाई करून संपूर्ण एकत्र होऊन आपआपल्यासच मारूं लागले; तेसमयीं कोणी कोणास वळखिना असें झालें. तेव्हां त्यांतील शब्द म्हणून असा कीं, मराठ्यांकडील हरहर आणि मुसलमानाकडील दीन दीन असा शब्द होई तेणेंकरूनमात्र वळखून मारीत; तव्हां कोणाचें

तोंड

तोंड कोणास दिसेना. शेवटीं त्या गर्दीत आफगाण लोक कांहींसे मागें हटूं लागले तें पाहून शाहूवलीखान आंगांत चिलखत चढविलेला होता तसाच घोड्यावरून उडी टाकून मोठी हारोळी देऊन बोलिला कीं, हे मित्र हो तुह्मीं पळता कोठे, तुमचा मुलुख एथून जवळ आहे किं काय. असें बोलून ते लोक आपले बरोबर घेऊन तेसमयीं त्याणें आपल्या जिवाचें संरक्षण केलें. याप्रमाणें मुसलमान लोकांचे लष्करचा मध्यभागची व उजवे बाजूची अवस्था झाली परंतु त्याची डावी बाजू कांहीं नव्हती; त्यांतील सरदार शापसंदखान याणें चालून येते वेळेस असें पाहिलें कीं, कदाचित् मोड झाल्यास पाठिमागें येणें जालें तर कांहीं आश्रयाकरितां जागोजागीं चर खणून मातीचा बर्वेड्या करून भिंतीसारिखे आश्रय जागोजागीं करून ठेविले होते, असें असतां बादशाहास लष्करची खबर दोन प्रहरीं कळली. तेव्हां त्याणें आपले खासगीचा शिपायांतून निवडक जे होते त्यांस लष्करचे छावणीचे जागीं पाठवून, त्यांस सांगितलें कीं, जे कोणी पळून जाऊन छावणीचे जागीं उभे असतील त्यांस हांकून युद्धास पाठवावे; आणि उजवे बाजूचे लोकांस पुष्टीकरणार्थ कित्येक लोक पाठविले. आणि शाह नवाजखानास निरोप पाठविला कीं, दहा हजार स्वारांची एकेक टोळी करून मोठ्या वेगानें मराठ्यांचे लष्कराचा मध्यभागावर हल्ला करावा. अशी आज्ञा झाली तेसमयीं त्याणें तसेंच केलें; आणि त्याचे बरोबर शापसंदखान व नजीबअदवला याणींही हल्ला केला, तो वेग मराठ्यांहीं बहुतवेळ सोसून, आफगाण लोकास कित्येक वेळा मागें हटविले. शेवटीं हातघाईचे वेळेस ते आफगाण लोक शरीरानें पुष्ट आणि सुदृढ असे जे त्यांपुढें मराठ्यांचा उपाय चालेना; तथापि त्यादिवशीं मल्हारराव होळकरास खेरीज करून मराठे सरदार आपआपल्या सामर्थ्यानुरूप लढले. आणि मल्हारराव आपल्या शक्तीप्रमाणें नलढला ह्मणून कोण कोणाचा मनांत आलें हा होळकर कांहीं कृत्रिमी आहे.

यानंतर अडीज प्रहर दिवस सुमारें विश्वासराव यास असाध्य जखम लागली. तें पाहून सदाशिवराव भाऊ आपल्या हत्तीवरून खालीं उतरून होळकरास निरोप पाठविला कीं, मीं तुह्मास पहिलें जें सांगीतलें होतें तें आतां करावें; याप्रमाणें सांगणें गेल्यावर मग तो भाउसाहेब आपल्या घोड्यावर बसून युद्धाचा गर्दीत शिरला. तेव्हां लोकांस दिसेनासा झाला. त्याचा निरोप होळकरास पोंहचला. तेव्हां तो रणभूमी सोडून निघाला, त्याजबरोबर दमाजी गाइकवाडही निघाला. तेवेळेस मराठे लोक युद्ध करणें टाकून आपल्या जीवाचा रक्षणासाठीं पळूं लागले तेव्हां हजारों शिपाई तरवारीनीं तोडले

गेले

गेले, व कित्येक छावणीकडे पळाले. त्यांस गर्दीमुळें त्या ठिकाणांत जावयाची वाट सांपडेना; तेव्हां त्या खंदकांत एकमेकावर पडून दडपून मेले गेले; त्या स्थानाजवळ पानपत नामें गांव होतें तेथें त्या मराठी लष्करच्या बायका व मुलें व कित्येक बुणग्यांतील लोक व कित्येक शिपाई एकदांच शिरले. त्या योगें तो सगळा गांव भर दाटी झाली. मग दिवस मावळला तेव्हां आफगाण लोक येऊन त्या पानपता सभोंवता घेरा घालून रात्रभर तेथें होते. मग प्रातःकाळीं ते सर्व लोक बाहेर काढून त्यांस आफगाणांहीं आपल्ये ठिकाणीं नेऊन त्यांतील बायका व मुलें वांटून घेतली; आणि पुरुषांचा दावणी करून त्यांचा मस्तकांचे ढीग आपल्या डेर्यांपुढें घातले. अशा निर्दयाचरणानें त्या लोकांची या पृथ्वींत निरंतर निंदा राहिली; व त्या योगें मनुष्य जातीसही बट्टा लागला. कांकिं, असे निर्दय प्राणी मनुष्यांत उत्पन्न होतात इतकें कळलें.

नंतर त्या लढाईत विश्वासरावाचें प्रेत सांपडलें तें आमेदशाह अबदाली याणें पहावयास आपले जवळ आणविलें. तेसमयीं त्यास पहावयाकरितां, आफगाण लोक मोठा शब्द करीत येऊन बहुत जमले तेवेळेस त्या लोकांची फार दाटी झाली. त्यांत असा उठला कीं, आमचा धर्माहून बाह्यजे त्यांचा बादशाहाचें हें प्रेत; यास्तव आम्हीं याला वाळवून यामध्यें गवत भरून आपल्या काबुल प्रांतीं घेऊन जाऊं. असें नानाप्रकारें बोलत असतां, रोहिले लोक व सुजाउदवला याणीं बादशाहाजवळ अर्ज करून तें प्रेत हिंदूंचे स्वाधीन करविलें. मग तें हिंदूंनीं जाळून टाकिलें. त्यासमयीं सुजाउदवला याणें जनकोजी शिंदा व इब्राहिमखान गार्दी हे दोघे जखमी होऊन बादशाहाचे कैदेंत सांपडले होते त्यांचाही प्राण वांचवायाविषयीं अर्ज करावयासाठीं उद्युक्त झाला परंतु तें सिद्धीस गेलें नाहीं. तेव्हां त्या लोकांहीं असें केलें कीं, इब्राहिमखान गार्दी याणें असत्यधर्मी लोक यांचा पक्ष स्वीकारून सत्यधर्मी लोकांशीं लढला, हें त्याचें मोठें दुष्कर्म जाणून त्याचा शिरछेद केला.

शिंदा आणि नजीबअदवला या उभयतांचा फार द्वेष होता यास्तव तोही मारिला गेला. मग त्या रणभूमीचा एके बाजूस एक शिर कापलेलें धड सांपडलें तें सदाशिवरावाचा आकृती प्रमाणेंच दिसत होतें; त्यासमयीं हेंच भाऊचें शरीर असेल असें म्हणूं लागले. याशिवाय त्या भाऊचें विशेष कांहीं वर्तमान नाहीं. दुसरें जशवंतराव पंवार तो त्या रणभूमींतच पडलेला होता, तो सांपडला. समशेरबहादूर तो त्या रणभूमींतून जखमी होऊन जिवाच्या भयास्तव पळतां पळतां त्यास कोणी गावकरी याणीं मारिला. मग विठ्ठलशिवदेव विंचुरकर व दमाजी गाइकवाड व नारो शंकर आणि कित्येक शिपाई हे त्यांतू-

न

न माघारे आपले मुलखी स्वच्छपणें आले त्या मराठी लष्कराचे जे लोक आले त्यांचा सुमार असा आहे कीं, जितके गेले तितक्यांचा चतुर्थांश माघारे आले. याप्रमाणें वृणत्याचाही तोच प्रकार, याबद्दल असें वाटतें कि, त्या भाऊसाहेबाचे लढाईसंबंधें दोन लक्ष सुमारें मराठी लोक मेले गेले. त्यांतून पळून कित्येक लोक सुरजमल्लाकडे गेले; त्यांस त्याणें आपल्या मुलखीं कृपाकरून रक्षिले. ती त्याची कीर्ति अद्यापि मराठे लोकांत आहे.

असा वृत्तांत हिंदुस्थानांत झाला तें वर्तमान पेशव्यास कांहींसें कळलें तेव्हां तो आपले खासगीचें सैन्य व दहा हजार सैन्यासहित जानोजी भोंसला यास बरोबर घेऊन, हिंदुस्थानांत आवयाकरितां निघाला. तो त्या वर्षाचा जानेवरीचे मध्यभागीं नर्मदा उतरत होता तेव्हां त्याच्या लोकांस कोणिएक सावकार याचा जासूद औरंगाबादेस जात होता तो सांपडला. त्याणें मराठ्यांचा पराभवाचें वर्तमान सांगितल्यावरून त्याला पेशव्याजवळ नेला तेव्हां पेशवा याणें त्याजवळचे कागद उघडून पाहिले, त्यांत खुणेचें लिहिलें होतें कीं, दोन मोतीं गळून गेलीं. आणि सत्तावीस मोहरा सांडून गेल्या; आणि रुपये व खुर्दा किती हरवल्या त्याची संख्या लागत नाहीं. यावरून सदाशिवराव व विश्वासराव आदिकरून मंडळीची दशा काय झाली ती पेशवा समजला. त्यानंतर थोडक्याच अवकाशानें त्यास त्या लढाईंतून आलेले लोक भेटले. त्यांत बाबुरावाचा पुतण्या बाळाजीजनार्दन, तो प्रथम; पुढें नाना फडनवीस यानावें तोच लोकांत प्रसिद्ध झाला. मग पेशवा त्या अनर्थाचा प्रकार पुरतेपणें समजून घेऊन हळूहळू माघारा पुण्यास येऊं लागला. मग त्या दुःखेंकरून, त्याचे बुद्धीस कांहीं अंतर पडलें; आणि त्यादिवसापासून त्याचा शरीरास दिवसानदिवस असमाधान होत चाललें. मग त्याच वर्षाचा पांचव्या महिन्यांत जुनाचे अखेरीरीस, तो पर्वतीचा देवळांत मरण पावला; तें देऊळ त्याणेंच बांधिलें होतें.

तो सदाशिवराव भाऊचा अनर्थ सर्व मराठी लोकांस दुःखादिक होण्याचें कारण झाला. मग पेशवाही मरण पावला त्यायोगें अधिकच अवघड पडलें.

तो बाळाजी बाजिराव फार योग्यतेस चढला, परंतु केवळ आपल्या सामर्थ्यानें योग्य झाला असा नाहीं, त्याचे आगोधरचे पुरुषांचें कृत्य त्याचे वेळेस शेवटास गेलें; तो राजनीति इत्यादि कामांत निपुण, असें त्यास त्याचे लोक म्हणत परंतु बहुधा कुटिल वर्तनास ते लोक बुद्धिकल्पना असें मानितात; ही त्यांचे बुद्धीस चूक आहे, सत्यतेनें जें वागावें तीच बुद्धि.

बाळाजी

बाळाजी बाजिरावाचे वेळेस प्रजेला कायकाय सुख होतें तो शोध केला असतां, असें दिसतें कीं, मख्त्याचा मामलतीची चाल मोडिली, व कोणी लुटारु आला असतां गांवकरी यांणींच मारावा असें शिकविलें, तेणेंकरून प्रजा सुख पावली असेल; मग पेशव्यानें प्रांतांत जागोजाग सुभेदार व मामलतदार ठेवून त्यांचे चवकशीवर सरसुभेदारही केले; आणि वसूल जमा करणारांची पहाणी क्षावी असाही त्याणें बेत ठेविला होता, याशिवाय जो हिशेब देइना त्याचें पारिपत्य करून हिशेब घेत असत. पुण्यांत बाळकृष्ण गाडगीळ मोठा कुलीन शास्त्री तो न्यायाधीश केला; त्या योगें शहरचे लोक फार सुख पावले, या सर्व उत्तम रीतीचें मूळ रामचंद्र बाबा शेणवी तो मेल्यानंतर सदाशिवरावानेंही तसेंच चालविलें, त्या राज्यांत ब्राह्मणांचीं कुळें बहुतेक योग्यतेस आलीं, आणि त्या राज्यांत प्रजाही सुख पावोन लोक नाना साहेब पेशवा धन्य असें म्हणूं लागले. ती कीर्ति अद्यापि त्या लोकांत आहे.

सन सत्राशें एकसष्टांपासून साासष्टपर्यंत
झालेलीं वर्तमानें मिळून
भाग विसावा.

## अनुक्रमणिका.


माधवराव बल्लाळ पेशवा झाला तें प्रकरण.

ताराबाईचा मृत्यु.

निजामअली, मराठी लोकांत वैमनस्यें पडलीं अशी संधी पाहून त्यास जिंकावयाकरितां निघाला.

टोंक्याचा देवस्थानाचा भंग, निजामअलीनें केला तें प्रकरण.

तो निजामअली पुण्याजवळ येऊन त्याशीं व पेशव्याशीं तह झाला.

रघुनाथराव, व माधवराव पेशवे, यांचा बिघड झाल्यामुळें रघुनाथराव औरंगाबादेस गेला तेथें त्यास, मोंगलांची कुमक मिळून तो माघारा पुण्यावरयेत असतां, माधवराव पेशवा आपल्या सुज्ञपणानें त्याचा स्वाधीन झाला.

रघुनाथराव मुख्यत्व पावोन त्याचा अनुचित आचरणेंकरून, मोठमोठ्या लोकांचीं मनें विटलीं; तेणेंकरून ते कित्येक जाऊन मोंगलांस मिळाले.

त्यावर मोंगल ब्राह्मणाचें राज्य बुडवावयास उद्युक्त झाला.

मोंगल पुण्यास येऊन तें शहर लुटून तेथचा कित्येकां घरांचा खंड घेऊन

कित्येक घरें जाळिलीं.

शेवटीं रघुनाथराव चांगला समय पाहून, मोंगलांचा लश्कराचा अगदीं पराभव करिता झाला.

नंतर औरंगाबादेस पेशवे आणि मोंगल यांचा तह झाला.

हैदर अल्लीचा उत्कर्ष.

माधवराव फार युक्तीनें त्या हैदराचा पराभव करिता झाला.

पेशवा व निजाम अल्ली मिळून जानोजी भोंसला याशीं युद्ध करून, त्यापासून दिलेला मुलुख कित्येक माघारा घेतला.

## भाग विसावा.

सन सत्राशें एकसष्टांचा महिना नव्हा सप्तेंबर, याचे अखेरीस रघुनाथराव याणें आपला पुतण्या बाळाजी बाजिरावाचा दुसरा पुत्र माधवराव यास बरोबर घेऊन, सातार्यास जाऊन राजापासून त्या मुलाचे नांवें पेशवाई संपादिली; ते समयीं त्या माधवरावाचा वयास सत्रावें वर्ष होतें.

त्यापुढें तीन महिन्यानी ताराबाई मृत्यु पावली. ते वेळेस तिचें वय शायशींवर्षांचें होतें; तिणें राजाराम राजा यास कैदेंत ठेविला, तो त्या दिवसापासून तसाच होता. ती ताराबाई मरणपर्यंत बाळाजी बाजिराव पेशवे व सदाशिवराव भाऊ यांचा द्वेष करीत होती; ती मरणसमयीं बोलली कीं, हे दोघे दुर्दशा होऊन मेले तेणेंकरून माझे मनोरथ पूर्ण झाले.

बाळाजी बाजिराव मेला हें वर्तमान सलाबतजंग व निजाम अल्ली यांस बेदर मुकामीं कळलें तेव्हां निजाम अल्ली तो आपणास दिवाण ह्मणवी आणि सलाबतजंगयास नाममात्र धनी असें करून आपण सर्व राज्य सुखानुभव घेत होता, तेव्हां तो समजला कीं, आपला मुलुख मराठ्यांहीं घेतला आहे तो या समयीं सोडवावयाविषयीं सुलभ पडेल ह्मणून कांहीं एक निमित्त करून औरंगाबादेचा आसमंतात् मोठी फौज जमा केली. ही त्याची कल्पना खरीच होती कांकिं, त्यापूर्वी चाळीस वर्षें त्यास अशी संधी सांपडली नाहीं तो प्रकार असा. पानपताचे लढाईंत मराठे पराभव पावले त्यामुळें ब्राह्मण व मोठे मोठे मराठे सरदार एकमेकांत परस्परें त्या नाशाचें कारण करून भांडूं लागले; त्यायोगें आपआपल्यांत फार वैमनस्यें पडलीं आणि रघुनाथराव तो आपला पुतण्या माधवराव पेशवा याचें वय लहान ह्मणून राज्यकारभार आपण चालवीत असे, आणि त्यापाशीं सैन्य त्या निजाम अल्लीचा निवारणास पुरेसें नव्हतें; हें वर्तमान त्यास कळतें तर तो मोठा लाभ पावता,

परंतु तें त्याला पुरतेपणें न समजलें; याशिवाय त्याणें दक्षिणेंत येऊन प्रथम लोक्यामध्यें हिंदूंचीं देवस्थानें होतीं तीं फोडलीं तेव्हां त्याचे मुसलमान लोक व तो असें समजला कीं, हें आह्मीं केलेलें कर्म ईश्वरसंतोषकारक झालें. परंतु तेणेंकरूनच त्या निजाम अल्लीचा नाश झाला. कांकिं, त्याचे लश्करांत रामचंद्रजाधव सरदार वगैरे हिंदू जे चाकर होते, ते रुष्ट होऊन बहुतेक त्यापासून निघून गेले; आणि पेशव्याकडे जाऊन राहिले. त्याणीं मीरमोंगल नामें निजामउलमुलुखाचा कनिष्ठपुत्र त्यासही बरोबर नेला.

त्यानंतर निजामअल्लीचें लश्कर पुण्यावर येऊं लागलें त्याचे निवारणार्थ दिवसें दिवस, मराठ्यांचा उद्योग वृद्धिंगत होत गेला. शेवटीं तो पुण्याजवळ एका मजलेवर आला. तेव्हां त्याचें पहिलें मानस होतें कीं, मराठ्यांपासून आपला सर्व मुलुख सोडवावा; तें टाकून इतकें मात्र केलें, कीं, बेदर व औरंगाबाद यांपासून सत्तावीस लाख रुपये घेत होते ते त्यांहीं घ्यावे. त्यावर निजाम अल्ली बेदराकडे मागें गेला; तो तेथें जाऊन त्याणें आपला भाऊ सलाबतजंग यास सन सत्राशें बासष्टांचा जुलाई महिन्यांत कैद करून त्यापुढें पंधरा महिन्यानीं जिवें मारून टाकिला. अशी त्याणें बंधुहत्या केली ती व्यर्थ केली - असें दिसतें; कांकिं सलाबतजंग केवळ गरीब होता. त्याचा हातून किमपि नाश झाला नसता.

ते मुसलमान लोक पुण्यापासून दूर गेल्यावर, सदाशिवचिमणाजी भाऊ याचा मामा त्रिंबकराव तो दक्षिणेंतील वसूल जमा करून माघारा पुण्यास आला नंतर पेशव्याचा चुलता रघुनाथराव यास ह्मणूं लागला कीं, तुह्मीं सर्व कारभार करितां यांत कांहीं माझा भाग असावा; तेव्हां त्या उभयतांचा वाद पडला, मग तो रघुनाथराव व सखाराम बापू वगैरे जे मुख्य कारभारी होते ते आपल्या मनांत समजले कीं, आपणावांचून कारभार चालणार नाहीं ह्मणून क्रुद्ध होऊन त्यांस हा श्रेष्ठ मानी असें समजून, ते सारे कारभार सोडून आपले घरीं उगेच बसले; आणि दुसरें समजलें कीं, आह्मावांचून कामांत अडचण पडूं लागली ह्मणजे हा आपणाच आमचें आर्जव करूं लागेल. परंतु त्या मामास तात्काळ जवळ बोलावून दिवाणगिरीचें काम सांगीतलें तेव्हां त्याणें गोपाळराव गोविंद पटवर्धन मिरजकर याचे साहाय्यानें कबूल केलें तें सर्व समजून +रघुनाथराव व सखाराम बापू यांचा मनांत त्या मामाविषयीं द्वेष व

+ रघुनाथरावाचा मनांतील द्वेष वाढवयाचें कारण आनंदी बाई, ती रघुनाथराव याची स्त्री, माधवरावाचा मनांतील द्वेष वाढायास कारण गोपिकाबाई, ती त्याची मातुश्री, तिचा तो माधवराव पुत्र.

द्वेष

द्वेष उत्पन्न झाला. त्यावरून रघुनाथराव पुणें सोडून नाशिकास गेला मग तो ते-थून पुढें ओरंगाबादेस जाऊन त्या शहरचा मुख्य मुगद स्वान होता त्याणें त्या-चा मोठा संमान करून त्यास मोंगलांची कांहीं फौज दिली; त्यानंतर त्याला म-राठेही पुष्कळ जाऊन मिळाले. त्यावर तो पुण्यास येऊं लागला तेव्हां त्याचा लश्कराची आणि माधवराव पेशव्याचा लश्कराची गांठ पुणें व आमेद नगर, यांचे मध्यभागीं पडली; ते समयीं पेशव्याचें लश्कर रघुनाथरावाचा लश्करापे-क्षा फार कमी असें समजून ते लोक त्याशीं युद्धास उभे न राहिले. त्यावेळेस तो रघुनाथराव याचे पुष्टी करितां निजाम अल्लीही येत होता आणि वराडांतून जा-नोजी भोंसला तोही सेनेसहित पुण्याकडे येऊं लागला होता, परंतु तो कोणा-चा पक्ष स्वीकारील तें समजलें नाहीं. हें सर्व जाणून माधवराव याणें परमदक्ष-ता व शहाणपणें करून मनांत निश्चय केला कीं, यासमयीं आपण काकाचे स्वा-धीन व्हावें; मग आपल्या बरोबरचा लोकांस सांगितलें कीं, आपआपले प्राण संरक्षणास पाहिजे तिकडे जावें. नंतर आपण जाऊन काकास भेटून त्याचा समूर उभा राहून बोलिला कीं, आपल्या राज्यांत विभाग व कलह न सावा याक-रितां मी तुमचे स्वाधीन झालों. तेव्हां रघुनाथरावानें त्यास बंदींत ठेविला, परंतु त्याचा असा मान रक्षिला कीं, तो बंदींत असतांही त्याची जेवढी प्रतिष्ठा हो-ती तेवढी पुढें रघुनाथराव मोठी योग्यता मिळवून निरंकुशपणें महत्पदारू-ढ झाला तरी त्यास मिळाली नाहीं.

यानंतर मोंगलांनीं कुमक केली यास्तव रघुनाथरावानें कबूल केलें हो-तें कीं, दवलताबाद व शिवनेरी व आशिरगड व आमेदनगर व एकावन्नल-क्ष रुपये प्रतिवर्षी उत्पन्न होत असा मुलुख देईन; त्याप्रमाणें त्यास यावया-ची तात्काळ आज्ञा दिली, परंतु तें त्यांचे स्वाधीन झालें नाहीं तों कांहीं मध्यें-च निमित्त उत्पन्न झालें, तो प्रकार पुढें लिहिण्यांत येईल. ते वेळेस तर मों-गलांस दवलताबाद मात्र दिली. मग निजामअल्ली पेरगावीं येऊन रघु-नाथराव यास मिळाला तेव्हां त्याला समजलें कीं, हे चुलते पुतणे मिळाले; त्यावरून त्याणें असें दर्शविलें कीं, हें तुमचें ऐक्य पाहोन मी संतुष्ट जहा-लों.

याप्रमाणें रघुनाथरावाची सत्ता झाल्यावर त्याणें सखारामबापू व नी-ळकंठ महादेव पुरंधरे हे दोघे आपले मुख्य कारभारी केले. त्यावेळेस जग-जीवनराव प्रतिनिधीचा पुतण्या श्रीनिवासराव तो प्रतिनिधी असतां त्यास दूर करून रघुनाथरावानें आपला पुत्र भास्करराव तो फार लहान बालक होता त्यास प्रतिनिधी करून, नागेशंकर यास त्याचा मुतालिक केला; आणि कान्हो-

जी

जी मोहिते यांस सरलष्कर पदवी दिली. पेशव्याचे फडनवीस बाळाजीविश्व-नाथापासून भानूच्या कुळांतले झाले; त्यांनीं मोरोबाबूराव भानू यापासून तो फडनविशी घेऊन चिंतोविठ्ठल यास दिली.

याप्रमाणें रघुनाथरावानें प्रतिनिधी आदिकरून नवे केले; तेणेंकरून तो श्रेष्ठांच्या मनांतून उतरला. असें असतांही आपला पूर्वीचा सूड उगवावया-साठीं, गोपाळराव पटवर्धन याचा किल्ला मिरज लढून घेता झाला; त्यायोगें मोठ्मोठ्या लोकांचें मन फारच विटून, मग गोपाळराव पटवर्धन व जे त्या रघुनाथरावापासून दुःख पावलेले सरदार ते निजाम अल्लीचा वजीर विठ्ठलसुंदर+ याचा बोलावण्यावरून निजाम अल्लीस जाऊन मिळाले, त्यांत रामचंद्र जाधवही होता; तो धनाजीचा नातू, त्यास रघुनाथरावानें सेनापतित्व दिलें असतांही, गुजराथेच्या आधिपत्याविषयीं त्याला इच्छा होती त्याप्रमाणें तें न मिळालें म्हणून तो तिकडे गेला; मग त्या मुरादखानानें केलेला पेरगांवचा तह मोडून, मराठे लोक व मुसलमान लोक पुनः सनसत्राशें सहसष्टांत युद्धाचा प्रसंग करिते झाले.

ही एवढी घटना होईलशी त्या रघुनाथरावाची अटकळ आली नाहीं; त्यावरून त्याणें युद्धाची तयारी केली नव्हती; त्या वेळेस माधवराव बंदींत असतांही त्याणें आपल्या शक्तीप्रमाणें काकाची पुष्टी केली, आणि मल्हारराव होळकर व दमाजी गाइकवाड हे दोघे रघुनाथरावाकडेस होते असें असतांही तें लष्कर मुसलमानांचा समूर लढावयाजोगें नव्हतें म्हणून त्या लोकांचा समूर युद्धास गेल्यासारिखें भासऊन मग एकीकडे जाऊन मोंगलांचें लष्कर आपल्ये पाठीमागें टाकून औरंगाबादेस जाऊन त्या शहराचे तटास शिडी लावून आंत शिरावयाचा उद्योग केला; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. नंतर तो निजाम अल्ली पाठीस लागला असा पाहून वराडप्रांतीं जाऊन जानोजी भोंसल्याचा मुलुख लुटतां लुटतां मल्कापुराची खंडणी रुपये साट हजार घेतले. त्यानंतर मोंगलांचा प्रांतीं जाऊन फार नाश केला; ते समयीं तो निजाम अल्ली त्या रघुनाथरावाचे पाठीस लागोन बहुतवेळ झाल्यावर समजला कीं, हा आपल्ये हातीं लागत नाहीं; तेव्हां तो सूड उगवावयास त्याणें निश्चय केला कीं, पुण्यास जाऊन तें शहर अगदीं लुटून जाळून टाकावें. हें वर्तमान रघुनाथरावास कळलें तेस-

+ विठ्ठलसुंदर यजुर्वेदी ब्राम्हण होता त्यास निजामानें आपला भाऊ बंदींत घातला ते समयीं दिवाणगिरी दिली पुढें मुरादखानाचा योगें मराठे व मुसलमान यांचा तह झाला. त्यापासून तो विठ्ठलसुंदर त्या मुरादखानाचा द्वेषास्तव पुनः नवें युद्ध उत्पन्न करावयास उद्युक्त झाला होता.

मर्थी त्याणें तो सूड घ्यावयासाठीं हैदराबाद जाळावयाची मसलत केली, आणि तिकडे चालिला.

हें वर्तमान पुण्याचा लोकांस कळलें कीं, मोंगल पुणें शहर जाळावयास येतो. तेह्मां तेथचे बहुतेक लोक आपलीं घरें टाकून, आपल्या सामर्थ्याप्रमाणें संसार खटलीं घेऊन डोंगरी किल्ल्यांतून व कोंकणांत जाऊन राहिले. मग निजाम अल्ली येऊन पुण्याजवळ उतरला नंतर जा जा घरांची खंडणी त्यास न मिळाली तीं तीं घरें कांहीं मोडून कांहीं जाळिलीं; मग पुरंदराकडे जाऊन भीमा नदीपर्यंत मुलुख उद्ध्वस्त केला. त्यानंतर पाउसकाळ जवळ आल्यामुळें तो बेदरास जाणार होता परंतु जानोजी भोंसल्याचे मसलतीनें औरंगाबादेस जावयाचा नेम ठरला.

इकडे रघुनाथराव हैदराबादेस गेला तेह्मां त्या शहरासभोंवता तट होता त्याजमुळें तें शहर घेतां येईना; तेह्मां बाहेरच्या पेठेची खंडणी एक लक्ष ऐशीं हजार रुपये घेतली, मग हैदराबाद सोडून निजामअल्लीचें काय वर्तमान आहे तो शोध घ्यावयास आला, त्याणें त्यावेळेस निजामअल्लीचे जे मराठे सरदार होते त्यांशीं कांहीं बोलणें करून सुमार पाहिला जो त्यांजकडील मराठ्यांतील मुख्य जानोजी तो आपलेकडचा होईल कांकीं, तो निजामास मिळाला ते समयीं जसा त्याचा मनोरथ होता त्याप्रमाणें त्यास लाभ न झाला. तेह्मां रघुनाथरावानें कबूल केलें कीं, प्रतिवर्षी तुह्मास बत्तीस लक्ष रुपये देऊं. आणि तो समयीं आपल्या पक्षाचा होईलसा करून ठेविला.

मग मोंगलसहित निजाम अल्ली औरंगाबादेस जात असतां, तीन चार मजली त्याचे पाठिमागें होता, तो गोदावरीस जाऊन पोंहचला ते समयीं आपण व बहुतेक लोक मिळून पलिकडे उतरून गेला, तेह्मां अलिकडे आपला दिवाण व कांहीं लोक राक्षसभुवन गांवांजवळ तो सर्व खटला उतरून पार जाई तों पर्यंत ठेविले. तेवेळेस जानोजी भोंसला आपले फौजेस कांहीं दरमहा न पोंहचल्याचें निमित्त करून त्या दिवाणास सोडून त्यापासून कांहीं अंतरानें उतरला तें वर्तमान रघुनाथरावास कळोन तो समजला कीं, हें चिन्ह आपल्या सहितावह आहे; त्यावरून मोठमोठ्या मजला करून अकस्मात मोंगलांचा लष्करावर पडोन तें मोठ्या निकरानें दोन दिवस युद्ध+ होऊन त्याचे मोंगल लोक बहुतेक मेले गेले. त्यांत तो दिवाणही मृत्यु पावला. त्या प्रसंगीं माधवराव होता तो आपल्या शौर्येंकरून व सावधपणानें आणि चातुर्येंकरून मोठा विख्यात झाला; ते समयीं निजाम अल्ली गोदावरीचे पलिकडे होता,

\+ त्या युद्धास मराठे तेरळजाचें युद्ध ह्मणतात.

त्याच्यानें

त्याचानें त्या दिवाणास पुष्टि करवेना आणि त्याचा लष्करचा नाश पाहून आपण औरंगाबाद शहरांत शिरला; त्याचेही पाठीस मराठे लागून त्यांहीं औरंगाबादेवर पुनः हल्ला केला, तेव्हांही त्यांचे लोक फार मेले गेले, परंतु अर्थ सिद्धीस गेला नाहीं. त्यानंतर निजामअल्ली फार पश्चात्ताप पावल्याचा आकार करून रघुनाथरावाचे भेटीस आला, आणि आपण जें कृत्य केलें तें सर्व दिवाणानें करविलें असें रघुनाथरावास समजावून त्याचें मन असें सुप्रसन्न केलें कीं, त्याणें जानोजी भोंसल्यास जो बत्तीस लक्ष रुपये उत्पन्न होतसा मुलुख देऊं केला होता तो वजा करून एकावन्न लक्ष रुपये उत्पन्न होतसा जो पूर्वीं लाऊन दिलेला मुलुख होता, तो द्यावयास सिद्ध झाला; परंतु त्याचा कारभारी लोकांहीं हें ठीक नव्हे असें समजाविलें त्यावरून त्याणें त्यास दहा लक्ष रुपये मात्र उत्पन्न होईसें दिलें, याप्रमाणें पूर्वींचा करारापेक्षां नऊ लक्ष रुपयांचा मुलुख निजामास न दिला, तो पेशव्यास लाभला. मग त्या निजामअल्लीशीं आणि पेशव्याशीं अकटोबर महिन्यांत नवा तह झाला. तेसमयीं जानोजी भोंसल्यास बत्तीस लक्षांचा मुलखाची सनद देतानां रघुनाथराव त्यास बोलिला कीं, तूं आपल्या वडिलांचें महत्व जेणें करून वाढलें, असें जें मराठ्यांचें राज्य तें बुडवावयाचें कृत्य केलेंस आणि निजामाचा आश्रय संपादिलास मग त्याचाही घात केलास, याप्रमाणें त्यास निषेधून कराराप्रमाणें सनद दिली. त्यावेळेस भास्करराव प्रतिनिधी मरण पावला तेव्हां ती जागा भवानराव प्रतिनिधी यास पुनः प्राप्त झाली; आणि गोपाळराव पटवर्धन यास मिरजेचा किल्ला रघुनाथरावानें पुनः माघारा दिला. तेसमयीं मोरोबा फडनवीस यास याचे जागीं न स्थापिला परंतु त्याचा चुलत भाऊ बाळाजी जनार्दन भानु यास तो अधिकार दिला.

पूर्वीं म्हैसुरचें वर्तमान लिहिलें त्यांत हैदरअल्लीचा प्रकार आला. तो हैदर कोणे प्रकारें विख्यात झाला तो विस्तार असा. मराठे लोक पानपतचा लढाईला दक्षिणेहून उत्तरेस गेले, तेसमयीं सलाबतजंग आपणास स्वतंत्रपणें राज्य मिळवावयास हाच उत्तम समय असा जाणून करनाटकांत गेला आणि तेथचा हैदरअल्लीशीं स्नेह केला नंतर त्या सलाबतजंगानें किमपि मुलुख घेतला नाहीं तोंच त्या हैदर अल्लीनें त्याला शेराप्रांतींचा नबाब केला; मग ते दोघे बरोबर जाऊन उसकटा व शेरा व बडाबाळापूर इतकीं घेतलीं. नंतर तो सलाबतजंग याणें आपला भाऊ निजामअल्ली याचा भयास्तव हैदरअल्ली याची संगत सोडिली, आणि आदोणी नामें आपलें रहावयाचें पहिलें ठिकाण तेथें गेला; परंतु हैदर अल्ली त्यासारखा न भिऊन तेथेंच

राहिला

राहिला, आणि तें राज्य आपल्या साधावयास उद्युक्त झाला मग त्याणें कित्येकां पाळेगारांपासून खंडणी घेऊन बेदनूर प्रांत आपल्या मत्तेंत आणिला. त्यापुढें सनसत्राशें चौसष्टांत त्याणें सावनुरचा नवाब जिंकिला; मग कांहीं कारणानिमित्त त्या हैदराला बेदनुरीं जावें लागलें, म्हणून तेथें एक सरदार ठेविला; त्याणें धारवाड घेतलें आणि हैदराचें ठाणें कृष्णातीरानजिक बसविलें हैदरअल्ली.

तो हैदरअल्ली असा पराक्रम करीत असतां, मराठे उगेच नबसले; त्यांहीं त्याचा उत्कर्ष आपल्या नाशास कारण असें समजून सनसत्राशें चौसष्टांतच पुण्यामध्यें मोठें सैन्य जमा केलें. मग मेमहिन्यांत ती फौज घेउन माधवराव करनाटकांत शिरला, तेसमयीं हैदराचें लश्कर मोठें सुदृढ स्थळ करून अनवतीनामक जाग्यावर छावणी करून राहिलें होतें. माधवराव आपल्या सैन्यासुध्दां तेथून पुढें दुसरी एक युद्धोपयोगी सुदृढ अशी चांगली जागा पाहून राहिला, त्या हैदराजवळ वीस हजार घोडेस्वार व पायदळ चाळीस हजार होतें, त्यांत वीस हजार कवाईत शिकविलेले पलटणी लोक असत; तेथें मराठ्यांचें लश्कर जवळ येऊं लागलें तेव्हां त्या मराठा लोकानीं मसलत केली कीं, याचें ठाणें सुदृढ आहे यास्तव समूर जाऊन लढूं नये. त्याणें वर्धानदीचे उत्तरेस ठाणीं बसविलीं आहेत तीं उठवावीं म्हणजे तो बाहेर निघून मोठी लढाई झाली असतां त्यांत आपलें हित होईल तें ऐकून त्या हैदरानें मसलत केली कीं, आपण ठाणें सोडून जातों असें दाखवून, बाहेर निघून मराठे आंगावर आले असतां मागें हटून त्यांस पुरतें आंगावर घेऊन, एकदांच हल्ला करून मारून टाकावे. अशी कल्पना करून तो त्याप्रमाणें उद्योग करूं लागला, मराठेही तेसमयीं तो त्याचा संपूर्ण मतलब जाणून आपण भीतों असें दाखवून मागें मागें हटूं लागले याप्रमाणें करतां करतां याणीं त्यास पुरता आपल्या आंगावर घेऊन मग एकाएकी त्याचा लश्करासभोंवती आपले स्वारांची दाटी करून त्याचा बहुत नाश केला; तो असा कीं, शेवटीं त्याला आपलें पहिलें ठिकाण अनवतीजागची छावणी, महत्प्रयासेंकरून प्राप्त झाली. असा हैदरअल्लीचा पराभव झाल्यानंतर, मुरारराव घोरपडा पेशव्यास जाऊन मिळाला त्या मुराररावाचा मूळ पुरुष संताजी घोरपडा, त्याचें स्वरूप राजाराम राजा याचा वेळेस अनीतीमुळें प्रकट झालें नाहीं यास्तव हेसमयीं तद्वंश्य मुरारराव जाणोन सेनापतित्वपदवी यास द्यावी ही मुनीनी असें ठरून, तो मुरारराव घोरपडा सेनापती केला.

यानंतर तें युद्ध समाप्तीस जाऊन मराठे यश पावतील असें निश्चित समजलें

मजलें असतांही, माधवरावानें आपल्या काकास निरोप पाठविला कीं, आपण येवून हें काम शेवटास न्यावें; यांत त्या माधवरावाची परमसुशीलता नकट झाली परंतु ती राजनीती नव्हे, कांकिं, आपणास यश येत असतां त्याचा अधिकार दुसऱ्यास करणें हें साधुमार्गास फार योग्य आहे, आणि राजास अहित, असा त्या माधवरावाचा निरोप गेल्यावर तो रघुनाथराव येऊन त्यास मिळाला, ते वेळेस तें लश्कर वरदा नदी उतरून पलिकडे जाऊं लागलें असें सत्राशें छप्पन्नांत घडलें.

तें मराठ्यांचें लश्कर वरदानदी पलिकडे जाऊन, अनवतीसमीप दाट रान होतें तें तोडून आपणास तिकडे जावयाची मोठी वाट करून हैदरअलीचें लश्कर व बेदनूर यांचा मध्यभागीं ठाणें घालावयाचा बेत करीत होतें; तें वर्तमान हैदरास कळतांच तो मोठ्या त्वरेनें बेदनुराकडे जाऊं लागला. त्यासमयीं मराठे तो मुलुख झाडीमुळें आंत शिरायास फार कठीण म्हणून हैदराचा लश्करास दोन दिवस फारसा उपद्रव न देतां, यथाशक्ति कांहींशी खटपट करीत राहिले; मग तिसरे दिवशीं मैदान मुलुख लागला तेव्हां मराठ्यांचा लश्कराची एक टोळी त्याच्या लश्करा पलिकडे जाऊन बेदनुराच्या अलिकडे अगोदरच उभी राहिली होती, तेथें जाऊन पोहचला ते समयीं त्या हैदरास युद्धाविषयीं उभें रहाणें प्राप्त झालें, तेव्हां मराठे त्यावर मोठ्या वेगेंकरून हल्ला करूं लागले असतां, तो हैदरअली याचे बहुतेक लोक रानांत पळून गेले, मग हजार पायदळ व अडीच हजार स्वार इतक्या फौजेनिशीं तो बेदनुरास पोहचला; त्याचे पाठिमागून मराठेही मुलुख घेत घेत गेले, शेवटीं रघुनाथराव याणें हैदराकडून कबूल करविलें कीं, पेशव्यास बत्तीस लक्ष रुपये द्यावे, व घोरपडे यांचा मुलुख त्याणें घेतला होता तो त्यांस माघारा द्यावा; याशिवाय सावनुरचा नवाबापासून खंडणी वगैरे कांहीं घेऊं नये. असा तह रघुनाथराव याणें केला तो माधवराव याचा मनास आला नाहीं, परंतु त्यावर सर्व कार्यभार सोंपविला होता म्हणून त्यावेळेस त्याला किमपि प्रतिकूल न बोलतां त्याचे दुसरे वर्षी फेब्रुवारी महिन्यामध्यें तो माधवराव कर्नाटक सोडून कृष्णे पलिकडे गेला. मग त्याच वर्षी निजामअली व पेशवा हे दोघे एकचित्त होऊन वराडास जाऊन जानोजी भोंसला याशीं युद्ध करून, तो अगदीं नम्र केला; आणि त्याणें पेशव्याशीं व निजामअलीशीं दगलबाजी करून मुलुख संपादिला तो बत्तीस लक्षांचा होता त्यांपैकीं त्याला चवथाई ठेवून बाकी सर्व घेतला. त्यांतून पंधरा लक्षांचा मुलुख माधवरावानें निजामअलीस दिला; तो त्याचे मैत्रीसाठीं दिला असें पुण्याचे बखरींत लिहिलें आहे, परंतु

असें

असें दिसतें कि, करनाटकीं आपण स्वारीकरून हैदर अल्लीला जिंकणार त्या कार्यास निजाम अल्लीनें सहाय व्हावें म्हणून माधवरावानें त्याशीं गुप्तपणें कांहीं बोली केली त्यावरून पंधरा लक्षांचा मुलुख दिला, त्यांतही तो संबंध असेल.

सन सत्राशें सासष्टांपासून
बाहात्तर पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग एकविसावा.

## अनुक्रमणिका.

इंग्लीश सरकार कंपनी बहादुर या नामाचें अर्थसूचन व त्या इंग्लीशलोकांहीं हिंदुमुलखीं कोणे निमित्तें प्रथम प्रवेश केला तें प्रकरण.

पुढें त्यांहीं आपल्या रक्षणार्थ राजमंडी घेतली.

मग त्यांशीं आणि निजाम अल्लीशीं स्नेह पडला ती गोष्ट.

माधवराव पेशवा करनाटकीं जाऊन तेथचा खंडणीचें बहुत द्रव्य घेऊन माघारा पुण्यास आला.

रघुनाथरावानें हिंदुस्थानांत स्वारी केली.

मल्हारराव होळकर याचा मृत्यु.

रघुनाथराव गोहदचा राण्याचें स्थान घ्यावयास गेला तो तेथें सिद्धी न पावतां माघारा पुण्यास आला तेथें आपला पुतण्या माधवराव पेशवा याविषयीं त्याचा मनांत कांहीं अविश्वास उत्पन्न होऊन तो होळकर व दमाजी गाइकवाड व जानोजी भोंसला यांचा साहाय्यानें युद्धेंकरून सर्व राज्य आपणास इच्छिता झाला.

मग मोठा युद्धप्रसंग होऊन रघुनाथराव माधवरावाचे कैदेंत सांपडला तो प्रकार.

माधवराव व निजामअल्ली एकचित्त होऊन जानोजी भोंसल्याचे मुलखीं गेले तो त्यांस शरण आल्यावर पेशव्यांस हितावह असा जानोजीशीं तह झाला तोविस्तार.

माधवराव करनाटकांत जाऊन हैदरअल्लीचा बहुत मुलुख घेतला.

मनवगळच्या किल्ला घेतेसमयीं धाड्गे कुळांचे दोन भाग यांचा पुरातन वाद उत्पन्न पुनः झाला ती कथा.

करनाटकांत माधवराव आपलें लश्कर त्रिंबकराव मामाचा स्वाधीन

करून

करून आपण माघारा पुण्यास आला.

त्या त्रिंबकराव मामानें हैदरास जिंकून त्याशीं तह केला.

पानपतचे लढाईनंतर हिंदुस्थानांत काय काय वर्तमानें झालीं त्यांचा विस्तार.

विसाजी कृष्ण सैन्यासहित हिंदुस्थानांत गेला.

दिल्लीचा बादशाहानें इंग्लिशांचा आश्रय धरिला.

नजीब अदवला याणें मराठ्यांशीं तह केला.

दिल्लीचा बादशाह इंग्लीश लोकांचा आश्रय सोडून मराठी लोकांकडे गेला.

सुजाउदवला व रोहिले मिळून मराठे लोक यांस मुलखांतून बाहेर घालवावयास सिद्ध झाले.

दिल्लीचा बादशाह दक्षणी ब्राह्मणाचा अत्यन्तस्वभावास कंटाळोन, त्याणें आपल्या सरदाराला सर्व मराठे हांकून द्यावयास सांगितलें.

माधवराव पेशवा याचा मृत्यु, व त्याचें गुणकथन.

रामशास्त्री याची गोष्ट.

## भाग एकविसावा.

पूर्वी हिंदूंचा मुलखांत इंग्लीश+ व फ्रेंच, यांचें कित्येकवेळा युद्ध होऊन शेवटीं इंग्लीशांहीं फ्रेंच लोकांस जिंकिलें. ते इंग्लीश आपली विलायत सोडून प्रथम हिंदूंचा मुलखीं आले तो प्रकार असा. तेथचे कित्येक द्रव्यवंत लोक मिळून एकचित्त होऊन त्याहीं असा संकेत केला कीं, हिंदूंचा मुलखीं जाऊन, कांहीं उदिम करावा; मग त्या साधनार्थ ते आपल्या बादशाहाजवळ जाऊन विनंती करिते झाले कीं, आह्मीं इतके जण मिळून आपलें द्रव्य एकत्र करून, हिंदुस्थान हिंदू मुलुख तेथें जाऊन उदीम करूं इछितों; त्यास या आमचा मंडळी खेरीज दुसरा कोणी तिकडे न जावा, आणि आह्मास या कामाविषयीं अनेक प्रकारें सरकाराश्रय पाहिजे; अशास कृपा करून आमचा उद्योग निर्बाधपणें चालेशी सनद द्यावी; त्यावरून बादशाहाची तशी सनद होऊन ते मंडळीचे लोक* तेथून निघोन हिंदूंचा राज्यांत कलकत्ता व मद्रास व मुंबई या तिहीं ठिकाणीं आपलीं

+ इंग्लीश लोकांस मराठे लोक इंग्रेज असें ह्मणतात, आणि फ्रेंचांस फरांसीस असें ह्मणतात. परंतु इंग्लीश व फ्रेंच हें शुद्ध.

* ती सनद पावलेल्या मंडळीचें नांव विलायतेंत असें पडलें कीं, अनरेबल ईस्त इंड्या कंपनी ह्मणजे हिंदु लोकांशीं संबंध ठेवून व्यवहार करणारी श्रेष्ठ मंडळी.

स्थळें करून राहिले; मग तथें कांहीं दीर्घ काळ असतां त्यांस त्या मुलखाचा रहाणाराशीं त्या कामाविषयीं कांहीं संबंध पडला; तेव्हां त्या हिंदुलोकांच्या कापट्यामुळें त्या इंग्लीश लोकानां, आपल्या अभिमानें व प्राणानें रक्षण व्हावें म्हणून शिपाई लोक बाळगून किल्ले बांधावे असें आगत्य पडलें. मग तेथच्या राजाशीं संबंध पडून त्यांचे हातीं कित्येक मुलुख सांपडला; तेव्हां त्यांस तें काम श्रेष्ठ असें नवाटतां. राजाप्रमाणें वर्तावें लागलें. फ्रेंच जिंकिले तेसमयीं बहुतेक मुलुख त्यांचा हातास लागला तेणेंकरून ते परम विस्मय पावोन, मनांत विचार करूं लागले कीं. यांत कांहीं एक भाग, आपल्या कामापुरता ठेविला आणि बाकी टाकिला तर आपणास बरें पडेल कीं नाहीं; तेव्हां असें ठरलें कीं, अर्धमर्ध टाकावें आणि अर्धमर्ध भोगावें हें ठीक नव्हे; त्यास टाकणें तर अगदीं सारेंच टाकून विलायतेस जावें; किंवा उत्तरोत्तर जसें कारण पडेल, तसें अधिक अधिक घेऊन. आपण त्या लोकांचे आचरणानुरूप वर्तावें हें योग्य त्यावरून बंगाल्यांत क्लैव् नामें लाॅट+ तो विलायतेचे बादशाहापासून सरकार आज्ञेनें मुलखाचा बंदोबस्तास मन सत्ताशें छप्पन्नांत आला, त्याणें असें पाहिलें कीं, आपल्या रक्षणास उगेंच बसणें ठीक नव्हे, कांकिं, तशानें रक्षण ठीक होत नाहीं दुसरा मारूं लागे तोंपर्यंत उपेक्षा करण्यांत मोठी हानी आहे; यास्तव पुढें होऊन अवश्य कांहीं उद्योग करावा. असा निश्चय करून त्यास प्रथम दोन कार्यें साधवायाचें आगत्य पडलें; त्यांत एक कार्य असें, साष्टी व करंजें व मुंबईजवळच्या आणखी एक टांपू आपले स्वाधीन व्हावा. दुसरें कार्य असें, पूर्वीं फ्रेंच लोकांस निजामानें शिबंदीच्या खर्चास दिलेले पांच परगणे मद्रासेजवळ आहेत ते आपल्या सत्तेंत आणावे. तेव्हां साष्टी आदि टांपू मराठे देइनात, कांकिं पूर्वीं विलायतचे पोर्तुगीस लोक यांस जिंकून त्यांहीं घेतलेले, ते जर या इंग्लिशांस दिल्हे तर आपली मानहानी होईल; व यांची हद्दी आपणास बाधक होईल असें त्यांचा मनांत आलें. मद्रासेजवळचे परगणे निजाम अलीकडे होते त्या पांचां परगण्यांतील एक गंठूर नामें परगणा तो त्या निजामाचा भाऊ सलाबतजंग यास जहागीर होता; म्हणून तो निजाम देईना. तेव्हां त्यास लाट म्हणाला कीं, या गंठूरा खेरीज चार परगणे आहेत ते तुम्हीं पूर्वीं अर्काटचे नवाबास मरवत्यानें देत होतां, तेव्हां त्यांचें उत्पन्न त्यापासून जें घ्यावयाचा नेम ठरविला असेल त्यापेक्षां षड्गुणित आम्हीं तुम्हांस देऊं. त्यास ते चारी परगणे आम्हास तुम्हीं द्यावे; असें मागीतलें असतांही तो निजाम ऐकेना, तेव्हां त्या लाटानें निश्चय केला किं, बलात्कारें करून आपल्या रक्षणार्थ घेतले पाहिजेत; त्यावरून त्याणें दिल्लीचा बादशाहाची

---

\+ लाट म्हणजे मोठ्या उमरावासारिखें पद आहे.

सनद

सनद त्या परगण्याविषयीं संपादन करून, मद्रासेस जो कोणी मुख्य साहेब होता त्यास आज्ञा देऊन त्याणें राजमंड्री शहर घेतलें. त्यावरून निजाम अल्लीस राग येऊन बोलिला कीं, आतां आम्ही इंग्लिशांला अगदीं निर्मूळ करून टाकूं; त्यानंतर त्याणें हैदरास शिकविलें कीं, तुम्ही कर्नाटकीं जाऊन इंग्लिशांहीं घेतलेला मुलुख सोडवा; तेव्हां तो अनर्थ चुकवावयाकरितां हैदराशीं स्नेह करावयास कांहीं बोलण्यानिमित्त वकील पाठविला. परंतु तो हैदर वकिलास आपल्याकडे येऊंच देईना. हें वर्तमान त्यादास समजलें तेव्हां त्याणें मद्रासच्या साहेबास लिहिलें कीं, हल्लीं हैदर व निजाम व मराठे यांची एकचित्तता आहे, त्यांत मराठे व निजाम यांचें पहिलें वैमनस्य होतें, त्यावरून असें दिसतें कीं निजामाशीं स्नेह करावा मग त्याचा साहाय्यें करून हैदर व मराठे यांचा मर्यादेंत वागावयास फार सुलभ पडेल. मग ती स्नेहाची गोष्ट निजामास कळविली तेव्हां त्यास तें बरेंवाटलें, कांकिं, त्याचा मनांत होतेंच कीं, हैदरास जिंकून मर्यादेंत ठेवावा. परंतु त्याचा मनांत आलें कीं, एकदांच उभयतांशीं न विटावें; मराठ्यांशीं गुप्तपणें जो तह केला आहे तो तसाच राखून आधीं हैदर जिंकावा त्यावरून त्या निजामानें इंग्लिशांशीं स्नेह करून चारी परगण्यांची सनद दिली; आणि त्यांपासून प्रतिवर्षी सात लक्ष रुपये घ्यावे असा करार करून, त्याशिवाय जा वेळेस गरज लागेल ते वेळेस आपल्या चाकरीस इंग्लिशांचीं दोन पलटनें व सहा तोफा सिद्ध असाव्या; त्याचा खर्च चाकरी पडेल ते समयीं आम्हीं देऊं; असें निजामानें कबूल केलें.

इकडे मराठ्यांचे दरबारीं इंग्लीश व निजाम यांचे मनांतील संकेत कळले असतील असें वाटतें; कांकिं, सन सत्राशें सदसष्टांचे जानेवारींत माधवराव आपल्यास निजामानें पूर्वील संकेताप्रमाणें येऊन मिळावयाची वाट न पहातां एकाएकीं कृष्णेपलिकडे लष्करसहित जाऊन दोहों महिन्यांत शेरा, व उसकटा घेतला व हैदरापासून तीस लक्ष रुपये घेऊन करनाटकचे दुसरे जे कोणी मोठे मोठे होते त्यांपासून सत्रा लक्ष रुपये घेतले, आणि तें सर्व द्रव्य जमा करून, निजामाची सिद्धता झाली नाहीं तोंच आपण आपले मुलखीं माघारा आला. नंतर निजाम व इंग्लीश या दोघांहीं पेशव्यास त्या नेलेल्या द्रव्याची वांटणी मागीतली; तेव्हां तो त्यांस तुच्छ मानून मान्य झाला नाहीं.

नंतर निजामअल्ली तो इंग्लिशांचा पक्ष सोडून हैदराकडे मिळून इंग्लीश जिंकावयाची मसलत बांधूं लागला. मग सन सत्राशें अडुसष्टांचा फेब्रुवारीचे तेविसाव्ये तारिखेस तो निजाम हैदराचा पक्ष सोडून पुनः इंग्लिशांशीं स्नेह करिता झाला. त्यांत पूर्व स्नेहापेक्षां इतके अधिक झालें, तें असें.

निजाम

निजाम आणि इंग्लीश या उभयतांचा मतें असें ठरलें कीं, हैदर अली ह्मणजे केवळ बंड याचा मानरक्षणाचें आपणास प्रयोजन नाहीं, त्यास याचा मुलुख घेऊन चित्तास येईल तो प्रकार केल्यास दोष किमपि नाहीं. त्यावरून निजामानें नेम केला कीं, हा हैदर दिल्लीचा बादशाहाचा हातचा दक्षिणेचा अधिकारी स्थापित आहे; त्यापेक्षां कर्नाटक बालेघाट घेऊन किंवा, त्या स्थानांतून हैदरास भ्रष्ट करून, तेथचें वहिवाटीस इंग्लिशाला दिवाण करीन. याशिवाय बसालतजंगास गंटूर परगणा जहागीर आहे तोही बसालतजंग मेल्या असतां, अथवा त्याचें वर्तणुकेंत अंतर पडलें असतां मी इंग्लिशास देईन. त्याचे पाठिमागचे वर्षी रघुनाथराव मल्हारराव होळकरास बरोबर घेऊन हिंदुस्थानची स्वारी करावयास गेला; तेसमयीं तो मल्हारराव+ मृत्यु पावला. त्या योगें रघुनाथ रावानें कल्पिलेले अर्थ सिद्धीस न गेले, व पूर्वी पानपतचे लढाई नंतर गोहदचा राणा एक जाट होता, त्याणें पेशव्याचा पक्ष सोडून विपरीत वर्तणूक केली यास्तव रघुनाथ रावानें त्याचा पारिपत्यासाठीं त्याचा शहरास घेरा घातला, आणि कित्येक वेळा युद्ध प्रसंग करून शेवटीं तो किल्ला हातास येत नाहीं सा समजून त्यापासून तीन लक्ष रुपये खंड घेऊन माघारा दक्षिणेस आला. त्याचे आगोधरच माधवराव पेशवा कर्नाटकांत जाऊन पोहचला होता, त्याणें काकास निरोप पाठविला कीं, आपण टोक्यास येऊन मला भेटावें. तेव्हां काकानें तर आनंदी बाईचा सांगण्यावरून मुलखाचा अर्धा भाग घ्यावा अशी मसलत केली होती, त्यावरून त्यास वाटलें कीं, माझी मसलत फुटली; त्यास तेथें गेलों तर माधवरायाचा कैदेंत सांपडेन. या शंकेनें तो टोक्यास जाईना, मग गोविंद शिवराम याचा योगें करून निर्भयपणें तेथें गेला. तेव्हां पेशव्याचा मनांत होतें कीं, त्या काकास बारा तेरा लक्ष रुपये वर्षास उत्पन्न होतील अशी गोदावरीचे उगमीं जहागीर करून द्यावी; तीचा उपभोग करून, काकानीं कारभार न करितां स्वस्थ असावें. परंतु त्या रघुनाथरावास राज्याचा अर्धभाग पाहिजे होता, ह्मणून तें देणें त्याचा मनास येईना; तरी त्याणें त्याप्रमाणें घेतलें, तथापि त्याचें मन संतुष्ट न झालें. त्यापुढें पर्जन्य काळ समीप आला तेसमयीं रघुनाथरावानें पंधरा हजारांवर सैन्य जमा करून चांदोरचा डोंगरांत धोरप ह्मणोन किल्ला आहे तेथें त्या लश्करासहित जाऊन आपणास जानोजी भोंसला येऊन मिळावा अशी त्याची मार्ग प्रतीक्षा करून त्या ठिकाणीं राहिला.

---

\+ मल्हारराव होळकर मृत्यु पावला तेव्हां त्याचे जागीं त्याचा नातू मल्हाराव स्थापिला तोही त्वरकरच मेला. मग त्या मल्हारराचाचा दिवाण, व अहल्याबाई खंडेराव होळकराची बायको, यांचा त्या अधिकाराविषयीं वाद पडला. शेवटीं अहल्याबाईनें आपला भाऊबंद नव्हे असा कोणी एक पराक्रमी शिलेदार होता, तो त्या अधिकाराचा धनी केला.

त्याचे मनांत होतें कीं, आपणास पाहिजे तितकें राज्य बलात्कारें करून घ्यावें. त्या मसलतीस दमाजी गाइकवाड व होळकराचा दिवाण गंगाधर यशवंतराव होते त्यांत गंगाधर यशवंत रघुनाथरावाविषयीं अनुरक्त आणि पेशव्याविषयीं तो आंगचा द्वेषी असे. कांकिं. पूर्वी ज्यासमयीं रघुनाथरावानें राज्यकारभार टाकिला होता, तेसमयीं कोणे एके दिवशीं पेशव्याचे घरीं सभेमध्यें बोलतां बोलतां त्या गंगाधर यशवंतरावानें रघुनाथरावाची स्तुती व माधवरावाची निंदा दर्शविली तेव्हां माधवराव कांहीं न बोलतां आपल्या आसनावरून उठून त्याजवळ जाऊन मोठ्या वेगानें एक त्याचा तोंडांत मारिली होती.

रघुनाथराव यास त्या डोंगरी ठिकाणीं पेशव्यानें फार दिवस राहूं दिल्हा नाहीं कांकिं, त्यास भय उत्पन्न झालें कीं, काकाला जानोजी भोंसला येऊन कुमक करील, म्हणून मोठी त्वरा करून लश्कर सहित एकाएकीं जाऊन त्या रघुनाथरावावर पडून त्याचा लश्कराचा अगदीं पराभव केला. तेव्हां तो रघुनाथराव त्या धोरप किल्यामध्यें शिरला. मग तो किल्लाही घेऊन त्या काकाला धरून पुण्यास आणिला.

त्या वेळेस पर्जन्यकाळामुळें पेशव्यास जानोजीचा पारिपत्या करितां पुढें जावयास अवसर झाला नाहीं; परंतु दुसरे वर्षीं सन सत्राशें एकुणसत्तरांत पेशवा आपल्या सैन्यासहित बरोबर रुकनअदवला नामें मोगलांचा वजीर फौजेसुद्धां घेऊन नागपुरास चालिला. तेसमयीं जानोजी आपल्या संरक्षणार्थ युद्धाचे तयारीचा चांगला बंदोबस्त करिता झाला. तो पेशव्याचा समूर युद्धास उभा राहिला, आणि आमेदनगरा पलिकडे जाऊन, पुण्याचे आसमंतात लुटता झाला. इतक्यांत माधवराव पेशवा याणें त्याचा प्रांतांत जाऊन सर्व जागीं ठाणीं बसवून वसूल घेतला. मग चांदा किल्ला यास घेरा घालून गोपाळराव पटवर्धन व रामचंद्र गणेश यांजबरोबर बत्तीस हजार स्वार देऊन जानोजी भोंसल्याचे पाठीस लाविले. तथापि पुण्याचे आसमंतात जो उपद्रव होत असे त्याचा प्रतिबंध न झाला. कांकिं, त्या दोघांहीं त्या जानोजीशीं आतून गुप्तपणें स्नेह ठेविला होता, त्यावरून पेशवा चांदाचा घेरा उठवून, गोदावरीकडे आला तेसमयीं त्या जानोजीनें असा आकार दाखविला कीं आतां त्याचा समूर जाऊन लढतो, परंतु त्याचा मनांत तसें नव्हतें. कांकिं, त्यानें पेशव्याचें लश्कर माहुरासमीप एकीकडे टाकून वाट धरिली. तेवेळेस त्याचा कोणी एक सरदार बापू करंद्या नामें होता, तो त्या जानोजीकडून येऊन पेशव्याचे लश्करीचा बुणग्यावर पडून कांहीं लूट घेऊन गेला. त्यापुढें पेशव्यास जानोजी भोंसला हे उभयतां युद्ध ठीक नव्हे असें समजून मार्चाचे तेविसाव्ये तारिखेस तो

चा नदी भीमेचे उत्तर कांठीं कंकापुरीं झाला. त्यांत असें ठरलें कीं, पूर्वींचा दिलेल्या बत्तीस लक्षांचा मुलुखा पैकीं आठां लक्षांचा मुलुख पेशव्यानें त्याकडे रक्षिला होता. तो घ्यावा; आणि अक्कलकोटचा राजा फत्तेशिंग भोंसला याचे जमीनीचा कांहीं वसूल होईल तोही पेशव्यानें घ्यावा. याशिवाय पेशव्याचे लष्करचा कोणी शिलेदार रुसून येईल तो जानोजीनें आपल्याजवळ बाळगूं नये. याखेरीज दक्षिणी सुभेदार, व दिल्लीचा बादशाह, व अयोध्येचा नवाब, व इंग्लीश व रोहिले, यांतून कोणा एकाशींही त्या भोंसल्यानें राजकारणीं मसलत करूं नये. याप्रमाणें कबुलात होऊन त्यादिवसापासून पांचां वर्षांनीं पांच लक्ष व एक रुपया पेशव्यास द्यावे. असें ठरलें. या करारांत आणखी प्रकार पुष्कळ होते. परंतु जे त्यांत मुख्य ते लिहिले. पेशव्यानीं करार केला कीं, कधीं हिंदुस्थानांत सैन्यासहित जावें लागल्यास वाटेनें जानोजी भोंसल्याचा मुलखास उपद्रव देऊं नये. जर दुसरा कोणी तिकडे स्वारी करील तर लष्कर पाठवून जानोजीचें साहाय्य करावें.

या प्रमाणें पेशव्यास जो लाभ झाला त्यापैकीं निजामास तीन लक्ष रुपये वर्षास पावूं लागले; व त्याचा वजीर रुक्कण अद्दवला, यास प्रतिवर्षीं एक लक्ष रुपये माधवरावापासून पावूं लागले.

इकडे कर्नाटकांत, हैदर अल्लीनें इंग्लिशांशीं कांहीं स्नेह करून आपल्ये पुष्टीकरणार्थ समयविशेषीं ते आपल्ये उपयोगी पडतील असें जाणोन तो मराठ्यांचें भय मानिनासा झाला. मग तो आपण मराठ्यांस खंडणी न देतां, पेशवे पक्षाचा कोणी पाळेगार होता त्यापासून खंडणी घेता झाला. असें त्याचें विपरीताचरण कळलें तेव्हां माधवराव पेशव्यानें बहुत स्वार जमा करून गोपाळराव पटवर्धन व मल्हारराव रास्ते वगैरे सरदार यांस त्यांबरोबर देऊन, त्यां हैदरावर पाठविले. मग थोडक्याच अवकाशानें आपण वीस हजार स्वार व पंधरा हजार पायदळ बरोबर घेऊन त्यांचे पाठिमागून गेला; तो तात्काळ दोन्हीं बाळापुरें व कोल्हार व नंदीदुर्ग व मनवगळ, यांखेरीज सोळा किल्ले व पंचवीस मुलूख घेता झाला. असें वर्तमान सन सत्राशें सत्तरांत घडलें.

मनवगळचा किल्ला घेतानां असें झालें कीं, घाडगे कुळाचे विभागी दोघे एक झुंझारराव नामें, दुसरा मलावरीकर नामें, या दोहीं कुळांचा वाद वतनाविषयीं ब्राह्मणी वंश्य बादशाहापासून चालत आला होता तो, ते समयीं नव्यानें उत्पन्न झाला. त्याची पंचाईत होऊन नागोजी नामें घाडगा होता, तो त्या घाडगे वतनाचा अधिकारी सा ठरला, त्याचा प्रतिवादी, वाजी घाडगा नामें होता, तो झुंझारराव घाडग्याचा वंश्य, त्याचा मनास ती पंचाईत येईना. तेव्हां तो माधवराव पेशवे यांजवळ बोलिला किं, आमचा वादास पंचाइत उपयोगी नाहीं

हीं, भाल्यानें जो जिंकील तो आमच्या वतनाचा अधिकारी होईल. तेव्हां माधवराव याणें तशी आज्ञा न दिली. मग त्या किल्ल्याच्या हल्ल्याचे वेळेस, असा नेम ठरला कीं, या दोघां वाद्यांत ज्याचें निशाण जरीपटक्याच्या निशाणापुढें जाऊन, या किल्ल्याचा तटावर आधीं चढेल तो वतनाचा अधिकारी होईल. याप्रमाणें कल्पना निघाल्यानंतर बाजी घोडगा प्रतिवादी याचा निशाण धरणारा सरदार हल्ला करतेसमयीं पडला, आणि जरिपटक्याचा धरणारा दमडेगनामें सरदार होता तोही पडला. तेव्हां नागोजी आपलें निशाण घेऊन पुढें सरेतन, तो जरिपटका उचलून मोठ्या वेगानें किल्ल्यांत शिरून, त्याचा तटावर जाऊन तेथें आपलें निशाण उभें करून त्याचाच काठीवर जरिपटका उभारिला. तें पाहून सर्व मराठे लोक मोठ्या हर्षानें नागोजीची प्रशंसा करित होत्साते परम जय जयकार शब्दानें करिते झाले. याप्रमाणें शौर्येंकरून मराठ्यांहीं तो किल्ला घेतला; परंतु त्यांत एक मोठी अपकीर्ती झाली ती अशी; तो किल्ला घेतल्यावर जे त्यांत शिपाई लोक होते ते सर्व मारून टाकिले.

यापुढें माधवरावाचे प्रकृतीस वरें वाटेनासें होऊन, त्यामजून महिन्यांत माघारें पुण्यास यावें लागलें; परंतु तेथचें कार्य सिद्धीस न्यावयासाठीं वीस हजार स्वार व सारें पायदळ त्याणें तेथें त्रिंबकराव मामाचे स्वाधीन करून ठेविलें. मग पर्जन्यकाळ गेल्यावर माधवराव सैन्य घेऊन त्रिंबकराव मामास जाऊन मिळावें ह्मणून पुनः निघाला. तेव्हांही त्याचे प्रकृतीस समाधान नाहीं असें झालें, यास्तव पूर्वीं पानपतचे लढाईंत मृत्यु पावला जो बळवंतराव त्याचा पुत्र आपा बळवंत, यास तें कार्य संपवून आपण माघारा पुण्यास आला. त्यानंतर सनसत्राशें एकाहात्तरांत तो आपा बळवंत जाऊन त्रिंबकराव मामास मिळाला, तेसमयीं त्या दोघांचें मिळून सैन्य तोफखाना खेरीज करून चाळीस हजार स्वार व दहा हजार पायदळ जमा झालें; त्यावेळेस हैदराकडे बारा हजार स्वार व पंचवीस हजार पायदळ व चाळीस तोफा होत्या; तरी तो मराठ्यांच्या भयास्तव युद्धास निघेना, तेव्हां त्रिंबकराव मामा याणें तो हैदर अली बाहेर निघावयासाठीं युक्तीनें लटकेंच वर्तमान उठविलें कीं, त्रिंबकरावानें आपलें अर्धें लश्कर दुसऱ्या कामास पाठविलें; तें त्यास खरें वाटून तो हैदर धैर्येंकरून बाहेर आला, परंतु युद्धसमयीं त्यास पुरतेपणें समजलें कीं, आह्मीं फसलों, तेव्हां तो आपलें पूर्वीचें शौर्य टाकून युद्ध न करितां केवळ घाबरेपणानें पळाला, आणि श्रीरंगपट्टणीं स्थान धरून राहिला. तेवेळेस त्याचा सर्व तोफखाना, व राहुट्या, डेरे वगैरे सरंजाम व पंचवीस हत्ती हें सर्व मराठ्यांचे हातीं लागलें. यानंतर त्रिंबकरावानें

त्या

त्या श्रीरंगपट्टणासही पेरा घातला, आणि तेथें त्या स्थानाविषयीं सवा महिन्यापर्यं-त अडून पाहिलें; परंतु तें स्थान हातीं लागेना तेव्हां तें सोडून त्या मुलखाची खंडणी घेत चालिला; तेसमयीं त्याची मसलत होती कीं, सुंदाव बेदनूर हे दोन परगणे घ्यावे, परंतु त्याचे आरंभींच असें वर्तमान आलें कीं, पुण्यांत माधवराव पेशव्याचे प्रकृतीस फारअजार झाला आहे, असें एकून त्याला पुण्यास माघारें जावें अशी उ-त्कंठा लागली. यास्तव तो त्या वेळेस हैदरानें तहाचें बोलणें लाविलें होतें, त्यास आपण मान्य होऊन तह करिता झाला. त्यांत असें ठरलें की, पूर्वी शिवाजीचे वे-ळेस कर्नाटकचा मुलख जितका मराठ्याकडे होता, तो त्यांहीं घ्यावा. याशिवाय मदगिरी व गरमकोंडा हे दोन्ही किल्ले त्रिंबकराव मामानें घेतले होते, तेही मरा-ठ्याचे स्वाधीन असावे. याखेरीज तूर्त लष्करखर्च हैदरानें मराठ्यांस छत्तीस लक्ष रुपये द्यावा आणि प्रतिवर्षी चवदालक्ष रुपये खंडणी द्यावे यास अंतर करूं नये. याप्रमाणें ठराव सन सत्राशें बहात्तरात झाला.

इकडे माधवरावास पुणेंयेथें कफोद्रव होऊन हैराण होता, तो कफप-र्जन्यकाळांत उपशम पावोन, त्याची प्रकृती बरी होईल अशी दिसायाला लागली

मग हिंदुस्थानांत पानपतचे लढाईपासून काय काय वर्तमान झालें तो प्रकार असा. तें युद्ध सनसत्राशें एकसष्टांत झालें; त्यांत अब्दाली बा-दशाह जय पावला, नंतर त्याणें दिल्लीचा पहिल्या बादशाहाचा औरसपुत्र, शाहअलं, तो तेसमयीं दिल्लीपासून दूर बंगाल्याचा नवाब व इंग्लीश याउभयतां शीं युद्ध करीत होता, म्हणून तो येई तोंपर्यंत त्याचा पुत्र जवानबक्त नामें होता त्याणें तें आधिपत्य चालवावें असें केलें. आणि त्याची वजिरी अयोध्येचा नव-याब सुजाअदवला यास सांगीतली व नजीबअदवल्यानें पूर्वी अमीरउलउमरा-व पदवी संपादिली होती; ती पुनः त्यास दिली. इतकीं कार्यें करून तो दिल्ली-स गेला. तेसमयीं नजीबअदवला दिल्लीचा बादशाहाजवळ राहिला, आ-णि सुजाअदवला तो आपल्या अयोध्येस जाऊन तेथचा बंदोबस्त करून का-शीस गेला. तेथें शाहअलं बादशाह येऊन तो व आपण उभयतां मिळून बुंद-लखंडांत जाऊन झांशी घेतली. आणि त्या प्रांतांतून मराठे लोक यांस काढून द्या-वयाचें काम आरंभिलें; तें सिद्धीसच गेलें असतें, परंतु मीरकाशीम नामें बंगा-ल्याचा अधिकारी तो इंग्लिशांचे भयेंकरून पळाला. तो सुजाअदवला यास शरण आला; त्याचा अभिमानास्तव त्याणें इंग्लिशांशीं विरोध बांधिला; त्या योगें तें काम तसेंच राहिलें. नंतर सन सत्राशें चौसष्टांत अकटोबराचे ते-विसाव्ये तारिखेस बक्सार शहराजवळ, त्याची व इंग्लिशांची गांठ पडली तेव्हां

तेव्हां त्या उभयतांचें युद्ध होऊन सुजाअदवला पराभव पावला. आणि शाहअलं बादशाह इंग्लीशयांचा आश्रय करून राहिला. त्यापुढें दुसरे वर्षी आगष्ट महिन्यांत सुजाअदवला याणें इंग्लिशांशीं तह करून त्यांही आपला मुलुख घेतला होता, त्यापैकीं आल्हाबाद व खोरा या दोहों खेरीज अयोध्येचें राज्य संपादिलें, आणि अबदालीनें दिल्ली दिल्लीचा बादशाहाची वजिरी तिला अडथळा नहोईसा केला.

दिल्लीमध्यें जवानबख्त तो अबदालीनें तक्ताधिपती केला होता, तेथें नजीब अदवला याणें तें सर्व काम आपले हातीं ठेविलें; यास्तव शाहअलं बादशाह निर्बळ होऊन इंग्लिशापासून आल्हाबाद व खोरा यांचें उत्पन्न खाऊन खाऊन राहिला, त्यास आशा होती कीं, इंग्लिशांचा आश्रयानें आपलें तक्त आपणास मिळेल.

जाटांचा राजा सुरजमल्ल तो हळू हळू बळाढ्य होऊन नजीब अदवला यास युद्धेंकरून मर्यादेंत ठेवावयाविषयीं त्याशीं लढून मृत्यु पावला. त्याचा पुत्र मल्हारराव होळकर याचा आश्रयेंकरून कांहीं दिवस दिल्ली सभोंवता घेरा घालिता झाला, परंतु त्या नजीब अदवल्यानें होळकराशीं कांहीं बोलणें करून त्याणें त्या सुरजमल्लाचा पुत्राचा पक्ष सोडून जावें असें केलें. तेव्हां तो मूल होळकर यास सोडून निघोन गेला. हें वर्तमान सन सत्राशें चोसष्टांत घडलें.

होळकराचा यास्वारी शिवाय सन सत्राशें एकसष्टांपासून सत्राशें एकुणाहात्तर पर्यंत चंबळानदी पलीकडे मराठ्यांची स्वारी गेली नव्हती. त्या वर्षाचे समाप्तीस माधवराव याणें विसाजी कृष्णा यास सेनानायक करून, पन्नास हजार स्वार व पुष्कळ पायदळ व मोठा तोफखाना सिद्ध करून चंबळानदीपलीकडे पाठविता झाला. त्या विसाजी कृष्णानें सन सत्राशें सत्तरांत रजपुतांचा राजापासून खंडणीचा बाकी ऐवज राहिला असें निमित्त करून दहा लक्ष रुपये घेतले. त्यानंतर तो जाटाचे मुलखीं जाऊन खंडणी घेत घेत, भरतपुरासमीप गेला असतां, तेथें मोठें युद्ध होऊन जाटास जिंकिला, आणि त्यापासून दहा लक्ष रुपये रोख घेऊन पंचावन्न लक्ष रुपये हप्त्यानें घ्यावे असें केलें. यानंतर मराठ्याचें लष्कर डिगचा किल्ल्याजवळ पर्जन्यकाळीं छावणी करून राहिलें असतां नजीब अदवला याणें ते समयीं असा विचार केला कीं, मराठेलोक आपला बांध, व मांगल्यापासून मृत्यु पावल्याचा सूड उगवतील असें जाणून पुढें अनर्थ नव्हावा यास्तव त्याशीं मैत्री करावयाविषयीं वकील पाठविला, आणि बोलणें लाविलें; त्यास विसाजी कृष्णा समजला, कीं,

या सलुख्यांत मराठ्यांचें हित आहे परंतु त्याजवरोवर रामचंद्र गणेश व महाद्जी शिंदा हे दोघे होते ते रोहिल्यांचा सूड घेण्याविषयीं फार आग्रह करिते झाले. मग असें ठरलें कीं धण्याचे आज्ञेप्रमाणें वागावें त्यावरून तें वर्तमान त्याहीं पेशव्यास विदित केलें. त्याचें उत्तर आलें कि. नजीबअदवला व मराठे यांशीं शुद्ध स्नेह होणार नाहीं. परंतु दिल्लीचा बादशाह शाहअलम. तो सांप्रत इंग्लिशांचा आश्रयास आहे: त्यास आपल्या आश्रयांत आणावयाची मसलत नजीबअदवल्याचे द्वारें शेवटास जाईल: यासाठीं तूर्त विसाजी कृष्णाचे विचारें चालावें. त्यावरून मराठे व मोंगल यांचा तह ठरला: मग त्या नजीबअदवल्यानें विश्वासार्थ आपला पुत्र जाबितारवान यास विसाजी कृष्णाजवळ पाठविला. त्यापुढें सन सत्राशें सत्तरांचे अक्टोबरांत तो नजीब अदवला मृत्यु पावला. त्या वेळीं त्याचे जागीं त्याचा पुत्र दिल्लीस जाऊन आपल्या बापाचें काम चालविता झाला.

यानंतर मराठे त्यादिगचा छावणी पासून उठून दिल्लीवर कांहीं मोहीम न करितां रोहिल्यांचा मुलुख सहज घेते झाले. त्यावरून इंग्लिशांला कांहीं आश्चर्य वाटलें; त्यांस ठाउक नव्हतें कीं मराठ्यांचें व शाहअलम याचें ऐक्य आहे. पुढें त्या शाहअलमानें इंग्लिशांस समजाविलें कीं, मराठ्यांचा आश्रयास जातों. मग मराठे रोहिलखंड सोडून सन सत्राशें एकाहात्तरांत पर्जन्यकाळाचे अगोधर दिल्लीस आले, त्यांहीं त्याजवान बक्षाचे मर्यादेस्तव दिल्लीचा आंतील किल्ला मात्र आपल्या सत्तेंत न आणिला, वरकड सर्व जागीं आपलें ठाणें घातलें. यानंतर महादजी शिंदा याणें इंग्लिशांकडे जाऊन शाहअलमास भेटून आपल्या लष्करांत विसाजी कृष्णाजवळ आणिला; तो बादशाह त्याच वर्षीचा दिसेंबराचे समाप्तीस मराठ्यांचा आश्रयानें दिल्लीचा तक्ताचा अधिपती झाला.

सुजाअदवला दिल्लींत मराठे होते तोंपर्यंत आपण त्या बादशाहाचे वजिरीचा कामास अंगें आला नाहीं, तथापि त्याची व मराठ्यांची ऐक्यता होती, कांकिं, नजीब अदवल्याचा पुत्रास मराठे बुडविणार होते आणि सुजाअदवला याचा मनांत होतें कीं, रोहिले निर्बळ करून पुढें संपूर्ण मुलुख आपले सत्तेंत आणावा. त्यावरून मराठ्यांहीं जाबितारवान नजीबअदवला याचा पुत्र याचा बहुतेक मुलुख घेतला, ते समयीं रोहिले लोक त्यांस असे भीत होते, कीं, ते मोठ्या सुदृढ किल्ल्यांत असले तरी त्यांहीं मराठे येतात असें ऐकूनच तें ठिकाण सोडून पळावें. त्यापुढें सुजाअदवला समजला कि, जर मराठ्यांहीं रोहिले अगदीं जिंकिले तर आपलीही दशा नीच होईल. यास्तव त्याणें

रोहिले

रोहिले यांचे सरदार यांपासून चाळीस लक्ष रुपये घेऊन, त्या रोहिल्यांशी संकेत केला कीं, तुह्मीं व आह्मीं मिळून मराठ्यांस रोहिलखंडांतून बाहेर घालवायाचें.

इकडे दिल्लीमध्यें बादशाह याणें विसाजी कृष्ण व दुसरे कोणी ब्राह्मण होते ते केवळ अतृप्तस्वभाव असें जाणून फार पश्चात्ताप पावला आणि मनांत निश्चय करिता झाला कीं, कसेंही संकट प्राप्त झालें तरी या लोभी लोकांचा संबंध टाकावा. मग त्याणें आपल्या लश्करचा मुख्य सरदार नजीफखान यास सांगितलें कीं, मराठे युद्ध करून आपल्या मुलखांतून काढून द्यावे, हें सर्व वर्तमान विसाजी कृष्णास समजून तो विचार करिता झाला कीं, शेवटचा उपाय युद्ध, त्यावांचून दुसरी कांहीं युक्तीकरून जें कार्य साधेल तें बरें ह्मणून त्याणें तेथचा सर्व वृत्तांत पुण्यास लिहून पाठविला; त्यांत सुचविलें कीं, आतां कोणत्याप्रकारें वर्तावें, ती आज्ञा द्यावी.

त्या उत्तराची मार्गप्रतीक्षा करीत असतां, त्यास वर्तमान कळलें कीं, माधवराव थेऊरास मृत्यु पावला; ते समयीं त्याचे वयास अठ्ठावीस वर्षें झालेलीं होतीं. त्यास पुत्र किंवा कन्या कोणी अपत्य नव्हतें त्याची स्त्री रमाबाई तिजवर त्याची फार प्रीती असे; ती त्याबरोबर सती गेली. असें वर्तमान सन सत्राशें बहात्तरांचा नवेंबराचे अठराव्ये तारिखेस घडलें.

तो माधवराव अनेकगुणसंपन्न होता; त्याणें युद्धादिकार्यनैपुण्येंकरून मोठी ख्याति मिळविली, परंतु त्याची राजनीतिदक्षता अशी होती कीं, तिचा पुढें त्याची शौर्यप्रशंसा हलकी. तो राज्य करूं लागला तेवेळेस त्याचा मुख्य कारभारी फारा दिवसांचा आणि मोठा चतुर असा सखाराम बापू नामें होता तो लोभी असूनही त्याचा चातुर्यामुळें लोकांस त्याची भीड फार असे; त्याचा पुढें माधवराव राज्यारूढ असतांही त्याचा मान तादृश होइना, आणि रघुनाथराव तोही मोठा पराक्रमी त्यामुळें त्याची प्रशंसा होइना. पुढें त्याणें रघुनाथरावाला बंदीस घातला त्यापासून त्यास कांहींसे लोक मानूं लागले; मग त्याणें त्या सखाराम बापूला आपल्ये प्रतिष्ठेस प्रतिपंथी असा जाणोन एक दिवस एकांतीं त्याला नेऊन विचारिलें कीं, या लोकांत माझा मान किमपि दिसत नाहीं; त्यास मी अयोग्य आहें किंवा दुसरें कांहीं कारण आहे तें सांगा, व यास उपाय काय तो सांगा, त्यावर त्याणें त्याचे मनांतील अर्थ समजून उत्तर केलें, कीं, याचें कारण मीच आहें त्यास नोरोबा फडनवीस याला कारभार सांगावा. असें त्याणें शहाणपणाचें उत्तर केलें त्यावरून माधवराव प्रसन्न होऊन, त्या सखाराम बापूनें आपली जहागीर खाऊन स्वस्थ रहावें असें केलें; आणि नोरोबा

फडनवीस यास कारभार सांगीतला.

याप्रमाणें माधवराव मोकळेपणा पावल्यावर पुढें तो कांहीं मोठें कार्य करणें तर तें आपल्ये आज्ञेवाचून करूं देत नसे. त्याणें त्यावेळेस लोक हित समजावयास अनेकप्रकारचे उत्तम कायदे केले. तो माधवराव राज्य करीत असतां, त्यास सुद्धा स्वरीज कधीं रिकामपण सांपडलें तर त्या अवकाशांत तो आपल्या प्रजेस कोणेप्रकारें सुख होईल तो अर्थ पहात असे, कोणेही ठिकाणीं फिर्याद झाल्यास त्याचा न्याय शुद्ध करण्याविषयीं त्यास मोठी आवड होती; याविषयीं त्याणें कोणी एक रामशास्त्री नामें ब्राह्मण बाळगला होता; तो फार उपयोगी असे, त्या रामशास्त्र्यानें जाजा युक्ती करून पंचाइती ठरवित्या ते ठराव अद्यापि न्यायाचे उपयोगी पडतात. तो रामशास्त्री चांगल्या वागणारास सुमार्गदर्शी आणि खलास यमसदृश होता; तो सातान्यानजीक माहुली क्षेत्रीं जन्मला. त्याचें अडनाव परभुणे तो तरूणपणीं विद्याभ्यास करावया करितां काशीस गेला होता. त्यास बाळकृष्ण शास्त्री याचा मृत्यु झाला तेसमयीं पुण्याचे दरबारीं त्याजकडून कांही यत्न नसतां बोलावून सर्वशास्त्री यांचा तो मुख्य केला; पुढें माधवराव योग्यतेस येऊं लागला तेसमयीं, तो त्यास नीतिविचार सांगत असे; त्याविषयीं एकगोष्ट आहे. तो प्रकार असा, कोणे एके समयीं माधवराव यास पंडितांचे भाषणें करून इछा झाली कीं, कांहीं तपस्या करावी. त्यामुळें माधवराव जप करूं लागला, मग एकदिवस तो जपास बसला असतां, रामशास्त्री कांहीं कामानिमित्त त्याजकडे गेला तेव्हां त्याजवळचा शिष्यांहीं सांगीतलें कीं, यावेळेस श्रीमंतांची गांठ पडणार नाहीं. कांकिं तेजपास बसले आहेत; त्यावरून तो आपल्या घरीं जाऊन विचार करिता झाला, कीं, जर याविषयीं वाद करावा तर ठिक नव्हे; त्यास याचा आश्रय सोडून जावें हेंच बरें. मग दुसरे दिवशीं तेथें जाऊन बोलिला कीं, मला काशीस जावयाची आज्ञा द्यावी. तें ऐकून माधवराव बोलिला कीं, आपण येऊन गेलां तेसमयीं मी जपकरित होतों. त्यानिमित्तें आपली गांठ पडली नाहीं, त्यावर त्याणें उत्तर केलें कीं, आपण जें निमित्त सांगतां तें ब्राह्मणास योग्यच आहे; परंतु ब्राह्मण जर आपलें कर्म सोडून राज्य करूं लागले तर त्याणीं प्रजापालन करावें; तें टाकून जप करीत बसले तर तो अन्याय. त्यास जर आपल्या चित्तांत जपकरावा असें आहे तर हें सर्व राज्य टाकून मज बरोबर चलावें; मी तें आपणास पुर्तेपणें शिकवीन. त्यावरून माधवराव मनांत समजून त्याणें तें कृत्य टाकिलें.

स्त

सन सत्राशें बहात्तरी पासून
सत्राशें पंचेहत्तरी पावेतों झालीं वर्तमानें
मिळून भाग येविसावा.

## अनुक्रमणिका.

रघुनाथराव बंदींतून सुटला, परंतु नारायणराव पेशव्याचा कांहीं तंट्या मुळें पुनः बंदींत पडला.

नारायणरावाला मारेकरी यांणीं मारिला.

मराठ्यांचें सैन्य हिंदुस्थानांतून माघारें फिरलें. रघुजी भोंसला यास सेनासाहेब सुभा पदवी प्राप्त झाली.

निजाम अल्लीवर रघुनाथराव याचें युद्ध होऊन निजाम पराभव पावोन त्याणें रघुनाथरावास दिलेला मुलुख याणें त्यास माघारा दिला.

रघुनाथराव कर्नाटकांत गेला असतां, कारभारी लोकांहीं त्यास अहित अशी कांहीं मसलत केली.

त्रिंबकराव मामा रघुनाथरावाशीं युद्ध करून पराभव पावला.

मग रघुनाथरावानें हिंदुस्थानांत जाऊन इंग्लीश व होळकर व शिंदे यांशीं आपल्या साह्याच्यार्थ कांहीं बोलणें लाविलें.

पुण्यांत कारभारी लोकांमध्यें वैमनस्य पडून त्यांच्या दोन फळ्या झाल्या.

हैदर अल्लीनें कर्नाटकांतील मुलुख मराठ्यांचा घेतला.

विलायतेंतून कंपनी सरकारचे आज्ञेनें मुंबैहून कोणी वकील साहेब, पुण्यांत रहावयास गेला.

इंग्लिशांहीं भडोज किल्ला घेतला.

ठाणें नामें साष्टीचा किल्ला इंग्लिशांहीं घेतला.

शिंदा व होळकर, यांहीं राघोबाचा पक्ष सोडिला; यास्तव राघोबा बडोद्यास गेला.

गाइकवाडाचें कुमकेचें कांहीं हुन्न.

राघोबा व इंग्लीश यांचें बोलणें होऊन तह झाला.

त्याप्रमाणें त्याचे कुमकेस इंग्लिशांचें लष्कर आलें.

तें व रघुनाथराव याचें लष्कर मिळून कसें कसें वर्तलें तो विस्तार.

आरासाजवळचे लढायांचा प्रकार.

जहाजांची लढाई.

फत्तेसिंग गाइकवाड याचा इंग्लीश व राघोबा यांशीं तह झाला.

रघुनाथराव

रघुनाथराव याचा उत्कर्ष, व माधवराव नारायण पेशवा याचा ह्रास लोकांमध्यें दिसू लागला.

## भाग बेविसावा.

माधवराव पेशवा तो आपला अतकाळ समीप आला असें जाणून पुढें रघुनाथराव याचें आनुकूल्य नसल्यास आणि कारभारी लोकांत वैमनस्य अगल्यास आपला भाऊ नारायणराव यास राज्य संभाळावयाचें अवघड पडेल; असें समजून, त्याणें सखाराम बापूला जवळ बोलावून आपली दिवाणगिरी सांगीतली. आणि रघुनाथराव काका यास बंदींतून काढून आपल्याजवळ नेला, आणि सखारामबापूचा देखतां मोठ्या अगत्यानें, कारभारी व धणी यांची एक चित्तता असल्यानें राज्यास फार हित आहे असें समजाविलें, मग आपल्या भाव्याला त्या दोघांचा स्वाधीन केला,+ नंतर तो माधवराव पेशवा मेल्यावर त्याचें उत्तरकार्य झाल्यानंतर त्याचा भाऊ नारायणराव तो सातान्यास जाऊन, राजाराम राजा याचे हातून पेशवे पदवीचीं वस्त्रें पावला. तेसमयीं त्या नारायणरावाचा नावास राजानें नवें कारभारी असें पद जोडून बजाबापुरंधऱ्या यास त्याचा दिवाण केला, आणि नाना फडनविसास त्याची पूर्वजार्जित फडनविशी दिली.

तो नारायणराव पेशवा व त्याचा काका रघुनाथराव यांचा कांहीं दिवस स्नेह राहिला; मग रघुनाथराव याची बायको व नारायणराव याची आई या दोघांचें मन मिळेना, त्या योगें या दोघांचा द्वेष पडला. तेव्हां त्या नारायणरावानें आपले कारभारी मिळवून मसलत केली कीं, काकाला पुनः बंदीस घालावा. त्या कृत्यास सखाराम बापूचें मात्र अनुमोदन नव्हतें, तो ह्मणाला कीं, हें केवळ अनुचित कर्म दिसतें. मग एप्रेलाचे अकराव्ये तारिखेस पुण्यांत नारायणरावजा वाड्यांत रहात होता त्यांतच एका खोलींत रघुनाथराव काका याचा प्रतिबंध केला.

या पुढें पेशवा याणें आपल्या कारभारी मंडळीचा लोकांमध्यें बजाबा पुरंदरे व नाना फडनवीस व हरिपंत फडके यांवर विश्वास ठेवून बहुतेक राज्यकारभार यांचे हातून चालवित होता. हे तिघे कारभारी यांचें व सखाराम बापूचें वैमनस्य असे; परंतु ते सारे शहाणे ह्मणून बाहेर असें दिसत होतें. कीं, मुख्य कारभारी सखाराम बापू.

जानोजी भोंसला तोही माधवरावाचे मरणसमयीं थेऊरास होता त्या

\+ स्वाधीन केला हा सर्व वृत्तांत थेऊरास माधवरावाचे शरीरीं समाधान नसतां झाला.

णें

णें पूर्वींच माधवरावाचे आज्ञेनें आपला भाऊ मुधोजी भोंसला याचा पुत्र रघुजी भोंसला तो दत्तक घेतला.

त्या मुधोजी शिवाय जानोजीला आणखी भाऊ होते; त्यांस संतती नव्हती. जानोजीनें तो मूल घेतल्यावर त्या मुलाचा बाप मुधोजी तोच त्याचा रक्षक केला असेल असें वाटतें, परंतु तो अर्थ निश्चित होत नाहीं. त्यापुढें दुसरे वर्षी मे महिन्यांत. तुळापुराजवळ जानोजी भोंसला मरण पावला. तेव्हां त्याचा पुत्र रघुजी भोंसला याचा रक्षक कोण म्हणून जानोजीचे भाऊ मुधोजी भोंसला व साबाजी भोंसला हे दोघे भांडूं लागले; तेसमयीं जानोजीची स्त्री दर्याबाई भोंसली ती त्या दोघां दिरांतून एकासही मुलाचा रक्षक नकरितां आपणच भोंसल्याचे राज्याचा कारभार करिती झाली. त्यावेळेस तिणें साबाजीला आपलें लश्कराचें काम मुख्यत्वें सांगितलें; तेव्हां तो मुधोजी भोंसला आपणास हे समयीं युद्धावांचून दुसरा उपाय नाहींसा समजून लश्कर जमाकरून युद्धास सिद्ध झाला. मग तो व त्याचा भाऊ साबाजी भोंसला यांची गांठ पडून कुंभारी गांव आकोल्याजवळ आहे तेथें युद्ध झालें. त्या प्रसंगीं मुधोजी भोंसला याचा अगदीं पराभव होऊन, तो आपल्या जीवाचे रक्षणासाठीं पळून गेला. मग पेशव्याचे योगें ते दोघे भाऊ युद्ध करणें टाकून, एकमेकास भेटले असतां, त्या दर्याबाईनें एकाएकीं साबाजीला टाकून मुधोजीचा पक्ष अवलंबिला. असें झाल्यावर मुधोजी इलीचपुरचा कोणी मुख्य पठाण होता त्याचे साहाय्यें करून पुनः युद्धास उद्युक्त झाला, आणि साबाजी निजाम व पेशवे यांचा साहाय्यसंपादनार्थ यत्न करूं लागला. इतक्यांत असें झालें किं. नारायणराव पेशवा मारेकरी याणीं मारिला; त्या अनर्थामुळें इतर सर्व मोठमोठीं कार्यें राहिलीं. असें सन सत्राशें त्र्याहात्तरांचा आगष्ट महिन्याचे तिसाव्ये तारिखेस झालें

मारेकरी याणीं नारायणराव पेशवा मारिला, तो विस्तार असा. नारायणराव भोजनकरून आपल्या महालात त्यादिवशीं निजला होता, तेसमयीं त्या वाड्यांत एकाएकी गडबड मोठीच झाली ती ऐकून तो जागृत होऊन, पाहूं लागला, तों वाड्यांत गारदी लोक शिरले, त्यांत सुमेरशिंग, व महंमद यूसफ हे दोघे होते ते आपला रोजमुरा बाकी राहिला म्हणून कांहीं दांडगाई करितात. असेंही त्याचे दृष्टीस पडलें, आणि ते आपल्या अंगावर येतात असें पाहून तो पळत पळत आपल्या काकाचे खोलींत गेला. त्याचे पाठीस गारदी लोक लागले. त्यांत सुमेरशिंग फार निकट होता; तेव्हां तो आपल्या काकाचे शरीरास मिठी मारून बोलिला कीं, काका माझा प्राण राखें लेकरा बचावा. असें ऐकून रघुनाथराव मध्यें होऊन सुमेरशिंगास त्याचे रक्षणार्थ यथायुक्त प्रकारें बोलिला.

तेव्हां

तेव्हां सुमेरशिंग बोलिला कीं, मीं हें कार्य येथपर्यंत केलें तें जर आतां सोडिलें तर माझा नाश मी आपल्या हातें केला असा होतो. आतां तुम्ही याची आशा सोडा, आणि यापासून लवकर दूर व्हा; नाहीं तर दोघे मेले आल. तेव्हां रघुनाथरावानें आपल्या शरीराची भिंठा सोडवून गच्चीवर पळून गेला; त्याचे पाठिमागें फिरून त्यास धरावयास नारायणराव तिकडे त्वरेनें जाऊं लागला असतां, कोणी एक हत्यारबंद रघुनाथरावाचा चाकर त+ल्या पंवार होता, त्याणें त्या नारायणरावाचे पाय धरून मागें ओढून पालथा पाडिला. त्याच क्षणीं नारायणरावाचा चाकर परम विश्वासू *छापाजी टिळेकर नामें, तो हत्याररहित असूनही मोठ्या त्वरेनें धांवोन आपला धणी आपल्या अंगाखालीं घालून, त्याचा रक्षणार्थ आपण त्यावर पडला. तेसमयीं सुमेरशिंग व तल्या पंवार या दोघांहीं एके जागीं बरोबर ते दोघे धणी व चाकर तरवारीनें ठार मारिले. हें वर्तमान बाहेर कळल्यावर सखाराम बापूनें हरिपंत फडक्याचे हातचें पत्र झालेल्या प्रकाराचें शोधास वाड्यांत रघुनाथरावाकडे पाठविलें, त्याणें उत्तर असें दिलें कीं, हें कृत्य गारदी लोकांनीं केलें. त्यावरून रघुनाथरावानेंच हें कृत्य केलें असा मनांत संशय उत्पन्न होऊन, हरिपंत फडके तेच वेळेस बारामतीस पळून गेले. आणि सखारामबापू याणें शहरचे लोक फार गडबडले होते, त्यांस धैर्य देऊन स्वस्थ केलें. मग त्रिंबकराव मामा त्या वाड्यांत जाऊन, त्याणें तें पेशव्याचें प्रेत नेऊन जाळिलें.

रघुनाथराव त्या गारदी लोकांचे बंदीस बाकी रोजमुरा देण्याचे निमित्तें करून राहिला असतांही वकील व कारभारी लोक त्याजकडे जात होते. नंतर सर्व कारभारी लोकांचे मतें असें ठरलें कीं, नारायणरावास रघुनाथरावानेंच मारविला असेल; परंतु याचा निश्चय होत नाहीं, त्यास हाली याला पेशवे पदवी प्राप्त झाली ती याणें भोगावी.

या विचारास रामशास्त्रीही अनुमोदन देता आला, परंतु तो बहुत युक्तीनें गुप्तपणें त्याचा आंतून बारीक शोध काढूं लागला. त्यावर दीड महिन्यानें त्यास पुरतेपणें तें सर्व विदित आलें. तेव्हां रामशास्त्री रघुनाथरावापाशीं जाऊन बोलिला कीं, हें अकर्म तुम्हींच करविलें; मी याचा पुरतेपणें शोध करून तुम्हांकडे आलों. असें त्याचें भाषण ऐकून रघुनाथराव याणें इतकेंच मान्य केलें कीं, मी त्यास धरावा असें मात्र पत्र दिलें होतें, हें वर्तमान खरेंच असेल कांकिं, पुढें तो रघुनाथरावाचा हातचा अस्सल कागद रामशास्त्री यास सां-

---

\+ तल्या म्हणजे तुळाजी असेल.

---

* छापाजी म्हणजे चापाजी.

घडला, त्यांतील केवळ मुकचा असा होता कीं, तो धरावा. त्या धकारावर कोणी आणीक शाई घालून मारावा असें केलें. तें कृत्य आनंदी बाईचेंच असेल, असें सर्वांच्या मनांत आलें. नंतर रघुनाथरावानें त्यास धरण्याविषयीं पत्र लिहिलें हा अन्याय आपणापासून घडला असें मान्य करून रामशास्त्री यास विचारिलें कीं, या दोषास प्रायश्चित्त काय करावें; त्यावर त्याणें उत्तर केलें कीं, यास देहांत प्रायश्चित्त पाहिजे; कांकिं, तुमचें बाकी उरलें जें आयुष्य त्यांत तुह्मापासून सद्वर्तन होणार नाहीं. आणि यापुढें तुह्मीं व तुमचें राज्य याचा धडगतीं मला दिसत नाहीं, यास्तव इतःपर मी तुह्मी राज्य करित असाल तों पर्यंत पुण्यास येणार नाहीं; आजपर्यंत सरकाराश्रित झालों होतों तोही आतां नको. इतकें बोलोन तो शास्त्री तेथून निघोन वायीं क्षेत्राजवळ एकाल्हान शा गावीं राहून कालक्षेप करिता झाला.

इकडे त्या गारदी लोकांचा बाकी रोजमुरा देऊन रघुनाथराव मोकळा झाल्यावर त्यास सातार्याहून पेशवे पदवीचीं वस्त्रें आलीं.

ज्यासमयीं नारायणराव मारिला गेला तेव्हां त्याचें वय केवळ अल्प अठरा वर्षांचें होतें; तितक्यांत त्याचे गुण अथवा दुर्गुण हे लोकांस दिसून आले नाहींत, परंतु त्याचा धैर्याविषयीं एक कथा आहे ती अशी. माधवराव पेशवा असतां हे दोघे भाऊ पुण्यामध्यें गुलटेंकडीकडे हत्तींची लढाई पहात बसले असतां त्यांतून एक हत्ती मोठ्या त्वरेनें जेथें ते दोघे बसले होते तेथें समोर धांवोन आला तेव्हां त्यांजवळचे जे चाकर लोक वगैरे ते सर्व पळाले. तेसमयीं तो नारायणरावही उठून पळावयास सिद्ध झाला. इतक्यांत माधवराव त्याचा हातास धरून बोलिला कीं, तूं जर पळालास तर तुजविषयीं आक्बर लिहिणारे काय लिहितील. तें ऐकताच तो त्यांजवळ स्थीर बसला. नंतर तो हत्ती केवळ निकट येऊन पोंहचला असतां कोणी एक आपाजीराव पाटणकर नामें मराठा शिलेदार तो मोठ्या धैर्यानें धांवत येऊन, नारायणरावाचे पुढें होऊन हत्तीचा सोंडेंत खंजीर खुपसून त्याणें त्या हत्तीला एकीकडेस केला.

हिंदुस्थानांत लष्कर सुद्धां विसाजी कृष्ण होता तो असें इच्छित असे कीं, मोगलांशीं युद्ध न होतां, सलुख्यानेंच कार्य साधावें; परंतु तें न होतां सनसत्राशें बहात्तरांचा दिसेंबराचे एकुणिसाव्ये तारिखेस दिल्लीजवळ त्याच्या व मोगलांचा युद्धप्रसंग झाला. त्यांत मराठे जय पावले, नंतर त्यांशीं व बादशाहाशीं तह झाला, त्यांत असें ठरलें कीं, पेशव्यास बादशाहापासून वक्षीपदवी असावी आणि त्याचा दस्तक जाविताखान त्या कामावर ठेवावा, आणि

ज्यापासून बादशाहानें मरंपूर घेतलेलें होतें तें त्याचें त्यास द्यावें. यांखेरीज निजामानें नर्मदेच्या अलिकडल्यापासून ग्वाग व खरा हे दोन परगणें घेतले ते बादशाहाकडे असून नर्मदा नदीस द्यावें. याप्रमाणें करार झाल्यावर चिमाजी कृष्ण लष्कर सुद्धां पर्जन्य काळाचे अखेरीस पुण्यांत दाखल झाला.

जानोजी भोंसला याचा दत्तपुत्र रघुजी भोंसला तो रघुनाथरावास पेशवेपदवी प्राप्त झाली असतां आपली माता जानोजीची स्त्री दर्याबाई व मुधोजी भोंसला यांसहित मिळून पुण्यास मिळाला; त्या रघुजीस सेनासाहेब सुभा पदवी प्राप्त झाली. नंतर रघुजी व दर्याबाई तेथून निघोन वऱ्हाडाकडे गेलीं परंतु मुधोजीनें पाहिलें कीं, साबाजी आपलेपेक्षां बलाढ्य म्हणोन तो त्याच्या जवळ राहिला.

याप्रमाणें दक्षिणेंतील वर्तमान असतां हैदर व निजाम यांचा राज्यांत समजली होत्या कीं, मराठ्यांत वैमनस्यें पडोन फार अव्यवस्था झाली आहे, त्यास यासमयीं कांहीं आपला लाभ पहावा. त्यांत निजाम याची सिद्धता अझाली नाहीं तोंच रघुनाथरावमोठी त्वरा करून त्या निजामावर चालून गेला. तेव्हां त्यास असें अगत्य पडलें कीं, जाचे प्रतिवर्षी वीस लक्ष रुपये द्यावे असा मुलूख देऊन तह करावा. अशी लक्ष्मी त्या रघुनाथरावास मिळाली तीजर तो आपले मराठे मुख्य सरदार यांस वांटून देता तर त्याचे पेशवे पदवीस दृढता येता; परंतु तें नकरितां त्याणें निजामाचा गोड गोड गोष्टी अशा ऐकिल्या कीं, तुम्ही व आम्ही बहुतां दिवसांचे सोबती त्यावरून मोहित होऊन तो वीसलक्ष रुपयांचा मुलुख घेतलेला त्याचा त्यास माघारा दिला. त्यावेळेस जे त्याचे अनिष्टचिंतक होते त्यांस मोठा हर्ष झाला कीं, हा एवढा मूर्खपणा झाला या योगें हा लवकरच बुडेल. असेंच आणीक एक त्यांस हर्ष होण्याचें कारण झालें तें असें, औरंगाबादेजवळ साबाजी भोंसला लष्करसहित होता त्यावर त्रिंबकराव मामास पाठविला, आणि आपण कर्नाटकांत जाऊन हैदर व इंग्लीश यांशीं युद्ध प्रसंग करावयाची मसलत केली. त्यावरून त्या अनिष्टचिंतकास त्याचे पेशवे पदवीस कांहीं विघ्न उत्पन्न करण्यास तो दूर गेल्यावर पाठिमागें सुलभ पडेलसें वाटलें. त्यावरून सखाराम बापू व नाना फडनवीस हे दोघे त्या रघुनाथरावाचें लष्कर सोडून माघारे पुण्यास आले. मग थोडक्या आवेळानें मोरोपंतराव रास्त्या, व बाबुजी नाईक बारामतीकर, व मोरोबा फडनवीस, व बजाबा पुरंदरे, व गेरे लष्कर सोडून कांहीं निमित्त करून माघारे पुण्यास आले. तेसमयीं त्या रघुनाथरावाचे निकटवर्ती लोक आणि तो रघुनाथराव यांखेरीज सर्व लोक समजले कीं, रघुनाथरावास अहित अशी कांहीं मोठी

मसलत

मसलत आहे, त्यावेळेस पुण्याचा कारभार चालविणारे सखाराम बापू व त्रिंबकराव मामा व नाना फडनवीस व मोरोबा फडनवीस व बजाबा पुरंदरे व आनंदराव जिवाजी व हरिपंत फडके इतके असत, ते पेशवे कुळाचे योगें वाढले. शाहु महाराजाचे अष्टप्रधान त्यांशिवाय दुसरे होते. असें असतां तेवेळेस त्या अष्टप्रधानास बसवून कारभार हे चालवित होते. यांही मसलत केलेली लोकांस पहिल्यानें कळली नाहीं, शेवटीं या कारभार्यांनीं असें केलें कीं, नारायणरावाची स्त्री गंगाबाई गरोदर होती ती, आणि दुसर्या कांहीं गरोदर स्त्रिया तीज बरोबर नेऊन तिला त्यांसहित पुरंदर किल्ल्यावर ठेविली, आणि जे रघुनाथरावाचे पक्षी होते त्यास बंदीस घालून कारभार त्या गंगाबाईचें नावें चालविला, तेव्हां लोक समजले कीं, गंगाबाईस पुत्र होईल अथवा त्यांतील एकीचा पुत्र तो गादीचा अधिकारी करून रघुनाथरावास भ्रष्ट करावा अशी मसलत आहे. या कारभारी लोकांहीं त्यावेळेस निजामअल्ली व साबाजी भोंसला हे आपल्ये मसलतीस अनुकूळ केले; आणि रघुनाथरावाचा लश्करांत मुख्य कारभारी कृष्णराव बळवंत तोही इकडून कांहीं सुचना झाली असतां, या मसलतीस अनुसरलेला केला. असें सनसत्राशें चवर्याहात्तरांत झालें.

याप्रमाणें पुण्यांचें वर्तमान असतां, रघुनाथराव कर्नाटकांत बलारीपलीकडे जाऊन त्याणें हैदराशीं कांहीं बोलणें लाविलें होतें तेसमयीं त्यास अशी द्रव्याची गरज लागली कीं, त्या हैदरानें कांहीं नगद रुपये देऊन पुढें पंचवीस लक्ष रुपये पर्यंत द्यावयाचा करार केला असतां, त्या रघुनाथरावानें करनाटकांत मराठ्यांचे तीन परगणे होते ते त्या हैदरास दिले. त्यानंतर त्यास पुण्याची मसलत कळली तेव्हां त्याचे मनांत होतें कीं, अर्काटच्या नवाबाचा मुलुख लुटावा तें सोडून त्याणें त्या हैदराशीं तह करून ठरविलें कीं, वर्षास सहा लक्ष रुपये खंडणी तुम्हासच देऊं आणि पेशवे तुम्हींच. मग त्या रघुनाथरावास कोणी सांगितलें कीं, तुमचा लश्करांत सरदार लोक कृत्रिमी आहेत, त्यांत भवानराव प्रतिनिधी मुख्य; त्यास तुम्हीं आपली सावधगिरी करा. त्यावरून प्रतिनिधीस त्याणें विचारिलें कीं, तुम्हीं तीनशें स्वारांनिशीं आपल्या अधिकाराप्रमाणें चाकरी करावी असें असतां तुम्हास चार हजार स्वार ठेवावयाचें प्रयोजन काय. त्यावर तो कांहीं उत्तर देइना तेव्हां मुरारराव घोरपडे सेनापती यांस सांगितलें कीं, भवानराव प्रतिनिधी यांचें लश्कर लुटा; त्यावर त्याणें उत्तर केलें, कीं, तुमचा जो दुष्ट असेल त्यावर आम्ही जाऊं, हा आपले घरचा खटला यांत आम्ही शिरणार नाहीं. मग वामनराव गोविंद पटवर्धन व गैरे सरदार यांला क्रमेंकरून तेंच सांगितलें असतां, त्याणींही तेंच उत्तर केलें तेव्हां त्याणें आप-

ले

ले खासगीचे लोक व कांहीं तोफा घेऊन त्या लश्करांतून बाहेर निघाला; तरी प्रतिनिधी त्याणें पुसल्याचें उत्तर देइना. आणि त्या प्रतिनिधीचा जवळचे शिपाई लोक बहुत करून मानव येरच्या नदीचे कांठीं रहाणारे होते. त्यांहीं प्रतिज्ञा केली कीं,आमचा धन्याचे जिवास जर बरें वाईट होईल, तर आम्हीं इतकेही मरोन जाऊं. हें वर्तमान कळतांच रघुनाथराव युद्धोपाय टाकून आपण त्या भवानरावाकडे एकांत करावयास गेला. तेव्हां प्रतिनिधी त्याचा संमान करून एकांतीं दोघे बसते समयीं आपली तरवार दोघांमध्यें ठेविली; तेव्हां रघुनाथरावानें त्यास विचारिलें. कीं, तुह्मास येवढ्या दूर दृष्टीचें प्रयोजन काय आहे, त्यावर तो बोलिला कीं, कदाचित् पंत+ प्रधान प्रतिनिधीशीं बोलताहेत त्यांत विसर पडेल. मग त्या एकांतांत एकमेकांस प्रमाणवचनें होऊन त्या रघुनाथरावानें प्रतिनिधीला कांहीं द्रव्य घावयाचें कबूल केल्यावर, उभयपक्षीं युद्धादिप्रकार नाहींसा झाला,नंतर रघुनाथरावानें आपल्या बरोबर मुरारराव घोरपडा व प्रतिनिधी यांस बरोबर घेऊन पुण्यास येऊं लागला. तेव्हां वामनराव पटवर्धन वगैरे सरदार तेही त्याबरोबर चालत होते, परंतु त्याचा लश्करांत ते न मिळतां वेगळेच उतरत आणि रात्रीं रघुनाथरावाचा छापा पडेल ह्मणोन फार सावधपणा राखीत असत. ते समयीं रघुनाथरावावर हरिपंत फडका लश्कर सहित पुण्याहून येत होता, आणि त्रिंबकराव मामा व साबाजी भोंसला परिंड्याहून येत होते व निजाम अल्ली तो कलबुर्ग्याहून येत होता, या तिघांतून जो कोणी प्रथम येईल त्यास मिळून रघुनाथरावाशीं युद्ध करावें अशी वामनरावादि सरदार मंडळीची मसलत होती. त्या तिघां येणांत त्रिंबकराव मामा याचा मनांत आलें कीं, रघुनाथराव मोठा शूर आहे; त्यास जिंकिलें असतां आपली मोठी कीर्ति होईल. आणि साबाजी भोंसला तर आपल्या कामाकरितां विलंब करितो या कामांस, असें मनांत आणून आपण एकटाच पुढें लश्कर सहित येऊन भीमा नदीचे पार उतरून पंढरपुराजवळ मोठ्या मेदानांत रघुनाथरावास गांठून त्यावर एकाएकी पडला. त्या समयीं मामापेक्षां त्या जवळ फौज कमी असतांही त्या रघुनाथरावानें त्याचा पराभव करून तो मामाही फार जखमीं झाला. ते समयीं रघुनाथरावानें त्यास धरून कैदेंत ठेविला. त्या लढाईत रघुनाथरावाचे दहा हजार सुमारें स्वार होते, त्यांत पुढचे तोंडीं आपण होऊन मोठ्या वेगानें लढला. ते समयीं मामाकडचा सरदार गंगाधरराव रास्ता तोही जखमी झाला परंतु रघुनाथरावाचे कैदेंत न सांपडतां वांचला. प्रतिनिधी व मुरारराव घोरपडा हे दोघे रघुनाथरावाकडचे होते,परंतु ते त्या युद्धांत

---

+ पंत प्रधान ह्मणजे रघुनाथराव,त्यास प्रतिनिधीनें तुह्मीं व आह्मीं सारिखेच असें दर्शविलें.

न शिरतां एकीकडे उभे राहिले; मग थोडक्याच दिवसांनी प्रतिनिधी हरिपंताचा लश्करांत जाऊन त्यास मिळाला. आणि मुरारराव घोरपडा आपलें स्थान गुटी तेथें जाऊन राहिला. मग हरिपंत फडका साबाजी भोंसला व निजाम अल्ली यांस जाऊन मिळाला परंतु त्या दोघांचें मनांत लवकर जाऊन रघुनाथरावावर पडावें असें नव्हतें. असा तो राघोबा जय पावल्यावर त्याचे मसलतींत कांहीं जीव आहेसें कांहीं दिवस दिसत होतें कांकीं, विसाजी कृष्णानें हिंदुस्थानांतून आणिलेलें जवाहीर होतें तें त्याणें पंढरपुरांत लोटिलें. आणि तेथची खंडणी घेऊन द्रव्य जमा केलें. त्यावरून त्याजपाशीं फौज जमा होऊं लागली, तेव्हां तो रघुनाथराव पुण्याची वाट धरिता झाला. मग कांहीं मजला तिकडे गेला असतां, त्याचा मनांत आलें कीं, माझाजवळचें द्रव्य या एवढ्या लश्करास पुरणार नाहीं; आणि हें द्रव्य सरल्यावर लश्कर आपल्या जवळ टिकेलसा विश्वास नाहीं. यास्तव तो पुण्याचा मार्ग सोडून बऱ्हाणपुरास चालिला. आणि इंग्लीश व होळकर व शिंदा यांची कुमक घेऊन कार्य साधावें असें त्याचा मनांत आलें. याविषयीं त्याणें पूर्वीं पासूनच, यांजपाशीं कांहीं बोलणें लाविलें होतें. तो रघुनाथराव पुण्यावर येऊं लागला त्यावेळेस पुण्यांतील कारभारी लोक फार भ्याले कांकीं, कदाचित् साबाजी भोंसला व निजाम अल्ली हे रघुनाथरावाचा पक्ष धरितील असा संशय होता; यास्तव त्याहीं विचार ठरविला कीं, सातारयाचा राजा मुक्त करून त्याचे मुख्यत्वें रघुनाथरावाचा पराभव करावा. परंतु तो बऱ्हाणपुरास जाऊं लागला त्यावरून ते निर्भय होत्सातें लश्कर जमा करून त्याचे पाठीस लागते झाले, त्यावर निजामअल्ली व हरिपंत फडका तेही त्याचे पाठीस लागले, हें सर्व मिळून पन्नास हजार लश्कर होतें.

रघुनाथराव बऱ्हाणपुरीं शिंदा व होळकर यांची गांठ पडायाचे आशेनें थोडकेसे दिवस राहिला मग तें न झालें म्हणोन तेथून निघाला; त्यास त्याचे लोक ते वेळेस बहुत प्रकारें निषेधित असतां, तो तें न मानितां नर्मदापार गेला. तेव्हां त्याजवळ सात हजार स्वार मात्र राहिले, त्यांखेरीज मुधोजी भोंसला वगैरे सरदार त्याला सोडून निघोन गेले. नंतर तो राघोबा इंदुरास पोंहोंचला तेथें शिंदा व होळकर होते त्यांहीं त्याचा मोठा मान करून त्यास आपल्या लश्करामध्यें घेतला त्यावरून अशी वदंता उठली कीं, या दोघांहीं रघुनाथरावाचा पक्ष धरिला; आणि गोविंदराव व फत्तेसिंग गाइकवाड, हे दोघे भाऊ गुजराथचा आधिपत्याविषयीं भांडताहेत, तेही आपला कज्जा शिंदा व होळकर यांजकडे नेऊन ते सांगतील त्यास मान्य होऊन त्यांचे विचारें रघुनाथरावाचें साहाय्य करितील.

परंतु त्यापूर्वीं एप्रेलाचे अठराव्ये तारिखेस नारायणरावाची स्त्री गंगाबाई प्रसूत झाली तो पुत्र जन्मला. तेणेंकरून रघुनाथरावास पेशवेपदवी प्राप्त

होणार

होणार नाहींसा निश्चय ठरला, त्यामुलाचें नांव माधवराव नारायण असें ठेविलें, त्याचा जन्मदिवसापासून चाळिसावे दिवशीं त्यास भानायांहून पेशवेपदवीचीं वस्त्रें देऊन तो राज्यावर स्थापिला.

इकडे रघुनाथरावाचा पाठीस लागलेले निजाम अल्ली व हरिपंत फडके त्यांत निजाम अल्ली तो पुण्यांतील कारभारी लोकांहीं मुलुख द्यावयाचा कबूल केला होता, त्याप्रमाणें मिळाला नाहीं व शिंदे आणि होळकर याणीं रघुनाथरावाचा संमान केला हें वर्तमान ऐकून त्याची पाठ सोडून आसम नजीक छावणी धरून राहिला; आणि हरिपंत फडके याणीं बऱ्हाणपुराजवळ मुकाम केला. यानंतर पुण्यांत कारभारी लोकांमध्यें ईर्ष्या उत्पन्न होऊन एकमेकांचा विश्वासांत कांहीं अंतर पडून, त्यांमध्यें दोन फळ्या झाल्या. त्यांत एक फळी अशी. मोरोबा फडनवीस, व बाबुजी नाईक बारामतीकर, व बजाबा पुरंदरे, हे तिघे रघुनाथरावाचे पक्षपाती झाले. यांहीं मसलत केली कीं, सखाराम बापू व नाना फडनवीस व गंगाबाई व तिचा पुत्र यांस धरून कैद करावे. त्यावेळेस पुरंदर किल्ल्यावर पर्जन्यकाळामुळें धुकें फार ह्मणून ते मागें त्या किल्ल्याखालीं उतरून सास्वडांत राहिले होते त्यांस तें वर्तमान जून महिन्याचे तिसाव्ये तारिखेस कळलें. तेव्हां ते तात्काळ पुरंदरावर चढले.

कर्नाटकीं, हैदर अल्लीनें दक्षिणेंतील हें सारें वर्तमान ऐकून तुंगभद्रेचे दक्षिणेस जितका मराठ्यांचा मुलुख होता तो सर्व हस्तगत केला. आणि बसालत जंग, मराठी मुलखांत शिरून आथणी व मिरज पर्यंत खंडणी घेत आला.

रघुनाथराव बरोबर तीस हजार फौज घेऊन इंदूर सोडून तापी नदीचे कांठीं जाउन उतरला; त्यासमयीं त्याजवळची फौज बहुत करून शिंदे व होळकर यांजकडची होती त्याचे मनांत होतें कीं, मुधोजी भोंसले व गोविंदराव गाइकवाड हे येऊन आपणास मिळतील; त्या आशेनें त्यांची मार्गप्रतीक्षा करीत असतां त्याणें इंग्लिशांशीं पुनः तहाचें बोलणें लाविलें. त्या इंग्लिशांचा मनांत पूर्वीपासून फार दिवस असें होतें कीं, मुंबई जवळचे लहान टापू व साष्टी व वसई हीं घ्यावीं आणि याविषयीं ते फार उद्युक्त असत, परंतु त्यांची ती मसलत सिद्धीस गेली नाहीं: मग रघुनाथराव यास जेव्हां त्यांचें कारण पडलें तेव्हां ते समजले कीं, या रघुनाथरावाचा द्वारें आपला अर्थ सिद्धीस जाईल ह्मणून त्यांहीं आपला वकील+

\+ वकील मोस्तीन् साहेब तो माधवराव पेशवा याचा मरणाचे कांहींसा आगोधर पुण्यांस पोंहोंचला होता, त्यास विलायतेंतून कंपनी सरकारची आज्ञा होती कीं, हिंदुस्थानांत आपले उदमी लोक आहेत त्याचा व तेथचा आपल्या मुलखाचा बंदोबस्त ठेवून त्या लोकांशीं सलुख मात्र असावा; परंतु कोणाशीं देणे घेणें वगैरे कोणत्याही गोष्टीचा संबंध करूं नये.

मोस्तिन्

मोस्तिन साहेब नामें होता त्यास आज्ञा दिली कीं, हें कार्य तुह्मीं साधावें. त्यापूर्वीं सनसत्राशें बहात्तरांत जादिवशीं माधवरावाचा मृत्यु झाला तेच दिवशीं इंग्लिशांहीं भडोज घेतली. त्या घेण्याचें कारण असें, इंग्लिशांकडे सुर्तेचें आधिपत्य असतां त्यांस भडोजचा नवाबाकडची खंडणी यावयाची होती ती तो देइना; तेव्हां इंग्लिशांहीं सनसत्राशें एकाहात्तरांत पर्जन्यकाळाचे कांहींसें पूर्वीं तोफेका मागावयास फौज पाठविली, तरी त्याणें खंडणी दिली नाहीं. मग तो नवाब पर्जन्यकाळानंतर मुंबईस येऊन इंग्लिशांशीं कांहीं तह करून गेला. पुढें तो तह त्याचे मनास ठीक वाटला नाहीं ह्मणोन त्याणें तेथें इंग्लिशांचा वकील होता त्याचा कांहीं अनादर केला. त्यावरून त्या वकिलास मुंबईसरकारची आज्ञा झाली कीं, तुह्मीं भडोजेहून निघोन सुर्तेस जावें; आह्मीं लश्कर पाठवून तो किल्ला घेऊं. त्यावरून वकील तेथून गेल्यावर मुंबईहून फौज येऊन तो भडोज किल्ला घेतला.

रघुनाथराव पुण्यास येत होता ती वाट सोडून बऱ्हाणपुरास गेला, त्यामुळें साष्टी वगैरे स्थानें हस्तगत करण्याविषयीं मोस्तिन साहेबास रघुनाथराव दूर पडला यास्तव त्याचा योगें तें कार्य सिद्धीस जाइना; परंतु पुढें रघुनाथराव तापी उतरला तेव्हां सुर्तेचा अधिकारी साहेब होता, तद्वारा त्या मसलती संबंधें बोलणें पुनः लाविलें; परंतु तो साष्टी वगैरे द्यावयास कबूल होइना, ह्मणोन तें सिद्धीस गेलें नाहीं. आणि दुसरें कांहीं बोलणें होत होतें तों पोर्तुगीस लोकांचा विलायतेंतील बादशाहाकडून साष्टी वगैरे स्थानें हिंदुलोकांपासून माघारीं घ्यावयास फौज गोमंतकीं आली. त्यावरून मुंबई सरकारांत असें ठरलें कीं, ठाणें नामें साष्टीचा किल्ला तो आपण न घेतल्यास पोर्तुगीस घेतील; यास्तव त्वराकरून तें ठाणें आपण घ्यावें. तेव्हां सहाशें गोरेलोक व एक हजार पलटणी शिपाई तोफांसुद्धां त्या कामावर नेमिले; ते सनसत्राशें चौऱ्याहात्तरांचा दिसेंबराचे बाराव्ये तारिखेस मुंबईहून निघाले. त्याचे दुसरे दिवशीं पोर्तुगीस लोकांचीं जहाजें येऊन मुंबईजवळ नांगरलीं; आणि ते लोक इंग्लिशांस ह्मणाले कीं, साष्टी वगैरे ठिकाणें पूर्वीपासून आमचीं तीं आह्मीं घेऊं, त्यास तुमचे जे लोक तिकडे रवाना झाले ते मागें फिरवा. असें त्यांचें बोलणें इंग्लिश ऐकेनात, तेव्हां ते लोक तेथूनच माघारे गेले. आणि इंग्लिशांचा लोकांहीं तेथें गेल्यापासून सातवे दिवशीं ठाणें घेतलें नंतर थोडक्याच दिवसांत संपूर्ण साष्टी आणि उरण टापूही त्यांहीं हस्तगत केला.

असें मुंबईकडचें वर्तमान असतां, पुण्यांतील कारभारी लोकांहीं गुप्तपणें शिंदे व होळकर यांस रघुनाथरावाचा पक्ष नाहींसा करून स्वपक्षानुसारी केले. आणि तीस हजार स्वार जमा करून, पुरंदराहून निघाले ते रघुनाथरावाव-

र

व जाहिला ती तारीख नवेंबराची पंचाविसावी. असें झालें असतां. रघुनाथराव यानें शिंदे व होळकर यांचें कृत्रिम समजून पुरंदराकडील लश्कर घेऊन तापीवर पोहोंचला नाहीं तोंच तें शिंदे व होळकर यांचें लश्कर टाकून निघाला. तो तेथून पुढें तापीनदीचे काठीं तालनेर नामें किल्ला आहे. त्यांत आपले खासगीचे लोक म- हून आपण गुजराथेकडे निघाला. तेव्हां त्याची स्त्री आनंदीबाई बहुतां दिवसां- ची गरोदर होती. तिला धारेच्या किल्ल्यांत नेऊन ठेविली; आणि थोडकेसे दिवस तथें राहिल्या असतां, ती प्रसूत होऊन पुत्र झाला. तो बाजिराव रघुनाथ त्याचा यो- ग असा होता कीं ब्राह्मणाचा राज्याचा शेवट तो पुरुष असतांच व्हावा.

यानंतर रघुनाथराव सनसत्राशें पंचाहात्तरांत जानेवारीचे तिसऱ्ये तारि- खेस बडोद्यांत पोंहोंचला; तेसमयीं त्याबरोबर दहा हजार स्वार व चारशें पाय- दळ होतें; तो बडोद्यास आवयाचें कारण असें. त्याचा मनांत आलें कीं, गोविंदराव गाइकवाड याशीं स्नेह करावा आणि इंग्लिशांशीं बोलणें लाविलें शेवटास न्या- वें. इकडे पुण्यांतील कारभारी लोकांनीं तो तालनेर किल्ला घेऊन रघुनाथरावा- चे पाठीस हरिपंत फडका यास फौज देऊन लाविला, आणि सखारामबापू व नाना फडनवीस, हे दोघे तेथून माघारे पुरंदरास येऊन तेथेंच कारभार चाल- विला.

रघुनाथराव बडोद्यास गेला तेव्हां गोविंदराव गाइकवाड तो आपला भा- ऊ फत्तेशिंग बडोदे शहरांत असे, त्या शहरास घेरा घालून लढत होता, पूर्वी स- नसत्राशें अडसष्टांत रघुनाथरायाचें व माधवराव पेशव्याचें वैमनस्य पडलें ते- व्हां दमाजी गाइकवाडानें रघुनाथरायाचा साहाय्यास आपला पुत्र पाठविला, तो- च हा गोविंदराव गाइकवाड.

माधवरावानें रघुनाथरावास जिंकिल्यावर पुढें थोडक्याच दिवसांनीं तो दमाजी मृत्यु पावला; त्यासमयीं त्याचे पुत्र चार होते. त्यांत एक सयाजी दुसरा गोविंदराव, तिसरा माणिकजी, चवथा फत्तेशिंग. इतक्यांत सयाजी वडील, परं- तु तो दमाजीचा दुसरे स्त्रीचा पुत्र. गोविंदराव तो दुसरा पुत्र, परंतु पहिले स्त्री- चा माणिकजी व फत्तेशिंग हे दोघे तिसरीचे. दमाजी मेला तेसमयीं गोविंदराव यास हा रघुनाथरावाकडचा म्हणून पुण्यांत प्रतिबंधांत होता, तथापि त्यास त्याचे बापाचें स्थान व त्याची पदवी सेनाखासखाईल नामें होती ती त्याला प्राप्त होण्या- स कोणी प्रतिपक्षी नव्हते. कांकीं, त्याणें आपण रघुनाथरावाचा पक्ष स्वीकारि- ला या अन्याया बदल तेवीस लाख रुपये दिले आणि नजर एकवीस लाख; या शिवाय आणीक कांहीं कारणास्तव साडेसहा लाख मिळून साडे पन्नास लक्ष रु- पये दिले; आणि प्रतिवर्षी सात लक्ष एकुण हात्तर हजार द्यावयाचें कबूल केलें.

या

यांखेरीज पुणें मुकामीं निरंतर त्याजकडील सरदारगहीं चाकरी तीन हजार स्वारां-निशीं करावी आणीक कधीं मोहिमेचे समयीं चार हजार स्वारांनिशीं चाकरीस असावें, असें त्याणें मान्य केलें. यास्तव तें स्थान व ते नाम त्यास मिळालें. इकडे वडोद्यांत त्याचा वडील भाऊ सयाजी तो वेडसर होता, तथापि त्याचा कनिष्ठ बंधु फत्ते-सिंग त्याणें पुण्यास येऊन त्या सयाजीचें मुख्यत्व स्थापिलें; आणि आपण त्याचा मुतालिक झाला. त्यावरून तो फत्तेसिंग व गोविंदराव यांचें वांकडें पडलें; तें त्यां-चें वैमनस्य माधवराव पेशव्यास इष्ट असेल. त्याची मसलत होती कीं, गाइकवाड यांस वाढूं देऊं नये आणि तो संकल्प सिद्धीस न्यावयासाठीं त्या भाव्यांत युद्ध करवावें, तोच उपाय श्रेष्ठ असें मानीत होता.

नारायणराव पेशवा याचा मृत्यूनंतर राघोबा पेशवा झाला तेव्हां पुनः ती पदवी गोविंदरावास दिली, त्यावर गोविंदराव गुजराथेंत जाऊन आपल्या भाव्या-स जिंकावयाचा उद्योग करूं लागला; रघुनाथराव तिकडे जाई तंव पर्यंत तें त्याचें कार्य शेवटास गेलें नव्हतें. मग तो गोविंदराव व रघुनाथराव त्या कामाविषयीं एक-त्र झाले.

याशिवाय रघुनाथरावानें तेच समयीं सुरतेचा अधिकारी साहेब होता त्याशीं पूर्वींचें आरंभिलेलें बोलणें चालविलें तें बहुतेक होऊन शेवटीं सन सत्राशें च्या-हात्तरांचा मार्च महिन्यांत समाप्तीस गेलें; तो प्रकार असा. रघुनाथरावानें कुम-केस मुंबई सरकारांतून पांचशें गोरे व एक हजार पल्टणी शिपाई लोक तशाच त्या बेताप्रमाणें तोफा त्वरित द्याव्या; मागून अणखी कांहीं गोरे लोक व पल्ट-णी शिपाई पाठवून तीन हजारांची भरती करावी, त्या सेनाखर्चास दर माहा दीड लाख रुपये राघोबानें द्यावयास कबूल केले. आणि त्या देण्याबद्दल इंग्लि-शांकडे गहाणादाखल गुजराथचा आमोद परगणा, व हानसोट, व वरसाल, व आखलेश्वर यांतील कांहीं विभाग इतकें दिलें. त्याशिवाय साष्टी व वसई व मुं-बई जवळचे लहान लहान सर्व टापू सनद करून दिले; यांखेरीज गुजराथेंतील जं-बूसर परगणा व उल्पार परगणा दिला, आणि आखलेश्वर परगण्याचा जमेंतून वर्षास पाउण लाख रुपये द्यावयाचा करार केला. आणीकही इंग्लिशांस उप-योगी अशा कांहीं बाबती त्या करारांत होत्या. परंतु तो विशेष लिहावयास नाहीं. त्यावेळेस रघुनाथरावाजवळ रोकड द्रव्य नव्हतें म्हणून सहा लक्षांचें[+] जवाहीर मुं-बईमध्यें इंग्लिशांकडे हर्त सेनाखर्चनिमित्त ठेविलें. असा राघोबाच्या व इंग्लिशा-

[+] सहा लक्षांचें जवाहीर मुंबईमध्यें ठेविलें तें पुढें अठ्ठाविसां वर्षांनीं बाजीराव रघु-नाथ पेशवा होळकरी दंगा उलगडल्यावर पुनः स्थापिला त्यासमयीं इंग्लिशांहीं त्याला ब-क्षीस पाठवून दिलें.

चा नष्ट झाला त्याच कारणानें पुढें इंग्लिश व मराठे लोक यांचें प्रथम युद्ध उत्पन्न झालें.

हरिपंत फडके रघुनाथरावाचे पाठीस लागून गुजराथेंत गेले तेव्हां त्यांजवळ फौज तीस हजार होती ती जवळ आली असें समजून रघुनाथराव व गोविंदराव हे दोघे घेरा घालून बडोद्याशीं लढत होते ते युद्ध टाकून त्यांस मार्या नदी पलीकडे जावे लागलें. ते तेथें वासद गांवाजवळ डेरे देऊन राहिले; मग फेब्रुवारीचे सत्राव्ये तारखेपर्यंत हरिपंत फडके यांजबरोबर फत्तेशिंग गाइकवाडही आला असतां, त्याचे मसलतीनें आपल्या लष्कराच्या तीन टोळ्या करून तीन ठिकाणीं एकदांच मार्यी नदी उतरले, आणि त्या तीन टोळ्यांचे मधली टोळी रघुनाथरावावर पडली; तीजबरोबर तो युद्ध करीत असतां, त्याचे मागून गोविंदराव गाइकवाड व खंडेराव+ गाइकवाड हे दोघे येऊन पोंहोंचले नाहींत तों त्या दोहीं कडच्या दोन टोळ्या रघुनाथरावावर येऊन पडल्या तेव्हां रघुनाथरावाचे दोघे उत्तम सरदार सखाराम हरी व मानाजी फांकडे यांस फार जखमा लागल्या आणि त्या रघुनाथरावानें आरबांची एक टोळी नवी ठेविली होती ती काहीं दरमहा थकल्याचें निमित्त करून युद्ध न करितां एकीकडे ऊभी राहिली; आणि ती लढाईची जागा फार अडचणीची होती त्या योगें बहुत अव्यवस्था होऊन रघुनाथरावास असें वाटलें कीं, आतां माझेही लोक मला धरतील. ह्मणोन त्याभयेंकरून तात्काळ हजार स्वार बरोबर घेऊन मोठ्या त्वरेनें घोडें पिटीत खंबाइती कडे गेला. त्या खंबाइतच्या नवाबाचे मनांत पूर्वी होतें कीं, रघुनाथरावास मिळावें, परंतु तो पळून आलासा पाहोन त्यास आश्रय करावयास भिऊं लागला. ते समयीं तेथें इंग्लिशांचा वकील मालेट साहेब नामें होता, त्याणें त्याला भावनगरास पोंहोंचविला. मग तो तेथून सुरतेस दाखल झाला, नंतर चौं दिवसानीं सन सत्राशें पंचाहात्तरांच्या फेब्रुवारी महिन्याचे सत्ताविसाव्ये तारखेस मुंबईहून इंग्लिशांचें लष्कर सवाचारशें गोरे व साडे नऊशें पलटनी लोक तोफांसहित सर्व मिळून पंधराशें योद्धे त्याला कुमक येऊन पोंहोंचले. तेव्हां रघुनाथरावाचे लोक पराभव झालेले जे तारापूर धोलकापुरीं गेले होते त्यांस मिळावयाविषयीं सुरतेहूनही, पुढें खंबाइतेस [illegible] असा त्यांचा विचार ठरला. आणि रघुनाथरावही त्यांजबरोबर तिकडे गेला.

तें लष्कर खंबायतेंत असतां, त्यास आणीकही कुमक मुंबईहून मद्रास प्रांताच्या शिपाई लोकांची एक पलटण, आणि पावणे दोनशें सुमारें गोरे लोक आले. यानंतर एप्रेल मासीं पालणपुराहून गायकवाचें लष्कर इंग्लिशांस मिळावयाकरितां निघालें तें व इंग्लिश लोक यांची खंबायतेपासून पांचां कोसांवर गांठ पडली.

\+ खंडेराव गाइकवाड तो गोविंदराव गाइकवाडाचा चुलता.

त्या

त्या लश्करांत सखाराम हरी व मानाजी फांकडे यांचे लोक सहा हजार किंवा आठ हजार चांगले होते. परंतु त्यांस रोजमुरा नमिळे म्हणून दोडगाई करीत; वर्कड बारा किंवा पंधरा हजार स्वारें अशाही होते. ते केवळ लुटारू त्यांपासून उपयोग न होतां नाशास मात्र कारण असें असत. त्यास पाहून इंग्लिशांचा जो मुख्य कारभारी किटिंग नामें होता त्याला मराठ्यांचा लश्कराचा अनुभव नव्हता, म्हणोन तो तें लश्कर एवढें मोठें, आणि त्यामध्यें निशाणें व डेरे फार पाहिले; इतक्यावरूनच मोठा संतुष्ट झाला, आणि आपल्या लोकांसाठी बरोबर द्रव्य नेलें होतें तें ही त्या शिपायांस वांटिलें. त्यानंतर एप्रेलाचे तेविसाव्ये तारिखेस तेथून तें लश्कर उत्तरेकडे मातर गावीं गेलें. त्यास तेथें पोंहचावयाचे पूर्वी वाटेनें दोनवेळा हरिपंताचा लशकराची गांठ पडून कांहीं कांहींसें युद्ध झालें; त्यांत पहिलें असामली गांवांजवळ झालें, तें इंग्लिशांचे लोकांशीं, त्यांत इंग्लिशांचे लोक पडले नाहींत. दुसऱ्या मध्यें रघुनाथरावाकडचे जखमी व मेले मिळून पन्नास साठ सुमारें पडले इतक्यानेंच रघुनाथरावाकडचे लोक अधीर होऊन यापुढें युद्धास झटेनातसे झाले, त्या युद्धांत रघुनाथरावाचा लोकांचा पराजय झाला असतां त्यांचे डाव्ये बाजूस इंग्लीश लोक होते, त्यांवर हरिपंताचा लोकांहीं हल्ला केला परंतु रघुनाथरावाचा लोकांपेक्षां त्यांचा अधिक नाश होऊन निघुन गेले. त्यापुढें राघोबाचा मनांत आलें कीं, पर्जन्यकाळ जाई तों पर्यंत अमदाबादेंत रहावें; परंतु इंग्लिशांची मसलत होती कीं, त्याच वेगानें पुण्यावर जाऊन पडावें यास्तव त्या रघुनाथरावानें तिकडे चाल केली; परंतु कोणे रितीची मसलत त्या कामास असावी ती नीट नव्हती; आणि त्या गुजराथेंतील मार्ग संकोचित असे, जास दोहीं बाजूनें उंच उंच कुडणें केलेलीं, त्या मुळें तें लश्कर फार हळू हळू जाऊं लागलें असतां नापार गांवांजवळ मे महिन्याचे अठराव्ये तारिखेस पोंहचलें; त्यास इतका विलंब लागला.

त्या लश्करानें खंबायत सोडिल्या पासून त्याबरोबर किटिंग साहेब होता त्याणें रघुनाथरावाचा लोकांस सांगितलें कीं, तुम्हीं दोहीं बाजूनीं चालून मध्यें बुणगें घेऊन बंदोबस्तानें चालवा. परंतु ते त्या कामास न पडतां कधीं शत्रु येतो असें ऐकिलें असतां ते लोक बुणग्यामध्यें शिरून चालत; अथवा इंग्लिशांचे टोळीचा आश्रय धरीत असें आलें असतां रघुनाथरावाचा सांगण्यावरून त्या साहेबानें त्या लोकांस धैर्य यावयाकरितां शंभर गोरे लोक व शंभर पलटनी शिपाई अशा दोन दोनशें लोकांचा दोन टोळ्या करून त्यांस दोन तोफा देऊन त्यांतली एक टोळी मागें चालावयास ठेविली, एकास दोहों बाजूनीं चालविली, आणि समयविशेषीं त्या दोहीं टोळ्याहीं एकमेकींस कुमक करावी अशी आज्ञा केली.

या

या प्रमाणें बंदोबस्तानें तें लश्कर चालत असतां, अठराव्ये तारिखेस तापार सोडून एका कोसावर गेले तों तेथें वाटेचा डाव्ये बाजूस एक मोठ मोठ्या दृक्षांची झाडी होती. तीतून एकाएकीं सहा तोफांचा मार त्या मागल्या टोळीवर चालू झाला, आणि त्या झाडींतूनच शत्रूचा लश्कराची एक मोठी टोळी धांवोन येत्ये असें पाहिलें. तेव्हां त्या किनिङ् साहेबानें लोक पुढें चालत होते ते उभे केले, आणि आपण एक तोफ व एक करनाळ बरोबर घेऊन मागें आला इतक्यांत ती बाजूची टोळी पाठिमागचे टोळीस येऊन मिळाली. तेव्हां शत्रूनें तोफांचा मार बंद करून ती आपली टोळी मागें फिरविली. ते समयीं त्या सहांपैकीं त्याचा दोन तोफा तेथें राहिल्या त्या घ्याव्या असा बेत होऊन इंग्लिशांचे लोक तिकडे जाऊं लागले असतां ती वाट अडचणीची आणि ते फार त्वरेनें गेले तेणें करून त्यांचा चालण्याचा बंदोबस्तांत कांहीं अंतर पडलें. मग त्या तोफांचे जवळ पोंहचल्यावर आपला बंदोबस्त नीट करावयास गुंतले असतां त्यांवर शत्रूंची एक टोळी मोठ्या वेगानें येऊन पडली. तेव्हां ते इंग्लिशांचे लोक त्यांशीं लढूं लागले तों त्या किनिङ् साहेबानें आपल्या लोकांस तोफांची कुमक करून शत्रूचे लोक मागें हटविले. नंतर इंग्लिशांचे लोक त्या तोफा घ्यावयास पुनः उद्युक्त झाले ते समयीं त्यांवर पूर्वींचे पेक्षां मोठी स्वारांची टोळी फार वेगानें येऊन पडली, तेव्हांही त्याणीं त्यांचे कित्येक लोक मारून त्यांस मागें हटविले. परंतु ते समयीं इंग्लिशांचेही कितिएक लोक मेले गेले, तेव्हां रायोबाचा कोणी कारकून होता त्याणें छत्रिम करून त्या अडचणींत दोन हत्ती घालून ती वाट बंद केली. आणि शत्रूस धैर्य देऊन मागून हल्ला करविला. तेव्हांही त्या पलटणी लोकांहीं त्यांकडे तोंड करून त्यांशीं लढून त्यांस दूर केलें. इतक्यांत रायोबाचे स्वार व आरब व शिंदे लोक मिळून आले ते इंग्लीश लोक यांचें लश्कर व पुढची टोळी या दोहीं मध्यें शिरले तेव्हां शत्रूचा पक्षाचे कोण व रघुनाथरावाचे कोण ते इंग्लिशांस समजेना असें झालें. मग ती गोरे लोकांची एक टोळी कांहीं कारण न दिसतां आज्ञेवांचून मागें हटूं लागली:+ तेव्हां काळे लोकही आपला मोड झाल्याचे भ्रांतीनें तसेच मागें हटूं लागले. ते हटत हटत थोडक्याशा वेळानें आपल्या लश्कराकडे बंदोबस्तरहित पळूं लागले. ते समयीं शत्रूचे लोक त्यांमध्यें शिरून ते लोक आपल्या ठिकाणीं पोंहचत तों पर्यंत त्यांतील कित्येक मारिले. परंतु ते त्या ठिकाणाजवळ पोंहचले तेव्हां इंग्लिशांचा तोफांचा व त्या सर्व पलटणी लोकांचा मार त्यांवर पडोन त्यांचा फार नाश होऊन ते पळाले. या प्रमाणें अरासाज-

---

\+ त्या टोळीस सरदारानीं आज्ञा दिली कीं, बाजूस व्हावें ते समजले कीं, मागें सरावें असें चौकशीवरून पुढें समजण्यांत आलें.

वळची लढाई झाली, त्यांत इंग्लीश जय पावले; परंतु त्यांत अनर्थ न झाला असें नाहीं; कांकिं, त्यांचे गोरे लोक जखमी झाले व मेले गेले मिळून शायशीं, आणि पलटणी लोक जखमी व मेले गेले मिळून एकशें छत्तीस. असे सर्व मिळोन दोनशें बेवीस पडले.

यानंतर किटिङ्ग साहेब भडोजेस जाऊन आपले जखमी लोक तेथें ठेवून आपण तेथून निघोन नर्मदेचा उगमाकडे त्या भडोजे पासून बारा चौदा कोसांवर बहुपीरास एक मजल करून गेला. तेव्हां तेथें नवें वर्तमान आलें कीं, हरिपंताचें लश्कर नदी उतरोन गेलें नाहीं; आपल्या पासून पांच कोसांचे अंतरानें आहे. तेव्हां किटिङ्ग साहेब त्याच दिवशीं मध्यरात्रीं निघाला आणि मनांत आणिलें कीं एकाएकी हरिपंताचा लश्करावर जाऊन छापा घालावा, ती त्याची कल्पना शेवटास जाती परंतु रघुनाथरावाचे स्वारांस कांहीं एका दोहों रोजांचा पैका भडोजेस मिळाला होता तितक्यानेंच कांहीं धैर्य उत्पन्न झालें असेल किंवा कांहीं त्यांस लूट मिळे या अर्थानें ते मागें राहिनांत; आणि इंग्लिशांचा लोकांत शिरून त्यांहीं अशी अव्यवस्था केली कीं, त्या साहेबास आपल्या पलटणी लोकांचा बंदोबस्त नीट करितां तो दिवस उगवे तोंपर्यंत पुढें जावयाची सधी सांपडली नाहीं; त्याणें करून ते हरिपंताचे लोक सावध झाले आणि त्यांहीं आपल्या तोफा वगैरे जड सामान नर्मदेंत बुडवून खटले पुढें चालतें केलें मग ते येऊन, मिळून तोंपर्यंत आपणही निघोन गेले. तेव्हां त्यांचे दहापांच उंट व एक हत्ती तळावर होते ते रघुनाथरावाचा लोकांहीं वळवून नेले. असें वर्तमान जुनाचे आठव्ये तारिखेस झालें. ते समयीं पर्जन्यकाळ जवळ आल्या मुळें पुढें जावयाची सोय नाहींशी पाहोन इंग्लिशांचें लश्कर बडोद्या पासून दहा कोसांवर दुभाई शहर आहे तेथें छावणी करून राहिलें. आणि रघुनाथरावाचें लश्कर बडोदें व दुभाई यांमध्यें भीलापूर नामें गांव आहे तेथें उतरलें. तेव्हां गोविंदराव गाइकवाडाचा बोलण्यावरून असें ठरलें कीं, पर्जन्यकाळ गेल्यावर फत्तेसिंगाशीं लढोन बडोदें घ्यावें.

याप्रमाणें युद्ध खुसकीवर होत असतां, समुद्रांतही युद्ध चालतें झालें, तो प्रकार असा. त्या युद्धाचे प्रारंभीं मराठ्यांचीं पांच जहाजें मोठीं होतीं. त्यांत एकशें चाळीस तोफांचें, एक अठ्ठावीस तोफांचें आणि बत्तिसांचें एक, व दोन सव्वीसांचीं. यारवेरीज दहा फतेमाऱ्या, एक एकीस दोहोंपासून नउ तोफांपर्यंत होत्या, अशा पंधरा. याप्रमाणें असतां एके दिवशीं इंग्लिशाची व त्यांची समुद्रामध्यें गांठ पडली तेव्हां इंग्लिश लोकांचा जहाजाचा मुख्य सरदार कामोडोर जानसन नामें होता. तो त्या मराठी लोकांस न भीतां त्यांजवर चालून, गे-

ला.

आजवर दोन जहाजें मात्र होतीं असें असतांही त्यास पळतांच मराठे आपल्या गलबतांची सारी भिडं हाकारून मागें पळून जाऊं लागले, तेव्हां तो त्यांचे पाठीस लागला. मग त्या इंग्लिशांचा दोहों जहाजांतील एक मोठ्या तरेचें चालणारें मुंबई गुराब नामें मोठें होतें तें पुढें जाऊन मराठ्यांचा जहाजांतील मोठें समशेरजंग नामें एकेचाळीस तोफांचें जहाज होतें त्यास गाठून त्यांशीं तो साऊंबल्डूं लागला. तो त्याचें दुसरें ही जहाज येऊन पोहचलें नंतर एक प्रहर पर्यंत युद्ध झाल्यावर त्या समशेरजंग जहाजावरचा दारूखान्यास तोफेचा गोळा लागून ती दारू पेटली; तेव्हां त्या जहाजाचे तुकडे तुकडे होऊन ऊंच उडाले. तेवेळेस त्या जहाजावरचा मुख्य व दुसरे त्याचे लोक बहुत एक मेले गेले, आणि त्यांतून थोडकेसे वांचले.

याप्रमाणें इंग्लिशांची कुमक राघोबाचे उपयोगीं पडली असतां, त्याणें आमोद परगणा व हनस्सेट परगणा हे दोन्ही इंग्लीश लोकांला सनद करून दिले; ते समयीं त्या दोहों परगण्याची जमा दोन लक्ष सत्त्याहात्तर हजार रुपये वर्षास उत्पन्न होत.

इकडे बडोद्यांत गोविंदराव व फत्तेसिंग गाइकवाड यांचा कलह होता तो ही इंग्लिशाचा योगानें मिटला. त्यांत राघोबास तीन महिन्यांत सव्वीस लक्ष रुपये मिळतील असें ठरलें. आणि गोविंदरावास रघुनाथराव याणें दहा लक्षांची जहागीर दक्षिणेंत द्यावी असा नेम केला. आणि कंपनी सरकारास भडोच शहराचा वसुलांतील जितका भाग गाइकवाडाचा होता तो व कित्येक गांवांचा सनदा मिळून वर्षास दोन लक्ष तेरा हजार रुपये उत्पन्न होत असा मुलुख गाइकवाडानें द्यावा असा निश्चय झाला.

याप्रकारें राघोबाचा उत्कर्ष होत असतां पुण्यांत माधवराव नारायणाचा ह्रास दिसूं लागला. तो असा, इंग्लिशांचा भयेंकरून हरिपंत फडका लश्करसुद्धां बहुपिरापासून माघारा दक्षिणेस आला. असा स्वसेनापराभव झाला असतां सखाराम बापू व नाना फडनवीस उद्विग्नचित्त झाले. आणि वर्कड मंडळीचा मनांत येऊं लागलें कीं, रघुनाथरावाचा उत्कर्ष झाला असतां वराडचा राजाही तत्पक्षानुसारी होईल. त्यापूर्वीं शिंदे व होळकर ही त्या कारभारी मंडळीचा पक्षसो-

---

+ दोहों जहाजांत एकाचें नाव रिवेंज. त्या नारवाचें बारदान १३०२ सुरती खंडी होतें त्यावर तोफा १२ रतली गोळ्यांचा २० व ८ रतली गोळ्यांचा ८ होत्या, व त्यावर दर्यावर्दी लोकांचा भरणा सर्व मिळोन १६८ आसामींचा होता, त्यामध्यें सत्तर गोरे लोक होते. दुसरें मुंबें गुराब त्या नारवाचें बारदान ९६० सुरती खंडी होतें, त्यावर तोफा ९ रतली गोळ्यांचा १६, व ३ रतली गोळ्यांचा ८ होत्या, व त्यावर दर्यावर्दी लोकांचा भरणा सर्व मिळोन १६६ आसामीचा होता, त्यामध्यें गोरे लोक ६० होते.

डून

डून निराळे झाले होते. आणि निजामअली तोही त्या मंडळीस भयप्रदर्शनार्थ रघुनाथरावाशीं कांहीं बोलणें लाऊन त्यांस ह्मणूं लागला कीं, नारायणरावास पुत्र झाला तो खरा नसेलसा आम्हांस वाटतो. त्यावरून त्या कारभारी मंडळीनें त्यासस अठरा लक्ष पंचायशीं हजारांचा मुलुख देऊन, तो अनुकूळ केला. या सर्व गोष्टींवरून लोकांस असें वाटलें किं, पुढें पर्जन्य काळ गेल्यावर रघुनाथराव येऊन त्याचा यत्किंचित् जय झाला तरी ते सर्व कारभारी त्यास अनुकूळ होऊन तो आधिपत्य पावेल अथवा माधवरावनारायणाचें रक्षण मुख्यत्वें आपण करील, परंतु इंग्लिशांमध्यें कांहीं अकल्पित खटला उत्पन्न झाल्यामुळें तें प्रकरण तसेंच राहिलें. तो खटला उत्पन्न झाल्याचा विस्तार पुढचे भागीं लिहिण्यांत येईल.

सन सत्राशें पंचाहात्तरांपासून
एकुणऐशीं पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग तेविसावा.

## अनुक्रमणिका.

रघुनाथराव मुंबईसरकारापासून आपलें कार्य करून घेत होता. तें कलकत्ता याचे मुख्य साहेब आणि त्यांचे मंत्रदायक मध्यें पडल्यामुळें सिद्धीस गेलें नाहीं.

कलकत्याहून कोणी वकील साहेब पुरंदरास आला त्याचें व पुरंदरचे कारभारी लोक यांचें वागणें व त्या वकीलाशीं त्या कारभारी मंडळानें तह केला तो विस्तार.

हैदरअलीनें पेशव्याचा कांहीं मुलुख घेतला.

सदाशिवराव भाऊचें सोंग घेणारा सदोबा याच्या उत्कर्ष व पराभव आणि मृत्यु.

राजाराम राजा याचा मृत्यु व त्याचे जागीं त्रिंबकजी भोंसला याचा पुत्र शाहूमहाराज नामें करून स्थापिला.

कोल्हापुरकर व मुधोजी भोंसला यांचें कांहीं मार्गील वर्तमान.

पुण्यांत कारभारी लोकामध्यें वैमनस्य पडून दुफळी झाली.

मोरोबा फडनवीस याची मंडळी मुख्यता घेऊन रघोबास आणवून तो मुख्य करावा अशी मसलत ठरली.

नाना-

नानाफडनवीसानें आपला अर्थ साधावयासाठीं सकपट युक्ती केल्या तो प्रकार.

त्यावरून राघोबाविषयीं मोरोबाचें मन फिरून त्यास रघुनाथरावाविषयीं इंग्लीश बोलत असतांही त्याणें रायोबाचें अगत्य टाकिलें.

नाना फडनवीस व त्याची मंडळी श्रेष्ठता पावोन तो मोरोबा फडनवीस व त्याची मंडळी कैद केली.

फ्रेंचांचा वकील पुण्यांत येऊन प्रतिष्ठेनें वागला तो प्रकार.

त्यानिमित्तें कलकत्त्याहून सहा पलटणें लश्कर मुंबईस येऊं लागलें.

नंतर मुंबईसरकारांत मसलत ठरली कीं, रायोबास बळेंच पुण्यांमध्यें स्थापावा.

त्यावरून नानाफडनवीस याची तयारी.

इकडे मुंबईसरकारचे मंडळींत वैमनस्य पडल्यानें रायोबाचा कार्यास इंग्लिशांचें लश्कर विलंबें करून बोरघाटावर जमा झालें.

मग तेथून पुढें तळेगांवांजवळ मराठी लश्कराची गांठ पडली असतां त्या मुख्य साहेबांस कांहीं भय वाटोन, ते पुढें न जातां त्याहीं मागें हटावें असा नेम केला; त्यासंबंधें वडगांवांजवळ त्या इंग्लीश लोकांवर कांहीं अनर्थ पडला तो प्रकार.

बंगाल्याहून इंग्लिशांचें लश्कर मुंबईस येत होतें तो विस्तार.

महादजी शिंद्यानें रघुनाथरावाविषयीं काय काय वर्तणूक केली, त्या गोष्टीचें कथन.

त्या शिंद्यानें सखारामबापू, व चिंतोविठ्ठल, हे दोघे नाना फडनवीसाचा स्वाधीन केले.

ते त्यास अनिष्टकारक ह्मणोन त्याणें त्यांस बंदींत ठेविले असतां, त्या प्रतिबंधांतच ते उभयतां मृत्यु पावले.

## भाग तेविसावा.

सन सत्राशें च्यवऱ्याहात्तरांत विलायती सरकार आज्ञेनें बंगाल्याचा मुख्य साहेब व त्याचे मंत्रदायक मिळून, मुंबई व मद्रास हींदु मुलखांत इंग्लिशांचीं मुख्य स्थानें तेथील मुख्य व त्यांचे मंत्रदायक कसे कसे वागतात; ती चवकशी प्रथम करूं लागले. तेव्हां त्यांस असें समजलें कीं, मुंबईसरकारानें मराठे यांशीं संबंध करून कांहीं मुलुख संपादिला; त्यावरून त्याहीं त्यांस सांगितलें, कीं, तुह्मीं हें काम सरकारहुकुमाखेरीज केलें, त्यास तें लवकर टाकून द्या, आणि

अं

जें लष्कर मराठ्यांचा कुमकेस पाठविलें आहे तें माघारें आपल्या कंपनीचा मर्यादे मध्यें आणवा; आणि साष्टी व वसई मात्र आपल्याकडे ठेवा; आह्मी वकील पाठवून पुण्याचे गादीचा जो मुख्य असेल त्याशीं स्नेह करूं; राघोबा हत्याकरणारा तस्मात् तो अयोग्य असेल. त्यावर मुंबई सरकारानें आपण केलेल्या कृत्यास पुष्टिकारक अशीं अनेक प्रकारचीं साधनें बोलण्यांत आणिलीं. आणि राघोबाचा हातून हत्या घडली नाहीं, असें आह्मास पुर्तेपणें ठाउक आहेसें समजाविलें तरी कलकत्त्याचा मुख्य व त्याचे मंत्रदायक ऐकेनात. तेव्हां ते निरुपाय होऊन त्यांहीं किनिड साहेबास लिहिलें कीं, पत्र पावतांच युद्ध मनाकरावें आणि मार्ग चालू झाले ह्मणजे कंपनीचा मर्यादेंत सुर्तेजवळ लष्कर सुद्धां येऊन रहावें. यानंतर दिसेंबर महिन्यांत बंगाल्याहून आप्टन् साहेब नामें वकील पुरंदरास आला. त्याजबरोबर सरवाबापूला गवरनर जनरालाचें पत्र होतें; त्यांत लिहिलें कीं, आह्मीं विलायतेहून बादशाहापासून आपल्या कामावर मुख्यत्वें आलों. त्या आमचे आज्ञेवांचून मुंबई सरकारानें कोणाशीं तह किंवा युद्ध करूं नये; तें नसून त्यांहीं राघोबाचा पक्ष स्वीकारिला, ह्मणोन आह्मी तें सर्व मोडून तुमचा स्नेहाकरितां तुह्माकडे वकील पाठविला आहे. हें वर्तमान राघोबास कळलें परंतु असें होण्याचें कारण काय तें तो नसमजला; ह्मणोन त्यास आश्चर्य वाटलें. मग त्याचा मनांत आलें कीं, मीं जें इंग्लिशांस द्यावयाचें कबूल केलें तें त्यांस थोडकें असें वाटत असेल, याकरितां तो आणखी ही बहुत द्यावयास सिद्ध झाला.

इकडे पुरंदरीं कारभारीलोक हें गवर्नर जनराल याचें कृत्य आपणास फार उपयोगी असें जाणोन हर्ष पावले. आणि तो वकील त्यांशीं नम्रतेनें वागे त्यावरून त्यांस वाटलें कीं, इंग्लिश आह्माला भीतात. तेव्हां ते त्याशीं बहुत वर्चढपणा करून त्यास बोलूं लागले कीं, साष्टी वगैरे स्थानें लवकर आमचे स्वाधीन करा आणि राघोबाल्लाही आह्माकडे त्वरित पोंहचता करून द्या. याप्रमाणें केल्यावर आह्मी कृपाकरून तुमचा मुंबई सरकारास खर्चानिमित्त बारा लक्ष रुपये देऊं. या बोलण्यांतच त्यांस कांहींशी धमकीची गोष्टही दर्शिवली. त्यावरून त्या वकिलानें कलकत्त्यास लिहून पाठविलें कीं, आह्मी यांशीं नम्रतेनें वागतों, तेणेंकरून यांस वाटतें कीं, आपणास इंग्लिश भीतात. आणि साष्टी वगैरे स्थानें यांचा सनदा मागाव्या अशी मला आज्ञा होती, तें कांहीं घडत नाहीं; आणि याशीं स्नेह करणें तेंही शेवटास जात नाहीं. तें पत्र कलकत्त्यास पोंहचल्यावर पहिली मसलत फिरून असें ठरलें कीं आतां महत्प्रयासेंकरून राघोबाचा पक्ष स्वीकारावा. त्यावरून गवर्नर व जनराल आणि त्याचे मंत्रदायक यांणीं निजाम अल्ली आणि हैदर याचे द्वारें राघोबाल्ला अनु

कूलतेचें

कूळलेचें पत्र पाठविलें. आणि शिंदा व होळकर व मुधोजी भोसला यांस लिहिलें कीं तुह्मी रघुनाथरावास अनुकूळ असा हें कदाचित न झालें तर त्यास प्रतिकूळ न व्हावें. याखेरीज त्यांहीं कित्येक द्रव्य व कांहीं सेना मुंबईस जावयाकरितां सिद्ध केली; आणि मद्रासचे पलटणीलोकही मुंबईस जावे अशी आज्ञा झाली. हें वर्तमान ऐकून राघोबास मोठा अनंद झाला, परंतु याप्रमाणें सिद्धी न पावला. कांकीं पुरंदरचे कारभारीलोकही हें सर्व जाणून एकाएकीं नम्र होऊन ते इंग्लीशांहीं मागीतल्याप्रमाणें द्यावयास सिद्ध झाले. तेव्हां तो अपटनसाहेब वकील तोकलकत्याचे आज्ञेची वाट न पाहातां तह करिता झाला त्यांत असें ठरलें कीं, सार्ष्टी इंग्लीशांहीं घेतली आहे ती त्यांकडेसच असावी. आणि भडोंच शहरचा पेशव्याचा जो भाग असेल तोच त्या शहराचे असमंतात् तीन लक्षांचें उत्पन्न होयसा मुलुख इंग्लीशांस द्यावा. याशिवाय बारालक्ष रुपये द्यावे. आणि फत्तेशिंगानें इंग्लीशांस दिलेला मुलुख तो आपल्या गाइकवाडाचा स्वता नाहीं असें ठरलें तर इंग्लीशांहीं तो मुलुख पेशव्यास द्यावा; आणखी राघोबाशीं मुंबईसरकाराचा तह झाला आहे तो इतःपर नसावा; या तहास रघुनाथराव अनुकूळ झाल्यावर त्याणें महिना पंचवीसहजार रुपये खर्चास घेऊन गोदातीरीं कोपरगांवीं रहावें, त्याजवळ एक हजार स्वार शोभार्थ असावे.

याप्रकारें तह ठरल्यावर मुंबईसरकारास बहुत विषम वाटलें; कांकीं ते मराठीलोकांचे माहितगार झाले असतां, त्यांस न विचारितां बंगालेकर सरकारानें ठराव केला तो मराठ्यांस फार हितकारक होईल.

तें तहाचें वर्तमान ऐकून राघोबाचें बोलणें पडलें कीं या तहास अनुकूळ व्हावें त्यापेक्षां मला कोणी दुसरा सहाय नसतां हीमी एकटाच युद्ध करीन. परंतु त्यास कोणी मराठा अंतःकरणपूर्वक सहाय मिळेना, आणि कलकत्याची मसलत झालेली पुनः न फिरेल असें समजून त्याणें आपल्या सेनेस रजा देऊन दोनशें माणसांनशीं तो रघुनाथराव सुरतेंत, इंग्लीशांच्या आश्रयानें राहिला. त्यावेळेस कोणी सदोबानामें ब्राह्मण होता, त्याणें पानपतची लढाई झाल्यावर आठां नवा वर्षांनी आपण सदाशीवराव चिमणाजी असें सोंग केलें; त्यावेळेस माधवरावानें त्याची चवकशी करून तो खोटासा ठरविला; आणि त्यास बंदींत घातला होता. तो एके ठिकाणीं ठेवीत नसत. त्याचें स्थानांतर करतां करतां, तेवेळेस तो रत्नागिरीस ठेविला. तेव्हां तेथचा सुभेदार रामचंद्रनाईक परांजपेनामें होता त्याणें पुण्यांतील अव्यवस्था जाणून, त्यास मुक्त केला तर आपणास मो-

ठा

ठा लाभ होईल असें समजून त्यास सोडिला. आणि लोकांस विदित केलें कीं, सदाशिवराव भाऊ हा खरा असतां, कारभारी लोकांनीं यावर जुलुम करून उगाच याचा प्रतिबंध केला, ही गोष्ट लोकांस सत्य वाटोन त्याजवळ वीस हजार फौज जमा होऊन त्याणें कोंकणांतील वीस बेवीस किल्ले घेतले असें झालें असतां मुंबईचा सरकारास तो खरा वाटला मग त्यांहीं त्याजकडे वकील पाठवून त्याचा मोठा संमान केला. शेवटीं तो सदोबा आपल्या सैन्यासुद्धां बोरघाटानें वर चढून त्याणें राजमाचीचा किल्ला हस्तगत केला. तेव्हां तो त्या राजमाचीस असतां, पुरंदरचा कारभारी लोकांहीं तो तेथें कांहींसा ठरावया करितां मुलथापीनें तहाचें बोलणें लाविलें; आणि त्यास नकळतां शिंद्याचा सरदार रामजी पाटील नामें व भिवराव पानशा यांस लश्कर सुद्धां राजमाचीस पाठवून एकाएकीं त्याजवर हल्ला करविला. तेसमयीं त्याचें लोक व तो भयभीत होऊन कोंकणांत पळाले; त्यांतून कित्येकानीं सार्ष्टीचे ठाण्याचा भिंतींचा आश्रय केला, आणि तो मुंबईस गेला, परंतु तेथें मुख्य साहेब नव्हता म्हणोन तो बोलिला कीं, एव्हां आम्हीं कुलाब्यास जातों मग मुख्य साहेब आल्यावर पुनः येऊं. असें म्हणोन तो कुलाब्यास गेला. तेथें रघुजी आंग्र्या होता त्याणें त्यासदोबास कैद करून पुण्यास पाठविला; तेथें त्यास हत्तीचे पायीं देऊन मारिला.+

इकडे मुंबई सरकारानें त्या सदोबाचा संमान केला आणि रघोबा सनसत्राशें शाहात्तरांत नवेंबराचे अकराव्ये तारिखेस सुर्तेहून मुंबईस आला; त्यास इंग्लिशांहीं दरमहा दहा हजार रुपये खर्चास देऊन आपल्या आश्रयांत ठेविला. त्यावरून पुरंदरचा कारभारी मंडळीनें बंगाल्याचा मुख्य गवरनर जनराल व त्याचे मंत्रदायक साहेब यांस शब्द लावून लिहिलें कीं, तुमचा व आमचा तह असतां, मुंबै सरकारानें याप्रमाणें कृत्रिम केलें. त्यावरून मुंबई सरकारही त्या कारभारी लोकांस शब्द लावी कीं, तुम्हीं आम्हास जो तीन लक्षांचा मुलुख दिला त्याचें उत्पन्न आतां तसें होत नाहीं असा वाद कित्येक वेळ होत राहिला.

फत्तेशिंग गाइकवाड तो आपणास पेशव्याचा ताबेदार म्हणवीत असे परंतु पेशव्याचे कारभारी लोक इच्छित होते कीं, आपल्या आज्ञेवांचून कोणाशीं युद्ध किंवा तह करणार नाहीं, व मुलुखही आज्ञेवांचून कोणास देणार नाहीं असें गाइ-

+ मारिला तो ब्राह्मण होता, यास्तव पुण्यांतील ब्राह्मण आपल्याकडे ब्रह्महत्येचा दोष नयावा म्हणून कोणी म्हणत कीं, तो सोनार होता. कोणी म्हणत कीं, तो ब्राह्मण होता, यास्तव तो हत्तीचा पायीं दिला नाहीं परंतु त्या अन्यायाची शिक्षा लोकांत दाखवायासाठीं आमेदनगरचा किल्ल्यांत त्यास पाठवून तेथें कोणि एक सोनार महत् अपराधी होता, त्यास जिवें मारावें अशी आज्ञा झाली असे, त्याला त्या सदोबाबद्दल उपोषणादि दुःख देऊन मारिला. आणि तो सदोबा सोडिला.

कवाड यापासून लिहून घ्यावें; याप्रमाणें त्यांचा मनांतील अर्थ जाणोन फत्तेशिंग याणें पेशवे यांचा धनीपणा मानिला, परंतु युद्ध करणें किंवा मुलुख देणें या कामास मला दुसऱ्याचे आज्ञेची गरज नाहीं असें बोलोन त्याणें इंग्लिशांस मुलुख दिला होता तो माघारा इंग्लिशांजवळ मागीतला. तें मागणें त्या कारभारी मंडळीचा मस्लतीनेंच झालें असा अर्थ नाहीं; कांकिं, राघोबानें गाइकवाडास मुलुख देऊं केला होता तो त्याप्रमाणें त्यास प्राप्त न झाला ह्मणोन त्याणें इंग्लिशांस आपला दिलेला मुलुख माघारा मागीतला.

इकडे पुरंदरचा कारभारी लोकांहीं तो सदाशिवराव भाऊचें सोंग करणार याचें पारिपत्य केल्यावर कोंकणांत फौज पाठवून त्यासदोबानें घेतलेले किल्ले सर्व हस्तगत केले.

यानंतर सन सत्राशें सत्त्याहात्तरांत पर्जन्यकाळ गेल्यावर हरिपंत फडका फौज घेऊन हैदराशीं युद्ध करावयास कर्नाटकांत गेला, परंतु तदनुसार लाभ न पावला; त्यावेळेस त्या हरिपंताचा लश्करांतील मानाजी फांकडा नामें सरदार व कित्येक मराठे मानकरी लोक त्या हैदरअल्लीनें फितविले होते; तें समजून हरिपंत फडका तेथून माघारा लवकर निघूं लागला, नंतर त्या लोकांतलाच एक ससवाडचा देशमुख यशवंतराव नामें फितुरी होता त्यास हरिपंतानें तोफेचा तोंडीं दिला त्यावरून तो दंगा शांत झाला. त्याच वर्षीं सातार्‍यांत रामराजा फार वृद्ध झालेला होता तो दिसेंबराचे बाराव्ये तारिखेस मृत्यु पावला. त्याच सुमारें भवानराव प्रतिनिधीही मरण पावला; त्याचे जागीं परशुराम श्रीनिवास नामें त्याचा पुत्र स्थापिला; त्यापूर्वीं सन सत्राशें साठांत कोल्हापुरचा राजा संभाजी तो दिसेंबर महिन्यांत मरण पावला होता. त्यानंतर दोन वर्षांहीं त्या राजाची स्त्री जिजाबाई तिणें इंदापुर परगण्यांतील खानवत गांवचा पाटील शाहाजी भोंसला याचा पुत्र दत्तक घेऊन, तो गादीचा धणी करून, तो कारभार आपण चालवूं लागली. तेव्हां त्या राज्यांत पूर्वीचा रीतीस फार अंतर पडूं लागलें. तें असें तिणें पेशव्याचा राज्यास उपद्रव दिला, आणि निजामाशीं कांहीं संबंध ठेविला; तेणें करून माधवराव बळवंत त्यावेळेचा पेशवा त्यास राग येऊन त्या कोल्हापुरकरांचा कित्येक मुलुख घेऊन आपले सोईरे पटवर्धन यांचे जाहागिरीकडे लाविला. याशिवाय तिणें समुद्रांत चांचेपणा केला ह्मणोन इंग्लिशांहीं तिचा मालवण किल्ला व सावंतवाडी संबंधें रेडी किल्ला घेतला.

वराडांतील वर्तमान असें, सन सत्राशें पंचाहात्तरांत साबाजी भोंसला व मुधोजी भोंसला या दोघांचें युद्ध होऊन त्यांत साबाजीचा जय झाला त्याचा लोकानीं मुधोजीस वेढून धरिला आणि कैद करीत होते, इतक्यांत साबाजी त्या

जयाच्या आनंदांत आपल्या हर्नी मुधोजीच्या हर्नी जवळ नेऊन बोलिला किं आतां कशास लढतां असें ह्मणत असतां त्या मुधोजीनें त्यास किमपि उत्तर नदेतां जवळचा पिस्तुलाच्या गोळीनें त्यास मारून टाकिलें मग तो मुधोजी आपला पुत्र रघुजि भोंसला याचा रक्षक होऊन कारभार चालवूं लागला.

इकडे बडोद्यांत फतेसिंग गाइकवाड याणें पेशवे सरकारास पांच लाख रुपये नजर व खंडणी बाकी ऐवज साडे दहा लक्ष रुपये नानाफडनवीस व सखाराम बापू यांस दरबार खर्च एक लक्ष रुपये देऊन आपलें सेनाखासखेल पद पावला.

इकडे राजाराम मृत्यु पावल्याचे कांहीं सें पूर्वी त्याचा वृद्धपणा ह्मणून वावीगांवचा पाटील त्रिंबकजी राजा भोंसला तो मालोजीचा भाऊ विठोजी भोंसला याचा वंश्य.

त्याचा पुत्र राजारामास दत्तक दिला, तो विठोजी तो शहाजीचा काका, त्या शहाजीचा पुत्र शिवाजी महाराज राजारामाचा दत्तकाचें नाव शाहू महाराज ठेविलें.

सन सत्राशें अठ्याहत्तरांत पुण्यामध्यें कारभारी लोकांत वैमनस्य पडलें तें उत्तरोत्तर वृद्धिंगत झालें तो प्रकार असा, नानाफडनवीस तो आपला चुलत भाऊ मोरोबा फडनवीस याचे बुद्धीस तुछ मानून द्वेष करीत होता. त्या मोरोबास राघोबाचे पक्षी जे मानीत होते त्यांत मुख्य बजाबा पुरंदरे व सखाराम हरी व चिंतो विठल व विष्णू नरहर याहीं मिळून तुकोजी होळकर आपल्याकडे घेतला असे. आणि मोरोबा फडनवीस व सखाराम बापू यांशीं मसलत होऊन पुनः राघोबास स्थापावा असें ठरलें परंतु त्याचे पूर्व वर्षी माधवरावनारायणाची माता गंगाबाई मरण पावली तेव्हां पासून मोरोबा विषयीं कांहीं मनांत शंका उत्पन्न झाल्या मुळें सखाराम बापू त्या कामांत पुर्तेपणें शिरेना, ही गोष्ट यावरून समजते कींकीं जा वेळेस मोरोबानें हें वर्तमान मुंबई सरकारास विदित केलें त्यावरून ते इंग्लीशही अनुकूळ होऊन सखाराम बापू पुरंदरचा तहकरणास मुख्य त्याची अनुकूळता या कामास पाहिजे असा आक्षेप त्यांहीं धरिला, तेव्हां तो तसें पत्र देईना. यास्तव तें सिद्धीस गेलें नाहीं. यावरून नानाफडनवीस याणें मनांत आणिलें कीं मोरोबास धरून कैद करावा परंतु तो त्याचा मतलब मोरोबास कळला तेव्हां तो पुण्याहून पळून गेला तेव्हां नानाफडनवीस समजला कीं हें कृत्य ना एव्हांच केलें हें ठीक झालें नाहीं, नंतर सखाराम बापूचा द्वारें युक्तीनें तो माघारा यावयास कारभारी मंडळी नवीच होणार त्यांत मोरोबा व बजाबा पुरंदऱ्या हे असावे असा आकार घातला,

तेव्हां

तेव्हां मोरोबा वश होऊन पुण्यास माघारा आला; परंतु बजाबा पुरंदऱ्या नानाच्या कृत्यास विश्वासेना, आणि सखाराम हरी मोठ्या धैर्यानें स्पष्ट बोलिला कीं मोठा शूर आणि प्रमाणिक व भोळा असा जो रघुनाथराव त्याचा पक्ष सोडून मी कदापि कृत्रिमी व भित्रा असा जो नाना फडनवीस याचा पक्ष धरणार नाहीं.

या पुढें मोरोबाचे पक्षपाती जितके होते त्यांवर नाना फडनविसाची शक्ति होळकराचा बळा पुढें चालेनाशी झाली. म्हणून तो पुरंदरास निघोन गेला मग थोडक्याच दिवसानीं त्या मोरोबास त्याणें असें दर्शविलें कीं जर मला अभय असेल तर मिही रघुनाथरावास अनुकूळ आहें. इतकें करून त्याणें सखाराम बापूच्या व मोरोबाच्या बद्धल मान रक्षून त्यांची प्रसन्नता संपादिली. त्यानंतर पुण्यांत पुनः विचार होऊं लागला कीं रघुनाथरावास त्या पदावर स्थापावा किंवा न स्थापावा. असें असतां तो मोरोबा आपल्या भोळेपणानें समजला कीं आतां मि मुख्य झालो आणि त्यास नाना फडनवीस वारंवार समजाऊं लागला कीं रघुनाथरावाचें आचरण नीट नाहीं आणि तो पदारूढ असतां त्याणें बहुत द्रव्य व्यर्थ खर्चिलें. त्यावरून त्याचा मनांत आलें कीं आतां रघुनाथरावाचें महत्व झालें असतां माझी योग्यता उतरेल. म्हणून त्यास रघुनाथरावाविषयीं इंग्लीश बोलिले असतांही त्यास तो आळस करूं लागला आणि त्याचे मनांत तें कार्य शेवटास जावेंसें नव्हतें. त्यावरून इंग्लीश यांणींही ती गोष्ट सोडिली.

यानंतर नाना फडनवीस मोठ्या आर्जवें करून त्या कारभारी मंडळीची सुप्रसन्नता राखीत असतां त्याचे पक्षी महादजी शिंदे व हरिपंत फडके हे फौजे सुध्धां कर्नाटकीं हैदरअलीशीं युद्ध उरकून मिरजेस दोघे एकत्र मिळून तेथून पुढें निरनिराळे निघून पुरंदरास जूनमहिन्याचे आठवे तारिखेस उभयतां येऊन पोंहचले. तेव्हां नाना फडनवीस आपली मुख्यता पूर्वीच्या प्रमाणें साधूं लागला आणि मुख्य मुख्य स्थानीं आपलीं ठाणीं बसऊन शिंद्याचे द्वारें होळकरास रघुनाथरावाचा पक्ष नाहींसा केला. त्यावरून मोरोबा फडनवीस मात्र त्यांत आपणास इंग्लीश सहाय व्हावया विषयीं उद्युक्त झाला परंतु तें कार्य सिध्धीस जाईल असा अवकाश नव्हता; कांकीं जून महिन्याचे अकरावे तारिखेस महादजी शिंद्याच्या स्वारांची एक टोळी येऊन अकस्मात त्या मोरोबास धरून नानाजवळ नेला. त्याणें त्यास आमेदनगराचा किल्यांत बंदीस घातला; ते समयीं त्याचे पक्षपातीही सांपडले ते कैद केले. सखाराम बापूनें इंग्लीशांशीं पुरंदरचा तह केला त्यास प्रतिबंध केला तर तो तह रहाणार नाहीं म्हणून तो तसा-

च

तसाच मोकळा ठेविला. त्यासमयीं सखाराम हरी तो राघोबाचा मोठा अभिमानी आणि विश्वासू असा सेवक होता, यास्तव त्याचे पायांत अशी जड बिडी घातली कीं, तो पुरुष बलाढ्य असतांही, त्याला तीं उचलेनाशी होती. आणि त्याचे खाण्यापीण्यांत असे हाल केले कीं, चौदा महिन्यांत त्याला उठावयाची शक्ति राहिली नाहीं. तरी तो आपल्या स्वामीचा अभिमानें करून बोलत असे कीं, माझें बळ गेलें आणि प्राणही लवकरच जातील. परंतु मी मेल्यावर माझी निर्मास हाडेंही, रघुनाथरावाचा कल्याणाचे शब्द करीत रहातील.

या प्रकारें नानाफडनवीस आपल्या कुटिल युक्तींनीं त्या कारभारी मंडळींत आपली श्रेष्ठता पावला असतां; तो मनांत आणूं लागला कीं, अशाच छत्रिमानें इंग्लीशही ठकतील. आणि त्यापूर्वीं सन सत्राशें सत्त्याहात्तरांत कोणी एक फ्रेंच वकिलाचा वेषेंकरून पुण्यांत आला होता, त्या लोकांशीं व इंग्लिशांशीं हिंदुस्थानचे राज्याविषयीं परस्परें फार स्पर्द्धा पुरातन आहे, असें त्या नाना फडनविसास ठाउक होतें; त्यावरून त्याणें युक्ती कल्पिली कीं, आपण फ्रेंच लोक हातीं धरिले असें इंग्लिशांस भय दाखवून कांहींएक प्रकारें ते वश करावे, म्हणोन त्यादिवसापासून तो त्या फ्रेंचांचा बहुमान रक्षिता झाला; आणि त्यापूर्वीं पुरंदरचा तहासंबंधें कांहीं खटलें पडलें तेंही तसेंच होतें असें असतां, तो नाना फडनवीस व शिंदे व होळकर यांस कलकत्त्याहून इंग्लिशांचें लिहिलें आलें कीं, आमचें व फ्रेंच लोकांचें विलायतेमध्यें युद्ध असतां, ते लोक सांप्रत तुमचा राज्यांत संमानानें वागतात; त्यास ते कदाचित् आमचा मुंबई सरकारास प्रतिपंथी होतील: याविषयीं आमचीं पलटणें खुसकीचा मार्गानें कलकत्त्याहून मुंबईस येतील त्यांस तुमचा अडथळा नहोईशी सनद द्या. त्या गोष्टीस शिंदे व होळकर तात्काळ मान्य झाले; परंतु नाना फडनविसास असा विचार पडला. कीं, जर हें मीं मान्य करीन तर ते लोक इकडे येऊन प्रबळ होतील. आणि जर मान्य न करावें तर ते युद्धास सिद्ध असतील. तस्मात् आपण त्या इंग्लिशांस भयप्रदर्शनार्थ फ्रेंच लोकांची प्रतिष्ठा वाढविली: तो उद्योग बहुत न होता तर बरें असतें. आतां यांत फसलों असें दिसतें; इतका विचार करून तोही निरुपाय होऊन वश झाला; परंतु त्याचे सरदार बुंदेलखंडांत होते त्यांस गुप्तपणें लिहिलें कीं, माझें अंग न दर्शवितां, होईल तितका इंग्लिशांस अडथळा करावा. यानंतर मुंबई सरकार याणींही त्या कारभारी मंडळीस स्पष्ट सांगीतलें कीं, जे तुम्हीं

---

+ तो सखाराम हरी जातीचा परभू होता; त्याशिवाय त्या जातीचे कित्येक पुरुष परम अभिमानें करून मराठ्यांची चाकरी करीत आले; असें मराठ्यांचा बखरीवरून विदित होतें.

नंत

नवे कारभारी आहांत. ते पुरंदरचा तह झाला आहे त्याप्रमाणें मान्य आहांत कीं नाहीं तें उत्तर द्या. व त्यांपैकीं कांहीं अंश राहिला तो आमचा आम्हास प्राप्त होण्यास विलंब नसावा. आणि तुम्हीं पुण्यांत फेंच लोकांचा वकील ठेविला यावरून तुमचा चित्तांत काय आहे तें आम्हास समजत नाहीं त्यास पुढें कर्तव्य काय असेल तें आम्हाला कळविलें पाहिजे. त्यावरून नाना फडनविसानें पुण्यांत लुबीन नामें फेंचांचा वकील होता, त्यास निघोन जावयाची आज्ञा दिली. परंतु त्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर विलंबानें कुटिल मार्गाचें आणि अस्पष्ट केलें; त्यावरून मुंबईस ठरलें कीं, हे पुरंदरचा तहाला मान्य नाहींत. त्यापेक्षां यांबरोबर युद्ध करावें.

असें झाल्यावर नाना फडनवीस समजला कीं, हा मजवर मोठा अनर्थ येऊन पडेल; यास्तव कांहीं महत उपाय केला पाहिजे. म्हणोन त्याणें मुंबईमध्यें या प्रकरणीं युद्धाची गोष्ट मात्र निघाली तोंच कांहीं एक युक्ती करून कालक्षेपार्थ कोणी एक वकील मुंबईस पाठविला; आणि मुलखीं मुलखींचा शिलेदारांहीं दसऱ्यास पुण्यावर येऊन मिळावें अशी आज्ञा केली. याशिवाय कोंकणांत जेथें जेथें त्याचीं जहाजें होतीं, तेथें तेथें त्या जहाजांवर धान्यादि साहित्यें भरून युद्धाची सिद्धता करविली. याप्रमाणें नाना फडनविसाची तयारी होत असतां, मुंबईमध्यें त्या युद्धास जावयाची गोष्ट मात्र निघोन तयारीस विलंब लागला. याचें कारण असें कीं, तेथचे मुख्य व त्यांचे मंत्रदायक, यांचा विचार एकचित्त होईना. मग असें ठरलें कीं, रघुनाथरावाबरोबर कांहीं फौज देऊन त्यास पुण्यांत पाठवून तो माधवराव नारायणाचा मुख्य रक्षक करून, स्थापावा. ही गोष्ट सिद्धीस न्यावयाकरितां त्याबरोबर सेना दिली तिचा सरदार व दोघे तिकाईत साहेब त्या कामास नेमून तो अर्थ शेवटास जावा सा केला. त्या फौजेंत सहाशें सुमारें गोरे लोक व दोन हजार दोनशें पलटणी लोक तोफखान्यासहित होते; ते त्या राघोबाबरोबर निघोन, दिसेंबराचे तेविसाव्ये तारखेस बोरघाटावर सारे जाऊन एके जागीं मिळाले, त्यांत पलटणी सरदार साहेब व ते दोघे तिकाईत साहेब यांचें कांहीं वैमनस्य पडलें आणि तो पलटणी साहेब हिंदूंशीं युद्ध करण्याविषयीं माहित नव्हता; म्हणोन त्यास खंडाळ्यापासून कारल्यापर्यंत आतानां, शत्रूची फारशी अडचण नसतांही आठ दिवस लागले. तेथून पुढें तळेगांवांवर पोंहचले तेव्हां जोंत महादजी शिंदे व हरिपंत फडके मुख्य असें मराठे यांचें मोठें लष्कर त्याची गांठ पडली. तें सैन्य सुमारें पन्नास हजार होतें, तेसमयीं प्रथम मराठे याहीं युद्ध करणार असें दर्शविलें; परंतु इंग्लीश आपल्या बंदोबस्तानें त्यांवर चालून जात असतां,

ते

ते समूर उभे राहिनात से झाले. नंतर तेतळे गांवाजवळ आऊन पोंहचतांत तों तोच गांव उजाड झालेला होता; आणि त्यांस दुसरें वर्तमान कळलें कीं या गांवाप्रमाणेंच चिंचवड व पुणें ओस पाडावयाविषयीं नानाची आज्ञा आहे. त्यावरून मराठे फार निकरानें लढतील, अशी अटकळ करून ते साहेब माघारें मुंबईस जावयास सिद्ध झाले. इतकें होईतोंपर्यंत लहान लहान युद्धें कोणी पारंग व पनकी लोक यांशीं झालीं त्यांत इंग्लीश जय पावले आणि त्यांचे जवळ अठरा दिवस पुरेशी सामग्री होती असरही राघोबा व ते पलटणांतले कित्येक सरदार यांचा मनास तों माघारें जावयाची मसलत येईना. असें असतां ते तसेच पुढें आऊन जर तात्काळ पुणें घेते तर तें कार्य सहज झालें असतें, परंतु तें न करितां तेच रात्रीं इंग्लीश आपलें मोठ्या तोफा वगैरे जड सामान तेथच्या तळ्यांत बुडवून डेरे पाडून मागें फिरले. तेव्हां त्यांस वाटलें कीं आम्हीं शत्रूस नकळतां एक मजल पार होऊं. परंतु मध्यरात्री नंतर दोन अडीच घटिकांनीं त्यांचा पिछास शत्रूचा मार होऊं लागला; आणि त्यावेळेस त्यांचें कांहीं सामान लुटलें गेलें. मग थोडक्याशा वेळानें त्यांचा पाठी मागची दोन तोफांसहित पलटणी सहाशें काळ्या लोकांची एक टोळी होती. तीवर शत्रूनें हल्ला केला असतांही तें लष्कर शत्रूशीं लढतां लढतां उजेड त्यावर पुढें चालतें झालें. तेसमयीं त्यांचा दृष्टीस पडलें कीं आपल्या सभोंवतीं शत्रूचा स्वारांची मोठी दाटी झाली आहे. आणि ते आपणावर हल्ला करणार आहेत असें समजून तो हल्ला आपणावर घ्यावयास बंदोबस्तानें उभे राहिले. त्यावेळेस मराठे लोक यांणीं जहाजहाना पासून चाल पडल्याप्रमाणें त्यांचा समूर न लढतां त्यांवर मागून हल्ला केला. तेव्हां ते मागचे शिपाई लोक सर्वकाळे होते. त्यांचा मुख्य साहेब हार्तलि नामें युद्ध निपुण होता त्याची आज्ञा वारंवार मानून ते मोठ्या स्थिरतेनें तेथेंच असून त्यांहीं तो शत्रूचा स्वारहीं हल्ला केलेला व्यर्थ केला; आणि त्यांस पिटून त्यांचे पाठीमागें जावें, अशी आज्ञा ते पलटनी लोक मागत होते. मग सूर्योदयाचे समयीं, मराठ्याचें पायदळ आणि स्वार मिळून पुनः मागच्या टोळीवर चाल केली. आणि मोठ मोठ्या तोफा आणून त्या लष्कराच्या थोरल्या भागावर मार टाकिते झाले. तेव्हां इंग्लीश यांणीं ही आपल्या तोफा सुरू केल्या; आणि मागचे टोळीस कुमक चारशें सुमारें गोरे लोक व दोनशें काळे लोक पाठविले. ते त्यांस मिळून मग त्या मागल्या टोळीच्या लोकांहीं दोन प्रहर पर्यंत आपणावर मराठे फार निकरानें हल्ला करित होते तो निष्फळ केला. तेव्हां मराठे यांचा बंदोबस्तांत कांहींसें शिथिल पडलें; अशी संधी पाहून ते लोक आपल्या थोरल्या भागास जाऊन

आश्रय

आश्रय पावले. ते समयीं ते थोरल्या भागाचे लोक वडगांवांत ठाणें धरून मराठ्यांशीं तोफांनीं लढत होते; ते त्या गांवांत शिरल्यावेळेस त्यांचें बुणगें त्या पलटणाचे टोळींत शिरलें. त्या योगें त्यांच्या बंदोबस्ताची कांहींशी न्यूनता झाली ती संधि पाहून, मराठ्यांहीं त्यावेळेस मोठा हल्ला करून त्यांच्या कांहींसा नाश केला; मग तिसरे प्रहरीं मराठ्यांहीं युद्ध बंद करून सोडिलें. त्या संधींत साहेब लोक समजले कीं आह्मीं एथ पर्यंत आपलें सर्व संभाळून आणिलें; आतां या पुढें नीट संभाळून जाणें होणार नाहीं. ह्मणून त्यांहीं तहाचें बोलणें करावया साठीं मराठ्यांकडे वकील पाठविला. आणि राघोबानेंही आपल्या विषयीं शिंद्याशीं तहाचें बोलणें लाविलें. त्यांत इंग्लीशांहीं कबूल केलें कीं सन सत्राशें व्याहत्तरांपासून जो हिंदूंचा मुलुख घेतला आहे तो माघारा द्यावा. व कलकत्त्याहून लष्कर मुंबईस येतें आहे तें माघारें फिरवावें. आणि राघोबा तर स्वमनेंच शिंद्याच्या स्वाधीन झाला. या शिवाय इंग्लीशांहीं आपला भडोज शहरचा भाग शिंद्यास द्यावा. आणि त्या शिंद्याचे कारभारी लोक यांस एकेचाळीस हजार रुपये दरबार खर्च द्यावा. असा करार झाल्यावर मराठ्यांहीं त्या इंग्लीशांस जाऊं दिले.

बंगाल्याहून लष्कर निघून मुंबईस येत होतें तें मे महिन्यांत यमुना पार उतरलें. त्यांस आज्ञा होती कीं वाटेनें निट मुंबईस जावें. परंतु मराठ्यांच्या सरदारांहीं वाटेंतच त्यांनीं अडविलें त्यावरून त्यांचा पारिपत्या करितां त्या लष्करास विलंब लागला. ते समयीं त्या लष्करी लोकांहीं मराठ्यांशीं युद्ध करून काल्पीचा किल्ला घेतला, आणि बुंदेलखंडच्या रजपूतांशीं लढतानांहीं, कांहीं उशीर लागला. त्यावरून कलकत्त्याच्या मुख्य साहेबास राग येऊन त्या लष्करच्या मुख्य सरदार साहेब यास माघारें बोलाऊन करनेल गाडड नामें साहेब त्या कामावर नेमिला. तो त्या लष्करांत जाऊन पोहचतांच तेथून पुढें सुरतेस चालता झाला त्यास वाटेनें कोणी मराठ्या सरदारांहीं उपद्रव केला असतां तो त्यांस जिंकून पुढें जाऊन नर्मदा पार उतरला. नंतर त्याणें मुधोजी भोंसल्याशीं कांहीं तहाचें बोलणें करावया साठीं कांहीं दिवस तेथें मुकाम केला. तो तह कलकत्त्याचे साहेब याणीं मुधोजी भोंसला आपणास वश होऊन त्याणें पेशव्याचा पक्ष सोडावा या आशेनें केला. आणि मुधोजीही तदनुरूप वागणार होता परंतु पुण्यांतील तयारीचें वर्तमान ऐकून तें घडलें नाहीं. मग तो गाडड साहेब नर्मदा सोडून फेब्रुआरीचे सहाव्ये तारिखेस बऱ्हाणपुरावरू-

न

न सुरतेस जाऊन पोंहचला; तेव्हां त्याशीं मार्गांत मराठे सरदार जसे प्रतिपक्षी पणें वागत होते तसा न वागतां भोपाळचा नवाबानें त्या इंग्लिशांचा मोठा संमान करून पुढें मराठ्यांचा राग आपणावर होईल असें नमानितां त्याणें इंग्लिशांस जोजो पदार्थ पाहिजे तोतो आपल्या शक्तीप्रमाणें अनुकूळ करून त्यांशीं स्नेह ठेविला. त्या स्नेहास्तव इंग्लिशांनींही त्यास अभय केला, तो लाभ अद्यापि त्याचे वंश्य अनुभवितात.

महादजी शिंदा तो नानाफडनविसाचा पक्षपाती असून त्याचा मनांत होतें कीं, आपण नानाचा हातारवालचा वागणारा असें नव्हावें; किंबहुना स्वतंत्रपणें त्यापेक्षां आपली श्रेष्ठता असावी; म्हणोन त्याणें रघुनाथरावास हातीं धरिला, आणि त्यास खर्चासाठीं बुंदलखंडीं बारा लक्षांची जहागीर नेमिली. आणि त्या राघोबास सांगीतलें कीं, हें तुम्हास अविछिन्न पोंहचेल; न पोंहचल्यास मी देईन. आणि नानाजवळ बोलिला कीं, हा रघुनाथराव कांहीं अनर्थ उत्पन्न करील तर त्याचा जापसाल मला पुसावा. असा तो उभयपक्षीं आपण मध्यस्त झाला. त्याचा मतलब असा होता कीं, नानाफडनवीस याचा उत्कर्ष नसावा; आणि त्याशीं व इंग्लिशांशीं विरोध असला तर नानाफडनवीस यास वारंवार आमची गरज लागोन आपली श्रेष्ठता राहील, यास्तव त्याणें इंग्लिशांशीं द्वेष पडावयासाठीं कांहीं मस्लत देऊन, नानाफडनविसाकडून त्या इंग्लिशांचा किल्ला बाणकोट याजवर हल्ला करविला.

याशिवाय राघोबा बुंदलखंडांत आपली जहागीर घ्यावयास पाठविला तेवेळेस त्याचे बरोबरचे जे लोक होते ते, तोफखाना वगैरे सरंजाम सुध्धां त्यास मागमें जाऊं दिले. आणि त्या रघुनाथरावाचा चवकशीस जे आपले लोक त्याबरोबर पाठविले ते, त्याचा लोकांपेक्षां कांहींसे अधिक होते. तो राघोबा तिकडे जात असतां नर्मदेसमीप पोंहचला तेव्हां त्यास कोणी समजाविलें कीं, तुम्हास झांशीचा किल्ल्यामध्यें शिंदा बंदीस घालणार आहे. त्यावरून रघुनाथरावानें आपल्याबरोबर चवकशी करितां जे शिंद्यानें पाठविलेले लोक होते त्यांवर चोळीमहेश्वरीं नदी उतरते समयीं एका एकीं हल्ला करून त्यास पळविले. आणि आपण मोठ्या त्वरेनें भडोंजेस जाऊन इंग्लीशांचा आश्रय केला. या सर्व प्रकाराचा विचार पाहिला असतां, असें दिसतें कीं शिंद्यानें राघोबास बंदीस घालण्याचें भय आपणाच दाखविलें असेल. कां कीं तें सत्य मानून त्याणें पळून जावें. आणि इंग्लीशांचा आश्रयास रहावें तेणेंकरून इंग्लीश व नानाफडनवीस यांमध्यें पक्का विरोध उत्पन्न होऊन, आपली श्रेष्ठता सुदृढ व्हावी. याच अर्थे त्याणें राघोबा बरोबर चवक-

शीस

शास लोक थोडे पाठविले. असा राघोबा पळून आण्यास अणीक एक मसलत असेल ती अशीकीं समयविशेषीं आपणास इंग्लिशांची प्रसन्नता संपादन करण्याचें कारण पडल्यास हें कृत्य उपयोगास येईल; हा एक अर्थ दिसतो. कांकीं त्यापूर्वीं त्याणें कित्येक वेळा साहेबलोकां पाशीं भाषण प्रसंगीं तुमची व आमची मैत्री असावी असें दर्शविलें. त्यांपैकीं एक गोष्ट अशी आहे कीं वडगांवच्या तहानंतर कोणे एके समयीं तीघेच वघे साहेब व तो महादजी शिंदा बोलत बसले असतां, त्यासमेत महादजी शिंदा इंग्लिशांचा लष्करें मागल्ये टोळीशीं पूर्वीं लढले त्याचें स्मरण करून स्फूर्तिपूर्वक बोलिला कीं धन्य तुमची युद्ध शिक्षा. जो मी एकदा लढणारा त्या माझे पुढें तुमचे पलटनीलोक, एक सारिखे तोबड्या भिंती प्रमाणें मला दिसत; ती भिंत एखादे जागीं तुटली असतां तात्काळ पुनः बांधली जाई. असें बोलतां बोलतां, त्यांतील एक शीबाल्ड नामें साहेब याचा कानांत सांगातलें कीं, असें युद्ध करणारे तुमचे लोक व माझे शिपाई एकमत्त झाले असतां, फार चमत्कार होईल; यास्तव तो समय यावा असें मी इछितो.

राघोबा पळाला तेसमयीं नानाफडनवीसाबरोबरीचा सखारामबापू व रघुनाथरावाचा मुख्य कारभारी चिंतोविठ्ठल हे शिंद्यापासून नानाफडनवीसानें मागून घेतले. तेव्हां त्याणेंही त्याप्रमाणें त्यास त्याचे स्वाधीन केले; त्यावरूनच कोणी म्हणतील कीं तो महादजी शिंदा अंतःकरण पूर्वक नानाफडनविसास अनुकूल होता, तर ती चूक आहे कांकीं, त्याणें आपलें आंग राघोबास पळवावयाविषयीं किमपि नव्हते, असें त्या नानाला समजावयासाठीं ते त्याचे हातीं दिले असतील. यानंतर नानाफडनवीसानें तो सखारामबापू मोठा शहाणा मनुष्य तो कोणे वेळेस काय करील तें समजूं न देतां, आपणाच सर्व आटपील या भयास्तव त्याला एके ठिकाणीं न ठेविला; तो कांहीं दिवस सिंहगडीं व प्रतापगडीं व दुसऱ्यां किल्यांवरून ठेवितां ठेवितां, शेवटीं तो सखारामबापू हाल होऊन त्या बंदीमध्यें रायगडीं मृत्यु पावला. आणि चिंतोविठ्ठलही तसाच कोणे एके किल्ल्यांत मरण पावला.

सन सत्राशें एकुणऐशीं पासून पंचायशीं पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग चौविसावा.

## अनुक्रमणिका.

जनराल गाडुड साहेब व नाना फडनवीस यांचें तहाविषयीं कांहीं बोलणें झालें.

इंग्लीश दुसऱ्याचा पक्ष नधरितां स्वयेंच मराठ्यांलोकांशीं युद्ध करूं लागले.

मग बडोद्याजवळ दुभाय शहर आहे तेथें इंग्लिशांचें लश्कर जाऊन. तें ठिकाण घेतलें.

फत्तेशिंग गाइकवाड याशीं तह केल्याचा प्रकार.

पेशव्यांचा लोकांपासून अमदाबाद कोट इंग्लिशांहीं लढोन घेतला.

मग गाडुड साहेब यास जिंकावयाकरितां शिंदे व होळकर गुजराथेंत गेले. ते कोणकोणत्या प्रकारें वागले तें प्रकरण.

बंगाल्याहून लश्कर येऊन ग्वाल्हेर व लाहोर हे दोन्हीं किल्ले घेतले.

कोंकणांत इंग्लीश व मराठे युद्ध करिते झाले तो प्रकार.

दुघाराजवळची लढाई.

वसयीं किल्ला इंग्लीशांहीं हस्तगत केला.

जनराल गाडुड साहेबकच्या मसलतीनें बोरघाटास ठाणें धरून राहिला; मग मुंबईकडे त्यास हटून आणें प्राप्त झालें.

त्यांत त्याचा कांहींसा नाश आला.

बंगाल्याचें लश्कर शिंद्याचा मुलखांत शिरलें तो प्रकार.

मद्रासचे कुमकेस कलकत्याहून लश्कर पायवाटेनें पाठविलें तेसमयीं मुधोजी भोसल्याचें लश्कर त्यालकुत्यास होतें तत्संबंधें आपल्या लश्करास अडथळा नहोण्याविषयीं कलकत्याचा साहेबानें तो मुधोजी स्वपक्षानुसारी केला.

सर्व मराठे व इंग्लीश यांचा महादजी शिंद्याचा द्वारें तह झाला.

दिल्ली कडील कांहीं वर्तमान.

हैदरअल्ली मरण पावल्यावर त्याचा पुत्र टिपू याचें वागणें, मद्रासेचा इंग्लीशांहीं साल्ब्याच्या तहाच्या बेत ध्यानांत न आणितां टिपूशीं वेगळा तह केला.

नाना-

नानाफडनवीस व निजाम यांचा टिपूवर कांहीं मसलत आली.

रघुनाथरावाचा मृत्यु व त्याच्या पुत्रांची कांहीं गोष्ट.

सनसत्राशें ब्याहत्तरापासून दिल्लीकडे काय काय वर्त्तमान आलें तें प्रकरण.

सुजा अद व त्याचा मृत्यु.

नजीफखानाचा दत्तपुत्र याणें शिंद्याची कुमक मागितली.

तेणें करून तो शिंदा दिल्लीमध्यें फार योग्यता पावला.

त्यायोगें शिंदा उन्मत्त होऊन त्याणें इंग्लीशांस कांहीं अमर्याद मागणें केलें, त्यावरुन ते रुष्ट होऊन त्यांहीं शिंद्याची मध्यस्थता दूर करून, आपला कोणी साहेब नेहेमी पुण्यास असावा असा नेम केला.

## भाग चौविसावा.

गाड्ड साहेब सुर्तेस जाऊन पोंहचला, नंतर त्याचा कलकत्याचा साहेबानीं मोठा मान वाढवून त्यास जनराल पदवी देऊन त्याला आज्ञा केली कीं नानाफडनवीस व मुंबई सर्कार यांशीं स्नेह पडेल असा उद्योग करावा; त्यांत पुरंदरचा तहा प्रमाणें वर्तन असावा. अशी आज्ञा झाली. त्यांत विशेष इतकाच कीं, फ्रेंच लोकांस हिंदूच्या मर्यादेंत येऊं देऊं नये. त्यावरून त्या साहेबाचें व नानाफडनवीसाचें बोलणें चाललें असतां, सनसत्राशें एकुणऐशींमध्यें पर्जन्याचे समाप्ति समयीं त्या साहेबास वर्त्तमान कळलें कीं एक समयावच्छेदें करून इंग्लीशांचीं स्थानें कलकत्ता व मद्रास व मुंबई हीं हल्ला करून घ्यावीं, आणि इंग्लीशांस घालवून द्यावें, आणिखी हें वर्त्तमान ऐकिल्याचे पूर्वींच त्याणें नानाफडनवीसास मैत्री संबंधें कांहीं स्पष्ट प्रश्न केला असतां नानानें विलंब न करितां उत्तर दिलें कीं, सार्ष्टी व राघोबा आमचे स्वाधीन केल्यानंतर तहाच्या विचार करितां येईल. या दोहों कारणास्तव तो गाड्ड साहेब कांहीं उत्तर न देतां, मुंबईस गेला. तेथच्या मुख्य साहेब व त्याचे मंत्रदायक यांचा विचारें असें ठरलें कीं. मलबार प्रांतीं समुद्रतीरीं मद्रास स्थानें संबंधें लष्कर आहे तें आपल्या कुमकेस बोलावून युद्धाची तयारी करावी. याशिवाय मुंबईस फौज तयार करून गुजराथेंत पाठवावी.

राघोबा भडोजेस पळून गेला. ते समयीं इंग्लीशांहीं त्याचा पहिल्यानें फार सन्मान केला नाहीं, परंतु त्यास आश्रय मात्र दिला. मग जून महिन्याचे बाराव्ये तारिखेस तो राघोबा आपले पुत्र अमृतराव व बाजीराव हे

दोघे

दोघे बरोबर घेऊन सुर्तेस जनराल गाडुड साहेब यांचे भेटीस गेला; तेव्हां त्या साहेबानें त्यास दरमहा पन्नास हजार रुपये खर्चास देऊन ठेविला; आणि त्यास पुढें जें विशेष कर्तव्य तें किमपि सांगीतलें नाहीं, कांकीं, तो मराठे लोकांचे मनांतून उतरला त्यास बळेंच मुख्य करून स्थापणें ही सुबुद्धि नव्हे; आणि आपण यांची नाहक प्रतिष्ठा नवाढविली असतांही, ते कारभारी लोक पुरंदरच्या तहाप्रमाणें न वागले तरी आपण आपल्या मान रक्षणार्थ स्वयेंच युद्ध करावें हें उचित असा विचार त्यांहीं ठरविला होता.

यानंतर तो गाडुड साहेब याणें सन् सत्राशें एकुणऐशींच्या शेवटीं, सुर्तेस माघारा येऊन तेथें नानाफडनवीसाच्या वकील होता, त्यास निरोप दिला; आणि आपल्या लष्कराची तयारी करूं लागला, तेच समयीं त्या साहेबानें फत्तेशिंग गाइकवाड यास मैत्री संबंधें कांहीं प्रश्न केले, त्याचें उत्तर विलंबें करून अस्पष्ट दिलें; त्यावरून तो गाइकवाड पूर्वींच्या बोलण्याप्रमाणें वागणार नाहींसा समजून, गाडुड साहेब आपल्या लष्करासुद्धां तापी उतरून, सन् सत्राशें ऐशींच्या जानेवारीचे पहिले तारिखेस, उत्तरेकडे गेला. तो बडोद्याजवळ दुभाय शहर आहे तेथें किल्लेदार ब्राह्मण दोन हजार लोकांसहित त्या कोटांत होता; त्यापाशीं तें ठिकाण साहेबानें मागीतलें असतां, त्याणें दांडगाईचें उत्तर केलें; आणि आंतून जे आला यांचे वार मारूं लागला. तेव्हां इंग्लीश रात्रीमध्यें मोर्चा बांधून, प्रातःकाळीं पाहूं लागले तों कोट रिकामा टाकून ते लोक रात्रीसच निघून गेले होते; असें तें शहर हस्तगत झालें. नंतर फत्तेशिंग गाइकवाड कृत्रिम टाकून सरळपणें तहाचें बोलणें करूं लागला. तेव्हां असें ठरलें कीं, मार्या नदीचे उत्तरेस पेशव्याचा जो भाग आहे तो फत्तेशिंगास असावा. त्याबद्दल फत्तेशिंगानें अठ्ठाविशी नामें तापी नदीचे दक्षिणेस अठ्ठावीस महाल आहेत ते व भडोजच्या जो गाइकवाडाचा भाग होता तो, व त्या परगण्यांत त्यांचे कांहीं गांव होते ते, व नर्मदेच्या कांठीं शिनोर नामें परगणा आहे तोही इंग्लीशांस द्यावा; परंतु इंग्लीशांहीं पेशव्याचें अमदाबाद शहर घेऊन गाइकवाडास अगोदर दिलें पाहिजे.

असा करार झाल्यावर, जनराल गाडुड साहेब मोठ्या त्वरेनें अमदाबादेवर गेला; तें शहर मोठें आणि त्याचा कोट परम सुदृढ असे तेवेळेस तें शहर ओस होतें तथापि त्यांत एक लक्ष मनुष्यांची वस्ती होती, आणि तेथचा किल्लेदार ब्राह्मण असे, त्यास तो किल्ला इंग्लीशांहीं मागीतला. तेव्हां त्याणें उत्तर केलें कीं, मी एव्हांच द्यावयास सिद्ध आहें. परंतु म-

जपाशीं

जपाशीं आरब व शिंदी लोक मिळून सहा हजार व दोन हजार मराठे स्वार आहेत. इतके वश करावयास कांहीं विलंब लागेल असें बोलणें लागलें असतांही, दुसरे दिवशीं इंग्लिशाचे कांहीं लोक त्या कोटाजवळ गेले, त्यांस त्या कोटकर्यांहीं तोफांचा भडमार करून त्यांतील कित्येक लोक मेले गेले. त्यावरून त्या गाइड साहेबानें मोर्चा लावून एके जागीं तो कोट पाडून मोठें खिंडार आंत जावयाजोगें एका दिवसांत केलें; मग दुसरे दिवशीं प्रातःकाळीं इंग्लिशाच्या लष्करांची टोळी त्या कोटांत जावयास सिद्ध झाली. असतां, आरब व शिंदी लोक त्या खिंडारावर चढून त्यास प्रतिबंध करावयास उभे राहिले, तेव्हां त्या उभयपक्षीं युद्धप्रसंग झाला तेव्हां त्यांस ओलांडून ते फार निकरानें आडवीत होते, तेसमयीं त्यांचे तीनशें लोक पडले तोंपर्यंत ते मागें नसरले, तेव्हां इंग्लिशांचे जखमी व मेले मिळून एकशें सहा पडले. असें तें शहर इंग्लिशांहीं घेतलें तेव्हां त्या साहेबानें फार बंदोबस्त ठेविला तो असा, कि, आपण आंत शिरल्यावर शहरांतील कोणा एकाही माणसास उपद्रव नव्हावा तरी ते आंत गेल्यावर तेथच्या शिपायांखेरीज त्या शहराचीं दोन माणसें मात्र मारिलीं गेलीं.

याप्रमाणें गुजराथेंत इंग्लीश जय पावत असतां शिंदे व होळकर वीस हजार स्वारांसहित नर्मदा उतरून बडोद्याजवळ येऊन मुकाम केला. हें वर्तमान ऐकोन जनराल गाइड साहेब अमदाबादेहून निघाला तो फाजिलपुराजवळ मायीनदी उतरून बडोद्याकडे चालिला. तेव्हां शिंदे व होळकर बडोद्यापासून निघोन पवनगडास गेले, तेसमयीं शिंद्याजवळ वडगांवचा तहासंबंधें जामिनादाखल दोघे साहेब होते, ते त्याणें गाइड साहेबाकडे पाठवून त्यास समजाविलें कीं. मीं तुमचा स्नेही आहें. त्याचा मनांत आलें असेल, कीं, आपण इंग्लीशांशीं स्नेह ठेवून पेशव्यांकडे भारीपणानें वागावें, परंतु इंग्लीश असें इच्छित होते कीं, आपला मान किमपि कमी नहोतां, त्या लोकांशीं निर्गुण स्नेहमात्र असावा, कांहींएक निमित्तें दुसऱ्याशीं संबंध ठेवून आपलें राज्य वाढवावें, अशी त्यांची वासना नव्हती. यानंतर शिंद्यानें त्या जनरालाकडे वकील पाठविल्यावर, त्याजवळ गाइडसाहेब बोलिला कीं, तुमचें तहाचें बोलणें तीन दिवसांत व्हावें उगाच विलंब कामाचा नाहीं. त्यावरून तो वकील माघारा शिंद्याकडे जाऊन त्याणें तेथून उत्तर आणिलें कीं राघोबानें वडगांवचा तहामध्यें कबूल केलें होतें कीं आह्मीं झांशीकडे बारा लक्ष रुपयांची जहागीर खाऊन राहूं; आमचा पुत्र बाजीराव यास माधवराव नारायण पेशवा याचा दिवाण करावा त्याप्रमाणें झालें पाहिजे. त्यावर इंग्लीशांचें बोलणें पडलें कीं, राघोबाचे मनास आलें तर तो झांशीस जाईल. त्यावर बलात्कार कर्तव्य नाहीं

हीं. या प्रमाणें उभयपक्षीं विचार परस्परें थोडक्याच दिवसांत विदित झाले. नंतर तो महादजी शिंदा समजला कीं या गाडर्डसाहेबाशीं आपल्या कुयु-क्ती चालावयाच्या नाहींत. आणि त्याच्या सिवायें कालक्रमणा होईल-शी नाहीं. म्हणून त्याणें गोविंदराव गाइकवाडाशीं सल्ला ठरविली कीं, मी तुम्हाला गुजराथेच्या राज्याचा अधिकारी करितों. असें असतां त्या शिंद्या-नें आपणावर त्या साहेबाचा लष्कराचा छापा एकाएकीं येऊन न पडावा. म्ह-णून आपल्या लष्करासभोंवत्या लहान लहान टोळ्या बसवून तोफा वगैरे जड सामान पवनगडाचे तटाखालीं पाठवून सावधपणें राहूं लागला. असा बंदोबस्त झाल्यावर इंग्लीशांचें लष्कर त्याच्याजवळ तीन कोसांवर उतरलें असतां, त्याणें त्यास किमपि अडथळा न केला. मग तीं दोन्हीं लष्करें एकमेकांची चवकशी सात दिवस करीत राहिलीं होतीं; नंतर एप्रेलाचे दुसऱ्ये तारिखेस गाडर्डसाहेब याणें कांहीं एक लोकांची टोळी तयार करून आपल्याबरोबर घेउन गुप्तपणें रात्रीस शिंद्याच्या लष्करावर चालून गेला तो त्याच्या लष्करासभोंवत्या टोळ्या त्याणें ठाणें मांडून ठेविलेल्या होत्या त्यांस कळूं न देतां, त्याच्या थोरल्या लष्कराज-वळ जाउन पोहोंचला; परंतु दिवस उगवावयाचा समय झाला त्यामुळें ते लोक घोड्यावर तयारच होते त्यांहीं प्रथम त्या इंग्लीशांच्या समोर उभे राहून त्यांवर चा-लून येतात असें त्यांस दाखविलें मग ते इंग्लीश त्यांजवर भडमार करूं लागले तेव्हां ते तेथून माघारे सरून त्यांच्या गोळ्यांचा मार चुकवून दूर उभे राहिले. तेव्हां इंग्लीशांहीं आपल्याकडचे अयोध्येचा नबाबाचे स्वार त्यांचे पाठीस लाविले तेव्हां ते तेथूनही दूर पळून गेले. त्या प्रसंगीं इंग्लीशांच्या पलटणांतील लोकांपैकीं को-णीएकही पडला नाहीं. नबाबाचे पंधरा स्वार मात्र पडले. त्यावेळेस यांपेक्षां मराठ्यांचा नाश फार झाला असेल, या प्रमाणें मराठ्यांचें लष्कर पळाल्यानें तो गाडर्डसाहेब समजला कीं आपला जय झाला; परंतु मराठे तेथून पळाले ते तो साहेब जेव्हां डेरे देउन उतरला तेव्हांच तेही पहिल्या प्रमाणें त्यापासून तीन कोसां-च्या अंतरानें डेरे देउन उतरले, आणि पूर्वींपेक्षां विशेष सावध झाले. त्यानंतर मुंबईहून मद्रासवाल्याचे कांहीं लोक येउन त्या साहेबास मिळाले तेव्हां त्याणें त्या-च महिन्याचे एकोणिसाव्ये तारिखेस पुनः मराठ्यांवर छापा घालावयाचा उद्योग केला. ते समयीं मराठे उभे राहून इंग्लीशांस आपल्याजवळ बाणाच्या टप्यांत येउं देउन एकाएकीं त्यांजवर बाणांची सरबत्ती करून माघारे सरले.

ते समयीं मुंबईकडे युद्धाचें कांहीं प्रयोजन लागलें या करितां त्या साहेबास लिहून आलें कीं, तुम्हांजवळ कारनेल हार्टली साहेब आहे त्याजबरोबर कां-हीं लोक देउन आम्हांकडे पाठवून द्यावा मग त्यास पाठविल्यावर गाडर्डसाहेब

इंग्लंडे

उरलेले लोक घेउन पर्जन्यकाळ जाईतोंपर्यंत नर्मदेच्या कांठीं जाउन राहिल्या त्या पूर्वी करनैलसाहेबानें गाडुडसाहेबास लिहिलें कीं, एथें कोणी मराठा गणेशपंत नामें लश्करसहित आला आहे त्यावरून त्यासाहेबानें बंगाल्याच्या स्वारांचें एक पलटन, व अयोध्येच्या नवाबाचे स्वार व कित्येक पायदळ पाठवून, एप्रेलाचे ते विसाव्ये तारिखेस त्या गणेशपंताच्या लश्करावर छापा घातला. तेव्हां त्याचे शें सवाशें लोक मारिले गेले, आणि त्या गणेशपंतालाही फार जखमा लागल्या त्यांस कांहीं उपाय चालेनासा होत्या, त्याच्या तीन तोफा व त्या लश्करचें बुणगें लुटून त्यानें सर्व सामान घेतलें मग त्यालोकांहीं पारनेर, व बगवारा, वइंद्रगड, हे तीन किल्ले घेतले त्याचप्रमाणें गाडुडसाहेबानें नर्मदेच्या कांठीं शिनोरासमीप एक शिंद्याच्या लश्करची टोळी होती, तीवर बंगाल्याचे पलटनीलोक पाठवून त्यालोकांस तेथून हांकून दिलें; त्यायोगें इंग्लिशांहीं गुजराथेंत नवामुलुख जिनका संपादिला होता त्यास पर्जन्यकाळ जाईतोंपर्यंत कांहीं उपद्रव न व्हावासा आला.

हार्टलीसाहेब कोंकणांतल्या तेसमयीं मराठेलोक इंग्लिशांहीं घेतलेला कल्याणगांव तो घ्यावयास फार जमून आले होते, ते मे महिन्याचे पंचविसाव्ये तारिखेस हल्ला करून कल्याण घेणार होते; परंतु त्याचे आगोदर चौविसाव्ये तारिखेस मध्यरात्रीं हार्टलीसाहेब येउन पोंचला. तो एकाएकीं त्यालश्करांत शिरून त्याणें त्यांचा कांहींसा नाश करून, त्यांस पळविलें. त्यापासून फार दिवसपर्यंत मराठ्यांचें मोठें लश्कर कोंकणांत गेलें नाहीं.

असें मुंबईकडचें वर्त्तमान असतां बंगाल्यांत मसलत झाली कीं, माळव्याचे ईशान्येस लश्कर पाठवून मराठ्यांशीं युद्ध करून, त्यांचें चित्त आपणाकडे गुंतवून मुंबईसरकारास सुलभ पडेलसें करावें. त्यावरून दोन हजार चारशें पलटनीलोक पायदळ, व पलटनीस्वार यांची एक टोळी व लहान लहान तोफा गोरेगोलंदाज सहीत असें तयार करून पाठविलें. ते फेब्रुवरी महिन्यांत यमुनापार उतरले तेव्हां गोहदशहराचे आसमंतात मराठ्यांची फौज कांहीं लुटित होती ती जिंकिली. नंतर त्या गोहदच्या राण्याच्या बोलण्यावरून काल्पीच्या पश्चिमेस, एक लाहार नामें किल्ला आहे तो, घ्यावयास उद्युक्त झाले. तेव्हां त्या इंग्लिशांजवळ भिंत पाडावयाजोग्या तोफा नव्हत्या; तरी त्या लश्करचा पाफम नामें कप्तान मुख्य साहेब होता, तो आपल्या लोकांच्या शौर्याचा विश्वासावर थोडकीशी भिंत पाडून हल्ला करिता झाला. तेव्हां तो किल्ला हातीं आला, परंतु जे लोक हल्ला करावयास पुढें गेले होते त्यांतील दोन सरदार साहेब, व सवाशें शिपाईलोक मेले गेले. असा त्या साहेबानें तो किल्ला घेतला.

त्या योगें त्याची प्रशंसा झाली परंतु त्याणें त्या पूर्वी ग्वाल्हेर नामें किल्ला तो त्याहून फार सुदृढ होता तथापि आपलें एकही मनुष्य न मरतां तो किल्ला हस्तगत केला तेव्हां-च तो मोठा नामांकित झालेला होता. तो किल्ला घेण्याचा प्रकार असा तो फाफ-मूसाहेब त्या किल्ल्यापासून पांच कोसांवर पाउसकाळ जाईतोंपर्यंत छावणी क-रून राहिला होता, तो तेथें गेल्यापासून हा किल्ला कोणत्या प्रकारें हातीं लागेल असा विचार करूं लागला. त्यास तेथचे कित्येक वर्तमान गोहदच्या राण्याचे लोक कळवीत होते त्याप्रमाणें दोन महिन्यांनीं त्याणें तो किल्ला हातीं लागावयास मसलत योजि-ली कीं, पलटणी काळ्यालोकांच्या कंपनी[+] दोन त्यांजबरोबर चार साहेबलोक सर-दार देऊन रात्रीसच पुढें जावें, त्यांचे पाठोपाठ वीस[*] गोरेलोक शिपाई व त्यामागून काळ्याशिपायांचीं पलटनें पाठवावीं अशी कल्पना करून त्याप्रमाणें रात्रीसच निघाले ते तेथें जाऊन पोहचतांच त्यांहीं त्या किल्ल्याचे तळची भिंत दहाहात उं-च होती तिला शिडी लावून सर्व चढून आंत उतरले मग त्या भिंतीच्या आंत त्यां-स एकशींहात सुमारें चढाव लागला तोही चढून गेले; त्यापुढें दुसरी भिंत वीसहा-त उंचीची लागली तेव्हां त्याजबरोबर जे त्यांस माहितगारी करून देणारे लोक होते ते बहुत युक्तीनें त्या भिंतीवर चढले, आणि तेथून दोरीची शिडी लाविली; मग त्यावरून एकेक शिपाई चढून आंत उतरून त्या भिंतीजवळच बसले. या प्रमाणें वीस शिपाई व एक साहेब आंत उतरून बसले, इतक्यांत त्यांतल्या ति-घा शिपायांहीं फार वेडेपणा केला तो असा, तेथें कोणी शत्रूचे लोक निजले होते त्यां-चर बंदुकेचे बार टाकिले त्या योगें ते आंतले लोक जागे होऊन त्यांवर चालून आ-ले तेव्हां ते वीस शिपाई व तो साहेब त्या लोकांशीं चांगले लढूं लागले तोंच त्यांचे मागून दुसरे लोक मोठ्या त्वरेनें येऊन येऊन विशेष जमाव होत चालिला तो पा-होन ते लोक पळाले, नंतर सूर्योदयसमयीं आगष्ट महिन्याचे चवथ्ये तारि-खेस तो किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन झाला.

तेच गर्वी कोंकणांत पनवेलीजवळ मोठा सुदृढ बावा मलंगड नामें कि-ल्ला आहे तो मुंबईच्या बंदरांतून फार चमत्कारिक दिसतो; त्यावरही इंग्लिशांहीं जाऊन छापा घातला, परंतु त्याप्रमाणें ते समयीं तो किल्ला हस्तगत न झाला. ते छापा घालणार लोक त्या किल्ल्याचे माचीस गेले, परंतु त्या किल्ल्याच्या लोकांस मिसळल्याचे पूर्वीच ते लोक सावध होऊन पळोन चाल किल्ल्यावर चढले; तेव्हां त्यांचे पाठीस लागोन इंग्लिशांच्या शिपायांस वर जावेना असा तो डोंगर कठीं-

[+] कंपनी ह्मणजे एकशांपासून दोनशें पर्यंत शिपाई असतात.

[*] त्यासमयीं वीस गोरे पुढें न चालविले याचें कारण असें कीं, पुढें गेल्यास कदाचि-त् शत्रू सावध होतील.

न आहे. यास्तव ते त्याळींच गहान त्या वर गेलेल्या लोकांला वरच कोंडितेजाले.

त्यावर्षी मुंबई सरकारांत द्रव्याचा तोट्यामुळें पुढें व्यवस्था कोणे प्रकारची होईल असा विचार पडला. त्यावरून त्यांहीं बंगाल्यास लिहिलें; त्याचें उत्तर आलें कीं, यासमयीं हैदर अल्ली मोठ्या लष्करासहित अर्काट प्रांतीं आला आहे. यासंकटामुळें आम्हाकडून वित्ताची तरतूद होणार नाहीं. तेव्हां मुंबई सरकारांत असें ठरलें कीं, मराठ्यांचा कोंकणांतील मुलुख घेऊन, वसूलाचा ऐवज जमा करावा. तेवेळेस मुंबईचा कोठींत दहाबारा लक्षांचें तांबें होतें तें विकून पैका केला. मग जनराल गाडड साहेब यास वसई किल्ला घ्यावयाची आज्ञा झाली. नंतर पर्जन्यकाळ गेल्यावर त्याणें येऊन वसई किल्ल्यास घेरा घातला; आणि कारणेल हार्टली साहेब यास पांच पलटणें देऊन कोंकणांतील मराठ्यांचीं ठाणीं उठवून, वसुलाचा बंदोबस्त करावयास सांगीतला. परंतु जे लोक बाबामलंगगड घ्यावयास घेरा घालून त्यावरचा लोकांस प्रतिबंध करून राहिले होते त्यांवर मराठ्यांचे तीन हजार लोक येऊन त्यांहीं त्यांसभोंवता वेढा घातला होता; यासाठीं त्या कारणेलास ते लोक सोडवावयाचें काम आधीं करावें लागलें. हार्टली साहेबानें तें कार्य फार युक्तीनें करून मराठ्यांचें लष्कर कोंकणांतून पार घालवून आपण बोरघाटाखालीं जाऊन आपल्या लोकांसहित राहिला. नंतर तेथून कोंकणचा वसूल मुंबई सरकाराकडे जमा होऊं लागला

इकडे पुण्यांत हरिपंत फडके व नाना फडनवीस मिळून कोंकणांतील मुलुख इंग्लिशांपासून सोडवावा, व वसई किल्ल्याचा घेरा उठवावा याविषयीं फार उद्युक्त झाले. परंतु त्यांची तयारी तशी नझाली म्हणून तेवेळीं त्यांहीं रामचंद्र गणेश, आनंदराव रास्ते व परशुरामभाऊ यांस कोंकणांत पुढें पाठवून मग त्यांमागून जोजो सरदार आला तोतो एक एकटाच त्यांचा कुमकेस पाठवूं लागले. त्यामुळें कारणेल हार्टली साहेब त्यांचे वाटेवर होता म्हणोन त्याचा लष्करास प्रतिदिवशीं युद्ध करावें लागलें असा एक महिना गेला, तेव्हां त्याचा लोकांत जखमी व आजारी मिळून सहाशें लोक अनुपयोगी झाले. आणि त्याणें वसुलाचा कामास कोंकणांत जागोजाग लहान लहान टोळ्या पाठविल्या होत्या त्यायोगें त्याजवळ दोन हजारांवर कांहींसे अधिक लोक मात्र राहिले. तेसमयीं तो साहेब मराठ्यांस जिंकोन वसुलाचा आटोप आपणास होणार नाहींसें जाणोन बोरघाटाहून निघोन वसईचे पूर्वेस साडेचार कोसांवर दुगाडापाशीं ठाणें धरून राहिला. तेव्हां रामचंद्र गणेश समजला कीं, कारणेल वसईकडे गेला यास्तव तो घेरा उठवायाचें कार्य शेवटास जाणार नाहीं, त्यावरून तो मोठ्या रागानें कारणेलाचा लष्कराचा ना-

श

श करावयास उद्युक्त झाला. तो दिसेंबराचे दहाव्ये तारिखेस पायदळ व स्वार मिळून वीसहजार फौजेसहित येऊन तीन वेळा त्या कार्णेल साहेबाचा लश्करावर हल्ला करिता झाला. परंतु त्या इंग्लिशांहीं तितकेवेळां मागें हटविला. त्यांतील एका हल्ल्यांत तो रामचंद्र गणेश याची पांच हजार स्वारांची टोळी इंग्लिशांचे पलटनीचे डावे बाजूवर चालून मोठ्या वेगानें येऊन पडली. तेव्हां इंग्लिशांचे जखमी व मेलेले मिळोन अठ्ठा शिपाई व दोघे साहेब पडले, असें तें युद्ध झालें; परंतु ते इंग्लिशांचे लोक मोठ्या स्थिरतेनें वागले, त्यायोगें त्यादिवशीं त्यांचा आणखी नाश न झाला.

दुसरे दिवशीं मराठ्यांचे स्वार यांहीं त्यांजवर हल्ला न केला, तथापि त्यांचा मोठमोठ्या तोफांचा मारानें इंग्लिशांचे मेले व जखमी मिळोन शें सवाशें शिपाई लोक व दोघे साहेब पडले. त्यादिवशीं इंग्लिशांहीं आपल्या लश्कराचा डाव्या व उजव्या बाजूचा दोहों टेकड्यांवर लश्कराचा संरक्षणार्थ दोन टोळ्या ठेविल्या, त्या युद्धाचा कामास बहुत उपयोगी झाल्या. परंतु त्यांचा नाशाविषयीं मराठे अति उद्युक्त झाले असें इंग्लिशांस दिसूं लागलें त्यावरून कार्णेल हाटली साहेब याला समजलें कीं, उद्यां निःसंशय शत्रू या दोहों टोळ्यांवरच हल्ला करितील; यास्तव त्याणें तेच रात्रीं त्यांचा बंदोबस्तास त्या दोहों टेकड्यांवरून एकेक तोफ ठेविली: आणि त्यांसभोंवते नट व खंदक केले, दुसरे दिवशीं सूर्योदयानंतर तीन घटिका दिवसास त्यांतील उजवे टेंकडीवरचा लोकांस समजलें कीं, आपणावर मराठे यांची तयारी झाली; परंतु त्यावेळीं धुकें फार होतें त्या योगें ते लोक केवळ त्यांचासमीप आले, तेव्हां, एकाएकीं तें धुकें जाऊन सूर्यप्रकाश स्पष्ट होऊन त्यांस असें दिसलें कीं, आपल्या पाठिमागें व पुढें आपल्या शत्रूचे स्वार व उजवे बाजूनें पायदळ व कवाईत शिकविलेले पेशव्याचे पलटनी लोक चालोन आपणावर येतात. ते समयीं ते इंग्लिशांचे टेंकडीवरचे लोक याणीं त्या मराठ्यांवर फार त्वरेनें गोळ्या घालल्या असतां, त्यांचा मोठ्या लश्कराचा तोफांचाही मार त्यांवर पडोन त्यांचा फार नाश झाला, तरी ते मागें हटेनात. आणि त्यांचे पायदळ लोकही बारकरीत करीत पुढें चालोन येऊं लागले असें असतां, एकाएकी ते मराठे लोक झटोन लढेनातसे झाले; आणि कोणा मोठ्या सरदाराचें प्रेत मराठे माघारें घेऊन जातात असें इंग्लिशांहीं पाहिलें. मग त्यांस तो रामचंद्र गणेश असें समजलें, तो पडला तेव्हांच त्यांचा पलटनी लोकांचा सरदार पोर्तुगीस तोही जखमी झाला. याजमुळे मराठे ते युद्ध सोडून निघोन गेले; अशी दुधाराजवळची लढाई झाली: त्यांत मुंबईचे शिपाई लोक यांचा जय होऊन मोठा मान पावले. त्याचे पूर्वदिवशीं गाडुडसाहेब यास वसई किल्ला तेथचा किल्लेदार निरुपा-

य होऊन देता झाला. मग तो साहेब तेथून उठोन कर्णेल हारली साहेबाचे कुमकेस गेला, तेव्हां तीं दोन लश्करें एकत्र झालीं त्यांत आपल्यापेक्षां दुसरे मोठमोठे साहेब आलेले पाहोन तो कर्णेल हारली साहेब सरकाराज्ञा घेऊन विलायतेस गेला.

त्यानंतर जनराल गाड्डसाहेब यास वर्तमान कळलें कीं, कलकत्त्यांतील मुख्य साहेब याणें मुधोजी भोंसल्याचा द्वारें मराठ्यांशीं स्नेह करून तद्वारा इंग्लिशांस बुडविणारे हेदर व निजाम यांस जिंकायाविषयीं उद्युक्त झाला. याप्रमाणें समजतांच त्याचा मनांत आलें कीं, जर मीं यासमयीं पुण्यांस गेलों तरही बंगाल्याची मसलत सिद्धीस लवकर आईल. त्यावरून तो आपलें लश्कर घेऊन बोरघाटावर चालिला, तेसमयीं हरिपंत फडका कोंकणांत होता तो पुण्यास गेला, त्याणें जातांजातां बोरघाटांत वाटेचा प्रतिबंधार्थ कांहीं लोक ठेवून आपण पुढें गेला. त्यामागून इंग्लिश येऊन त्याघाटांतील लोकांचा तात्काळ पराजय करून त्याचे लोक घाटावर चढून खंडाळ्याजवळ डेरे देऊन उतरले; परंतु तो जनराल गाड्डसाहेब आपण कित्येक लोकानशीं त्या घाटाखालींच खोंपवलीस राहिला. त्यावेळेस इंग्लिशांचें लश्कर साडेसाहाशें रुमारें गोरे लोक व साडे पांचहजार रुमारें काळे लोक होते.

पुण्यांत नानाफडनवीस याणें इंग्लिश जवळ आल्याचें किमपि भय न मानितां, आपल्या लश्कराची तयारी आरंभिली; आणि कित्येक नवे नवे लोक ही ठेवावे व कारण पडल्यास पुणेंशहर व तेथपासून खंडाळ्यापर्यंत सुखुरव उद्ध्वस्त करावयाचा बेत केला; तेव्हां जनराल गाड्डसाहेब याणें मुधोजी भोंसला याशीं व कलकत्त्याचा साहेबाशीं तह केल्याचा प्रकार त्या नानाफडनविसास लिहून समजाविला; तो त्याणें न मानून उत्तर दिलें कीं, हे वर्तमान आम्हास मुधोजीनें लिहिलें नाहीं; आणि हेदरअल्लीखान आमचा मित्रागतच आहे. त्यावरून जनराल गाड्डसाहेब मनांत असें योजित होता कीं, आपणास पुण्यास जाऊन पुणें घ्यावयाचें सामर्थ्य नसतांही मराठ्यांस उगीच धमकी दाखविल्यानेंच बंगालची मसलत सिद्धीस जाईल परंतु तें न झालें.

त्यावेळेस नानाफडनवीस याणें परशुराम भाऊ बरोबर बाराहजार फौज देऊन त्याणें कोंकणांत जाऊन गाड्डसाहेबाचे लश्करी कोठीस उपद्रव करावा आणि मुंबईची वाट बंद करावी या कामास योजिला, आणि आपल्या संगाबर हरिपंत फडके व तुकोजी होळकर यांस मोठ्या लश्करासहित घेऊन सह्याद्रीकडे चालिला. तेव्हां माधवराव पेशवा पुरंदरीं पाठविला, तेसमयीं तो सात वर्षांचा होता.

तेवेळेस मद्रासेकडे हैदरअल्ली बहुत उपद्रव करीत होता; त्यासारिखा श- त्रु त्या इंग्लिशांस त्यापूर्वी कधींही भेटला नाहीं, म्हणून त्यांहीं मुंबई सरकारास लिहिलें कीं, हे समयीं तुम्ही आमची कुमक करावी; हें न होय तर आमचें जें लश्क- र पूर्वी तुम्हाकडे आलें आहे तें, आमचें आम्हांकडे पाठवावें. असें ऐकून मुंबई- सरकारांत असें ठरलें कीं गाडुडसाहेब घाटावर गेला आहे त्यास मुंबईकडे बोलावून समुद्रकांठीं हैदर अल्लीचा मुलखीं दोन पलटणें पाठवून त्या हैद- राशीं युद्ध चालवावें, व मद्रासेचे लोक मद्रासेस नेमावे; असें होऊन गाडुडसा- हेबास आज्ञा गेली. ते समयीं तो साहेब आपलीं तीन पलटनें तोफखा- न्यासहित व सातशें स्वार मुंबईहून लश्करी सामान आणावयाकरितां प- नवेलीस पाठविले त्यांची मार्गप्रतिक्षा करीत होता; मग तें लश्कर सा- मानरुद्धां येऊन एप्रेलाचे चवथे तारिखेस खोपवलींत येऊन पोंहोचले* नंतर तो साहेब तेथून निघून मुंबईस जावयाची तयारी करूं लागला; त्यांत प्रथम त्याणें आपले लोक मोठ्यामोठ्या तोफा व बुणगें यांसहित, खंडाळ्या- हून खोपवलीस चौहों दिवसांत आणिले. तेव्हां तो गाडुडसाहेब समजला कीं, मी एथून निघून जाणार, हें वर्तमान कोणास ठाऊक नाहीं परंतु तो तेथू- न दुसरे दिवशीं विसाव्ये तारिखेस निघाला तेवेळेस त्याचें सर्व खटलें मुकामा- हून निघालें नाहीं तोंच, खंडाळें व कारलें या दोहींचा मध्यभागीं हरिपंत फडका पंचवीस हजार स्वार व तोफखान्यासहित चार हजार पायदळानशीं, उतर- ला होता, तो अकस्मात तेथें येऊन पोंहचला. तेव्हां त्या हरिपंतानें त्या सा- हेबाचे कित्येक डेरे व बंदुकांचे दारू गोळी भरलेल्या तोटयांचे बस्ते व दोनह- जार तोफांचे गोळे वगैरे सामान लुटून नेलें. ते समयीं वरकड मराठे सर- दारही इंग्लिशांचा नाशाविषयीं पूर्वीपासून त्यासमयाची वाट पाहात होते; त्यांत तुकोजी होळकर पंचवीस हजार स्वारांसहित कुरकर घाटाचे पायीं उत- रला होता, आणि परशरामभाऊ तो बारा हजार स्वारांसहित भिमाशंकरा- जवळ पडला असे; तरी त्या हरिपंत फडक्या बरोबर इंग्लिशांचा पाठीस लागले. ते दिवशीं दोन प्रहरांवर दोन घटिकापर्यंत, तो गाडुडसाहेब या

---

* तें सामान आणणारे लोक यांस लुटावयाकरितां परशरामभाऊ याचे कुमकेस नाना फडनवीसानें तुकोजी होळकर पाठविला; तो जाऊन त्यास मिळाला, तेव्हां ते दोघे मिळून लश्कर स्वार पायदळ व बाणदार वगैरे करून पंचवीस हजार स्वार जमा झाले, त्याशीं लढतां लढतां इंग्लिशांचे लोक तें आपलें सामान सांभाळून प- नवेलीहून निघाले ते तीन दिवसांनीं खोपवलीस पोंहचले. तोंपर्यंत त्या युद्धप्रसंगें करून त्या लश्करांतील लोक मेले व जखमी मिळून, एकंदर सहा पलटनांतील शिपाई का- ळे व पांच साहेब पडले.

स त्या लोकाशीं युद्ध करितां करितां त्या खोंपवलीहून चोकापावेतों पोंहचे तोंपर्यंत, ढेंग देऊन उतरावयास अवसर सांपडला नाहीं. मग दुसरे दिवशीं त्या साहेबास त्याहून मोठ्या निकरानें युद्ध करावें लागलें, त्याप्रसंगीं त्याणें बंगाल्याचें लोक आपल्या लष्कराचा पृष्ठभागीं चालविले होते, त्यांवर मराठ्यांचा मार विशेष पडला. मग त्या दिवशीं मध्यें एक मुकाम करून दुसरे दिवशीं तेविसाव्ये तारिखेस तो गाड्डरसाहेब आपल्या पलटनासहित पनवेलीस पोंहचला. ते वेळेस बंगाल्याचें सहावें पलटन व मुंबईचें तेरावें पलटन, हीं दोन्हीं त्या लष्कराचा पाठिमागचे दोर्ळांत बुणग्याचा रक्षणार्थ नेमिलीं होतीं, तीं विशेष युद्धप्रसंगेंकरून मोठ्या योग्यतेस चढलीं. त्या दोहीं पलटनांचा मुख्य बंगाल्याचा कर्नेल, पारकर नामें साहेब होता, तो त्या लढाईतच मृत्यु पावला; आणि गाड्डड साहेबाचे मेले व जखमी झाले मिळून चारशें अठेचाळीस, काळे शिपाई व अठरा साहेबलोक पडले असा नाश पावोन इंग्लीश खोंपवलीहून मुंबईकडे गेला, त्यावरून मराठे आपण जय पावल्याची प्रसिद्धी लोकांत करूं लागले; परंतु त्यांत त्यांचा नाश न झाला असा नव्हता.

यानंतर इंग्लीश महिना दीड महिना पनवेलीस राहून मग तेथून कल्याणास जाऊन पर्जन्यकाळ आई तोंपर्यंत तेथें छावणी करून राहिला. इतकें होईतोंपर्यंत मराठ्यांचा लष्करांतील सरदार माधवराव रामचंद्र याजबरोबर दहाहजार स्वार देऊन गुजराथेंत पाठविला, आणि कोंकणचा किल्याचा बंदोबस्तास प्रतिकिल्यावर पहिल्यापेक्षां शिबंदी वाढवून, बाकीउरलेले लष्करी लोक सर्व निघोन आपआपल्या ठिकाणांस गेले.

असें मुंबईकडचें वर्तमान असतां गोहदच्या राण्याचे कुमकेस जाऊन, ग्वाल्हेर घेतली, मग माळव्यांत शिरून शिप्री हस्तगत करून सरोजपर्यंत गेलेलें इंग्लीशांचें लष्कर, तें बाहेर घालवावयास महादजी शिंदा येऊन त्याणें त्या इंग्लीशांचा लष्करास आसमंतात कोंडून, सात दिवस त्यांचा डेऱ्यावर मोठमोठ्या तोफांचे गोळे टाकून टाकिता झाला. तेणेंकरून इंग्लीशांस तें स्थळ सोडून जाणें प्राप्त झालें. तेव्हां तो कोणास न कळतां मार्चाचे सातवे तारिखेस मध्यरात्रीं उठून निघून गेला. मग दिवस उगवल्यावर, तो साहेब गेलासा समजून शिंदा लष्कर सुद्धां त्याचे पाठीस लागला. तो वाटेनें दिवसास त्याबरोबर युद्ध करी आणि रात्रीस त्यापासून दोन कोसांचा अंतरानें मोठ्या सावधपणें राहत असे; याप्रमाणें चोविसाव्ये तारिखे पर्यंत इंग्लीश आपलें लष्कर मात्र संभाळून त्या शिंद्यावर हल्ला न करिता झाला; त्यावरून तो शिंदा जसा रात्रीस सावध-

पणा

पणा ठेवीत असे, तसा ठेविनासा झाला; तेव्हां इंग्लीश तर त्याचा असावध पणाची संधी पहातच होता, त्यास ती संधी सांपडतांच त्याणें चौविसाव्ये तारिखेस रात्रीं त्या शिंद्याचा लश्करावर छापा घालून, त्याचे बहुतेक लोक मारिले, आणि त्याचा तेरा तोफा, व तीन हत्ती, व थोरला झेंडा; व कित्येक उंट, व कित्येक घोडे, लुटून घेतले; आणि तें सर्व लश्कर हाकून दिलें. मग पर्जन्यकाळीं ते इंग्लीश त्या शिंद्याचा मुलखांतच राहिले. आणि त्यांहीं पूर्वीं ग्वाल्हेर किल्ला घेतला होता, तो गोहदचा राण्याचे स्वाधीन केला, त्यासमयीं कलकत्याचा मुख्य साहेब याणेंहीं त्या मुलुखासमीप राहणारे जे रजपूतलोक यांस मराठ्यांचा पक्ष तसून ते आपणास वश व्हावयासाठीं उद्योग केला, परंतु तो शेवटास गेला नाहीं. गोहदचा राणा मराठ्यांशीं वक्र व्हावा या आशेनें, त्यास ग्वाल्हेर किल्ला दिला, तरी तो आपल्या सामर्थ्याप्रमाणें मराठ्यांशीं विरोध करीना.

त्यावेळेस कलकत्यांत मसलत ठरली कीं, मद्रासेचे कुमकेस सहा पलटनें पाठविलीं त्यास अडथळा न होण्याविषयीं मुधोजी भोसला व कलकत्याचा साहेब यांची कांहीं गुप्त समजूत पडली होती. तो मुधोजी भोसला पेशवे व वरकड मराठे सरदार यांस आपण इंग्लीशांचा पक्ष धरिला हें कळूं न द्यावें म्हणून त्याणें आपला पुत्र चिमणाजी याजबरोबर आपलें लश्कर तीस हजार स्वार देऊन कटाकप्रांतीं पाठविला; परंतु त्या मुधोजीनें इंग्लीशांपासून सोळा लक्ष रुपये घेऊन गुप्तपणें त्यांशीं स्नेह केला. हें वर्तमान पुण्यामध्यें थोडक्याच दिवसांनीं प्रसिद्धीस आलें असेल, कांकीं; जनराल गाड्ड साहेब पनवेलीस पोंहचल्यानंतर त्या मुधोजी भोसल्यास नानाफडनवीसाचें पत्र गेलें कीं, इकडे असा पेशव्यांचा जय झाला, हे समयीं तुह्मी यांचा पक्ष सोडिला, यास्तव सरकार तुमचें पारिपत्य करील. हें वर्तमान त्या मुधोजीनें कलकत्याचा साहेबास कळविलें आणि लिहिलें कीं, असें असतांहीं माझे द्वारें पेशवे व सर्व मराठे सरदार हैदरअलीला हाकून द्यावयास तुह्मास अनुकूळ होतील, याविषयीं आपला दिवाण दिवाकरपंत पुण्यास पाठवितों. यास्तव त्याची व तुमची प्रथम भेट झाली असतां उत्तम आहे. त्यास ह्या काशीमध्यें तुमची भेट घेईल. असें मुधोजीचें बोलणें झालें परंतु तें शेवटास न गेलें कांकीं, त्याचा दिवाण तो काशीस जातांना मार्गांतच मृत्यु पावला; आणि त्यासमयीं कलकत्याचा मुख्यास वर्तमान आलें कीं, महादजी शिंदा पराभव पावल्यानंतर, त्याणें त्या लश्करचा साहेबास तहाविषयीं प्रार्थना केली आहे तीच सख्य करण्यास कारण होईल. त्यावरून कलकत्याचा मु-

ख्यानें

त्यानें तो अर्थ सिद्धीस न्यावयासाठीं एंडरसन नामें कोणी एक साहेब पुण्यास पाठविला. तो आणि महादजी शिंदा यांची साल्पेगांवीं भेट होऊन उभयतांच्या भाषणेंकरून सर्व मराठे व इंग्लीश यांचा तह झाला. त्यांत उभयपक्षीं जामीनकी त्या महादजीनें स्वीकारली. त्या तहाचा प्रकार असा; पुरंदरचा तह झाल्यापासून इंग्लीशांहीं जितका मराठ्यांचा मुलुख घेतला तो सर्व माघारा द्यावा. व भडोंचेजवळचा तीन लक्षांचा मुलुख पुरंदरचा तहामध्यें पेशव्यांहीं इंग्लीशांस देऊं केला होता, तो इंग्लीशांहीं मागूं नये. याशिवाय गाइकवाडाचा मुलुख व गुजराथ हीं दोन्हीं सनसत्रांशीं पंचाहत्तरांत युद्ध झालें त्यापूर्वीं ज्याकडे होतीं त्याकडेसच असावीं. आणि पेशव्यांहीं गाइकवाड यास खंडणीची बाकी न मागावी. व रघुनाथराव यास दरमहा पंचवीस हजार रुपये खर्चास देऊन त्याच्या मनास येईल तें एक ठिकाण त्यास रहावयाचें नेमावें. यांखेरीज आणिक ठरलें कीं सर्व मराठे व इंग्लीश मिळून हैदरअल्लीला पराक्रान्त करून, त्याणें अरकाटच्या नवाबाचा व इंग्लीशांचा जो मुलुख घेतला तो अवश्य सोडवावा. व इंग्लीशलोक जे मराष्ट्रमुलुखीं सावकारी करतील त्यांपासून सरकारदस्तुरी, इतर सावकारांपेक्षां विशेष न घेतां, इतरांप्रमाणेंच त्यांचे व्यापारास अडथळा नसावा. व पोर्तुगीस लोकांखेरीज कोणी फिरंगी मुलुखाचा पुरुष येऊन त्यास मराठ्यांच्या मुलुखीं ठाणें धरून राहूं देऊं नये.

असा तह कलकत्याचा साहेबानें सन सत्राशें व्यायशींचा जून महिन्यांत ठरविला परंतु नाना फडनवीस याच्या मनांत आलें कीं हा तह लांबवून, आपण हैदराचा पक्ष स्वीकारितों, असें इंग्लीशास भय दाखवून, त्यांपासून साष्टी हस्तगत करून मग तह शेवटास न्यावा, याप्रमाणेंच हैदरअल्लीसही आपण इंग्लीशांकडचा होणार असें कल्पना दाखवून त्यापासून कांहीं लाभ संपादावा यास्तव त्याणें त्या तहाच्या पत्रावर आपली मान्यता लिहावयास तें वर्ष शेवटास जाई तों पर्यंत विलंब केला; परंतु तो हैदरअल्ली दिसेंबराचे सातवे तारिखेस मृत्यु पावला; तेणेंकरून त्या नाना फडनवीसास तेविसावे तारिखेस त्या पत्रावर मान्यता लिहिणें प्राप्त झालें.

याच अवकाशांत इंग्लीशांहीं वडगांवच्या तहांत शिंद्यास भडोंचा किल्ला, देऊं केला होता, त्याप्रमाणें त्याचे स्वाधीन केला.

हैदरअल्ली मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र टिपू यास त्याचे जा

गीं

र्गी स्थापिला; तो मराठ्यांस दाखवी कीं, आपण साल्ब्याचा तहास मान्य आहों. परंतु इंग्लीशांशीं युद्धप्रसंग करण्याविषयीं त्याणें अंतर न केलें. मग महादजी शिंदा त्या हैदराचा पुत्रास निरधीन असतां, त्याणें तें न मानिलें. त्यावरून महादजी शिंदा मराठ्यांचें व इंग्लीशांचें लष्कर एकत्र करून त्यावर जावें अशी मसलत करूं लागला. ते समयीं नानाफडनवीसासही त्या कामांत आपलें हित आहेसें समजत होतें, परंतु त्या महादजी शिंद्याचा उत्कर्षाविषयीं त्या नानाफडनवीसास मत्सर उत्पन्न झाला; यास्तव त्याणें ती मसलत लांबविली. इतक्यांत, मद्रासचे इंग्लीश यांहीं केवळ आपल्याच हितार्थ टिपूचा उपद्रव आपणास न लागावा म्हणून साल्ब्याचा तहाप्रमाणें तो बेत न ठरवितां त्या निराळा त्या टिपूशीं तह केला. हें वर्तमान कलकत्याचा मुख्यास कळतांच तो क्रुद्ध होऊन त्याचा मनांत आलें कीं, तें मोडावें. परंतु मद्रासकरानें तें काम बहुतेक शेवटास नेलें, त्यामुळें त्याचा उपाय चालेनासा झाला. ती गोष्ट साल्ब्याचा तहा निराळी जाणून मराठे रुष्ट झाले; ते समयीं तद्दोष शमनार्थ कलकत्याचा साहेबानें मराठ्यांची समजूत पडली कीं, मद्रासकर यांहीं माझे आज्ञेचा भंग केला.

नानाफडनवीस याचा मनांत पूर्वींपासून होतें कीं, टिपूला सामर्थ्यहीन करावा; यासाठीं त्याणें निजामाशीं स्नेह करून त्या उभयतांहीं संकेत ठरविला कीं, निजामास खंडनीचीबाकी मागावयाचे मिषें करून नानानें फौजेसहित आपले देशाचे मर्यादेपर्यंत जावें. आणि निजामानेंही त्या खंडनी बाबद कांहीं बोलण्याचें निमित्त करून फौजेसहित त्याठिकाणीं येऊन मग ते उभयतां एकत्र मिळून हैदरावर स्वारी करावी. त्यांत जो लाभ होईल त्यापैकीं इंग्लीशांस भाग न द्यावा. यासाठीं त्यांची कुमक कहीं घेऊं नये. या प्रमाणें गुप्तमसलत ठरवून नानानें निजामास व टिपूस एकदांच खंडबाकीचें मागणें केलें; तें टिपूनें मान्य करून उत्तर दिलें कीं, सांप्रत आपणाजवळ ऐवज नाहीं. निजामानें लिहिलें कीं या प्रकरणीं बोलणें करावयास आपण फौजेसहित यदगिरास यावें; आम्हीही लष्करसुद्धां तेथें येतों, मग दोघांचा बेताप्रमाणें ठराव होईल. असें झाल्यावर नाना व निजाम हे उभयतां संकेताप्रमाणें लष्करसुद्धां भीमा व कृष्णा यांचा संगमाजवळ त्या संकेतस्थळीं यदगिरास एकत्र मिळाले. ते समयीं त्या उभयतांचें बोलणें त्या बाकी प्रकरणींमात्र प्रसिद्धपणें झालें, आणि दुसरें बोलणें हैदरानें निजामाचा व मराठ्यांचा मुलुख घेतला हो-

ता

तः तो मागाग द्यावा व टिपूवर मोहीम करावी, याविषयीं जो संकेत झाला तो गुप्त राहिला. आणि ते समयीं तें काम तसेंच राहिलें, कांकीं निजाम आपलें सामर्थ्य विशेषसें जाणून नानास अगोदरच असा विभाग मागूं लागला कीं, त्या प्रमाणें नानास कबूल करवेना. मग इतकेंच ठरलें कीं, तूर्त हें काम असेंच रहावें; पुढें जेव्हां उभयतां एकमतें ठरेल तेव्हां करतां येईल. नंतर ते दोघे आपआपले ठिकाणीं गेले. त्यांत निजामअल्ली आपली राजधानी हैदराबाद येथें पोंहचतांच त्यास वर्तमान कळलें कीं, टिपू फौजेसहित येऊन, कृष्णेचे दक्षिणेस मोंगलांचे मुलखीं स्वारी घालणार आहे. आणि त्या वेळेस त्या टिपूनें निजामास खेद उत्पन्न होईसा निरोप पाठविला कीं, तुह्मीं विजापुरचा स्वामीपणा करितां तो खोटा, त्यास तें स्थळ माझे स्वाधीन करा. यावरून असें वाटतें कीं, निजामाचा व नाना फडनविसाचा गुप्त तह झाला तो टिपूला कळला असेल.

तो निरोप पोंहचतांच निजामअल्लीनें नाना फडनविसास आपल्या कुमकेस बोलाविला. परंतु तो नाना आपल्या राज्यांत कांहीं कामास गुंतला, आणि त्याचा लश्कराचीही तयारी तादृश नव्हती. ह्मणोन निजामानें आपला वकील टिपूजवळ होता तद्द्वारा तो अनर्थ शमविला. नाना फडनवीस कामास गुंतला ह्मटलें तें असें; त्यास वर्तमान कळलें कीं, माधवराव नारायण यास पदच्युत करून गादीचा अधिकारी रघुनाथरावाचा पुत्र बाजिराव यास स्थापावा. अशी मसलत बहुतां लोकांहीं फार दिवसांपासून केलेली आहे, ती सिद्धीस जाईल यास्तव तें मोडावयाविषयीं त्यास यत्न करावा लागला. त्या वेळेस रघुनाथराव याचें कुटुंब सात्प्याचा तहाप्रमाणें कोंपरगांवीं होतें. आणि तो रघुनाथराव तेथें गेल्यावर दोन तीन महिन्यांनीं मृत्यु पावला होता. ते समयीं त्याची स्त्री आनंदीबाई गरोदर होती. ती त्याचा मरणानंतर थोडक्याच दिवसांनीं प्रसूत झाली, तो पुत्र जन्मला; त्याचें नाव चिमणाजी आपा. रघुनाथरावाचे मृत्युसमयीं बाजिराव नवां वर्षांचा लहान असतांही त्या रघुनाथरावाचे पक्षपाती व नाना फडनविसाशीं रुष्ट झालेले जे लोक होते ते सर्व मिळोन त्या बाजिरावाला गादीचा अधिकारी करावयास उद्युक्त झाले असत. तेव्हां नाना फडनवीस याणें त्या कोंपरगांव प्रकरणीं मंडळीस किमपि उपद्रव न देतां, त्यांचा विश्वासमात्र न ठेविला. मग पुढें रघुनाथरावाचे पुत्र बाजिराव व चिमणाजी आपा यांचा आणि नाना फडनविसाचा द्वेष पडला त्याचें कारण हेंच.

रघुनाथरावाचा पुत्रास गादीचा अधिकारी करणारे लोक, यांत महा-

दजी

दजी शिंदा मुख्यत्वें आहे, अशी त्यावेळेस वदंता उठली होती; परंतु ती खरीच असेल असा निश्चय करितां येत नाहीं. त्यांत इतकेंमात्र खरें कीं, नाना निरंतर चिंतेंत असावा, याविषयीं महादजी शिंदा यास मोठी आवड होती; परंतु तें सिद्धीस न्यावेंच असा त्याचा मनोरथ नसेल; उगेंच त्या नानाला भय मात्र असावें इतकेंच असेल. कांकिं, त्याचें मन पुण्याचा कारभारांत फारसें नव्हतें, तो हिंदुस्थानांत आपली श्रेष्ठता वाढवावयाविषयीं अत्यंत उद्युक्त होता; त्याचा उद्योगाचा प्रकार समजावयासाठीं सनसत्राशें ग्याहात्तरांत मराठ्यांहीं हिंदुस्थान सोडिलें. त्यापासून तिकडे काय काय वर्तमान झालें तें ध्यानांत आलें पाहिजे.

मराठ्यांहीं दिल्ली घेतली तेसमयीं तेथचा बादशाहाचा सेनापती नजीफखान यास पदच्युत केला. मग मराठे दक्षिणेस आल्यावर तो पुनः अधिकारारूढ होऊन तिकडे मराठ्यांचीं ठाणीं होतीं तीं उठवूं लागला, आणि बंगाल्याचा नवाब सुजाअदवला तोही तसाच वागत असतां, त्याचा मनांत आलें कीं, आपण नजीफखान यास मिळून, नर्मदेचा उत्तरेस जितके मराठे असतील तितके हांकून द्यावे; परंतु तो सुजाअदवला सनसत्राशें पंचाहात्तराचा जानेवारींत मृत्यु पावला त्यामुळें तें तसेंच राहिलें.

त्यापुढें नजीफखान दिल्लीचा बादशाहाचा सर्व कारभार फार चातुर्यें करून मुख्यत्वें आपण करूं लागला. तो सनसत्राशें ब्यायशींचा एप्रेल महिन्यांत मृत्यु पावला. तेव्हां त्याचा दत्तपुत्र होता तो व तेथचे दरबारी लोक यांचीं बहुत भांडणें होऊन मग त्याशीं विरोध करणारे ते बहुतेक लयास गेले; त्यांपैकीं साव्याचा तहाचे वेळेस एकमात्र त्याचा विरोधी राहिला होता. मग दुसरे वर्षीं तो दत्तपुत्र याचा स्वाधीन तो बादशाहही असतां, त्याणें त्या शत्रूपेक्षां आपलें सामर्थ्य कमीसें जाणोन दुसऱ्या कोणा बळवानाचें इष्टत्व संपादन करून, त्यास जिंकावयाचा उद्योग आरंभिला. त्यांत प्रथम त्याणें इंग्लिशाकडे यत्न केला, तो साधेना यास्तव शिंद्याकडे यत्न करिता झाला; तेव्हां शिंद्यानें तात्काळ तें अंगिकारून तो महादजी शिंदा व तो दत्तपुत्र यांची आग्यामध्यें भेट झाली; परंतु थोडक्यांच दिवसांत तो दत्तपुत्र मारेकरी याणीं मारिला. त्यानंतर शिंदा मुख्यत्वें दिल्लीचा कारभार करूं लागला. त्यावर बादशाहाची कृपा होऊन बादशाहानें त्यास आपला सेनापती करून दिल्ली व आग्रें हीं दोन्हीं त्याचे स्वाधीन केलीं. असा शिंद्याचा उत्कर्ष झाल्याचें वर्तमान पुण्यास येऊन पेशवे व नाना फडनवीस वगैरे कारभारी यांस विस्मययुक्त आनंद झाला; त्यावरून पेशव्यांहीं एक फौजेची टोळी त्या शिंद्याकडे पाठविली; त्यांत अर्थ असा कीं, या लाभांत पेशवे यांचा अंश आहेसें सर्वांत प्रसिद्ध व्हावें. याप्रमाणें तो शिं-

दा

दा योग्यतेस आला. तेव्हां त्यास असा गर्व झाला कीं, नानाफडनवीस व होळकर हे आपला मत्सर करितील हा अर्थ त्याचा मनांतच नआला; आणि तो केवळ उन्मत्त होऊन त्याणें इंग्लिशाकडे बंगाल्याचीही चौथ मागीतली. तेव्हां तेथचा मुख्य साहेब याणें त्याचा धिक्कार करून, त्यापासून उलटें असें लिहून घेतलें कीं, तुह्माजवळ आह्मीं मागणें केलें हा आह्मांपासून चूक झाली. त्याशिंद्याचा मान हलका करायाविषयीं नाना फडनवीस इंग्लिशांस ह्मणत होता, कीं, तुमचा कोणीएक साहेब आह्माजवळ असावा, केवळ शिंद्याचाच द्वारें कारभार न चालावा; असें असताही ते इंग्लीश आपला साहेब देत नव्हते, परंतु तो शिंदा उन्मत्त जेव्हा दिसला तेव्हा त्यांहीं ती गोष्ट मान्य केली. तेसमयीं त्यांहीं पुण्यास मालिट साहेबनामें आपला वकील पाठवावयाचें मान्य केलें, असें वर्तमान सन सत्राशें पंचायशींत घडलें.

---

सन सत्राशें पंचायशीं पासून
नव्वद पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून.
भाग पंचविसावा.

## अनुक्रमणिका.

टिपू नरगुंदच्या देसायाबरोबर कसकसा वागला तें प्रकरण.

त्याटिपूनें हिंदूवर जुलुम करून मुसलमान केले.

नाना फडनवीस याणें टिपूला जिंकावयाविषयीं इंग्लिशांचे कुमकेविषयीं यत्न केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं.

पुण्याहून मराठ्यांचें लष्कर निघालें तें निजामअल्ली व मुधोजी भोंसले यांस मिळून टिपूवर चालिलें.

बदामी किल्ला युद्ध करून मराठ्यांहीं घेतला.

तुकोजी होळकर कितुरास जाऊन काय काय करिता झाला तो प्रकार.

सावनुरच्या नबाबाची कांहीं गोष्ट.

टिपूनें एकाएकी मराठ्यां तळाचें बोलणें लाविलें तो विस्तार.

महादजी शिंदा दिल्लीमध्यें योग्यतेस चढूं लागला असतां, त्याणें अन्याय कर्में केली त्यामुळें मुसलमान लोक त्याचा द्वेष करूं लागले.

त्या शिंद्यानें रजपुतांकडे खंडणी मागीतली असतां, ते सारे एकत्र मिळून त्याशीं युद्ध करिते झाले.

त्या-

त्या युद्धाचा प्रकार व त्याचा शेवट कसा झाला तें प्रकरण.

त्या शिंद्यास संकट प्राप्त झालें असतां तो कसकसा वागला तें प्रकरण.

त्यास पुण्याहून कुमक येऊन पोंहचली.

आग्र्याजवळची लढाई.

इस्मायलबेगाचा पराभव.

कोणी गुलाम कादर मामा याचें आचरण व त्याचा मृत्यु.

शिंदा दिल्लीमध्यें पुनः मोठी योग्यता पावला.

त्याणें आपल्या लष्कराचा काय काय बंदोबस्त केला तो विस्तार.

## भाग पंचविसावा.

टिपूनें निजामास जें लिहिलें होतें कीं विजापूर माझे स्वाधीन करा, या धमकावणींत अर्थ इतकाच कीं, तुह्मीं व पेशवे मिळून जाजा मसलती करितां त्या सर्व मी जाणतों; कांकिं, ते समयीं टिपूनें निजामावर चालून जावें अशी त्याजवळ फौजेची तयारी नव्हती; आणि निजामानेंही त्यास मोठी गोष्ट सांगावी अशी त्या निजामास शक्तीही नव्हती, ह्मणोन त्या उभयतांचा तह श्रीरंगपट्टणाजवळ झाला, तो त्या उभयपक्षीं निर्बळते मुळेंच ठरला. परंतु तो फार दिवस टिकणार नाहींसा ते दोघे जाणत होते, यास्तव तो तह झाला तरी युद्धोपयोगी लष्कर सिद्धता व आपल्या मुलखांतील किल्ल्यांचा बंदोबस्त यत्नपुरःसर करीत होता, ती सिद्धता झाल्यावर त्या टिपूनें ते समयीं युद्ध उत्पन्न होण्यास कांहीं निमित्त केलें तें असें; मलप्रभेचे दक्षिणेस सहा कोसांवर नरगुंद नामें किल्ला व त्याचा आसमंतात मुलुख, तो कोणी देसाई ब्राह्मण याचा स्वाधीन होता. तो देसाई पूर्वीं मराठ्यांस त्या देशाची खंडणी देत होता; मग हैदरानें कृष्णेचे दक्षिणेकडचा मराठ्यांकडचा मुलुख घेतला, त्यांतच तो देसायाचाही मुलुख त्याजकडे गेला. तेव्हां तो देसाई त्या हैदरास मराठ्यांप्रमाणें खंडणी देऊं लागला. पुढें तो हैदर मेल्यावर टिपू त्या देसायाकडे अमर्याद मागों लागला. तेव्हां तो ब्राह्मण पेशव्यांस शरण गेला त्यावरून त्या टिपूस त्यांहीं निषेधून सांगितलें कीं, जहागिरदार आपल्या मार्गानें वागत असतां दुसरी मुद्रा झाली तरी त्यापासून अधिक घेणें हें ठिक नव्हे. त्यावर टिपूनें उत्तर केलें कीं, मी आपल्या राज्यांत इच्छेस येईल तसें आपल्या प्रजेपासून घेईन. असें उत्तर पेशव्यांस करून तिकडे लष्कर पाठवून त्यास आज्ञा दिली कीं, जर तो देसाई ब्राह्मण आह्मांस ठिका मार्गांतल्याप्रमाणें न देईल तर तो किल्ला घ्यावा. यानंतर तें लष्कर जाऊन किल्ल्यास घेरा घातला असतां, त्या ब्राह्मणाचे कुमकेस मराठ्यांकडून गणेशपंत

णेशपंत बेहेरे व परशुराम भाऊ पटवर्धन हे लश्करसुद्धां तिकडे गेले. त्यासमयीं टिपूचा वकील पुण्यांत होता. ह्मणोन नाना फडनविसानें त्याउभयतांस सांगितलें कीं आधीं मराठ्यांहीं युद्धाचा आरंभ न करावा; मग ते दोघे सरदार नरगुंदास पोंहचल्यावर त्यांस टिपूचा सरदारांकडून विनोदयुक्त कांहीं थट्टाईचा निरोप आला त्यावरून ते गणेशपंत बेहेरे व परशुराम भाऊ हे क्रुद्ध होऊन नानाचें सांगणें न मानितां, टिपूचा लश्करावर चालून जाऊन त्यालश्करासभोंवत्या लहान लहान टोळ्या त्यांहीं बंदोबस्तास ठेविल्या होत्या त्यांवर पडोन त्या टोळ्या त्यांचा थोरल्या लश्करांत मिळविल्या तेव्हां त्यांतून टिपूचीं दोन पलटनें व कित्येक स्वार पुढें होऊन लढूं लागले, ते समयीं मराठ्यांचे वीस शिपाई व एक हत्ती मेला गेला इतकें होतांच ते मराठे मागें हटले हें वर्तमान नानास कळतांच त्याणें दुसरें लश्कर मोठें तयार करून तो गणेशपंत व परशुराम भाऊ यांचा कुमकेस पाठवून, त्याटिपूला लिहिलें कीं, हा कलह मजकडून उत्पन्न झाला नाहीं हे चाकर लोकच भांडतात; त्यास हा कलह जर मिटेल तर मी फार संतोष पावेन. त्यावर टिपूनें उत्तर केलें कीं, मीही तेंच इछितों, आणि जर तुह्मीं या नरगुंदसंबंधें माझा स्वामीपणा मात्र मानाल तर मी याची खंडणी तुह्मास दोन वर्षांची देईन. असें उत्तर गेल्यावर नानानें निजाम अल्लीचा मसलतीप्रमाणें मान्य करून आपलें लश्कर कृष्णेचा उत्तरेस नेलें, आणि टिपूनें आपल्या बोलीप्रमाणें खंडणीचा ऐवज सत्तावीस दिवसांत पोंहचता करून देतों ह्मणोन कबूल केलें. याप्रमाणें मराठ्यांचें लश्कर दूर झालें असतां टिपूनें तो नरगुंद किल्ला घेऊन त्या देसायाला कुटुंबसुद्धां अक्षय बंदींत ठेविला, आणि त्याची कन्या आपली स्त्री केली; तीशिवाय त्याचा पहिल्या बायका होत्या. असें असतां त्याणें एवढें अन्याय कर्म केलें, आणि मराठ्यांस जें द्यावयाचें कबूल केलें होतें तेंही दिलें नाहीं. यांत टिपूचा कुटिलपणा स्पष्ट दिसून आला. याशिवाय कित्तूर किल्ला याचा खंड मराठे घेत होते तोही नरगुंदासारिखा हेदगकडे गेला, नंतर त्याटिपूनें तो हस्तगत केला, मग त्याणें जितकीं अन्यायकर्में केलीं तितक्यानेंच मराठ्यांस कदाचित् पुरा खेद न होईल ह्मणोन त्याणें कृष्णेचा दक्षिणेचे बहुतेक हिंदू धरून बलात्कारानें त्या हिंदुलोकांचा सुंता करून मुसलमान केले. असा टिपूनें अनर्थ केला तेव्हां शंकराचार्यांचे शिष्य दोन हजार ब्राह्मण यांस तो जुल्म सोसेना यास्तव त्यांहीं अनेक प्रकारानें प्राणत्याग केले.

नाना फडनवीस याणें मनांत निश्चय केला होता कीं, टिपूला जिंकून तत्संबंधीं इंग्लिशांस किमपि भाग त्या लाभापैकीं न द्यावा तथापि यासमयीं टि-

पू प्रबळ झाला आणि त्याचा पलटन बंदोबस्त फार चांगला आहे; अणखी आ-
पला सहाय जो निजामअल्ली त्याचें लश्कर केवळ अव्यवस्थितसें जाणून,त्याणें
इंग्लिशांकडे कुमक मागावयाकरितां मनांत कल्पना आणिली कीं, टिपू व इं-
ग्लिश यांमध्यें पहिलेंच वैमनस्य आहे यास्तव तो जिकायाविषयीं यत्किंचि-
त् लाभ दाखविल्यानेंच आपले सहाय इंग्लिश होतील. म्हणोन मुंबईसर-
कारांत त्याणें आपला वकील पाठविला, तेव्हां त्यांहीं त्या वकिलाचें बोलणें अल-
सत अळसत ऐकून, त्याचा अंगिकार न करितां, तें प्रकरण कलकत्याचा मुख्या-
कडे लोटून दिलें. तेव्हां तेथचा मुख्यानेंही तें काम स्वीकारिलें नाहीं. इत-
क्यांत पुण्यामध्यें मराठ्यांचें लश्कर त्या टिपूवर जावयास सिद्ध झालें; तेसम-
यीं पेशवे व मुधोजी भोंसले यांचा तह झाला कीं, इंग्लीश पेशव्यावर चालून
येत असतां मुधोजीनें त्यांस अनुकूळ नव्हावें; व पूर्वीं माधवराव पेशवे व
जानोजी भोंसले यांचा तह झाला आहे त्यांत अंतर न करितां, मुधोजी भोंस-
ल्यानें वागावें.

त्यावर्षीं पर्जन्य फार लांबला म्हणोन मराठ्यांचा लश्करास दिसेंबराचे
पहिले तारिखेपर्यंत निघावयास अवसर सांपडला नाहीं. मग हरिपंत फड-
का लश्करासुद्धां पुण्याहून निघोन भोंसले व निजाम यांचा लश्करास मिळाव-
यासाठीं पूर्वींचे संकेत स्थळीं येद्गिरास जाऊं लागला. त्याबरोबर नानाफ-
डनवीसही निजामअल्लीशीं कांहीं बोलणें करावयास निघाला. नंतर तीं स-
र्व लश्करें एकत्र मिळाल्यावर निजामाशीं आणि मराठ्यांशीं मसलत ठरली
कीं, टिपूचें सर्व राज्य घ्यावें, आणि त्याचे सहा विभाग करून त्यांतील दोन वि-
भाग पेशवे यांणीं घ्यावे. व दोन निजामअल्लीनें स्वीकारावे; व एक शिंद्यास द्या-
वा, व एक होळकरास द्यावा. असा नेम होऊन तुकोजी होळकर व गणेशपं-
त बेहेरे. या दोघां बरोबर पंचवीस हजार फौज देऊन टिपूचें कांहीं लश्कर
कितुरापाशीं होतें त्यावर नेमिले; आणि थोरलें लश्कर टिपूचा मुलखांत बदा-
मीवर चालिलें. तेसमयीं मसलत झाली कीं, बदामीजवळ जाऊन पर्जन्यका-
ळपर्यंत युद्धाचा उपक्रम न करितां उगेंच रहावें पुढें पर्जन्यकाळीं नद्या भरल्याव-
र तेथें टिपूची कुमक पोंहचेनाशी झाली म्हणजे युद्ध आरंभावें. त्या मसलती-
स निजामअल्ली मान्य झाला होता, परंतु पर्जन्यांत युद्ध करणें त्यास आवडे-
ना, यास्तव तो आपला सेनापती पंचवीस हजार सैन्यसहित हरिपंताचा स्वा-
धीन करून, आपण हैदराबादेस माघारा गेला. त्यानंतर मराठ्यांहीं टिपू-
ची अडचण न होईलसें, समजून त्या किल्ल्यास घेरा, सनसत्याऐशीं शायशीं-
च्या मे महिन्याचे पहिले तारिखेस घातला. तो बदामी किल्ल्याचें शहर

मोठ्या मैदानात असून त्यासभोंवता तट आहे त्याचा मध्यभागीं गढी आहे, आणि त्यातटाचा दोहों बाजूंस बाहेरचे आंगीं दोन डोंगरी किल्ले आहेत; त्यातटाशीं मराठे वीसदिवस तोफाचा मारकरून लढले. तथापि तो तट फारसा ढासळला नाहीं. तेव्हां असें ठरलें कीं याचा आंत जावयास शिडी शिवाय दुसरा उपाय नाहीं; मग बिमा व्येतारिखेस मोंगल व मराठे त्या कृत्यास सिद्ध झाले. तेव्हां त्या कोटांतील गाडेतीन हजार लोक त्यांचा निवारणार्थ, आंतून त्या भिंतीवर चढले त्यांहीं पूर्वीच त्यातटासभोंवते दारु भरलेले बुधले आगोआग पुरून ठेविले होते, मग ते मराठे व मोंगल त्यांवर हल्ला करीत असतां ते केवळ त्या पुरलेल्या बुधल्यांवर येऊन पोंचले. तेव्हां अकस्मात त्या बदामी कराहीं त्या बुधल्यांस बत्ती देउन त्यांचा फार नाश केला तथापि ते मराठे, व ते मोंगल यांमध्यें मोठी ईर्षा उत्पन्न झाली होती, त्यायोगें ते तो नाश न मानितां, तसेंच मोठ्या वेगानें पुढें सरून त्यातटास, आगोआग शिड्या लाउन वरचढून आंत उतरले. नंतर त्या शहराचा आंतील गढीशीं मात्र कांहींसा विलंब लागला. तेसमयीं त्यातटांतील लोकांचे पाठीस शत्रु लागले असतां, ते बहुतेक पळून त्या दोहों बाजूंचा दोहों किल्यावर चढून स्वस्थपणें राहिले; नंतर ते त्यांचा पाठीस लागलेले मराठे व मोंगल, यांवर त्यांहीं त्या दोहों किल्यांवरून मोठे मोटे दगड लोटून, त्यांवर बंदुकांचाही भडमार करून त्यांचा बहुत नाश केला तरी ते मराठे व मोगल यांचे अनृट उद्योग व मोठा वेग पाहून, ते किल्लेकरी अत्यंत भीत होउन, केवळ जीवदान मात्र मागून त्यांस ते दोनी किल्ले त्यांहीं दिले.

असें झाल्यावर नाना फडणवीस ते युध्याचें काम हरीपंत फडके यांस सोंपुन आपण पुण्यास माघारा गेला. तसा मुधोजी भोंसलाही आपले बहुतेक लोक आपला दुसरा पुत्र खंडोजी भोंसला यांचा स्वाधीन करून, तें कृत्य हरीपंतास सोंपउन त्यास कबूल केलें कीं मी दसरा झाल्यावर आणीक फौज घेउन, तुमचे कुमकेस येतों. इतकें करून तो माघारा नागपुरास गेला. तेसमयीं होळकर अगोधरच कितुरास गेला होता त्याणें त्या परगण्यांतील सर्व टिपूचीं ठाणीं उठवून त्या किल्याशीं लढत होता त्यावर कांहीं वेळानें तो किल्ला घ्यावयाचें काम तसेंच ठेउन तो होळकर तेथून एकादिवसांत तीस बत्तीस कोस जाउन, सावनुरास पोंचला; तो तेथे टिपूचा एक मोठा सावकार, राघवेंद्रराव नामें होता, त्यास धरावयाचा बेतानें गेला परंतु तो तेथून पळून गेला होता. तेव्हां त्या होळकरानें तेथचे दुसरे दोन तीन सावकार धरून, त्यांपासून दोन लाख रुपये खंडणी घेतली. सावनुरीनबाबयास पूर्वी टिपूनें आपली बहिण देउन त्याचे पहिले घेतलेले बारा परगणे त्यास माघारे दिले होते; तथापि तेसमयीं टिपूनें त्या नबाबास कांहीं उपद्रव दिल्यामुळे, तो टिपूचा पक्ष सोडून होळकरास मिळाला.

हरी

हरीपंत फडके तो बदामी किल्ला घेतल्यानंतर गजेंद्रगड वगैरे आणीक किल्ले घेउन, मग तो हरीपंत कोपाळ किल्यास गेला असतां, त्यास वर्तमान कळलें कीं, आपणावर टिपू मोठ्या लष्करासहीत टोंकाच्या नावांत बसून तुंगभद्रा नदी उतरून आलीकडे आला. तेव्हां हरीपंत फडके त्या टिपूवर जावयास सिद्ध जहाला परंतु तो मुलुख स्वारांच्या युध्दास उपयोगी नाहीं सा समजून, तो सावनुरास गेला, तो तेथें टिपूही येउन मराठे व मोगल यांच्या लष्करापासून तीन कोसांवर उतरला; तेव्हां तीं दोन्हीं लष्करें सावनुराच्या दोहोंकडे होतीं; मग पंधरा दिवस पर्यंत ते उभयपक्षीं लोक आपआपले तळावर उगेच होते, नंतर टिपूनें पहाटेची पांच घटका रात्र असतां मराठ्यांचा तोफख्यान्यावर छापा घातला परंतु तत्संबंधें त्या टिपूचा हातीं कांहींन लागलें. त्यावेळेस मराठ्यांचा लष्करांत कांहीं धान्यादिकाचा तोटा पडला आणि टिपूचानेंही मैदानांत येवणार नाहीं या दोहीं कारणास्तव तो हरीपंत फडके सावनूर टाकून लष्कर स्थळापासून पांच कोस मागें जाउन दुसरी मैदानाची जागा धरून राहिला. तेव्हां टिपूला त्याचे पाठीस लागवेना म्हणून, तो सावनुरांत शिरून राहिला. याप्रमाणें त्या दोहींलष्करांचा युद्धप्रसंग न होतां व त्यांतील एकासही विशेष लाभ नसतां, एकाएकीं टिपूनें सनसत्राशें सत्यायशींच्या फेब्रेवारींत, मराठ्यांशीं तहाचें बोलणें करावयाकरितां हरीपंताकडे तुकोजी होळकराचे द्वारें, वकील पाठविला. त्याचा बोलण्याचा विश्वास हरीपंत धरीना, म्हणून एप्रेलपर्यंत तें तहनकरणीं बोलणें चाललें होतें. मग तो तह ठरून मराठ्यांस, कितूर व बदामी व नरगुंद प्रांत झाले. याशिवाय पंचेताळीस लक्ष रुपये टिपूनें मराठ्यांस देतों म्हणून कबूल केलें; आणि सावनुरचा नवाबासही आपल्या मुलखाचा कांहीं भाग द्यावयास तो कबूल झाला, परंतु त्यासही टिपूचा विश्वास येईना म्हणून तो मराठ्यांचा लष्कराबरोबर पुण्यास गेला.

टिपूनें एकाएकी मराठ्यांशीं तह करून कलह मिटविला, याचें कारण असें. बदामीस नानाफडनवीस असतां, इंग्लीशांचा वकील मालीटसाहेब तो मराठ्यांकडे नेहेमी राहावयास पूर्वसंकेताप्रमाणें आला, तेव्हां त्याची व नानाफडनवीसाची प्रथमभेट त्या बदामीस होउन मग तो नानाबरोबर होता, आणि कलकत्यास तेसमयीं नवा मुख्यसाहेब आला, त्याणें कलकत्ता, व मद्रास, व मुंबै, इतक्या आगीं आपल्या पलटनींचा बंदोबस्त चांगला आरंभिला यासर्वप्रकारें करून, टिपूला वाटलें कीं मराठे व इंग्लीश निःसंशय, एकचित्त आहेत; तेंच भय मानून त्याणें युद्ध सोडिलें.

महादजी शिंदा यास दिल्ली व आग्रे प्रांत झाले, तथापि तेथें पूर्वी अव्यवस्था झाली होती, त्यामुळें त्या बंदोबस्तास जो खर्च लागला त्याप्रमाणें तेथें उत्प

न जालें नाहीं. लौकिक दिसण्यानंतर तो त्यास मोठा लाभ झाला व प्रसिद्ध झाला, परंतु निश्चितार्थ लागला नव्हता. मग थोड्याच दिवसांत त्यास द्रव्याचा तोटा पडला, यास्तव त्याला, जो न मसलत नाहीं असें अन्यायकर्म करावें लागलें; त्यांत जे मुसलमान सरदार त्या शिंद्यास मिळाले होते, त्या बहुतेकांच्या जहागिरी त्याणें जप्त केल्या, आणि ज्यांच्या जप्त केल्या नव्हत्या, त्यास ही शंका उत्पन्न होउन ते त्याचा द्वेष करूं लागले. असें असतां शिंद्यानें बादशाहाचें नांव करून त्या रजपूतांस खंडणी मागीतली आणि आपण लष्कर सहीत जयपूरच्या दरवाजापाशीं जाउन तेथें डेरा देउन उतरला. आणि त्यांस सर्व रजपूतांस साठ लक्ष रुपये खंडणी मागीतली. त्याप्रमाणें त्यांहीं बहुतेक पैका देउन बाकी राहिला तो कांहीं अवकाशानें देउं म्हणून कबूल केलें. मग त्या अवकाशाप्रमाणें ती वेळ आल्यावर, महादजी शिंद्यानें तो ऐवज मागायास रयाजी पाटील नामें आपला सरदार पाठविला, तेव्हां त्या जयपूरकरास बादशाहाचे मुसलमान सरदार आंतून अनुकूळ होते, यास्तव ते रजपूत याणीं त्या रयाजीशीं लढून त्याचा पराभव केला. ते वेळेस दिल्लीचा बादशाह जो कोणी बलवान होईल त्यास आपलें कार्य करून घेण्यास निमित्त कारणाचे परी झालेला असे, आणि केवळ दुसऱ्यानें दिलें खाउन गरीबासारिखा होता, तोही त्या संधींत शिंद्याचा तिरस्कार करून म्हणूं लागला कीं, या शिंद्यानें माझा किमपी मान ठेविला नाहीं; असे हे मराठे लोक केवळ रानवट आहेत. ते समयीं तो महादजी शिंदा समजला कीं मी रजपूतांशीं वांकडा झालों आणि मजविषयीं बादशाहाचे लोक रुष्ट झाले. याशिवाय आपलें लष्कर व बादशाहाचें लष्कर यांचा रोजमुऱ्याची बाकी देणें पुष्कळ थकली, अशा समयीं युद्ध करून जय न झाला तर, माझा समूळ नाश होईल; एवढें संकट त्याजवर पडलें असतांही, त्या महादजी शिंद्यास युद्धावांचून दुसरा उपाय दिसेनासा झाला; तेव्हां त्याणें आपा खंडेराव नामें आपला सरदार जवळ बोलाविला आणि पूर्वी दिबायन नामें फ्रेंच जातीचा मोठा नामांकित सरदार याणें शिकविलेलीं त्याचीं दोन पलटणें नुकतींच बुंदेलखंडांतून आलेलीं होतीं, त्यांसही जवळ बोलाविलीं. मग तें आपलें लष्कर व बादशाहाचें लष्कर बरोबर घेउन सन १७८७ शांत दिल्लीहून निघोन रजपूतांवर चालिला, तो जयपुराजवळ पोंहोंचला असतां, त्याचा मनांत आलें कीं रजपूतांशीं युद्ध करून आपला परिणाम नीट होणार नाहीं; म्हणून त्याणें त्या जयपुरच्याशीं तह करावयाचा उद्योग आरंभिला, परंतु तो जयपुरचा राजा प्रतापसिंग, यास जोतपुरचा राजा व दुसरे ही कित्येक रजपूत राजे मिळून तेथें मोठें सैन्य जमा झालें होतें म्हणून ते सर्व रजपूत तह न मानून त्या शिंद्याचा लष्करचे कोटीस उपद्रव करून अनेक प्रकारें त्यास बेजार करूं लागले.

असा थोडकासा वेळ गेल्यावर त्या महादजी शिंद्याकडचे मोंगल व मराठे त्या उपद्रवास कंटाळून बादशाहाकडचा सर्व सरदारांत मोठा सरदार महंमदबेग अमदानी नामें होता, तो व त्याचा पुतण्या इसमायलबेग, तो ही त्या शिंद्याचा पक्ष सोडून रजपूतांस मिळाले. तेव्हां तो महादजी शिंदा समजला कीं, जर आतां युद्धास विलंब करीन तर हे बादशाहाचे सर्व लोक रजपूतांस आउन मिळतील, ह्मणून तात्काळ मोठ्या निकरानें परस्परें युद्ध होउन, त्यांत महंमदबेग मोठ्या तोफेचा गोळा ल्यानें मृत्यु पावला तेसमयीं, अशी संधी उत्पन्न झाली कीं, त्या महंमदाचें सर्व लश्कर पळून जावें आणि मराठ्यांचा जय व्हावा, परंतु इसमायलबेग याणें मोठा उद्योग करून त्या सर्व लोकांची थोपाथोपी केली आणि युद्ध चालविलें; तेसमयीं शिंद्यास मागें हटावें लागलें. त्यानंतर तिसरे दिवशीं शिंदा फिरून रजपूतांशीं लढावयास सिद्ध जाला; तेसमयीं बादशाहाचे सर्व पायदळ लोक ऐशीं तोफांसहीत अकस्मात त्या इसमायलबेगास मिळाले. अशा ह्या संकटसमयीं शिंद्यानें आपलें धैर्य किमपि न सोडितां फार युक्तीनें वागणूक केली, ती अशी. त्यासमयीं त्याणें आपलें सर्व जडसामान व बहुतेक बुणगें कुशळगडाकडून ग्वाल्हेरास पाठविलें; मग आपल्या लश्करासुद्धां मोठ्या त्वरेनें दीग किल्यापर्यंत हटत गेला. तो तेथें राहून आपल्या लश्कराचा लहान टोळ्या आसमंतात गेलेल्या, जमा करिता झाला. मग आपणास जाटलोक सहाय करून घेण्याविषयीं त्या जाटाचा दीग किल्ला त्यास माघारा दिला, आणि आपल्या मोठमोठ्या तोफा त्या जाटाचा दुसरा भरतपुर नामें किल्ला आहे तेथें ठेविल्या; मग आपण आग्राजवळ आउन तो किल्ला व त्या आग्रा खेरीज अल्लीगर नामें दुसरा किल्ला आहे, त्या दोहीं जागीं शिबंदी पाठविली.

तेसमयीं ते रजपूत लोक यांचा मनांत मराठे समूळ बुडवावे असें नव्हतें. ह्मणून ते निरनिराळे होउन आपआपले ठिकाणास गेले. मग इसमायलबेग तो बादशाहाचा मुलुख मराठ्यांहीं घेतलेला सोडवावयास एकटाच उद्युक्त झाला. तो प्रथम आग्राजवळ आउन उतरला आणि शिंद्याशीं मोठें युद्ध करून आग्रें घेणार होता परंतु शिंदा हलकें हलकें युद्ध करून मोठ्या युद्धास उठेना असे आठ दिवस गेले; नंतर शिंद्याला असें वर्तमान कळलें कीं, इसमायलबेगाचे कुमकेस गुलाम कादर नामें रोहिल्या, जाबितारखान रोहिल्याचा पुत्र येतो; असें ऐकतांच तो शिंदा आपल्या लश्करासहित निघोन ग्वाल्हेरास गेला. तथें त्याणें पूर्वी पेशव्यांस कुमक मागीतली होती ती पोहोचली नाहीं ह्मणून [illegible] पुनः मोठ्या आग्रहानें लिहिलें कीं माझें कार्य अद्यापि नष्ट झालें नाहीं; परंतु [illegible] इंग्लीश रजपूतांस मिळतील असें दिसतें; हें झालें तर मराठ्यांचा समूळ नाश होईल; त्यास हे समयीं सर्वांहीं आपला धनी [illegible] आहे असें ध्यानांत आणून निर्म

त्सरपणें एकचित्त होउन, आपलें राष्ट्र संभाळावयाचा अभिमान धरिला पाहिजे. असें त्या महादजी शिंद्यानें नाना फडनवीसास कुमकेविषयीं लिहिलें असतां, स्वतः उद्योग किमपि न टाकिला. त्या शिंद्याचे लोक आग्रामध्यें इस्मायल्बेगाशीं लढत आहेत आणि जाटलोक यांची इस्मायल्बेग स्पर्धा करितो म्हणून ते आपल्या लोकांचा महायार्थ इस्मायल्बेगाला उपद्रव करिताहेत; असें आणून त्या महादजी शिंद्यानें मनांत आणिलें कीं, इस्मायलबेगास गुलाम कादर जरी मिळाला आहे तरी ये समयीं आपण जाउन ते आपले आग्राचे लोकयांस कुमक करावी. त्यावरून त्याणें आपला सरदार राणेखान, व आपाजी खंडेराव यादोघांबराबर लश्कर देउन त्यांत दिबायनांचीं दोन पलटनें हीं नेमिलीं. तो राणेखान भरतपुरास जाउन तेथून जाटाचें लश्कर घेउन ते सर्व आग्रावर जावयास निघाले तों इस्मायल्बेग व तो गुलाम कादर आग्राचीं लढाई कांहीं शीराखुन तेथून निघोन त्यांवर आले. त्यांची व राणेखानाची भेट त्या भरतपुरापासून आठ कोसांवर होतांच, त्या उभयपक्षीलश्करांचें युद्ध मोठ्या निकराचें झालें. तेव्हां महादजी शिंद्याचीं पलटनें फार सदृन लढलीं; त्यांवर इस्मायलबेग आपल्या रीतीप्रमाणें मोठ्या त्वरेनें स्वयें चालून आला असतांही, फार वेळपर्यंत त्याचा उपाय त्या पलटनापुढें चालला नाहीं; त्याप्रमाणेंच दुसरा एक लिस्तेनो नामें, फ्रेंच जातीचा मोठा नामांकित सरदार जाटाकडचा असे त्याचीं पलटनें फार सदृन गुलाम कादराशीं लढलीं; त्यापुढेंही त्या गुलाम कादराचा इलाज चालेना: परंतु त्या जाटाचीं दुसरीं तीन पलटनें कोणी जहानगीरखान नामें मुसलमान सरदार याचे स्वाधीन होतीं, तो एकही बार न करितां इस्मायल्बेगास जाउन मिळाला; हें न होतें आणि त्या लश्करचे स्वार, तीं युध्द करणारीं पलटनें यांस शदृन कुमक करिते तर, ते समयींच शिंदा जयपावला असता, परंतु तें न झालें. म्हणून त्या पलटनीं लोकांचा बहुत नाश होउन त्यांस युद्ध सोडून रात्रीचा आश्रयानें आपल्या जीवाचें संरक्षण करून माघारें भरतपुरास जावें लागलें. असा मुसलमानांचा जय झाल्यावर जाटांचा मुख्य रंजितशिंग यास इस्मायल्बेग म्हणूं लागला कीं, आग्रे घेतल्यें म्हणजे मीं तुम्हें पारिपत्य करावयास चुकणार नाहीं. असें त्या इस्मायल्बेगाचें फुशारकीचें बोलणें शेवटास न गेलें; कांकीं, लस्कर दादा नामें आग्राचा किल्लेदार होता, त्याणें आपल्या किल्याचा संभाळाचा उद्योग निरन्तरपणें केला, त्यामुळें तें कार्य फारलांबलें. तेव्हां त्या मुसलमान लोकांत परस्परें अविश्वास उत्पन्न होउन, वैमनस्यें पडूं लागलीं; याच्येगेस त्याचसमयीं राणेखानास वर्तमान कळलें कीं शिख लोक यांणीं उत्तरेकडून येउन मोगलांच्या मुलखांत स्वारी घातली. तेव्हां त्या राणेखानानें आपल्या लश्कराची एक टोळी त्या शिखांचे कुमकेस पाठवून त्यांस सांगितलें

कीं,

कीं, गुलामकादराचे जहागिरीचा नाश करावा. ते समयीं त्यांहीं तसेंच केलें असतां, तो गुलामकादर आपलें सैन्य घेउन तो उपद्रव मोडावयासाठीं आपल्या मुलखास गेला. तेंच समयीं शिंद्यानें राणेखानाच्या लश्करास कुमक पाठविली. तेव्हां तो पुनः इस्मायलबेगास जिंकावयाकरितां आग्र्यास गेला. मग सन सत्राशें अठ्यायशींचा जुनमहिन्यांत अठराव्ये तारिखेस त्या आग्र्याजवळ मोठें युद्ध होउन त्या इस्मायलबेगाचा पराभव जाला; त्या युद्धांत तो इस्मायलबेग हा फार जखमी जाला; परंतु त्याचा घोडा बहुत चांगला होता म्हणून तो त्या घोड्यासुद्धां यमुनेंत उडी घालून आपला जीव वांचवून पार निघोन गेला. मग तसेच त्या बरोबर यमुनेंतून पार गेले त्या थोडक्या लोकांनिशीं तो गुलामकादराच्या लश्करांत गेला; आणि त्याचे जे लोक पळाले ते बहुतेक दिल्लीस गेले. त्या समयीं शिंद्याच्या दिवायन यांचीं पलटनें मोठी योग्यता पावलीं।

असा जय पावल्यावर तो महादजी शिंदा लागलाच दिल्लीस न गेला म्हणून तेथचे लोक ती त्याची मोठी चूकशी मानूं लागले; परंतु त्या नजाण्यांत शिंदा आपलें हित असें समजला असेल कीं, इस्मायलबेग व गुलामकादर हे दोघे दिल्लीमध्यें आपल्या लश्कराचा बंदोबस्त करीत असतां, यांचा स्नेह फार दिवस टिकणार नाहीं; मग दुफळी जाल्यावर एक आपणास अनुकूळ होईल. याखेरीज पुण्याहून नानाफडनवीसाकडून कुमक ही तोंपर्यंत येईल. मग त्याप्रमाणें पुण्याहून तुकोजी होळकर व अलीबहादर हे दोघे लश्कर घेउन आले; नंतर शिंद्यानें राणेखान व आपाजी खंडेराव व अलीबहादर व दिवायन यांचीं दोन पलटनें इतके दिल्लीस पाठविले.

इकडे दिल्लींत गुलामकादर व इस्मायलबेग यांणीं आपल्या लश्कराचा बाकी ऐवज घ्यावयाकरितां बादशाहाचें घर लुटलें; नंतर तो गुलामकादर दिल्लींत प्रबळ होउन त्याणें दोन महिने पर्यंत त्या बादशाहास व त्याच्या कुळास अत्यंत दुःख दिलें* कीं तें पाहून इस्मायलबेगास बहूत खेद वाटून त्या उभयतांचें वांकडें पडलें, मग मराठ्यांचें लश्कर दिल्लीस येउन पोंचलें. तेव्हां तो इस्मायलबेग व दुसरे तेथचे लोक मोठ्या हर्षे करून त्यांस आंत घेते जाले. नंतर त्यांहीं एक मोठी टोळी सिद्ध करून गुलामकादरास धरावयाचा उद्योग आरंभिला. तेव्हां तो आपल्या लोकांसुद्धां पळून जाउन मीरतनामें किल्ल्यांत शिरला, मग त्याचे पाठीस लागले त्या लोकांशीं तो तेथून मोठ्या निकरानें लढला. परंतु त्या किल्ल्यांतली धान्यादिकांची बेगमी सरली, तेव्हां तो चांगल्या घोड्यावर बसून एक

* तो गुलामकादर दिल्लींत प्रबळ होउन त्याणें तेथचा बादशाह शाहाअलम यास तख्तावरून उठवून त्याचा पुत्र बेदारबख्त यास त्याचे जागीं स्थापून त्या बादशाहाचा फार अपमान करून त्या निगराचा अर्थानें आपल्या हातें त्याचे डोळे काढिले, आणि त्याच्या स्त्रिया व कन्या व त्यांचे सगे सोयरे व त्यांच्या स्त्रिया यांची अनिर्वाच्य अमर्यादा केली; आणि त्या कित्येकांस अन्नावांचून उपाशीं मारिलें.

टाच तेथून पळाला. तो कित्येक दूर गेल्यावर रात्रीं अंधारांत, त्याचा घोडा पडला; तेव्हां त्यास अगाध कावसला कीं, त्यायोगें त्याला गतप्राणाचेपरी मूर्छा येऊन तो अचेतन पडला. मग दिवस उगवल्यावर कोणी शूद्र तेथें आला त्याणें त्यास पाहिलें मग तेथून उचलून त्यास मराठ्यांचा लश्करांत नेला. नंतर तो त्या लश्करांत बंदीस असतां कांहीं दिवसांनीं शिंद्यानें त्याचे हात पाय तोडून तो थोटा केला; मग तो कांहीं दिवसांनीं मृत्यु पावला. नंतर त्या गुलाम कादरानें शहाअलं बादशाहाचा पुत्र बेदरबखत यास दिल्लींतून आपण पळतांना आपल्याबरोबर मिरत किल्यांत नेला होता तो मग त्यांचा हातीं लागला त्यांहीं त्यास किमपि दुःख न देतां मर्यादेनें बंदींत ठेविला; शेवटीं त्याचा वडिलास शिंद्याचे योगें तक्ताधिपत्य आल्यावर त्याणें त्या आपल्या पुत्रास जिवें मारून टाकिला, असें वर्तमान सन सत्राशें एकुणनव्वदांत घडलें.

त्यानंतर महादजी शिंदा याणें गुलाम कादर याची जहागीर व बहुतेक दुआबप्रांत व दिल्ली व आग्रें हे दोन परगणे घेतले. एवढें यश त्यास प्राप्त झालें तथापि तो निर्भय झाला नव्हता. तेवेळेस अफगाणाचा बादशाह तिमोरशाह अब्दाली याचे लोक मुलखांत स्वाऱ्या घालीत होते ते आपणावर येतील असें त्या महादजी शिंद्यास वाटत होतें; याखेरीज रजपुतांमध्यें ही मोठमोठे त्याचे द्वेष्टे असत. याशिवाय त्याचें साहाय्य होळकर व अलीबहादर यांस त्याचें कार्य शेवटास नेण्यापेक्षां त्याणें संपादिलेल्या मुलखाचा भाग घेण्याविषयीं आशा फार होती तो हें सर्व आणून आपल्या वृद्धीचा उद्योग त्याणें टाकिला नाहीं. तो प्रकार लिहिण्याचे पूर्वी शिंद्यानें आपल्या लश्कराचा काय काय बंदोबस्त नवा केला तो समजला पाहिजे.

प्रथम त्याणें पहिल्यापेक्षां रजपूत व मुसलमान चाकरीस बहुत ठेविले, आणि त्याचे स्वार पूर्वी चोळणे घालीत असत, ती चाल मोडून स्वारांहीं घोटपर्यंत लांबीचा विजारा घालावयाची चाल पाडिली; आणि त्या पूर्वी मराठ्यांचा लश्करांत गोसावी लोक फारसे नव्हते ते अधिक ठेवून त्यांचा एक समुदाय नवाच मोठासा करून हिमत बहादर नामें त्यांचा गुरू होता त्यास त्या मंडळीची मुख्यता दिली. यासर्वांपेक्षां त्याणें त्या दिबायनाचीं दोन पलटनें होतीं तीं प्रतिपलटनास सातशें लोक याप्रमाणें पलटनें चोवीस केलीं आणि त्या प्रतिपलटनास मैदानांत लढाईच्या उपयोगी अशा हलक्या हलक्या तोफा पांच पांच दिल्या. त्या चोविसा पलटनांतील आठ आठ पलटनांच्या बृगेडनामें एक एक भाग करून, एकेका बृगेडास पांच पांचशें स्वार नेमिले. या इतक्या समुदायाचें मुख्यत्व दिबायनास दिलें, आणि त्या पलटनांचा खर्चास पुरेसा मुलुख देऊन त्या मुलुखाचे उत्पन्नांत शेंकडा दोन रुपये प्रमाणें त्या दिबायनानें आपलें स्वामित्व संबंधें घ्यावे, व त्यास जातीनें दरमहा दहा हजार रुपये

केला

केला. त्या पलटणींत कोकांत त्या दिवाणानें आपल्या हाताखालीं विलायतेचे कित्येक मुलुखचे मोठे मोठे चतुर साहेब लोक ठेविले होते; त्यांत एक सांगस्तर नामें साहेब होता तो बंगाल्याचा मुख्य साहेबापाशीं होता; मग त्याणें गोहदचा राण्याची चाकरी कांहीं दिवस करून शिंद्याचा पलटणींत राहिला. तो तोफा ओतावयाचा कामांत अत्यंत कुशळ असे; त्याणें फार चांगल्या साहतोफा शिंद्यास ओतून दिल्या, मग शिंद्याचा तोफखाना वाढतां वाढतां त्यांत अनेक प्रकारचा तोफा दोनशांवर जमल्या; एवढी त्या महादजी शिंद्याची दवलत वाढली.

सनसत्याशीं नव्वदांपासून त्र्याण्णवपर्यंत झालेलीं वर्तमानें मि-

ळून भाग सहावा

## अनुक्रमणिका

टिपूनें पेशव्यांशीं तह केलेला मोडून फौजेची तयारी केली.

नंतर टिपूनें इंग्लिशांचा मित्र त्रावनकोरवाला याशीं युद्ध केलें असतां त्याचा पारिपत्याविषयीं इंग्लीश, व मराठे, व मोगल, यांचें ऐक्य झालें.

इंग्लीशांनी वेळीं परशुरामभाउस मिळून टिपूशीं युद्धाचा उपक्रम केला.

धारवाड किल्ल्याचा युद्धाचा प्रकार.

मद्रासकडून इंग्लीशांचें लष्कर आलें त्याचें धारणें.

मोगलांचा वर्तणूक.

हरिपंत फडके व परशुराम भाउ यांचें लष्कर इंग्लीशांस मिळालें तो विस्तार.

लार्ड कार्नवालिसानें टिपूचा पराभव करून श्रीरंगपट्टणास घेरा घालाव-याची तयारी केली असतां, अन्नतृणादिकांचा टंचाईमुळें त्यास तो उद्योग सोडावा लागला.

यानंतर इंग्लीश व मराठे व मोगल यांचा टिपूचा मुलखीं कसकसा संचार झाला तो प्रकार.

लार्ड कार्नवालिसानें पुनः श्रीरंगपट्टणास घेरा घातला. मग तह झाला त्यावर इंग्लीश व मराठे व मोगल यांस कायकाय लाभ झाला ती कथा.

परशुरामभाउ श्रीरंगपट्टणास दिल्वें करून आला तो विस्तार.

त्यासमेतून माघारा पुण्यास जातांना वाटेनें बहुत उपद्रव सोसावा लागला.

## भाग सविसावा.

सन सत्राशें सत्यायशीं मध्यें टिपूनें फार झटून नट केला तथापि हरिपंत फडका यांचें लश्कर तुंकेच कृष्णेचे पलीकडे पोंहचलें न पोंहचलें तोंच, त्याणें कित्तूर मराठ्यांपासून घेतलें; व बंदनुरास कांहीं लश्कर जमा करून कोंकणपट्टी मराठ्यांपासून घेणार असें दर्शविलें. असें त्याचें एकसमयींच नट करणें आणि तहि परीत वागणें याचें मूळ कारण त्या टिपूचा स्वाभाविक चांचल्या वांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं; परंतु त्यासमयीं कित्येक इंग्लीश असें समजले कीं, टिपू व नाना फडनवीस व निजामअल्ली व फ्रेंच हे सर्व मिळून आम्हास बुडविणार आहेत. आणि नाना फडनवीस समजला कीं, मराठे बुडवावे असेंच टिपूचा मसलतीचें तात्पर्य. त्यावरून त्या नानानें कलकत्याचा मुख्य लार्ड कानवालीस नामें साहेब याकडे वकील पाठवून स्पष्ट विचारिलें कीं, टिपूचें प्राबल्य न होण्यास तुमचें व आमचें ऐक्य असावें. त्यावर त्या साहेबानें उत्तर दिलें कीं, यांत आमचें हित आहे परंतु आमच्या सरकारची आज्ञा अशी आहे कीं जो आपणाशीं विरोध करील त्याशींमात्र वक्र असावें. टिपूनें पूर्वीं आम्हांशीं जें बोलणें केलें आहे त्यांत जर त्याकडून कांहीं अंतर पडेल तर आम्ही तुम्हास मिळूं.

यानंतर टिपूचें आचरण इंग्लीशांविषयीं विपरीत नाहीं असें समजून कलकत्याचा मुख्यानें मनांत निश्चय केला कीं, पूर्वीं सन सत्राशें अडसष्टांत निजामअल्लीनें करार केला कीं, बसालतजंग मृत्यु पावल्यावर त्याची जहागीर गंटूर परगणा इंग्लीशांस मी देईन. त्याप्रमाणें तो बसालतजंग सन सत्राशें ब्यायशींत मृत्यु पावला; त्यास हे समयीं त्याला मागावयास योग्य आहे. असें समजून त्याकडे त्या साहेबानें वकील पाठवून मागतांच त्या निजामानें तो परगणा त्यांस दिला. तो प्रांत अति उत्कृष्ट असून त्याणें उगाच दिला असें नाहीं, तो समजला कीं, हाल्लीं हिंदुस्थानामधें मराठे व इंग्लीश व टिपू व आम्ही सत्ताधारी यांसर्वांमध्यें न्यूनबळ असा मीच आहें; त्यास यांतील कोणा एकाचा आश्रय केल्यावांचून माझें रक्षण होणार नाहीं.

त्या निजामाचा मनांत होतें कीं, टिपूशीं स्नेह करावा; कांकीं, तो आपल्या जातीचा मुसलमान आहे. परंतु त्याचे वजीर वगैरे मुत्सद्दी यांणीं त्यास मसलत दिली कीं, हे समयीं तुम्हीं पूर्वींच्या तहाप्रमाणें इंग्लीश यांस गंटूर परगणा देऊन दोघांपासून दोन्ही वस्तू तोफा व गंइंसी पहिल्या करारप्रमाणें त्या इंग्लीशांस मागून, मग त्यांशीं स्नेह ठेवाल तो उपयोगी होईल. असें ठरवून त्या निजाम

अल्लीनें

अल्लीनें कलकत्त्यास वकीलही पाठविला; परंतु सरळपणानें वागणें त्याच्यानें होईना तें असें. त्याणें कलकत्त्याचा मुख्याकडे वकील पाठविला असतांही, टिपूशीं स्नेह साधावयाकरितां दुसरा वकील पाठविला. त्याचें बोलणें आलें कीं, तुमचा स्नेह मला मान्य आहे, आणि तुमचा व आमचा कांहीं शरीरसंबंधही व्हावा; त्यावर निजामास राग येउन तें मान्य न करितां तसेंच राहिलें. असें असतांही इंग्लीशांकडे टिपूचा वकील बोलणें करीत असतां त्यास त्या लाटकानवालिसानें उत्तर दिलें कीं, पूर्वीच्या करारप्रमाणें तुह्मास आह्मीं पलटनें व तोफा व खंडणीही देतों; परंतु टिपूला जिंकावयाविषयीं या वेळेस आह्मीं तुमचें साहाय्यास विलायतेचे आज्ञेवांचून येणार नाहीं. आणि पुढें कधींही कर्नाटक, बालेघाट, आमच्या स्वाधीन झाल्यावर त्याविषयीं जो तुमचा व आमचा पूर्वी करार ठरलेला आहे त्याप्रमाणें तो मुलुख तुह्मास देउं. असें त्या लाटाचें उत्तर निजामास गेल्यावर टिपूला समजलें कीं, आह्मास जिंकावयाविषयीं निजामाला इंग्लीश अनुकूळ झाले. यावरून तो टिपू क्रुद्ध झाला आणि पूर्वी त्याणें इंग्लीशांचा साहाय्यावरून कोरच्या राजा यावर मोहिम करून तो मुलुख घ्यावयाचा बेत केला होता. तो सिद्धीस न्यावयाचा उद्योग करूं लागला.

तो टिपू सन सत्राशें एकुणनव्वदांच्या डिसेंबर महिन्यामध्यें त्रावनकोरास जाउन त्या राजाच्या लष्करावर हल्ला करिता झाला. त्या युद्धामुळें नाना फडनवीस याच्या पूर्वील बोलण्याप्रमाणें सन सत्राशें नव्वदांच्या जून महिन्याचे पहिले तारिखेस पुण्यामध्यें इंग्लीश व नाना फडनवीस, व निजाम अल्ली, यांचें ऐक्य झालें. त्यासमयीं असें ठरलें कीं, निजाम अल्ली व नाना फडनवीस मिळून पंचवीस हजार फौज घेउन या पर्जन्यकाळांतच जाउन उत्तरेकडचा टिपूचा मुलुख घ्यावा. त्यानंतर पर्जन्यकाळ गेल्यावर त्या तिघांहीं मिळून होईल तितकें लष्कर जमा करून टिपूचा सर्व मुलुख घ्यावा. त्या कामास इंग्लीशांहीं दोन पलटनें मराठ्यांस द्यावीं, व दोन निजामास द्यावीं; त्या पलटनांचा खर्च त्या उभयतांहीं द्यावा.

त्या मुलखांत या तिघांतील कोणा एकाचेंही पूर्वील स्वामित्व नाहीं असा जो मुलुख असेल तो तिघांहीं वांटून घ्यावा. याशिवाय कोणी पेशव्यांकडील किंवा निजामाकडील पाळेगार अथवा जमेदार हेदरानें घालवून दिलेला असेल त्यास त्याचे जागीं स्थापून त्याजपासून कांहीं द्रव्य नजर घ्यावें; तें तिघांहीं वांटून घ्यावें; आणि या तिघांतील जो कोणाचा मुलुख पूर्वीचा असेल त्याचें स्वामित्व त्याणीं करावें. असा नेम ठरल्यावर इंग्लीशांचें लष्कर मद्रासेहून निघालें, आणि मुंबईहून दोन पलटनें व सहा तोफा निघाल्या; त्या अंबेघाटानें वर चढून तासगांवीं जवळून जून महिन्याचे अठराव्ये तारिखेस पोहोंचल्या. त्यांचा मुख्य कप्तान लिट्ल नामें साहेब होता; त्याबरोबर मरा

ठ्यांहीं

ठ्यांहीं आपल्या कारकून संगमेश्वरापासून दिला होता. त्याणें त्या साहेबाचा आज्ञेस कांहीं युक्ति करून अनेक प्रकारें विलंब लाविला; आणि टिपूचा वकील पुण्याहून अद्यापि गेला नाहीं असें त्या साहेबास वर्तमान कळलें; त्यावरून त्या साहेबाला कांहीं चमत्कार वाटला. जेव्हां तो तासगांवास पोहचला तेव्हां तेथें मराठ्यांच्या स्वारांची तयारी त्यांहीं ठरल्याप्रमाणें नाहींशी पाहून तो समजला कीं, कारकुनानें विलंब लाविल्याचें कारण हेंच. तो तेथें पोहचला तेव्हां मराठ्यांचे स्वार दोन हजार मात्र जमले होते. मग ती तयारी न होण्याचें कारण शोधितां इंग्लीशांस असा ठिकाण लागला कीं, मराठे टिपूस ह्मणतात कीं, आह्मीं व निजामअल्ली व इंग्लीश एकमत झालों आहों तरी तुह्मीं आह्मांस कांहीं द्रव्य द्याल तर आह्मीं तें मोडून तुमचा पक्ष स्वीकारूं. असें त्याशीं बोलणें मात्र करून त्या टिपूपासून द्रव्य घेतल्यानंतर त्यावर उलटून त्यास बुडवावयाचा मसलतींत आहेत; इतकें इंग्लीशांस समजलें. ते मराठे टिपूकडून द्रव्य येईल ह्मणून कांहीं दिवस वाट पहात होते, परंतु तें सिद्धीस जात नाहींसें पाहून मग त्यांहीं आगस्ट महिन्याचे पांच तारखेस त्या वकीलाला निरोप दिला.

यानंतर परशुराम भाउ पुण्याहून निघोन कृष्णा उतरावयास त्याला आगष्टाची अकरावी तारीख लागली. त्याबरोबर पांच हजार स्वार व दीड हजार पायदळ होतें. त्यानंतर थोडकेच दिवसांत प्रतिनिधी कांहीं स्वारांसहित येउन त्या परशुराम भाउस मिळाला; याशिवाय विजयदुर्गचे बंदराच्या कामावर धोंडोपंत गोखला नामें होता तो एक हजार स्वारांसहित येउन त्या भाउला मिळाला. त्या धोंडोपंतानें इंग्लीशांचे आज्ञेंत वागावें असें परशुराम भाउच्या मनांत आलें, परंतु ती मसलत कांहीं कारणामुळें सिद्धीस न गेली; तथापि त्या दिवसापासून इंग्लीश व गोखले यांचा परिचय झाला; मग त्या इंग्लीशांच्या द्वारें त्या धोंडोपंतांचा पुतण्या बापू गोखला तो पुण्याचे दरबारीं मोठी योग्यता पावला; नंतर कालेंकरून त्याशीं व इंग्लीशांशीं द्वेष पडला, तें प्रकरण पुढें लिहिण्यांत येईल.

यानंतर पंचविसाव्ये तारिखेस मराठ्यांहीं टिपूचा लहानसा कोटाचा गांव घेतला. त्यापासून परस्परें युद्ध चालू झालें, आणि मराठ्यांचें लष्कर तेथून पुढें चालतां चालतां टिपूचा मुलुखचे रयत लोक ह्या टिपूचे शिबंदीस घालवून मराठ्यांकडे मिळावयास सिद्ध आले. मग त्या शिबंदीलोकांहीं आपला धणी कोण हा विचार मनांत न आणितां, त्या परशुराम भाउची चाकरी धरून मुलखाची बाकी घेण्यास त्याला साहाय्य झालें. नंतर थोडक्याच वेळांत आणखी मराठे लोक थोडे थोडे येउन, त्या परशुराम भाउस मिळतां मिळतां, इंग्लीशांचीं दोन पलटनें खेरीज करून, मराठ्यांचें लष्कर सुमारें दहा हजार स्वार व तीन हजार पायदळ अ

मलें

मलें. मग त्या लश्करासहित तो परशुरामभाऊ सतेंबराचे अठराव्ये तारिखेस, धारवाडाजवळ जाउन तो किल्ला घ्यावयाचा उद्योग करूं लागला. त्यांत दिवसास दुरून तोफांचे गोळे त्या किल्ल्यास मारावे, आणि रात्रीस त्या तोफा माघाऱ्या नेउन तोफखान्यांत ठेवाव्या; असें अनुपयुक्त आणि उपहासास्पद युद्ध दोडमहिनापर्यंत त्या परशुरामभाउनें चालविलें. मग तो कांहींसा उपयुक्त वर्तला; तो असा. कित्येक लोक त्या किल्ल्यांतून बाहेर येउन युद्धाविषयीं राहिले होते, त्यांवर हल्ला करून त्यांस किल्ल्यांत घालवून, त्यांच्या तीन तोफा घेतल्या. तेसमयीं इंग्लीशांची पलटनें उपयोगी पडली; त्यांहीं मराठ्यांच्या साहाय्यावांचून त्या किल्ल्याची पेंठ झडीलावून घेतली. तेसमयीं त्या पलटनाचा लिटल साहेब व दुसरा कोणी येक साहेब हे दोघे सर्वांच्या पुढें त्या भिंतीवर चढले तेव्हां त्या दोघांसही जखमा लागल्या, आणि त्या पलटनांतील शिपाई लोक मेले व जखमी मिळोन बासष्ट पडले. मग ती घेतलेली पेंठ इंग्लीशानें परशुरामभाउच्या पुत्र आपासाहेब याच्या स्वाधीन करून आपण आपल्या छावणीस गेला. तेव्हां त्या पेंठेंत मराठ्यांवर आंतले किल्लेकरी चालून येउन त्या उभयतांचें मोठ्या निकरानें युद्ध झालें. तेसमयीं मराठे मेले व जखमी मिळोन पांचशें पडले; त्यापेक्षां त्या किल्लेकराचा अधिक नाश झाला, आणि ते माघारे गेले, असें असतांही तो आपासाहेब तेथून निघून आपल्या लोकांसहीत माघारा लश्करांत गेला. तेव्हां ती पेंठ त्या किल्लेकरांच्या स्वाधीन सहज झाली. नंतर उभयपक्षीं मेलेल्या लोकांस जाळावयासाठीं कांहीं दिवसांचा सल्ला झाला. असे त्या युद्धाच्या आरंभ दिवसापासून, मराठ्यांहीं तीन महिने कच्चा मसलतीनें घालविले; नंतर पुनः ती पेंठ घ्यावयाचा अभिमान धरून, लाजेनें इंग्लीशांची कुमक न घेतां, मराठ्यांहीं लढून लढून ती पेठ घेतली. यापुढें मराठे व इंग्लीश त्या किल्ल्याशीं लढतां लढतां. तेथच्या किल्लेदारानें परमशौर्येंकरून किल्ला साडेसहा महिनें संभाळिला. शेवटीं निरुपाय होउन सन् सत्राशें नव्वदांच्या एप्रेलाचे चवथे तारिखेस त्याणें मराठ्यांच्या स्वाधीन केला.

असें धारवाडाचें वर्तमान असतां. इंग्लीशांचें लश्कर मद्रासेहून निघालें तें दक्षिणेकडून टिपूच्या मुलखांत शिरून कारूळ, व दिंडीगाळ. व कुंबिनूर व पालघाट इतका मुलुख जानेवारीचे समाप्तीपर्यंत हस्तगत करून ते लोक माघारे मद्रासेस गेले. इतक्यांत मुंबैकडून फौज निघोन समुद्रकांठीं कालीकटनामें बंदराजवळ टिपूचें कांहीं लश्कर होतें, त्याचा पराभव प्रथम करून टिपूचे लोक मलबारांतून घालवून तो मुलुख घेतला.

इकडे मद्रासेस, पाहिलें लश्कर माघारें आल्यावर विलंब न करितां ल्याटकान पालिसनामें साहेब आपलें दुसरें लश्कर घेउन पुनः टिपूच्या मुलखास चालिला.

तो

तो बिलोरावरून बंगलोरास जाउन मार्चाचे पांचव्ये तारिखेस घेरा घालून युद्ध करून तें शहर घेतलें. तेसमयीं मोंगलांचें लश्कर मद्रासेच्या दोहों पलटनांच्या साहाय्यें करून कोपाळाशीं लढत होतें. मग इंग्लीशांहीं तें शहर घेतलें सें ऐकून तो किल्लेदार अधीर होउन, निजामास किल्ला देता झाला.

त्यापूर्वीं पुण्यांहून जानेवारीचे पहिले तारिखेस पंचवीस हजार स्वार व पांच हजार पायदळ घेउन हरिपंत फडका पंढरपुराकडून भीमा व कृष्णा यांचा संगमापाशीं पार उतरून, गंडावळापर्यंत गेला. मग तेथून आपलें दोन हजार लश्कर रवेगीज करून बाकी सर्व लश्करानें करनोळापर्यंत चालावें अशी आज्ञा देउन आपण त्या दोन हजार लश्करासहीत निघाला तो निजामअल्ली आपल्या मुलखाचे मर्यादेचा पांगलगावीं होता तो तेथून आपल्या लश्कराची वर्तणूक करवितो असें दाखवीत होत्साता, तेथें मुकाम करून राहिला असे; त्याचा भेटीस गेला त्या भेटींत असें ठरलें कीं, इंग्लीशांशीं तहाप्रमाणेंच वागावें, परंतु टिपूचा समूळ नाश न करावा. यानंतर हरिपंत फडका याणें लाटकानवालिस याचे कुमकेस दहा हजार फौज पाठविली. ते लोक अनंतपुरास पोंहचले तेव्हां, त्यांस कळलें कीं, मोंगलाची दहा हजार फौज त्या लाटाचा कुमकेस जात असतां, वाटेंत टिपूचा कोणी कुतुभ आदीन नामें सरदार यास जिंकून मग लाटास मिळून ते सर्व श्रीरंगपट्टणास गेले. यास्तव आपलें तिकडे जाण्याचें प्रयोजन नाहीं असें समजून हरिपंताची मार्गप्रतिक्षा करित तेथें मुकाम करून राहिले.

तो लाट्कानवालिस श्रीरंगपट्टणावर निघाला असतां टिपूनें त्या आपल्या राजधानीपासून लाटाचा लश्करापर्यंत मुलुख आकून उद्ध्वस्त करून शत्रूचा लश्करास धान्य तृणादि मिळेनासें करून टेविलें होतें. मग तें लश्कर त्या श्रीरंगपट्टणाजवळ येउन पोंहचलें असतां, टिपू युद्धास उभा राहिला. तेसमयीं तो पराभव पावून त्यास श्रीरंगपट्टणाचा आंत पळून जाणें प्राप्त झालें. तेव्हां लाट्कानवालिससाहेब याणें श्रीरंगपट्टणाजवळ मे महिन्याचे एकोणिसाव्ये तारिखेस डेरे दिले. तेसमयीं पर्जन्यकाळ जवळ आला आणि त्याच्या लश्करास वाटेनें अन्न तृणादि मिळालें नव्हतें त्यायोगें लोक बहुत हैराण झाले; याजमुळें त्यास हें बास वाटलें कीं हें कार्य शेवटास जात नाहीं, याशिवाय मराठ्यांचें लश्कर साहाय्यास येणार होतें त्याचें ही कांहीं वर्तमान कळत नाहीं. हा सर्व विचार मनांत आणून त्या लाटानें मुंबईहून लश्कर येत होतें त्यास आज्ञा केली कीं, हे वेळेस तुम्हीं माघारें जावें, आणि आपण आपल्या मोठ्या मोठ्या तोफा नासून टाकून तें युद्धाचें काम सोडून तेथून निघोन मेलगोटाची पहिली मजल करावयाचा बेतानें तिकडे चालिला, तो तेथें पोंहचला नाहीं तोंच त्याचे दृष्टीस पडलें कीं, मोठ्या मोठ्या स्वारांचा टोळ्या आपल्या

कडे

कडे चोहींकडून येतात; तेव्हां त्यास वाटलें कीं, हे आपल्यावर कोणी शत्रूचे लोक चालून आले, ह्मणून त्याणें युद्धाविषयीं तयारी केली; मग त्यास समजलें कीं, हें लश्कर आपल्या कुमकेस परशुराम भाउ व नाना फडनवीस यांचें आलें. त्यांत परशुराम भाउचें लश्कर धारवडाकडून आलें, आणि नानाकडून हीं येउन पोंहचलें; तीं दोनीं लश्करें चोविसाव्ये तारिखेस एकत्र मिळून दुसरे दिवशीं त्यांचा व लाटाची पंचविसाव्ये तारिखेस गांठ पडली. ती कुमक आपणास येत्ये असें त्या लाटास पूर्वी न समजण्याचें कारण असें, कोणी टिपूकडचे पेंढारी लोक व वेरड यांहीं बहुत चातुर्य करून जे त्या लाटास बातमी पोंहचविणारे जासूद त्यांस वाटेंतच मारून टाकिले, यास्तव त्यास वाटलें कीं, आपणास कोणी कुमक येत नाहीं, ह्मणून त्याणें तें काम सोडिलें आणि तेथून निघाला, नंतर ती कुमक पोंहचल्यावर त्या लाट कानवालिसास पश्चात्ताप झाला कीं, आपण श्रीरंगपट्टणास घेरा घातलेला उठवून निघालों हें दैवगतीनें विसंगत पडलें. मग त्या लाटास मराठ्यांच्या लश्करींचा आजारांत धान्य तृणादि सर्व सामग्री मिळालसें पाहून फार संतोष झाला. यानंतर असें ठरलें कीं, तिघांहीं मिळून धारामहाल हस्तगत करावे; तें कार्य लाट कानवालीस याणें सिद्धीस नेलें, आणि मराठे व मोगल यांहीं आणखी कांहीं किल्ले घेतले. नंतर दिसेंबराच्या शेवटास त्या साहेबानें फिरून त्या श्रीरंगपट्टणावर जावयाची तयारी केली परंतु परशुराम भाउ आपल्या कांहीं लाभसाधनास चित्रदुर्गापाशीं गुंतून त्या लाटाकडे जाईना आणि मोंगलांचें लश्कर गरमकोंड्याजवळ छावणी करून होतें, त्याचाही येण्याची त्वरा दिसेना. हरिपंत फडका तर त्या लाटाच्या जवळच होता परंतु त्याणें आपल्या लाभासाठीं युद्धाचें निमित्त करून मुलखाचा वसूल जमा करावयास आगोजाग लश्करांतून आपले बहुतेक लोक गुंतविले होते, या अडचणीमुळें तें श्रीरंगपट्टन घेण्याचें काम तसेंच ठेवून तिकडे जावयाच्या मार्गांतील किल्ले घ्यावयाचा उद्योग आरंभिला. मग त्याणें पांच किल्ले हस्तगत केल्यावर, सन् सत्राशें ब्याणवांच्या जानेवारीचे पंचविसाव्ये तारिखेस तो उत्तर दुर्ग किल्याजवळ गेला असतां, तेथें मोंगलांचें लश्कर येउन त्यास मिळालें. इतक्यांत हरिपंत फडक्याचें ही लश्कर येउन त्या लाटास मिळालें. तेव्हां तो लाट कानवालीस व हरिपंत फडका व निजाम अल्लीचा पुत्र शिकंदरजा, हे तिघे मिळून फेब्रुवारीचे पांचव्ये तारिखेस श्रीरंगपट्टनाजवळ जाउन पोंहचले. मग दुसरे दिवशीं टिपूचे लोक त्या पट्टनाच्या तटाबाहेर जे होते त्यांवर हल्ला करून माघारे कोटांत घालविले, आणि त्या शहरास घेरा घालावयाची तयारी केली. नंतर मुंबई सरकारचें लश्कर सोळाव्ये तारिखेस येउन पोंहचलें. तें त्या घेरा घालण्याच्या कामास फार उपयोगी पडलें.

आणि

आणि बेविसाव्ये तारिखेस टिपूनें त्यांवर आंतून मोठी स्वारी घातली असतां त्यांहीं. आपला बंदोबस्त नीट राखून त्यास मागें हटविला. त्यापूर्वीपासूनच टिपूनें तहाचें बोलणें लाविलें, परंतु तें त्या लाटाच्या मनास येईना. शेवटीं टिपूनें त्या मुंबईचे टोळीवर हल्ला केला तो व्यर्थ झाल्यावर दुसरे दिवशीं टिपू त्या लाटाच्या मनास येईसा तह करिता झाला तो प्रकार असा. त्या युद्धप्रसंगाच्या पूर्वी जितका मुलुख टिपूचा होता त्यापैकीं निमें त्या तिघां जणांस असावा; आणि एक कोटि पांसष्ट लक्ष रुपये तूर्त द्यावे; नंतर एका वर्षांत आणखी तितकेंच द्रव्य तीन हप्त्यांनीं द्यावें. याप्रमाणें भरणा पुरता होई तोंपर्यंत टिपूनें आपले दोघे पुत्र ओलीस दिले. असें झाल्यावर त्या टिपूकडून आलेलें वित्त त्या तिघांहीं वांटून घेतलें; आणि त्यापासून घेतलेल्या मुलखाची वांटणी करून घेत असतां, एकेकास चाळीस चाळीस लक्षांचा विभाग आला. त्यांत मराठ्यांस भाग वरदानदी व कृष्णा या दोहींचा मधला बहुतेक मुलुख, आणि विलोरीपाशीं सोंडूर नामें खोरें आहे ती जमीन आली. निजामाचा वांटणीस घुटी व खरपा या दोन जागा व यांचा मधला मुलुख आला त्याची पश्चीम मर्यादा† मुद्गल व कनकगिरी व कोपाळ. इंग्लीशांस वांटणी आली ती बारामहाल व कुर्ग व मलबार.

यानंतर मार्चाच्या शेवटास ते तिघेही मुख्य एकमेकांचा परस्परें संमान करून एकमेकाची आज्ञा घेउन आपआपल्या ठिकाणास गेले.

परशुरामभाउ तो तह होईपर्यंत त्या श्रीरंगपट्टणास लश्करमध्यें पोंहचला नव्हता; त्यास कित्येक वेळा हरिपंत फडका याणें तेथें येण्याविशीं बोलावणें केलें, आणि त्यास लाटकानवालीस याची मसलतही कळली होती; परंतु ते समयीं तो समजला कीं, हे वेळेस आपल्याजवळ इंग्लीशांचीं पलटनें आहेत. यायोगें बेदनूर हस्तगत होईल; अशा अर्थें तो त्या श्रीरंगपट्टणाकडे न जातां बेदनुराकडे चालिला. तेव्हां त्यास वाटेंत होळीआनोर नामें किल्ला लागला, तो त्या पलटणांहीं घेतला. मग तो परशुराम भाउ तेथून पुढें तुंगेच्या कांठानें चालत असतां त्यास शिमोगा नामें दुसरा किल्ला लागला, तो घ्यावयाचा नेम केला; तेव्हां त्या किल्याचे निर्ऋतीदिशेस दोन कोसांवर एक मोठ्या झाडीचा मुलुख होता त्यांत, टिपूचा कोणी भाउबंद सात हजार पायदळ व आठशें स्वार व दहा तोफा इतक्यांसहित ठाणें धरून राहिला असे; त्यास जिंकावयाकरितां परशुराम भाउनें आपला पुत्र आपासाहेब याजबरोबर स्वार देउन पाठविला आणि त्या पलटनांतील आठ कंपनी आपल्या लष्कराच्या नजावर ठेवून बाकी लोकांसहित त्या लिट्ल साहेबांसही त्याचा साहाय्यास नेमिला. ती शत्रूची जागा स्वारांनी आंत आ

† यामर्यादेमध्यें आनागोंदीसंबंधें थोडकासा मुलुख आहे तो टिपूनें आपल्याकडे ठेविला.

वयास

वयास फार कठीण होती ह्मणून त्या लिटलसाहेबास आपल्याजवळ आठशें लोक मात्र असतांही, त्या युद्धाचा सर्व भार संभाळावा लागला. तेव्हां फार वेळपरम शौर्येंकरून अतूट उद्योग केल्यानें, त्यास तीजागा प्राप्त झाली. मग थोडक्याच वेळानें तो किल्ला हस्तगत झाला. नंतर परशुराम भाउ त्या गनचे वाटेनें बेदनुरास आउन त्याकिल्याला घेरा घालणार होता, परंतु त्यास वाटेंतच वर्तमान कळलें कीं, आपणावर टिपूचा कोणी मोठा सरदार श्रीरंगपट्टणाकडून येतोआहे, ह्मणून तो बेदनूर घेण्याचें काम टाकून श्रीरंगपट्टणास आउन लाटकानवालिस याला मिळावयास चालिला. तो तेंतह्राचें काम पूर्ण झाल्यावर तेथें पोंहचला. नंतर ते श्रीरंगपट्टण घेणारे तिघेही आपआपल्या ठिकाणास जाउं लागल्यावर मराठ्यांचें तोफखाना वगैरे जडसामान व इंग्लीशांहीं मराठ्यांस मोठ्यामोठ्या सत्रा तोफा दिल्या होत्या त्या हें सर्व त्या परशुराम भाउला पुण्यास पोंहचवावयाचें काम पडलें. त्यामुळें तो वाटेनें हळू हळू जात असतांना टिपूशीं व मराठ्यांशीं तह झालेला असूनही, त्या भाउला टिपूकडचे पेंढारी व बेरड यांचा बहूत उपद्रव लागला; आणि तो परशुरामभाउ पूर्वी तिकडे गेला तेव्हां त्याचा लोकांहीं त्या वाटेचा मुलुख उद्ध्वस्त केला होता ह्मणून तो त्या श्रीरंगपट्टणाहून तुंगभद्रेस पोंहोंचे पर्यंत असा बेजार झाला कीं, त्याप्रमाणें मराठ्यांचे हाल कधींही न झाले.

सनसत्राशें व्याण्णवांपासून
पंचाण्णव पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग सत्ता विसावा.

## अनुक्रमणिका.

महादजी शिंदा पुण्यांतील कारभारी मंडळी पेक्षां वरचढ होण्याविषयीं पुण्यास गेला.

पेशव्यांस वश करून घ्यावयाविषयीं त्याणें उद्योग कसकसा केला तोप्रकार.

पेशव्यांस वकीलमुतलक नामें पदवी प्राप्त होउन पेशव्यानेंही महादजी शिंद्यास आपल्या हस्तक करून दिल्लीचा कामावर स्थापिला. तो विस्तार.

रजपूतांचा मुलखांत शिंदे व होळकर यांचा सरदारांस सरदारांचा लढाई ज

बळ न ढाई झाली तें प्रकरण.

त्यामुळें पुण्यांतील वहिवाटींत कांहीं अंतर पडलें.

नाना फडणवीस याणें पेशव्यांशीं एकांत करून आपली मुख्यता दृढ केली.

महादजी शिंद्याचा मृत्यु.

त्याचा स्वभावाचें व बुद्धीचें वर्णन.

त्याचे जागीं त्याचा भावाचा नातू दवलतराव शिंदा याची स्थापना.

बडोद्यांचें वर्तमान.

गोविंदराव गाइकवाड यास बडोद्यांत अधिकार प्राप्त झाला.

महाराष्ट्र मुलखाचा पश्चिम भाग समुद्रतीर तेथचे मंडलाधिपति त्यांचीं वर्तमानें.

त्यांहीं चांचेपणा केला तो व त्याचें निवारण.

मराठी लोक पहिल्या लढाईची चाल टाकून पलटणाचा भरवशावर लढूं लागल्यानें काय काय परिणाम झाला तो प्रकार.

होळकरानें पलटनें चाकरीस ठेविलीं.

मराठी समुदाय मिळून निजामाशीं बाकी ऐवज मागावयाचे निमित्तें युद्धास सिद्ध आले, व खरड्याची लढाई.

निजामाचा पुत्र अलीजहा तो मृत्यु पावला, नाना फडनवीस याची कांहीं गोष्ट.

## भाग सत्ताविसावा.

महादजी शिंदा हिंदुस्थानांत असतां त्याचे साहाय्यास आलेले होळकर व अलीबहादर हे त्याचा कामास नाहक अटकले, त्यायोगें त्यांशी व त्याशीं मासलेवाईकरून कलह होई. ते समयीं तो महादजी त्यांस म्हणे कीं, मी अंगें पुण्यास जाउन तुम्हास माघारें बोलावणें करीन; असें बोले, परंतु त्या दोघांस ठाउक होतें कीं, नानाचा मनांत शिंदा फार वाढूं देउं नये, आणि हा शिंदा इनकेलांव यादिल्लीहून पुण्यापर्यंत जाईतोंपर्यंत, इकडचा बंदोबस्त बिघडेल. म्हणून यास तिकडे जावयास अवकाश होणार नाहीं, हें समजून शिंद्याचें तें भाषण लटक्यांत आणीतात, मग तो उज्जनीस जाउन, तेथून पुण्यास जावयास निघाला तेव्हां त्यांस तें सत्य वाटलें; आणि या जाण्यांत कांहीं मोठी मसलत आहे ती कोणती असेल असा विचार करितां त्यांचा मनांत आलें कीं, पुण्यांत व हैदराबादेंत इंग्लीशां

इंग्लीशांचें प्राबल्य होईल, त्याचा निवारणार्थ हा जातो. कदाचित् आपण जो हिंदुस्थानांत संपादिलेला मुलुख यांत किमपि भाग यांस न द्यावा; असेंही असेल. तें अशा कल्पना करूं लागले परंतु वास्तविक पाहिलें असतां पुण्यांतील ब्राह्मण्याचा बंदोबस्त राखून पेशव्याजवळ आपण मुख्यत्वें वागावयाचा मसलतीनें तो निघाला. ते समयीं त्याणें लोकांत असें प्रसिद्ध केलें कीं, पूर्वी वकील मुतलक नामें पदवी बादशाहापासून आह्मीं पेशव्यांचे नामें संपादिली; त्याचा अभिषेक पेशवे यांस करावयाकरितां बादशाहाचे आज्ञेनें पुण्यास जातों. त्यासनदेचे बरोबरच त्याणें बादशाहापासून मोंगलांचा सर्व मुलुखांत इतःपर गोवध न व्हावा अशा बंदोबस्ताची दुसरी सनद घेतली होती, तीही मराठेलोक यांस दाखवावयाकरितां आपल्या बरोबर नेली.

तो महादजी शिंदा पुण्यास येतो असें वर्त्तमान नानाफडनवीसास कळलें तें त्याणें प्रथम सत्य मानिलें नाहीं; मग जेव्हां निश्चय समजला कीं, तो शिंदा पुण्यास येतो खरा. तेव्हां त्या नानानें लार्ड कानवालीसास लिहिलें कीं, पूर्वी लिट्लसाहेब आपल्या पलटनासहीत मजपाशीं होता, तो हल्लीं श्रीरंगपट्टनची मोहिम करून मुंबईस गेला आहे; त्यास त्या पलटनासहीत हे समयीं जर मजकडे पाठवाल तर मी त्याचा खर्च चालवीन, आणि तुमचा मजवर तो मोटा उपकार होईल. असें नानाफडनवीसानें लिहिलें गेलें असतां, त्यावेळेस तो लार्ड कानवालिस त्याचे कुमकेस तीं पलटनें पाठवीना.

तो नानाफडनवीस आपणास इंग्लीशांपासून कुमक आणील, आणि तीं आपणास बाधक होईल, असें समजून तो महादजी शिंदा नानाफडनवीसास इंग्लीशांपाशीं कुमक मागावयाचें काम न पडावें ह्मणून आपल्या बरोबर एक पलटन मात्र घेउन पुण्यास गेला. तो तेथे मुळा व मुठा या नद्यांचा संगमाजवळ सन् सत्राशें ब्याण्णवांचा जुन महिन्याचे अकराव्ये तारिखेस डेरे देउन उतरला.

मग तो महादजी शिंदा आपला उद्योग चालवूं लागला, तेव्हां तें पद पेशव्यानें न स्विकारावें याविषयीं. नानानें श्रीमंतास असें समजाविलें कीं, या सनदेमध्यें जें महाराज आदिराज असें लिहिलें आहे हें पद आपल्ये पेशवाईस योग्य नव्हे. याप्रमाणें तो सांगत होता, परंतु शिंदा तो उद्योग टाकीना*; शेवटीं त्याणें त्या अभिषेकाविषयीं साताऱ्याचा राजाची आज्ञा घेउन त्या कार्याची सिद्धता केली.

---

* तो उद्योग न सोडण्याचें कारण असें कीं त्यानें कौन्सुलरकीचा सनदेंत पेशव्यांचें नाममात्र ठेविलें आणि तन्नंतरें सर्वकारभार महादजी आपण पेशव्याचा हस्तक होऊन करणार.

[illegible]

महादजी शिंदा पुण्यास आल्यावर नवां दिवशीं नानाफडनविसास त्याचे भेटीस गेला. तेव्हां तो शिंदा मोठ्या संमानानें त्यास भेटून त्यादेखतां आपण गादीवर बसला नाहीं. अशी त्याची मर्यादा राखिली. नंतर दुसरे दिवशीं महादजी शिंदा पेशव्याचे भेटीस गेला. ते समयीं त्याणें हिंदुस्थानचे कित्येक चमत्कारीक पदार्थ श्रीमंताचा भेटीस दिले, आणि त्यावेळेसच उद्यां वकीलमुतलखी पदवीचा अभिषेक श्रीमंतांस करावा असा नेम ठरविला. नंतर त्या अभिषेकाचा थाटास असा समारंभ केला कीं, त्याणें आपल्या तळापासून जवळच फार चांगल्याचांगल्या मोठ्या मोठ्या राजडेऱ्यांची पंगत उभी केली. त्या सर्व डेऱ्यांचा मागला डेरा मुख्य होता, त्यामध्यें मोंगलांचा बादशाहाचा तक्ताप्रमाणें एक आसन करून ठेविलें. त्यावर ती बादशाही सनद व त्या पदवीसंबंधें बादशाहाकडील वस्त्रालंकारादि पदार्थ मांडिले. नंतर पेशवा मोठ्या समारंभाचा स्वारीनें तेथें येउन मग त्या डेऱ्यांत त्या गादीसमोर आला असतां त्या आसनास तीन वेळां नमस्कार करून, मग त्यावर एकशें एक मोहरा ठेविल्या; आणि तें आसन उजवें घेउन त्याचे डावे बाजूस बसला. तेव्हां शिंद्याजवळ कोणी फारशी लिहिणार मुख्य होता त्याणें ती वकीलमुतलकी अधिकाराची सनद वाचून सर्वांस ऐकविली. आणि गोवधन होण्याविषयीं बंदोबस्ताची जी सनद होती तीही वाचून दाखविली. नंतर ते वस्त्रालंकारादि पदार्थ पेशव्यानें घेतले. त्यांत वस्त्रें नउ आणि जडावाचे अलंकार पांच. त्यांत शिरपेंच दोन व तुरा एक आणि बाहूभूषण जोड एक व पोहोंचा जोड एक, याशिवाय कंठी, कुडक्या, भिकबाळी, वकडीं, तोडे, असे अलंकार होते; आणि एक कलमदान, व एक दौत, व एक मोरतब, व दोन मोरचेलें, आणखी एक ढाल व तरवार; या खेरीज एक घोडा व एक हत्ती, त्याशिवाय बादशाही डेंड्याचे हत्तीस हा, व एक नालखी व एक पालखी, याप्रमाणें होतें त्यांतील वस्त्रें व अलंकार ते घेऊन दुसऱ्या डेऱ्यांत नेउन मग ते अलंकार आंगावर घालून आणि तीं वस्त्रें नेसून, पेशवा पुनः आपल्या त्या पहिल्या जाग्यावर येउन बसला. तेव्हां तो महादजी शिंदा व नाना फडनवीस वगैरे कारभारी मंडळी पैकीं जे त्या सभेंत होते, त्यां हीं श्रीमंतांस +नजरा दिल्या. मग पेशवा तेथून माघारा पुण्यांत येऊं लागला. ते समयीं हरिपंत फडके व महादजी शिंदा हे दोघे तीं दोन मोरचेलें त्यावर ढाळीत त्याला लष्करांतून पोंहचविता. मग तो त्याला लष्करांतून वस्तून पुण्यास मोठ्या समारंभानें आला. तीर्थ्यांरीत हा व यास नाग

---

+ नजरा दिल्या त्यावेळेस जे कोणी आपणास मानाच्याचा राजाचे पुरातन चाकर म्हणविणारे, शिलेदार वमानकरी यांस, ती पदवी पेशव्यास आस झाल्यानें असहन होउन; कित्येकांहीं नजरा न दिल्या. व कित्येक त्या डेऱ्यांत न गेले.

शिकलोकांची फार दाटी झाली. तेव्हां लोक अनेक प्रकारें जयशब्द उच्चारित असतां, सहस्रावधि वाद्यांचा ध्वनि, व बंदुका आणि तोफा यांच्या सरबत्या, हे सर्व ध्वनि मिळून मोठा गजर झाला. तो असा थाट होता कीं, त्यापूर्वी पुण्यांतील लोकांहीं कधीं हा तसा समारंभ पाहिला नाहीं.

पेशव्यास बादशाहाकडची वकीलमुतलकी अधिकाराची सनद आली त्यांतच असें लिहिलें होतें कीं, दिल्लीमध्यें पेशव्यांचा हस्तक महादजी शिंदा व त्याचा कोणी वंश्य असावा. त्यावरून पेशवा महादजी शिंद्याचा डेऱ्यांत तो अभिषेक समारंभ होऊन आपल्या वाड्यांत येतांच त्याणें त्यास तो अधिकार दिला. त्यावेळेस शिंदा यास मोठी योग्यता मिळाली असतां, तो मोठ्या नावास चढला असूनही त्या सभेंत तो बोलिला कीं मी श्रीमंतांचा जोडा उचलणारा चाकर आहें, त्या मला पाटील या नावापेक्षां दुसरें मोठें नाव योग्य नाहीं. असें बोलून त्याणें आपली लीनता+ दाखविली, तेणें करून लोक वश व्हावे. परंतु त्या सभेस जे गृहस्थ होते, ते त्याचा हलक्या बोलण्याचा अतिशय झाला सा समजून त्यांचीं मनें तादृश प्रसन्न न झालीं. कीं, हा मुळचा कसा होता, आणि या वेळेस किती योग्यतेस चढला आहे. अणखी भाषणांतर केवळ दीनासारिखें करितो; तस्मात् हा सरळ पुरुष नव्हे. असें त्यांस दिसलें.

मग शिंदा आपले तळावर आला. तेव्हां त्याचा सरदारांहीं त्यास नजरा दिल्या. परंतु दुसरे सर्व मराठे आपणास अनिष्ट आहेत असें त्या महादजीला समजलें. त्यावरून त्याणें मनांत निश्चय केला कीं, इतःपर आपली मसलत परम सावधपणें शेवटास न्यावी. त्यानंतर पेशव्यास आपण नाना फडनवीसापेक्षां प्रिय होण्याविषयीं त्या महादजी शिंद्यानें त्या श्रीमंतास गोडगोड गोष्टी सांगून युक्तीनें त्यास शिकारीचें व्यसन लावुन आपल्या बरोबर स्वारीस नेऊं लागला. तो त्या शिंद्याचा मतलब समजून नाना फडनवीसानें त्याशीं व श्रीमंतांशीं बहुधा एकांत न होण्याविषयीं यत्न चालविला. तो माधवराव पेशवा तर उत्तम स्वभावाचा होता त्यास वाटे कीं नाना बोलतो तें हितावह आणि तो विश्वासूही खरा, परंतु त्याचें वागणें शिंद्यापेक्षां क्रूरतेचें दिसे आणि तो कधीं हा आनंदित नसे; शिंदा तर दर्शनें करून व भाषणानें व वागणुकेनें हा उल्हासकारक होता, म्हणून त्या श्रीमंतांचें मन शिंद्याकडे लागे.

दरबारांत शिंद्याचें कार्य बहुधा हिंदुस्थान संबंधें होतें; तो महादजी शिंदा नाना फडनवीसास म्हणे कीं, मी मोठी खटपट करून पेशव्यांचा मान वाढ

---

+ ते समयीं व्यवहारांत मागून चालत आलेलीं शिंद्याचीं नावें तीन पडलीं होतीं तीं अशीं एक राजमहाराज माधवराव शिंदा; दुसरें मदारुल महाम, तिसरें अलीजाह बहादूर.

विला. आणि मराठेही मोठ्या योग्यतेस चढविले. त्यास ओमीरखर्च केला तो तु- म्हीं सरकारांतून द्यावा. या गोष्टीस नानाफडनवीस किमपि मान्य होईना. तो म्हणे कीं. तुम्हीं जो मुलुख घेतला त्याचा वसूल होऊन त्यापैकीं जें उरलें असे ल, तें आम्हास द्या; अशी पुण्यांत खटपट होत असतांही नाना व शिंदा हे दो घे एकमेकांच्या मानरक्षून वागण्यांत अंतर करीतनव्हते. शेवटीं हिंदुस्थानांत नानाचा पक्षाचा तुकोजी होळकर याशीं व शिंद्याचा दिवाण नामें सरदार याशीं रजपूत लोकांच्या राज्यांतील कांहीं लुटीचे वांटणीसंबंधें कलह उत्पन्न होऊन मोठें युद्ध झालें; त्यांत होळकराचीं नवीं चार पलटनें दविलेलीं होतीं त्याचा शिंद्याचा पल- टनांहीं अगदी पराभव करून त्याचा अठ्ठावीस तोफा दिवाणनाकडे गेल्या. तो सू ड घ्यावयास त्या होळकरानें शिंद्याची राजधानी उज्जनी तेथें जाऊन तें शहर लुटलें. असें वर्तमान पुण्यास आल्यावर नानाफडनवीस व शिंदे यांचा मर्यादेंत अंतर पडलें. तेव्हां नानानें आपणास कोणे समयीं दगा होईल गें समजून, परशुराम भाउ पटवर्धन यास फौजेसह आपणाकडे बोलाविला. तो दोन हजार स्वारां सहित आला, तें पाहून शिंदा आपणास फौज आणावयास निमित्त चांगलें झा लें असा हर्ष पाउन, एक बृगेद पलटनें आणविलीं. नंतर त्याणें नानाशीं विपरी त वागणूक केल्यानें व पेशवा प्रसिद्धपणें आपणाकडे व्हावा असा उद्योग केल्यानें त्याशीं व नानाशीं असा द्वेष पडला कीं, तो हरिपंत फडक्यानें मध्यस्थ्यासें करून मिट विला नसता तर मोठा संग्राम होता. त्यानंतर ते दोघेही आपआपल्याजवळ फौ जा असतां युद्धापेक्षां पेशव्याचा मध्यस्थीनें, आपआपलें कार्य साधन इच्छित हो ते. कोणे एके समयीं शिंदा पेशव्यांशीं कांहीं एकांत करित असतां तीं भाषणें ऐकू न कोणी नानास कळविलीं. तेव्हां त्यास कांहीं भ्रांति उत्पन्न होऊन त्या नानानें मनांत विचार केला कीं पेशव्यास एकांतीं स्पष्ट पुसावें कीं, तुम्ही त्याजकडे आहांत किंवा मजकडे आहांत, तें सांगा. याप्रमाणें विचार केल्यावर तो नानाफडनवीस पेशव्या जवळ जाउन एकांतीं बोलिला कीं, आजपर्यंत मी तुमची सेवा विश्वासरूपणें कोणे री तीची करीकेली; तो अर्थ मनांत आणून शिंद्याचें वागणें कोणे रितीचें, आणि त्या णें आपल्या लश्करांत परदेशी लोकचाकरीस ठेवून त्यांचा गर्नाप्रमाणें नवेच का यदे केले; आणि तो ब्राह्मणास अगदी बुडवून सर्व मराठी राज्यांत आपण मुख्य व्हें वागावें असा त्याचा मनोरथ आहे; ऐसियास मला तुमची अनुकूळता अस ल्यावांचून त्याची बरोबरी करितां येतनाहीं. त्यास हा सर्व विचार मनांत आणून माझा मसलतीनें वागावयाचें असल्यास, तशी आज्ञा व्हावी, नाहींतर मला काशीस जाण्याचा निरोप द्यावा. असें बोलतांना त्या नानाचा नेत्रांस पाणी आ लें, आणि श्रीमंत जर शिंद्याचे मसलतीनें वागूं लागेल तर राज्य बुडेल म्हणून

खेद

खेद करूं लागला. हें पाहून त्या माधवरावाचें मन फारच द्रवलें, आणि तो ही श्रमी होउ
न बोलिला कीं, तुम्हीं गेल्या गोष्टी मनांत आणूं नये. इतःपर मी विचारेंच वागेन; आपण
कां काशीस जातां. असा नानाचा विचार श्रीमंतांचा मनांत भरून मानल्यानंतर त्या ना
नाची मुख्यता ठरली; असें असतांही त्या शिंद्याचा युक्ती पुढें थोडक्याच दिवसांत
नानाचें कांहींच चालेनासें झालें असतें; परंतु तो शिंदा आपल्या मतलबास फार जपून
असतांही, थोडक्याच दिवसांत त्यास मोठा ज्वर होउन, तो पुण्याजवळ वानवडी गांव
आहे तेथें सन सत्राशें चवऱ्याण्णवांचा फेब्रुवारीचे बारव्ये तारिखेस मृत्यु पावला.

तो महादजी शिंदा फार योग्यतेस चढला होता, त्यायोगें त्याचा मृत्यु सर्व हिंदु
लोकांत कोणास हितावह आणि कोणास दुःखदायक झाला. त्या महादजीचा मनांत
होतें कीं, आपण मुख्यत्वें वागावें, असें असतां त्याची इच्छा असे कीं, समदविशेषीं
बाहेरचा शत्रूस मारावयाकरितां मानकरी लोक सबळ असावे; आणि ब्राह्मणाची
मुख्यता त्यास अगदीं प्रियन व्हती. तो योग्यतेस चढत असतां दोहीं ब्राह्मणाचा क
लहांत शिरून त्याणें त्यांतील एकाचा पक्ष स्वीकारून त्यास वाढविला; तथापि तो म
हादजी शिंदा आपण वाढविलेल्या नानास आपणच बुडवावयाचा उद्योग करिता
झाला. तो शिंदा ज्या समयीं कांहीं कार्यवशात् पुण्याहून दूर राहूं लागला आणि
माळव्यामध्यें त्याचें लष्कर इंग्लीशांहीं जिंकिलें तेच समयीं ब्राह्मणानीं इंग्लीशगा
दुगाहेवयास वश केला होता; तेव्हां दिसण्यामध्यें असें आलें कीं, महादजी शिंदा
ब्राह्मणापेक्षां न्यूनबळ आहे. परंतु सालप्याचा तहांत इंग्लीशांहीं ठरविलें होतें
कीं, महादजी शिंदा स्वतंत्र; आणि त्यापुढें तो मराठ्यांस व इंग्लीशांस तहाचें द्वा
र झाला; तेव्हां तो आपली न्यूनबळता टाकून योग्यतेस चढतचढत स्वतंत्रपणा
करून, आपल्या इच्छेस येईल तसें वागावयाची त्याला शक्ति आली. तो सूक्ष्म
बुद्धी आणि राजनीतिकुशल असे, तसाच कुटिल व स्वराज्यवृद्धिविषयीं उत्कं
ठित, आणि दीर्घद्वेषी होता. त्याचें मुख पाहिलें असतां असें वाटे कीं, हा सदानं
दी आणि स्थूलबुद्धी पुरुष आहे, तो शरीरानें पुष्ट आणि ठेंगणा होता, त्याचा
रंग काळा असे. त्याचा पायास पानपतचे लढाईंत जखम लागून तो लंगडत चा
लत असे; त्याचे सेवक त्यावर प्रीती करीत होते. तो आपल्या लोकांस परभा
रां गांवांवर देणें द्यावयास तत्पर होता, परंतु स्वजीन्यांतून किंवा खासगीपैकीं
देण्यास जड असे. हानरमराठ्यांचा प्रायः जातिस्वभावच आहे. मराठ्यांलोकांत
कोणी अक्षर वाचणारे व कोणी लिहिणारे असतात, परंतु वाचणें व लिहिणें व
जमाखर्चाचें कौशल्य, व हिशोबीं निपुणता इतके गुण एकत्र असा पुरुष मराठ्यांत
दुर्लभ आहे; असें असतां महादजी शिंद्यांत हे सर्व गुण होते. तो मेला तेव्हां त्या
ला पुत्रसंतती नव्हती. त्या महादजीचा सख्खा भाऊ तुकोजी शिंदा तो पानपतचा

लढाईंत मेला होता, त्याचे तिघे पुत्र एक केदारजी, व शेळोजी, व आनंदराव, यांस महादजी शिंद्यानें आपल्या लश्करांत ठेविलें. त्यांतील केदारजी तो महादजी असतांनाच मृत्यु पावला होता; त्यास संतती नव्हती. खेळोजीस दोन पुत्र होते; आणि आनंदरावाचा पुत्र एक, दवलतराव नामें होता, तो त्या तिघां भावांतील कनिष्टाचा पुत्र असें असतांहि, महादजीनें नेम केला होता कीं मी या दवलतरावास दत्त घेईन; परंतु तो प्रकार त्याचा मृत्यु समयीं शेवटास न गेला, तरी ती गोष्ट त्याच्या जवळच्या लोकांत प्रसिद्ध होती. ह्मणून तो निवर्तल्यावर त्या दवलतरावाची स्थापना महादजीच्या जागीं होत असतां, लक्ष्मीबाई महादजीची स्त्री ती आपल्या मर्जीप्रमाणें त्या कार्यास अडथळा करूं लागली. तथापि तें स्थान दवलतरावास प्राप्त झालें. त्या वेळेस तो पंधरा वर्षांचा होता.

महादजी शिंद्याच्या अंतकाळीं नागपुरीं व बडोद्यांत काय काय वर्तमानें होत आलीं तीं अशीं. ते समयीं नागपुरामध्यें रघूजी भोंसला राज्य करीत असे, त्याचा बाप सन सत्राशें अठ्यायशींत मेला, ते समयीं रघूजीपेक्षां धाकटे त्याचे पुत्र खंडोजी व व्यंकाजी हे दोघे, त्या व्यंकाजीस मन्याबापू ह्मणत.

त्यांत खंडोजीस बापानें आपल्या राज्याचा उत्तर भाग दिला, आणि व्यंकाजीच्या स्वाधीन दक्षिण भाग केला; रघूजी भोंसला तो त्याचा ज्येष्ठ पुत्र त्यास जानोजी भोंसला चुलता याची मराठी राज्यांतील सेनासाहेबसुभा पदवी प्राप्त झाली होती, परंतु तो त्याचा बाप असतां त्याजकडे वगडची मुख्यता नव्हती.

त्या वेळेस टिप्पूच्या नाशाविषयीं मराठे व निजाम व इंग्लीश यांचें ऐक्य झालें. ते समयीं पेशव्यांच्या सादर बोलावण्यावरून त्या रघूजी भोंसल्याला पुण्यास जावें लागलें. तो तेथें असतां त्या मोहिमेस न जावें हें त्याच्या मनांत होतें, यास्तव त्याणें पेशवा स्वयें त्या कामास जात नाहीं हें निमित्त असेंस धरून मला ही तिकडे जाणें आवश्यक नाहीं असें युक्तीनें सुचविलें परंतु तो आपला मनोरथ शेवटास जात नाहींसा समजून, श्रीमंतापाशीं एकांतीं बोलिला कीं, जर मीं इतका दूर टिप्पूच्या मुलखीं गेलों तर माझा भाउ खंडोजी माझें राज्य आटपील. त्यावरून पेशव्यानें त्या मोहिमेच्या खर्चाबद्दल दहा लक्ष रुपये घेउन त्यास माघारें जावयाची आज्ञा दिली. मग तो नागपुरीं पोंचल्यावर थोडक्याच दिवसांहीं त्याचा भाउ खंडोजी मृत्यु पावला. तो त्या रघोजीस मोठें शल्य होतें, तें निवारण झाल्यावर त्याणें आपला दुसरा भाउ व्यंकाजी यास चांदा व छत्तीसगड याची जहागीर दिली.

बडोद्यामध्यें फत्तेसिंग गायकवाड राज्य करित होता तो सन् सत्राशें एकुणणवदांच्या दिसेंबरच्या एकविसाव्या तारिखेस माडीवरून पडून मृत्यु पावला. त्या वेळेस त्याचा धाकटा भाउ मानाजीराव याणें सयाजीला आपले स्वाधीन

ठेउन

ठेवून राज्य चालविलें; तेव्हां सयाजी व तो मानाजीराव गाइकवाड याचा मधला भाउ गोविंदराव तो अनधिकारी होत्साता, पुण्याजवळ एक खेडेगांवीं रहात होता. त्याणें तो फत्तेसिंग मेल्याचें वर्तमान ऐकून पेशव्यास अर्ज केला कीं, तें राज्य माझें मला असावें, त्याप्रमाणें करण्यास तो अधिकारीच होता परंतु, मानाजीरावयाणें पेशव्यास तेहतीस लक्ष तेराहजार एकरुपया नजर केला; आणि फत्तेसिंगाकडे छत्तीस लक्ष रुपये खंडणीची बाकी राहिली होती ती देतों असें कबूल केलें. त्यावरून नानाफडनवीसानें त्याराज्याविषयीं पेशव्याची सनद त्या मानाजीरायास देवविली. तेव्हां गोविंदरावयाणें महादजी शिंदा पुण्यास आल्यावर त्याद्वारा आपल्यास त्याराज्याची सनद संपादिली. तेसमयीं मानाजीराव इंग्लिशांस कुमक मागत असतां इंग्लिशांहीं त्याची समजूत पाडावयाविषयीं नानाशीं बोलणें लाविलें असतां, मानाजीराव मृत्यु पावला. तेव्हां तो तंटा सहजानाहींसा होउन, गोविंदराव गायकवाड आपल्या अधिकारावर जावयास सिद्ध झाला, परंतु नानाफडनवीस वगैरे कारभारी त्यास पूर्वीं देणें जें ठरलें होतें त्याची कबूलात करून घेतल्यावांचून जाऊं देईनात. आणि तापीचे दक्षिणेकडचा मुलुख त्याणें पेशव्यास द्यावा, याप्रमाणें त्या गोविंदरावास मागत होते. परंतु ती गोष्ट त्याणें इंग्लिशांस कळविली तेव्हां त्या इंग्लिशांहीं सालब्याच्या तहाविरुद्ध ही गोष्ट, असें समजाविलें असतां नानानें तें सोडिलें. नंतर तो गोविंदराव सन सत्राशें त्याण्णव याच्या दिसेंबराचे एकोणिसाव्या तारिखेस आपल्या अधिकारावर जावयास निघाला. असें महादजी शिंद्याच्या मरणसमयीं वराडांत आणि बडोद्यांत वर्तलें.

कोंकणांत तुळाजी आंग्र्या इंग्लिशांशीं फार चांचेपणा करीत असतां त्यांहीं त्यास सन सत्राशें छपन्नांत अगदीं हीनबळ केला.

कुलाबकर मानाजी आंग्र्या सन सत्राशें एकुणसाठांत मृत्यु पावला होता. त्याचा पुत्र रघुजी आंग्र्या तो आपल्या बापाप्रमाणेंच आपणास पेशव्याचा कर म्हणवी आणि कांहीं त्यांची आज्ञा असतां मान्य करावयाचें कारण पडलें तर मानित असे. तो रघुजी सन सत्राशें त्याण्णवांत मृत्यु पावला. तेसमयीं त्याचा कोणी भाउबंद जयसिंग आंग्र्या याणें पुण्याची आज्ञा न घेतां त्या रघूजीचा पुत्र मानाजी यास रघुजीच्या जागीं बसवून कारभार चालविला, त्यायोगें पुण्याचे दरबारी लोक तो जयसिंग आंग्र्या व तो मूल मानाजी यांचा द्वेष करूं लागले.

जंजीऱ्याचा शिद्दी याचे राज्यांत कांहीं प्रकार झाला तो असा. त्या राज्यांत शिद्दी इब्राहिम नामें होता तो त्या सर्वांत मुख्य असे; तो सन सत्राशें बासष्टांत मृत्यु पावला. त्याचा स्थानीं अबदुल रहीम नामें शिद्दी अधिकारी होता.

त्यास

त्यास तो अधिकार प्राप्त होतां शिद्दि याकुट नामें होता त्याणें तो अधिकार मिळविला. तेव्हां तो अबदुलरहिम याणें तें आपलें पद घ्यावयास कांहीं यत्न करित असतां तो सिद्दीस जायीना तेव्हां तो पुण्यास जाउन आश्रय पावला. शिद्दी याकुटानें तर त्यास पेशव्याचा अनुकूळ न होण्याविषयीं पुण्यास लिहून समजून केली कीं, तुर्त दंडाराजपुर अबदुलरहिमास द्यावें आणि मी मृत्यु पावल्यावर जंजीरा ही त्याचाच आहे. त्याप्रमाणें मान्यता होउन पुढें शिद्दी याकुट मेल्यावर शिद्दी अबदुल्रहिम यास तें स्थान प्राप्त झालें. परंतु शिद्दी याकुट याणें आपल्यें मृत्युसमयीं लेख करून ठेविला होता कीं, हें राज्य अबदुलरहिम याणें करावें, आणि याच्यामागें याचा दुसऱ्या पुत्रानें करावें. तो लहान असतां माशामित्र शिद्दी ओहर याणें तें काम संभाळावें.

यानंतर अबदुल्रहिम सन् सत्राशें चवऱ्यायशींमध्यें मृत्यु पावला. त्याणें तें शिद्दी याकुटाचें पत्र न मानितां आपला वडील पुत्र अबदुल करीम त्यास बाळुमियां म्हणत असत, त्याला आपले जागीं स्थापावा असा आपले मरणसमयीं नेम करून ठेविला मग तो अबदुल्रहिम मेल्यावर याकुटाचा मित्र शिद्दी ओहर तो त्या गादीमाचें तो घेउन आपले स्वाधीन करून घेण्याविषयीं उद्योग करित असतां, त्या बाळुमियानें आपल्या धाकट्या भावास घेउन पुण्यास जाउन नाना फडनवीसाचे आश्रयानें राहिला. नंतर त्या वादाविषयीं इंग्लीश मग त्यांशीं शिद्दी ओहर पक्षीं बोलत असतां नाना फडनवीसास फार आशा होती कीं, हें लहानसें राज्य आपणास असावें त्यास बहुत वेळपर्यंत इंग्लीशांची अनुकूळता होयीना मग जा वेळेस टिप्पूचा नाश करितां मराठे व निजाम व इंग्लीश यांचें ऐक्य झालें, त्या वेळेस असा नेम ठरला कीं, तो बाळुमियां व त्याचा भाउ यास सुरतेजवळ पाउण लक्ष रुपये वर्षास जमा होत सा मुलुख द्यावा, आणि एकेचाळीस हजार रुपये देउन तो जंज्याचा मुलुख पेशवे याहीं घ्यावा. असें करारपत्र सन् सत्राशें एक्याण्णवांचा जुनमहिन्याचे सहाव्ये तारिखेस सिद्ध झालें. आणि तें राज्य लहान असें असतां ही हस्तगत करावयास पेशव्यांना फावलेंच नाहीं म्हणून तें अद्यापि राहिलें आणि पेशव्याचें गेलें. यास दृष्टांत. असें नदीचा कांठीं लव्हाळे असतात ते मोठें पाणी आलें तरी लवून राहातात; आणि मोठे मोठे वृक्ष त्या पाण्याच्या नेटानें उपटून वाहून जातात.

मालवण व सावंताचे वाडीकडील वर्तमान असें. मालवणकर व सावंतवाडीकर यांहीं चांचेपणा करून इंग्लीशांस बहुत उपद्रव केला असतां, इंग्लीशांहीं लढाउ जहाजें पाठवून, कोल्हापुरकराचें मालवण व सोव

तोंचा

तोंच रेडी किल्ला सन सत्राशें छपन्नांत घेतला. नंतर दुसरे वर्षी कोल्हापुरकरांपासून तीन लक्ष त्र्यायशीं हजार रुपये घेउन, मालवण किल्ला त्यांस माघारा दिला. आणि तेच वर्षी वाडीकरांपासून दोन लक्ष रुपये घ्यावयाचा करार करून त्यांचा रेडी किल्ला त्यांस माघारा देत होते ते समयीं वाडीच्या दरबारांत फार अव्यवस्था झाली असे. त्यायोगें तो दोन लक्षांचा भरणा व्हावयास वेंगुर्लें परगण्याचा वसूल तेरा वर्षेपर्यंत गहाण ठेविल्यावांचून दुसरा कांहीं उपाय दिसेनासा झाला. मग कोणी कुमटे नामें मध्यस्थ होउन, त्या वाडीकरांचे दोन जामीन घेउन त्यांस तेरा वर्षेपर्यंत वेंगुर्ल्याचा किल्ल्यामध्यें ठेउन त्याचा बंदोबस्तास व वसुलाचे कामास उपयोगार्थ इंग्लिशांचे शिपाई त्या वेंगुर्ल्यांत असून तेथें इंग्लिशांहीं आपला झेंडा लाविला. तेव्हां त्या मध्यस्थानें इंग्लिशांस दोन लाख रुपये एकदांच दिले. ते समयीं इंग्लिशांहीं रेडी किल्ला सावंतास माघारा दिला. त्यानंतर थोडक्याच वेळानें ते दोघेही जामीन पळून गेले, तेव्हां कुमट्यास वाडीचे लोक वसूल घेउं देईनात, आणि छापा घालून तो वेंगुर्लें किल्लाही त्यांहीं घेतला. त्यांचे पारिपत्य इंग्लिशांहीं करावें, परंतु ते कांहीं देशाचा कामास गुंतले, म्हणून तें तसेंच राहिलें. त्यावरून कोल्हापुरकरही पुनः चांचेपणा करूं लागला; मग कित्येक वर्षें तो उपद्रव सोसून इंग्लिशांहीं शेवटीं त्याचा पारिपत्यास मुंबईमध्यें लष्कर तयार केलें. तेव्हां त्याहीं इंग्लिशांस कांहीं पैका देउन मालव्यांत कोठी करवयास जागा दिली; त्यायोगें तें काम तसेंच राहिलें. असा इंग्लिशांहीं अर्धवट उपाय केल्यामुळें पुढेंही सन अठराशें बारापर्यंत तो त्या वाडीकराचा व कोल्हापुरकराचा व जंजिरकराचा व पेशव्यांचाही चांचेपणा कांहीं कांहीं होता.

एथपर्यंत (सन सत्राशें चव्याण्णव सुमारें) मराठेलोक युद्धाविषयीं कुशळ आणि धैर्यकरून लढत असत, परंतु या समयीं ते लोक पायदळ व तोफखाना यांचा भरंवशावर लढूं लागले; त्यायोगें पूर्वीसारिखा त्यांचा स्वारांहीं साहयाधट्टपणें जाउन छापा घालून, एकाएकीं शत्रूचा नाश करावा आणि मागें पळावें, तें होईना. पायदळ पुढें करून स्वारांनीं त्यांस पाठबळ व्हावें अशी चाल पडली. याच पद्धतीनें पानपतच्या लढाईंत स्वारांस पायदळ व तोफखानासोडून पळतां येईना, म्हणून जय होईल अथवा न होईल असा संशय असतांही त्या मराठेलोकांस ते समयीं युद्ध करावें लागलें. पूर्वीं अशी चाल होती कीं जय होईलच असा निश्चय असल्यास युद्धास उभें रहावें.

त्यानंतर पुढें कधीं मराठेलोकांत पलटणें चाकरीस ठेवावयाचा कल्प निघाला असतां, सरदार म्हणत कीं हे मराठ्यांचा उपयोगी नाहीं कां कीं जे लोक त्यापाशीं कवाईत शिकलेले ते त्यांप्रमाणें काय लढतील. त्यास

जर आपला जय झाला पाहिजे तर पूर्वीच्या प्रकारानें लढल्यास होईल, आणि त्या लोकांच्या चालीनें लढल्यास हिंदू अगदीं बुडतील. हा अर्थ मनांत धरून होळकरानें बहुत दिवसपर्यंत आपल्या लष्करांत पलटनें बाळगलीं नाहींत. परंतु जा वेळेस शिंद्यानें रजपुतांचे किल्ले घेतले ते वेळेस तो समजला कीं जर हीं पलटनें याजवळ नसतीं तर हें काम होतें ना. म्हणून त्या होळकरानें एक फ्रेंचाच्या सरदाराचार पलटनास हीत चाकरीस ठेविल्या. तीं पलटनें लखेरी जवळ शिंद्याच्या पलटनाशीं लढून नाश पावलीं. तथापि त्यांहीं फार चांगलें युद्ध केलें म्हणून होळकरानें त्या सरदारास पुनः तयारी करावी म्हणून सांगीतलें.

अशीं मराठी लोकांत पलटनें ठेवुन लढाईची चाल पडली होती, परंतु रघोजी भोंसला याणें पलटनें इतके दिवस चाकरीस ठेविलीं नाहींत.

महादजी शिंदा जीवंत असतां मराठ्यांची मसलत होती कीं, निजाम अल्लीकडे चौथ व सरदेशमुखी बाबद बहुतां दिवसांची बाकी राहिली आहे ती मागून घ्यावी. यावर कोणी कल्पना करील कीं ते समयीं मराठी लोकांत वैमनस्यें पडलीं असतां, ह्या कामासाठीं सारे एकमत कसे झाले. तर असें समजावें कीं निजामाकडील कांहीं प्राप्त झालें असतां, तें सार्‍यांहीं वांटून घ्यावें, असें पूर्वीपासून चालत आलेलें त्या सर्वांस लाभुक होतें. मग महादजी शिंदा मृत्यु पावल्यावर, तो सर्व बंदोबस्त नाना फडनवीसास करावा लागला, ते समयीं इंग्लीशांहीं नानास व निजामास सांगीतलें कीं, हे समयीं आम्हीं कोणाचाही पक्ष स्वीकारीत नाहीं.

हे दरम्यान पेशव्यांकडचे गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे नामें दोघे वकील नानानें पाठविले त्यांशीं व निजामाशीं त्या मागण्या प्रकरणीं बोलणें झाल्यानंतर त्याणें त्या वकीलांजवळ मराठ्यांहीं उगेंच त्याचा मुलुख व्यर्थ लुटून घेतला, व जो बसूल आपल्या मुलखांतून त्या निजामास देणें तो न दिला; व त्यांस पेंढार्‍यांचा फार उपद्रव लागला. इत्यादि चोविस कलमांची याद देउन पेशव्याकडे पाठविले. त्या कलमांचीं उत्तरें नानानें फार चातुर्य करून लिहिलीं; आणि त्या बरोबरच दुसरी अठ्ठावीस कलमांची याद त्यावर तयार करून पाठविली. त्यांत असें दर्शविलें कीं दोन कोटी तीन लक्ष रुपये पेशव्याचे निजामावर आहेत. त्याजवरून निजामाचा मशीर उल्मुलुख नामें कारभारी, याचा आणि ते दोघे पेशव्याचे वकील यांचा बहुत वाद झाला; शेवटीं तो मशीर उल्मुलुख त्या वकीलांस सभेमध्यें बोलिला कीं, हे शेव निपुण आणि अति कुटिल, असा जो तुमचा धणी त्याणें अंगें

येउन

येऊन या दरबारांत आपल्या कलमाचा अर्थ सांगितल्यावांचून, कोणाच्याही ध्यानांत येणार नाहीं. त्यावर त्या वकिलांनीं उत्तर केलें कीं, आमच्या नानास कामें बहुत आहेत. त्यामुळें त्यांचें एथें येणें घडतें कसें. त्यावर त्या मशीरउल्मुल्कानें प्रतिउत्तर दिलें कीं, त्याचें येणें येथें कसें होईल तें तुम्हांला ठाऊक असावयास उशीर नाहीं. या धमकीच्या बोलण्यानें मग दोघांहीं युद्धाचें आकरण मानून उभय पक्षीं लढाईची तयारी होऊं लागली. तरि तें वाद मिटावयाचें बोलणें आरंभिलेलें होतें तें शेवटपर्यंत चालत गेलें.

मोंगलांचा रितीनें तरी युद्धाची कल्पना उत्पन्न झाल्यापासून मोठ्या हर्षानें तें घडावेंच असें इच्छित होते. मग निजामानें बेदरास मोठें लष्कर स्वयें जमा केलें; तेथें अनेक प्रकारें युद्धसाहित्य फार मनःपूर्वक तयार होत आहे, असें दिसून आलें; परंतु त्या लष्करचे शिपाई अव्यवस्थित असून आपल्या सरदाराच्या आळयांत नव्हते. आणि युद्धोपयोगी शस्त्रादि पदार्थ व सरंजाम यथास्थित नसे. तरी त्या लोकांमध्यें उघ्याच पोकळ गोष्टी होत होत्या कीं, आतां पुण्यास जाऊन तें शहर लुटून जाळून टाकूं. असाच त्या लष्करांतील कळवातिणी ही त्या बोलण्याच्या आकारप्रमाणेंच त्या लष्करचें वर्णन व सरदारांचे त्या बुडवावयाच्या गोष्टी गाण्यांत आणून गात होत्या. तो मुख्य कारभारी मशीर उल्मुल्क ही त्या दरबारांत सभेमध्यें बोलिला कीं, इतःपर मोंगल मराठ्यांच्या तगाद्यांतून सुटले झाले; आणि विजापूर व खानदेश ही आतां मराठ्यांपासून सोडवून घेईन. तें कार्य न झालें तर पेशव्याचें सर्वस्व घेऊन त्यास लंगोटी लावून भिक्षा मागण्यास हातीं देऊन त्याला स्नानसंध्या करावयाकरितां काशीस लावून दिल्यावांचून, सल्ला करावयाचा नाहीं.

नाना फडनवीसानें थोडक्याच वेळांत मोठें लष्कर जमा केलें. तें समयीं दवलतराव शिंदा व तुकोजी होळकर हे दोघ पुण्यासच होते. आणि भोंसले व गायकवाडानें ही कांहीं लष्कर पाठविलें. त्याशिवाय बराड्यांतूनही लष्कर कुमकीस येत होतें; आणि दक्षिणेकडचे मोठे मोठे जहागीरदार पटवर्धन, रास्ते, विंचुरकर, व मालेगांवकर, व प्रतिनिधि, व पंतसचीव, व मराठे मानकरी लोक, निंबाळकर, व घारगे, व चव्हाण, व डफळे, व पवार, व थोरात, व पाटणकर, वगैरे यांस पेशव्यानें बोलावणें नेले; त्यावरून ते सर्व आपआपल्या सैन्यासहित पुण्यावर येऊन पोहचले. मराठ्यांची अशी तयारी होत आहे तों निजामाचें लष्कर आधींच [illegible] बाहेर निघालें.

तो निजाम वेदराहून निघोन मांजरानदीचे कांठानें हळु हळु मराठ्यांचा मुलुखाचे मर्यादेकडे चालूं लागला. मग एका महिन्यानें सन सत्राशें पंचाण्णवांत जानेवारींत, पेशवा पुण्याहून लष्कर घेऊन निघोन मोंगलांवर चालिला. तें लष्कर फार मोठें म्हणून त्यास धान्य तृणादिकांची सोयी साठीं, त्या लष्कराचे कांहीं विभाग करून बहुत वाटांनीं चालूं लागला. ते समयीं तें मराठी लष्कर स्वार व पायदळ मिळून एक लक्ष तीस हजारावर होतें; आणि दहा हजार पेंढार त्याखेरीज असे. या एवढ्या समुदायांत दवलतराव शिंद्याचा जमाव फार मोठा होता. त्याचें बहुतेक लष्कर माळव्यांत व हिंदुस्थानांत असतांहीं, तो पंचवीस हजार सैन्यासहीत पेशव्याकडे आला. त्यांत दहा हजार पलटनी लोक असत. रघुजी भोंसला याचें लष्कर स्वार व पायदळ मिळून पंधरा हजार असे. तुकोजी होळकर याचे लोक दहा हजार होते; त्यांत दोन हजार पलटनी लोक असत. परशुरामभाऊ पटवर्धन याचे लोक सात हजार मात्र होते, परंतु त्यास सर्व सरदारांहीं मिळून त्या सर्व लष्कराचा मुखत्यार केला. तेव्हां त्याणें सर्व पेंढारी व त्यांजबरोबर कित्येक स्वार देऊन त्यांना पुढें पाठवून मोंगलांचा आसमंतात मुलखाचा नाश करावयाविषयीं आज्ञा दिली. नंतर आपण त्या सर्व लष्करासहित दीड शें तोफा बरोबर घेऊन निजामावर चालिला. तेव्हां त्या निजामाचें ही लष्कर एक लक्ष दहा हजार होतें.

तो निजाम त्या सैन्यासहित खरड्यावर येत होता तो मोरी घाट उतरत असतां पेशव्यांचा लष्करची खासगी फौजेचा टोळा त्यांत हरिपंत फडक्याचा पुत्र बाबूराव फडका मुख्य होता, त्याणें तेथें जाऊन त्या मुसलमानावर एकाएकी हल्ला केला. ते समयीं त्याचा कांहीं नाश होऊन त्या फडक्यास मागें हटावें लागलें; त्यावरून तो निजाम अल्ली समजला कीं, आतां आपला जय आहे. म्हणून ते दिवशीं (मार्चाचे अकराव्ये तारिखेस) अस्तमानीं, त्याणें आपलें मोठें दरबार भरवून जयाचा नजरा घेतल्या. मग दुसरे दिवशीं मोंगलांचें लष्कर त्या खरड्याहून निघोन परिंड्याकडे जात असतां, उजवे बाजूस फार मोठें मराठ्यांचें लष्कर जमून आलेलें पाहिलें. तेव्हां त्या निजाम अल्लीनें तेथेंच आपला हत्ती उभा करून आधीं आपल्या लष्कराचें सर्व बुणगें डाव्ये बाजूस केलें मग आसतुखान नामें आपल्या स्वारांचा सरदार याजबरोबर सत्रा हजार पलटनी लोक देऊन मराठ्यांवर हल्ला करावयास नेमिला. ते वेळेस परशुराम भाऊनें ही आपल्या लष्कराचा बंदोबस्त केला. तो प्रकार असा. पेशव्यांचे व होळकराचे लोक आपल्या जवळ घेऊन आपण त्या लष्कराचा मध्यभागीं उभा राहून, रघूजी भोंसल्याचें लष्कर उजवे बाजूस

करून डावे बाजूस दवलतराव शिंदा लश्कर रुद्धां उभा केला. यासमागें बंदोबस्त होउन आपण हरिपंत फडक्याचा पुत्र बाबूराव व तुकोजी होळकराचा पुत्र काशीराव, हे दोघे व काहीं लोक बरोबर घेउन शत्रू कशा रीतीनें आपणावर चालून येतो तें पहावयास पुढें निघाला. तो थोडकासा दूर गेल्यावर मोंगलांच्या लश्करांतील एक पठाणाची टोळी त्या परशुराम भाउवर पडली. त्यामध्यें उत्तर मुलखां बलुचिस्थानचा लालखान नामें मुख्य सरदार होता त्याणें मोठा पराक्रम करून आपल्या हातें बहुत शिपाई मारून, त्या परशुराम भाउस ही जखमी करून घोड्यावरून खालीं पाडिला. तेसमयीं त्या भाउचा ज्येष्ठ पुत्र हरिपंत पटवर्धन तो बापाची अशी अवस्था पाहून तात्काळ आडुन त्या लालखानावर फार उसटून पडला आणि त्यास तेथेंच मारून टाकिला; परंतु त्यांचे पराण होतेतें तो मेला तरी लढतानां राहीनांत; आणि त्यांचे पुशीस करनोळच्या नवाबाचा पुत्र, बइलिच्पुरचा नवाबाचा पुत्र, हे दोघे येउन असे लढले कीं, तेवेळेस मराठ्यांची अव्यवस्था होउन, त्यांस मागें हटावें लागलें. तेव्हां ते आपल्या लश्करांत माघारे येउन पोहचत तोंपर्यंत त्यांची अशी घालमेल झाली कीं, काहीं कारणावांचून त्या लश्कराच्या मोठ्या भागाचे ही लोक हजारों भिउन उगीच पळूं लागले. तेसमयीं बाबूराव फडक्या याचे स्वाधीन जरीपटका होता; तो ही शत्रूस पाठ दाखवून पळावयास सिद्ध झाला. तें पाहून जीउबा बक्षी नामें दवलतराव शिंद्याचा मोठा सरदार तो आपला घोडा मोठ्या वेगानें पिटून त्या बाबूरावा जवळ गेला. आणि त्यास शिव्या देउन बोलिला कीं, अरे भित्र्या तुला जर निर्भय जागा पाहिजे तर शिंद्याच्या लश्कराचे पाठीमागें जाउन स्वस्थ रहा. तेव्हां तो बाबूराव मोठें धैर्य धरून तेथेंच राहिला.

इतक्यांत त्या दोंहीं लश्करांतील पलटनें आपआपल्या गोळीच्या टप्यांत येउन पोहचलीं तेव्हां मोंगलांकडील पलटनांचे पाठीवर स्वार बहुत बंदोबस्तानें येताहेत असें दिसलें; तेसमयीं रघूजी भोसल्यानें त्यास्वारांवर बाणाची सरबती केली. याशिवाय पेरण नामें फ्रेंच जातीचा कोणी शिंद्याच्या पलटनी लोकांचा मुख्य सरदार होता, त्याणें एका टेकडीवर छत्तीस तोफा चढवून तेच क्षणीं त्या तोफांचा भडमार त्या स्वारांवर केला. तेव्हां त्यांस ते दानमार सोसेनातसें होउन ते मागें पळाले. तेव्हां निजामाचीं पलटनें आपल्या पुढीले स्वार पळून गेले असें पहात असतां ही, ते लोक मागें न हटले; आणि त्यांहिं शिंद्याच्या पलटनाशीं लढून कांहींसा जय ही मिळविला; परंतु तेसमयीं तो निजाम अली खरड्याकडे जावयास मागें हटूं लागला; आणि त्या पलटनी लोकांस ही मागें फिरावयाविषयीं वारंवार

निक

निकराचें निरोप पाठविना झाला, म्हणून त्यांस ही तें युद्ध टाकून मागें फिरणें प्राप्त झालें. नंतर तो निजाम मागें फिरल्याचें वर्तमान त्याचा सर्व लश्करास विदित होउन, तेसारेंच लोक मागें हटले. इतक्यांत सूर्य मावळला त्यायोगें अंधार पडून त्या लश्कराची अशी अव्यवस्था झाली कीं, त्यांतील पलटनी लोक मात्र खेरीज करून बाकीचा लोकांस आपआपलीं ठिकाणें ही सांपडेनांत शीं झालीं. मग फार रात्र होयी तोंपर्यंत त्या दोहीं लश्करांत आगोआग राहून राहून बंदुकांचे बार होत होते; शेवटीं त्या उभय पक्षी लोकांत एकमेकांस ह्याकामारमारून, इतस्ततः धांवतां धावतां ते लोक फार श्रमी होउन आगोआग जेथें जेथें पडले तेथें तेथें निजून राहिले. नंतर बहुतेक रात्र गेल्यावर सर्वत्र स्थिरता झाली. तेव्हां मराठ्यांचे दहा बारा स्वार आपल्या घोड्यांस पाणी पाजावयाकरितां जलस्थान शोधीत दैवगतीनें मोंगलाचा लश्कराची एक टोळी पडली होती तेथेंच पोंहचले. त्यांस पहातांच त्या मोंगलाचा लोकानीं शत्रु आला असें जाणून बंदुकांचे बार केले; तेवेळेस त्यांचे पलटनी लोक ही त्यांपासून जवळच होते, त्यांचा पहारेकऱ्यांहीं तो आवाज ऐकून आपण ही बार केले. तेणें करून ते पलटनी लोक निजले होते ते एकाएकी घाबरे होउन उठले, आणि त्यापाशीं बंदुका भरलेल्या होत्या त्यांचा भडमार उगाच विचार न करितां मोठ्या त्वरेनें बारंवार करिते झाले. तो मोठा शब्द ऐकून मोंगलाचे सर्व लोक जागृत होउन, हें काय होतें तें मनास न आणितां घाबरे होउन बहुतेक पळाले. मग पूर्व दिवशीं संध्याकाळीं जी गर्दी झाली होती, त्यापेक्षां ही मोठी गर्दी होउन त्या सर्व लश्कराची अव्यवस्था झाली, आणि त्या पलटनाची ही तारंबळ होउन, ते लोक कित्येक पळाले. इतक्यांत चंद्रोदय झाला, ते समयीं तो निजाम अली आपल्या लश्कराची अव्यवस्था पाहून फार भयभीत होत्साता, जाउन खरड्याचा लहानशा किल्ल्याचें आंत शिरून आश्रय करून राहिला. ते समयीं त्याचा रक्षणार्थ त्याबरोबर धांवले लोक त्याचा लश्कराचा दशांश त्या किल्ल्याचा सभोंवते राहिले, आणि बर्कड सर्व आपलें बुणगें लुटून आपल्या शक्तिप्रमाणें दूर पळून गेले. हें वर्तमान मराठ्यांचे पेंढारी लोक यांस कळतांच ते त्यांमागून धावून त्यांहीं नेलेली ती सर्व लूट पाडवून आणिते झाले.

मग सूर्योदयानंतर मराठे लोक पुढें चालतांना त्यास मोंगलाचा लश्कराचा नळावर आगोआग तोफा वगैरे नानाविध युद्धसाहित्य पडलेलें पाहून मोठा चमत्कार वाटला, आणि ते त्या खरड्याचा किल्ल्याजवळ

गेले

गेले. तेव्हां निजामअल्ली त्या किल्यांत आपणाच आपणास कोंडून घेउन राहिला. आणि त्याचें लक्ष फौजेंतील दशांश लोक मात्र त्या किल्यास भोंवते आहेत असें पाहून ते फारच हर्ष पावले. हें हर्षाचें वर्तमान मराठ्यांच्या लष्करी टोळ्या जा मागें होत्या त्यांस लवकर समजून, ते लोक ही मोंगलांस लुटायाकरितां मोठ्या त्वरेनें आले, आणि त्या किल्यास भोंवते जे लोक यांस घेरा घातला. मग दुसरे दिवशीं आगोआग मोर्चे उभे करून, त्या मोंगलांच्या लोकांवर तोफांचा मार करून, तो किल्ला घ्यावयाचा उद्योग चालविला. तेव्हां तो मार निजामअल्लीनें दोन दिवस सहन करून तिसरे दिवशीं (मार्चाचे पंधराव्ये तारिखेस) त्याणें आंतून सांगून पाठविलें कीं, आतां मारूं नका; इतःपर तुमचा व आमचा तह असावा. मग मराठे तें मान्य करून त्या निजामास म्हणाले कीं, जो तुमचा मशीर उल् मुलुख नामें मुख्य वजीर, जो नानाची निंदा दरबारांत करून फार अमर्याद बोलिला, त्याचा सूड उगवावयास आधीं तो आमचे स्वाधीन करावा. आणि जो मुलुख सदाशीवराव भाउनें सन् सत्राशें साठांत घेतला होता तो तुम्हांस पुनः दिला तो सर्व आम्हांस द्यावा. व तुमच्या मुलुखाची मर्यादा परिंड्यापासून तापीपर्यंत आहे. त्यांत आमचा कांहीं भाग होउन त्यांतच दवलताबाद किल्ला आम्हास असावा. याशिवाय तीन कोटी रुपये आमचे तुम्हाकडे बाकी आहेत ते आम्हास द्यावे, व आजपर्यंत सेनाखर्च झाला तो तुम्हीं द्यावा. याखेरीज आमचा रघोजी भोंसला याचा गंगथडीमध्यें घासदाण्याबद्दल बाकी ऐवज राहिला आहे तो एकुण तीस लक्ष रुपये द्यावे. आणि याणें पुनः गंगथडींत घासदाणा न मागावा याकरितां त्यास तीन लक्ष अठरा हजार रुपये वर्षास उत्पन्न होतसा मुलुख द्यावा. आणि वराडांत जो तुमचा भाग आहे त्याचा वसूल पहिल्याचाली प्रमाणें तुम्हीं घेत जावा.

असें त्या मराठ्यांचें मागणें त्या निजामास कठीण वाटलें नाहीं. परंतु तो वजीर मात्र त्यांचे स्वाधीन करावयाचें अवघड पडलें. अशा संकटसमयीं तो मशीर उल् मुलुख त्या निजामास बोलिला कीं, यात हांत मराठ्यांहीं बहुत मागीतलें नाहीं, आणि मला ही देण्याविषयीं आपण श्रमी होउं नये. मी त्यास राजी आहें. तेव्हां निजामानें दोनशें मराठे त्या वजीरास न्यावयाकरितां आले होते त्यांचा स्वाधीन तो मशीर उल् मुलुख यास केला. तेव्हां त्या मराठ्यांहीं त्यास आपल्यांत आणि नेला. ते समयीं पेशवा मोठ्या समारंभानें आपल्यास न्यावयास उठून पुढे

जाउन भेटला. नंतर मराठे आपल्या लश्करांत मोठ्या आनंदें करून उत्साह करिते झाले कीं, आज आह्मी मोठा जय संपादिला.

त्या समयीं रघुनाथराव मुलुखाची व पेशव्याची भेट झाली ते समयीं पेशव्याचें मुख म्लान झालें. तें पाहून मग त्या उत्साह समयीं नानानें श्रीमंतांस विचारिलें कीं, आपणास त्याचे भेटी समयीं श्रम होण्याचें कारण काय; त्यावर पेशव्यानें उत्तर केलें कीं, मोगलांहीं मित्रपणें आपली एवढी अमर्यादा करून घेतली, आणि आमचे लोक यत्नांवांचून जय पावले असतां आपणास आपणच विजयी असें मानितात, तस्मात् हे समयीं उभयपक्षीं पुरुष अप्रयोजक पाहून, मासें मन फार विव्हळ झालें. हें पेशव्याचें उत्तर परम योग्य पडलें कां कीं, त्या प्रसंगीं उभयपक्षीं लक्षलक्ष संख्येवर सैन्यें असतां केवळ युद्ध करूनच, दोन्हीं लश्करें मिळून दोनशें ही मनुष्य पडले असें नाहीं. याशिवाय रात्रीस घाबरेपणानें अव्यवस्था होउन, वल्याकिल्यास त्यांहीं घेरा घालून मोरचे बांधून तोफा चालविल्या त्यायोगें ही मोगल फार मेले गेले ते तरी युद्ध करून पडले असें ह्मणतां येत नाहीं.

याप्रमाणें खरड्याची लढाई झाली असतां, मराठी शिलेदार लोक त्यांत होतेते त्या दिवसापासून ती गोष्ट निघाल्यास आह्मीं त्या प्रसंगीं केवढा मान पावलों; त्या युद्धासारिखें यशस्वी युद्धच नाहीं, अशी प्रशंसा अद्यापि करताहेत.

नंतर पेशवा पुण्यास आला आणि नानाफडनवीस त्या संपादिले त्या मुलखाची व्यवस्था करावयास गुंतला. परशुराम भाउ पटवर्धन व रघोजी भोसले हे पुण्याबाहेर डेरे देउन राहिले; होळकर जेजोरीस उतरला, शिंदा जामगांवापाशीं राहिला; असें असतां पुण्यास वर्तमान आलें कीं निजाम अल्लीचा पुत्र अल्ली जाह, तो हैदराबाद सोडून बाहेर जाउन आपल्या बापाचें स्थान आपण घ्यावयासाठीं मोठें बंड करून राहिला आहे: हें वर्तमान ऐकून होळकर व शिंदे पुण्यास आले, त्यावरून त्या वेळेचे मुसलमान लोक बोलत कीं, हे सर्व मराठे त्या बंडास अनुकूळ आहेत, परंतु याचा काहीं तपास लागत नाहीं. तो अल्लीजाह यास निजामाचा पलटनी सरदार पाठीस लागून धरून हैदराबादेस त्यास घेउन जात होता, तेव्हां तो आपल्या वडिलाचे सन्मुख जावयाचे लाजेस्तव वाटेतच विष खाउन मृत्यु पावला.

यानंतर दक्षिणेंत गावहिंदुस्थानांत गेला, परशुराम भाउ नासगांवास गेला, होळकर पुण्यांत होता, आणि रघोजी भोसला दक्षिणेंत गेल्यावर एक

महिना

महिना पुण्यास राहून मग त्याला नर्मदेच्या दक्षिणेकडे किनिएक मुलुखाचा सनदा पेशव्यानें देउन तो मोठा सन्मान पावून अक्टोबरमहिन्यांत तो तेथून आपले मुलुखीं आवयास निघाला. इतके दिवस नानानें जें जें कार्य केलें तें तें सिद्धीस गेलें; आणि तो आपल्या पराक्रमाच्या परम सीमा पावला, कांकीं त्यास दवलतराव शिंदा आदिकरून सर्व सरदार लोक वश होते. त्यायोगें असें दिसूं लागलें कीं असे माधवराव पेशव्याचे वेळेस मराठ्यांचें राज्य योग्यतेस चढलें होतें. तसें आतांही चढेल; परंतु त्या नानास आपली सर्वत्र आज्ञा कुंठित न झाली पाहिजे, अशी फार आवड होती; आणि दुसरा कोणी आपणास प्रतिस्पर्धी होईल असें भय ही वाटे. त्यामुळें शेवटीं त्याचा सर्व पराक्रम नष्ट होउन त्याच दुःखानें पुढें तो मरण पावला.

---

सन १७७४ पंचाहत्तरांपासून
त्र्याण्णवपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग अठ्ठाविसावा.

## अनुक्रमणिका.

नानाफडनवीस माधवराव नारायण पेशवा यास कोणत्या प्रकारें बंदोबस्तानें वागवीत होता तें व नानाच्या आज्ञा वरघुनाथरावाचें कुटुंब यांस कशा बंदोबस्तांत रक्षिलें तें प्रकरण.

रघुनाथरावाचा औरस पुत्र बाजीराव व ईन त्याचे गुण व स्वरूप याचें वर्णन.

त्या बाजीरावाविषयीं नानानें फार मत्सर केला तो पर्याय.

माधवराव नारायण पेशवा व बाजीराव रघुनाथ हे दोघे नानाच्या बंदोबस्तांत होते यास्तव ते समदुःखी होउन त्या उभयतांची मैत्री झाली.

तें नानास विदित होउन त्याणें त्या उभयतांचा विशेष बंदोबस्त केला.

तें माधवरावास सहन न होतां त्याणें माडीवरून उडी टाकिली, आणि मृत्यु पावला.

नानानें बाजीरावगादीचा अधिकारी न व्हावा ह्मणून यत्न केला तो प्रकार.

बाजिरावानें

बाजीरावानें बाळोबा नान्या व शिंदा यांस आपल्या पक्षाचे करून नानाची मसलत मोडावी असें केलें तें समजून नाना आपणच बाजीरावाला गादीवर बसवावयास उद्युक्त झाला.

तेव्हां बाळोबा नान्यानें बाजीरावाला शिंद्याचा बंदींत देवून चिमणाजी आपास गादीवर बसवून परशुराम भाउ पटवर्धन तो मुख्य कारभारी केला.

त्या कारभारीमंडळीनें नानास मुख्य कारभारी करितों असें मिष करून त्यास दगा करावयाची मसलत केली तें कृत्य नानास विदित होउन तो सावध झाला त्यांत तो नाना आणि बाजीराव यांचें एकच कार्य पडलें.

सरजेराव घाडगा व बाळोजी कुंजर हे नानाचा उपयोगीं कसे पडले तें प्रकरण.

नंतर बाजीरावास गादीचा धणी करावयाकरितां त्या नानानें शिंदा अनुकूळ केला.

तीरार सिद्धीस गेली नाहीं तोंच बाळोबा नान्यास विदित होउन त्यानें बाजीरावास हिंदुस्थानांत पाठवावयाचें योजिलें. तेथें जाणें न होण्यासाठीं बाजीरावानें कांहीं युक्ति केली तो प्रकार.

नानानें शिंद्याचे द्वारें बाळोबा नान्यास कैद केला.

परशुराम भाउ पुण्याहून पळाला तेसमयीं त्याचे पाठीस लोक लागले त्यांहीं त्यास धरिला.

बाजीरावास पेशवे पदवी प्राप्त झाली.

नंतर चिमणाजी आपायास कांहीं प्रायश्चित्त देउन तो गुजराथचा अधिकारी केला तो प्रकार.

नानानें करार केल्याप्रमाणें शिंदा व रघोजी भोसला यांस तें तें प्राप्त केलें.

परंतु निजामास कबूल केल्याप्रमाणें बाजीराव देईना म्हणून मशीर उल्मुल्ख फार रुष्ट होउन तेथून निघोन गेला.

तुकोजी होळकर याचा मृत्यु नंतर त्याचा पुत्रांत गादीविषयीं वाद पडला.

मल्हारराव होळकर युद्ध करून मृत्यु पावला.

काशीराव होळकर यास शिंद्याचे द्वारें आपाच्या सर्व अधिकार प्राप्त झाला.

नाना व शिंदा या दोघांस दूर करावयाविषयीं बाजीराव यत्न करूं लागला.

गेला.

त्यांत शिंद्याच्या हातून नानास कैद करून तो नाना व त्याचे पक्षपाती लोक यांचीं घरें लुटावयाची आज्ञा दिली त्यायोगें सर्व शहरांत दंगा झाला.

त्यानंतर बाजीराव पेशवा याचा मुख्य कारभारी अमृतराव झाला.

सखाराम घाटगा याणें आपली कन्या शिंद्यास दिली आणि त्याचा मुख्यत्वें कारभार आपण करूं लागला.

तो सर्जेराव घाटगा व बाळोजी कुंजर हे दोघे बाजीरावाच्या अनुकूलतेनें पुण्यांतील कित्येक मोठमोठ्या गृहस्थांस अत्यंत पीडा करून त्यांपासून पैका घेते झाले.

अमृतरायानें शिंद्यास धरावयाची मसलत केली त्यास बाजीरावाची अनुकूलता होउन शेवटीं त्या बाजीरायाचा भित्रेपणामुळें सिद्धीस गेली नाहीं.

नानानें त्याचें काम परशुरामभाउ पटवर्धनास सांगून त्यायोगें तो बंदींतून मुक्त झाला.

## भाग अठ्ठाविसावा.

सवाई माधवराव पेशव्यास नानाफडनवीस यानें याचा लहानपणापासून आपल्या हातीं फार बेतानें ठेविला होता. तो एकवीस वर्षांचा मोठा झाला तरी त्याचा बंदोबस्तांत किमपि न्यून पडूं दिलें नाहीं. आणि त्यासमयीं जे कोणी कांहीं राज्यकारणी बंदीस पडले होते, त्यांस मात्सर्य करून फार जपूं लागला. तो प्रकार असा. साताऱ्याचा राजा बंदींत होता त्याचा खर्चास नेमणूक केलेली होती, ती कमी केली; आणि त्याचे भाउबंद सोयरे धायरे यांस त्यांची भेट न होई असें केलें.

रघुनाथराव यांचें स्त्रीपुत्रादि कुटुंब कोपरगांवांस, सन सत्राशें श्याण्णवपर्यंत होतें; मग तीं रघुनाथरायाची स्त्री आनंदीबाई तीचा प्रकृतीस कांहीं आजार झाला म्हणून, तिला तिचा परिवारासहवर्तमान, नाशिका जवळ आनंदवल्लीस नेउन ठेविली. ती, तेथें सन सत्राशें श्याण्णवांचा एप्रेलमहिन्यांत मृत्यु पावली; नंतर निजाम अलीचा युद्धप्रकार उत्पन्न होईतोंपर्यंत, तिचा परिवार तेथेंच होता; मग कांहीं दंड न व्हावें यास्तव त्यास शिवनेरीचा किल्ल्यांत नेऊन ठेविला. त्यांत अमृतराव नांवानें रघुनाथरावाचा दत्तपुत्र व दोघे औरसपुत्र त्यांत वडील बाजीराव धाकटा चिमणाजी आपा, हे तिघे होते.

ते. मग तें निजामअल्लीशीं व मराठ्यांशी युद्ध होऊन तो गवगवा उरकल्यावरही त्यांस मोकळे न सोडितां रघोपंत गोडबोले व बळवंतराव नागनाथ हे दोघे आपले कारकून त्यांजवळ ठेवून, पहिल्यापेक्षां विशेष बंदोबस्त केला.

ते तिघेही रूपेंकरून उत्तम आणि तरुण व सुस्वभावाचे होते; त्यांस नानाफडनवीस असा उपद्रव देत असे कीं, तें पाहून तो बहुत लोकांचे मनांतून उतरला; कांकीं त्यांपासून किमपि उपद्रव न होतां त्यांस अतिबंदोबस्तांत ठेवणें ह्या त्या नानाचा क्रूरपणा स्पष्ट दिसून आला. यास्तव जे लोक पहिले रघुनाथरावाचा पक्षाचे होते ते याचें असें आचरण पाहून या नानाची निंदा करीत. आणि ते तिघे रघुनाथरावाचे पुत्र यांची प्रशंसा करीत; याप्रमाणें त्या गृहस्त मंडळीची वृत्ती जाणून तो नानाफडनवीस आपल्या वृद्धदशेमुळें अधीरपणें त्यांचा बंदोबस्त अधिकच करूं लागला. त्यांत रघुनाथरावाचा औरसपुत्र थोरला बाजीराव, याविषयीं तर भयेंकरून फार मात्सर्य करूं लागला.

बाजीराव तारुण्येंकरून युक्त, आणि त्याची अवयवसंस्था फार नीटस, व सुस्वरूप तर अशी दिव्य कीं, ज्याचें तोंड पहातांच माणसाचें मन त्याकडे लागावें. आणि त्याचा बोलण्यांत असा कांहीं रस कीं, तें भाषण ऐकून मनुष्यानें मोहित व्हावें. ते वेळ त्याचा वयास एकोणीस वर्षें होतीं; आणि तो घोड्यावर बसणें व तलवार धरणें व तीरंदाजी करणें या कामांत परमकुशल असून, त्यासारिखा भालाखेळणारा साऱ्या गंगथडींत दुसरा कोणी न व्हता. याशिवाय तो शास्त्रनिपुण असून, याज्ञिक कर्मांतही फार उत्तम होता. तो माधवराव नारायण पेशवा याचा चुलतचुलता त्याची प्रशंसा ऐकून माधवराव पेशवा बहुत संतुष्ट होउन त्याला मुक्त करून त्यास भेटावयाविषयीं फार इच्छित असे. म्हणून त्याविषयीं माधवरावानें नानाफडनवीसाजवळ कधीं ती गोष्ट काढिली असतां तो आपल्या अतिसावधपणानें पेशव्यास समजावी कीं, तो कितीजरी चांगला असला तरी तुमचा शत्रू असें समजा; त्याचा बाप रघुनाथराव व आनंदीबाई त्याची माता हें स्मरण धरून असावें. असें अनेक प्रकारें नाना पेशव्यास समजावीत असतां तें सर्व व्यर्थ गेलें. कांकीं, तो जों जों त्यास विपरीत समजावी तों तों त्यास बाजीरावाचा भेटीची इच्छा अधीकच उत्पन्न होई; परंतु त्या पेशव्यानें कांहीं एखादी गोष्ट आपले मनें केली तर तें वर्तमान आपणास कळविणारे नानानें आपले चाकर गुप्तपणें त्याजवळ ठेविले होते. आणि बाजीराव तर त्याचे बंदींत असे. त्यामुळें परस्परें त्या दोघांची मैत्री साधेना. असें असतांही आपणावर पेशवा प्रीति करितो. हें वर्तमान ऐकून त्या बाजीरावानें आपणाजवळ नानाफडनवीसानें

सानें

त्यानें ठेविलेला कारकून बळवंतराव नागनाथ यास आपलासा करून त्याचे मुखानें माधवराव पेशव्यास निरोप पाठविला कीं, सांप्रत मी शिवनेरी किल्ला येथें नानाचे बंदींत आहें, आणि आपण आत्मनाधिष्ठित असून, त्याचा बंदोबस्तामुळें हल्लीं मजसारिखेंच आहांत. ऐशीयास याचा बंदोबस्त देहपुरताच आहे, मनाचा बंदोबस्त याचा हातीं नाहीं. त्यास तुमचा व आमचा स्नेह मात्र असावा. इतक्यानें जसे आपले उभयतांचे वडील पूर्वीनामांकित झाले तसेच आपणही समयविशेषीं होउं. त्यावरून पुढें त्या दोघांमध्यें त्या बळवंतराव नागनाथाचे द्वारें एकमेकाचीं पत्रें एकमेकास पोंहोंचूं लागलीं. तें वर्तमान कांहीं अवकाशें करून नानास कळतांच, त्यास असा राग आला कीं, तो पाहून लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. त्या नानानें प्रथम बळवंतराव नागनाथ याचा पायांत बिडी घालून किल्यावर टाकिला, आणि बाजीरावाभोंवता पहिल्यापेक्षां विशेष बंदोबस्त ठेवून माधवराव पेशवा याची बहून निर्भर्त्सना केली.

तो माधवराव पेशवा नानाफडनवीसाचा सूत्रानें वागण्यास आधींच कंटाळला होता; आणि त्याचा मित्र बाजीराव यास अधीक उपद्रव झालेला ऐकिल्यानें फारकष्टी होउन, त्याणें आपली बसायाची खोली सोडून बाहेर जाणें अगदीं टाकिलें; व कधीं दरबारासही येईना, त्यावरून लोकांत असें प्रसिद्ध झालें कीं, श्रीमंतांस ज्वर येतो म्हणून ते दरबारास येत नाहींत. त्यावर्षी (सन सत्राशें पंचाण्णवांत) दसरा अकटोबराचे बेविसाव्ये तारिखेस पडला; त्याचा समारंभ फार चांगला केला होता, ते दिवशीं माधवराव पेशवा सीमोल्लंघनास बाहेर निघोन संध्याकाळीं त्याणें आपल्या रीतीप्रमाणें सर्व मानकरी लोकांचा भेटी घेतल्या; ते समयीं तो कोणासही अजारीसा दिसला नाहीं, परंतु त्याचें मन सर्वांशें उदास झालें होतें. इतक्यानेंच त्याणें मग या करितां त्याचे शरीरीं कांहीं विकार नसून एकाएकी पंचविसाव्ये तारिखेस माडीवरून खालीं कारंजावर उडी टाकिली. तेव्हां त्याचे हातपाय मोडून त्या कारंजाचा नळीची जखम त्याचे अंगास फार लागून तो तिसरे दिवशीं मृत्यु पावला. त्याणें मरते समयीं फार आग्रहें करुन सांगीतलें कीं, माझे पाठीमागें गादीवर बाजीरावाची स्थापना करा. असें बोलून मग त्याचा परममित्र हरिपंत फडक्याचा पुत्र बापूराव फडका याणें त्यास धरून बसविल्या असतां तो त्याचा अंगावर टेंकलेल्या मृत्यु पावला.

हें माधवरावाचें मरण नानाफडनवीस ऐकून फारकष्टी व्हावा. परंतु न व्हावा; त्याचें कारण असें तो पूर्वीपणें समजला होता कीं, याचा मरणें

करून

करून आपल्या मोठेपणास धका आहे म्हणून तो आपल्याच दुःखांत गुंतला.
त्याणें प्रथम असा उपाय केला कीं, माधवरावानें फार आग्रह करून सांगीत
लें कीं, बाजीरावास गादीचा धणी करा. तें गुसराखूं लागला कीं, बाजीराव
यास स्थापिला असतां केवळ आपल्या मोठेपणासच हानी होईल असें ना
हीं; कदाचित प्राणासही धका पोंहचेल. हें भय मानून त्याणें माधवराव पेश
व्याचा उडीचें वर्तमान ऐकतांच परशुरामभाउ पटवर्धन यास सांगून पाठवि
लें कीं, हे वेळेस तुह्मा जवळ जितकी फौज असेल तितकी व दुसरी लवकर मि
ळेल तितकी घेउन त्वरित पुण्यास या. नंतर पेशव्याचा मृत्यूचे दुसरे दिवशीं
रघूजी भोसला व दवलतराव शिंदा यांस नाना फडनवीसानें पुण्यास माघारें बोला
विलें कीं, आतां धणी कोण करावा तो विचार करावयास लवकर या. तेवेळे
स तुकोजी होळकर पुण्यासच होता. त्यास नानानें बहुत गोष्टी सांगीत
ल्या कीं. पहिल्या पासून रघुनाथरावयाणें इंग्लीशांशीं संबंध ठेविला तसा
च हल्लीं बाजीराव धणी झाला असतां जर इंग्लीशांशीं स्नेह करील तर फा
र नाश होईल. इतकें त्यास समजावून शिंदा व भोंसला यांचें मन आपणा
कडे लावून घेतलें, आणि आपला मतलब त्यांस सांगीतला कीं, यशोदा
बाई माधवरावाची स्त्री तीजरी लहान आहे तरी तीचा मांडीवर दत्तक बस
वून त्याचा नावानें राज्य यथास्थित चालवावें. हें ऐकून सर्व मराठे सरदार
मान्य झाले; त्यांत बाळोबा तात्या नामें शिंद्याचा मोठा कारभारी होता तो मात्र
प्रतिकूळ बोलिला. तेव्हां जीउबा बक्षी नामें शिंद्याचा मोठा दुसरा सरदार होता
तो बोलिला कीं, आपला धणी शिंदा तो तरुण आहे यास्तव त्याचें सांगणें उ
पयोगी नाहीं. वरकड जे भोंसले वगैरे पुरातन मोठे मोठे सरदार आहेत ते
सांगतील तें योग्य. नंतर सत्राशें शाहाण्णवांचा जानेवारींत नानाचा मसल
तीप्रमाणें त्या सर्व सरदारांची मान्यता होउन त्या पत्रावर शिका झाला. नंत
र ते सारे सरदार आप आपल्या ठिकाणास जाउन कारभार चालविते झाले.

त्यापुढें तो दत्तक शोधून आणून स्थापावा एवढें मात्र राहिलें, परं
तु हें सारें वर्तमान बाजीरावास कळलें होतें आणि तो बाळोबा तात्या ही आ
पल्या पक्षाचा आहे असें समजून त्याजकडे कागदपत्रांची वहिवाट करू
न थोडक्याच महिन्यांत तो वश केला. त्याच सुमारें जीउबा बक्षी याचे
शरीरीं समाधान नाहींसें होउन, तो केवळ आसन्नमरण झाला असतां,
त्याणें दवलतराव शिंद्यास जवळ बोलावून आपल्या पलंगावर बसवून
घेउन बोलिला कीं, बाळाजी विश्वनाथाचा प्रत्यक्ष वंश असतां मीं दत्तक घे
ण्याविषयीं अनुमोदन दिलें हें मला मोठें खेदास्पद झालें. असें त्याचें भाष

ण

ण झाल्यानंतर तो जीउबा बक्षी मृत्यु पावला. हें वर्तमान बाजीरायास समजतांच तो हें आपणास हितावह आहे असें जाणून, त्याणें दवलतराव शिंद्याकडे बोलणें लाविलें. तेव्हां असें ठरलें कीं, बाजीरायानें चार लक्षांचा मुलुख शिंद्यास द्यावा; आणि शिंद्यानें बाजीरायास आसनावर स्थापावयाकरितां, जो सेनाखर्च लागेल तोही बाजीरायानें द्यावा; ह्मणजे त्यास पेशवे पदवी प्राप्त होईल. हें वर्तमान तात्काळ नानाला कळलें तेव्हां तो फार भिउन त्याणें परशुराम भाउ पटवर्धन, तासगावांस होता त्यास आपल्याजवळ मोठ्या त्वरेनें बोलाविला. तो आपले स्वार जमा करून घेउन, तासगाव सोडिल्यापासून, दोन दिवसांत पुण्यास येउन पोंहचला, मग त्याचें व नानाचें बोलणें झालें तेव्हां असें ठरलें कीं, शिंदा जें करणार तें आह्मीं प्रथम करावें हें उत्तम. त्यानंतर परशुराम भाउ शिवनेरी किल्ल्यास जाउन ती गोष्ट बाजीरावास त्याणें विदित केली. तेव्हां त्या बाजीरावाचा भाउ अमृतराव तो बाजीरावास ह्मणे कीं, हें काम शिंद्याच्या हातून होउं द्यावें; याची त्वरा करूं नये. तेव्हां त्या परशुरामभाउनें बाजीरावास अनेक प्रकारें अगत्याच्या गोष्टी सांगून शेवटीं त्यास विश्वासार्थ गायीचें शेंपूट हातांत धरून शपथ दिली. तेव्हां तो बाजीराव आपला धाकटा भाउ चिमाजी आपा यास कधांत्या किल्ल्यावरून उतरून पुण्यास गेला, आणि त्याचा वडील भाउ अमृतराव तो तेथेंच राहिला.

मग बाजीराव व नाना फडनवीस यांची भेट होउन परस्परें नेम ठरला कीं, यापूर्वी उभयपक्षीं जा अनुचित गोष्टी झाल्या असतील, त्या कोणीच मनांत आणू नये. असें झाल्यावर त्यांचा बेत ठरला कीं, बाजीरावानें राज्य नानानें मुख्यत्वें करून चालवावें. याप्रमाणें करारपत्र ही झालें. ही झालेली गोष्ट बाळोबा तात्यास कळल्यावर त्याला मोठा राग येउन त्याणें मनांत निश्चय धरिला कीं, नानाची मसलत अगदी पाडून टाकीन. तो अर्थ सिद्धीस न्यावयाकरितां त्याणें आपला धणी शिंदा त्यावेळेस गोदावरीचे कांठीं होता, तो वश करून त्याचें सैन्य पुण्यावर चालतें केलें.

नाना फडनवीस मसलतीविषयीं फार दृढ होता. परंतु आंगधटाईविषयीं तो तादृश नव्हता. शिंद्याचें लश्कर आपल्या लश्करापेक्षां प्रबळ. आणि बाजीरावाचाही विश्वास येत नाहीं व आपण जर बाळोबाच्या हातीं सांपडलों तर प्राणासही भय आहे, असें समजून तो नाना बाजीरावास परशुरामभाउच्या स्वाधीन करून आपण तेथून निघोन पुरंदरावरून साताऱ्यास गेला. बाळोबा तात्या व बाजीराव यांची पुण्यांत भेट झाली. तेव्हेळेस हे दोघे परमस्नेही आहेत असें दाखविलें असतां, बाजीरावानें अविश्वासक आचरण ज्या

बाळोबा

बाळोबा तात्याच्या स्मरणांत आहेसें लोकांस भासलें. नंतर तो बाळोबा तात्या आपल्या मनांत बहुत विचार करून ठरविता झाला कीं, बाजीराव धणी न करावा; जो आपल्या विचारास येईल तो धणी करून नाना फडनवीसाशिवाय कारभारी हा दुसराच करावा. मग त्याणें परशुरामभाउस कळविलें कीं, माधवरावाची स्त्री तीचे मांडीवर चिमणाजी आपा यास बसवून, बाजीराव बंदींत ठेवून, सर्व कारभार तुह्मी संभाळावा; अशी माझी मसलत आहे, त्यास तुमचा विचारांत कसें येतें. तेवेळेस परशुरामभाउ, नाना आंगधटाईपणांत कमीसा आणून, त्याची कांहींशी अवगणना करित असे; तथापि तो नाना फार शाहणा ह्मणून त्याचा विचार ध्यानास आणि त्यावांचून त्याणें त्यास उत्तर न दिलें. नानाची मसलत झाली कीं, या गोष्टीस अनुमोदन द्यावें; परंतु बाजीराव आपल्या बंदींत ठेवावा. नंतर त्याप्रमाणें ठरलें. मग बाळोबानें त्या नानास दर्शिविलें कीं, तुमची व आमची मैत्री असावी, त्याप्रमाणें नानाही मान्य झाला.

बाजीराव आपल्या बंदींत असावा ही परम हितकारक नानानें दिलेली मसलत, परशुरामभाउला उपयोगी नाहींशी वाटून, तो उत्तर देते समयीं त्याविषयीं कांहींच न बोलिला; त्यावरून बाजीराव शिंद्याचे स्वाधीन राहिला. हें वर्तमान नानाला, वाईहून पुण्यास जावयास सिद्ध होते समयीं समजलें; तेव्हां तात्काळ त्याचे ध्यानांत आलें कीं, हें सर्व कृत्य मला दगा करावयाचें आहे, त्यास हे समयीं पुण्यास जाउं नये. मग तो नाना वाईस राहून, त्याणें अगोधरच सातार्‍याचा राजापासून, नव्या पेशव्याचीं वस्त्रें आपल्याजवळ घेउन ठेविलीं होतीं, तीं पुण्यास पाठवून दिलीं.

त्यावेळेस परशुरामभाउ व शिंदा आपला घात करितील असें बाजीरावाचा मनांत न आलें; असें असतां तें वर्तमान कोणप्रकारें त्यास कळलें, तें समजलें पाहिजे, कां कीं, ते वेळेस पुण्याचे दरबारची रीति कशी होती, ती त्यावरून समजेल; आणि त्यापुढें ही चाल तशीच पडत आली, तें ध्यानांत येईल.

प्रथम शिंद्यानें बाजीराव आपल्या लष्करांत यावा ह्मणून अशी युक्ति केली कीं, त्यास गादीचा धणी करावयाचा कामाबद्दल कांहीं खर्च लागल्याचें निमित्त करून, त्यास पैका मागीतला. तेव्हां तो बाजीराव बोलला कीं, आह्मास देववत नाहीं. त्यावर शिंदा आग्रहाचें बोलणें करित असतां, कांहीं सावाद होतां होतां शिंद्यानें दर्शिविलें कीं, बाजीरावाचा कठोर शब्दें करून आपलें मन दुखावलें, ह्मणोन त्यास निरोप पाठविला कीं, मी माघारा हिंदुस्थानांत जातों, त्यास कृपा करून मला आज्ञा झाली पाहिजे. त्यावरून,

बाजीराव

बाजीराव शिंद्याच्या कल्पनेप्रमाणेंच तात्काळ त्याच्या लष्करांत जाउन त्याशीं एकांत करूं लागला. तेव्हां शिंद्यानें अस्तमान होईतोंपर्यंत, युक्तीनें त्या गोष्टी लांबविल्या. इतक्यांत एकाएकीं असें वर्तमान आलें कीं, परशुरामभाउ चिमणाजीआपास घेउन पळाला परंतु त्यास कोठें नेला तें कळत नाहीं. इतकेंमात्र त्याला मानात्यास नेला अशी शहरांत वदंता आहे. तेव्हां बाजीराव अत्यंत भययुक्त होत्साता, शिंद्यास म्हणूं लागला कीं, तूं पाठीमागून जाउन त्यास धरून आण. त्यावर त्याणें उत्तर दिलें कीं, तो कोठें गेला तें कळत नाहीं. तेव्हां रात्रीचें धावणें ही उपयोगी नाहीं; असें त्याचें बोलणें ऐकून बाजीराव बोलिला कीं, असें आहे त्यास मी आजची रात्र येथेंच रहातों. असें ऐकतांच शिंद्यानें तें अवश्य मानून त्यास ठेवून घेतला. मग दुसरे दिवशीं शिंद्याचे लोक त्या बाजीरावास म्हणूं लागले कीं, आपण येथेंच स्वस्थ रहावें. येथून दुसरे जागीं जातां, नाश आहे. त्यावरून तो समजला कीं, घात झाला.

चिमणाजीआपाला परशुरामभाउ व बाबूराव फडके यांणीं पळविला खरा. परंतु त्यास पुण्यांतच लपविला. नंतर त्याला सांगूं लागले कीं, तुला आम्ही गादीचा अधिकारी करितों तेव्हां तो आपल्या भावाबेराज आपण धणी होईना. शेवटीं बळेंच त्याला पेशवा करून चिमणाजीमाधवराव असें त्याचें नाव ठेविलें. ही गोष्ट सन सत्राशें शाण्णवांच्या मे महिन्याचे सव्विसाव्ये तारिखेस घडली. दुसरे दिवशीं परशुरामभाउनें नानास सांगितलें कीं, तुम्हीं पुण्यास येउन बाळोबातात्याचा स्नेह होत अंतर पडलें आहे. तें नीट करून मुलुखाचें कामावर रहावें; आम्ही लष्करांचें काम संभाळितों. त्यावर नानानें परशुरामभाउस उत्तर लिहिलें कीं, कांहीं बोलणें व्हावयाचें आहे त्यास तुमचा पुत्र हरिपंत यास आधीं पाठवून द्यावा त्याप्रमाणें हरिपंत ही आला, परंतु केवळ वकीलासारिखा न आला; त्याजबरोबर चारपांच हजार निवडक स्वार होते. आणि तें समयीं बाबूराव फडके यांचें नानास गुप्त पत्र आलें कीं, आपण क्षणमात्र विलंब न करितां आपल्या रक्षणाचा उपाय करावा. त्यावरून त्याणें वाई सोडून प्रतापगड किल्यामध्यें शिबंदी नवी वाढवून कोंकणांत महाडास गेला. तेथें रायगडाची बंदोबस्ती फार चांगली केली.

बाळोबातात्याचा मनांत होतें कीं तात्काळ नानास धरावा यास्तव आपला धणी शिंदा याचे पलटणी लोक त्या कामास नेमणार होता. परंतु नानाचा पक्षाचे कोणी लोक होते ते परशुरामभाउशीं कांहीं बोलून त्याचे मतें करून

परशु

परशुरामभाउ हा बोलिला कीं, बलात्काराचा उपाय हे समर्थी नकरावा; परंतु परशुरामभाउ त्यानानास प्रतिकूळ नव्हता, असें न समजावें कां कीं. थोडके दिवस झाल्यानंतर त्याणें नानाच्या जहागिरीचा मुख्य होता तो शिंद्यास दिला. आणि त्याचा वाडा पुण्यांत होता तेथें राहून जें त्याचें द्रव्य सांपडलें त्याचा व्यय करूं लागला.

त्या समर्थी नानाचें द्रव्य अपार आहे, अशी लोकांत अवायी होती; व कोणी ह्मणत कीं, पेशव्यांचा बहुतां पिढ्यांचें द्रव्य जमलेलें होतें, तें सर्व नाना बरोबर घेउन गेला. त्यांत नानानें द्रव्य बहुत नेलें हें खरें, परंतु तें पेशव्याचें नसेल; कां कीं. सवाई माधवराव पेशवा होय तोपर्यंत. पेशवे कर्जभरू होते. त्याणें त्यानेलेल्या द्रव्याच्या बंदोबस्त कोणे प्रकारें केला व कोण कोणत्या सावकारांकडे ठेविलें. त्याचा अद्यापि ठिकाण नाहीं, ह्मणून सर्व मराठे लोक आश्चर्य करितात.

परशुरामभाउ पुण्यांत पेशव्याचा कारभारी झाला ते समर्यी शिंद्यास लश्करी खर्चाचा फार तोटा पडला होता, ह्मणून परशुरामभाउनें त्यास वचन दिलें कीं. मी पुष्कळ द्रव्य उत्पन्न करून देतों. यास्तव तो परशुरामभाउ मशीरउल्मुलुखास बोलिला कीं, तुमच्या धण्यांकडे आमचें सरकारीरुपये तीन कोटी येणें आहेत, त्यापैकीं त्यापासून या वेळेस कांहीं अंश देविल्यावर. तुह्मांस त्याकडे जावयाची मुक्तता केली जाईल; त्यावर त्या मशीरउल्मुलुखानें उत्तर दिलें कीं, मी या कामाचा उद्योग यथाशक्ती करीन. असें त्याचें वचन झाल्यावर तो पुण्याजवळ डेरा देउन रहावयाची आज्ञा पावला. नंतर थोडक्याच वेळानें त्याचा तळावर पुष्कळ लोक घेउन, तो तेथें मोठ्या समारंभानें राहिला.

या प्रकारें पुण्याच्या दरबारांत कारभारी मंडळ नवें झाल्यानें, बाजीराव व नाना फडनवीस यांचा परस्परें स्नेह वृद्धिंगत होउं लागला. मग ते एकमेकास कायदपत्रें पाठवूं लागले. त्या कामांत कोणी शूद्र बाळोजी कुंजर नामें शिलेदार मध्यस्थ होता; तो महाडास जाउन नानास बाजीरावाच्या हिताविषयीं आग्रहानें कित्येक गोष्टी सांगता झाला, त्यायोगें नानाचें मन पहिलें बाजीरावाकडे होतें, तें अधिकच झालें. मग त्या नानानें कांहीं युक्ती करून पेशव्याची खासगी फौज बाबूराव फडक्या याचे स्वाधीन होती, ती त्या फडक्यास कह्यां वश केली, आणि तुकोजी होळकर ही आपल्या सर्व लोकांसह्यां वश होउन. त्या नानाच्या खुणेची मार्ग वाट पहात होता. याखेरीज त्या नानानें रायाजी पाटील नामें कोणी शूद्र बाळोबातात्या

चा

च्या हवी होता, त्याचे द्वारें शिंद्याशीं बाजीरावाच्या कार्यार्थ बोलणें केलें. तो प्रकार असा. नानानें शिंद्यास निरोप पाठविला कीं, जर तुम्हीं बाळोबा तात्यास बंदींत घालून बाजीरावास गादीवर बसवाल तर, तुम्हास हिंदुस्थानांत जाते समयीं, परशुराम भाऊची सर्व जहागीर व अहमदनगर किल्ला व दहा लक्ष रुपये वर्षास उत्पन्न होतसा मुलुख देऊं.

याशिवाय नानानें तें कार्य सिद्धीस न्यावयाकरितां आणीक एक मसलत योजिली, तो प्रकार असा. सखाराम घाडगा नामें कोणी शूद्र कागलकराचा वंश होता. तो मोठा चतुर आणि उमेदवार असे; यामुळें रायाजी पाटलाची त्यावर प्रीति बसली; आणि शिंदाही त्यास प्रसन्न होता, कांकीं, त्याची कन्या अति सुंदर असे ती आपली स्त्री करावयाविषयीं दवलतराव शिंदा इच्छित असे. यास्तव नानानें तो सखाराम घाडगा वश करून शिंदा अनुकूळ आपणास व्हावयाविषयीं तेंही प्रकरण आपल्या अर्थसाधनास उपयोगी केलें.

असें सहाय करून नानानें तो शिंदा वश केला. हें वर्तमान बाबूराव फडके वगैरे जे नानाचे पक्षपाती होते त्यांस कळलें. तें त्यांनीं तादृश गुप्तरक्षितांत आलें त्यामुळें बाळोबा तात्यास तो सर्व वृत्तांत विदित होउन त्याणें तात्काळ बाबूराव फडक्यास बंदींत घातला, आणि नीलकंठराव परभू व मानाजी घोरपडे यांस धरावयाकरितां लोक पाठविले, परंतु ते अगोदरच सावध होउन त्यांहीं बाजीरावाच्या कार्याकरितां लोक ठेविले होते, त्यांसहीत त्या धरणारांशीं लढून वायीकडे निघोन गेले. तेथें मानाजी फांकडा होता, तो त्यांच्या कुमकेस देउन, नानानें त्यांस कांहीं द्रव्य देउन, सालप्याच्या घाटास पाठविले. तेथें नानाचा कोणी इष्ट, बजाबा शिरवळकर होता त्याची त्यास कुमक होउन, दहा हजार फौज जमा झाली. मग त्यांहीं आपण बाजीरावाचे पक्षी असें प्रसिद्ध केलें.

नानानें एवढे लांबलांब पल्ले बांधले ते, पुण्यांत बाळोबा तात्यास कळले नाहींत त्यास हें दहा हजार फौजेचें मात्र बाजीरावाचें कृत्य सें वाटलें. त्यावरून त्या बाळोबा तात्यानें कल्पना केली कीं, बाजीरावास जर हिंदुस्थानांत पाठविला म्हणजे त्याची मसलत मोडेल. असें मनांत ठरवून त्याणें सखाराम घाडगा यास कांहीं फौजेसहीत बाजीरावाबरोबर देउन हिंदुस्थानाकडे चालविला. तो सवरनदीचे कांठीं आई तोंपर्यंत बाजीरावानें तो घाडगा वश केला; तेव्हां त्याणें निश्चित सांगितलें कीं तुमचें हिंदुस्थानांत जाणेंच न होतां शिंद्यानें तुम्हांस गादीवर बसवावें या कार्यासाठीं मी आपली कन्या [illegible]

शिंदे

शिंद्यास देउन, आणीक ही यथाशक्ति उद्योग करीन; परंतु हें काम झालें असतां, कागलगांव मला इनाम करून द्यावें आणि शिंद्याचा कारभार मुख्यत्वें मासे स्वाधीन असावा: याशिवाय मधः दोन कोटि रुपये शिंद्यास देउं केले पाहिजेत. इतक्या ह्या गोष्टी बाजीरावानें मान्य केल्या नंतर आपल्ये शरीर प्रकृतीस बरें नाहीं असें निमित्त करून त्यानें वगतारींत मुक्काम केला.

इतकें होई तोंपर्यंत नानानें आपल्या नव्या नव्या मसलती परमदक्षतेनें चालविल्या होत्या, तो प्रकार असा. मशीर उल् मुल्क्याचे द्वारें नानानें गुप्तपणें निजाम अल्ली वश केला; तसाच रघूजी भोंसल्याशीं कांहीं बोलणें करून अनुकूल करून घेतला; आणि परशुराम भाउचा मुलुख लुटावयाविषयीं कोल्हापुरकरांस बुद्धि दिली.

असें असतां पुण्यांत वर्तमान होतें कीं, साळप्याच्या घाटाजवळ बाजीरावाची दहा हजार फौज जमा झाली आहे, तें बंड मोडावयाचें मिष करून, परशुराम भाउची आज्ञा घेउन, मशीर उल् मुल्क नानाच्या हितार्थ फौज जमा करूं लागला.

याप्रमाणेंच तेवेळेस शिंदा व होळकर ही बाळोबा तात्या व परशुराम भाउ यांस ठकवावयाचे मसलतीनें, तें बंड मोडावयाचेंच मिष करून कांहीं लोक साळप्यांकडे पाठवून कांहीं नाना फडनवीसास धरावयाचें निमित्त करून रायगडाकडे योजिले. मग तीं बाजीरावाची गोष्ट नानाच्या पक्षपातीयों कांहीं इंग्लीशांस कळविली असतां तेहीं मान्य झाले. याप्रमाणें सर्व सिद्धता होउन, अखेरीं बराचे सत्ताविसाव्ये तारिखेस शिंद्यानें बाळोबा तात्यास कैद केला, आणि मशीर उल् मुलुखाची व आपली फौज एकत्र करून परशुराम भाउ पटवर्धनास धरावयाकरितां पाठविली. तेव्हां तो परशुराम भाउ सावध होउन बरोबर चिमणाजी आपास घेउन कांहीं लोकांनिशीं शिवनेरी किल्यास गेला, परंतु त्याचे पाठीस लोक लागले होते त्यांस तो थोडक्या दिवसांत सांपडला. त्याला आनंदराव रास्त्याच्या स्वाधीन ठेविला.

इतक्यांत बाजीरावास भीमेच्या कांठीं कोरेगावीं आणिला, आणि अमृतराव व बाबूराव फडके हे दोघे कैदेंत होते ते मुक्त केले. ते समयीं नाना फडनवीस साळप्याच्या लष्करांत मिळून पुण्यास जात होता. त्यास वाटेंत कांहीं बाजीरावाकडचें लिहिलें आलें; त्यावरून त्यास कांहीं भीति उत्पन्न होउन तो तेथेंच राहून, त्याणें बाजीरावास लिहिलें कीं, जर तुमचें मला अभय असेल तर मी येथून पुढें पुण्यास येईन, नाहींतर असाच राहीन. त्यावरून बाजीरावानें त्या नानाला अभय देउन आज्ञा दिली कीं तुमच्या मर्जीस

आलें

आलें तर चाकरी करावी नाहींतर न करावी. तेसमयीं शिंदा व निजामअल्ली यामध्येंही बाजीरावास आसनावर बसवावयाचा बेत होऊन, मुख्य कारभारी नाना असावा असें ठरलें; नंतर नाना फडनवीस पुण्यास आऊन नवेंवराचे पंचविसाव्ये तारिखेस पुनः आपलें काम करूं लागला. त्यापुढें दिसेंबराचे सत्ताविसाव्ये तारिखेस सातान्याहून वस्त्रें येऊन गादीवर बाजीरावाची स्थापना झाली. तेसमयीं सभेमध्यें मोठेमोठे पंडीत बसवून त्यांकडून ठराविलें कीं, माधवराव नारायण मृत्यु पावला, आणि रघुनाथरावाचे पुत्र आहेत, असें असतां केवळ भाउबंदकीसंबंधें माधवरावाचे स्त्रीनें दत्तक घ्यावा हें अशास्त्र, म्हणून होणार नाहीं. आणि चिमणाजी आपा याचा वडील भाऊ असतां याला बलात्कारें राज्यावर बसविला, तेंही अयोग्य कर्म झालें. यास्तव त्यास कांहीं प्रायश्चित्त पाहिजे. असें म्हणून त्याला कांहीं हलकें से प्रायश्चित्त देऊन तो गुजराथचा अधिकारी केला; परंतु तो तिकडे न जातां नावमात्र त्याचें केलें आणि आबा शेलूकर नामें त्याका मां वर कारभारी पाठविला.

नाना फडनवीस आपलें कार्य पुनः चालवूं लागला तेव्हां त्याणें आपल्या साहाय्यास त्रिंबकराव परचुरे यास घेतला; आणि नारोपंत चक्रदेव यास सेनेचें काम सांगीतलें. शिंद्यास आमेदनगरकिल्ला देऊं केला होता त्याप्रमाणें त्याचा स्वाधीन करून, परशुरामभाऊ पटवर्धन याची जहागीर हातीं लागेल तशी घ्यावी म्हणून आज्ञा देवविली. रघूजी भोंसला ही नानानें कबूल केल्याप्रमाणें सर्व पावून सन् सत्याण्णवाचा जुलई महिन्यांत नागपुरास गेला; परंतु नानानें निजामअल्लीशीं तह केला होता त्याप्रमाणें बाजीरावें केला. त्यावरून मशीरउल्मुलख्यास राग येऊन पेशव्यांची आज्ञा न घेतां हैदराबादेस निघून गेला, त्यामुळें नाना फडनवीसानें मोठ्या यत्नें करून संपूर्ण बंदोबस्ताविषयीं मसलत केली होती तींत अंतर पडलें, असें समजावें. त्यावेळेस निजामाचे दरबारीं पेशव्याचा कोणी वकील नव्हता. गोविंदराव पिंगळा मात्र पुण्यास होता. परंतु त्याचा कारभारी सदाशिव माणकेश्वर नामें तेथें आकबरनवीशीचें काम करून राहिला असे. तो मशीरउल्मुलुखाचें वैमनस्य दूर करण्याविषयीं उपयोगी केला.

बाजीरावानंतर त्या बंदोबस्ताचा न्यूनतेकरून अरिष्ट घडावें. कांकीं, त्याचा मनांत नानाचें तेज कमी पडावें असें होतें; आणि तेसमयीं (आगस्त महिन्याचे पंधराव्ये तारिखेस) तुकोजी होळकर मृत्यु पावला. तेंही बाजीरावाच्या मनोदयानुरूप झालें, तो प्रकार असा. तुकोजीनिवर्तला तेसमयीं त्याचे दोघे औरस पुत्र काशीराव व मल्हारराव. आणि

दोघे दासीपुत्र यशवंतराव व विठोजी. असे चवघे. त्यांत काशीराव तो बुद्धीनें आणि शरीरें करून अप्रयोजक होता. मल्हारराव शूर आणि सूज्ञ असे. मग थोडक्याच दिवसांत त्या दोघा भावामध्यें कलह उत्पन्न होउन ते दोघे दासीपुत्र मल्हाररावाचे पक्षपाती झाले. नंतर मल्हारराव याणें आपल्या बापाचा तळ सोडून पुण्याजवळ भांबवडें गांव आहे तेथें थोडक्याशा लोकानिशीं जाउन राहिला. त्यास गुप्तपणें नाना अनुकूळ होता. काशीराव आपल्या भावास जिंकावयाकरितां शिंद्यास शरण जाउन कुमक मागूं लागला. तो शिंदा तर त्या गोष्टीची वाटच पहात होता, त्यास हें समजतांच मोठ्या हर्षानें तो मल्हारराव होळकर यास धरावयाकरितां फौज देता झाला. तेव्हां मल्हारराव होळकर आपल्या भावाचे स्वाधीन न होतां युद्ध करून मृत्यु पावला. तेव्हां यशवंतराव व विठोजी हे दोघे राहिले. त्यांत यशवंतराव नरनाळपुरास गेला आणि विठोजी तो कोल्हापुरास गेला. ते वेळेस मल्हाररावाचे लोक बहुतेक त्या युद्धांत मृत्यु पावले. त्यांत एक लोणीकर रविराव शिंदा नामें मोठा शूर होता त्याचा मृत्यूनें वर्तमान त्याचा स्त्रीचे कानीं पडतांच ती उभी होती तशीच पडून प्राण सोडिती झाली.

शिंद्यानें काशीराव होळकरासारिख्या अप्रयोजकास हातीं धरल्यामुळें होळकराचें कूळ यास शिंद्याचा हाताखालीं वागावें लागलें. तेणें करून नानास होळकराचें बळ होतें तें शिंद्यास जाउन नानाचे योग्यतेचा समूळ नाश झाला, आणि शिंदा पुण्याचा कारभारांत शिरून स्वतंत्रपणें धण्यासारिखा वागूं लागला. तेव्हां काहीं वेळां त्याणें असा जुलुम केला कीं, त्यापूर्वीं पेशव्याचे दरबारीं कधींही तसे घडलें नाहीं. त्यांत कुलाबकर मानाजी आंगऱ्या यास बंदींत घालून कुलाबा किल्ला बलात्कारें घेउन बाबूराव आंगऱ्या नामें कोणी आपला आप्त यास दिल्हा इतकें झालें तरी बाजीरावास तत्संबंधी दूषण लागलें नाहीं. कांकीं, त्यावर पूर्वींपासून लोकांची प्रीति बसली होती.

बाजीराव तर आपल्या कार्यासाठीं शिंद्यास स्वतंत्रपणें वागावयाकरितां गुप्त अनुकूळ होता, परंतु त्याचा मनांत असें कीं. शिंदा व होळकर या दोघांतून एकासही न लागतां आपण निराळें असावें. दुसरें त्याचा मनांत होतें कीं. शिंदा कोणे एके समयीं आपल्या हिंदुस्थानांत जाईल तेव्हां सहज त्याचा उपद्रव नाहींसा होईल; परंतु नाना जवळचे जे रहाणार तत्संबंधीं उपद्रवाचा आधीं बंदोबस्त केला पाहिजे. ही मनांतील गोष्ट बाजीरावानें अमृतराव आपला बंधू व गोविंदराव काळे आदिकरून स्वपक्षपाती मंडळीस विदित केली

केली. परंतु त्याचा परम विश्वास घाटग्यावर होता, त्या घाटग्यानें बाजीरावाच्या कार्यासाठीं दवलतरावास आपली कन्या देऊं केली होती. त्याचा नावास सर्जेराव असें पद जोडिलें होतें. त्यास बाजीरावानें समजाविलें कीं, तुह्मीं मुख्यत्वें शिंद्याचा कारभार करणार त्यास नाना अडथळा करितो. अशा युक्ती करून त्याशीं व नानाशीं द्वेष पाडिला. नंतर बाजीराव आणि तो घाटगा यांची मसलत झाली कीं, आधीं नानाला अवश्य बंदींत घातला पाहिजे. मग दिसेंबराचे एकतिसाव्ये तारिखेस नाना शिंद्यास परत भेट करावया करितां कांहीं शा बंदोबस्तानें शिंद्याकडे गेला, तेव्हां तेथें शिंद्याचा पल्टनी लोकांचा कोणी सरदार याणें नानास कैद केला; तेसमयीं त्याबरोबर हजार सुमारें स्वांगीचे लोक होते ते कित्येक मारून पिटून लावून दिले. त्यावेळेस नानाबरोबर आबा शेलूकर व बजाबा शिरवळकर व नारोपंत वैद्य वगैरे बंदींत सांपडले. तेच वेळेस तो सर्जेराव घाटगा याणें आपले शिपाई नाना फडनवीस व त्याचे पक्षपाती गृहस्थ यांचीं घरें लुटावयास पाठविले. तेसमयीं जसा शत्रु एखाद्या किल्यास घेरा घालून फारकदून मग त्या किल्यांत शिरला ह्मणजे मोठा अनर्थ करितो, तशी पुण्यांत गर्दी झाली, तो प्रकार असा. एकदांचच हूंकडे सर्व शहरांत नाकेबंदी होउन लुटालूट होऊं लागला. आणि मोठा गल्बला होउन तोडातोडी ही कित्येक ठिकाणी झाली. तसेच एकरात्र दिवस बंदुकांचे बार होत राहिले; तेसमयीं शहरचे लोक आपआपले दरवाजे लावून माडीवर चढून खिडक्यांतून बंदुकांचे बार करून त्या लुटारू लोकांशीं लढत होते; आणि कोणास बाहेर पडणें तर दहावीस जमून ढाल तरवार हातीं घेउन बाहेर पडत. अशी तेवेळीं पुण्यांत धामधूम झाली.

जेसमयीं शिंद्याचा तळावर नाना धरला गेला, तेवेळेस बाजीरावानें नानाचे पक्षपाती जे कारभारी यांस कांहीं कामाच्या निमित्तें बोलाउन बंदीस घातले; त्यांत मुख्य बाबूराव फडके व आपा बळवंत व नारोपंत चक्रदेव व नारो नीलकंठ मजीमदार व गोविंदराव पिंगळे इतके होते, शिंद्यानें नाना फडनवीसास बंदींत घातला तो आमेदनगरच्या किल्यास पाठविला. नंतर बाजीरावानें आपला भाऊ अमृतराव तो मुख्य कारभारी करून गोविंदराव काळे व शिवराम नारायण थत्ते, हे दोघे त्याचे सहाय केले; आणि बाळाजी पंत पटवर्धन तो लष्करी कामांत केवळ अनभिज्ञ असें असतांही मर्जीस्तव त्याला लष्कराचा मुखत्यार केला. याप्रमाणें बाजीरावानें आपल्यामनें नानाला अगदीं नष्ट केला असा जाणून मग शिंद्यास आपणापासून दूर करावयाची योजना आरंभिली, तेव्हां त्याचा मनांत आलें कीं, शिंद्याचे दगाया

शीं जो पहिला करार केला आहे त्याप्रमाणें दिल्यावांचून हे दूर जाणार नाहींत; परंतु सांप्रत तदनुसार वागावयाची शक्ती नाहीं त्यास सावकाशपणें तें काम करितां करितां कांहीं युक्तीनें तो उद्योग सिद्धीस न्यावा, असें मनांत आणिलें.

शिंद्यानें घाडग्याची कन्या (सन्‌ सत्राशें अठ्याण्णवांचे मार्च महिन्यांत) वरिली, तो मोठा समारंभ केला. त्यास खर्चही बहुत लागला आणि त्याचें लश्कर पुण्यांत होतें त्यास दरमहा वीस लक्षांवर खर्च लागत असे; त्यामुळें खर्चास तोटा पडून थोडक्याच दिवसांत शिंद्याजवळ द्रव्याविषयीं फार अडचण पडली. तेव्हां त्याणें बाजीरावास पहिलें घाडग्यानें गुप्त कबूल केलेले दोन कोटी रुपये मोठ्या निकडीनें मागूं लागला. तेव्हां बाजीरावानें त्यास उत्तर केलें कीं, सांप्रत आह्मास एवढी शक्ती नाहीं, परंतु तुह्मी जर घाडग्यास आपला मुख्य कारभारी कराल तर तो आणि बाळोजी कुंजर मिळून माहितगारीनें पुण्यांतील द्रव्य उत्पन्न करून तुह्मास देतील. त्यास शिंद्यानें ही अनुमोदन दिलें नंतर घाडग्यानें बाजीरावाचे वाड्यांत जे नानाचे पक्षी बंदींत घातले होते ते बाहेर काढून त्यांस द्रव्यासाठीं मारूं लागले; नंतर मोठेमोठे पुण्यांतील गावकार व कोणी द्रव्यवंत गृहस्थांस धरून नानाप्रकारें दुःख देते झाले. त्यास त्यांहीं द्रव्यही देउन कित्येक त्या दुःखानें मृत्यु पावले त्यांत गंगाधरपंत भानू नामें कोणी नानाचा भाऊबंद होता त्यास तापविलेल्या तोफेवर बांधिला ते समयीं तो तत्काळ मृत्यु पावला. याप्रमाणें सरजेराव घाडगा आपल्या अंगाच्या दिमाखानें लोकांस नानाप्रकारें दुःख देता झाला, आणि बाजीरावही त्यास अनुकूळ असून आपली प्रजा फार कष्टविता झाला.

तो सरजेराव घाडगा एवढा दुष्टपणा करील सें बाजीरावाचे कल्पनेंत आलें नसेल परंतु त्या अनर्थाचें कारण तो बाजीरावच झाला. मग त्या सर्जेरावाचा क्रूरपणाविषयीं बाजीराव शिंद्याजवळ त्याचा उपद्रवाची मनाई करित असतां, शिंदा तें कांहीं ऐकेना; त्यास वाटलें कीं, बाजीराव केवळ लौकिकार्थ दांभिकपणें बोलतो.

अमृतराव यास बाजीरावानें पूर्वीं शिंद्याशीं गुप्त बोलणें करून दोन कोटी रुपये त्यास देउं केले होते व पुढें लोकांस मारून पैका घ्यावयाची मसलत झाली, तें किमपि ठाऊक नव्हतें; ह्मणून तो सर्जेराव घाडग्याविषयीं फार क्रुद्ध झाला आणि त्याणें असें पाहिलें कीं, सर्व प्रजा शिंद्यास कंटाळली त्यावरून तो बाजीरावाजवळ बोलिला कीं, एकाएकीं शिंद्यास धरून कैद करावा; त्यागोष्टीस ही बाजीराव अनुकूळ होउन तो अर्थ

सिद्दीस त्याविषयीं संधी पाहूं लागला. असें असतां अमृतराव याणें आपा काळे नामें कोणी पेशव्यांच्या पलटणी लोकांचा सरदार यास सांगितलें कीं, शिंदा आमचे भेटीस आला असतां आम्हीं तुला कांहीं खूण करूं, ते वेळेस तुम्हीं गर्दी करून शिंदा धरून कैद करावा. मग बाजीराव पेशवा याणें कांहीं कामागाहीं अवश्य यावें म्हणून शिंद्यास आज्ञा पाठविली. मग तो आल्यावर त्यास बाजीराव बोलिला कीं, तुमच्या आचरणाच्या शोधकरावयाविषयीं तुम्हास बोलाविलें. इतकें म्हणून एकाएकीं धनीपणाच्या नात्यानें डोळे वटारून शिंद्यास स्पष्ट विचारिता झाला कीं, या राज्याचा धणी मीं किंवा तूं, तें सांग तेव्हां शिंदा बाजीरायाचें असें भाषण ऐकून अत्यंत विस्मित होत्साता, नम्रतेनें उत्तर करिता झाला कीं, मीं पेशव्यांचा चाकर पेशवा आज्ञा करील त्याप्रमाणें वागणुकेंत अंतर करणार नाहीं. त्यावर बाजीराव बोलिला कीं तूं माझा रयितेस व चाकर लोकांस केवढी पीडा केलीस. आणि माझ्या शहरांत व माझ्या वाड्यांत. माझा अती अनादर केलास, या पुढें मला हें सहन होणार नाहीं तूं या वेळेस एथून निघोन जांबगावांस जा. त्यावर ही दवलतरावानें शांतपणें उत्तर दिलें कीं, मीं तुमच्या आज्ञेप्रमाणेंच वागावयास इच्छितों परंतु मला माझ्या फौजेचें देणें फार झालें आहे त्यामुळें माझें एथून जाणें कसें होईल. मला तुम्हांस गादीवर बसवावयाकरितां बहुत खर्च लागून मीं लोकांचा ऋणी झालों तें द्रव्य मला द्या म्हणजे हे वेळेसच मीं पुणें सोडून जातों. असें त्या शिंद्याचें उत्तर होतांच अमृतरावानें भावास खुणेनें विचारिलें कीं, मीं आतां आबा काळ्यास खूण करूं कीं काय. तेव्हां बाजीराव भित्रेपणानें त्यास खूण कर असें म्हणेना. हें त्याचें स्वाभाविक अधीरपण त्याचा पक्षपाती लोकांस प्रथम समजून आलें; या पुढें त्याचा तो दुर्गुण बहुत वेळा प्रसिद्धीस आला. मग शिंदा त्यापासून उठोन दिसण्यांत केवळ गरीबपणानें आपल्या ठिकाणीं गेला परंतु त्याचा मनांत बाजीरावाचा अविश्वास आणि राग भरला होता.

यावरूनच बाजीरायाचा केवढा अप्रयोजकपणा होता तो विदित होतो. परंतु त्यानंतर ही कोणे एके वेळेस बाजीरावाची व शिंद्याची गांठ पडली. तेव्हां अमृतरावानें शिंद्यास धरून कायकाय करावयाची मसलत केली होती. ती संपूर्ण बाजीरावानें शिंद्यास कळवून, यापुढें तुम्हीं सावध रहा असें समजाविलें

त्या वेळेस शिंद्यास लष्करच्या खर्चाचें असें संकट पडलें होतें तरीच पेशव्यास हात पडले; असें असतां सातार्‍यास कांहीं कामानिमित्त लष्करास जाणें भाग आलें परंतु रोजमुरा थकल्यामुळें ते सरदार पुणें सोडीनात त्या

वेळां

यांगें पुण्यांत मोठी धामधूम झाली तीचें निवारण बाळाजीपंत पटवर्धनास करतां येईना. ते समयीं बाळोजी कुंजर तो पेशव्याचा प्रीतींतला ह्मणून फार गर्वास चढून त्यास वाटलें कीं, आपण या गोष्टीचा बंदोबस्त सहज करूं यास्तव तो शिपाई लोकांत जाउन कांहीं अमर्याद बोलूं लागला. तेव्हां त्यांहीं त्याचा उपहास करून त्याची अनेक प्रकारें अमर्यादा करून शेवटीं त्याचा पागोट्यावर धबल मारून पागोटें रस्त्यांत पाडून शिपाई लोक लाथालाथानीं तें एकमेकांच्या अंगावर उडवूं लागले.

अशी पुण्यांत धुराई झाली ते समयीं गोविंदराव पिंगळा बंदींत असतां, त्याणें बाजीरावास निरोप पाठविला कीं, या वेळेस जर नारोपंत चक्रदेव यास मुक्त केल्या तर हा सर्व बंदोबस्त होईल; नाहीं तर फारच अनर्थ पडेल. ती गोष्ट बाजीरावाचा मनास येउन त्याणें नारोपंत चक्रदेव यास मुक्त करून गोविंदरावासही सोडिला. तो नारोपंत चक्रदेव याची शिपाई लोकांत मोठी मान्यता होती त्याणें बंदींतून मुक्त होतांच एकादिवसांत संपूर्ण बंदोबस्त केला, परंतु तें लश्कर सातार्‍यास न गेलें कां कीं, नारोपंत चक्रदेवास बाजीरावाचा विश्वास वाटेना. यास्तव तो फौजेस आपल्यापासून दूर करावयास इच्छित नव्हता; आणि पुण्यांतही शिपाई लोकांची गरज होती. यामुळें लश्कराची सातार्‍यास योजना झाली. त्यावरून पुढें परशुरामभाउ पटवर्धनाचा स्फटकेचाही योग घडला, तें प्रकरण असें. बाजीराव जा वेळेस गादीवर बसावयाचे योजनेंत होता त्यावेळेस त्याणें सातार्‍याचा राजाशीं मसलत केली कीं, नानाचा ठेवणाईत तुह्मांजवळ बाबूराव कृष्ण आहे तो बंदीस घालून किल्ला आपलेस्वाधीन ठेवावा आणि मला पुण्याचा गादीचा अधिकार प्राप्त झाल्या असतां मी पहिल्या बाजीरावाचा प्रमाणें वागेन तें तात्काळ मान्य करून राजानें तो बाबूराव कैद करून किल्ला आपलेस्वाधीन रक्षिला नंतर नाना फडनवीस भ्रष्ट झाल्यावर बाजीरावानें शिवराम नारायण थथे यास सातार्‍याचा राजाकडे किल्ला मागावयास पाठविला तेव्हां राजानें उत्तर दिलें कीं, मी किल्ला संभाळितों आणि पेशव्यानें आपल्या वचनाप्रमाणें वागावें; हें वर्तमान ऐकून बाजीराव आपल्या कृत्रिमाचा परिणाम नीटन झाला असें समजून भययुक्त होत्साता माधवराव रास्ता यास बोलिला कीं, सातार्‍याचा राजापासून किल्ला माझे सत्तेंत येईसा करा तेव्हां तो माधवराव सातार्‍यास गेला ते वेळेस राजा आपल्यास रव्या सोयर्‍याचा मसलतीनें रास्त्याची नम्रतायुक्त गोष्ट व धमकीची गोष्ट ही मानीना. असें बाजीरावाचें आचरण शिंघास विदित होउन तो समजला कीं, बाजीराव सर्वांशीं ही कुटिलमार्गानें वागतो, ह्मणून त्याणें सातार्‍याचा राजास

गुप्त

गुलमसलत दिलीकीं, तुह्मी किल्ला देऊं नका आह्मी आपलीं पांचपन्नास तोफा सुद्धां तुह्मांस पाठवून देऊं तुह्मी आलमगाचा उपद्व्यापासून मुक्त असावें हेंच योग्य. असें झाल्यावर तो राजा फौज देऊं लागला त्यास माधवराव रास्ता अडथळा करावयास उद्युक्त झाला असतां, राजाच्या लोकांहीं साताऱ्यांतून पिटून त्या माधवरावास मालगांवापर्यंत घालविला. असें असतां त्या माधवरावाच्या भाऊ आनंदराव रास्ता याचे स्वाधीन परशुरामभाऊ पटवर्धन वाईस होता. त्याणें आनंदरावास सुचविलें कीं, मला जर आज्ञा होईल तर मी लोक ठेवून साताऱ्याचे धामधुमीचा बंदोबस्त करीन. ती गोष्ट बाजीरावास कळवून त्याचे आज्ञेनें आनंदराव रास्ता व परशुरामभाऊ या दोघांहीं वाईजवळ फौज जमा केली. इतकें होईतों साताऱ्याचा राजाचे लोक त्या शहरांत स्वस्थ राहिले होते कांकि, ते समयीं पर्जन्य प्रबळ होता ह्मणून ते समजले कीं, या वेळेस वेणीनदी उतरून लश्कर येणार नाहीं; परंतु परशुरामभाऊला एक उताराची जागा सांपडली तेव्हां तो कोणास कळूं न देतां दहा हजार फौजेसहीत वेणी उतरून अकस्मात् साताऱ्याजवळ जाऊन पोहोंचला. ते समयीं ते राजाचे लोक असे असावध होते कीं, त्यांहीं कोणी येईल ते वर्तमान कळावयास नाक्यानाक्यांनीं टोळ्या ठेविल्या नव्हत्या, मग ते परशुरामभाऊचे लोक शहराजवळ भिडले असतां राजाची फौज ते वेळेस अडीच हजार सुमारें शहरांत होती, ते लोक पळूं लागले असतां राजाचा भाऊ चतुरशिंग तो राजाच्या मसलतींत मुख्य होता, तो व त्याचे सोयरे धायरे एलोजी मोहिते व सेनाजी मोहिते वगैरे होते त्यांहीं त्या पळणारांची थोपाथोपी करून, परशुरामभाऊच्या लश्कराचे तोंडावर गेले. इतक्यांत राजाला आपल्या माणसांसुद्धां किल्ल्यावर चढावयाकरितां अवसर सांपडला. इकडे जे लोक परशुरामभाऊच्या तोंडावर गेले होते ते वेगें करून कांहींसे पुढें जाऊन युद्ध करिते झाले, परंतु त्यांचा उपाय चालेना. त्यांतील एलोजी मोहिता ठार पडला, आणि कुशाबा राजा महारीक व दुर्गाजी राजा महारीक हे फार जखमी झाले; तेव्हां चतुरशिंगाच्या आज्ञेनें राजाचे लोक मागें फिरले तरी सेनाजी मोहिता शत्रूस पाठ दाखवीना, त्याणें चहूंकडे पाहून पाहून माधवराव रास्ता त्याचे दृष्टीस पडतांच त्यास भोंवतें त्याचे लोक असतांही तो त्यावर एकटाच धांवला; तेव्हां त्या रास्त्याच्या लोकांहीं त्याचे तोडतोडून तुकडे तुकडे केले.

यानंतर परशुरामभाऊचे लोक साताऱ्यांत शिरून लुटालूट करूं लागले. तेव्हां चतुरशिंग आपल्या बरोबर कांहींसे लोक घेऊन साताऱ्यास सोडून

न निघाला तेव्हां परशुराम भाउचे कांहीं लोक त्याचे पाठीस लागले असतां तो कोल्हापुरच्या राजास जाउन मिळाला.

इकडे राजाला जातां त्यावर त्याचे यास मिळणें होउन तो परशुराम भाउच्या स्वाधीन झाला. याप्रमाणें तें कार्य सिद्धीस गेल्यावर परशुराम भाउला आज्ञा झाली कीं. आतां कोणेस निरोप द्यावा: त्यावर परशुराम भाउनें उत्तर केलें कीं. ही गोष्ट मां प्रसन्न होत नाहीं. कांकीं. या लोकांचें मला बहुत देणें झालें आहे; मजविषयीं स्वामीनीं शंका धरूं नये मी सरकारच्या विश्वासू चाकर आहें. त्यावरून बाजीरावानें त्यापासून दहा लक्ष रुपये गुन्हेगारी घेउन त्याचा पहिल्या अन्यायांची क्षमा केली.

सन् सत्राशें अठ्याण्णवांपासून अठराशें पर्यंत
आलेलीं वर्तमानें मिळून
भाग एकोणतिसावा.

## अनुक्रमणिका.

शिंद्याच्या बायांचें वर्तमान.

त्या बायांनीं दंगा उत्पन्न केला आणि अमृतरायाचे लष्करांत आश्रय पावल्या.

पेशवे व शिंदे यांचें वैमनस्य पडलें.

शिंद्यानें नानास मुक्त केलें.

नंतर शिंदा आणि पेशवा यांचें पुनः ऐक्य झालें.

सरजेराव घाडगा यास शिंद्याच्या आज्ञेनें प्रतिबंध झाला.

इंग्लीश व निजाम अल्ली यांचा तह.

नाना फडनवीस व बाजीराव यांचा कांहीं गोष्टी.

बाजीरायाचें कुटिलवृत्त.

इंग्लीशांहीं श्रीरंगपट्टण घेतलें.

त्या मुलखाची वांटणी केली तें प्रकरण.

इंग्लीश आणि निजाम अल्ली यांमध्यें नवा तह झाला.

बायांचें फार वाढलेलें बंड तें मोडावयास शिंद्यानें बाळोबा नाना त्यास बंदींतून मुक्त केला.

कोल्हापुरचें कांहीं वर्तमान.

चतुरशिंग राजा याणें युद्ध केलें तो प्रकार.

परशुरामभाऊ पटवर्धन युद्धांत पराजय पावोन मृत्यु पावला.

### भाग एकोणतिसावा.

पुण्यामध्यें शिंद्याची दुर्दशा होत गेली तिच्या वृद्धीचें कारण असें उद्भवलें कीं, तें शिंद्याच्या कल्पनेंतच आलें नव्हतें.

महादजी शिंदा मेला तेसमयीं त्याच्या तिघी स्त्रिया होत्या त्यांत धाकटी भागीरथीबाई ही रूपवती आणि तरुण असे.

पुढें दौलतराव शिंदा त्या गादीचा अधिकारी झाला तेव्हां त्याणें निश्चय केला

कीं मी यातिघी बायांचा मान चांगला रक्षीन, नंतर त्या दवलतरावानें त्या तिघींस आपल्या जवळ ठेवून त्यांचा खर्च चालविला परंतु त्या खर्चाचा नेम बांधिला नव्हता. त्यावरून थोडक्याच वेळानें असें झालें कीं, त्या बायांस कांहीं पदार्थाचें अगत्य पडलें असतां तो त्यानां प्राप्त न झाला. तेव्हां त्या बायांहीं तो येोभाट शिंद्यापर्यंत जाऊं न देतां. त्यांत वडील जी होती तिणें लोकांत असें प्रसिद्ध केलें कीं, हा दवलतराव शिंदा आह्मापेक्षां जी धाकटी बायी तिशीं बलात्कारें संग करूं इछितो आणि दुसरें सांगूं लागली कीं, जो असा मातृगामी तो उत्पन्न होण्यास शुद्ध बीज नसतें. तेव्हां सरजेराव घाटग्यानें दवलतराव शिंद्याचा पक्ष स्वीकारून त्या बायांशीं बोलणें करावयास इछिलें, परंतु त्या बाया त्यास आपले जवळ येऊं देईनात. तेव्हां तो दुष्ट बळेंच त्यांचा रावटींत शिरून त्या बायांस हातीं धरून बाहेर ओढून कोरड्यांचा मार देता झाला. या प्रकारें त्या बायांचा त्याणें अपमान केला.

त्या महादजी शिंद्याचा राज्यांत मुख्य कारभारी शेणवी होते ते व त्यांचे कित्येक सोयरे धायरे यांहीं त्या सरजेरावाची योग्यता वृद्धिंगत पाहून आधींच मत्सर आरंभिला होता, त्यावर त्याचें हें अनुचित कर्म पाहून त्या बायांचे पक्षपाती होऊन त्या सरजेरावाशीं बहून वादविवाद करून शेवटीं ठरविलें कीं शिंद्यानें बायींचा खर्चाचा बंदोबस्त त्यांचा माना प्रमाणें करून द्यावा, आणि बायींनीं एथून जाऊन ब्रह्मणपुरीं स्वस्थ असावें, या प्रमाणें नेम ठरून त्या बायांचे बरोबर काहींसे स्वार मनसब्राशें अठ्याण्णवांचा में महिन्याचे चवदाव्ये तारिखेस त्या बायांस पुण्याहून शिंद्यानें रवाना केल्या, त्या भीमेचे कांठीं कोरेगांवीं पोहचत तोंपर्यंत, पुण्यामध्यें त्या शेणवी मंडळीस वर्तमान कळलें कीं, शिंद्यानें एथून त्या बाया ब्रह्मणपुरीं पोहचवावयाचें निमित्त करून काढिल्या त्या आमेदनगरचा किल्यांत बंदीस घालावयाकरितां नेल्या. तेव्हां त्यांहीं तात्काळ एक आपला पक्षपाती केलेला शिंद्याजवळ हिंदुस्थानी स्वारांचा सरदार मुजफिरखान नामें पठाण होता त्यास त्या बायांनां सोडवून आणावयाकरितां पाठविला. तो तेथें त्वरेनें जाऊन त्याणें त्या सोडवून पुण्याजवळ माघाऱ्या आणिल्या. नंतर त्या मुजफिरखानाचा पारिपत्याविषयीं सरजेरावानें शिंद्याजवळ फार आग्रह धरिला तेव्हां त्या घाडग्यास त्या पठाणावर जावयाची आज्ञा झाली, हें वर्तमान समजून त्याणें बाजीरावाचा भाऊ अमृतराव याचा तळ जुंनरचे वाटेस भीमेचे कांठीं होता तेथें त्या बायांस नेऊन मोठ्या बंदोबस्तांत ठेविल्या. ते समयीं तो घाडगा त्वरें त्या पठाणाचे पाठीस लागलेला होता. त्यावर तो पठाण माघारा उलटून त्याचा पराभव करून मोठ्या मानानें त्या बायांकडे पुनः गेला. त्या दिवसापासून पुढें जून महिन्याचे सातवे तारिखेपर्यंत त्या बायांवर तो मुजफिरखान स्वस्थ तेथेंच होता, त्या रात्रीं अमृतरायाचा तळावर छा-

पा

पा घालावया करितां शिंद्याचीं पांच पलटनें घेऊन येतचलीं, परंतु तें लष्करी लोक सावध होऊन त्यांहीं त्या पलटनी लोकांस मागें फिरविलें.

त्यानंतर शिंदा याणें पुनः त्या शेणवी मंडळाशीं कबूल केलें कीं, त्या बायां- चा मर्जीस येईल तेथें त्यांहीं रहावें; मी त्यांचा मानाप्रमाणें चालवितों; असें दुस- ऱ्यानें त्या बायांचें आणि शिंद्याचें ऐक्य झालें. तेव्हां तो शिंदा पुनः घात करील अ- सें न जाणून अमृतराव त्या बायांस घेऊन लष्कर सुद्धां खडकीचा पुलाजवळ येऊ- न राहिला. तो कित्येक दिवस तेथें असतां त्यास शिंद्याचा पुरता भरवसा वाटल्या- वर, जा दिवशीं त्या अमृतरावाचे लष्करी मुसलमान लोक ताबूत पाण्यांत बुडवाया- स सिद्ध झाले. ते दिवशीं सरजेराव घाडगा तो शिंद्याचें व अमृतरावाचें लष्कर यांचा तंटा नव्हावा म्हणून त्यांचा बंदोबस्ताचा मिषें करून आपल्या बरोबर तोफा व प- लटनी लोकांचे दोन बृगेड घेऊन त्या लष्कराजवळ नदीचे कांठीं जाऊन पोंहचला, तेव्हां अमृतरावाचे लष्करी लोक यांस त्या शिंद्याचें कृत्य किमपि विदीत नहोतां ते विश्वासें करून स्वस्थ राहिले असतां एकाएकीं त्या घाडग्यानें त्यांवर पंचवीस तो- फांचा मार चालविला. नंतर पलटनी लोकही पुढें घालवून हल्ला करून त्यांचा अ- गदीं उधळाउधळी होऊन त्यांचा नळ लुटला, त्यावेळेस त्या बाया अमृतरावाचें ल- ष्कर सोडून अगोधरच विठलवाडी गांवीं राहिल्या होत्या, त्यायोगें तें युद्ध बायांसं- बंधें झालेंसें दिसलें नाहीं; पेशवे व शिंदे हे आपआपल्याच आस्कानें लढले असा अर्थ झाला. त्यादिवसापासून शिंदे व पेशवे यांचीं युद्धें निःसंशयपणें चालू झालीं. असें दिसण्यांत आलें. तेव्हां काशीराव होळकर अमृतरावयास मिळाला. आ- णि मोटमोठे मानकरीही त्या अमृतरावाचा पक्षासच अनुसरले, नंतर पेशवे व निजाम यांचें ऐक्य झालें. असें असतां शिंदा यास मोठी भीति उत्पन्न होऊन त्या- स वाटलें कीं, आतां कसेंही करून आपल्या हिंदुस्थानांत जावें, परंतु शिपायांचा लो- कांचें देणें त्यास फार झालें होतें त्यामुळें पुण्याहून त्याचें निघणें होईना; म्हणून पे- शव्याहीं जसा निजामाशीं स्नेह केला तसाच त्या शिंद्यानेंही बाजीरावास भय उत्प- न्न व्हावया करितां टिपूशीं स्नेह करावा म्हणून वकील पाठविला. तें समजून बाजी- रावानेंही त्या टिपूकडे आपला वकील पाठविला. नंतर दवलतरावानें बाजीरावा- स भय व्हावया साठीं नाना फडनवीसास सोडाया, हेंच उत्तम असें जाणून नानाशीं बोलणें लाविलें, शेवटीं ठरलें कीं, दहा लक्ष रुपये नानानें दिले असतां त्याची मुक्त- ता होईल, तें मान्य करून नाना त्या आमेदनगराहून सुटून निघाला, ही गोष्ट बा- जीरावास अनिष्ट तथापि अगोधरच त्यास समजलें होतें कीं, नाना फडनवीसास शिंदा सोडील.

तो नाना सुटतांच बाजीराव पेशवा याणें निजामाशीं तह केला त्यावरून

शिंद्यानीं

शिंद्यांशीं वकानाशीं तहाचें बोलणें आरंभिलें. त्या दिवसापासून बाजीराव व शिंदे यांनीं मैत्री वाढूं लागली. त्या वृद्धीस एक कारण उपयोगी पडलें तें असें. सर्जेराव घाटग्या याणें फकीरजी गाढवे नामें कोणी एक सरदार अनुकूल करून त्याजकडून अनेक प्रकारें उपद्रव देत होता. त्याचें निवारण शिंद्यास ही होईना. आणि तो घाटगा क्रूरपणा करितां करितां त्यास त्या दुष्कर्मांचा असा अभ्यास झाला कीं, त्याचा निर्दयपणास अंत नाहीं. त्याणें कोणे एके वेळेस शिंद्याचे लष्करचे चार सरदार धरून त्यांतील तिघे तेथा यांचे पक्षपाती असें निमित्त करून त्यांस तोफांचे तोंडीं देऊन उडविलें; आणि चवथ्याचा डोकीवर मेख ठोकून मारिला. असा त्यास जंगवाचा निःसीम दुष्टपणा पाहून शिंदा त्यावर कोपला, आणि त्या घाटग्याला फकीरजी गाढव्यासहीत बंदींत घालावयाची आज्ञा दिली. त्याप्रमाणें ते कैद केल्यावर शिंद्याशीं व बाजीरावाशीं स्नेह होण्यास पूर्वींचें तें एक द्वेष कारण नाहींसें झालें. याखेरीज त्या वेळेस कलकत्त्याचा मुख्याची बदली होऊन त्याचे जागीं लार्ड मार्निंग्टन आला; त्यास मारक्किस वेलस्ली असें ही म्हणतात, त्या लाटानें पहिल्या इंग्लीशांचा रीतींत कांहीं अंतर केलें, तें असें. त्यांची अशी धरसाल होती कीं, तादृश अडचण पडल्यावांचून परक्याचा मसलतींत शिरूं नये; तें सोडून त्यास हें भानें हैदराबादचे दरबाराशीं स्नेह करावयाचा उद्योग पुनः आरंभिला. कां कीं, [illegible] होतें कीं, टिपू फ्रेंचांचें साहाय्य घेऊन निजाम व शिंदा यांशीं स्नेह करून [illegible] बाधक होईल, त्यावरून त्यास हें बाचीं मसलत होती कीं, [illegible] अर्जी [illegible] हिंदुस्थानांत घालणार, म्हणून त्या शिंद्यास असें समजाविलें कीं, [illegible] हिंदुस्थानांत तुम्हांवर येता हेंत. आणि [illegible] कळविलें कीं, शिंदा हिंदुस्थानांत गेला म्हणजे तुमचा न त्याचा [illegible] आम्हीं आपली फौज तुमचे चाकरीस पाठवून देऊं.

हें काम बाजीराव यांचे इंग्लीशांस सांगत होता. तेव्हां तें त्यास अनुकूल होईना न त्यावरून त्याचा [illegible] आलें कीं, एकाएकी, आपणास इंग्लीश [illegible] यांत कांहीं नानानें इच्याची मसलत केली असेल. तोंन समजला कीं [illegible] हें दृढ येऊन पहिल्याचा दीन अंतर पडलें. बाजीराव [illegible] शिंद्यास हिंदुस्थानांत जावयाचा निरोप झाल्यावर [illegible] आणि बाजीरावाचा व नानाचा स्नेह झाला असें [illegible] शिंद्यास हिंदुस्थानांत जाण्याविषयीं बाजीराव [illegible] हें समर्थी तुम्हां पुणें सोडून जाऊं नये; कां कीं, नाना इं[illegible] असें शिंद्याशीं बोलणें होत असतां बाजीराव नानाफडणीसास म्हणत असे कीं, तुम्हीं शिंद्याचा नकळत [illegible]

आल्यास

झाल्यास तर मोठा उपकार होईल. त्यावरून नाना पुण्यांत येऊन राहिला परंतु त्याणें असा आग्रह धरिला कीं, तुह्मापासून माझ्या शरीरास आणि द्रव्यास भय होणार नाहीं असें निजाम आणि इंग्लीश यांचें तारण सांगणें पाहिजे. तेव्हां मी तुमच्या कारभारांत शिरेन हें पडलें असतां माला आधीं शिंदा हिंदुस्थानांत लाऊन द्यावा लागेल.

नंतर नानानें शिंदा हिंदुस्थानांत जावयासाठीं आपल्याजवळचे पंधरा लक्षरुपये दिले व दहा लक्षरुपये आपल्यामुक्ततेविषयीं टंक केले होते ते त्या शिंद्यास पूर्वीच दिले. नंतर बाजीरावपेशवा समजला कीं, शिंदा निश्चित जाणार आहे, यास्तव त्याचा मनांत आलें कीं, कोणास नकळतां एकांतीं नानाची गांठ घालून त्यास समजवावें कीं, मी तुमचें कांहीं वांकडें केलें नाहीं. अशा युक्तीनें तो वश करावा, यावरून त्याणें आपल्या बरोबर एक मनुष्य घेऊन मध्यरात्रीं नानाचे घरीं जाऊन त्यास भेटला. तो बाजीराव बोलण्यामध्यें पक्का मायावी होता; त्याणें शिंद्यास सांगून नानास उपद्रव दिला होता. त्यांत आपली कृति किमपि नाहीं असें समजावून बोलिला कीं, तुमचे कारभारी यास मी आपल्या बंदींत ठेविले, हेंही त्यांचा हितार्थच केलें; कांकीं, त्यास शिंद्याचा उपद्रव न लागावा. शेवटीं आपलें सांगणें नानास खरें वाटलें असें निश्चित जाणून त्या बाजीरावानें नानाचा पायांवर डोकें ठेवून बोलिला कीं, तुमच्या पायांचीच शपथ, मी इतःपर तुह्मास आपल्या बापाप्रमाणें मानीन आणि तुमच्या सांगण्यावांचून कांहीं करणार नाहीं, इतकें बोलून तत्काळ डोळ्यांत पाणी आणून ह्मणूं लागला कीं, हे समयीं ब्राह्मणाच्या राज्यास अपायकारक दोन कारणें झालीं आहेत. त्यांत एक तर आमच्या मराठ्यांत परस्परें वैमनस्यें पडलीं आणि दुसरें इंग्लीश लोकांस या राज्याविषयीं लोभ उत्पन्न झाला. यास्तव यावेळेस तुह्मीं आपल्या बुद्धिकौशल्येंकरून या सर्व अव्यवस्थेचें आकलन केलें पाहिजे.

असें बाजीरावपेशव्याचें कृत्रिम असतां नाना फडनवीसास सत्य वाटून तो प्रथम निजामअली व शिंदा यांची जामिनकी मागत होता तें सोडून, सन सत्राशें नव्याण्णवांचा अक्टोबराचे पंधराव्ये तारिखेस, निःसंशयपणें कारभार चालवूं लागला, त्यांतच त्याची बुद्धि चुकली; कांकी, तो आपलें काम करूं लागतांच त्यास यशवंतराव घोरपडा याणें जाऊन सांगितलें कीं, हल्लीं तुह्मांस बंदींत घालावयाविषयीं बाजिराव पुनः शिंद्याजवळ आग्रहाचे निरोप पाठवितो, ही गोष्ट नानानें शिंद्यास विचारून खरीशी मानिली. तेव्हां तो नाना फडनवीस लागलाच बाजीरावाकडे जाऊन त्यास बोलिला कीं, तुह्मीं मला मोठा विश्वास देऊन दगा करावयास कसे प्रवृत्त झालां, मी आपल्या वृद्धपणानें व दुर्दशेनें मृतप्राय झालों, त्या माझ्या प्राणाचा नाश कां चिंतितां, मी तुमच्या कारभारांत आपल्या सहत्वासाठीं न शिर-

लों. केवळ सरकार हितार्थ या कामाचा स्वीकार केला, त्यास जर तुम्हाला माझें भय वाटत असेल तर अगदीं जेथें दरबारी कारभारी नाहीं अशा रिकामे जागीं जावयास मला सांगा, मी तेथें स्वस्थ राहीन, त्यावर बाजीरावानें उत्तर केलें कीं, यांतील किमपि मला ठाऊक नाहीं आणि मजपासून कदापि असें घडावयाचें नाहीं. असें असतां जाणें तुम्हांस माझें नाव सांगीतलें असेल तो मला दाखवा. हें वर्त्तमान शिंद्यास कळतांच त्याणें बाजीरावाचे मुख्य कारभारी गोविंदराव काळे व शिवराम नारायण थथे यांस धरून कैद केले; कांकीं, बाजीरावानें आपल्यावरला शब्द उडविला तो त्यांवर आला. त्यायोगें ते बंदींत पडून त्यांचें सर्वस्व गेलें. तथापि त्यांहीं बाजीरावाचें नांव सांगीतलें नाहीं, हा एक मराठी लोकांचा जातिस्वभावच आहे कीं, कसेंही संकट प्राप्त झालें असतां तें सहन करून आपल्या स्वामीवर शब्द येऊं देऊं नये. तें बाजीरावाचें कृत्य त्या दोघां कारभाऱ्यांहीं आपल्यावर घेतलें यास्तव नाना फडनवीसास कांहींसा विश्वास वाटून त्याणें कारभार चालविला. यापूर्वीं सन सत्राशें अठ्याणवाच्या सप्तेंबर महिन्यांत निजामाशीं आणि इंग्लीशांशीं असा तह झाला होता कीं, निजामानें आपल्या जवळचीं फ्रेंच लोकांहीं शिकविलेलीं पलटणें दूर करावीं, आणि फ्रेंच लोक चाकरीस न ठेवावे याबद्दल एकाएका पलटनास हजार हजार लोक, अशीं इंग्लीशांकडचीं सहा पलटणें चाकरीस ठेवावीं. या तहामध्येंच इंग्लीशांहीं सुचविलें कीं, पेशव्याशीं व तुम्हाशीं कांहीं एक संबंधें वाद पडला असतां आम्हीं तो कलह तोडावयाचा उद्योग करूं. याप्रकारेंच तह इंग्लीशांहीं पेशव्यास दर्शविला परंतु बाजीरावास त्यांचा विश्वास वाटेना म्हणून तो तह त्याचा मनास येईना, असें असतां नानाची मसलत ऐकून त्याणें उत्तर दिलें कीं, हा तह माझा मनोदयानुरूप न झाला, तथापि आजपर्यंत तुम्हाशीं व आम्हाशीं जो तह झाला आहे त्यांत मजकडून अंतर पडावयाचें नाहीं. कदाचित् टिपूशीं आणि तुम्हाशीं युद्ध झालें तर मी तुमचें साहाय्य करीन, असें बाजीरावानें इंग्लीशांस उत्तर दिलें तें योग्य दिसलें, परंतु त्याचे आंगीं एवढी धीरता व प्रामाण्य नव्हतें. नानानें त्यावेळेसही बाजीरावास सांगीतलें कीं, इंग्लीशांशीं प्रमाणिकपणेंच वागावें तें न केल्यास नाशच होईल. यानंतर इंग्लीशांहीं टिपूशीं युद्ध आरंभिलें असतां, नानानें इंग्लीशांचा कुमकेस मराठी लश्कर पाठवावयाची योजना केली, परंतु बाजीराव दवलतराव शिंद्याचा मसलतीनें चालें म्हणून तें न घडलें, आणि बाजीराव याणें आपले मनांत कल्पना केली कीं, टिपू व इंग्लीश या दोघांत एकाचा जय होई तोंपर्यंत दोघांशीं समान स्नेह ठेवून, शेवटीं आपण जयवंतास मिळावें, परंतु त्याचें लक्ष इंग्लीशांपेक्षां टिपूकडे विशेष असे, त्याणें नाना फडनवीसास न कळतां टिपूपासून तेरा लक्ष रुपये घेतले होते; याशिवाय त्याणें शिंद्याशीं मसलत केली होती कीं,

समयविशेषीं आपण दोघांहीं मिळून निजामाचे मुलखीं जाऊन त्याचा पराभव करून लोकांत असें प्रसिद्ध करावें कीं, आपण टिपूचेच सहाय इंग्लिशांचे नव्हे. अशी पुण्यांत बाजिराव पेशवा व दवलतराव शिंदा हे दोघे मसलत करीत असतां अकस्मात वर्तमान आलें कीं, इंग्लीश व टिपू यांचें युद्ध होउन टिपूची राजधानी श्रीरंगपट्टनसुद्धां तें सर्व राज्य इंग्लिशांचे हातीं लागलें. त्याप्रसंगीं टिपूही मृत्यु पावला, हें वर्तमान मोठें आश्चर्यकारक ऐकून शिंदा आणि बाजिराव हे तात्काळ मोठा हर्ष पावल्याप्रमाणें दर्शवूं लागले. व आपण आपले लोक इंग्लिशांच्या साहाय्यास न पाठविले तो दोष नानाकडून घडला असें ठरवून तात्काळ धोंडोपंत गोखला तो कर्नाटकचा सरसुभेदार यास इंग्लिशांचे साहाय्यास पाठविला, तो तिकडे जाऊन पोंहचतांच त्याणें टिपूच्या मुलख इंग्लिशांकडे गेला होता तो कांहीं कांहीं लुटला. याशिवाय त्याणें कांहीं उपयोगी असें एक काम केलें तें असें. कोणी धोंडीवाघ नामें त्या मुलखींचा लुटारू श्रीरंगपट्टनाहून पळालेला तो रयतेस फार उपद्रव देत होता, त्यावर या धोंडोपंतानें छापा घालून त्याचा लोकांचा बेत विसकटला. त्यानंतर तो धोंडिवाघ तेथून निघोन कोलापुरच्या राजा पेशव्याशीं लढत असतां त्याचे चाकरीस जाऊन राहिला.

दवलतराव शिंदा याणें टिपूच्या नाशाचें वर्तमान ऐकून तात्काळ श्रीरंगपट्टनास लोक पाठवून त्यांस आज्ञा दिली कीं, कोणी टिपूचे पक्षपाती असतील त्यांस अभय देऊन पुनः युद्ध सिद्ध करावें. असें असतां कर्णेल पालमेर नामें साहेब इंग्लिशांचा वकील पुण्यांत होता त्यास शिंद्यानें निरोप पाठविला कीं, तुम्हीं मोठे जयवंत झालां त्यायोगें आम्हीं अत्यंत हर्ष पावलों.

टिपूच्या मुलख निजामअल्ली आणि इंग्लिश या दोघांहीं मिळून घेतला असतां त्याचा वांटणी विषयीं निजामअल्लीनें किमपि चवकशी न करितां केवळ इंग्लिशांचाच छातीवर विश्वास ठेविला, तेव्हां मारक्कीस वेलसली साहेब याणें त्या वांटणीप्रकरणीं बंदोबस्त केला, तो प्रकार असा. म्हैसुरचा पुरातन राजा त्यास हैदरअल्लीनें जिंकिला होता त्याचा वंशाचा शोध करून त्यास त्याचे गादीवर बसविला. तेसमयीं टिपूच्या मुलखाचा वसूल तीस लक्ष चाळीस हजार होन उत्पन्न होता, त्यापैकीं त्या राजास तेरा लक्ष साठ हजार होन नेमिले, आणि निजामअल्लीस पांच लक्ष तीस हजार. आणि आपणास पांच लक्ष सत्तीस हजार, हैदर व टिपू यांचा परिवारास दोन लक्ष चाळीस हजार देऊन ते दोन्हीं आपले स्वाधीन ठेविले होते; आणि टिपूचा कोणी कमरदीन नामें सरदार होता. तो व त्याचा परिवार निजामअल्लीचा स्वाधीन असे त्यास सत्तर हजार होन मिळोन सत्तावीस लक्ष सत्तीस हजार होन झाले, बाकी तीन लक्ष तीन हजार होन राहिले, ते निजामअल्ली आणि इंग्लिश या दोघांचे मतें ठरलें कीं. पेशवा आपल्या कराराप्रमाणें कामास आला नाहीं. तथापि तुमचा

व आमच्या तहामध्यें हमेसमयीं मिळत असल्यास तें उरलेलें द्रव्य त्यास द्यावें नाहींतर त्याचे तीन भाग करून त्यांतील दोन निजामानें घ्यावे, तिसरा इंग्लीशांहीं घ्यावा.

नंतर बहुतेक वादविवाद होऊन पेशवे व इंग्लीश यांचा तह होयीना, तेव्हां तो उरलेला भाग पहिल्या नेमाप्रमाणें इंग्लीश व निजाम यांणीं वांटून घेतला, ते समयीं निजाम व इंग्लीश यांचा दुसरा कांहीं तह झाला, त्यांत असें झालें कीं, इंग्लीशांहीं निजामाच्या मुलुखाचे रक्षणार्थ आणिक दोन पलटणें दिलीं. आणि नेम केला कीं, जो कोणी निजामाच्या राज्यास अन्यायेंकरून उपद्रव करील, तो इंग्लीशांहीं आपला शत्रू असा जाणून त्यास जिंकावा. या लश्कराच्या खर्चास निजामअलीनें म्हैसुर प्रांताचा सर्व आपले वांटणीचा विभाग इंग्लीशांस दिला असे.

याप्रमाणें निजामाकडचें व इंग्लीशांचें वर्तमान असतां, शिंद्याचा राज्यांत फार अव्यवस्था होऊं लागली ती अशी, सरजेराव घाडगा याणें दुष्टपणें दम्याच्या बाया अमृतरायावर घातल्यानंतर त्या बाया विठ्ठलवाडीहून निघून कोल्हापुरच्या राजाचे आश्रयास गेल्या, त्या वेळेस तो राजा पेशव्याशीं लढत होता त्यापाशीं त्या बाया जाऊन राहिल्या, नंतर शिंद्याजवळचा नारायणराव बक्षी व कित्येक शेणवी मंडळ त्या शिंद्याचें लश्कर सोडून कोल्हापुरकरास जाऊन मिळाले, त्या मागून कित्येक स्वारही जाऊन मिळाले, मग त्याजवळ फार फौज जमल्यावर तो तेथून निघोन कृष्णेच्या उत्तरेस गोदावरीपर्यंत शिंद्याचे गांव लुटित गेला, मग पुण्यास हो येऊन कित्येक वाटा बंद करून तेथें शिंद्याच्या तळास उपद्रव देऊं लागला. ते वेळेस शिंद्याचे स्वार त्याशीं लढावयास अशक्त होते. तेव्हां त्याचे पलटनी लोक मात्र त्या राजास अडथळा करीत, त्यापासून मुलुखांत फार अव्यवस्था होऊन सर्वत्र हत्यारबंद स्वार जमा होऊन रयितेस उपद्रव होतां होतां तो दंगा हिंदुस्थानपर्यंत पोंहचला, तेथें लखबादादा शेणवी तो बाळोबा तात्याचा इष्ट म्हणून शिंद्यानें तो विश्वास योग्य नव्हेसें जाणून त्यास भ्रष्ट केला होता, तो शिंद्याचा शत्रूस मिळून त्याणें कित्येक वेळां आपणास धरावयाकरितां शिंद्याचे लोक आले ते जिंकून उज्जनीपासून सरोजपर्यंत मुलुख हस्तगत केला. याशिवाय यशवंतराव होळकर तो नागपुरास गेला होता, त्यास नागपुरकरांहीं शिंद्याचा सांगण्यावरून बंदींत घातला होता तो, त्या बंदींतून पळून जाऊन माळव्यांत शिरून लुटालुट करूं लागला. ते वेळेस शिंद्याचा पलटनांचा मुख्य सरदार दिबायन तो विलायतेस गेला. त्याचे जागीं मुखत्यार पेरणानामें फ्रेंच असे, तो आग्रेनामें किल्ला घ्यावयाकरितां युद्ध करीत होता, त्या आग्र्यामध्यें लखबादादा आश्रय करून राहिला होता, म्हणून तो पेरणा फ्रेंच शिंद्याजवळ कुमक मागीत असे.

असें असतां शिंद्यानें त्या बायांशीं पुनः तह करावयाचा बेत केला, परंतु त्या बाया आपण मुख्य राज्य करणार आणि त्या शिंद्यास कारभाऱ्याचा नात्यानें वागविणा-

रयाशिवाय दुसरें कांहीं ऐकेनात. अशा संकटसमयीं शिंद्यानें आपले दोघे नवे मुख्य कारभारी केले, रायाजी पाटील व आबा चिटनीस यांस. मसलत विचारिली असतां त्यांहीं फार चातुर्य करून प्रामाणिकपणें स्वहित न पहातां त्यास उत्तर दिलें कीं, बाळोबातात्यास सोडून जर तो मुख्य कारभारी केला तरच. हा बंदोबस्त होईल. तेव्हां त्या शिंद्यानें त्याप्रमाणें तें शेवटास नेलेंच ते बंड करणारे बंड सोडून त्या बाळोबातात्यास आउन मिळाले आणि त्या बायांहीं त्या बाळोबाचेच द्वारें ब्राह्मणपूर व अकरा लक्षांची जहागीर घेउन स्वस्थ रहावयास सिद्ध झाल्या. तो लखबा दादा त्या आग्र्यामध्यें युद्ध करीत असे. तोहीं न लढावा असें सिद्ध झालें. आणि त्या बाया विश्रामानें पुण्यास जातांना जेजोरीस पोंहचल्या इतक्यांत त्या बायांचा पक्षाचा कोणी होता त्यास शिंद्याच्या लोकांहीं मारिला. हें वर्तमान त्या बायांहीं ऐकून तेथूनच फिरल्या. त्या माघाऱ्या पंढरपुरास गेल्या. आणि तो सर्व बंदोबस्त मोडून तो तंटा पुनः उत्पन्न झाला.

पेशवे व कोल्हापुरकर हे युद्ध करीत असतां कोल्हापुरकरांस चतुरसिंगाची कुमक मिळाल्यानें तें युद्ध वाढलें. त्या चतुरसिंगास पूर्वीं सातान्याच्या लढाईचे समयीं रास्ते व प्रतिनिधी यांचा शिपाई लोकांहीं कोल्हापुरकराच्या मुलखांत हाकून लाविला. आणि ते लोक वारणा नदीचे कांठीं उतरले ते समयीं जे सातान्याहून पळाले ते पांचशें समारें लोक एके जागीं जमून त्यांहीं चतुरसिंगास ते वारणा नदीचे कांठीं शत्रूचे लोक उतरल्याचें वर्तमान कळविलें, तेव्हां त्या चतुरसिंगानें तें वर्तमान कळविणार लोक यांस लपून रहावयास सांगून आपण कोल्हापुरकरांकडून कुमक आणून ते व ते पांचशें लोक एकत्र मिळून रास्ते व प्रतिनिधी यांच्या लोकांवर एकाएकीं असा छापा घातला कीं, त्यांतील एखादा दुसरा वांचला असेल. त्यानंतर परशुरामभाऊचेही लोक अशाच धपाहून त्या चतुरसिंगाचे लोक त्यांवर आउन त्यांस हाकून दिले. त्यापुढें त्या चतुरसिंगास वर्तमान कळलें कीं, रास्त्यांची दोन तीन हजार फौज तोफांसुद्धां सातान्या जवळ डेरे देउन उतरली आहे; तेव्हां तो आपल्या बरोबर सहाशें पायदळ घेउन डोंगरचे थाटें पालीस गेला, ते रात्रीं तेथें राहून त्या देवाची पूजा केली. आणि त्या देवाच्या भंडारक पाळीं लाउन तेथून मोठ्या वेगानें धांवला तो वेग असा कीं, रास्त्यांचे लोक सावध असतांही, त्या चतुरसिंगाच्या लोकांहीं त्यांच्या तोफा घेउन नासून टाकिल्या. आणि त्यांचे कित्येक लोकही मारून निघाले. ते दुसरा कोणी त्यांवर आला नाहीं तोंमोडीत राकरून तो चतुरसिंग वारणा नदीस जाउन पोंहचला. त्याणें अशी धरासी करून लढतां लढतां आपल्या जवळ बहुत लोक जमा केले मग रास्त्यांची फौज सहा हजार होती तिला वारणा व निरा या दोहोंनद्यांमध्यें कधींही एके ठिकाणीं स्वस्थ राहूं दिली नाहीं. असें असतां कोणे एके समयीं त्या चतुरसिंगा जवळ पांचशें मनुष्य असतां त्यावर रास्त्यांचे पांच हजार शिपाई लोक चालून येउन यांची व त्यांची गांठ पडली तेव्हां त्याच्या लोकांहीं

त्यास

त्यास आसमंतात वेष्टिला असतांही तो परमशौर्येंकरून त्यांतून पार झाला. ते समयीं त्याचे लोक अर्धे अधिक मेले गेले.

असे गरसे व चतुर्सिंगराजा यांचें युद्धप्रसंग होत असतां, कोल्हापुरचा राजा याणें परशुराम भाउचें मुख्य ठिकाण तासगाव तें लुटून तेथें बहुत द्रव्य खर्चून नवा बांधलेला त्या परशुराम भाउचा वाडा होता तो जाळून टाकिला.

याखेरीज त्या राजानें कर्नाटकांत कित्येक ठिकाणची खंडणी घेतली, तेथे सरसुभेदार धोंडोपंत गोखले होता तो मोठ्या शौर्यानें मुलुख संभाळित असतांही, त्याचा कित्येक वेळां पराभव केला, याप्रमाणें कोल्हापुरवाल्यांसंबंधी मुलुख यामध्यें वर्तमान नाना फडनवीस कारभार करूं लागे तोंपर्यंत झालें.

बाळोबा तात्या व नाना फडनवीस यांची पुनः मैत्री होउन ते आपआपल्या धण्याचा बोलण्यावरून इंग्लीश आणि निजाम यांशीं कसें वागावें ती मसलत एकांतीं करूं लागले. ते वेळेस, त्यांचा मनें ठरलें कीं, प्रथम दक्षिणेच्या बंदोबस्त अगत्य केला पाहिजे. त्या कामास पेशवे व शिंदे व जहागीरदार मिळून तीस हजार फौज जमा झाली म्हणजे दसरा होतांच परशुराम भाउला त्या कामास योजावा.

ते समयीं तो परशुराम भाउ कोल्हापुरकरांचा द्वेषास्तव त्यांशीं परजन्यांतही युद्ध करीत होता. त्याणें घटप्रभा व मलप्रभा नदीपर्यंत कोल्हापुरकरांचीं कित्येक ठाणीं लुटविलीं आणि आपण नाना कडील फौजेची वाट न पहातां एकटाच कोल्हापुरास जाउन तें युद्ध शेवटास न्यावें असा नेम बांधून तो परशुराम भाउ गोकाकेहून कोल्हापुरावर जाउं लागला, त्यास वाटेनें पटनकुडी गांवाजवळ कोल्हापुरचा राजा व चतुर्सिंग या दोघांची गांठ पडली तेव्हां त्यांचें व याचें मोठें युद्ध होउन, त्या परशुराम भाउचा अगदीं पराभव होउन त्यास मोठमोठ्या जखमा लागून, तो परशुराम भाउ शत्रूच्या हातीं सांपडून मृत्यु पावला.

असें झाल्यावर नाना फडनवीस व बाळोबा तात्या यांहीं त्या परशुराम भाउचा पुत्र आपा साहेब याजबरोबर पांच पलटनें आणि विंचुरकर व प्रतिनिधी यांचे लोक देउन, त्यास जास्त जिकावयाकरितां कोल्हापुरास नेमिले. तेव्हां तो राजा पन्हाळा किल्ला याचे खालीं डेरे देउन आश्रयास राहिला होता; तेथेंही आपा साहेबाचे लोक त्यांवर पडून ते कित्येक पन्हाळ्यावर चढले, आणि बहुतेक कोल्हापुरास शिरले, म्हणून त्या आपासाहेबानें कोल्हापुरास घेरा घालून कित्येक वेळा युद्ध होउन तो किल्ला त्या आपासाहेबाचे हातीं लागत होता परंतु ते वेळेसच पुण्यांत असें नवेंच कांहीं कार्य उद्भवलें कीं, तें कोल्हापुरचें काम सोडून त्या आपासाहेबाला पुण्यास जावें लागलें, तेणेंकरून कोल्हापुरचें राज्य राहिलें तें अद्यापि त्या राजाचे स्वाधीन आहे.

सन अठराशें पासून
अठराशें तीन पर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग तिसरा.

## अनुक्रमणिका.

नाना फडनविसाचा मृत्यु व त्याचा स्वभावाचें वर्णन.

बाळोबा तात्या याचा मृत्यु व धोंडिबा व नारायणराव बक्षी यांस निर्दयपणें पेशव्यानें मारिलें तें प्रकरण.

दक्षिणेंत धामधूम झाली तो प्रकार.

धोंडीवाघाचें बंड व त्याचें पारिपत्य इंग्लिशांहीं केलें तें.

पुण्यांतील कांहीं वर्तमान.

शिंद्याची माळव्यांतील कांहीं गोष्ट.

यशवंतराव होळकराचा प्रादुर्भाव.

शिंदा पुणें सोडून हिंदुस्थानांत चालिला नंतर त्याशीं व होळकराशीं युद्ध झालें तो विस्तार.

सर्जेराव घाटगा पुणें सोडून शिंद्यास मिळून, इंदुरावर जाऊन तेथें यशवंतराव होळकराचा पराभव केला.

यशवंतराव होळकर याणें दक्षिणेंत संचार केला; नंतर तो पुण्याजवळचे लढाईंत जय पावला.

बाजिराव पेशवा सिंहगडाहून निघोन कोंकणांत जाऊन तेथें इंग्लिशांच्या जहाजांत बसून वसईस गेला.

सन सत्राशें त्र्याण्णवांपासून सन अठराशें दोहोंपर्यंत बडोद्यांत काय काय क्रमानें झालें तो प्रकार.

### भाग तिसरा.

पुण्यांत मोठें कांहीं कार्य उत्पन्न झालें असें मागल्या भागांत लिहिलें. त्यांत प्रथम नाना फडनविसाचा मृत्यु; दुसरें शिंद्यानें समजून केली की, सर्व पटवर्धनांची जहागीर आपणास द्यावी. हें वर्तमान ऐकून आपासाहेब पटवर्धन याणें कोल्हापुरचा वेढा उठवून आपल्या बरोबर धोंडोपंत गोखल्यास घेऊन कर्नाटकांत गेला. या गोष्टीचा विस्तार लिहिण्याचे पूर्वी नाना फडनविसाच्या कांहीं एक दोन गोष्टी समजल्या पाहिजेत.

तो नाना सन अठराशेंच्या मार्चाचे तेराव्ये तारखेस मृत्यु पावला. त्या

बरोबरच मराठी लोकांचे राज्यकारणीं कौशल्य गेलें. तो नाना राजनीतींतपरम दक्ष होता; त्याचें बाळपणापासून सर्व वय राजकारभारांत गेलें. तो आपल्या प्रजेची वहिवाट व मुलखाचा वसूल घेणें आदिकरून कामें माधवराव बल्लाळ याचे रीती प्रमाणें चालविणार होता; परंतु मोठमोठ्या कामांचे अडचणीमुळें त्यास अवसर सांपडला नाहीं. आणि तादृश मुलखाची पाहणीही होत नसे; त्यायोगें चवकशीची मंदी फार पडली होती. याविषयीं एक गोष्ट आहे ती अशी पुण्यांमध्यें त्यावेळेस घाशिरामब्राह्मण हिंदुस्थानच्या राहणारा कोतवाल होता; त्यास मोठी योग्यता प्राप्त जहाली असतां तो अंतःकरणास भयकारक असें हत्याकर्म करी. असें असतां कित्येक गृहस्थ अकस्मात कांहीं कारणावांचून नाहींसे झाल्यावर, त्यांचा घाताचा संशय त्या घाशिरामाविषयीं उत्पन्न झाला. मग ती गोष्ट नाना फडनविसाचा कानावर पडली असतां, तो ह्मणे कीं, असें दुष्कर्म करणारा या पृथ्वीवर नसेल. त्यानंतर असें एके दिवशीं वर्तमान उठलें कीं, घाशिराम कोतवाल कोणाएका गृहस्थास कोंडून ठेवून त्यास अन्नोदकावांचून उपाशीं मारितो आहे. तेव्हां मानाजी फांकडा याणें आपल्याबरोबर कांहीं शहरचे लोक घेऊन, तेथें जाऊन तें बंद केलेलें दार फोडून तेथून उपोषणानीं मृतप्राय झालेला एक ब्राह्मण होता त्यास मुक्त केला. त्यादिवसापासून त्या कोतवालाचें पापकर्म असें प्रसिद्धीस येत गेलें कीं. शेवटीं त्यास शहरचा लोकांहीं त्याचा घरांतून त्याला बाहेर काढून दगडमार करून जिवें मारून टाकिला.

नाना फडनवीस याची आकृती उंच आणि सडपातळ असे, आणि त्याची अंगकांति काळसर होती; व तो प्रकृतीनें रुष्टासारिखा दिसे. परंतु त्याचे नेत्र पाहिले असतां तो मोठा धूर्तसा भासे; आणखी तो आपल्या कुलांत प्रमाणिकपणें व सद्यांतःकरणेंकरून वागे. तो राज्याची आशा ठेवी परंतु आपल्या मंडळींत सर्वपदार्थाविषयीं थोडक्यानेंच तृप्त असे. तो दिवसामध्यें असा कारभार आटोपी कीं, ती गोष्ट कोणासही सांगितली असतां आश्चर्य वाटेल. तो नाना मेला तेसमयीं त्याची स्त्री फार लहान होती; आणि त्यास संतती नव्हती.

तो नाना फडनवीस मरणपावल्यानंतर, पेशवा व शिंदा यांमध्यें कलह उत्पन्न होण्याचें एक कारण झालें तें असें कीं, त्या दोघांसही नानाचें द्रव्य बहुत असेल तें आपणास असावें अशी इच्छा उत्पन्न झाली. त्यावरून शिंदा याणें नानाकडे आपले कोटि रुपये येणें आहेत असें निमित्त करून त्याची सर्व जहागीर जप्त केली. आणि बाजिरावाचा हेयास्तव त्या शिंद्यानें

नाना

नाना फडनविसाचे स्त्रीस दत्तपुत्र घ्यावयास अनुमोदन दिलें.

असा शिंदा बाजिरावाविषयीं विपरीतवर्ती असे त्याणें तेंच कृत्य विशेष नकरितां बाळोबा तात्याचा द्वारें सरबाद्याधाचें बंड मोडिलें; त्या आपल्या कारभाऱ्याचा नाशास प्रवृत्त झाला तो असा, त्याणें आपला श्वशुर सखाराम घाट्गा याचे मसलतीनें त्या बाळोबास धरून आमेदनगरच्या किल्यांत कैद केला. तो तेथें थोडक्याच दिवसांत आपल्या मृत्युनेंच मरणपावला. त्याबरोबरच बंदीस घातलेले त्याचे दोघे भाऊ होते त्यांचें असें भाग्य नव्हतें कीं, त्यांहीं आपल्या मृत्यूनेंच मरावें. त्यांत एक धोंडिबा त्याला तर तोफेचा तोंडीं देऊन उडविला; दुसरा नारायणराव बक्षी त्यास तोदुष्ट घाट्गा याचे कल्पने प्रमाणें त्याचा हातांपायांस बाण बांधून आग लाविली तेव्हां तो त्या बाणाचा नेटानें जिकडे तिकडे उलथा पालथा वांकडा तिकडा होऊन बहुत पीडा पावोन मेला.

यानंतर बाजिराव पेशवा नाना फडनविसाचे पक्षपाती लोक यांचा नाशाविषयीं आणि परशुराम भाऊची जहागीर घ्यावयाविषयीं उद्युक्त झाला. यासाठीं नाना फडनविसाचे स्त्रीस त्याणें दत्तक घ्यावयाचें अनुमोदन देतों असें मिष करून, त्या मंडळीस तो विचार करावयाचे निमित्तें आपल्या वाड्यांत बोलाविलें; नंतर ते सारे एके जागीं जमा आल्यावर त्यांसर्वांस असा दोष ठेविला कीं, तुह्मीं नाना फडनविसास दत्तक देऊन तो मला प्रतिबंधक करणार, यास्तव त्यां तुह्मांस शिक्षा असावी. असा त्या मंडळीस दोष लावून ते सारे किल्यावर टाकिले. त्या गोष्टीस शिंदाही अनुकूळ झाला, कांकिं, पेशवा पूर्वीं शिंद्याचा हितार्थ जेणाव्यांचा नाशास प्रवृत्त झाला होता.

याप्रमाणेंच पटवर्धनाचा नाशाविषयीं शिंदा पेशव्यास अनुकूळ झाला त्या शिंद्याचा कारभारी सर्जेराव घाट्गा तो कोल्हापुरचा राजाकडे जाऊन तो राजा पटवर्धनाचा नाशाविषयीं शिंद्यास अनुकूळ होय असें केलें. तेव्हां त्या शिंद्याचीं कित्येक पल्टनें शिधोजीराव निंबाळकर निपाणीचा देसाई याचे स्वाधीन होऊन पटवर्धनाचा मुलुख घ्यावयास निघालीं. तीं पल्टनें फारवेळ त्याजवळ नराहिलीं; परंतु त्याशिधोजीचा स्वारांहीं मिर्जेपासून विजापुर पर्यंत मुलुख उद्ध्वस्त केला.

ते समयीं संपूर्ण दक्षिणेंत धामधूम झाली ती अशी. धोंडी वाघ याणें कोल्हापुरचा राजाची चाकरी सोडून निघाला, तो इंग्लिशांहीं संपादिलेल्या मुलखीं जाऊन लुटालूट करून पेशव्याचाही कर्नाटक मुलखीं कित्येक ठिकाणची खंडनी त्याणें घेतली. त्यावरून इंग्लिशांहीं पेशव्याची आज्ञा घेऊन त्या

[illegible] नागिरन्यास आपली फौज नेमिली. त्या पूर्वीच त्या धोंडीवाघानें कर्नाट-कांत धोंडोपंत गोखला आपला शत्रु आला आहे असें समजून शपथ केली. कीं, त्या धोंडोपंताचा काळजाचें रक्त काढून त्या रक्तानें आपल्या मिशा रंगवीन. त्या वाघानें तो धोंडोपंत गोखला जेथें होता त्यासमीप कोणी एके झाडीमध्येंल-पून राहोन त्याचा प्राणहरणार्थ छापा घालावयाचा येत्न करून, त्या धोंडोपं-ताजवळ अगदीं थोडकेसे लोक असी संधी पाहोन, त्यावर अकस्मात छापा घालून त्या धोंडोपंत गोखल्यास ठार मारिला. आणि आपल्या शपथेप्रमाणें त्याचा काळजाचें रक्त काढून आपल्या मिशांस लाविलें. त्या छाप्यामध्येंच धोंडोपंत गोखल्याजवळ त्याचे दोघे पुतणे होते त्यामध्यें थोरला मारिला गेला. आणि धाकटा तो बापु गोखला त्याचा डाव्या डोळ्यास मोठी जखम लागली.

यानंतर इंग्लिशाहीं त्या धोंडीवाघाचा पारपत्यास फौज पाठविली तीं त्यावर पडोन त्याचा लोकांचा अगदीं पराजय होऊन तो धोंडीवाघही मेला गे-ला. हें वर्तमान सन अठरासेंचा सप्तेंबर महिन्याचे दहाव्ये तारिखेस प-डलें.

शिंदा पुण्यामध्यें राहिला असतां त्याचा मुलुख माळवें व हिंदुस्थान याचा बंदोबस्तांत अव्यवस्था जाली होती. ती असी. यशवंतराव होळकरना-गपुराहून पळून धारेस जाऊन तेथें आनंदराव पवार याचा आश्रयास कांहीं दिवस राहिला. नंतर त्या आनंदरावानें शिंद्याचा भयास्तव त्या होळकरास कांहीं द्रव्य व कित्येक घोडे देऊन त्याला तेथून पुढें मार्गस्थ केला. तो होळ-कर तितक्याच द्रव्यसाधनानें आपल्याजवळ कांहीं लोक जमा करून, तरी कोणी एक अमीरखान नामें पठाण मुलखांत [illegible] त्याला जाऊन मिळाला. आणि त्यायोगें मोठी योग्यता पावोन लोकांस असें प्रसि-द्ध केलें. कीं, आपण खंडेराव होळकर याचा पुतण्या [illegible] होळकर पक्षी मंडळ होतें तितकें बोलाविलें तें कित्येक जमा झाल्यावर होळकराचा कुळास शिंद्याचा हातून सोडवावयाकारितां त्यासहित निघाले. नंतर शिंद्याचे मुलखीं नर्मदातीरीं जाऊन कित्येक शिंद्याचे गांव लुटूं लागला. तेव्हां का-शिराव होळकराचें पलटण कोणी एक फ्रेंच जातीचा सरदार त्याचे स्वाधीन असे तो त्यावर पाठविला. त्याचा त्या यशवंतरावानें पराभव केला [illegible] [illegible] यशवंतरावाचा पक्षपाती होऊन, आपले पलटणी लोक व तोफा घेऊन [illegible] मिळाला. तेव्हां त्या यशवंतरावास हा खंडेरावाचा पेंच पाडून [illegible] [illegible] आणि तो मोठ्या [illegible] वाढूं लागला. [illegible]

र तो शिंदा याणें लश्करसुद्धां तात्काळ तिकडे जाऊन आपल्या मुलखाचा बंदोबस्त करावा; परंतु तेसमयीं त्याचे कारभारीमंडळींत वैमनस्यें पडलीं होतीं. त्यामुळें तो प्रकार घडेना कांकीं, कोणे एके वेळेस त्या कारभारी मंडळीनें होळकरास धमकीची गोष्टसांगावी व कोणे एके समयीं प्रार्थनाही करावी असें होऊं लागलें; नंतर ते कारभारी लोक काशिरावाचा नाशाविषयीं होळकरास निकून त्या यशवंतरावानें काशिरावापासून आपणास भीति न व्हावयासाठीं शिंदा अनुकूळ करून घेतला, आणि त्या बदल शिंद्याचा बायांस धरून कैद करावयाचा नेम केला. त्यापूर्वीं होळकरानें त्या बायांशीं मैत्रीचें बोलणें लावून समजाविलें कीं, मीं तुमचा पक्षपाती आहें. तथापि हेसमयीं तो नेम सोडून होळकर त्या बायांचा लश्करावर पडोन त्या बायांनां तेथून पिटून बऱ्हाणपुरीं लावून दिल्या, आणि त्या शहरासभोंवता घेरा घातला; परंतु त्या बाया तेथून सुटून पळाल्या असतां त्या शिंद्यास वाटलें कीं, होळकराचा छत्रिमानेंच पळाल्या. त्यास आपण हिंदुस्थानीं जाऊन बंदोबस्त केल्यावाचून राज्य टिकणार नाहीं, असा त्या शिंद्यानें मनांत निश्चय करून पुणे मुकामीं पांच पलटणें व दहा हजार स्वार तयार केले, आणि त्यांस सरजेराव घाडगा याचे स्वाधीन करून पेशव्याचे चाकरीस ठेविले, आणि आपण तेथून निघाला तेसमयीं त्याणें बाजिराव पेशव्यापासून सत्तेचाळीस लक्षांचा हुंडया घेतल्या.

तो शिंदा हळू हळू तेथून निघोन बऱ्हाणपुरीं जाऊन राहिला. तोंपर्यंत होळकर माळव्यामध्यें स्वाऱ्या घालून. तेथची खंडणी घेत असे आणि कुठकुठे लुटित असे. त्याशिंद्याचें सैन्य फार मोठें आणि तो केवळ समीप आला असें समजून त्या होळकरानें आपले सर्व लोक उज्जनी पाशीं मोठ्या त्वरेनें जमा केले, कांकिं, त्याचा मनसोबा असा होता किं, शिंदा येऊन पोंहचला नाहीं तोंच उज्जनी लुटावी. हें वर्तमान त्या शिंद्यास कळलें तेव्हां त्याणें आपलीं पलटणें चार कोणी एक करणेल हेशिंग नामें आपला सरदार याचे स्वाधीन करून, त्यास बऱ्हाणपुराहून पुढें त्वरित पाठविला. नंतर त्याचे पुष्टीकरणार्थ दुसरा सरदार व दोनपलटनावर कांहीं पायदळ लोक पाठविले. तेव्हां होळकरानें उज्जनी जवळ पुढें आलेल्या लोकांशीं युद्धाचा आरंभ थोडक्याशा लोकानिशीं केला, आणि त्यास नकळतां त्याचे पाठिमागें आपल्या लश्कराचा मोठा भाग नेऊन जे लोक त्याचा पुष्टीकरणार्थ मागून येत होते ते जिंकून ते लोक पुनः युद्धास उभे न रहातील असें केलें. नंतर आपले लोक त्यांशीं लढून धैर्यवंत झालेले माघारे आणून त्या हेशिंगाचा चार पलटनावर एकाएकीं हल्ला केला. ते समयीं तें युद्ध फार निकराचें झालें त्यांत ते पल

टनी

टनी लोक एक वांटा राहोन चार वांटे लोक जखमी व मेले मिळून पडले. त्यांत त्याचे सरदार साहेब लोक होते ते सात मेले गेले व तीन साहेब त्या शत्रूचा हातीं सांपडले, आणि एकटा हेशिंग मात्र राहिला. असा होळकराचा जय सन अठराशें एकाचा जून महिन्यांत होऊन मग त्याणें त्या उज्जनीची मोठी खंडनी घेतली. नंतर त्या शिंद्याचा तोफखाना नर्मदा उतरून पलिकडे गेला होता त्याचे रक्षणार्थ शिंद्याचे कितेक स्वार व चार पलटनें होतीं त्यांवर जाऊन तो तोफखाना पाडाव करून घ्यावयास होळकरानें मोठा उद्योग केला परंतु त्याचा उपाय चालेना. तेव्हां त्या शिंद्यास कांहीं धैर्य उत्पन्न होऊन तो आपलें लश्कर बऱ्हाणपुराहून उठवून नर्मदापार जावयास फार प्रयत्न करूं लागला.

इकडे पुण्यामध्यें शिंदा निघोन गेल्यावर बाजिराव जे कोणी मोठमोठे थोर कुलीन लोक जांहीं आपणाविषयीं किंवा आपला बाप रघुनाथराव त्याविषयीं विपरीत आचरण केलें होतें, असे जे त्यांचा सूड उगवावयास उद्युक्त झाला. तेव्हां प्रथम त्याणें रास्त्यांचा कुळांतील माधवरास्ता यास स्नेहानें भेटीस बोलावून तो आपल्या वाड्यांत आल्यावर त्यास धरून रायगडास पाठविला. याशिवाय जे कोणी त्याचे हातीं सांपडले ते अनेक प्रकारें लुटले, त्याणें इतकी रास्त्यांची अमर्यादा अन्यायाविणें केली त्यावरून तो बाजिराव लोकांचे मनांतून उतरला; त्यायोगें त्याचा कोणासही विश्वास येईना आणि मुलखांत जागोजाग बंडें उत्पन्न आलीं. त्या बंडांचा एक टोळींत बाळकृष्ण गंगाधर मुख्य होता. आणि विठोजी होळकरही त्यास मिळाला असे. त्या टोळीचा पराभव गणपतराव पानशा याणें केला. तेव्हां तो विठोजी होळकर यशवंतराव होळकराचा भाऊ धरला गेला; त्यावेळेस बाजिराव पेशवा याणें त्यास जिवें मारून टाकावयाचा नेम केला; कांकिं, तो बंडांत सांपडला तस्मात तो प्राणांत दंड करावयाचा अपराधी खरा परंतु तेवेळेस मराठी लोकांत चाल होती कीं, जो अत्यंत क्रूरपणें हिंसाकर्मेंच करील त्यास मात्र प्राणांत दंड करावा. केवळ स्वांऱ्या घालून लूट करणारास तसा दंड नाहीं. असें असतां आणि त्याचा बाप तुकोजी होळकर त्या एवढ्या थोराचा तो पुत्र त्यास मारावें हेंही योग्य दिसत नव्हतें, परंतु बाजीरायाचा मनांत आलें कीं, हा नानाचा परम मित्राचा पुत्र म्हणून त्याणें त्यास जिवें मारविला तो प्रकार असा. आपण (बाजीराव पेशवा) व आपला मित्र (बाळाजी कुंजर) हे दोघे खिडकींत बसून आपल्यासमोर अंगणामध्यें हत्ती आणून त्या विठोजी होळकराला हत्तीचा पायांस बांधविला, तेसमयीं त्याणें आपल्या प्राण रक्षणाविषयीं बाजीरायाची प्रार्थना केली; परंतु त्या बाजीरावास त्या विठोजीविषयीं किमपि दया न येतां तो स्वस्थ बसून पाहूं लागला. मग तो हत्ती तें सारें अंगण फिरला, तितक्यानें

त्याचा प्राण गेला नाहीं. तेव्हां तो हत्ती तेथून बाहेर नेवविला; नंतर त्या बाहेरचा मैदानांत तो हत्ती फिरतांनां त्या विठोजीचें प्राणोत्क्रमण झालें.

दवलतराव शिंदा आपल्या लश्कराचें सामर्थ्य न्यून असें समजून पुण्यांत पेशव्याचा चाकरीस पूर्वीं सर्जेराव घाडगा यास ठेविला असतांही, त्याला हिंदुस्थानांत आपल्याजवळ बोलाविला. तो तिकडे जाऊन त्या शिंद्याजवळ पोंहचल्यावर त्या दवलतरावानें त्याजबरोबर दहा हजार स्वार व चवदा पलटनें देऊन आपली राजधानी उज्जनी होळकरानें लुटली होती, तो सूड उगवावयास इंदुर नामें त्या होळकराची राजधानी लुटावयास पाठविला. त्या वेळेस त्या होळकराबरोबर गोरे सरदार यावांचून काहीं पलटनें व स्वार पंचवीस हजार, व पलटनी लोकांखेरीज पांच हजार पायदळ, इतकें सैन्य होतें, त्यासहित तो यशवंतराव त्या आपल्या इंदुराचा संरक्षणास आला. नंतर काहीं दिवस त्या दोहीं लश्करांचें युद्ध हलकें हलकें होत होतें. मग त्या होळकरानें एकाएकीं त्या शिंद्याचा लश्करावर हल्ला करावयाची कांहीं उत्तम कल्पना काढिली होती, परंतु त्यांतील कांहीं बेत विसकटून शेवटीं तो होळकर त्या युद्धांत पराभव पावला. ते समयीं त्याचा अठ्याणव तोफा सरजेराव घाडग्याचा हातीं लागल्या, आणि त्याची राजधानी इंदूर तेंही त्या घाडग्यानें अगदीं लुटलें. ते समयीं त्या दुष्टानें आपल्या क्रूरपणाची परम सीमा केली.

त्याची पुणें सोडून गेल्याचे पूर्वींची त्याचा धोर्त्याविषयीं काहीं गोष्ट आहे ती अशी. तो सर्जेराव घाडगा याणें बाजीराव पेशवा याचा मित्र बाळोजी कुंजर त्याचे घरीं धरणें द्रव्यानिमित्त बसवून वरकड जे दरबारी लोक होते त्यांचा फार अनादर आरंभिला. तेव्हां तो बाळोजी कुंजर याणें आपल्या मनांत विचार केला कीं, तो घाडगा आपणाकडे आला असतां त्याचा मोठा संमान करून तो जें ह्मणेल त्यास राजी ह्मात्यासारिखा आकार दाखवून मग त्यास युक्तीनें धरून बंदींत ठेवावा. अथवा जिवें मारून टाकावा. अशी योजना करून आपल्या लोकांस सांगून ठेविलें कीं, तो सरजेराव घाडगा आणि मी एकांतीं बोलत बसलों असतां, जेव्हां मी तेथून उठून बाहेर येईन तेव्हां तुह्मीं त्यास युक्तीनें धरा अथवा मारून टाका. अशी तयारी करून तो सरजेराव आपले घरीं आला असतां तो आणि आपण उभयतां खोलींत एकांतीं बोलत बसले तेव्हां बोलतां बोलतां तो बाळोजी कुंजर तेथून उठून बोलिला कीं, मी पैक्याचा हुंड्या आणवितों इतकें ह्मणून त्या खोलींतून बाहेर निघूं लागला. तेव्हांच तो सरजेराव

मनांत समजल्या कीं. ही कांहीं आपणास दग्याची खूण आहे; त्यावरून त्या सरजेरायानें एक हात त्या बाळोजी कुंजराच्या मानेवर टाकून दुसऱ्या हातांत तरवार घेऊन त्यास गच्चांड्या देत त्या खोलींतून बाहेर काढून तेथून तसाच दरवाजापर्यंत धक्के देत नेऊन मग त्या दरवाजाबाहेर रस्त्यांत जातांच तेथें आपल्या घोड्यावर पटकर उडी मारून बसला, आणि तेथून त्वरेनें पळत पळत आपल्या लोकांत जाऊन मिळाला.

हिंदुस्थानांत होळकर पराभव पावल्यानंतर त्यास बंडाबांचून दुसरा उपाय दिसेनासा झाला. असें असतांही त्याचें धूर्तपण व स्वाभाविक शौर्य पाहून शिपाई लोकांचें मन त्याकडे लागे ह्मणून त्या शिंद्याचे कित्येक शिपाई लोक त्या यशवंतराव होळकरास मिळाले. असें झाल्यावर त्या होळकरानें मसलत केली कीं, हा मुलुख सोडून पुण्याचे आसमंतात संचार करावा. तेव्हां शिंदायास तिकडे गुंतवावयासाठीं आपलीं पलटनें महेश्वरास ठेऊन आपण उत्तरेचा मार्ग धरिला. कां कीं त्या शिंद्यास तो आपली दक्षिणेस जाण्याची मसलत कळूं नये; याकरितांच फत्तेशिंग मान्या बरोबर मात्र कांहीं स्वार देऊन पुण्याकडे पाठविला. तो मान्या गोदावरी तीरीं येऊन, कित्येक गांव लुटून त्या मुलुखीं कित्येक ठिकाणची खंडणी घेऊं लागला. इतक्यांत तो होळकर स्वयें महेश्वरास येऊन, तेथून आपलीं पलटनें बरोबर घेऊन शिंद्याचा मुलुख खानदेशांत जाऊन, मोठ्या क्रोधानें तो मुलुख उद्ध्वस्त करूं लागला. इतकें होई तोंपर्यंत त्याणें शहाआमेदखान नामें कोणी आपला सरदार यास पुण्याच्या आसमंतात लुटालूट करावयास पुढें नेमिला; त्याच्या पारिपत्याकरितां पेशव्याचा सरदार नरसिंहखंडेराव नामें विंचुरचा जहागिरदार तो पंधराशें स्वारांनिशीं त्यावर चालून गेला; त्याचा त्या शहाआमेदखानानें असा पराभव केला कीं, त्या विंचुरकराचा पंधराशें स्वारांतील क्वचित् वांचले असतील. हें वर्तमान बाजीरावपेशव्यास कळतांच तो फार भ्याला आणि इंग्लीशांच्या सरकाराशीं आपल्या कुमकेविषयीं बोलणें लाविलें, परंतु तेवेळेस तो बाजीराव इंग्लीशांना आपल्या मुलुखांत फौजेसहित रहावयास अनुमोदन देईना; आणि इंग्लीश व निजाम अली यांची मैत्री झाली होती त्यांतीलही कित्येक गोष्टी स्वीकारिना ह्मणून तो कल्प शेवटास गेला नाहीं. नंतर पेशव्यानें होळकर गोदावरी उतरून आलीकडे न यावा ह्मणून त्याशीं बहुत प्रकारें तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां त्याणें उत्तर दिलें कीं, माझा भाऊ तुह्मीं मारिला तो तर तुमच्यानें मत्यां देववत नाहीं; परंतु त्याचा पुत्र खंडेरावयास बंदींत घातला आहे

तो सोडून द्यावा; आणि जितका आमचा होळकर मंडळीचा मुलुख आपणा कडे आहे तो सर्व सोडावा: इतकें झालें असतां आपण ह्मणतां ही गोष्ट कदाचित् घडेल. त्यागोष्टीस बाजीराव याणें मान्यकेल्याप्रमाणें दाखविलें आणि होळकरास निश्चित सांगून पाठविलें कीं, आह्मीं तुमचा खंडेरावास सोडावयाची आज्ञा दिल्ही. असें असतां इकडे त्या खंडेरावाला आशीरगडावर पक्क्या बंदोबस्तांत ठेयावा असें सांगून पाठविलें, आणि तेच वेळेस दवलतराव शिंदा याकडून सदाशिवराव भास्कर नामें सरदार दहापलटनें व कांहीं स्वार घेऊन येत होता त्यास निरोप पाठविला कीं, हे समयीं आह्मीं होळकराशीं कांहीं तहाचें बोलणें करून तो स्थिर केला आहे; अशा संधीस तुह्मीं त्वरा करून आपला अर्थ साधावा.

यानंतर बाजीराव पेशव्याकडून पांडोजी कुंजर तो कांहीं लोकांसहित गारदोंडेस जाऊन होळकराकडचा फत्तेशिंग मान्यायावर हल्ला करिता झाला. तेव्हां तो पांडोजी पराभव पावला. ते समयीं त्यामान्यानें मोठी त्वरा करून बारामतीस जाऊन तेथें पेशव्याचा तळ होता त्यांत नाना पुरंदरे व गणपतराव पानशे मुख्यत्वें असत; त्यांवर पडून त्याणें त्यांचाही पराभव केला; व तेथच्या तोफखानाही त्यामान्यानें घेतला. बाजीरावानें पूर्वी आपले सरदार रास्ते यांचा अपमान केला यास्तव पटवर्धन व वरकड जे दक्षिणेंतील जहागीरदार यांहीं त्या पांडोजी कुंजराचे व फत्तेशिंग मान्याचे लढायींत मन घातलें नाहीं: जर ते मनावर घेते तर एवढा अनर्थ न होता. ते वेळेस सर्व पटवर्धनांपेकीं एकटा चिंतामणराव मात्र बाजीरावाचा पक्षपाती होता; परंतु तोही थोडक्याच वेळांत श्रीमंतांचा पक्ष सोडिता झाला.

होळकर लष्करसुद्धां ऐलीबेला खेडेकडे चालिला असतां, शिंद्याकडचा सदाशिवराव भास्कर लष्करासहित त्या होळकराची वाट सोडून आलनेंव भीरेचे वाटेनें पुण्यास येऊन, पेशव्याचा लोकांत मिळाला. नंतर ते पेशव्याचे लोक व शिंद्याचे लोक मिळून ऐलीबेलापाशीं त्या होळकराचा तोंडावर गेले. तें वर्तमान समजून होळकर आमेदनगरचे वाटेनें जेजोरीस जाऊन फत्तेशिंग मान्यास मिळून तेथून सन् अठराशें दोहोंचा अक्टोबरचे तेविसाव्ये तारिखेस राजवाडीचा घाट उतरून पुण्याजवळ लोणी व हडपसर या दोहोंमध्यें उतरला. ते वेळेस पेशवे व शिंदे यांचें लष्कर त्या ऐलीबेल्याहून निघोन माघारें पुण्यास येऊन गारपिरावर राहिलें. असें असतां उभयपक्षीं दोन दिवस तहाचें बोलणें झालें त्यांत पेशवे बाजीराव तें होळकरास ह्मणत कीं, तुला आमचा राजधानीवर शत्रूसारिखें फौज घेऊ

न

न चालून येण्याचें प्रयोजन नाहीं; त्यास तूं एथून निघोन जा. त्यावर त्या होळकरानें उत्तर केलें कीं, मीं स्वामीचा आज्ञेंत अंतर करावयाचा मनुष्य नव्हे; परंतु आमचा धण्याची आज्ञा शिंदा मानीत नाहीं. त्यास स्वामींनीं स्वदेशवास सोडायाची आज्ञा दिली असतां त्याणें त्याचा बंदोबस्त पहिलेपेक्षां अधिक केला; याशिवाय मीव माझे धणी पेशवे तुह्मी हे आपण उभयतां एकपतेंच वागणार होतों परंतु शिंदा मजबरोबर युद्धास सिद्ध आला; यास्तव हे समयीं मीं शिंद्याचें पारिपत्य करून आपल्या स्वामीचा मान रक्षीन. या प्रमाणें त्या होळकराचें व बाजिरावाचें बोलणें दोन दिवस होऊन अरवटोंबराचे पंचविसाव्ये तारिखेस प्रातःकाळीं उभयपक्षीं लश्करें सिद्ध झालीं, ते वेळेस त्या होळकराकडे चवदा पलटनें होतीं त्यांत एक कार्नेल व दोन मेजर असे तिघे मुख्य साहेब लोक होते; व त्या पलटनाखेरीज पांच हजार पायदळ असे व पंचवीस हजार स्वार होते. शिंद्याकडे पलटनें होतीं परंतु त्यांचा बंदोबस्त होळकराचा पलटनापेक्षां कमी व त्यांची सख्या कमी असे. वरकड स्वार व पायदळ त्या होळकराचा बरोबरीनें होतें. याप्रमाणें त्या दोहीं कडची सेना उभी राहिली असतां एक प्रहर दिवसा नंतर उभयपक्षीं तोफांचा मार चालू झाला. तो सहा घटिका पर्यंत एकसारखा चालत होता, नंतर त्या होळकराचा पठानी स्वारांची टोळी पेशव्याकडचा सरदार विंचुरकर यांचा स्वारांवर पडून यश पावली; परंतु तेच वेळेस फत्तेशिंग मान्यानें पेशव्याचे हुजूर पागेवर हल्ला केला असतां, त्या मान्याचा बहुत नाश होऊन त्या पाग्याचा जय झाला. हें पाहून शिंद्याचे वरकड जे स्वार होते त्यांस विशेष अवसान येऊन, त्यांहीं होळकराचा स्वारावर हल्ला केला, तेव्हां होळकराचा स्वारांचा पराभव होईलसा दिसून आला. ते समयीं होळकर आपल्या सर्व सैन्याचा पाठिमागें होत्या त्याणें तो सुमार पाहिला आणि तात्काळ आपल्या घोड्यावर बसून मोठा शब्द करून बोलिला कीं, हे समयीं जे कोणीं माझे असतील त्यांहीं मजबरोबर यावें. यापुढें उपयोग नाहीं, असें सांगून जे तेथून पळणार लोक होते त्यांस मोठें धैर्य देऊन निवडक स्वारां सहित स्वयें पुढें सरसून त्या शिंद्याचे स्वार मागें हटविले, इतकें होई तोंपर्यंत ज्यांत इंग्रेजांचा सरदार नाहीं अशीं शिंद्याचीं सहा पलटनें होतीं, त्यांचानें त्या होळकराचा पलटना समूर उभें रहावेना परंतु त्या शिवाय त्या शिंद्याचीं चार पलटनें दियायन साहेबाच्या हातचीं तयार केलेलीं पुरातन होतीं, त्यांत मुख्य सरदार चवघे साहेब असत, त्या पलटनांहीं मात्र आपली जागा न सोडितां परम शौर्य करून युद्ध केलें. शेवटीं त्या होळकरानें त्या शिंद्याच्या सर्व स्वारांचा पराभव करून त्यांतील तोफांचे सर्व गोलंदाज मारून मग त्या आपल्या संपूर्ण लश्करीं समुदाया सुद्धां त्याच्यार पलटनों

वर मोठ्या वेगानें हल्ला करित करीत होवटीं त्या युद्धें करून त्यांतील कोणी साहेब मेजरनीं त्या पलटनाचा बहुत नाश होऊन तें युद्ध समाप्त झालें. तेव्हां त्यांशिंद्याच्या सान्या तोफा व बुणगें होळकराच्या हातीं लागलें, त्याचा असा जय झाल्यावर त्या यशवंतरायानें पुणें शहराचा नाश न व्हावा म्हणून आपल्या सर्व लष्करास तेथून मागें फिरावयाची आज्ञा दिली. त्यांतील कोणास हि शहरांत जाऊं देईना, तेव्हां त्यांतील कोणीं लोक त्या होळकराची आज्ञा न मानितां त्या शहरांत शिरूं लागले. त्यांवर त्याणें तोफांचा मार चालू करून त्यांस मागें फिरविले. असें युद्ध पेशव्याकडचे सरदार त्या होळकराशीं करीत असतां बाजीराव पेशवा, निःसंशय आपला जय होयील असा समजून जिकडे युद्ध समारंभ होता तिकडे जावयास आपल्या वाड्यांतून बाहेर निघाला. परंतु तोफांचा आवाजास भिऊन शहरा बाहेर दक्षिणेचा अंगीं दूर उभा राहून तेथूनच त्या युद्धाचा परिणामाची वाट पहात राहिला, मग आपला पराभव झाला असा समजून सात हजार लोकांसहित तेथून निघोन सिंहगडास गेला. नंतर त्याणें तेथून कर्णेल क्लोस नामें साहेब इंग्लीशांचा वकील ते समयीं पुण्यांत होता, त्यास निरोप पाठविला कीं, इंग्लीशांहीं हे समयीं आमचें साहाय्य केल्यास, सहा पलटनांसहित त्यांहीं आमाचा मुलुखीं रहावें.

पुण्याचा लढायांत यशवंतराव होळकर जय पावल्यावर त्याणें तेथें संगमावर कर्णेल क्लोस साहेब इंग्लीशांचा वकील रहात होता, त्यास दुसरे दिवशीं आपल्या भेटीस बोलाविला. त्या युद्धांत होळकर व पेशवे या उभय पक्षीं लष्करचे स्वार त्या कर्णेल क्लोस साहेब याचा हवेलीजवळच लढले तथापि त्यास कांहीं उपद्रव न लागला. मग दुसरे दिवशीं तो साहेब होळकराचे भेटीस गेला, तेव्हां त्याणें त्या होळकराचा जसा डौल पाहिला त्या प्रमाणें लिहिलें आहे, तें असें, तो यशवंतराव होळकर विजयी झाला असून घोट्या इतक्या चिखलांत एक लहानशी राहुटी उभारलेली होती त्यांत त्या साहेबानें त्यास पाहिला, त्या होळकराचा आंगास एक भाल्याची जखम आणि त्याचे मस्तकीं एक तलवारीचा वार लागलेला असे, त्यास भेटावयाचे वेळेस तो होळकर त्या साहेबाशीं बहुत नम्रतेनें वागला आणि त्याचें बोलणें केवळ मोकळ्या मनाचें होतें त्यास त्या साहेबानें त्याचा जखमाची गोष्ट काढिली असतां, तें दुःख त्याचा गणनेंतच नाहींसें दिसलें, आणि शिंदे व पेशवे यांशीं व त्या होळकराशीं वैमनस्य होतें ते मिटावयाविषयीं यशवंतराव इंग्लीशांची मध्यस्थी इच्छित होता, आणि ते वेळेस त्या साहेबाशीं तशा गोष्टीही निघाल्या.

होळकर प्रथम पेसव्याशीं बहुत नम्रतेनें वागे, व त्यास पुण्यांत बोला-

वीत

वीत असतां तो बाजीराव ऐकेना; मग तो पेशवा तीन दिवस त्या शिंहगडीं राहून तेथून पुढें रायगडीं* आउन तेथें ही कित्येक दिवस राहून मग पुढें महाडास जाउन तेथून मुंबई सरकारास पत्र पाठविलें कीं, तुम्ही कांहीं गलबतें पाठवून मी व माझे बरोबरचे लोक यांस आपल्याकडे घेउन जावें. असें लिहिलें असतां त्याचें उत्तर यावयाचे पूर्वीं वसईचा सरसुभेदार खंडेराव रास्ता तो महाडामध्यें बाजीरावास येउन मिळाला; त्याचा पाठीस लागलेले यशवंतराव होळकराचे लोक ते जवळ आले असें बाजीरावास कळतांच तेथून पळून सुवर्णदुर्गास गेला. तेथें ही आपला टिकाव निघणार नाहीं असें समजून तें स्थळ टाकून रेवदंड्यास गेला. ते ठिकाणीं इंग्लीशांचीं जहाजें येउन त्या खंडेराव रास्त्या सुद्धां बाजीरावास दिसेंबराचे सहाव्ये तारिखेस वसईंत नेउन पोंहचविला. त्यापुढें त्या वसईमध्यें इंग्लीश व बाजीराव यांचा विशेष तह झाला त्याचें मूळ तेंच. तो विस्तार लिहावयाचे पूर्वीं बडोद्यामध्यें सन् सत्राशें ब्याण्णवांपासून जीं वर्तमानें झालीं तो प्रकार समजला पाहिजे.

सन् सत्राशें ब्याण्णवांत गोविंदराव गाइकवाड यास बडोद्याचा अधिकार प्राप्त झाला, असें पूर्वींचे भागीं लिहिलें आहे; आणि आबा शेलूकर तो नाना फडनवीसा बरोबर बंदींत पडला असें लिहिलें आहे. तो आबा शेलूकर पुढें सन सत्राशें अठ्याण्णवांत दवलतराव शिंद्यास दहा लक्ष रुपयांचें करारपत्र देउन आपली मुक्तता करून घेतली आणि तेथून अमदाबादेस जाउन तेथचा कारभार चालविला; परंतु तो आबा नानाचा पक्षपाती यास्तव बाजीरावानें गोविंदराव गाइकवाड यास गुप्तपणें अनेक प्रकारें शिकवून त्याशीं व आबा शेलूकराशीं वैमनस्य पाडिलें. त्यापासून लवकरच त्या दोघांचा युद्धप्रसंग होउन ते उभयतां एकमेकाचा नाशाविषयीं अनेक प्रकारें एकमेकास उपद्रव देउं लागले; त्यांत प्रथम आबा शेलूकराचें प्राबल्य सें दिसलें, मग दुसरे वर्षीं (सन सत्राशें नव्याण्णवांत) सुरतेचा नवाब मृत्यु पावला; ते समयीं त्याचा भावास तो अधिकार व्हावा, तत्संबंधें कांहीं बंदोबस्ताविषयीं डंकन साहेब नामें मुंबईचा गवरनर सुरतेस गेला. ते वेळेस गोविंदराव गाइकवाड याचे दोघे वकील त्या साहेबाचा बहुमानास्तव सामोरे गेले. तेव्हां तो समय स्वकार्यसाधनोपयोगीसा जाणून त्या साहेबानें सुरतेंत चवथाई भाग गाइकवाडाचा होता तो व त्यालगत चवऱ्याशीं नामें एक परगणा मागीतला. तेव्हां ती गोष्ट गोविंदरावानें तात्काळ कबूल केली.

---

* रायगडीं माधवराव रास्ता बंदींत होता त्यास मुक्त करून त्याची जहागीर त्यास माघारी देउन आपल्याकडे नवे लोक ठेवावयाचे कामावर बाजीरावानें त्यास नेमिला.

त्या

त्यावरून असें दिसून आलें कीं, हे समयीं इंग्लीशांस गाईकवाडानें इतका सुदुरवुराचा दिला; परंतु असें न समजलें कीं, त्याणें थोडक्याच दिवसानीं त्या आलागेलकराचा नाशाविषयीं कुमक मागावयाचा मसलतीनें दिला.

सन अठ्राशेंत तो गोविंदराव गाईकवाड मृत्यु पावला, ते समयीं त्याचे औरसपुत्र चवघे व दासीपुत्र सात होते याशिवाय कांहीं कन्याही होत्या; त्या चवघा पुत्रांत वडील आनंदराव, त्यास मुख्य मानकरी, तो आपला धनी असें मानीत, परंतु त्या आनंदरावाचा ज्ञानांत कांहीं कमीपणा होता ह्मणून कित्येक त्या राज्यांतील मंडळ आपलें महत्व स्थापावयाविषयीं उद्युक्त झालें. त्या गोविंदरावाचा दुसरा पुत्र कान्होजी तो कांहीं बंड करील अशे अटकळीनें, गोविंदराव त्यास बंदींत ठेविता झाला; मग तो गोविंदराव मेल्यावर त्या कान्होजीनें आनंदरावास बहुत नम्रतेचा गोष्टी सांगून आणि लश्करी लोक यांस मध्यस्थ करून आपण बंदींतून सुटका पावला; नंतर तो तेथचा मुख्य कारभारी झाला. परंतु इतक्यानेंच त्यास तृप्ति नसे, यास्तव तो सर्व अनेकप्रकारें राजाप्रमाणें सत्ता करूं लागला. असे चार महिने गेल्यावर कोणी एक रावजी आपा नामें गोविंदराव गाईकवाडाचा मुख्य कारभारी होता, तो प्रबळ होऊन त्याणें त्या कान्होजीला पदच्युत केला. तेव्हां तो कान्होजी व तो रावजी आपा परभू आपणास इंग्लीशाची कुमक मागीत होते, त्यांत रावजी परभू इंग्लीशांस अशी आशा दाखवी कीं, गोविंदराव याणें तुह्मांशीं जो करार केला तो मी शेवटास नेईन; आणि कान्होजीही इंग्लीशांस तेंच सांगून त्याखेरीज चिखली परगणा देतों, ह्मणून कबूल करिता झाला. तो रावजी परभू याचा भाऊ बाबाजी परभू तो बडोद्यांतील संपूर्ण स्वारांचा सरदार असे, त्याचे पुष्टीस त्या बडोदे शहरांत सात हजार आरब होते ते अनुकूळ असत.

तो कान्होजी गाईकवाड याची पुष्टी करणारा मल्हारराव गाईकवाड तो कडीचा जहागिरदाराचा पुत्र, तो शूर आणि मोठा दक्ष होता; त्याणें लश्कर जमा करून त्या आनंदरावाचे कित्येक किल्ले व जितकीं ठाणीं होतीं तीं घेतलीं; तेव्हां त्या आनंदरावाचा मुख्य कारभारी रावजी याणें विलंब न करितां मुंबई सरकारास अर्जी केली कीं, आह्मांस हे समयीं मल्हाररावाचा उपद्रव शमनार्थ पांच पलटणें पाठविलीं पाहिजेत; आह्मी त्यांची चाकरी घेऊन रोजमुरा देत जाऊं. ते समयीं मुंबई सरकारास ती गोष्ट उत्तम शी वाटली आणि त्यांत आपलें हित आहेसें समजलें, परंतु कलकत्याचा मुख्य साहेब याची आज्ञा आल्यावांचून त्या मुंबईचा साहेबास त्या गाईकवाडाला तादृश अनुकूळ होतां येईना ह्मणून तें पत्र येतांच त्यांहीं सोळाशें लोक मात्र त्याचे कुमकेस पाठविले. त्यांत मेजर वाकर साहेब नामें मुख्य केला होता; तो सन अठ्राशेंचा फेब्रुआरीचे अखेरीस त्या लोकांसहीत गाईकवाडाचा लश्करांत मिळून तो कडीवर चालिला. तेव्हां तो मल्हारराव गाईकवाड याणें आह्मांपासून चूक आली असें बोलून जीं ठिकाणें घेतलीं होतीं तीं माघारीं देतों असें कबूल करून त्याशीं तह करावयाचा आकार घातला, परंतु का-

ची ममलत समय पाहून घात करावयाची होती, त्याप्रमाणें त्याणें कोणेएके समयीं त्यावर छापा घातला तो इंग्लीशांचा बंदोबस्तामुळें शेवटास नगेला, परंतु थोडक्याचदिवसांत असें दिसून आलें कीं त्याणें गाईकवाडाचें बहुतेक वश केलें. असें असतां मेजरवाकरसाहेब यांचा कांहीं उपाय चालेना. त्याणें कडीपाशीं राहून आपलें संरक्षणमात्र केलें आणि आपल्ये पुष्टीकरितां मुंबई सरकारास फौज मागून त्याची मार्गप्रतीक्षा करीत राहिला. मग एप्रेलाचे तेविसाव्ये तारिखेस मुंबईहून नवे लोक येऊन त्याकडीकिल्याचा तटाखालीं उतरून आपल्यासमूर खंदक करून त्याची माती आगीजाग तटाप्रमाणें उंच करून तेथें बळ धरून राहिले होते. त्यांवर गाईकवाडाचे व इंग्लीशांचे लोक जाऊन जयपावले. त्या युद्धांत इंग्लीशांचे लोक मेले व जखमी मिळून एकशें तेसष्ट पडले.

यानंतर मल्हारराव तें युद्ध टाकून इंग्लीशांचा स्वाधीन झाला तेसमयीं तो कडीचा किल्ला गाईकवाडाचे स्वाधीन झाला, तेव्हां मल्हाररावास प्रतिवर्षी सवालक्ष रुपये निर्यादाचा वरूलापैकीं देऊन तेथें त्याणें रहावेंसें केलें.

हें काम झाल्यावर कोणी गणपतरावनामें गाईकवाडाचा भाउबंद, तो बडोद्यापाशीं संकेरानामें किल्ला आहे तेथें मल्हाररावाच्या पक्षानें लढतअसून तो किल्ला देईना; तेव्हां तें स्थान इंग्लीशांहीं बलात्कारेंकरून घेतलें. तेसमयीं त्या गणपतरावाजवळ मुराररावनामें आनंदरावाचा दासीपुत्र होता ते दोघे तेथून निघोन धारेसजाऊन तेथचा पवाराचा आश्रय पावले.

त्यापुढें अणीक एक मोठें काम राहिलें होतें तें थोडक्याच वेळांत शेवटास गेलें. तो प्रकार असा, बडोद्यामध्यें आरबलोक होते त्यांहीं आपला रोजमुरा थकल्याचे निमित्तें आनंदराव गाईकवाड यास कैद करून त्या शहरांत सत्ता करूं लागले आणि कान्होजीस बंदींतून सोडून दिला. ही अव्यवस्था इष्टिंगत नव्हावी म्हणून त्या लोकांस मेजर वाकरसाहेब याणें बहुत प्रकारें सांगीतलें, परंतु त्या सांगण्याचा उपयोग नाहींसा पाहून त्या साहेबानें बडोद्यास भोंवता घेरा घातला. तेव्हां ते आरबआंतून दहा दिवसपर्यंत लढले; त्या लढाईंत किल्येक साहेब सरदार मेले गेले. नंतर तसेंच युद्ध चाललें असतां, इंग्लीशांचा मोर्चा लागू होऊन त्या किल्ल्याची भिंत ढासळून मोठें खिंडार पडतांच, ते आरबलोक युद्ध टाकून तहाचें बोलणें करूं लागले; तेव्हां गाईकवाडानें त्या आरबलोकांची वाजवी बाकी साडेसत्रालाख रुपये राहिली ती देऊन त्याहीं आपल्या राज्याचे मर्यादे बाहेर जावें असें कबूल करवून त्यांस तेथून बाहेर घालविलें. ते बहुतेक आपल्या बोलीप्रमाणें निघून गेले, त्यांतील एक आबूजमादार नामें होता तो मात्र त्या कराराप्रमाणें नचालतां, आपले बहुतेक लोक बरोबर घेऊन राजपिंपळीस जाऊन कान्होजीला मिळाला.

तो कान्होजी कित्येक लोक जमाकरून जागोजाग लुटलुट लुटित असे, आणि खंडनीही घेत असे, तेव्हां (सन अठ्राशें तिहींमध्यें) मेजर होमस्नामें साहेब एक टोळी घेऊन आला त्याची व त्या कान्होजीची लढाई होऊन इंग्लीश जयपावल्यावर त्यांहीं कान्होजीचा पाठीस लागून, कापडवंजेस त्याला गांठून त्याचा सर्व लोकांची दाणादाण केली. तेव्हां तो कान्होजी तेथून पळून उज्जनीस जाऊन राहिला.

सन अठराशें दोहोंपासून अठराशें आठ
पर्यंत झालेल्या वर्तमानें मिळून भाग
एकुणिसावा

## अनुक्रमणिका

होळकर पुणें मुकामीं जय पावल्यानंतर तेथच्या लोकांस उपद्रव न दे-तां नम्रतेनें वागल्याचें कारण.

त्याणें बाजीराव पेशवा याच्या गादीवर अमृतरावाचा पुत्र विनायकरा-व यास बसविला.

वसईंत पेशवा व इंग्लीश यांचा तह झाला तो प्रकार.

त्या तहास विघ्न करावयाविषयीं, शिंदे व रघुजी भोंसले एकमत्त होऊन गुप्तपणें सैन्य जमा केलें.

इंग्लीशांच्या बळानें बाजीराव पेशवा आपल्या गादीवर पुनः बस-ला.

रघुजी भोंसला व शिंदा, यांशीं इंग्लीशांहीं तहाचें बोलणें लाविलें तें सि-धीस न जातां उभयपक्षीं मैत्री तुटली.

आमेदनगर किल्ला इंग्लीशांहीं घेतला.

असाई जवळची मोठी लढाई.

असीरगड व भडोंच व पवनगड हे किल्ले इंग्लीशांहीं घेतले.

हिंदुस्थानांतील युद्धप्रकार.

दिल्ली व आग्रें यांच्यामधील लासवारी जवळच्या लढाईची गोष्ट.

दक्षिणेंत आरगांवाजवळ लढाई झाली तें प्रकरण.

देवगांवच्या व सर्जीअंजिणगांवच्या तह.

होळकर व इंग्लीश यांचें वैमनस्य पडून जनराल लेक साहेब सैन्यास-ह त्याचे पाठीस लागून त्यास त्याचे मुलखीं चालविला.

त्यानंतर तो होळकर पुनः येऊन त्याणें कर्णेल मानसन साहेब याचा हाताखालचे एकें टोळीचा पराभव केला.

मग तो होळकर मोठ्या सैन्यासहित हिंदुस्थानांत शिरला.

त्या होळकराचें लष्कर दिल्लीजवळ पराभव पावलें.

डिगाजवळची लढाई.

तो किल्ला इंग्लीशांहीं घेतला.

होळकराचे दक्षिणेंतील किल्ले व त्याची राजधानी इंदूर इंग्लीशां

नीं लागले.

जनराल लेकसाहेबानें भरतपुर किल्ला घ्यावयाचा उद्योग केला तो शेवटास न गेला, तथापि त्या राजानें वकील पाठवून इंग्लीशांशीं तह केला.

शिंद्यानें होळकराचा पक्ष स्वीकारिला यास्तव त्याशीं व इंग्लीशांशीं वैमनस्य पडलें.

होळकर पंजाबाकडे पळाला, त्याचे पाठीस लेकसाहेब लागल्यामुळें त्या उभयतांचा तह झाला.

तेच समयीं शिंद्यानेंही इंग्लीशांशीं तह केला.

होळकर पंजाबांतून आल्यावर त्यास वेड लागून तो मृत्यु पावला. त्याचा स्वभावादिकाचें वर्णन.

## भाग एकतिसावा.

बाजीराव वसईंत आश्रय पावला इतक्यांत पुण्यामध्यें काय काय वर्तमान झालें तें प्रकरण असें. होळकरानें आपल्या लोकांपासून पुणेंशहर यास उपद्रव न लागावा म्हणोन फार बंदोबस्त ठेविला, तो केवळ तेथच्या लोकांसच उपयोगी असा नव्हता; त्यांत अशी मसलत होती कीं, बाजीराव आपल्या हातीं सांपडावा, नंतर ती मसलत सिद्धीस जात नाहीं असें समजून त्याणें अमृतराव पेशवा जुन्नरास होता त्यास पुण्याचें राज्य चालवावयाकरितां बोलाविला; तेव्हां तो कित्येक दिवस मान्य होईना; शेवटीं सन अठराशें दोहोंचा नवेंबराचे बाराव्ये तारिखेस पुण्यांत येऊन आपला डेरा भामवड्यास देऊन तेथेंच राज्यकारभार मोरोबा फडनवीस व बाबूराव फडके वगैरे नाना फडनवीसाचें पक्षपाती मंडळ यांच्या साहाय्येंकरून चालविला. नंतर होळकर याणें त्या अमृतरावास गादीवर बसून राज्य करावयाची मसलत दिली असतां तो ऐकेना, म्हणून त्याचा पुत्रास होळकर गादीवर बसविणार होता, तेंही त्याणें न ऐकिलें. परंतु त्यास जेव्हां समजलें कीं, बाजीराव पेशवा याणें इंग्लीशांचा आश्रय धरिला, तेणेंकरूनच तो पेशवेपणास मुकला; असें आपलें तेव्हां त्या अमृतरावानें होळकराचें बोलणें मान्य केलें, नंतर त्या अमृतरावाच्या पुत्र विनायकराव यास पेशवेपदवीचीं वस्त्रें आन झालीं; तीं सातार्‍याच्या राजा त्यास प्रथम देत नव्हता, मग त्या राजाचा भाऊ चतुरसिंग राजा तो त्या होळकराचा पक्षपाती झाला, असें त्या-

चा

त्या सांगण्यावरून राजानें विनायकरावास तें पद दिलें. याप्रमाणें त्या होळकराची मसलत सिद्धीस गेल्यानंतर त्याणें आपल्या दुष्ट स्वभावासारिखें कृत्य आरंभिलें. त्यांत प्रथमतः दोघे बाजीरावाचे कारभारी चिंतोपंतदेशमुख व वैजनाथभटमामा आगवन. यांस हातांखालीं घेतलें. तेव्हां त्यांहीं त्यास लष्करीखर्चासाठीं शहरच्या लोकांस पुढें होळकराचा उपद्रव न लागावा ह्मणून, त्या सर्वांकडून खंडणीसारिखें द्रव्य देवविलें. नंतर तें असें उत्तम कार्य करणारे जे पुरुष त्यांसच कैद करून आपल्याजवळचे अत्यंत क्रूर हरिपंत भावे व हरिनाथ नामें दोघे ब्राह्मण होते, त्यांचे स्वाधीन त्या दोघांजणांस करून सांगीतलेंकीं, तुमच्या इच्छेस येईल तसें यांस छळून द्रव्य घ्यावें. तेव्हां त्यांहीं त्या दोघांस व त्यांशिवाय दुसरेही त्याशहरचे सर्व थोर कुलीन लोक त्यांस अनिर्वचनीय दुःख देऊन त्यांचें सर्वस्व हरण केलें.

बाजीरावपेशवा ज्यादिवशीं वसईंत पोंहचला तेच दिवशीं कर्णेल क्लोससाहेब तेथें अगोधरच पुण्याहून जाऊन राहिला, होता तो व बाजीराव यांची दिसेंबराचे सहाव्येतारिखेस भेट झाली, तेव्हां त्या कर्णेल क्लोससाहेबानें बाजीरावास पूर्वींच तहाचा प्रकार लिहून पाठविला होता, ती गोष्ट तो साहेब बोलतांच बाजीराव त्यास मान्य झाला. नंतर आणखी कांहीं त्या उभयतांचें बोलणें होऊन एकतिसाव्येतारिखेस तो तह ठरला. त्याचें निमित्त असेंकीं पेशवे व इंग्लीश यांहीं परस्पर एकमेकाचा व जे आपले सहाय असतील त्यांचा संरक्षणाकरितां बाहेरचा शत्रू जिंकावा. त्या कामास इंग्लीशांचे सहा हजार पलटनीलोक व त्या बेताप्रमाणें गोरे गोलंदाज यांसहित तोफखाना, आपल्या राज्यांत पेशव्यांहीं राहूं द्यावा. त्यांतील दोन हजार लोक नेहमीं पेशव्याजवळ असावे; याखेरीज पेशव्याकडचे दहा हजार स्वार व सहा हजार पायदळ याप्रमाणें कुठेंही युद्धप्रसंग पडल्यास असावें; आणि विलायतेंत कोणे एके मुलखीं इंग्लीशांचें ठेटें राहातात, त्या मुलखाचा कोणी पेशव्यानें आपल्या चाकरीस ठेवूं नये, याशिवाय इंग्लीशांच्या लष्करी खर्चास बाजीरावानें चिसा लक्षांचा मुलुख द्यावा, आणि पेशवे पूर्वीं सुरतेंत आपला कांहीं हक्क घेत होते तो न मागावा, असेंही कबूल करून निजाम व गायकवाड यांपासून पेशवे बाकी ऐवज घेणार होते तो इंग्लीशांच्या द्वारें घ्यावा, याप्रमाणें मान्य होऊन दुसरेंही कबूल केलेंकीं, पूर्वीं निजामाशीं महाडचा तह ठरला होता त्यास आह्मी मान्य आहोंत; आणखीं नुकसानाचे आ-

नंतर नारायकचा हातें इंग्लीशाशीं तह केला आहे त्यासही कबूल आहोंत. यास्तव शिंदे दुसऱ्या कोणाशीं तह करणें तर, तो ही इंग्लीशांचे मसलतीवाचून करणार नाहीं.

याप्रमाणें वसईत बाजीराव मोठ्या अडचणीमुळें पूर्णपणें तह करून इंग्लीशांस मिळाला असें झालें, परंतु तो एक बुद्धीचा मनुष्य नव्हे त्याचा स्वभाव होता कीं, कोणाशींही निष्कपटपणें स्नेह न करितां दुसऱ्यांस फसवावें; यास्तव चुकताच तो तह ठरून तें करारपत्र होऊन त्यावर मोर्तब होतें तोंच, त्याच्या मनांत आलें कीं, शिंदा व रघुजी भोंसला यांस होळकराच्या पारिपत्याचें मिषें करून पुण्यास बोलावून आणून मग त्यांकडून इंग्लीशांस घालवून द्यावें. त्यांतच दुसरें त्याच्या मनांत आलें कीं, तें युद्ध होऊन कदाचित इंग्लीश जय पावले तर आपण यांशीं स्नेह केला आहे हाच वृत्तिंगत करूं, असें मनांत आणून त्याणें शिंद्याकडे बाळोजी कुंजर आणि रघुजी भोंसल्या यांकडे नारायणराव वैद्य पाठविला, तो पर्याय दिसण्यांत असा केला होता कीं, इंग्लीशांशीं व आम्हांशीं तह झाल्याचें वर्तमान कळवायाकरितां हे दोघे वकील या उभयतांकडे पाठविले; परंतु आंतून अर्थ असा कीं, मी बहुत अडचणीमुळें इंग्लीशांशीं तह केला या गोष्टीचा राग मनांत न धरितां त्वरेकरून पुण्यास यावें. हे वर्तमान त्या उभयतांस कळतांच ते दोघे एकमत होऊन त्यांनीं विचार ठरविला कीं, हा तह आम्हां सर्व मराठ्यांस बाधक होईल, त्यास तो सिद्धीस जाऊं देऊं नये.

नंतर कलकत्त्याचा गवरनर जनराल साहेब याणें शिंदे व रघुजी भोंसले यांचा मनास बाजीरावानें केलेला तह, कदाचित येणार नाहीं असें समजून आपले वकील त्यांकडे पाठविले; कीं, बाजीरावाच्या व आमच्या परस्परें एकमेकांचीं राज्यें संभाळावयाकरितां तह झाला आहे, तसेंच तुम्हांस व आम्हांस ऐक्य एकमेकांचा राज्य रक्षणार्थ तोच असावें. त्यावेळेस शिंदा मोठी फौज घेऊन बऱ्हाणपुरी होता, त्याणें तें इंग्लीशाच्या वकिलाचें बोलणें ऐकून उत्तर केलें कीं, हे समयीं ही गोष्ट माझ्या मनास येत नाहीं, तथापि माजकडून इंग्लीशांशीं किमपि द्वेष नाहीं, असें निश्चित समजावें. याप्रमाणें त्याचें बोलणें होऊन पुढें समजण्यांत आलें कीं, त्याणें व रघुजी भोंसल्यानें इंग्लीशांशीं युद्धाविषयीं मोर्चे तयारी आरंभिली; आणि दुसरें हीं सिद्ध झालें कीं, हे समयीं बाजीराव व शिंदा व रघुजी भोंसला यांचें ह्याविषयीं अन्योन्य पत्रद्वारें ऐक्य झालें आहे, त्यापुढें इंग्लीशांहीं बाजीरावांचे ज्या या फौज बरोबर जामध्यें बारा गोरे लोक होते असें

होत

दोनहजार तीनशें सैन्य देऊन पुण्यांस आणवून सन अठराशें तिहांचा मे महिन्याचे तेरावे तारिखेस मोठ्या समारंभानें गादीवर बसविला. त्यापूर्वी कलकत्याचा गवरनरजनरलानें आपली फौज हैदराबादेस होती ती आणि मद्रासेची आणून निजामाची व दक्षिणेंतील जहागीरदार यांजकडची सेना घेऊन होळकरास दक्षिणेंतून घालवून राज्याचा बंदोबस्त केला होता. तसा अगोदरच अमृतरावही पुणें सोडून गेला असे; तेव्हां त्याणें जातांना प्रथम संगमनेरगाव लुटून तेथून तो घाट सोडून वाकडा नाशिकास जाऊन तेथेंही पुण्याप्रमाणेंच लोकांस बहुत दुःख देऊन तें शहर लुटलें, तसेंच वाटेनें सर्व गांव लुटीत गेला. त्यानंतर त्याणें लिहावयाजोगें कृत्य केलें नाहीं, आणखी त्याशीं व बाजीरावाशीं ऐक्य होईना ह्मणून तो कित्येक स्वारांसहित काहीं वर्षें इंग्लीशांचा चाकरीस जाऊन राहिला; त्यानंतर त्या इंग्लीशांहीं प्रतिवर्षी त्यास आठलक्ष रुपये देऊन काशींत ठेविला. त्याचा पुत्र विनायकराव तो अद्यापि तेथें आहे.

रघुजी भोंसले व शिंदे यांहीं इंग्लीशांस दक्षिणेंतून घालवावयाचा मसलतींत होळकरास घ्यावयाविषयीं फार बोलणें लाविलें; तेव्हां त्याणें प्रथम मी तुह्मांस अनुकूळ होत नाहीं असें त्यांस न भासवितां त्यांकडून आपला माळवामुलुख पुरातन जहागीर तो सोडवून बाजीरावपेशवा याचा कैदेंत खंडेराव होळकर नामें आपला पुतण्या असे, तोही मुक्त करून मग आपणास अवश्य हिंदुस्थानांत जावयाचें काम आहे असें निमित्त करून त्यांस न मिळतां माळव्यास जाऊन राहिला.

यानंतर इंग्लीशांचा मुख्य गवरनरजनरालसाहेब यास शिंदे व भोसले मोठमोठीं सैन्यें घेऊन निजामाचा मुलखाचे मर्यादेसमीप दोघे जवळजवळ राहिले असें विदित होऊन, त्याणें त्या उभयतांस विचारिलें कीं, तुमचा मनांत काय असेल तें स्पष्ट सांगा. त्यावेळेसच त्या साहेबानें आपली फौज अमेदनगरापाशीं आणून ठेविली होती. तेव्हां त्याणीं कालहरणार्थ मात्र तुह्मांशीं आमची वकता नाहीं असें बहुतवेळ उत्तर दिलें असतां शेवटीं त्या साहेबाचे फौजेचा मुख्य जनराल वेलस्ली नामें साहेब याणें त्या उभयतांस सांगितलें कीं, जर तुह्मी ह्मणतां हें सत्य आहे तर तुह्मीं दोघे आपआपली फौज घेऊन एथून जा, आह्मीही आपली फौज माघारी नेऊं, असें कित्येक दिवस गेल्यावर त्या दोघांहीं इंग्लीशांचा वकीलास विपरीत उत्तर केलें. तेव्हां तो वकील त्यांपासून निघोन

गेला

गेल्यातीच उभयपक्षीं युद्धाची तयारी करावयास रवूण झाली, असें सन अठराशें तिहींचा आगस्टाचे तिसऱ्ये तारिखेस घडलें.

तेसमयीं त्या युद्धाविषयीं इंग्लीशांजवळ पन्नासहजार स्वमारें फोजेची तयारी झाली होती; त्यांतील साडेसाहाहजार लोक हिंदुस्थानांत नेमिले; त्यांचा मुख्य जनराल लेकसाहेब केला; बाकी फोज गुजराथेंत व दक्षिणेंत होती. त्यां सर्वांचा एक मुख्य जनराल वेलसली साहेब होता, त्याणें साडेसातहजार स्वमारें लोक गुजराथेंत ठेवून कित्येक पुण्याचा रक्षणास व हैदराबादचा बंदोबस्तास नेमून एक भाग कृष्णा व तुंगभद्रा नदी या दोहींचा मध्यभागीं ठेवून, सत्राहजार स्वमारें फोज आपल्याबरोबर सर्वत्र संचारार्थ घेतली.

दवलतराव शिंदा व रघुजी भोंसला या उभयतांमिळोन एकलक्ष स्वमारें सेना होती. त्यांत शिंद्याचे गोरे सरदार सहित पलटनीलोक तीस हजारांवर असत, आणि स्वार स्वमारें पन्नास हजार होते. बाकी कित्येक तोड्याचे बंदुकवाले व कित्येक बाणदार, आणि गोरे सरदार विरहित, अर्धवट कवायीत शिकविलेले रघुजी भोंसल्याचे पलटनीलोक असत. त्या दोहीं लश्कराच्या तोफखाना मिळून दोन तीनशें तोफा होत्या; त्यांत शिंद्याचे गोलंदाज फार चतुर होते, त्या शिंद्याचा पलटनांतील सत्राहजार स्वमारें पायदळ व आठहजार स्वमारें स्वार हिंदुस्थानांत शिंद्याचा मुलुख रक्षित असत.

याशिवाय इंग्लीशांस विपरीत असा आपणास पेशव्याचा पक्षपाती ह्मणविणारा कोणीएक समशेर बहादर नामें बाराहजार लश्करासहित बुंदेलखंडांत होता.

इंग्लीशांच्या मुख्य सरदार वेलसलीसाहेब तो समजला कीं, हेसमयीं युद्धाशिवाय दुसरा उपाय नाहीं, तेव्हां आमेदनगर घ्यावयास कांहीं लश्कर पाठविलें. त्या आमेदनगरच्या किल्ल्याची बांधणी चिरेबंदी आणि त्या सभोंवता मोठा खंदक आहे; त्यावरून पूर्वी चांदबिबीनामें बादशाहाची स्त्री होती, तीचा वहीवाटीपासून तें स्थळ मोठें दुःसाध्य असें लोक मानीत होते. त्या किल्ल्यापासून पेठ निराळी; तीच्या सभोंवता मातीचा तट आहे. त्यांत तेवेळेस आरबलोक यांचा एक समुदाय व शिंद्याचें एक पलटन होतें, आणि किल्ल्यांत पंधराशांवर स्वमारें शिपायीलोक असत. याशिवाय तो किल्ला व ती पेठ यांचा मध्यभागीं एक स्वारांचाजमाव होता; असें असतां इंग्लिशांचे लोक त्या पेठेजवळ जाऊ-

न

न त्यांहीं विलंब न करितां तत्काळ शिडी लाऊन त्या भिंतीवर चढून आंत उतरून ती पेंठ हस्तगत केली, नंतर मोठे मोठे मोर्चे लावून किल्याच्या तटास खिंडार पाडिलें, तें पाहातांच तेथच्या किल्लेदार भयभीत होऊन आपल्या लोकांकरितां निघोन जावयास मार्गमात्र मागून किल्ला देता झाला.

त्यानंतर जनराल वेलसलीसाहेब आपल्या लष्करचे लोक त्या किल्यांत ठेऊन, आपल्या बरोबरचे लोक आठ हजार रुमारें मुलखांत संचाराच्या हेतानें दुसऱ्या कोणा सरदाराच्या स्वाधीन करून बाकी लोकांसहित आपण आगष्ट महिन्याचे एकोणतिसाव्ये तारिखेस औरंगाबादेस गेला. इतक्यांत मराठ्यांचें लष्कर अजिंठ्याचा घाटानें जाऊन जालनास उतरलें. मग तेथून उठोन अग्नायी दिशेस चालिलें, त्यावरून तें हैदराबादेस जाईल अशी वदंता उठली; यास्तव वेलसली साहेब औरंगाबाद सोडून गोदावरीकडे चालिला. तें वर्तमान ऐकून मराठे ती वाट सोडून तेथून उत्तरेस निघालें. त्यालष्करांत युद्धाविषयीं बंदोबस्त ठीक नव्हता; कांकीं, दवलतराव शिंदे व रघुजी भोंसले हे दोघेही युद्ध निपुण नसून दोघांचें वागणें एकामतानें न व्हतें.

यानंतर जनराल वेलसली साहेब याणें मुलखांत संचार करावयाकरितां जो आपल्या लष्कराचा भाग वेगळा केला होता तो व त्या बराबरचें लष्कर, सप्तेंबराचे एकविसाव्ये तारिखेस एकच मिळालें, तेसमयीं वर्तमान आलें कीं, मराठ्यांचें लष्कर जाफराबादेपाशीं बोरखरदनामें गांव आहे तेथें येऊन उतरलें; त्यावरून त्या साहेबाचा विचारास आलें कीं, पुनः दोन्हीं भाग निरनिराळे करून वेगळ्या वेगळ्या वाटांहीं जाऊन एकाएकीं त्यावर हल्ला करावा. मग तेविसाव्ये तारिखेस तो साहेब तेथून उठला नंतर दुसरे दिवशीं मुकाम करते वेळेस त्या साहेबास कळलें कीं, आपणापासून जवळ तीन कोसांवर शत्रूचें लष्कर आहे, तेव्हां त्याणें आपल्या लष्करचें बुणगें तेथें ठेविलें आणि त्याचा रक्षणास एक पलटन ठेवून बाकीचे लोक बरोबर घेऊन आपल्या लष्कराचा दुसऱ्या भागाची वाट न पाहतां त्वरेनें शत्रूवर चालिला, तो कांहींसा तिकडे गेला असता शत्रूचें लष्कर पन्नास हजार रुमारें शंभर तोफांसहित खेळणा नदीचा पलीकडच्या कांठीं, जुवा नदी संगमाजवळ उतरलेलें त्याचा दृष्टीस पडलें. तेथें [illegible]

लष्कराचे डाव्ये बाजूस आग्राय नामें एक भुयींकोटाचा गांव पाहिला, तेस-मयीं त्या साहेबाजवळ साडेचार हजार सुमारें सैन्य होतें आणि त्याबरोबर पेशवे व म्हैसूरच्या राजा यांकडचे कांहीं स्वारही होते परंतु ते इंग्लिशयास त्यांचा विश्वास येईना ह्मणून त्यांपासून युद्धोपयोग विशेष होऊं दिला नाहीं. आणि आपली टोळी तर शत्रूच्या सैन्यापेक्षां फार लहान ह्मणून व शत्रूचा तोफखाना प्रथम हातीं लागल्यास मोठा उपयोग होईल असें जाणून त्याचा तोंडावर समोर न जातां डाव्ये बाजूस जेथें त्याचा तोफखाना होता त्यावर चाल केली, तेव्हां मराठ्यांहीं आपला तोफखाना सुरू करून प्रथम इंग्लिशांचा पायदळाचा नाश बहुत केला; शेवटीं इंग्लिशांचे गोरे स्वार वेगें करून चालून त्यांवर गेले, ते वेळेस मराठ्यांचे स्वार व पायदळ यांस त्यापुढें उभें राहवेना, आणि त्या गोरे लोकांचे कुमकेपुढें सरून शत्रून लढत असतां मद्रासचे पलटनी स्वार येऊन पोंहचले नंतर तें पायदळ मराठ्यांचें मागें हटले, त्यास जाग्याचा संकोचामुळें ते एकीमागें एक अशा दोन ओळी धरून उभे होते, त्यांतील पुढची ओळ इंग्लिशांचा नेटानें मागचे ओळीस मिळून, त्यांचा बंदोबस्त विसकटून इंग्लिश त्यांवर पडले, तेव्हां मराठ्यांचा लोकांस इंग्लिशांहीं जयानदींत घालविलें. त्यांतून जे ती नदी उतरून पळूं लागले त्यांतल्या कित्येका लोकांस इंग्लिशांचा स्वारांहीं मारिलें.

रघुजी भोंसला तर या युद्धाचा आरंभींच पळाला, आणि शिंदाही थोडक्याशा वेळानें तसेंच करिता झाला; त्या युद्धांत सर्व मराठी सैन्यांतील शिंद्याचीं कित्येक पलटनें व त्यांचे गोलंदाज यांणींमात्र, उत्तम प्रकारें युद्ध केलें, तेव्हां मराठ्यांचे लोक बहुत जखमी झाले आणि बाराशें ठार पडले, त्यांत शिंद्याचा प्रधान यादवराव भास्कर नामें होता तोही मेला गेला. असा मराठ्यांचा मोड होऊन, त्यांच्या अठ्यांयशीं तोफा इंग्लिशांच्या हातीं लागल्या. याप्रमाणें आस्साईजवळच्या युद्धांत इंग्लिशांहीं विजयी होऊन, मोठा मान संपादिला. ते समयीं इंग्लिशांचा समुदायांतील लोक मेले व जखमी मिळून, तिसऱ्या चारश्यावर सुमारें पडले. त्या युद्धांत एक विशेष झाला तो असा, मराठ्यांहीं आपल्याजवळ इंग्लिश येऊन भिडले असें पाहतांच, भूमीवर वेडींवांकडीं अंगें टाकून अगदीं मृतप्राय पडले, नंतर त्यांस आपल्या अंगावरून पुढें जाऊं देऊन एकाएकीं उठून त्यांचा मागून तोफांचा मार केला.

त्या साहेबानें आपल्या लष्कराचा भाग वेगळा केला होता त्या-

स

स वाटेनें कांहीं अडचण पडून दुसरे दिवशीं संध्याकाळ पर्यंत येऊन पोहचला नाहीं; मग तो येऊन मिळाल्यावर त्यास वेलस्लीसाहेबानें नर्मदेकडे शिंद्याचे पाठीस लाविला, तेव्हां शिंद्याचीं पलटणें त्याशीं लढावयास उभीं राहिनांत, यास्तव त्यांमागून नर्मदापार जाऊन त्या लोकांच्या सरदारानें त्यांची पाठ सोडून त्याचें बऱ्हाणपुर व आशीरगड नामें किल्ला घेतला.

असें दक्षिणेंत वर्तमान असतां आगष्ट महिन्याचे एकुणतिसाव्ये तारिखेस इंग्लीशांहीं गुजराथेंतील भडोंच घेतली, नंतर पवनगड नामें किल्ला आहे तेथें जाऊन तोही हल्ला करून घेतला.

हिंदुस्थानांत शिंद्याचा अलिगड नामें परम सुदृढ किल्ला आहे तोही जनराल लेकसाहेबानें मोठें युद्ध करून हस्तगत केला; त्या युद्धांत इंग्लीशांचे लोक मेले व जखमी मिळून पावणेतीनशें सुमारें पडले. आणि मराठ्यांचे लोक खंदकांत पडून बुडाले व मेले व जखमी मिळून दोन हजार सुमारें पडले. मग लेकसाहेबानें तो किल्ला सोडून दिल्लीपासून तीन कोसांच्या अंतरानें मुकाम केला, तेथें नुकते डेरे उभे करितात तोंच शत्रू समूर दृष्टीस पडला. त्याचा शोध करितां असा ठिकाण लागला कीं, शिंद्याकडचा कोणी पुरातन फ्रेंच सरदार नऊहजार सुमारें पलटनीलोक व पांच हजार सुमारें स्वार व सत्तर तोफा, इतके समजून त्या लेकसाहेबास जिंकावयाकरितां आला. तेव्हां त्या साहेबानें तेथें आपल्या बुणग्याच्या रक्षणापुरते लोक ठेऊन बाकी उरलेले साडेचार हजार सुमारें होते तितक्यांसहित शत्रूशीं युद्ध करून जय पावला, त्यांत मराठ्यांचे तीन हजार सुमारें, आणि इंग्लीशांचे सहाशें पडले, तेव्हां दिल्लीशहर इंग्लीशांस सहज प्राप्त होऊन, तेथचा बादशाहही त्यांच्या हातीं लागला.

यानंतर लेकसाहेबानें आग्रा किल्ला यावर चालून जाऊन त्यास भोंवतीं शिंद्यांचीं कित्येक पलटणें होतीं त्यांस तेथच्या किल्लेकरीयास त्यांचा विश्वास येईना यास्तव त्याणें ते आंत घेतले नाहींत त्यांस जिंकतांच त्या किल्लेदारानें इंग्लीशांस किल्ला दिल्हा.

पुनः इंग्लीश व शिंद्याचीं पलटनें यांची लढाई लासवारी गांवांजवळ झाली, तो प्रकार असा. इंग्लीश शत्रूच्या पाठीस लागून रात्रींत बारातेरा कोसांची मजल करून सूर्योदयसमयीं शत्रूची सेना त्यांच्या दृष्टीस पडली; तेव्हां त्यांस वाटलें कीं, शत्रू वाटेनें चालतो आहे, म्हणून जे स्वार तेथें पोहचले होते ते पाठीमागचे लोक यांची वाट न पाहतां त्वरा करून त्यांवर जाऊं लागले, ते केवळ त्यांना समीप गेले, तेव्हां त्या इंग्लीशांस

असें समजलें कीं, तें सरहद्दस्थान धरून राहिले आहेत; आणि असें दृष्टीस पडलें कीं, पुढें एक तोफांची ओळ उभी करून त्या तोफा सांखळीनें गुंतविलेल्या; तेव्हां ते स्वार तो तोफखाना घ्यावयास उद्युक्त झाले परंतु, त्या तोफांच्या मारापुढें त्यांचा उपाय चालेना यास्तव त्यांस आपल्या स्वारांची व पायदळांची वाट पहावी लागली; ते येऊन पोंहचल्यावर इंग्लीशांहीं त्या तोफा घेऊन मराठ्यांचा पराभव केला. त्या युद्धांत शिंद्याकडे बहुतेक फ्रेंचजातीचे सरदार असत, आणि कित्येक दिबायनानें शिकविले पुरातन पलटनीलोक होते ते फार झटून लढले, व मागें नसरतां जेथे उभे होते तेथेंच पडले, नंतर थोडके राहिले तेव्हां युद्ध टाकिलें. असें झालें ह्मणून इंग्लीशांचे लोक सद्याआठशें त्यांत बहुतेक सरदार असे नाश पावले.

इंग्लीशांच्या याजवरून शिंद्याचीं हिंदुस्थानांतील सर्व पलटनें हीनबळ होऊन त्याच्या चंबळानदीचे उत्तरेचा मुलुख इंग्लीशांच्या हातीं लागला.

असें हिंदुस्थानचें वर्तमान असतां कटाक व बुंदलखंड या मुलखीं इंग्लीशांचें सैन्य जाऊन तीं ठिकाणेंही त्याहीं हस्तगत केलीं.

ते समयीं दक्षिणेंत कायकाय वर्तमान झालें तो प्रकार असा, शिंदे व रघुजी भोंसले यांस वर्तमान कळलें कीं, जनराल वेलसली साहेब दक्षिणेंत औरंगाबादेवर चालिला, आणि त्याच्या लष्कराचा एक भाग बऱ्हाणपुरास गेला; त्यावरून त्यांहीं त्यास अडथळा करावयाची सिद्धता केली; तेव्हां जनराल वेलसली साहेब फिरून उत्तरेस जाऊं लागला, हें समजून शिंदा आपल्या लोकांसहित ठिकाण धरून राहिला, आणि रघुजी भोंसला तो उत्तरेस अनकाटनक्याचा घाटाकडे चालिला.
तेव्हां तो रघुजी भोंसला निजामाच्या मुलुख उद्दस्त करील, या शंकेनें जनराल वेलसली साहेब पुनः दक्षिणेस त्या मागें निघाला तो त्याजवळ पोंहचल्यावर रात्रीस इंग्लीशांच्या छापा आपणावर पडेल अशा भयास्तव आपल्या तळाची बदली दोहों दिवसांत पांचां जागीं केली, ते समयीं त्या दोहीं लष्करांच्या युद्धप्रसंग पडला नाहीं; इतकें मात्र झालें कीं, रघुजी भोंसल्यानें पांच हजार स्वार इंग्लीशांचे चौदा हजार बैल दाणा भरून जात होते, ते पाडून आणावयास पाठविले, त्या बैलां बरोबर इंग्लीशांचे पलटनीलोक यांच्या तीन कंपनी व पायदळ व मैसूरच्या राजाचे कांहीं स्वार होते त्यांची व यांची आंबेरगांवांपाशीं गांठ पडली. तेव्हां त्या उभ-

तांचे

तांचें बहुत युद्ध होऊन त्यांतील दोनशें बैल मात्र नेले; वरकड त्यांहीं संभाळून इंग्लीशांचा लष्करांत पोंहचविले.

रघुजी भोंसला आपल्या मुलखाकडे जाऊं लागला तेव्हां वेलस्ली-साहेब आपल्या दुसऱ्या भागाचा सरदार गाविलगडास घेरा घालून लढत होता त्याचे कुमकेस गेला.

इतकीं कामें होयातों पर्यंत शिंद्यानें कित्येक वेळा वकील पाठविले. नंतर नवेंबराचे तेविसाव्ये तारिखेस (सन १८०३) शिंद्याचें व वेलस्ली साहेबाचें युद्ध तहाचा बोलण्यासाठीं कांहीं दिवस मना झालें; परंतु रघुजी भोंसल्याचा कोणी वकील न आला ह्मणून तो वेलस्ली साहेब आरगांवाजवळ भोंसल्याचें लष्कर होतें तेथें जाऊन, त्यावर पडून त्याचा पराभव केला, नंतर भोंसल्यानें इंग्लीशांशीं दिसेंबराचे सत्राव्ये तारिखेस तह ठरविला. तो विस्तार असा, वरदानदीचे पश्चिमेस रघुजीचा कांहीं हक्क व मुलुख होता तो आणि नरनाळा व गाविलगड हे दोन किल्ले जा डोंगराचे धारेवर दोहोंजागीं आहेत, त्या सगळ्या पर्वताचे दक्षिणेचा मुलखांतील प्रतिवर्षी चार लक्ष रुपये उत्पन्न होत असा मुलुख, व दोन्हीं किल्ले खेरीज करून बाकी सर्व मुलुख इंग्लीश व त्यांचे पक्षपाती यांजकडे असावा. याशिवाय कटाकप्रांत व बालेसोरही, इंग्लीशांकडेसच असावा. आणि निजामानें पूर्वीं रघुजी भोंसला चौथ व घांसदाणा वगैरे जें घेत होता, तें त्यानें इतःपर न मागावें, आणखी निजाम व सेनासाहेब सुभा (भोंसला) व पेशवे, यांत कांहीं कलह उत्पन्न झाल्यास त्याचें निवारण इंग्लीशांच्या मध्यस्थानें व्हावें; यावरही दुसरें ठरलें कीं, इंग्लीश व भोंसले यांच्या दरबारांत परस्परें वकील असावे, तेव्हां इंग्लीशानें आपला वकील एल्फिन्स्टन नामें साहेब पाठविला, तो नागपुरीं जाऊन राहिला.

हा तह देवगांवीं झाला ह्मणून याचें देवगांवचा तह असें नांव पडलें. नंतर थोडक्याच दिवसांनीं सुर्जीअंजिणगावीं शिंद्याचाही तह ठरला. त्यानें भागीरथी व यमुना या दोहों मध्यें जो मुलुख आहे तो व जयपूर जोधपूर, हे रजपूतांचे मुलुख, आणि गोहदचा राणा याचा उत्तरेस जो मुलुख आहे तोही, आणखी अहंमदनगर व भडोंच किल्ला व तत्संबंधी मुलुख इतके इंग्लीशांचे स्वाधीन करून, अजिंठ्यांचा घाट व गोदावरी, या मध्यें जो मुलुख त्याचा होता, तोही त्यांस देऊन कबूल केलें कीं, मोंगलांचा बादशाहाकडे आम्ही कांहीं न मागूं; व जयपूर व जोधपूर व बुंदी व माचेरी एथचे राजे वगैरे ज्यांहीं इंग्लीशांचा पक्ष स्विकारिला असेल,

त्यांस

त्यास आमचा उपसर्ग न लागतां त्यांहीं स्वतंत्रपणें वागावें.

असा करार झाल्यावर इंग्लीशांहीं घेतलेलें बऱ्हाणपुर व आशीरगड व पवनगड व दोहद व तत्संबंधी मुलुख, आणि पूर्वी दिल्लीचा बादशाहानें महादजी शिंद्यास ढोलपुरबारी व राजखेडा, हे परगणे इनाम करून दिलेले होते ते दिले. याप्रमाणें तह झाल्यावर मेजर जान मालकमसाहेब यास शिंद्याजवळ वकील नेमिला; तो जाऊन त्याचा लष्करांत राहिला.

असा इंग्लीश व निजाम व पेशवे यांहीं एकमतें मुलुख संपादिला, त्यांतील वरदानदीचे पश्चिमेचा व नरनालगड व गावेलगड यांचा डोंगराचे दक्षिणेस जो मुलुख तो निजामाचा भाग ठरला. पेशवा आपल्या शक्तिप्रमाणें युद्धास झटला नाहीं व त्या युद्धेंकरून त्यास नानाप्रकारें उपयोग झाला होता म्हणून आमेदनगर किल्ला व तत्संबंधी मुलुख मात्र त्याचा भाग ठरून बाकी इंग्लीशांकडे राहिला.

याप्रमाणें वाटणी ठरल्यानंतर इंग्लीशांचे दक्षिणेंतील लष्कराचा एक भाग जाफराबादेस गेला, दुसरा पुण्यांत पेशव्याचा रक्षणास राहिला; तेवेळेस त्या मुलखीं लुटारूंचा दंगा बहुत होता.

इंग्लीशांचें हिंदुस्थानांतील लष्कर यास होळकराचा विश्वास नव्हता म्हणून त्याचे चवकशींत ते तयार राहिले, त्याणेंहीं पूर्वी सांगीतलेलीं युद्धें होत असतां, माळव्यामध्यें शत्रूंची व आपली प्रजा संतान मानिली आणि त्या सर्वांपासून अतिशयित खंडणी घेत राहिला. मग इंग्लीशांहीं शिंदे व भोंसले यांस विलंब न लावितां जिंकिलें. त्या योगें तो होळकर परम विस्मय पावला आणि त्यास ऱ्हासकाळही प्राप्त झाला, तथापि त्याचा मनांत पहिल्यापासून इंग्लीशांस घालवावयाचा बेत होता तो सोडीना, यासाठीं त्याणें उत्तरेस जाऊन भरतपुरचा राजा व रजपूत राजे व रोहिले व शीखलोक हे आपणास मिळवावयाचा उद्योग आरंभिला. याशिवाय इंग्लीशांचा व शिंद्याचा तह झाला होता तो मोडून शिंद्यासही आपल्याकडे घ्यावयास वकील पाठविला. याप्रमाणें आचरण करीत असतांही होळकर इंग्लीशांस मित्रत्व दाखवीत असे, परंतु पुढें थोडक्याच दिवसांहीं गवरनर जनरलसाहेबास त्याचें कापट्य स्पष्ट कळून इंग्लीशांचा पक्षपाती लोकांचे देशमर्यादेजवळ त्या होळकराचें लष्कर होतें, त्यास तेथून दूर जावयास त्याणीं जनराल लेकसाहेबाकडून पत्र पाठविलें.

त्यांतच रचना केली कीं, जें तुमचें बोलणें असेल त्यास वकील पाठवा, नंतर तो येऊन असें मागणें करूं लागला कीं, त्याप्रमाणें साहेबास कबूल करवेना; मग तें बहुतेक बोलणें होऊन होळकरानें दावाची गोष्ट सांगितली असतां त्या जनरल लेकसाहेबानें उत्तर केलें कीं, तुह्मी जशी युद्धाची गोष्ट कुशारकीनें सांगतां तशी आमची चाल नाहीं. कदाचित तुह्मीं युद्ध करूं लागलांतर आपल्या कल्पनेपेक्षां आपण अशक्त असें ध्यानास येईल.

यानंतर सन अठराशें चौदाव्या एप्रिलांत, होळकर देवदर्शनाचें मिष करून शिंद्याचें शहर अजमीर तेथें जाऊन तो किल्ला घ्यावयास टपून राहिला. परंतु तें झालें नाहीं, तेव्हां त्या गोष्टीचा राग शिंद्यास न यावा ह्मणून त्याच्या वकिलाजवळ बोलिला कीं, आह्मीं किल्ला घ्यावयाचा यत्न केला, तो केवळ स्वहितार्थच असा नव्हे, सर्व मराठ्यांहीं स्वतंत्रपणें वागावयाकरितां आरंभिला.

यावरून इंग्लिशांचा मनें ठरलें कीं, अवश्य युद्धोपाय चालवावा तेव्हां एप्रेलाच्या महिन्यांत गुजराथेमध्यें कर्नल मरेसाहेब याजवळ इंग्लिशांची कांहीं फौज होती त्यास होळकराचे मुलखीं स्वारी घालावयाची आज्ञा झाली, ते वेळेसच जनरल लेकसाहेबही होळकराचे पाठीस लागला; आणि शिंदा कबूल झाला कीं, होळकरास बुडावयाविषयीं मी सहाय करीन.

जनरल लेकसाहेब होळकराचे पाठीस लागला असतां त्याणें पुनः तहाचें बोलणें लाविलें, परंतु साहेब ऐकेना यास्तव तो मागें हटत हटत चंबळा नदी उतरून आपल्या मुलखीं गेला. तेव्हां तो साहेब पुढें पर्जन्यकाळ जवळ आला, ह्मणून त्याची पाठ सोडून तेथून माघारा आपल्या छावणीस गेला; आणि पांच पलटणें व तीन हजार मराठे स्वार इतकें सैन्य मुलखांत त्या होळकराचा उपसर्ग आपल्या कोणास लागूं देऊं नये ह्मणून नेमिलें; त्याचा मुख्य कर्नल मानसनसाहेब केला.

नंतर मुंबईचें लष्कर गुजराथेंतून येतें असें त्या साहेबास कळून त्याणें नेम केला कीं, तो मरेसाहेब आणि आपण एकच मिळून होळकराशीं स्पर्धा चालवावी. अशी कल्पना करून तो मुकुंदघाटाचे वाटेनें होळकराच्या मुलखांत शिरून चंबळानदीकडे चालिला; त्यास जुलई महिन्याचे सातवे तारिखेस वर्तमान कळलें कीं, होळकर आपलें पायदळ व स्वार व तोफखान्यासह सर्व सैन्य घेऊन इंग्लिशांचा नाशास येतो, आ-

णि

णि दुसरें वर्तमान आलें कीं, कर्णेल मरे साहेब गुजराथेंतून लष्कर घेऊन
निघाला, त्याणें कांहीं कारणामुळें इकडे येण्याची मसलत टाकिली, अ-
शासमयीं त्या साहेबाजवळ भक्षण सामग्री दोन दिवस पुरेशी मात्र होती,
त्या सर्वकारणामुळें त्यास पुढें जावयाचा मोठा विचार पडला; तेव्हां त्याणें
लगेंच धैर्यकरून पुढें होऊन होळकराचें लष्कर चंबळानदी उतरतेसमयीं
त्यावर हल्ला करावा तें न होतां, त्याचा दुर्दैवानें त्यास बुद्धी सुचली कीं, हे वे-
ळेस आल्यावाटेनें मागें फिरावें; मग लगेंच केलें. तेव्हां तो तेथून निघो-
न मुकिंद घाटास पोहचला, तों त्याचा पाठीमागें होळकराची फौज जव-
ळ येऊन त्यास पत्र आलें कीं, तुह्मीं युध्द टाकून आमचे स्वाधीन व्हावें याखे-
रीज तुह्मास दुसरा उपाय नाहीं. तेव्हां तें त्याणें न मानिलें असतां, हो-
ळकरानें आपल्या स्वारांचा तीन टोळ्या करून एक त्याचा सन्मुख व दोहों
बाजूंस दोन योजून हल्ला केला, तें युद्ध प्रातःकाळापासून अस्तमानपर्यंत झा-
लें, तथापि त्या इंग्लीशांचा बंदोबस्त त्या स्वारांस मोडवेना. मग ते होळ-
कराचे लोक युध्द सोडून दोनकोसांवर मागें जाऊन उतरले. तेथें त्यांचें पा-
यदळ व तोफा मागून येऊन पोहचल्याह्मणजे तें सर्व सैन्य त्या मानसन् सा-
हेबाच्या लष्करावर पडून त्यास अगदीं नाहींसा करावयाचा बेत होता; तें इंग्ली-
शांच्या सरदारास समजून, दुसरे दिवशीं उजेडतां तेथूनही तो मागें जाऊं
लागला, त्यास शत्रूचा असा उपद्रव असून, पर्जन्यही बहुत लागत असतां
तो रामपुरानामें चंबळेचा उतार आहे तेथपर्यंत पोहचला, तेसमयीं मोठ्या
पर्जन्यामुळें तो उतार मोडला होता, नंतर तें पाणी उतरल्यावर तो मानस-
न साहेब नदीपार गेला, त्यास तेथें जावयास विलंब लागला, आणि त्याचा
असमंतात गावांतून अन्न सांपडेना, ह्मणून फार हैराण झाला, आणि मा-
र्गांतील चिखलामुळें त्याचा तोफा चालेनात, तेव्हां त्या टाकून पुढें चंबेलीना-
में ओढा आहे तेथें पोहचला; तोही पाण्यानें भरला होता, तेथून पार जाव-
यास दहा दिवस खोळंबा झाला. इतकें होईतोंपर्यंत होळकराचे स्वा-
र निरंतर हल्ला करीत होते, आणि त्या साहेबाच्या लष्करास धान्यादिकां-
चा फार तोटा, त्यायोगें त्याची मोठी दुर्दशा झाली, आणि तो ओढा पार हो-
तांना त्याचे कित्येक शिपाई वाहून गेले; व बुणग्यांतील लोक ओढा उतरू-
न पलीकडे आपली जाण्याची पाळी येईल ह्मणून वाट पाहत असतां मागें
राहिले, ते होळकराचे पक्षी भिल्ल यांणीं मारिले. इतकें झालें तरी त्या प-
लटनांचा बंदोबस्त होळकरांचा स्वारांस मोडवेना. आणखी ते पलट-
नी लोक त्या ओढ्याचे कांठीं असतां जुलाईचे एकविसाव्ये तारिखेस सं-

ध्याकाळीं

ध्याकाळीं ते होळकराच्या सैन्यांत शिरून त्यांच्या कित्येक लोकांस मारून माघारे आपल्या ठिकाणास आले. नंतर आठा दिवसांनीं रामपुरनामें किल्ला पूर्वीं लेकसाहेब्यानें होळकराचे पाठीस लागतांना घेतला होता त्याठिकाणास पोंहचला. तेथें जनराल लेकसाहेबाकडून त्याच्या कुमकेस दोन पलटनें यत्यां बरोबर कांहीं दाणा आला तो त्यांस प्राप्त झाला, मग त्यानीं दीड पलटन ठेऊन तेथून पुढें बनासनामें नदीजवळ पोंहचले, तेथेंही उतार नाहींसा झाला होता, यास्तव ती नदी उतरून पलीकडे जावयास उशीर लागला, तितक्यांत मराठ्यांच्या तोफा व पायदळ येऊन पोंहचलें, तेव्हां इंग्लीशांचे बहुतेक लोक उतरून पलीकडे गेले, आणि बुणग्याच्या रक्षणास एक पलटनावर कांहींसे लोक राहिले; त्यांवर त्यांहीं तोफांचा मार चालवून हल्ला केला, तेसमयीं त्यापलटनाच्या साहेबानें वेगें करून त्यांवर चालून घेऊन एकक्षणभर त्या तोफा हस्तगत केल्या; परंतु होळकर अंगें मोठ्या सेनेसहित येऊन त्याणें त्या बहुतेकांस मारून टाकिलें, त्यांत बारा गोरे साहेब सरदार पडले. बाकीजे त्यापलटनीचे शिपाई व सरदार राहिले ते आपल्या नदी उतरून पलीकडे गेलेल्या लोकांचा मार चालू झाल्यानें वांचले.

यां पुढें तो मानसनसाहेब याणें शिद्याचीं सहा पलटनें व एकवीस तोफा आपल्या कुमकेस कुशाळगडनामें जयपुरच्या राजाचें ठिकाण आहे, तेथें येऊन त्याचीं व आपली गांठ पडावयाचा नेम केला होता म्हणून तेथें गेला, परंतु ते आगीं पोंहचतांच ती कुमक नाहींसें समजलें, तेव्हां आग्र्यापर्यंत जावयाची मसलत ठरली. मग तें ठिकाण सोडून निघाल्यावर वाटेंत मराठे स्वार तोफांसुध्दां येऊन त्यांहीं त्या पलटनाच्या नाश आरंभिला, परंतु त्यांचें बळ चालेना; कांकीं, ते स्वार जोंपर्यंत त्या पलटनी लोकांचे बंदुकांच्या तोंडासरसे येऊन भिडत, तोंपर्यंत त्यांहीं बार न केले; मग ती सरबत्ती होतांच ते चहूंकडे उधळले, असें बहुत वेळां झालें, परंतु शेवटीं मराठ्यांच्या तोफांच्या मारानें व ते शिपाई निरंतर वाट चालून थकलेले होते, त्यायोगें एके रात्रीस फार अंधारामुळें त्या पलटनींत बुणगे शिरून, बयानानामें पर्वतांतील वाटेच्या अडचणीमुळें त्यांच्या सर्व वेत विसकटला, तेव्हां ते असके शिपाई आप आपल्या सामर्थ्याप्रमाणें आग्र्यास जाऊन पोंहचले, तोंपर्यंत ते कित्येक मराठ्यांहीं मारिले परंतु त्याचा पाठीस लागलेले सराटि थोडके होते म्हणून ते बहुतेक वांचले.

त्यावरून होळकर साठ हजार स्वार व पंधरा हजार पायदळ व एकशें

त्याप्रमाणें

त्याणें तोफांसहित थाटानें फार धामधूम करीत मथुरेस आला. परंतु जन-रल लेकसाहेबानें या गोष्टीचा बंदोबस्त अगोधरच केला होता त्यायोगें इंग्लीशांहीं एका महिन्यांत मराठ्यांस तेथून पिटून आपण त्या मथुरेंत मु-काम केला. तेव्हां होळकर तें स्थान सोडून गेला, तो दिल्ली घ्यावयाचा उद्यो-ग करूं लागला; त्याणें तेथें नऊ दिवस युद्ध करून तें काम सिद्धीस न जातां जनरल लेकसाहेब येतो असें त्यास समजून तो भरतपूरचा राजा यास मि-ळावयाकरितां त्या राजाचा दिगनामें किल्ला आहे तेथें गेला. तेव्हां त्याचे पाठीस लागलेले इंग्लीश येऊन पोंहचले, त्याहीं त्यांवर हल्ला केला, ते समयीं मराठ्यांचा पराभव होऊन त्यांचा सत्यायशीं तोफा इंग्लीशांच्या हातीं लागल्या, आणि ते होळकराचे लोक त्या किल्ल्यांत आश्रय पावले. मग त्या लेकसाहेबानें भिंती पाडावयाजोग्या मोठ्यामोठ्या तोफा आ-ग्र्याहून आणून तो किल्ला घ्यावयास आरंभ केला. त्या दिवसापासू-न दहाव्ये दिवशीं त्या किल्ल्याचे बाहेरचा धाकटा तट ढासळून खिंडार प-डून मध्यरात्रीं इंग्लीशांचा हल्ला चालून तें ठिकाण हस्तगत होऊन दुस-या दिवसाचा रात्रीं उजाडतां त्या किल्ल्यांतील शिबंदी व होळकराचे लोक तो किल्ला सोडून तेथून भरतपुरास जाऊन आश्रय पावले. तेवेळेस होळकराचें स्वार भरतपुरीं न जातां फरकाबादेस जाऊन पोंहचत तों प-र्यंत लेकसाहेबानें त्यांचे पाठीस लागून त्यांतील तीन हजार मारिले.

इतकें होईतोंपर्यंत मुंबईच्या फौजेंतील एक टोळी गुजराथेंतून मा-ळव्यांत जाऊन होळकराची राजधानी इंदूर हस्तगत केलें, आणि त्या माळ-वे प्रांतीं जे होळकराचे मोठेमोठे किल्ले होते ते सारे घेतले. याशिवाय द-क्षिणेंतीलही त्याचे चांदोर व जालनें वगैरे किल्ले आणि त्याचा मुलुख हस्तगत केला. असें झालें असतां त्या होळकरास भरतपुरमात्र आ-श्रय उरला; तोही घ्यावयाची मसलत ठरली, ह्मणून मुंबईच्या सेनाभाग हिंदुस्थानांत पाठविला तो कोठ्यापर्यंत पोंहचला होता, त्यास आज्ञा गे-ली कीं, बंगाल्याचा लष्करास येऊन मिळावें.

जनरल लेकसाहेब याणें या पूर्वी जीं जीं कामें आरंभिलीं तीं तीं सह-ज सिद्धीस गेलीं, ह्मणून भरतपुर घ्यावयाचा बेत झाला, तेवेळेस त्या जव-ळ तोफखाना वगैरे किल्ला घ्यावयाचें साहित्य यथास्थित नसतांही तो त्व-रेकरून त्या कामास लागला; त्या भरतपुराचा घेर साडेतीन चार कोसां-चा आणि त्यास परमस्फुरद असा मातीचा तट व त्यास भोंवता मोठा खं-दक पाण्यानें भरलेला, तें पाणी पुरतें भरल्यास एका पुरुषापेक्षा अधिक व्हावें.

व्हावें. असें असतां त्या किल्ल्यास धरणे घालिलें एके मार्गानेच दाणे वगैरे-न येऊ देतां [illegible] त्या [illegible] एक महान सें खिंडार पडलें त्यांत हल्ला केला, तो सिद्धीस गेला नाहीं, नंतर आणखी तीन वेळां तशीच गर्दी केली, तरी का-र्यसिद्धी न झाली.

नंतर त्या साहेबानें तरवाच उमेद धरून, आणीक सरंजाम आणा-वित असतां तेथचा राजा होळकराची कुमक करून शेवटास आला नाहीं, असें समजून त्याणें स्वहितार्थ त्याचा पक्ष सोडून इंग्लिशांशीं तह केला. त्यांत असें ठरलें कीं, वीस लक्ष रुपये त्या राजानें इंग्लिशांस द्यावे, आणि तो को-णी इंग्लिशांचे द्वेषी असतील त्यांचा पक्ष धरूं नये; याशिवाय पूर्वी लेक-साहेबानें त्या भरतपुरकराशीं तह केला, त्यांत कांहीं त्याचा हिताचीं कलमें होतीं तीं इतःपर नाहींत असें समजावें; आणि इंग्लिशांहीं वचन दिलें कीं तुम्ही क-बुलातीप्रमाणें सरळ मार्गानें वागतां असें, आमच्या मनांत येईल तेव्हां, तु-मचा दिग किल्ला तुम्हांस माघारा देऊं.

असा तह झाल्यानंतर शिंद्यानें आपल्या वकीलाबरोबर कित्येक स्वार व सर्व पेंढारीमंडळ त्या राजाचे कुमकेस पाठविलें, ते समयीं त्याणें त्या वकीलास भेट न देतां त्याबरोबर आलेल्या लोकांसहित त्याला मा-घारा फिरविला. त्याबरोबर होळकर आपले राहिलेले स्वार× व बुंदेल खंडांतून आलेला अमीरखान यांस आपल्याबरोबर घेऊन शिंद्याचा लश्करांत गेला.

तेथें शिंद्यानें त्याचा मोठा सन्मान केला, आणि इंग्लिशांचा वकीला-ची समजूत केली कीं, याणें तुमचे मुलखीं जाऊन उपद्रव न करावा यासा-ठीं आम्हीं याचा मान राखिला. तें साहेबाचे मनास न आलें, (त्या जनराल लेकसाहेबास तेसमयीं विलायतेहून लार्ड असें नवे पद प्राप्त झालें होतें,) तेव्हां तो साहेब भरतपुराहून शिंद्याकडे चालिला. तेवेळेस शिंदा व होळकर हे तो लार्ड जवळ आला असें समजून कोटापर्यंत गेले. तेस-मयीं पर्जन्यकाळ समीप आला, असें म्हणून त्या साहेबानें नियम केला कीं, यावेळेस यांचे पाठीस न लागतां छावणी करून राहावें. तेव्हां आपल्या बंगाल्याचा लश्कराचा मोठा भाग तो आग्रें व मथुरा येथें ठेऊन,

---

× भरतपुरच्या किल्ल्याची लढाई होत असतां होळकराचा व इंग्लिशांचा स्वारां-चीं युद्धें नाहेर होत असत, तेव्हां [illegible] इंग्लिश [illegible] घालून आपले एकही मनुष्य न पडतां त्याचे एक [illegible] मनुष्य [illegible]

[illegible]

मुंबईचा लष्कराची टोळी समपूर्ण केली. असें सन अकराशेंपांचांत पर्जन्याचा आरंभापर्यंत झालें.

नंतर शिंदे व होळकर कोटा सोडून अजमीरचा वाटेनें चालिले, ते समयीं शिंद्याचा मुख्य कारभारी सरजेराव घाटगा तो आणि होळकर एकमत होऊन इंग्लीशांशीं युद्ध करावें अशी मसलत होत होती, परंतु तो सरजेराव घाटगा थोडक्याच दिवसांत पदच्युत होऊन अंबुजी इंगळ्यास तें मुख्यत्व प्राप्त झालें. त्याची मसलत युक्तीनें काळ हरण करावयाची होती, व शिंद्याचा मनांत येऊं लागलें कीं, आह्मी व होळकर दोघे मिळूनही इंग्लीशांस घालवून देणें घडत नाहीं. याशिवाय ते शिंदे व होळकर यांमध्येंच कांहीं ईर्षा उत्पन्न होऊन दोघांहीं आपआपलें लष्करांचे तळ निरनिराळे केले; नंतर शिंद्यानें आपल्या हितार्थमात्र इंग्लीशांशीं तह करावयाची मसलत आरंभिली असतां होळकर अजमीर सोडून आपल्याबरोबर बारा हजार स्वार व दोन तीन हजार पायदळ व तीस तोफा घेऊन शीख व अफगाण लोक यांची कुमक संपादन करावयास पंजाब मुलखीं गेला.

नंतर लार्ड लेक साहेब त्याचे पाठीस लागला असतां आणि त्यास शीखलोकांची कुमक न मिळतां तो होळकर फार संकटांत पडला. तेव्हां त्याणें बियानदीचे कांठीं ज्याठाचें लष्कर होतें तेथें आपला वकील तहाचें बोलणें करावयास पाठविला.

इतक्यांत शिंद्यांणें तहाचें बोलणें आरंभिलें होतें तें नवंबराचे बेविसाव्या तारिखेस कर्णेल माल्कम साहेब व शिंद्याकडचा मुनशी काविलनेंतनामें होता, यांचे विद्यमानें शेवटास गेलें.

या तहांतील मुख्य प्रकार इतकाच कीं, शिंद्याचे इनाम परगणे ढोलपुरबारी, राजखेडा, हे इंग्लीशांहीं द्यावे, आणि सर्जीअंजिणगांवच्या तहासंबधें इंग्लीश प्रतिवर्षी शिंद्याचे कित्येक मानकरी व सरदार यांस पंधरा लक्ष रुपये देत होते, ते न द्यावे; व कंपनी आणि शिंदा यांचा मुलखाची मर्यादा नवी असावी, ती अशी. यादोहोंमध्यें चंबळा नदी मर्यादा, पश्चिमेस कोटा पर्यंत, तशीच पूर्वेस गोहदच्या राण्याचा मुलखाचे पलीकडचे सीमेपर्यंत.

इंग्लीशांहीं शिंद्याचा स्वासगी खजीन्यास प्रतिवर्षी साडेचार लक्ष रुपये द्यावे, आणि त्याचे स्त्रीस व कन्येस आपल्या मुलुखीं जहागीर द्यावी; त्यांत दोन लक्षांच्या मुलुख स्त्रीस आणि एक लक्षाच्या कन्येस द्यावा. त्याशिवाय गोहदचा राण्यास कांहीं मुलुख देऊन त्याकडून ग्वाल्हेर किल्ला इंग्ली-

शांहीं

त्यांहीं शिंद्यास द्यावा.

होळकराशीं व इंग्लीशांशीं तह झाला तो प्रकार असा. कोटा रामपुरा व बुंदी, व त्या बुंदीच्या डोंगराचे बाहेरच्या उत्तरेस जो मुलूख आहे, तेथें होळकराची सत्ता नसावी; आणि इंग्लीश व त्यांचे सहाय यांपाशीं कांहीं मागूं नये, व आपले चाकरीस गोरे लोक न ठेवावे; याशिवाय सरजेराव घाडगा हा इंग्लीशांचा दुष्ट यास्तव याला आपल्या कारभारांत शिरूं देऊं नये, याखेरीज लार्डलेक साहेबानें सांगितले वाटेनें माळव्यास जावें. इंग्लीशांहीं कबूल केलें कीं, चंबळेच्या दक्षिणेस होळकराचा मुलूख आहे तेथचा कारभारांत आम्ही शिरणार नाहीं. याखेरीज चांदोर किल्ला व आंबेर* व शिवगांव इतके खेरीज करून परकड दक्षिणेंतील जितके होळकराचे किल्ले व प्रांत असतील तितके इंग्लीशांहीं त्यास माघारे द्यावे.

त्यानंतर होळकर पंजाबाहून आल्यावर कोणी उदयपुरच्या राजा याचे कन्येनिमित्त जयपुरकर व जोतपुरकर या दोघां राजांचा कलह लागला होता तेव्हां त्या दोघांचे वकील शिंदा व होळकर यांकडे कुमक मागावयास आले; ते समयीं शिंद्यानें त्या दोघांकडे सरजेराव घाडगा व बापूजी शिंदा यांजबरोबर पंधरा हजार फौज देऊन पाठविले. होळकरानें अमीरखान यास पठाणांसुद्धां जयपुरच्या राजाकडे नेमिला. नंतर कित्येक वेळपर्यंत जयपुरच्या राजाचें प्राबल्य होतें, परंतु तो अमीरखान त्या राजाचा पक्ष सोडून केवळ स्वहितार्थ त्या दोघांच्याही मुलुखांत लुटालूट करूं लागला; नंतर त्याणें जोतपुरच्या राजाचा अभिमान धरिला. शेवटीं त्या दोघां भांडणारांत आपण मध्यस्थ होऊन कित्येक मारेकरी घालून, उभयपक्षीं दंगे करून तो कलह शमविला.

इतकें होई तोंपर्यंत होळकराचे बुद्धीस चळ होऊन त्याचे मुत्सद्दी लोक यांस त्याला प्रतिबंधांत ठेवावा लागला. त्यास वेड लागल्याचे पूर्वी त्याच्या पुतण्या खंडेराव होळकर यास कोणी फितुरी लोक मिळून तो मुख्य असा मानून त्यांहीं त्याचा झेंडा उभा केला; तेव्हां त्या यशवंतरायानें तो फितूर मोडून त्या खंडेरायास मारेकरी घालून मारून टाकिला. परंतु त्या एकाएकीच मारिल्यानें त्याचा राग शमेना म्हणून त्याणें आपला भाऊ त्याच क्रोधानें काशीराव तसाच मारविला, तेणें करून त्याचा राग शांत होऊन तो निर्भय झाला. त्यास खूळ लागल्यावर तो सन अठराशें आठांपासून

---

* आंबेर वगैरे ठिकाणें खेरीज केलीं तीं पुढें होळकराची वर्तणूक नीट असल्यास माघारे द्यावीं.

अठराशें अकरापर्यंत दंशांतरांत होता. मग त्यावर्षी अकटोबराचे वेविसा-वे तारिखेस त्यावेडांतच मृत्यु पावला.

तो होळकर मनाचा धीट आणि शरीरें करून रुंद असे; याचा जय झाला असतां तो आपल्या जातीच्या मराठ्यांप्रमाणें उछृंखल होचा, परंतु विपत्तीसमयीं बावरा नहोतां धैर्य करून आपल्या अर्थसाधनाचा उपाय चालवीत असे; तो बोलण्यांत व आचरणांत केवळ रानवडा होता; असें असून समयानुसार राजाप्रमाणें वागणें, आणि दुसऱ्यापासून आपली मर्यादा ठेवणें, याविषयीं परम सुज्ञ, आणि विनोदी असे, यास्तव शिपाई लोक त्यावर प्रीति करीत. तो पुरुष इतरां मराठ्यांपेक्षां मोठा उद्योगी, त्याणें फारशी व मराठी या दोन्हीं लिहिण्याचा अभ्यास केला होता. त्याचे आंगीं असे गुण असून, कित्येक गोष्टीविषयीं त्याचें वागणें लोभी व निर्दय व क्रूरपणायुक्त होतें; याशिवाय तो समयविशेषीं मोठा उग्रस्वभाव होता. त्याची आकृति ठेंगणी आणि शरीर पुष्ट वरंग काळसर मुखश्री चांगली, त्यायोगें तो कांहींसा हस्तमुख दिसे; त्याचा हातांत बंदुक फुटून त्याचा एक नेत्र गेला असे, तथापि त्याचें तोंड विशोभित झालें नव्हतें.

सन अठरांशें तिहींपासून अ
ठराशें सत्रापर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून
भाग बत्तिसावा

## अनुक्रमणिका

यशवंतराव होळकर मेल्यानंतर त्याचा कारभार अमीरखानानें मुख्यत्वें केला तें प्रकरण.

शिंदे व नागपुरकर भोंसले यांचें वर्तमान.

पेंढारी लोकांची कांहीं गोष्ट.

बाजीराव पेशवा पुनः गादीवर बसल्यानंतर, कसकसा वागला तें.

प्रतिनिधीचें बंड.

सदाशिव माणकेश्वर व कुसुरुजी मोदी यांचा वहिवाटीचा प्रकार.

बाजीराव पेशवा याणें माधवराव रास्त्याशीं व वरकड जहागीरदार यांशीं कोणे प्रकारें कृत्रिम ठेविलें तो विस्तार.

त्रिंबकजी डेंगळा योग्यतेस चढल्याचा प्रकार.

बाजीरावानें आपल्या जवळ द्रव्य जमा केलें तें.

त्याणें इंग्लीशांस बुडवावयाविषयीं कशी मसलत केली ती.

त्या बाजीरावाशीं व बडोदेकराशीं वहिवाट झाली तें.

गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा वध.

त्या पुढें त्रिंबकजी डेंगळा इंग्लीशांचा बंदीत पडलेला पळून आऊन त्यास बाजीराव पेशव्यानें गुप्तपणें आश्रय दिला.

त्यावर इंग्लीशांहीं काय काय केलें तें प्रकरण.

## भाग बत्तिसावा

रजपूत राजाचा कलह शांत झाल्यावर अमीरखान मोठ्या त्वरेनें रामपुरास आला, तेथें ठरलें कीं, राजकारभार चालवावयास मंडळी नवी करावी, त्यांत मुख्यत्वें अमीरखान असावा परंतु बाह्यात्कारें यशवंतरावाची स्त्री तुळसाबाई ती मुख्य केली. ती दुर्व्यसनी आणि मोठी खुनशी असे, यास्तव त्या एवढ्या कारभारास ती केवळ अयोग्य होती, तिणें यशवंतराव मृत्यु पावल्यावर आपल्या सवतीचा दौलतरावनामें चहूं वर्षांचा मूल आणून त्या गादीवर बसवून त्याचें नांवें

कारभार

कारभार चालविला. त्या नंतर थोडक्याच दिवसांनीं त्या अमीरखानानें चाईजवळ गफूरखाननामें कोणी आपला भाऊबंद यास ठेवून आपण आपल्या पठानांचा हितार्थ रजपुतांचे मुलखीं गेला.

त्यापुढें होळकराचा राज्यकारभाराची अशी अव्यवस्था झाली कीं, त्या योगें प्रतिवर्षी मुलखाचा वसूल घ्यावयाचा नियमा प्रमाणें उत्पन्न होईना आणि त्या कारभारी मंडळांत कोणास अशी शक्ती नव्हती कीं, फौजेस फांटा देऊन खर्च तोडावा याशिवाय सरकार खजिन्यांत शिबंदीचा खर्चास पुरेसें द्रव्य नव्हतें म्हणून त्या लष्कराचा वेगळ्या वेगळ्या टोळ्या करून त्यास सरदार देऊन कोणत्याही प्रकारें त्यांचा खर्च चालवावयाचा बेतानें त्यांस आपल्या मुलखांत जागाजागा पोट भरावयास पाठविले. त्यांतील कित्येक बंडास अनुसरले; त्यांत एक महंमद अल्लीखानबंगष नामें होता त्याणें खानदेशाचे बहुतेक परगणे लुटून निजामाचा मुलखांतून होळकराचा अंमल परगण्यांत जाऊं लागला; परंतु पुणें व हैदराबाद यां मध्यें इंग्लीशांचीं पलटनें होतीं त्यांही त्यावर जाऊन त्याला कैद करून मुंबईस पाठविला. तो तेथें बंदींत ठेविला.

शिंद्याचे मुलखीं होळकरापेक्षां कांहींसा बंदोबस्त विशेष होता, तथेंही खर्चाचा तोट्यामुळें त्यांस होळकरा प्रमाणेंच मुलखांत फौज पाठवावी लागली त्या पूर्वी त्या फौजा मुलुखभर पसरून युद्धादि कामास गुंतल्या असत; त्या योगें प्रजेस बहुत उपद्रव होत नसे; मग त्या रिकाम्या होऊन एके जागीं बहुत असूं लागल्या तेव्हां रयतेस परम दुःसह असें दुःख प्राप्त होऊन ते लोक चांगल्या पेरण्या झालेलीं स्थळें टाकून गेले.

एवढी अनीति प्रसक्ति झाली असतांही शिंदे व होळकर यांचा सैन्यांत शत्रूचा उपाय चालेना, कांकीं, ते लोक युद्धकुशल होते; असाच रघोजी भोंसल्याचा राज्याचाही बेत कांहींसा विसकटला, आणि त्याचे लोक तादृश युद्धनिपुण नव्हते, म्हणून अमीरखान याणें रजपुतांचा मुलखांत आपली सत्ता स्थापून सन अठरागें नवांमध्यें वराडांत स्वारी केली; त्या बरोबर त्याचा पठानांखेरीज पेंढारी फार आले, मग त्या सर्वांही रघुजीचा मुलुख लुटावयाचा आरंभ केला, परंतु इंग्लीशांचे लोक त्या मुलखा समीप होते त्यांही ते निरंकुशपणें लूट करितात असें समजून त्यांहीं युद्ध करून त्यांस नर्मदापार घालविले.

पेंढारीलोक यांचा निर्दयपणास अंत नाहीं; ते पहिल्यापासून मराठी लष्कराचा संगतीस असत. पुढें पहिला बाजीरावपेशवा हिंदुस्थानांतून पुण्यास येऊं लागला ते समयीं, ते माळव्यांत येऊन राहिले; नंतर कांहीं दिवसांनीं होळकर व शिंदे यांच्या मुलखांत जाऊं लागले असतां, त्या दोघांत ज्याचा पक्ष ते धरी-

त

न त्या प्रमाणें आपणास शिंदेशायी, किंवा होळकरशायी असें म्हणवीत. मग म-न् सत्राशें चवऱ्याणवांत शिंद्यानें त्या पेंढाऱ्यांस नर्मदेजवळ कांहीं मुलुख दिला. त्या पुढें कोणी मोठा धूर्त करीमखान आणें खरड्याचा लढायींत निजामास लुटून बहुत द्रव्य मिळविलें होतें, तो त्या पेंढाऱ्यांचा मुख्य होऊन त्याणें अमीरखान पठा-नाची सुप्रसन्नता संपादून, सुजाहलपूर नामें परगणा त्यापासून मिळविला. या शिवाय शिंद्याचे जहागिरदार यांचा माळव्यांतील मुलुख कांहीं युक्तीनें हाता खालीं घालून त्यास प्रतिवर्षीं पंधरा लक्ष रुपये जमाबंदी होऊं लागली. तेव्हां शिंद्यास त्या विषयीं शंका उत्पन्न होऊन, कांहीं भुलथापीनें त्याला धरून ग्वाल्हे-र किल्ल्यांत बंदीस घातला, तो सन् अठराशें दहा पर्यंत तेथें राहिला. मग ब-हुत द्रव्य देऊन त्या प्रतिबंधांतून सुटून जे कोणी मध्येंच चितू, व दोस्त महमद, व ना-मदारखान, व शेखदल्लू नामें, चवघे पेंढाऱ्यांचे मुख्य झाले होते, ते येऊन त्यास मि-ळाले, तेव्हां त्याचे पंचवीस हजार स्वार जमले. ते समयीं त्याची मसलत हो-ती कीं, कांहीं पायदळ चाकरीस ठेऊन पुनः वराडांत जाऊन लुटालूट करावी; परंतु रघोजी भोंसला याणें त्या चवघांतील चितू नामें मुख्य तो आपल्याकडे घे-ऊन त्यांस तेथून काढून दिलें. ते वेळेस तो करीमखान आपला पुरातन आ-श्रयभूत अमीरखान याजपाशीं आश्रयास गेला, तेथें त्याणें शिंद्याचा मसल-तीवरून त्यास बंदीस ठेविला. तो सन् अठराशें सोळापर्यंत तसाच होता.

पेंढारी लोकांची चाल होती कीं, प्रतिवर्षीं दसऱ्याचे सुमारें आपला कोणी मुख्य याचे मसलतीनें एखादे ठिकाणीं बंदोबस्त ठीक नाहींसें समजून, ते आ-गीं चोरवाटांनीं जाऊन पोंहचल्यावर जसा पर्जन्यकाळीं नदीस लोंढा येतो त्या-सारिख्या वेगानें एकाएकीं त्या मुलखावर पडून तेथें वेगळ्या वेगळ्या टोळ्या होऊन त्या देशांतील सारीं ठिकाणें लुटून सर्व प्रकारें अनर्थ करावा; मग ती लू-ट घेऊन आपण प्रवेश केलेल्या ठिकाणापासून दूर, दुसऱ्या एखाद्या संकेतस्थ-ळीं जाऊन सर्वांहीं एकत्र मिळून आपल्या ठिकाणास जावें.

ते पेंढारी प्रथम माळवें व मारवाड व मेवाड व रजपूताना व वराड इतक्या मुलखीं उपद्रव करीत होते; मग कधीं कधीं निजाम व पेशवे यांचा मुलखांत शि-रूं लागले,

इकडे पुण्यामध्यें बाजीराव पेशवा यास इंग्लीशांहीं गादीवर बसवि-ल्यानंतर, थोडक्याच अवकाशानें त्याची कृतघ्नता व कुटिलवृत्ति इत्यादि दुर्गु-ण दिसून आले.

तो इंग्लीशांचा द्वेषी मंडळाशीं पत्रादिद्वारा गुप्तस्नेह ठेवूं लागला आ-स नमस्त करून येण्याविषयीं त्यांची अशी समजूत करी कीं, तुम्हीं सर्व दूर गे-

ला

ला. आणि दक्षिण सीमेचे जहागीरदार सारे फितलेले; या मुळें मी एकटा पडलों ह्मणून अडचणी करितां इंग्लीशांशीं तह केला. या शिवाय जेव्हां पटवर्धन जनराल वेलसली साहेबास मिळून त्याचे बरोबर सेने सहित युद्धास आणार होता, तेव्हां त्याणें कोल्हापुरचा राजास त्याचे मुलखीं स्वारी घालावयाची मसलत गुप्तपणें दिली.

या कृत्यापासून त्या बाजीरावानें आपलीं दोन हितें कल्पिलीं होतीं त्यांत एक तर शिंद्याचे शत्रू इंग्लीश यांचासाहाय्यास पटवर्धन जाईनासा केल्यानें शिंद्याची आपणाविषयीं सुप्रसन्नता होईल. दुसरें असें, परशुरामभाऊ पटवर्धन यांचें आणि आपलें वांकडें पडलें आहे यास्तव इंग्लीशाचासाहाय्यास तो न गेला हेंच निमित्त करून, साहेबलोकांस समजवावें कीं, तुमचा व आमचा तह झाला यास पटवर्धन अनुकूळ नाहीं; इतकें करून त्याची जहागीर आपण जप्त करावी.

बाजीराव यास राज्यकारभारचालवावया विषयीं कोणा एकाचाही विश्वास नसे ह्मणून आपणच संपूर्ण तीं कामें वहिवाटीत असे तो आपणास सर्वांहून प्रवीण असें मानी; परंतु इंग्लीशांचा वकील व आपण भाषण करीत असतां त्याचा व आपल्या विचारांत अंतर दृष्टीस पडून कदाचित् बोलण्याचा बेत चुकून कलह उत्पन्न होईल ह्मणून तें काम दुसऱ्याचे हातून घ्यावें असा निश्चय करून कोणी इंग्लीशांचा द्वेष्टा असा सदाशिव माणकेश्वर यास इंग्लीशांच्या वकीलाशीं बोलण्याचा कामास नेमिला.

तो माणकेश्वर टेंबुर्णीगावचा देशपांड्या; त्याणें प्रथम पुण्यामध्यें कांहीं दिवस कीर्तन करून निर्वाह केला. त्याचे अंगीं कविताशक्ति चांगली, आणि तो वाद्यें वाजिवण्याविषयीं कुशल होता. पुढें हैदराबादेंत पेशव्याचा वकील गोविंदराव पिंगळा याची त्याणें चाकरी धरिली. मग बाजीराव पेशवा व दवलतराव शिंदा जे समयीं एकमत होऊन इंग्लीशांस अगदीं बुडविणार होते, तेव्हां त्या मसलतींत निजामासही घ्यावया करितां तो माणकेश्वर त्याकडे पाठविला.

त्या बाजीरावाची अनीति कशी होती ती ध्यानांत यावयास एक दोन गोष्टी आहेत; त्यांत खंडेराव रास्ता याणें बाजीरावास विपत्ति समयांतही सोडिलें नाहीं, आणि तो बाजिराव पुनः पुढें गादीवर बसल्या नंतर दुसऱ्या वर्षीं बाबूराव फडक्यानें मोठें बंड केलें होतें तें बहुत युक्तीनें खंडेराव रास्ता मोडिता झाला, असाही परमविश्वासू चाकर त्याणें इंग्लीशांचा पक्ष धरून माणकेश्वराशीं वाद केला असें ऐकून त्याची चवकशी न करितां एवढ्याच

निमित्तानें

निमित्तानें त्यास पदच्युत करून त्याची जहागीरही बाजीरावानें जप्त केली. असेच जे बहुतदिवस सेवा केलेले जुने चाकर होते त्याचा उपजीविकेचा विचार न ठेवितां त्याचें स्मरणही टाकिलें. तो बाजीराव असा दुर्वृत्त असून त्यास इंग्लीशांचा साहाय्यामुळें त्याचा राज्यांतील संपूर्ण बंड मोडून लोक सुखीसे दिसूं लागले; आणि त्याची आज्ञा त्या राज्याचा मर्यादेंत सर्वत्र अकुंठित चालती झाली. त्यांत प्रतिनिधीचा बंडापर्यंत अंतर नपडलें, त्या बंडाचा प्रकार असा. इंग्लीश व बाजीराव पेशवे यांचा स्नेह झाल्याचा पूर्वी,पुण्यांत परशुराम श्रीनिवासनामें प्रधानराव प्रतिनिधीचापुत्र होता; त्यास बाजीरावानें धरून कैद करावयाची मसलत केली. ती सिद्धीस नआली तो प्रतिनिधी तेथून निघून आपली जहागीर कऱ्हाड तेथें जाऊन राहिला. ते समयीं त्या जहागीरीची वहिवाट त्याची मातुश्री व बळवंतराव फडनवीसनामेंत्या जहागीरीचा मुतालिक यां दोघांही चालविली होती; तो प्रतिनिधी यास ती वहिवाट आपण चालवावयासी इछा होऊन तो वाद बाजीरावाकडे गेला, त्यास पूर्वीच प्रतिनिधीला बलहीन करावा अशी वासना झाली होती, त्यावरून हा समय उत्तम असें जाणून तें काम बळवंतराव फडनवीसानें वहिवाटावें असा ठराव केला; आणि त्या बरोबरच कांहीं फौजेसहित बापुगोखला यास पाठवून त्या प्रतिनिधीला बंदीस घातला. मग तो कलह मिटून त्या मुलखांत स्थिरता झाली,असें पाहून तो गोखला पुण्यास आला, तेव्हां लोकांहीं अटकळ केली कीं इतःपर प्रतिनिधी जन्मभर बंदीतच राहील,परंतु त्याचा योग तसा नव्हता; पूर्वीं त्या प्रतिनिधीची महासाध्वी स्त्री तिजबरोबर त्याचा कांहीं कलह होऊन तिला दूर ठेवून त्याणें आपल्याजवळ एक तेलीण बाळगिली होती; तिणें त्या संकट समयीं कांहीं युक्तीनें वासोटा किल्ला हस्तगत करून,कित्येक लोक चाकरीस ठेवून लहानशी गढी किल्ला मसूर तेथें प्रतिनिधी बंदीस होता,त्या ठिकाणीं जाऊन हल्ला करून त्यास तिणें तेथून मुक्त केला. नंतर त्या प्रतिनिधीनें आपला झेंडा उभा करून लोकांत प्रसिद्ध केलें कीं,मी पंत प्रधानाचा अंकित नव्हे,माझा धनी साताऱ्याचा महाराज. त्यावरून त्याचा मुलखांतील शिपाईलोक व त्याचे संबधी कित्येक मोठेमोठे कुलीन गृहस्थ त्या कडे जाऊन राहिले. त्या योगें कदाचित त्याचा मनोरथ सिद्धीस गेला असता परंतु तो प्रतिनिधी कांहींसा क्रूर असून त्याचा स्वभाव उग्र आणि अत्यंत अविचारी असे, त्यास त्याचा आईचा पक्षाचा अथवा त्या मुतालिकाकडचा कोणी सांपडलाअसता, त्यावर दया नकरितां त्या विषयीं अत्यंत क्रूरपणा करी, त्यावरून तो लोकांचा मनांतून उतरला, आणि खर्चास द्रव्य जमा करावयासाठीं प्रजेस पेंढाऱ्या प्रमाणें

उपद्रव

उपद्रव करूं लागला. असें झाल्यानंतर बापूगोखल्या पुन: फौजेसहित त्यावर जाऊन युद्ध व्हावें असें ठरलें. त्या समयीं त्याचे कोणी पुरातन विश्वासू चाकरलोक यांची समजूत होती कीं, हे समयीं गोखल्यासमोर युद्धास उभें न राहतां, डोंगरांत जाऊन तेथें रामोशी सहाय करून जेव्हांस आपला हात चालेल ते समयीं युद्धप्रसंग करावा, तो प्रकार न एकतां त्याणें वसंत गडाजवळ गोखल्याची वाट पाहिली, नंतर तो गोखला येऊन युद्ध होऊं लागलें असतां, पहिल्याच हल्यामध्यें प्रतिनिधीचे लोक पळून थोडकेसे उरले, आणि तो प्रतिनिधी जातीनेंही लढला; त्या समयीं त्याचा उजवा हात तुटून तो शत्रूचा हातीं लागला; मग बाजीरावाचा राज्याचे समाप्तीपर्यंत त्यास प्रतिबंध होता. त्याचा सर्व मुलुख बापू गोखल्यानें वासोटा किल्ला खेरीज करून, तात्काळ घेतला. नंतर त्या वासोट्यामध्यें नेतीण होती ती आठ महिने लढून शेवटीं तेथचा दाण्याचे कोठीस आग लागल्यामुळें निरुपाय होऊन तिणें तो किल्ला दिला.

या प्रमाणें बाजीरावानें प्रतिनिधीला अगदीं बुडविला, या विषयीं लोकांस असें विदित न वाटावें कीं, आम्हीं केवळ स्वहितार्थच प्रतिनिधीचें सर्वस्व हरण केलें, याकरितां त्याचा मुलुख व त्याची वस्त्रयात्री गोखल्याचे हातीं लागली होती. ती सरकारांत न नेतां त्या कडेसच राहूं दिली. त्या योगें व त्या मुलखाची अमर्याद खंडनी घेतल्यानें, तो बापूगोखला इतर सरदारांपेक्षां थोडक्याच दिवसांत मोठा धनवंत झाला. असें सत्र अठरांत आठांत पडलें.

बाजीराव आपली निर्बाधसत्ता झाली असें समजून मग प्रतिनिधीचा मुलुख बापूगोखल्याकडे होता तो सरकारांत मागूं लागला, आणि पूर्वीपासून त्यास परम प्रिय असें संपूर्ण जहागिरदार यांचा सूड उगवावयाविषयीं त्याचे मनांत होतें तें कृत्य यथास्थित साधावयास उद्युक्त झाला, तेव्हां कित्येक लहान लहान जहागिरदार यांहीं आपली आज्ञा मानिली, असें निमित्त ठेवून, त्यांचीं स्थानें आपल्याकडे जप्त ठेविलीं. या प्रमाणें सर्वांस बुडवायाची त्यास वासना झाली, परंतु तें इंग्लीशांचा भत्ता वांचून घडेना; असें असतांही तो आपल्या मनांतील अर्थ अनेक प्रकारें गोडबोलून लोकांस फसवून कधींकधीं शेवटास नेत असे. त्यांत माधवराव रास्ता यास इंग्लीशांहीं आपल्या कांहीं कामाकरितां फौज पाठवावी म्हणून आज्ञा केली, ती त्याणें न मानिली; त्या योगें तो अपराधी असा ठरवून, त्यास शिक्षा व्हावी असें झालें असतां, बाजीरावानें त्यास समजूत दिली कीं, इंग्लीशांस सांगून तुझें पारिपत्य करणें मजकडे येऊं दे, म्हणजे तुला तमादंड होणार नाहीं; या गोष्टीस तो माधवराव मान्य झाला, नंतर बाजीरावानें त्याचा सर्व मुलुख घेऊ-

न

न त्यास कांहीं उरूं दिलें नाहीं, असेंच आपा देसायी यास इंग्लीशांहीं कांहीं आज्ञा केली असतां त्यांत अंतर करावयाविषयीं त्या बाजीरावानें गुप्त मसलत दिली आणि त्याचेंही पारिपत्य करावयाचें आपल्याकडे घेऊन त्याचा जहागिरीचा चतुर्थांश घेतला.

सदाशिव माणकेश्वर तो श्रीमंताचा पक्ष करून इंग्लीशांशीं वागत असतां त्याणें ते वेळेस कार्नेलक्लोससाहेबाचा वकील फारशी जातीचा कुसरूजी नामें होता त्यासच मोदीही म्हणत, त्याला वश करून आपल्याकडे घेतला, तो, व माणकेश्वर हे दोघे निरंतर एक विचारें वागत असतां बहुत वेळा त्यांही आपल्या कार्यसाधनास भलतीच गोष्ट साहेबाचा मनांत आणून स्वहित संपादावें. असें कित्येक दिवस चाल्लिलें मग सन अठरशें अकरांत त्या कामावर एलफिन्स्तन साहेब येऊन त्या मोदीचें तेज बहुत कमी पडलें, आणि तेच समयीं माणकेश्वर व मोदी यांचाही स्नेहामध्यें कांहीं अंतर आलें. त्यावरून बाजीरावास त्या दोघांचें ऐक्य समजून त्याचा मनांत आलें कीं, हे दोघे आपल्या ऐक्यामुळें कदाचित् माझ्या उपयोगास पडले असतील, परंतु तेच जर विपरीत वर्ती झाले, तर तेंच ऐक्य माझा समूळ नाशास कारण होईल. एशीयास हीच मसलत कीं यां दोघांत वांकडें पाडून मोदी आपणाकडे घ्यावा. असें ठरवून त्याणें मोदीस उत्तम पदवी कर्नाटकची सरसुभेदारी दिली, तेव्हां त्याणें बापूसाने नामें गृहस्थ आपल्या हाताखालीं घेऊन तो पेशव्याकडील अधिकार व इंग्लीशांची चाकरीही, दोन्ही कामें चालविलीं. असें कांहीं दिवस गेल्यावर, सदाशीव माणकेश्वराकडून मोदीचा त्या अधिकार संबंधें अनीति वर्तन प्रकरणीं बोभाट श्रीमंताजवळ आला, तो ऐकून त्यास पुरतें समजलें कीं, त्या दोघांत पक्कें वितुष्ट पडलें. या शिवाय त्या बाजीरावानें आपणास दुसरा एक लाभ कल्पिला कीं, मी यास मोठा अधिकार देऊन आपलासा केला. परंतु त्या एलफिन्स्तन् साहेबानें तो अर्थ सिद्धीस जाऊं दिला नाहीं, कांकीं, साहेबाची चाकरी, व बाजीरावाकडचा अधिकार, हीं दोन्ही कामें एकानेंच करावीं हें योग्य नव्हे, असें त्याचा मनांत येऊन त्या मोदीचें दुसरें कांहीं अयोग्य आचरण पाहून त्याणें त्यास दोहों कामांतून एक टाकावयास सांगीतलें असतां, मोदीनें श्रीमंताकडचा अधिकार टाकिला.

नंतर तो मोदी पुण्याहून दूर करावा असें त्याचें कृत्य साहेबाचा दृष्टीस येऊन त्याला गुजराथेंत वेतन देऊन स्वस्थ बसवावा असें केलें होतें; तेव्हां तो तेथून निघून तिकडे जावयास सिद्ध झाला; अशा संधींत रात्रीमध्यें तो

चित

विषप्रयोगानें मेला गेला. तें विष त्याणें स्वयें घेतलें किंवा, दुसऱ्याचे हातून घात झाला, याचा शोध बहुत केला असतांही सिद्धांत झाला नाहीं.

कर्नाटक सरसुभा त्या मोदीनें टाकिल्यावर, बाजीरावानें तें काम त्रिंबकजी डेंगळ्यास सांगीतलें. नंतर तो मोदी मृत्यु पावल्यावर कांही दिवसांनीं इंग्लीशांशीं वहिवाटीचें कामही श्रीमंतानें त्रिंबकजीस दिलें. तो त्रिंबकजी पूर्वीं श्रीमंत महाडास पळून गेले ते वेळेस जासूदगिरी करीत असे; त्याणें पुढें बाजीरावाचें मन आपणाकडे किती लावून घेतलें तें यावरून समजण्यांत येईल. शेवटीं तो अशी प्रतिष्ठा पावला कीं, पेशव्याचाघरीं त्यावांचून कोणतेंही काम होऊंच नये, असें असतां एके समयीं कोणी सराफ मखतेकरास आर्मीन झाला नंतर त्या मखतेदारापासून सरकार कामांत अंतर पडल्यानें त्या त्रिंबकजी डेंगळ्यास मोठा राग येऊन त्या सराफास ओढून आणिला. तो येतांच त्याचा डोक्यावर त्रिंबकजीनें स्वयें ठोसरा मारिला; तेव्हां त्याचा हातांत मोठमोठ्या सोन्याचा आंगठ्या व जोडवीं होतीं, त्यांचा रट्टा मर्मी लागून तो ब्राह्मण तेथेंच मृत्यु पावला. असा त्या दुष्टापासून अपराध झाला तरी बाजीरावानें त्या विषयीं मनांत किमपि खेद न केला. तो बाजीराव आपलीं अनेक प्रकारचा खर्चाचीं कामें मखत्यानें करवी; तशाच मामलतीही मखत्यानेंच देत असे, त्यावरून त्रिंबकजी तर मखत्यांत अंतर पडल्यास असें शासन करीत असे, तसें चोरीस किंवा हत्येसही करीत नव्हता.

असा कारभार चालत असतां बाजीरावानें पांच कोटि रुपये आपल्याजवळ जमा केले होते; त्यास प्रतिवर्षी राज्यांत उत्पन्न एक कोटि वीस लक्ष रुपये जमा होत असत; त्यांतील पन्नास लक्ष रुपये मागें ठेवून बाकी खर्च करी. तो याज्ञिककर्मांत बहुत प्रीति ठेवून आपण अंगें त्या कृत्यांत शिरून आपल्यास विद्वान म्हणवी; आणि त्याचा बापानें नारायणरावास मारिला म्हणून तो उपद्रव शमनार्थ त्याणें पुण्यास भोंवतीं कित्येक लक्ष आंब्याचीं झाडें लाविलीं; व पंढरपुरचा देवास बहुत द्रव्य दिलें. या शिवाय त्याचा गुरुनें त्यास सांगीतलें कीं, माझा स्वप्नांत नारायणराव प्रत्यक्ष येऊन बोलिला कीं बाजीरावानें लक्ष ब्राह्मण जेऊं घालावे तें ऐकतांच तसें त्याणें केलें.

बाजीराव राज्य करीत असतां त्याणें सन अठराशें चवदांमध्यें. त्रिंबकजीचा मसलतीवरून शिंदे व रघुजीभोंसले यांजकडे वकील पाठवून गुप्त तह केला कीं, तुम्ही व आम्ही एकमत असून, समय विशेषीं इंग्लीशांस

काढून

काढून देऊं. असाच पेशव्याचा मुख्याकडेही आपला वकील निरंतर रहावया स पाठविला. नंतर आपण कोपरगांवीं आऊन पेशव्यांचा कित्येक मुख्यांशीं एकांत केला. ही गोष्ट दुसरे वर्षीं साहेबाचा समजण्यांत आली परंतु त्याचा शोध पुर्तेपणें कळावयाचा उद्योग न झाला, ह्मणून त्या बाजीरावास गादीवरून उठविला नाहीं.

त्या वेळेस इंग्लीशांस घालवून द्यावयाचा बेताखेरीज दुसरी एक त्याची मसलत होती, ती अशी, गुजराथेंत आपलें मुख्यत्व असावें. त्या ठिकाणीं गोविंदराव गाइकवाड अधिकारी झाल्यापासून त्या वेळेपावेतों गाइकवाड पेशवे या दोघांचा देण्याघेण्या संबंधीं हिशेब झाले नव्हते. नंतर बापूसेराळ यास त्या कामाकरितां गाइकवाडानें पुण्यास पाठविला असतां, त्यास बाजीरावानें एक कोटि सुमारें द्रव्य गाइकवाडसरकारांतून आमचें यावयाचें आहे असें समजाविलें. तें देणें तितकेंही झालें असेल, कांकीं, सन अठरांशांचा वर्षीं अमदाबादचा मक्ता ठरला. त्या खेरीज सन अठरांशें चहूंमध्यें गुजराथेंतील दुसऱ्या कांहीं मुलखाचा मक्ता साडेपांच लक्ष रुपये ठरण्यांत आला होता, परंतु बाजीरावाचा बाप रघुनाथराव याचा पक्ष स्वीकारिल्यानें वडोदेकरास विशेष ऋण झालें होतें ह्मणून त्या कोटींतून साठ लक्ष रुपये पेशव्यानें स्वसंतोषें करून त्यांस सोडावे असें कबूल केलें.

तो एवढ्या धार्मिकपणानें वागत असतां त्याचा उपकार मनांत न आणितां वडोदेकर त्याचा मागणीस उत्तर स्थानीं भडोंजचें उत्पन्न पेशवे घेत आले त्यापैकीं आपला भाग राहिला तो व आबा शेलुकराचें बंड मोडिलें त्या कामास खर्च लागला तो, आणि गुजराथेंतील पेशव्याचा मुलखाचा बंदोबस्तास नवी शिबंदी ठेविली, त्या खर्चाचा आकार झाला असेल तो पैका, हें तिन्ही प्रकार मनांत आणून जें तुम्हांकडे फिरलें तें आमचें द्या; असें ह्मणूं लागले. त्यावरून जाचा उलगडा होऊंच नये, असा वाद वाढला आणखीं बाजीरावाचाही मनांत होतें कीं, हा कज्जा लवकर संपवूं नये कांकीं, युक्तीनें इंग्लीश विपरीत वर्तनांत गाइकवाडास घ्यावा याचा कामास वादावांचून जर वकीलांचें जाणें येणें घडेल तर इंग्लीशास संशय वाटेल.

अशीच हैदराबादचा निजामाकडेही बाकी राहिली होती, त्या निमित्तें करून तोही वाद त्या अर्थीं लांबविला. त्या विषयीं; इंग्लीश समजून पाडीत असतां, पेशवा ऐकेना. अशी बाजीरावाची कुटिलवृत्ती बापूसेराळ नामें महाकुलीन यास कळतांच, पेशव्यानें वडोदेकरास लिहिलें कीं, हा वकील या कामास अयोग्य आहे, यास्तव दुसरा कोणी गृहस्थ लवकर पाठवून द्यावा,

ते समयीं वडोद्यात धनी असून राज्यकारभार चालविणारा फत्तेशिंग होता, त्याणें आपल्याजवळ खासगीचा कामावर गंगाधरशास्त्री पटवर्धननामें कारकून ठेविला होता. तो योग्यतेस चढतचढत, त्याचें नाममात्र मुख्यत्व झालें नव्हते. बाकी सर्व कामाची वहिवाट तो करी; त्याला पुण्यास पाठवावयाचा निश्चय करून त्या फत्तेशिंगाचा मनांत हिशेबाचा गोष्टी खेरीज, दुसरें काम करून घ्यावयाचें होतें कीं, गुजराथेंतील पेशव्याचे महाल जे आपण मक्त्यानें घेतले आहेत, तत्संबंधीं मुदत भरली यासाठीं पुनः मक्ता कबूल करावा, या प्रमाणें नेम होऊन गंगाधरशास्त्री यास योजून त्यावर त्रिंबकजी डेंगळ्याकडून एखादाअनर्थ न पडावा अशा अर्थें त्या गाइकवाडानें इंग्लीशांचें अभयवचन घेऊन शास्त्रीबावाला पुण्यास पाठविला. नंतर त्या दोन्ही गोष्टींतून एकही सिद्धीस जात नाहीं, असें पाहून तो शास्त्री याणें मनांत ठरविलें कीं, हीं दोन्ही कार्यें साहेबास सोंपऊन आपण माघारें जावें. यावरून पेशवा व त्रिंबकजीडेंगळा या उभयतांहीं शास्त्री याचा विशेषमानआरंभिला कांकीं, तीं कामें जर साहेबाकडे जातील तर वडोदेकराशीं व आह्माशीं बोलण्याचा प्रकार चालतोहे तो बंद होईल. असें समजून शास्त्री वश करावयाचे मसलतीनें प्रथम त्यांहीं तो माघारा जावयास मुहूर्त योजित होता तो टाकवून दुसऱ्या मुहूर्तानें त्याचें जाणें व्हावें असें करून त्यास राहून घेतला. मग ती वेळा येई तोंपर्यंत त्रिंबकजी डेंगळ्यानें त्याची अशी स्तुती केली कीं, तुह्मी या कामास बहुत योग्य आहांत, आणि श्रीमंतही तुमची योग्यता जाणून तुह्मास मुख्यत्वें कारभार द्यावयास इछितात. असें त्रिंबकजींचें बोलणें त्याला सत्य वाटावें ह्मणून बाजीरावही त्यास बोलूं लागला कीं, तुमचा पुत्रास आमची मेहुणी पुंडरीकनायकरास्ते यांची नात देणार.

अशा युक्तीनें शास्त्री याचें मन मोहित करून आपण पंढरीचे यात्रेला जाते समयीं त्यासही बरोबर नेला. ते वेळेस पुण्यामध्यें बापु मैराळ होता त्याणें त्यास नाना प्रकारें समजाविलें कीं, हे समयीं तुह्मी श्रीमंतांबरोबर यात्रेस जाऊं नका; ही माझी मसलत ऐकावी नाहीं तर मला आपल्या बरोबर न्यावें. असें त्या मैराळानें ह्मटलें असतां तो शास्त्री कालपाशबद्ध होत्साता, त्याणें तें हितवाक्य एकही मानिलें नाहीं. नंतर पंढरपुरीं जाऊन जुलाईचे चवदाव्या तारिखेस (सन १८१५) तो गंगाधरशास्त्री याणें त्रिंबकजीडेंगळ्याशीं संकेत केला कीं, आज रात्रीस आह्मी भोजन केल्यानंतर तुह्मासहित देवदर्शनास जाऊं, या प्रमाणें तेचरात्रीस श्रीमंताचे पंगतीस त्याचें भोजन होऊन तो देवदर्शनास जाणार होता, मग तो संकेत समय जवळ आला तों त्याचा शरीरास कांहींसें असमाधान होऊन त्रिंबकजीडेंगळ्यास सांगून

न

न साठविलें कीं, हे समयीं माझ्यानें येववत नाहीं. परंतु त्यास त्रिंबकजीनें अत्याग्रह करून बोलाविलें; म्हणून त्याचा भिडस्तव बरोबर हत्यारें रहित थोडकेसे लोक घेऊन देवास गेला. नंतर दर्शन करून त्रिंबकजीशीं कांहीं गोष्टी बोलून तेथेंच माडीवर श्रीमंत बसले होते त्यांजपाशीं जातांच त्यांची सुप्रसन्नता पाहून तो शास्त्री आणि तो पंढरपुरकर यांचीं आनंदमय भाषणें होऊन मोठ्या संतोषानें श्रीमंतांची आज्ञा घेऊन तो गंगाधरशास्त्री तेथून निघून आपले घरीं जात असतां, तीनशें साडेतीनशें पावलें चालून गेल्यावर, रस्त्यामध्यें अकस्मात कोणी हत्यारबंद असे मारेकरी येऊन त्याचे तुकडे तुकडे केले.

असें दुष्कर्म कोणीं केलें तो शोध इंग्लीशांचा वकील करूं लागला असतां, बाजीराव व त्रिंबकजी डेंगळा हे दोघेही आपल्या अंगीं लागूं देईनात परंतु सर्व लोकांचा मनें असें ठरलें कीं, हें त्रिंबकजीचेंच कर्म आणि त्या मारेकऱ्यांनींही त्याचेंच नांव सांगीतलें, नंतर तो निःसंशय अन्यायी असा समजून साहेब बाजीरावास म्हणूं लागला कीं, त्या त्रिंबकजीला धरून आमचा स्वाधीन करा तें त्याणें बहुतवेळ पर्यंत ऐकिलें नाहीं. शेवटीं त्यास न दिला तर युद्ध करावें लागेल, असें समजून सप्टेंबरचे पंचविसावे तारिखेस तो इंग्लीशांचे स्वाधीन केला. मग त्यांहीं त्यास मुंबईजवळ ठाण्याचा किल्ल्यांत ठेविला. तो दुसऱ्या वर्षाचे सप्टेंबरचे बाराव्ये तारिखेपर्यंत त्या बंदींतच राहिला; नंतर ते दिवशीं चार पांच घटका रात्र झाली असतां, तो आपला वेष बदलून बाहेर त्याचे सहाय आले होते त्यांत मिळून त्या बरोबर पळून जाऊन, नाशिक व संगमनेर एथचे भिल्ल व रामोशी यास मिळून आश्रय पावला. मग खानदेश व बागलाण व सातान्याजवळ शंभूमहादेवाचा डोंगर, याचा आसमंतात राहिला असे; परंतु जा जा ठिकाणीं शिवाजी महाराज याणें महत्व संपादिलें होतें, तेथें जावयास भीत असे. तिकडचे लोक यांस तेव्हांही शिवाजीचा गुणाचें फार स्मरण असून त्याचा वेश्यचतुरंगि तो त्रिंबकजीनें धरून कैद केला तेंही ते आठवीत होते, यास्तव जर तो तेथें जाता तर तात्काळ मारिला गेला असता.

* बाजीरावानें गंगाधरशास्त्री यास मारविला असें पूर्णपणें त्याकडे लागू झालें नाहीं. परंतु तें कर्म झाल्यावर त्याचा मनास चांगलें वाटलेंच, आणि त्रिंबकजी डेंगळा ठाण्यांत बंदीस असतां तेथें पहारा त्यास जे साहेब असत त्याशीं भाषण करितां करितां त्याणें कित्येक वेळा सांगीतलें कीं, मी आपल्या धन्याचे आज्ञेप्रमाणें वागलों.

तो चतुरशिंग पुण्याची लढाई झाल्यानंतर होळकर व अमीरखान व रजपूत यांचा आश्रयानें मुलुखांत त्याच्या घालीत असे; मग सन् अठराशें बारांत तो खानदेशांतून आपल्या मुलुखास येत होता तेव्हां त्रिंबकजीनें त्याला भेटीस बोलावून कपटानें कैद करून कांगोरी किल्ल्यावर ठेविला, तो सन् अठराशें अठराचा एप्रिलांत मृत्यु पावला. त्याचा भाऊ शाहू नामें असे. तो त्याचे अगोदरच सन अठराशें आठाचा मे महिन्याचे तिसरे तारिखेस सातान्यांत मेला; त्याचे जागीं त्याचा पुत्र प्रतापसिंह नामें स्थापिला. तो अद्यापि तें राज्य करीत आहे.

त्रिंबकजी डेंगळा गेल्यावर पेशव्याचा कारभार सदाशिवभाऊ माणकेश्वर पुनः चालवूं लागला; त्यास मोरोदिक्षित वसईकर व चिमणाजी नारायण हे दोघ सहाय होते. ते वेळेस पेशव्याचे दरबारी लोक व इंग्लीशांचा वकील यांशीं अति स्नेह आहे असें लोकांस दिसून आलें, परंतु निश्चितार्थ तर बाजीरावाचा मनांत अनेक प्रकारें दगे करावयाची मसलत होती; त्यांत त्याणें होळकर व शिंदे व नागपुरकर भोंसले व पेंढारी यांशीं पत्रद्वारें ऐक्य ठेवून गुप्तपणें त्रिंबकजीला पैका पाठवून अनेक ठिकाणीं लोक ठेवावयाची आज्ञा दिली असे; आणि पुण्यामध्येंही आपण कित्येक फोज ठेवूं लागला हें सर्व वर्तमान साहेबास कळून तो त्या कारभारी लोकांस म्हणे कीं, तुमची दग्याची मसलत आहे. त्यावर ते उत्तर करीत कीं, हें दगा करणें किमपि नाहीं; आणि बाजीराव पेशवा तर नुकताच फुलगांवीं त्रिंबकजीला भेटला असून, सांगे कीं, आम्हास त्रिंबकजीचा ठिकाणा नाहीं. असें त्याचें कुटिल वर्तन बहुत वेळ चालिल्यानें ती मसलत सिद्धीस जाऊन कदाचित अनर्थ होईल असें पाहून साहेबानें बाजीरावास स्पष्ट सांगीतलें कीं, आजपासून एका महिन्यांत त्रिंबकजी डेंगळ्यास आणून द्याल तर तुमचा व आमचा स्नेह राहील.

असें होऊन इंग्लीशांचें लष्कर जमूं लागलें. तें भय मानून बाजीरावानें त्रिंबकजी डेंगळ्यास धरून आणावयाविषयीं जाहीरनामा लावून सिंहगड व पुरंदर व रायगड हे तीन किल्ले डेंगळ्या येईतोंपर्यंत इंग्लीशांचा स्वाधीन मागीतल्याप्रमाणें ठेविले. या शिवाय पेशव्याचा व इंग्लीशांचा ते समयीं नवा तह झाला, त्यांत विशेष इतकाच कीं, पेशव्यांहीं इतःपर गाईकवाडास कांहीं मागूं नये, आणि जी बाकी राहिली आहे ती बदल साडेचार लाख रुपये गाईकवाड प्रतिवर्षीं देतील ते घेत जावे; व अमदाबादेचा मक्त्याचे साडेचार लक्ष रुपये पेशव्यानें गाईकवाडा

पासून

पासून घ्यावें. व वसयींचा तहांत असें ठरलें होतें कीं, पांच हजार स्वार व तीन हजार पायदळ इंग्लीशांचा कामास बाजीरायानें ठेवावें, त्या बद्दल चवतीस लक्षांचा मुलुख पेशव्यानें इंग्लीशांस द्यावा; या खेरीज आमेद नगरकिल्ला व नरमदेच्या पलीकडची जितकी पेशव्याची प्राप्ति असेल तितकी इंग्लीशांहीं घ्यावी, आणि माधवरावरास्त्याची जहागीर बाजीरावानें उगीच जप्त केली होती ती त्यास माघारी द्यावी.

असें पुण्यांत ठरल्यावर बडोद्याचा गाईकडास पहिल्यापेक्षां विशेष लाभ झाला त्याशीं इंग्लीश वाकर साहेब याणें तहकरून संन् अठराशें पांचात ठरविलें कीं त्याणें इंग्लीशांचीं तीन पलटनें व एक गोलंदाजाचीकंपनी आपल्याजवळ बाळगून त्याचा खर्च आपण चालवावा; या शिवाय हे समयीं आणखी एक पलटन पायदळ व दोन पलटनें स्वारांचीं नवीं ठेवावीं असें ठरलें.

संन् अठराशें पंधरापर्यंत पेंढारी यांचा बहूत उपद्रव झाला.* व अमीरखानाचे पठानही मुलुखांत मोठा दंगा करीत असत, तेव्हां कलकत्याचा गवरनर जनराल साहेब याणें निश्चय केला कीं या सर्वानर्थांचा उपशम करून दक्षिण मुलुखीं बंदोबस्त नीट रक्षावा.

या साठीं शिंदे व होळकर व नागपुरकर वगैरे हिंदुचा मुलुखांतील सर्व मोठे मोठे यांस कळवावें कीं आह्मीं हें कार्य करितों यास तुमची सहायता असावी. या प्रमाणें केल्यास जो सिद्ध न होईल तोच या अर्थाचा घटक शत्रू असा जाणावा.

मग ही गोष्ट प्रसिद्ध करीत असतां, मुंबईचें व मद्रासचें व कलकत्याचें या तिहीं लश्करांची तयारी होऊन यांतील कित्येकांहीं जाऊन ते बहुतेक पेंढारी मारिले, वरकड लश्कर त्या साहेबानें कार्योपयोगी कल्पिलेलीं ठिकाणें धरून. त्याचे आज्ञेची मार्गप्रतीक्षा करीत राहिले.

पुढें या उद्योगाचें असें सार्थक झालें कीं, नागपुरांत रघुजी भोंसला मृत्यु पावल्यावर तेथचा कारभाराची वहिवाट ❋ व्यंकोजी मन्या बापूच्या पुत्र मु-

* पेंढारी यांचा उपद्रव इंग्लीश व निजाम याचे मुलखीं विशेष होता म्हणून बाजीरावाचें व ते पेंढारी याचें एक आहे असा इंग्लीशांस संशय न व्हावा याकरितां त्याणें आपल्या लश्कराचाएकभाग कोंकणांत पाठवून त्यांहीं आपणास पेंढारी असें म्हणून आपलाही मुलुख लुटावयाची आज्ञा दिली त्या वरून त्या लोकांहीं तसेंच केलें.

❋ रघुजीभोंसला संन् अठराशें सोळाचा मार्च महीन्याचे बावीसाव्या तारिखेस मृत्यु पावला; त्याचें आसन त्याचा पुत्र परसाजी भोंसला यास प्राप्त झालें, परंतु तो अल्पबुद्धी यास्तव

धोजी

धोजी याणें मुख्यत्वें चालविली, आणि तो इंग्लीशास अनुसरून त्याणें आपल्ये मुलुखीं त्यांचीं पलटणें बाळगावयाचें कबूल केलें. तसाच भोपाळच्या नबाबही इंग्लीशांचा सहाय झाला. शिंदा व अमीरखान हेही कलकत्याचा गवरनर जनराल साहेब याचे आज्ञेप्रमाणें वागूं लागले. तेव्हां साक्षात्कारें दिसण्यांत आलें कीं हा बंदोबस्त सिद्धीस जायील, परंतु नागपुरकर व शिंद्याचीं चित्तें आंतून बाजीरावाकडे होतीं, तें कापटय साहेबास विदित होऊन त्याणें त्याच वक्रशींत अंतर केलें.

---

मन्याबापूचा पुत्र मुधोजी याणें तेथचा कारभाराची वहीवाट मुख्यत्वें चालविली, त्यास आपासाहेब ह्मणत.

## सन् अठराशें सत्रांच्या आरंभापासून समाप्तिपर्यंत झालेलीं वर्तमानें मिळून भाग तेहेतिसावा.

## अनुक्रमणिका.

बाजिरावपेशवा व बापूगोखला यांणीं एकमतें इंग्लिशांच्या नाशाविषयीं मसलत केली.

इंग्लिश व पेशवे यांच्या स्नेह तुटून पुण्याजवळ युद्ध झालें.

कोरेगांवची लढायी.

बापूगोखला अस्याजवळ इंग्लीशांवर हल्ला करून मृत्यु पावला.

नागपुरकरांचें कृत्य.

सीताबल्डीजवळची लढायी.

नागपुरकर आपासाहेब तो इंग्लीशांशीं स्नेह करून आपल्ये गादीवर बसला.

चितूपेंढारी यास होळकरानें आश्रय दिला यास्तव मेहदपुरापाशीं होळकराची व इंग्लीशांची लढायी झाली.

मग तो होळकर शरण येऊन त्याचा व इंग्लीशांचा तह झाला.

पेंढारी यांचे मुख्य सरदार इंग्लीशांहीं धरिले.

सेवनीपाशीं बाजिरावाची व इंग्लीशांची गांठ पडली.

आपासाहेब पुनः गादीवर बसल्यानंतर कसकसा वर्तला तें.

बाजिरावपेशवा इंग्लीशांचे हस्तगत होऊन, त्यांहीं त्यास ब्रह्मावर्ती ठेविला.

मराठीराज्य इंग्लीशांहीं घेतल्यानंतर कसकसा बंदोबस्त केला तें प्रकरण.

## भाग तेहेतिसावा.

सन् अठराशें सत्रांच्या जुलायीमहिन्यांत बाजिरावपेशवा पंढरपुरचे यात्रेस गेला तो तेथून कृष्णा वेकोबीं माहुलीक्षेत्रीं येऊन त्या जागीं सप्तेंबराचे समाप्तिपर्यंत राहिला. त्याणें इंग्लीशांशीं विपरीत वागणुकेविषयीं नाना कल्पना केल्या होत्या त्या त्या सिद्धीस न्यावयाच्या विचारांत अवसरीं करीत होता. त्याचे मसलतींत बापूगोखला मुख्य आला असे त्यास बाजिरावानें लिहून दिलें कीं, मी तुझा मसलतीवांचून चालणार नाहीं; आणि त्याचा मनोद-

[illegible]

यानुरूप त्याची सर्वकामें शेवटास न्यावयाचेंही कबूल केलें. नंतर त्या उभयतांचा मनें विचार ठरला कीं, आपली सर्व तयारी झाली ह्मणजे प्रसिद्धपणें एकाएकीं इंग्लीशांवर हल्ला करावा. ही गोष्ट सातारच्या राजा यास विदित करून त्याचा परिवारसुद्धां त्याला वासोट्या किल्यावर ठेविला. इतकें होई तोंपर्यंत त्याणें आपल्या राज्यांतील बहुतेकां किल्यांवरून संपूर्ण युद्धसाहित्य यथास्थित भरून सिद्धता केली. याखेरीज शिंदे व होळकर व नागपुरवाले यांजकडे वकील पाठविले. यानंतर अकटोबराचे एकोणिसाव्ये तारिखेस दसरा पडला; त्याचा समारंभ फार उत्तम झाला, त्या दिवसापासून पुण्यामध्यें पेशव्याची फौज पुष्कळ जमा होऊं लागली, ते लोक गारपिरावर इंग्लीशांची छावणी होती तिचा सभोंवतें केवळ निकट उतरले.

ते वेळेस इंग्लीशांच्या लष्कराचा मोठा भाग घोडनदीहून कोठें दूर गेला होता ह्मणून पुणें मुकामीं इंग्लीशांचे लोक होते ते फार थोडे असें दिसून आलें; परंतु त्यांचे कुमकेस मुंबईहून एक गोरे लोकांचें पलटन पुण्यांवर जात होतें तें वर्त्तमान पेशव्यास कळून त्याची मसलत होती कीं, तें येऊन पोंहचलें नाहीं तोंच, कोणे एके रात्रीस त्या इंग्लीशांच्या पलटनांवर अकस्मात छापा घालावा. मग अठ्ठाविसाव्ये तारिखेस तोफाना वैलजुंफून स्वार व पायदळ सिद्ध होऊन मध्यरात्रीस पेशव्याचे आज्ञेनें पुण्याचे दक्षिणेस उभे राहिले होते, ते समयीं इंग्लीशांच्या छावणींतील कोणाएकासही तें वर्त्तमान कळलें नाहीं, ह्मणून ते सर्व लोक गाढनिद्रानिमग्न झाले होते; परंतु संगमावर एल्फिनस्टन साहेब होता त्यास तो सकळ वृत्तांत कळला. तेव्हां त्याणें आपल्या माडीवरून कानवसा घेतला असतां, त्यास त्यां लोकांची मोठी गडबड आहे असें समजलें; तेव्हां प्रथम त्याचा मनांत आलें कीं, आपले लोक सावध करून आपणच त्यांवर एकाएकीं चालून जावें, मग दुसरें त्याचा मनांत आलें कीं, युद्धाचा उपक्रम आधीं बाजीरावाकडून व्हावा. इतक्यांत त्याचा जासुदानीं येऊन सांगीतलें कीं, ते लोक काहीं मसलतीस गुंतले आहेत, आणि ती गडबडही कांहिंशी कमी झाली असें त्या साहेबास वाटलें ह्मणून त्याणें आपल्या छावणींच्या लोकांस सावध न करितां ती रात्रि तशीच जाऊं दिली. नंतर दुसरे दिवशीं ते छावणींचे लोक सावध झाले असें समजून बापूगोखला तात्काळ छापा घालणार होता परंतु बाजीरावानें पूर्वीपासून केलेली मसलत चालत आली होती कीं, ते छावणींचे पलटनी लोकही कांहीं द्रव्य देऊन वश करावे तो अर्थ पुरतेपणें सिद्धीस न्यावयाकरितां त्याणें गोखल्यास आज्ञा द्यावयाविषयीं विलंब केला; असें होतां ती दुसरीही रात्रि गेली, मग तिसरे दिवशीं मुंबईहून निघालेलें

लेले गोरे लोक (ते पेशव्याचा मनें अजून दूर असतील) त्यांहीं मोठमोठ्या मजला करून ते दिवशीं तिसरेप्रहरीं छावणीचें ठिकाण आटपलें. नंतर ती जागा शहराच्या सान्निध्यें करून संकोचित यास्तव आपल्या लोकांस हितकारक नव्हे, असें समजून तें स्थान टाकून खडकीच्या पुलाजवळ मोकळे जागीं जाऊन प्रशस्तपणें उतरले. असें नवेंबराचे पहिले तारिखेस वर्तमान झालें.

नंतर एलफिनस्तनसाहेबानें एक पलटन व कित्येक मराठे स्वार घोड नदीवर होते त्यांस बोलाविले तें ऐकून इतःपर विलंब कामाचा नाहीं असें पेशव्याकडे ठरलें. त्यावरून त्याच महिन्याचे पांचव्ये तारिखेस तिसरेप्रहरीं पेशव्याचे लोक शहरांतून बाहेर निघोन युद्धास येऊं लागले. तेव्हां त्या शहराजवळ जितक्या उंच जागा तितक्यांवरून पायदळाचा थाट जमला, आणि मैदानांत जिकडे तिकडे स्वारांची दाटी झाली; ते समयीं त्या शहराकडे पाहिलें असतां, पाण्याचे धारेसारिखी तिकडून येणारे स्वारांची अतूट रघ पडली होती. तें सर्व वर्तमान इंग्लीशांस विदित झालें, त्यावेळेस त्यांचे सवातीनहजार+ पायदळमात्र असतां; त्यांची मसलत ठरली कीं, मराठे आपणावर येऊन पडले नाहींत तोंच, आपण पुढें होऊन त्यांवर हल्ला करावा. तेव्हां ते आपल्या तळाच्या रक्षणार्थ सुमारें पांचशें लोक ठेवून बाकीचे सर्व तें ठिकाण सोडून पुढें पाऊणकोस सरल्यावर दोहींकडून युद्धारंभ झाला. ते समयीं प्रथम मराठ्यांच्या तोफा व बाणांचा मार चालू होऊन मग गोखल्यानें आपले सहा हजार निवडक स्वार जरीपटक्या बरोबर ठेविलेले त्यांस इंग्लीश उभे होते त्यांचा डाव्या बाजूच्या पलटनावर जावयास नेमिले. ते वेळेस ते पलटनी लोक याणीं पेशव्याचे कोणी कवाइत शिकलेले पायदळलोक होते त्यांवर जाऊन त्यांस पिटून आपल्या बंदोबस्तांत काहीं न्यूनता झाली होती, परंतु ते आपणावर शत्रु मोठ्या वेगानें येतो असें पाहून, तात्काळ समयविशेषानुरूप बंदोबस्तानें उभे राहिले. मग ती मराठ्यांची निवडक टोळी त्या इंग्लीशांचे उजव्ये बाजूकडून वेगानें त्यांवर निरकस चालून येताना त्यांचा व इंग्लीशांचा परस्परें भडमार होत असतां ते स्वार केवळ समीप आले तेव्हां, त्या पलटनी लोकांहीं एकदांच भडमार केला व त्या जागीं दैवयोगें करून मोठा चिखलही होता त्यामुळें, घोड्यांस त्यांतून जावयाचें मोठें अवघड पडून एकमेकांवर पडत पडत त्यांतील थोडकेसे मात्र त्या पलटनापर्यंत पोहचले व तरकडी स्वारां-

+ पूर्वी पेशव्यानें एका पलटनासहित फोर्डसाहेबनामें इंग्लीश आपले चाकरीस ठेविला तो खडकीच्या पुलाजवळ छावणी करून राहिला असे; तो युद्धप्रसंगीं इंग्लीशांस मिळाला तेव्हां सवातीनहजार इंग्लीशांचें पायदळ जमलें.

चों

ची उधळा उधळी झाली; त्यांतील कित्येक इंग्लीशांचा पाठीमागून जाऊन त्यांना छावणीकडे वळले परंतु तेथें त्यांच्या मोठ्मोठ्या दोन तोफा होत्या त्यांच्या मार पाहातांच, त्याहीं तो बेत टाकिला. नंतर इंग्लीश त्याहून पुढें सरले असतां, पेशव्याचें लोक जें ठिकाण धरून उभे होते, त्यांहीं तें युद्ध सोडून आपल्या तोफांस बैल जुंपून शहराकडे चालिले. त्यांमागें इंग्लीश कांहींसे त्यांस घालवीत जाऊन, मग रात्रीच्या अंधार पडूं लागला ह्मणून त्यांची पाठ सोडून माघारे आपल्या छावणीस आले.

तें युद्ध अगदीं स्वल्प झालें याचें कारण असें असेल कीं, बाजिराव पेशवा व बापूगोखला यांहीं इंग्लीशांचे पलटनी लोक आपणांस अनुकूळ आहेत, ते एकही गोळी नमारितां, मुकाट्यानें त्या युद्धसमयीं आह्मामध्यें येऊन मिळतील; असें आपल्या सर्व लोकांस सांगीतलें होतें; मग त्यांचें विपरीत वर्तन पाहून ते परम विस्मय पावले, याखेरीज ते लोक युद्धास पुण्यांतून बाहेर पडतांना, त्यांच्या जरीपट्क्याची काठी कांहीं धक्का लागून मोडली; तो त्यांस मुळींच अपशकुन झाला.

त्याप्रसंगीं पुण्यांत बाजीरावाजवळ राहिलेल्या लोकांखेरीज, मराठी लश्कर अठ्रा हजार स्वार व आठ हजार पायदळ होतें; त्यापैकीं मेले व जखमी मिळून सुमारें पांचशें पडले, आणि इंग्लिशांचे मेले व जखमी मिळून आयशीं निरुपयुक्त झाले.

नंतर दुसरे दिवशीं प्रातःकाळीं घोड नदीहून इंग्लीशांचें एक पलटन व कित्येक स्वार येऊन पोंहचले, तेव्हां गोखला युद्धास पुनः उभा राहीनासा झाला. त्यावर आठ दिवसांनीं इंग्लीशांचें लश्कर जें जनराल स्मित साहेबाबरोबर दूर गेलें होतें तेंही येऊन मिळालें असतां, तो साहेब दुसरे दिवशीं हल्ला करणार होता त्यावरून बाजीराव पेशवा पुणें सोडून साताऱ्याकडे पळाला. त्याचे पाठीस स्मित साहेब लागला असतां, तो तेथून निघून पंढरपुराकडे गेला; तेव्हां त्याणें वासोट्याहून साताऱ्याच्या राजाही, आपल्या बरोबर पळवावयास आणविला. तो त्यावाटेंतच येऊन त्यास मिळाला. नंतर पेशवा जुनराकडे जाऊन बामणवाडींत कांहीं दिवस राहिला असतां, तेथें कित्येक लोकांसहित त्रिंबकजी डेंगळाही येऊन दाखल झाला, इतक्यांत उत्तरेकडे स्मित साहेब आला असें समजून तो पेशव्या आपल्या मंडळासुद्धां तेथून दक्षिणेकडे पळाला. त्यावरून वर्तमान उठलें कीं, बाजीराव पुण्यावर हल्ला करावयास येणार; ह्मणून कर्नेल बर साहेब जो ते समयीं पुण्यांत मुख्य होता त्याणें घोड नदीहून पहिल्या रेजमिंटाचें दुसरें पल-

टन आपल्या कुमकेस बोलाविलें (त्या पलटनास हल्लीं सेकंदग्रेनेदेर असें ह्मणतात) ती पलटन पांचशें बंदुकांची व तिजवरोवर पंचवीस गोरे गोलंदाजसुद्धां दोन तोफा, व नवे ठेविलेले तीनशें मराठी स्वार, इतक्यां सहित सनअठ्राशें सत्रांचा शेवटल्या दिवशीं रात्रीस आठ वाजतांना निघून सारी रात्र चालून सकाळीं दहा वाजतांना, भीमेचे कांठीं कोरे गावांवर पोहचले. तेथें नदीपलीकडे पंचवीस हजार स्वार व पांच हजार पायदळासहित, पेशवा उतरला होता, त्यास पाहून त्या पलटनाचा मुख्य कप्तान स्टांतन् साहेब याणें, त्या ओसाड पडलेल्या कोरे गावांमध्यें आश्रय धरिला. तोंपर्यंत बापू गोखला व आपा देसायी निपाणकर व त्रिंबकजी डेंगळा यांचा ससलतीनें आरब व गोसावीं यांच्या तीन टोळ्या नदी उतरून तिहींकडून इंग्लीशांचा नाशार्थ त्या गावांवर जाऊं लागल्या. तो उद्योग शेवटास न्यावयाकरितां त्यांचा कुमकेस दोन तोफा सुरूकरून बाणांचाही मार चालविला. नंतर त्या गावांचा रस्त्यांत उभयपक्षी लोक झटून मोठ्या निकराचें युद्ध झालें. तेव्हां त्या कित्येका रस्त्यांतून आरबांहीं इंग्लीशांस बाहेर घालविलें, व त्या त्या बाटानीं इंग्लीशांही नेटानें शिरून, त्या आरबांसही बाहेर काढिलें; असें त्या गावांत जागोजाग बहुत वेळां झालें. शेवटीं त्या गावांचे मध्यभागीं एक गढी सारिखी जागा होती ती त्या साहेबास नकळतां रिकामी राहिली, तींत आरब शिरले, तेव्हां त्यांस बाहेर काढितां येईना; इतकें होई तोंपर्यंत मराठ्यांचे स्वारही येऊन त्या गावांसभोंवते जमले, त्यामुळें नदीची वाट बंद होऊन इंग्लीशांचा लोकांस पाणी मिळेनासें होऊन, ते फार हैराण झाले. तोंपर्यंत इंग्लीशांचा दोन तोफा टेंकडीवर ठेविल्या होत्या त्या मोठ्या उपयोगी पडल्या, परंतु त्यांचे साहेबसरदार व बहुतेक गोरे गोलंदाज मेले गेले असें पाहून त्या आरबांनीं सवेग चालकरून त्यांतील एक तोफ घेतली. तेसमयीं त्या पलटनाचा पेटीसन्नामें साहेब असे त्याणें फार शौर्य केलें, त्याचा उरास गोळी लागून पाठींतून पार होऊन त्या जखमेनें मूर्छितसा पडला; तो तें वर्तमान एकतांच आपल्या जवळचे लोक होते ते त्वरित जमाकरून आपल्या हातीं उफराटी बंदुक घेऊन, त्या आरबामध्यें घुसून कित्येकांस बंदुकेचा दस्त्यानेंच ठार मारितमारित त्याणें ती तोफ माघारी घेतली. त्या संधींतच त्याचे छातींतून दुसरी गोळी पार होऊन तो निरुपयुक्त होत्साता भूमीवर पडला. याप्रमाणें तें युद्ध अस्तमानपर्यंत झालें असतां, रात्रीचा आरंभीं मराठ्यांकडून काहीं सैहलकें पडलें; तेव्हां त्यांस पाणी मिळावयाजोगा अवसर सांपडून, मग नऊ वाजतां मराठे अगदीं युद्ध सोडून गेले. दुसरे दिवशीं उजाडतांनां, मराठ्यां-

स्वें

ें लश्कर दक्षिणेकडे निघून जातें असें दृष्टीस पडलें ते समयीं प्रातन्साहेबा-नें त्यांवर आपल्या दोहों तोफांचा मारा चालविला असतां, त्यांतील कोणी माघारा न फिरतां ते सर्व निघोन गेले. तेव्हां तो साहेब आपल्या सामर्थ्याप्रमाणें आपले पडलेले जखमी लोक नेववले तितके त्या दोहीं तोफांसुद्धां बरोबर घेऊन, माघारा घोडनदीस गेला. त्या लढाईंत इंग्लीशांचे मेले व जखमी मिळून एकशें छप्पन शिपाई, व वीस गोरे गोलंदाज पडले. इतकें होऊन तो उरांतून दोन गोळ्या पार झालेला पेटीसन साहेब आपल्या तळावर पोंहचल्यानंतर मेला. त्याशिवाय दुसरे दोघे साहेब त्या लढाईंत मृत्यु पावले व दोन जखमी जाले, आणि नवे ठेविलेले मराठे तीनशें त्यांपैकीं दीडशें उरले वरकड काहीं मेले व कित्येक जखमी झाले व काहीं पळाले. मराठ्यांचे सुमारें पांच सहाशें पडले.

बाजीराव पेशवा याजवळ इतका बंदोबस्त असतां, तो कोरेगांव सोडून गेला याचें कारण काय, असें कोणी ह्मणेल तर समजावें कीं, जनरल स्मित साहेब त्याजवळ पोंहचला. मग तो पेशवा तेथून दक्षिणेस गेल्यावरतिकडच्याही मुलुख मद्रासेच्या लोकांहीं घेतला असें त्यास कळून, तो सालप्याच्या घाटानें सोलापुरास जाऊन राहिला, आणि तेथची कित्येक खंडनी घेतली. नंतर नागपुरकराचा गणपतराव सुभेदारही त्यास मिळून पंढरपुरास जावयाचा बेत झाला. तेव्हां पेशव्या बरोबर बापू गोखलाही होता.

असें असतां फेब्रुआरीचे एकोणिसाव्ये तारिखेस त्या गोखल्यासहित बाजीराव आष्टेगांवीं जाऊन उतरला असतां, जनरल स्मितसाहेब एकाएकी येऊन पोंहचला असें वर्त्तमान त्यास समजलें असतां, त्याणें गोखल्यास गेर्पेकरून निरोप पाठविला कीं, तुह्मीं आमचें रक्षण कोणे प्रकारें करितां, व आत्यांवर छापा कसा पडला तें सांगा. तेव्हां गोखल्यानें उत्तर दिलें कीं, हे समयीं तुमची पाठ संभाळण्यांत चुकणार नाहीं. असें सांगीतल्यावर त्याणें आपा देसाई निपाणकर याचे चार हजार लोक आपल्या पाठीमागें रक्षणास ठेऊन, आपण पांचशें स्वारांनिशीं इंग्लिशांची वाट पहात राहिला.

ते समयीं त्या स्मितसाहेबाजवळ स्वारांचीं काळीं पलटनें दोन व गोरें पलटन एक, व थोडे जुंपिलेल्या काहीं तोफा; इतकेंमात्र होतें, आणि त्याचें पायदळ मागें राहिलें असे. मग त्या उभयपक्षीं गांठ पडली असतां मराठ्यांहीं बंदुकांचा मार चालविला आणि त्या गोखल्याचे दृष्टीस पडलें कीं, ओढ्यानें अडचणीनें इंग्लीशांचें पलटन बंदोबस्त रहित येत आहे, ह्मणून तो तीनशें लोकांनिशीं वेगें करून त्यांवर चालिला. त्यामुळें त्या पलटनाची काहीं अव्यवस्था

झाली,

झाली, परंतु तेच वेळेस गोरे पलटनाची टोळी त्या उभ्या पलटनाचे पाठीमागून मोठ्या वेगानें जाऊन, एकीकडून त्या मराठ्यांमध्यें शिरून गोरख्यास ठार मारिला. नंतर इंग्लीश त्या लोकांचे पाठीस लागला असतां, त्यांचें कित्येक सामान व कित्येक हत्ती व घोडेही त्यास सांपडले. त्यांत विशेष इतकाच कीं, साताऱ्याच्या राजा आपल्या परिवारासुद्धां इंग्लीशांच्या हातीं लागला.

पुण्यांत बाजीराव पेशवा याणें इंग्लीशांशीं सकृत्रिम स्नेह ठेऊन शेवटीं त्यांशीं युद्धही केलें तें वर्त्तमान ऐकून नागपुरकर इंग्लीशांजवळ त्या पेशव्याची निंदा करूं लागला परंतु त्याच महिन्याचे सत्ताविसाव्यें तारिखेस तेथें इंग्लीशांचे लोक होते त्यांवर एकाएकी सेना पाठविली. तें त्याचें लश्कर नऊ हजार स्वार व नऊ हजार सुमारें पायदळ, त्यांत तिनचार हजार आरब कित्येका तोफांसहित होते. तेसमयीं तेथें इंग्लीशांचें +चवदाशें पायदळ व गोरे गोलंदाजसहित चार तोफा होत्या, आणि दोनशें सुमारें बंगाली पलटनाचे स्वार असत. तें युद्ध शितावल्दी नामक एक टेंकडी नागपूरशहराजवळ आहे तीच्या आसमंतात पडलें; त्याचा आरंभ अस्तमानीं होऊन दुसरे दिवशीं दोनप्रहरपर्यंत मोठ्या निकरानें चालिलें. त्यांत आरब व इंग्लीश यांहीं कोरेगांवच्या लढायीप्रमाणेंच परम शौर्य केलें. तसेंच इंग्लीशांकडे बंगालच्या त्यांतील सहाव्या रेजमिंटाचे स्वार होते, ते तर बहुतच उपयोगी पडले. त्यांहीं नागपुरकराचे स्वार यांच्या मोठ्या समुदायांत वेगानें प्रवेश करून, त्यांची उधळाउधळी होऊन त्यांतील कित्येक पायदळही मारून त्यांच्या दोन तोफा हिरून आणि त्या तोंपर्यंत इंग्लीशांच्या पायदळास जयाविषयीं संशय होता. मग हें करून त्यांहीं टेंकडीवरून पहातांच, त्यांस विशेष धैर्य उत्पन्न होऊन, ते जेकारपुरःसर मोठा शब्द करून, वेगानें पुढें सरून मराठ्यांचा मोड झाला. त्याप्रसंगीं इंग्लीशांचे मेले व जखमी मिळून सवातीनशें पडले; तितकेंच मराठ्यांचेंही निरुपयुक्त झालें.

तो आपासाहेब नागपुरकर याणें दग्याचें आचरण केलें तें सिद्धीस न गेलें ह्मणून आपला अनर्थ टळावयाकरितां इंग्लीशांस सांगून पाठविलें कीं, ही गोष्ट माझे आज्ञेनें न झाली. त्यावर साहेबानें उत्तर केलें कीं, मी तुमच्याजवळचे सर्व लोक दूर केल्याशिवाय तुमचा व आमचा व्यवहार चालणार नाही. नंतर चहूंकडून त्या साहेबाच्या साहाय्यार्थ आणिखी आणिखी फौजा येऊं लागल्यावर, दिसेंबरचे पंधराव्यें तारिखेस, त्याणें त्या आपासाहेबास

+ चौदाशें पायदळांत दोन कंपन्या तेथें इंग्लीशांच्या वकील त्याचें खासगीच्या असत बाकी सर्व मद्रासेचे होते.

निरोप पाठविला कीं, तुह्मांस आमचा स्नेह पाहिजे असल्यास, आपली सर्व फौज दूर करून मुलुखाचा रक्षणाचें काम आह्मांकडे ठेवावें; आणि तुमचा दुसऱ्या कोणापासून दगा न होण्यास तुह्मीं आमचे जवळ येऊन रहावें. या गोष्टीचें उत्तर करावयास तुह्माला या वेळेपासून पाहांटेची दोन घटका रात्र उरे तोंपर्यंत, अवकाश दिला.

असें होऊन ती वेळ गेल्यानंतर इंग्लीशांचें लश्कर त्या नागपुरकरावर चालिलें. तें समजून तो आपासाहेब स्वयें निघून साहेबाचे भेटीस आला, तेव्हां इंग्लिशांचें लश्कर तेथेंच उभें राहिलें असतां, त्याणें आपल्या तोफख्यान्यांतील संपूर्ण तोफा आणवून त्यास दिल्या; परंतु त्याचा ज्या तोफा बाहेर होत्या त्या जेव्हां इंग्लीश हस्तगत करूं लागला तेव्हां त्याचें मराठे लोक तयार होऊन इंग्लीशांवर चालिले. ते समयीं इंग्लीशांची फौज पुनः त्यांवर चालून मोठ्या बलात्कारानें त्याही तोफा घेतल्या.

शेवटीं त्या बाहेरच्या तोफा इंग्लिशांस न देणारे असे त्या नागपुरकराचे गणपतराव सुभेदार व मनभट नामें दोघे सरदार होते, त्यांतील गणपतराव तो बाजीरावास जाऊन मिळाला, आणि मनभट तो आपल्या आरबांसहित नागपुरच्या किल्यांत बळ धरून राहिला. तें ठिकाण इंग्लीश शिडीलाऊन एकदांच घेणार होते, तें सिद्धीस न जाऊन, थोडक्याच दिवसानीं ते आरब आपल्या परिवारासुद्धां इंग्लिशांचा अभयवचनानें निघून गेले असतां, तो मनभट त्यांचे स्वाधीन झाला. त्यापुढें नागपुरकर व इंग्लीश यांचा तह ठरला कीं, इंग्लीशांहीं नागपुरकराचा संपूर्ण मुलुख संभाळून त्यानांचौथीसलक्षरुपये प्रतिवर्षी उत्पन्न होतसा मुलुख त्या खर्चास द्यावा.

याप्रमाणें दक्षिणेंत व पूर्वेस दंगा होत असतां माळवा व हिंदुस्थानांत बंगाला व मद्रास यांच्या फौजा एकत्र मिळतानां त्यांहीं कित्येक जागीं पेंढाऱ्यांचा मोड केला होता, त्यांतील एक चितू नामें त्या पेंढाऱ्यांचा मुख्य त्याचा पाठीस जनराल मालकमसाहेब लागला तेव्हां, त्या चितूला होळकरानें आपल्या लश्करांत घेतला. याशिवाय अणखी कित्येका प्रकारांहीं होळकर आपला प्रतिपंथी, असें त्या मालकमसाहेबास विदित झालें. तेव्हां त्याणें त्या चितूची पाठ सोडून मायारा मद्रासेचा मुख्याची फौज होती, तींत जाऊन मिळाला. नंतर तेथून होळकरास काहीं वागणुकीचे प्रकार गवरनर जनरलाच्या कल्पनेप्रमाणें सांगून पाठविले. त्याचें उत्तर अधीगीकार सदृश होळकराकडचे गफूरखान वगैरे पठाणाचे सरदार यांहीं मल्हारराव होळकराचें आर्य देऊन, तैसा होईल असें कित्येक वेळा दर्शविलें; परंतु तेथ्ने वे-

ळास

ळेस त्यांचे स्वार आऊन इंग्लिशांचा कित्येक बुणग्याचा नाश करून म्हैसूरचा राजा तपस्वी म्हणून त्याचाही स्वारांवर हल्ला केला, त्यावरून तेथें जो इंग्लिशांचा मुख्य होता त्याणें निश्चय केला कीं, आतां या अनर्थाचा उपशम केलाच पाहिजे. ते समयीं त्या पठाणांहीं आपल्या मंडळांत फितुराचा शंकेनें यशवंतराव होळकराची स्त्री तुळसाबाई तीला मारून टाकून तिचा मुख्य कारभारी गणपतराव नामें होता त्यास बंदींत घातला. असें असतां तो शिप्रानदीपलीकडे होळकराचा तळ होता, त्यावर इंग्लीश चालिला.

ते समयीं होळकराचें लष्कर दहा हजार स्वार व दहा हजार पायदळ होतें. त्यांहीं त्या शिप्रानदीच्या वळणानें कोंपरा झालेली जागा, ती परम सुदृढ असें पाहून, तेथें स्थान धरून राहिले होते. त्या लष्कराचे डाव्ये बाजूस नदीची मोठी दरड, आणि उजवे बाजूनें मोठा ओढा असे; आणखी त्याणीं आपल्या लष्कराचें तोंड नदीकडे करून त्या आंगीं आपल्यापुढून मोठमोठ्या सत्तरसुमारें तोफा ओळीनें ठेविल्या होत्या. तेथें इंग्लीश त्यावर जाऊन पडल्याचे पूर्वीं, त्यांस ती नदी उतरावी लागली. तिचा प्रवाहापासून आठशें साडेआठशें पाउलें होळकराचा लष्करास अंतर होतें. तें स्थान असें दुर्गम आणि होळकराचें स्वार ही आपल्या समुदायांतून बाहेर निघून जिकडे तिकडे पसरून उत्तम प्रकारें लढत होते, तथापि इंग्लीश मोठ्या नेटानें त्या नदीचा उतार पार झाले; तेव्हांच शत्रूवर जाऊन पडावयाचे पूर्वीं आपल्या कवायदीचा बंदोबस्त राखणें त्यांस आवश्यक, त्यास कांहीं वेळ पाहिजे, आणि आपल्या तोफा होळकराचा मोठमोठ्या तोफांपुढें निरुपयुक्त म्हणून ते त्याच ठिकाणीं उभे राहिले असतां शत्रूकडील तोफांचा भडमारानें त्यांतील कित्येक मेले गेले. त्यांची तयारी झाल्यावर जनराल मालकम साहेबानें आपल्या लोकांसहित मोठ्या वेगानें त्यांवर चाल केली असतां, त्यापुढें शत्रूचा पक्षाचे पायदळ व स्वारांतील कोणी एकही टिकला नाहीं. त्याचे गोलंदाज मात्र आपआपल्या तोफांस टाकून जाईनात. तेणें करून ते बहुतेक त्या ठिकाणींच मेले गेले, इतर जे उधळून गेले होते त्यांचे पाठीस इंग्लीशांचे स्वार व पायदळही लागून त्यांचे तीन हजार लोक मारिले.

तेव्हां शत्रूनें आपल्या तोफांतील लहान लहान तोफा सहा नेऊन वरकड इंग्लीशांस प्राप्त झाल्या. त्या युद्धांत इंग्लीशांचें सैन्य पायदळ, एक पलटण गोरे लोक, व सात पलटणें काळे लोक, आणि काळे स्वार चार पलटणें, व गोरे स्वार सुमारें दोनशें, व कित्येक साधे बारगीर, या इतक्यांतून पावणें आठशें निरुपयुक्त झाले. तें युद्ध मेहदपुर नामें गावांजवळ झालें म्हणून त्यास

मेहद

मेहदपुरची लढाई असें नांव पडलें. त्या युद्धांतून होळकराचें एक पलटन आपल्या वटावल्यानें रामपुरापर्यंत गेलें होतें, तेथें अगाल्याच्या लष्कराचें एके टोळीची गांठ पडून, त्याची उधळाउधळी झाली.

असा जय झाल्यानंतर तो मालकमसाहेब त्या शत्रूच्या पाठीस लागला असतां मंदीसुरास होळकराचा पुत्र मल्हारराव तो इंग्लीशांच्या स्वाधीन झाला. तसमयीं इंग्लीशांचें व त्याचें ऐक्य होऊन ठरलें कीं, अमीरखानानें पूर्वीं जो तह होळकराच्या नावानें केला होता, तो मान्य. त्या खेरीज त्या होळकरानें इंग्लिशांच्या पक्षी कोट्याच्या राणायासही कित्येक परगणे दिले. व पूर्वीं होळकर रजपुतांपासून खंडणी घेत होता ती इंग्लिशांहीं घ्यावी, आणि बुंदीपर्वताचे उत्तरकडे व सातपुड्याचे दक्षिणेकडे जितकी त्याची सत्ता होती, तो मुलूखही इंग्लीशांस दिला. या खेरीज इंग्लिशांहीं होळकराचा मुलखाचें रक्षण करावें त्याकरतां त्याची तीन हजार फौज असावी.

मराठे मेहदपुरचे लढाईनंतर आपला अर्थ सिद्धीस जात नाहीं असें समजून त्यांहीं तो उद्योग टाकिला. बाजिरावाजवळ मात्र थोडकेसे लोक उरले असतां त्यास कर्तव्यार्थ सुचेना त्यामुळें तो मुलखोमुलखीं पळत सुटला. त्यावर चहूंकडून इंग्लीशांच्या फौजा जात होत्या.

शिंद्यास मेहदपूरचें वर्तमान कळून तो इंग्लीशांच्या मुद्रानें वागूं लागला त्याचा कोणी सरदारांहीं बळ धरून इंग्लीशांस किल्ले द्यावयाचा अडथळा केला, त्यांवर फौजा पाठवून थोडक्यांत वेळानें इंग्लीशांहीं त्यांस जिंकिलें.

अमीरखान व पेंढारलोक पूर्वींच शिनावल्डींचे लढाईपासून समजल्याचें बळ चालणार नाहीं असें समजून साहेबानें ठरविलेल्या तहाप्रमाणें वर्तूं लागले.

पेंढारी लोकांवर बंगाला व मद्रास व मुंबईच्या सैन्याच्या टोळ्या जाऊन त्यांतील कित्येक पेंढाऱ्यांस मारून त्या लोकांहीं जें जें मुलूख घेतले होते ते सोडवून त्यांचे त्यांस माघारे देऊन, त्यांचे मोठमोठे सरदार धरून आणिले. त्यांपैकीं नामदारखान व करीमखान स्वतः आपण होऊन फेब्रूआरींत मालकमसाहेबाचे स्वाधीन झाले. तिसरा वासिलमहमद तो शिंद्याचें स्थान ग्वाल्हेर येथें आश्रय मागत होता त्यास इंग्लीशांच्या सांगण्यावरून शिंद्यानें त्यांचे स्वाधीन केला. आपला चितु यास बहुत संकटें प्राप्त होऊन शेवटीं तो असीरगड किल्ल्यास येथें त्याणें आश्रय धरिला तेंही स्थान इंग्लीश लढून घेऊं लागले असतां, तेथून तो चितु एकटाच रानांत पळाला;

ला; त्यास एका व्याघ्रानें त्या अरण्यांत मारिला असें निश्चित समजण्यांत आलें.

पश्चिमेकडे मुंबईच्या सरकारानें पूर्वींच फौजा पाठवून रायगडवगैरे कोंकणांचे लहान मोठे किल्ले सर्व घेतले; असें असतां बाजीरावमात्र साहेबांचे हस्तगत व्हावयाचा राहिला. तेंही त्याच वर्षाच्या जुलायी महिन्यांत सिद्धीस गेलें. तो प्रकार लिहिल्याचे पूर्वीं नागपुरकराचें कांहीं वर्तमान समजलें पाहिजे.

तो आपासाहेब नागपुरकर शिताबर्डीचे लढाईनंतर इंग्लीशांच्या स्नेहानें पुनः आपल्या गादीवर बसल्यापासून त्याणें अनेक प्रकारें विपरीत वर्तणुकी गुप्तपणें केल्या. त्यांत गोंड नामें कोणी रानवट लोक यांस बंड उठवावयाची मसलत दिली; आणि आपण इंग्लीशांस किल्ले द्यावयास कबूल होऊन किल्लेदारांस आंतून सांगीतलें कीं, किल्ले न द्यावे. याशिवाय तो बाजीरावासही ह्मणत असे कीं, तुमची कुमक असल्यास आह्मी इंग्लीशांस उलटून रोध सांगूं. हें सर्व प्रकरण इंग्लीशांच्या वकीलास विदित झालें होतें, त्यावरून बाजीरायाणें गणपतराव सुभेदार यास वरदेवर फौज पाठविली असतां त्यावर इंग्लीशांची पलटनें जाऊन त्यांची वरदानदीचे कांहीं गांठ पडून एथें कांहीं चकमकी झाल्या [illegible] त्याचा पराभव झाल्यानंतर तो आपासाहेबही नागपुरीं इंग्लीशांहीं कैद केला.

त्यापूर्वींच बाजीराव नागपुराच्या मुलखीं आश्रयार्थ वरदानदीच्या पश्चिमेस जाऊन उतरला असतां तेथूनही एका रात्रीं [illegible] जाऊं लागला, [illegible] उठून सेवनीपाशीं इंग्लीशांच्या [illegible] टोळीची गांठ पडली तेव्हां त्याच्या लोकांचा नाश होऊन [illegible] होते तेही बहुतेक आपआपल्या ठिकाणास गेले.

यानंतर बाजीरावाचें [illegible] सर्वत्र इंग्लीशांचा बंदोबस्त आहे असें पाहून [illegible] न, मालकमसाहेब इंदुराजवळ [illegible] होता त्यास [illegible] लिहून पाठविलें; नंतर जुलायी महिन्याचे [illegible] तारिखेस त्याची व साहेबांची भेट होऊन तो राज्यरहित होत्साता इंग्लीशांचे स्वाधीन [illegible]. ते समयीं ठरलें कीं, त्याणें राहावें [illegible] इंग्लीश ठेवतील तो खर्च [illegible]. तेव्हां त्या मालकमसाहेबानें कृपाळू होऊन त्याचा भाऊ अमृतराव यास [illegible] पीं आठलक्ष रुपये कंपनी सरकारांतून पोंहचत आले, तसेंच [illegible] असें केलें. ही गोष्ट कलकत्याचा मुख्य गवरनर जनरल साहेब यांच्या [illegible]

येऊन त्याणें त्या बाजीरावास बंगाल्याकडे कानपुरापाशीं बेदूर नामें क्षेत्र आहे ती जागा रहावयाची नेमिली, त्याठिकाणास मराठे ब्रह्मावर्त ह्मणतात.

त्रिंबकजी डेंगळा याचे पाठीस इंग्लीशांची टोळी लागून त्यास खानदेशांमध्यें अहीर गांवाजवळ धरिला, तो तात्काळ बंगाल्यांत चुनारगड नामें सुदृढ किल्ला आहे तेथें बंदीस घातला.

नागपुरकर आपासाहेब यास कैदकरून बंगाल्यांत पाठवितांना, तो कांहीं सवड पाहून पळाला, त्याणें शिखलोकांचे मुलखीं जाऊन आश्रय धरिला. तो कपटी व अविचारी व पराक्रमशून्य ह्मणून साहेबलोक त्याची गणना करीत नाहींत.

असें उत्तरेकडे वर्तमान असतां एप्रेलाचे अकराव्ये तारिखेस इंग्लीशांहीं साताऱ्याचा राजा मोठ्या समारंभानें गादीवर बसविला, त्यास मुलुख पश्चिमेस सह्याद्री पासून वर्ती पंढरपुरापलीकडे कांहींसा, व दक्षिणोत्तर वारुणा नदी व निरानदी यांची मर्यादा करून दिला. त्या मुलुखांत बाजीरावाचे कांहीं उरलेले पायदळ लोक सुमारें साडेचार हजार व तेरा तोफा इतक्यांसहित गणपतराव सुभेदार उपद्रव करीत असे तें समजून मद्रासेचा कोणी जनरल मनरो नामें साहेब मोठा विख्यात होता, ज्याणें कर्नाटक सरसुभा घेतला. तो साहेब तेथून उत्तरेस जाऊन सोलापुरचा किल्यापाशीं त्याची गांठ पडून युद्ध होऊन त्या गणपतरावाचे बहुतेक लोक मारून त्यास हांकून दिला. नंतर थोडक्याच दिवसांनीं तो किल्लाही घेतला.

याप्रमाणें संपूर्ण दक्षिण मुलुख इंग्लीशांच्या सत्तेंत येऊन मग तेथील जहागिरदार वगैरे जे इंग्लीशांस अनुसरून किंवा तद्विपरीत होते, त्यांस कोण कोणत्या प्रकारें देण्याघेण्याच्या योगें वाढवावें किंवा बलहीन करावे त्या योजनेचा विचार इंग्लीश करूं लागले.

प्रथम बुंदीचा राजा रजपूत याचा पहिल्यापासून इंग्लीशांशीं स्नेह होता, त्याला पूर्वीं शिंद्यास खंडणी द्यावी लागत असे तें चुकलें; व शिंदे आणि होळकर यांहीं बलात्कारें जो त्याचा मुलुख घेतला होता तो त्यास पुनः प्राप्त झाला. असाच भोपाळचा रजपूत राजाही पूर्वीं इंग्लीशांच्या उपयोगीं पडलेला त्यास आष्टा, व इच्छावर, व सेहोर, व दोराहा, व देवीपाना नामें पांच परगणें, व माळव्यांतील जप्त केलेल्या विंचुरकराचा कांहीं मुलुख आणि सुजावलपूर परगण्यांतील कांहीं भाग व किल्ला इस्लामनगर नामें तो, शिंद्याकडे असे त्याबद्दल दुसरा कांहीं मुलुख देऊन तें स्थान त्यास दिलें.

निजाम याच्या बाजीरावाचे द्वेषें संग्रामकाळापर्यंत होते तें फिटावयासा

ठीं

ठीं त्याजा पेशव्यास दहा लक्षांचा मुलुख द्यावा लागता, तो न लागला. व पेशव्याकिंवा त्याचे लोक त्या निजामाच्या राज्यांतील बारा लक्षांचा मुलुख इंग्लीशांशीं व मराठ्यांशीं युद्ध लागे तोंपर्यंत वहिवाटीत होते, तो त्याचा त्यास प्राप्त झाला. या खेरीज होळकर व नागपूरकर यांचा मुलखांतील सहा लक्षांचा सुमारें मुलुख इंग्लीशांहीं त्यास दिला. तेव्हां त्या युद्धाचे पूर्वीं जें त्या राजास मिळत होतें त्यापेक्षां अठ्ठावीस लक्ष रुपये अधीक मिळूं लागले असतील अशी अटकळ होत्ये.

दक्षिणेंत जितकीं वेतनें व अग्रहारें व इनामें पुरातन चालत आलीं होतीं. तीं इंग्लीशांहीं तशींच राखिलीं. आणि जहागिरदारही बहुतेक तसेंच राखिले. कोल्हापुरकरास पहिल्यापेक्षां विशेष, चिकोडी व मनोळी हे दोन परगणे मिळाले. या खेरीज जे कोणी इंग्लीशांचा पक्ष धरिलेले गृहस्थ लोक होते, त्यांस अनेक प्रकारें संतुष्ट केले. दुसरें जे सरकारचे कारभारी नेमणुके वांचून बाजीरावाजवळ उगेंच आश्रयमात्र धरून राहिलेले, यांस व नाना फडनवीसाचे वेळेपासून जे मोठे मोठे दरिद्री झालेले होते, त्यांस योग्यतानुसार कोणास कांहीं जमीनी व कोणास कांहीं द्रव्य देऊन, एलफिनस्तन साहेबानें सुखी केले. तसेंच कित्येक सरदारही दरिद्रानें पीडिलेले पाहून, त्यांस कांहीं निर्वाहाच्या कल्पना योजिल्या, व पुण्यामध्यें सर्व हिंदु लोकांस आपआपल्या रीतीप्रमाणें गणितादि विद्या शिकावयाची शाळा घातली.

इंग्लीशांहीं युद्ध यत्नें करून मराठी राज्य संपादिलें असतां, कोणाचेंही अनिष्ट न होय अशी कल्पना योजून त्या राज्यांतील संपूर्ण प्रजेस सुखकारक अशा वर लिहिलेल्या मर्यादा करून ठेविल्या. यांचे मुख्य कर्ते, महा समर्थ परम दयावंत ऐसे इंग्लीशांचे गवरनर जनराल मारक्कीस हेसतिङ्स साहेब, व त्यांचे सहाय तत्समानशील मोठे नामांकित एलफिनस्तन साहेब; हे पुरुष सुकीर्ति साधन दक्ष यांणीं हिंदूंच्या मुलखांतील संपूर्ण प्रजेचें हित साधिलें; त्यायोगें यांचें स्मरण लोकांच्या मनांतून भ्रष्ट न व्हावें.

**समाप्त**

इंग्रेजांचा इशवीसन् निघाल्यापासून, पुढें, हिंदूंचा शालीवाहन शक कोणत्या वर्षी
चालू झाला, तें, व इंग्रेजी आणि हिंदी भाषाभेदेंकरून महिन्यांचीं नांवें व त्यांचा
रंभ कसकसा होतो, तें प्रकरण. जर कोणी इच्छा करील कीं इंग्रेजांचा इशवीसन नि
घाल्यापासून, पुढें कितीं वर्षांनीं हिंदूंचा शालीवाहन शक चालू झाला; तें वर्ष ध्यानांत
वें. तर त्याणें इशवीसनाचीं अठ्याहत्तर, किंवा एकुणऐंशीं वर्षें वजा करावीं, म्हण
शालीवाहन शकाच्या आरंभाचें वर्ष कळेल. यास प्रमाण; हल्लीं इशवीसन अठरा
एकुणतिसांच्या चवथा महिना, एप्रेल याची तारीख चवथी; त्यादिवशीं, हिंदूंचा श
लीवाहन शकाचें सत्राशें एकावन्नावें वर्ष निघालें; यावरून अर्थात सिद्ध झालें कीं
इशवीसन अठराशें एकुणतिसांत शालीवाहन शके सत्राशें एकावन्न वजा दिल्य
अठ्याहत्तर उरतात. त्या अठ्याहत्तराव्या वर्षी, मार्चाची समाप्ति, व एप्रेलाचा
रंभ अशा संधींत, शालीवाहन शक निघाला. सन अठराशें एकुणतिसांच्या एप्रेल
चवथे तारिखेच्या पूर्वीं, शके सत्राशें पन्नास होते; त्यावरून असा अर्थ झाला कीं
न अठराशें एकुणतिसांत शके सत्राशें पन्नास वजा दिले असतां; एकुणऐंशीं शे
रहातात. त्या एकुणऐंशाव्या वर्षी मार्चाची समाप्ति व एप्रेलाचा प्रारंभ अशा स
धीं शालीवाहन शकाचा प्रारंभ झाला.

यास दुसरें प्रमाण इंग्रेजांचे इशवीसन अठराशें एकुणतिसांत, हिंदूंचे श
लीवाहन शके सत्राशें पन्नासाची समाप्ति व सत्राशें एकावन्नाचा आरंभ.

इंग्रेजी आणि हिंदी महिन्यांचीं नांवें व त्यांच्या आरंभाचा प्रकार असा.

| | | |
|---|---|---|
| १ जानेवारी यांत | १० पौषयाची समाप्ति व | ११ माघयाचा आरंभ. |
| २ फेब्रुवारी यांत | ११ माघाचा शेवट आणि | १२ फाल्गुनाचा आरंभ. |
| ३ मार्च यांत | १२ फाल्गुनाची समाप्ति व | १ चैत्राचा आरंभ. |
| ४ एप्रेल यांत | १ चैत्राचा शेवट व | २ वैशाखाचा आरंभ. |
| ५ मे यांत | २ वैशाखाची समाप्ति व | ३ ज्येष्ठाचा आरंभ. |
| ६ जून यांत | ३ ज्येष्ठाचा शेवट व | ४ आषाढाचा आरंभ. |
| ७ जुलई यांत | ४ आषाढाची समाप्ति व | ५ श्रावणाचा आरंभ. |
| ८ अगष्ट यांत | ५ श्रावणाचा शेवट व | ६ भाद्रपदाचा आरंभ. |
| ९ सप्टेंबर यांत | ६ भाद्रपदाची समाप्ति व | ७ आश्विनाचा आरंभ. |
| १० अक्टोबर यांत | ७ आश्विनाचा शेवट व | ८ कार्तिकाचा आरंभ. |
| ११ नवेंबर यांत | ८ कार्तिकाची समाप्ति व | ९ मार्गशीर्षाचा आरंभ. |
| १२ डिसेंबर यांत | ९ मार्गशीर्षाचा शेवट व | १० पौषाचा आरंभ. |

# शुद्धिपत्र

## सर्वभागानुक्रमणिकादि

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | +६ | त्याणेंकरून | तेणेंकरून |
| ४ | ७ | पांचव्ये | चवथ्ये |
| १० | २ | फौजेसुद्दा | फौजेसुद्दां |
| १० | ११ | नांव | नाव |
| १४ | ११ | भोंसला | भोंसला |
| १४ | २० | खाच्या | खानाच्या |
| १५ | २३ | च | व |
| १५ | २६ | जा | जें |
| १६ | ११ | वेतला | घेतला |
| १९ | ४ | सागीतलें | सांगीतलें |
| २१ | १४ | फत्तेशिग | फत्तेशिंग |
| २१ | २२ | मसुलतीनें | मसलतीनें |
| २१ | २९ | पक्षानुसारीं | पक्षानुसारी |
| २२ | २३ | मराठ्यांतह्मचें | मराठ्यांशींतह्मचें |
| २३ | २ | कादरमामा | कादरनामा |

## मुख्यप्रकरणें संपूर्ण यांचें

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १३ | दिल्ला | दिला |
| ३ | २ | यास्तवं | यास्तव |
| ३ | ८ | माघारें | माघारे |
| ४ | १९ | कामांकरितां | कामाकरितां |
| ४ | २० | दिल्ली | दिली |
| ४ | २२ | नांवास | नावास |
| ४ | २४ | नांव | नाव |
| ४ | २९ | कित्येकं | कित्येक |
| ५ | १ | दिल्लीं | दिलीं |
| ६ | १ | वंदर | वंदर |
| ६ | ४ | दिल्ला | दिला |
| ७ | १० | दिल्ली | दिली |
| ७ | १२ | नांव | नाव |
| ८ | १३ | नांव | नाव |
| ८ | १८ | नांव | नाव |
| ९ | ५ | दिल्लेल्या | दिलेल्या |
| ९ | ७ | दिल्लें | दिलें |
| ९ | १२ | नांव | नाव |
| ९ | *१ | नांव | नाव |
| ९ | १७ | नांव | नाव |
| ९ | २९ | ह्मोनें | ह्मांनें |
| १० | ६ | गजमंडी | राजमंडी |
| १४ | ३२ | दिल्ली | दिली |
| १५ | ९ | दिल्लें | दिलें |
| १६ | ५ | दिल्ली | दिली |
| १९ | २ | बंदीन | बंदीन |
| १९ | २८ | दिल्लें | दिलें |
| २० | १२ | सांडें | सांडें |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २० | १३ | जाहालें | झालें |
| २२ | ९ | किल्ला | किल्ले |
| ३० | ३ | वालेकिला | वाळेकिल्ला |
| ३२ | १३ | मांगीं | मार्गी |
| ३६ | १४ | त्याणेंकरुन | तेणेंकरुन |
| ४१ | २१ | घुडलें | घडलें |
| ४३ | २४ | मांडावर | माडीवर |
| ४३ | ३२ | जवचा | जवळचा |
| ४५ | ३२ | आणिक | अणीक |
| ४५ | ३२ | फासकर | फासलकर |
| ४६ | २१ | पंताचों | पंताचा |
| ४७ | ३ | ती | तीं |
| ४८ | ११ | ताहीं | ताहींत |
| ५१ | ८ | औरंगजेंबानें | औरंगजेबानें |
| ५२ | ६ | एकाएकीं | एकाएकी |
| ५३ | २३ | माजन | माजुम |
| ५३ | २३ | किलेच्या | किल्याच्या |
| ५९ | ३ | पोंचला | पोंहचला |
| ६१ | ४ | फडनीस | फडनवीस |
| ६३ | ५. | फडनीस | फडनवीस |
| ८२ | १८ | दिल्ला | दिला |
| ८४ | १. | लश्वगावर | लश्कगावर |
| ८९ | ४ | मावडा | मावडा |
| ९० | ५. | कोलापुरांत | कोल्हापुरांत |
| ९० | ११ | कोल्यापुरांत | कोल्हापुरांत |
| ९६ | २१ | वळ्वेंगाव | वाळवेंगांव |
| १०१ | ११ | आणीक | अणीक |
| १०१ | २५. | एकूतांच | एकतांच |
| १०२ | २० | पोंचला | पोंहचला |
| १०३ | ३ | पोंचले | पोंहचले |
| १०३ | ३ | ओंसलेकडे | ओंसल्याकडे |
| १०३ | १२ | पोंचले | पोंहचले |
| १०३ | १५. | पोंचले | पोंहचले |
| १०३ | १६ | पोंचले | पोंहचले |
| १०५. | १३ | पेंढारी | पेंढारी |
| १०५. | २१ | त्याणेंकरुन | तेणेंकरून |
| १०५. | ३० | रिकाभी | रिकामी |
| १०६ | ३३ | कोलापुर | कोल्हापुर |
| १०७ | २. | कोलापुर | कोल्हापुर |
| १०७ | ९ | कोलापुर | कोल्हापुर |
| १०७ | २५. | कोलापुर | कोल्हापुर |
| ११४ | २ | आठवले | अटवले |
| ११४ | ४ | आठवले | अटवले |
| ११४ | ४ | नांव | नाव |
| ११४ | ८ | संकाजी | शंकाजी |
| ११७ | २१ | पोंचविली | पोंहचविली |
| ११८ | ३ | पक्षपात धरीत नसे | पक्ष धरीत नसे |
| ११८ | ६ | अशा निमित्तें करुन | अशा निमित्तें करुन |
| ११८ | १६ | संकाजी | शंकाजी |
| ११९ | १७ | आठवले | अटवले |
| ११९. | २५. | माघारें | माघार |
| ११९ | २९. | नांव | नाव. |
| ११९. | ३० | नांव | नाव |
| ११९. | ३१ | माघारें | माघार |
| १२० | १९. | नांव | नाव |
| १२२ | ४ | नांव | नाव |
| १२४ | २५. | त्यागेंकरुन | तेणेंकरुन |
| १२४ | २८ | किल्ले | किल्ले |
| १२५. | २८ | जहालें | झालें |
| १२५. | ३३ | तत्काळ | तात्काळ |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १३० | ७ | नाव | नाव |
| १३१ | २२ | शाहूंच्या | शाहूच्या |
| १३४ | १० | नांव | नाव |
| १३४ | २० | नांव | नाव |
| १३६ | ५ | लढाईत | लढाईत |
| १३७ | ३ | फडनीशी | फडनवीशी |
| १३७ | ३० | पक्षपात धरिला | पक्ष धरिला |
| १३८ | ८ | असतें | असें |
| १४१ | २६ | नांव | नाव |
| १४९ | २६ | उंचलायचाची | उचलावयाची |
| १५७ | ११ | कोलापुराकडे | कोल्हापुराकडे |
| १६२ | २३ | त्यांगेनशीं | त्यांगेनिशीं |
| १७० | २५ | ह्याकोण | ह्याकोणा |
| १७४ | १६ | मुख्यनयार | मुख्त्यार |
| १७८ | १ | सयायशें | सद्याशें |
| १८० | २७ | कदाप्रांतीं | कदाकप्रांतीं |
| १८१ | २८ | कदाप्रांतीं | कदाकप्रांतीं |
| १८२ | २९ | केले | केलें |
| १८७ | २६ | कोलापूरकर | कोल्हापूरकर |
| १८९ | ४ | जानागबाईच्या | जोनागबाईच्या |
| १८९ | ५ | कोलापुराहून | कोल्हापुराहून |
| १९३ | २१ | कोलापुराहून | कोल्हापुराहून |
| १९६ | २१ | कोलापुराहून | कोल्हापुराहून |
| २०२ | २३ | गाजीदिननामें | गाजीवदिननामें |
| २०४ | १० | घुंटी | घुटी |
| २०६ | १७ | मत्तेंत | सत्तेंत |
| २०९ | ५ | मराठंच्या | मराठ्यांच्या |
| २१० | ३२ | हैदरअली | हैदरअल्ली |
| २१६ | ८ | निमें | निंमें |
| २१८ | ३० | नांव | नाव |
| २२० | ६ | आठवलें | अटवलें |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २२३ | १ | आसामी | असामी |
| २२६ | २५ | अईज | अईच |
| २२७ | १५ | असाउठल्या | असा शब्द उठल्या |
| २३४ | १८ | आंला | आला |
| २४० | १ | अर्धेमर्धे | अर्धेमुर्धे |
| २४० | १० | अर्धेमर्धे | अर्धेमुर्धे |
| २४० | २४ | गंडूर | गंदूर |
| २४० | २६ | गंठूर | गंदूर |
| २४६ | १० | तुर्ते | तूर्ते |
| २४६ | ३२ | दफनार | दफ्तार |
| २५५ | २८ | कार्यसाधार्थे | कार्यसाधार्थे |
| २५५ | ३२ | जाधिनास्थान | जाधिनास्थान |
| २६२ | १६ | त्यापेंकरून | तेपेंकरून |
| २७१ | ११ | मरवावाप्र | मरव्यानामवाप्र |
| २७४ | २५ | उपद्रंव | उपद्रव |
| २८१ | २८ | बालकिल्ला | बालेकिल्ला |
| २९७ | ५ | जाचें | ज्यायाचें |
| २९८ | १४ | कुकंस | कुमकेस |
| ३०० | २५ | मराठ्यांतहाचें | मराठ्यांशींतहाचें |
| ३०४ | १ | गडी | गढी |
| ३०८ | ७ | यंसमयीं | इंसमयीं |
| ३१८ | १० | विशीं | विषयीं |
| ३१८ | ३१ | साहेबांसही | साहेबासही |
| ३२२ | १३ | भरवशावर | भरंशावर |
| ३२६ | १२ | नागपुरमध्यें | नागपुरामध्यें |
| ३२६ | ३० | गायकवाड | गाईकवाड |
| ३४० | २७ | हाईल | होईल |
| ३४१ | १७ | अगदी | अगदीं |
| ३४२ | १३ | हल्ली | हल्लीं |
| ३४३ | २३ | अगदी | अगदीं |
| ३४५ | ३ | पर्तमान | वर्तमान |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३४५. | २२ | संभाळितां | संभाळितों |
| ३४७ | ८ | वंश | वंश्य |
| ३४८ | ११ | माल्ल्यांचा | माल्ल्याचा |
| ३४८ | १७ | माल्ल्यांचा | माल्ल्याचा |
| ३५८ | २० | मडळीस | मंडळीस |
| ३५९ | ७ | भरवसा | भरंसा |
| ३५९. | १७ | आस्कानें | आक्स्मानें |
| ३६५ | १ | संकटींसमयीं | संकटसमयीं |
| ३७५ | २२ | खेडेकडे | खेंडेकडे |
| ३७६ | २२ | होत्या | होता |
| ३७९. | १२ | तो सर्व अनेक<br>प्रकारें | तो अनेक प्र<br>कारें |
| ३८२ | २१ | भासवड्यास | भांववड्यास |
| ३८४ | १३ | यांकडे | याकडे |
| ३८७ | ११ | अगनार्या | अग्नार्या |
| ३८८ | ४ | युत्योपयोग | युद्धोपयोग |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३८८ | ११ | त्या गोरेलोकां<br>चा कुमकें पुढें<br>सरून घडून<br>लढत अस<br>तां मद्रासेचें | त्या गोरेलोकां<br>चे कुमकेंस<br>मद्रासेचें प<br>लटनी स्वारये<br>ऊन पोंहचले |
| ३९० | १२ | याजवरून | याजयावरून |
| ३९९ | ※२ | माघारे | माघारीं |
| ३९९. | २२ | दंगे | दगे |
| ४०३ | १५. | तों स्वर्गीसस्था<br>न आपला पु<br>रातन आश्र<br>यभूत स्वर्गी<br>सस्थान | तों आपला<br>पुरातन आ<br>श्रयभूत स्व<br>र्गीसस्थान |
| ४२३ | १ | कित्येब | कित्येक |
| ४२५. | १० | गांडनामें | गोंडनामें |
| ४२६ | १२ | वारुणा | वारणा |

459

DS Duff, James Grant
432 History of the Marathas
M2D818

PLEASE DO NOT REMOVE
CARDS OR SLIPS FROM THIS POCKET

UNIVERSITY OF TORONTO LIBRARY